॥ श्री ॥

ब्रह्मीभूत श्रीनानामहाराज साखरेप्रणीत

सार्थ-ज्ञानेश्वरी.

लेखक

सुप्रसिद्ध सांप्रदायिक

श्रीनानामहाराज जोशी साखरे

यांचे चिरंजीव

विनायक नारायण जोशी साखरे.

मुद्रक व प्रकाशक

त्र्यंबक ह[illegible] ग[illegible]ते.

पुणें येथें सदाशिव पेठेंत "इंदिरा" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

नवी आवृत्ति.

मिति आषाढ शुद्ध १ शके १८३७.

तारीख १३ जुलै सन १९१५.

हा ग्रंथ **त्र्यंबक हरी आवटे** यांनीं पुणें पेठ सदाशिव येथील आपल्या ' **इंदिरा** ' छापखान्‍
छापून पुणें पेठ सदाशिव घर नंबर १८१ येथें प्रसिद्ध केला.

हा ग्रंथ सन १८६७ च्या २५ व्या कायद्याप्रमाणें नोंदून सर्व हक्क प्रकाशकानें
आपले स्वाधीन ठेविले आहेत.

प्रस्तावना.

सर्व जगतांत दुःखसंबंधरहित संपूर्ण सुखांच्या ऐश्वर्यानें मंडित असा कोण आहे, असें जर आपण सूक्ष्म रीतीनें विचार करून पाहूं लागलों, तर तशा प्रकारचा प्राणी फार विरळा, किंबहुना नाहींच म्हटलें तरी चालेल. प्रत्येकाचे पाठीमागें कांहींना कांहीं तरी दुःख आहेच. कोणास पुत्र नाहीं, कोणाची बायको कुरूप, कोणाजवळ द्रव्य नाहीं अशा प्रकारें कोणत्याना कोणत्या तरी कारणामुळें दुःख हें आहेच. एतावता, दुःखसंबंधरहित केवळ परमानंदाचा अनुभव कोणी घेत आहे असें सामान्य रीतीनें पाहणारास दिसत नाहीं; पण प्रत्येक प्राण्याची इच्छा तर तशी स्थिती आपणास असावी अशी आहे, व ती प्राप्त होण्याकरितां आपआपल्या बुद्धीनें ते लौकिक उपायही करीत असतात; परंतु लौकिकउपायेंकरून अत्यंत दुःखनाश होत नाहीं, व परमानंदाचा लाभही मिळत नाहीं. त्यास आचार्यद्वारां शास्त्रैकशरण होणें हाच उपाय आहे, ह्यावांचून दुसरा उपायच नाहीं. ही गोष्ट श्रुतीमध्यें अनेक ठिकाणीं सिद्ध केलेली आहे. पण त्या श्रुतीचे ठिकाणीं सर्व प्राण्यांस अधिकार नाहीं. कारण केवळ श्रुतिवाक्यावरूनच श्रुत्यर्थ ध्यानांत येण्याची योग्यता सर्वांचे ठिकाणीं नाहीं. जसा शूद्र किंवा स्त्रिया ह्यांचे ठिकाणीं अज्ञानाधिक्य असल्यामुळें त्यांस श्रुतीचे ठिकाणीं अधिकार नाहीं, तसाच स्मृतिवाक्यांचे ठिकाणीही नाहीं. ही जरी गोष्ट खरी आहे, तरी शूद्रांस किंवा, स्त्रियांस दुःखाचे अत्यंत निवृत्तीची आणि परमानंदप्राप्तिरूपमोक्षाची इच्छा नाहीं, असें मात्र नाहीं. सर्वांसच मोक्षाची इच्छा आहे. अशा सर्व जीवांची भगवान व्यास यांना करुणा येऊन सर्व वेदांचें सार अशी भगवद्गीता भारताच्या भीष्मपर्वामध्यें त्यांनीं ग्रथन केली. भारत हा ग्रंथ म्हणजे फार प्राचीन काळचा इतिहास आहे. त्यांत जागोजागीं भगवद्यश वर्णन केलेलें आहे, म्हणून पुण्यरूप आहे. फार काय सांगावें! वेदामध्यें जितका अर्थ प्रतिपादित आहे, तितका सर्व अर्थ व्यासांनीं या इतिहासांत प्रतिपादन केला आहे, म्हणून व्यास पांचवा वेद असें श्रेष्ठांनीं म्हटलें आहे. ह्या इतिहासाचें श्रवण करण्यास सर्वांस अधिकार आहे. याच्या श्रवणापासून वर लिहिलेल्या स्वरूपाचें मोक्षरूप फल श्रवण करणारास अथवा चिंतन करणारास प्राप्त होतें. त्यांतही भाषेच्या अडचणीमुळें सर्वांचाच प्रवेश होत नाहीं; व थोडेंसें संस्कृत भाषेचें ज्ञान असलें तर त्यापासून उत्तान अर्थ कळेल, परंतु त्यांतील रहस्य कळणार नाहीं; ह्याकरितां भगवान विष्णूंनीं ज्ञानेश्वराचा अवतार धारण करून सर्व अनाथ जीवांचा उद्धार करण्याकरितां त्यावर श्रीभावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) नांवाचा टीकारूप ग्रंथ केला. प्राकृत भाषेंत भगवन्मनोगत व्यक्त करून दाखविणारा ज्ञानेश्वरीशिवाय दुसरा ग्रंथच नाहीं, असें म्हणण्यास कांहींएक हरकत वाटत नाहीं. हें खुद्द श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आपले ज्ञानेश्वरीचे १५ वे अध्यायांत अश्वत्थपदाचें व्याख्यान करतेवेळीं लिहिलें आहे. तसें तेरावे अध्यायांतही महाराजांनीं स्पष्ट सांगितलें आहे. असो; संस्कृत समजणारांसही ज्याप्रमाणें शंकराचार्यांचें भाष्य समजून घेण्यास परंपरागत सांप्रदायिकांकडे जावें लागतें; त्यावांचून स्वबुद्धीनें भाष्य पाहूं म्हटलें तर कांहींएक समजत नाहीं, त्याचप्रमाणें हाही ग्रंथ परंपरागत सांप्रदायिकांस शरण जाऊन त्यांचेपासून समजून घेतला पाहिजे, अथवा साक्षात् श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं तरी एकाद्यावर अनुग्रह केला पाहिजे. त्यापैकीं दुसरी गोष्ट अत्युत्कट पुण्याईवांचून होणार नाहीं; असे पुण्यसंपत्तिमान् पुरुष फार थोडे, अशा भाग्यवान पुरुषांपैकींच **श्रीनानामहाराज साखरे** हे होत. ह्यांची परंपरा खालीलप्रमाणें आहे.

सुमारें १५० वर्षांपूर्वी श्रीज्ञानेश्वरमहाराज ह्यांचे रुपेस पुणें येथील केसकर ह्यांचे वंशांतील श्रीअच्युत महाराज नांवाचे पुरुष पात्र झाले. जन्मांतरींच्या बहुत पुण्याईनें ह्या भाग्यवान् पुरुषास अशी इच्छा झाली कीं, श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आपलेवर कृपा करून ज्ञानेश्वरी ग्रंथ समजून द्यावा! ही इच्छा पूर्ण व्हावी म्हणून त्या थोर पुरुषानें श्रीक्षेत्र आळंदी येथें उपोषित राहून महाराजांचे समाधीपुढें ज्ञानेश्वरीचें पारायण करण्यास आरंभ करून असा निश्चय केला कीं, ज्या दिवशीं महाराजांचा अनुग्रह होईल, त्याच दिवशीं महाराजांस नैवेद्य समर्पण करून पारणा करावयाची; नाहींपेक्षां अनुष्ठान करीत करीत प्राणत्याग करावयाचा! निश्चयाचें बळ। तुका म्हणे तेंचि फळ! ॥ श्रीअच्युतमहाराज ह्यांचा हा तीव्र निश्चय पाहून १७ वे दिवशीं रात्रीं श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं स्वप्नामध्यें

ान देऊन मस्तकावर वरदहस्त ठेविला, आणि सांगितलें
ीं, आजपासून तूं जो ज्ञानेश्वरीचा अर्थ सांगशील तोच
रोबर असेल. अशा रीतीनें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे क-
स पात्र झालेले श्रीअच्युत महाराज परमानंदाचा अनु-
व घेत घेत शेवटीं परमानंदरूप झाले. त्यांत एक कांहीं
धु शामराज महाराज म्हणून होते, त्यांजवर त्यांनीं
नुग्रह केला. असा जीवनन्मुक्तिसुखाचा अनुभव घेत
सतां अनंत जीवांवर त्यांनीं अनुग्रह केला. त्यांतच पुणें
थील राहणार व चिमाजीआप्पा (पेशव्यांचे बंधु)
ांचे खासगी कारभारी **रामचंद्रपंत जोशी** यांजवरही
यांनीं अनुग्रह केला, तो प्रकार असा:—

एके दिवशीं रात्रीं रामचंद्रपंत घोड्यावर बसून हिंडावयास
नेघाले असतां, येथील बुधवारांतील पासोड्या मारुतीचे
ळांत श्रीअच्युतमहाराज यांचें कीर्तन चालू होतें. तेथें
णभर उभे राहिले. श्रीअच्युतमहाराज यांची ज्ञानपूर्वक
क्ति, व निष्कपट वैराग्य पाहून, आणि अप्रतिम वक्तृ-
ा ऐकून दैवयोगानें त्यांस उपरति झाली त्यांचेजवळ
१ लाख रुपये रोख होते. पोटीं पुत्रसंतान वगैरे
ांहीं नव्हतें. अशा स्थितींत त्यांची अशी खात्री झाली
ीं, ह्यांचेशिवाय आपलें संसारदुःख कोणी निवारण
रणार नाहीं. ते दुसरे दिवशीं सकाळींच येथील सदाशिव
ठेंतील होदापलीकडे श्रीअच्युतमहाराज यांजकडे गेले,
णि हात जोडून म्हणाले कीं, माझेवर अनुग्रह व्हावा,
ी आपला शिष्य असून आपणास शरण आलों आहें.
व्हां अच्युत महाराजांनीं सांगितलें कीं, "बाबा, तूं
ीमंत आहेस, आम्ही गरीब आहों, अशा स्थितींत तुझें
ा आमचें जमावें कसें? परमार्थाला द्रव्य फार प्रति-
ंधक आहे!" असें श्रीअच्युत महाराजांचे मुखांतील
ाक्य श्रवण करितांच त्यांनीं लागलींच २१ लाख रुपचां-
र त्यांचे समक्ष उदक सोडलें, आणि बुधवारांतून मोरो-
ादादांचे होदाचें पाणी आपल्या खांद्यावर कावडीनें त्यांचे
येथें नेलें. तेव्हां, श्रीअच्युतमहाराज यांचें अंतःकरण
ुप्रसन्न होऊन त्यांनीं त्यांस उपदेश देऊन त्यांचेकडून
श्रीज्ञानेश्वरी ग्रंथ अध्ययन करविला. तसेंच २१ लाख
रुपये ब्राह्मणभोजनांत खर्च कर म्हणून सांगितलें. त्याप्र-
माणें त्यांनीं ब्राह्मणभोजनांत त्या द्रव्याचा व्यय केला. हें
ब्राह्मणभोजन करतेवेळीं पुणें येथें व श्रीक्षेत्र आळंदी
येथें अशी स्थिति झाली कीं, गांवांत व्यापाऱ्यांचे दुकानांत
तूप, व साखर मिळेनाशी झाली. तेव्हांपासून लोकांत
त्यांचें नांव **साखरेबोवा** असें पडलें. साखरेबोवा हे पुणें
आले तेथें रहात असत. त्यांनीं गोपालकृष्णाची मू
गोपालकृष्ण महाराजांच्या पादुका यांची स्थापना
शु० १३ रोजीं केली. ते असतांना वाढदिवसाचा उत्
ज्येष्ठ व० १३ पासून १५ वावेतों तीन दिवस कर
तसेंच श्रावणमासांत श्रावण वद्य १ पासून वद्य १० पावे
गोकुलअष्टमीचा मोठा उत्साह करीत असत. पुढें पुण
तील त्यांचे भाऊबंदांपैकीं गोविंदपंत जोशी यांचे च
पुत्र केशवराव, हरीपंततात्या, विनायकराव व पंढरीना
आबा हे चौघेही त्यांचे शिष्य झाले. पंढरीनाथ आबा (हेज
भर ब्रह्मचारी होते) ह्या चौघांची गृहस्थिति फार गरीबी
होती, तथापि त्यांची साखरेबुवांच्या ठिकाणीं असले
गुरुभक्ति मोठी अप्रतिम होती. ज्यावेळीं साखरेबोवांच
मनांत संन्यास करावयाचें आलें, त्या वेळीं हें संस्थ
कोणाचे स्वाधीन करावें, असा प्रश्न सहजच त्यांच्या
त्यांचे हजार बारांशें शिष्य होते त्यांच्या मनांत आल
त्या मंडळींत श्रीमान् लोक बरेच होते, त्यांनीं त्यांचेजव
संस्थान आमचेकडे द्यावें म्हणून प्रार्थना केली, परंतु आह
सर्वांचे म्हणण्याचा विचार करून काय करावयाचें तें कर
असें ते सांगत असत. शेवटीं त्यांनीं सर्वांस बोलावून अ
सांगितलें कीं, जरी आमचेजवळ श्रीमान् लोकांनीं दे
स्थानची मागणी केली, तरी आमचे मनोगताप्रमाणें दे
स्थान चालविण्याचें हरीपंततात्या व पंढरीनाथआबा ह्या
शिवाय दुसऱ्याचे हातून होणार नाहीं; जरी ते गरी
आहेत, तरी भगवद्भक्ति म्हणजे काय हें त्यांस
माहीत आहे. असें सर्वांसमक्ष सांगून देवस्थान त्यां
स्वाधीन केलें. तेव्हांपासून ह्या जोशांचे घराण्यास **साखरे** असें नांव पडलें, तें अद्याप चालू आहे. पुढें ते संन्यस्त
झाले त्या वेळीं त्या आश्रमांतील त्यांचें नांव ब्रह्मानं
स्वामी असें होतें.

ते पुणें येथें समाधिस्थ झाले, तेव्हां त्यांचे पट्टशिष्य
चौघे जोशी त्यांनीं त्यांचे इच्छेप्रमाणें व निष्ठेप्रमाणें त्यांच
समाधि श्रीक्षेत्र आळंदी येथें सिद्ध वेटांत त्यांस पुण्याहून
नेऊन दिली, व पुढें ते त्यांची पुण्यतिथि करूं लागले. ह्या
बंधुचतुष्टयांची आपले गुरूवर इतकी श्रद्धा असे कीं, आ
पले गुरु ज्या ठिकाणीं रहात असत, त्या ठिकाणच
कोणी गडी, मोलकरीण, माणूस, कारकून कोणीहीं त्यां
चेकडे येवो, हे सर्व बंधु त्यास वंदन करीत असत. इतकेंच
नव्हे, तर साखरेबोवा समाधिस्थ झाल्यास सुमारें १०
वर्षें झालीं व त्यांचे संस्थानचा उत्साह अद्याप श्रीनानाम

ण आंग्रे ह्यांच्या वाड्यांतील जानवीं काढण्यास बसणारे [illegible] पंढरीनाथ महाराजांनीं व्याही असें नांव दि- [illegible] प्रमाणें श्रावणमासाचा उत्साह सुरू झाला कीं पांहिल दिवशीं त्यांना भोजनास आमंत्रण करावयाचें ही गोष्ट अद्यापपावेतों साखरे यांचे घरीं चालू आहे. जोशी बंधुचतुष्टय यांचा " देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ॥ अन्न अच्छादन । हें तो प्रारब्धाधीन " इ- त्यादि वचनांवर पूर्ण निश्चय असल्यामुळें उपजीविकेच्या साधनांत कोणीच प्रवृत्त झालें नाहीं. त्या चौघांपैकीं हरी- पंत तात्यांस तीन पुत्र व चार कन्या असा परिवार होता. तथापि ते प्रपंचाकडे कधीं ढुंकून देखील बघत न- सत. उपरामस्थितींत ते नेहमीं असत. कोणी अंतरंगी पु- रुष आलाच, तर त्याच्याशीं अध्यात्मज्ञानाचीच गोष्ट बो- लावयाची, ह्यामुळें त्यांचे ठिकाणीं सर्व बंधूंची गुरुबुद्धी असे. त्यांच्या परिवाराचे संगोपनाची खटपट आपण स्वतः ब्रह्मचारी असतां खुद्द पंढरीनाथआबाच करीत असत. हीं मुलें लहान असतांच हरीपंततात्या हे वारले; पुढें पंढरी- नाथआबा यांनीं ह्या मुलांचा सांभाळ करून, गुरूकडून भाग्यानें प्राप्त झालेलें श्रीगोपालकृष्णाचें संस्थान व गुरूची कार्तिक शुद्ध ९ ची साखरेबुवांची पुण्यतिथि हीं कृत्यें ते त्यांचे हातून करवूं लागले, त्याचप्रमाणें श्रीज्ञानेश्वरी व अमृतानुभव ह्या ग्रंथांचेंही त्यांनीं त्यांचेकडून अध्ययन क- रविलें. श्रीहरीपंततात्यांचे मुलांपैकीं **रामभाऊ** व **नाना** हेच काय ते अध्ययन करण्याचे वयांत होते; आणि ते त्यांचे शिष्य होते. तिसरे **दामुअण्णा** हे त्या वेळीं लहान होते. त्यांपैकीं पंढरीनाथ महाराजांचे मनाप्रमाणें श्रीज्ञा- नेश्वरीचें अध्ययन **श्रीनानामहाराज** ह्यांनीं केलें. साख- रेबोवांचे देवस्थानचे संबंधानें गुरुवारीं व एकादशीस रात्रौ जागर व पहांटेस पंचपदी व रोज नित्य पंचपदी असा क्रम आहे; जागरास साखरेबोवांचे शिष्य व पुढें जोशी ह्यांचे झालेले शिष्य येत असत, त्यांचेपुढें पंढरीनाथ महा- राजांनीं **श्रीनानामहाराज** ह्यांचेकडून ज्ञानेश्वरी सांग- वावी; अशा रीतीनें **श्रीनानामहाराज** ह्यांचा सुमारें दहा बारा वर्षें श्रीज्ञानेश्वरी ग्रंथावर असा कांहीं अभ्यास झाला कीं, सर्व ज्ञानेश्वरी ग्रंथ त्यांस मुखोद्गत झाला. ते स्वप्नांत जरी बरळले तरी ज्ञानेश्वरीच्या ओंवीचा अर्थच बरळत. इतकी त्यांची त्या ग्रंथांत तयारी झाली. गुरुकृपेनें त्यांचे वक्तृत्वास इतका कांहीं मोहकपणा आला होता कीं, को- णीही सहज जरी श्रीनानामहाराजांचे मुखांतून ज्ञानेश्वरी- च्या चार ओंव्या ऐकिल्या तरी त्याची चित्तवृत्ति रंगून गेल्याशिवाय रहात नसे. ह्या अप्रतिम गुणामुळें, वडील व चुलते वारल्यानंतर ह्या संस्थानचे पारमार्थिक कृत्याचा सर्व भार **श्रीनानामहाराजां**वरच पडला. पूर्वी वडिलांनीं कीर्ति संपादन केली होतीच. त्यांतही **श्रीनानामहारा- जांचे** अंगचे गुणानें हीं सर्व कृत्यें मोठ्या व्यवस्थेनें चा- लली. **श्रीनानामहाराज** यांनीं आपलें सर्व आयुष्य श्रीज्ञानेश्वरीचे अध्ययनांत व अध्यापनांत घालविलें. कोणी कोणत्याही वेळीं कोणतेही जातीचा कोणच्याही अधिका- राचा मनुष्य त्यांच्याकडे जावो, त्याला आतां मी सांगत नाहीं, असें त्यांनीं कधींही कोणास म्हटलें नाहीं. ते असत तोंपर्यंत त्यांचे घरीं रोज ज्ञानेश्वरीचा पाठ व त्यावर प्रवचन चालत असे.

श्री ज्ञानेश्वरीवर होत असलेल्या **श्री नानामहाराज साखरे** यांच्या प्रवचनाचा लाभ मुमुक्षुजनास करून देऊन, वडिलांची सेवा करावी म्हणून मी **श्री नानामहाराज साखरे** यांनीं सांगितलेल्या अर्थाचा ' सार्थ ज्ञानेश्वरी ' नांवाचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला होता. त्याचा श्रद्धालु भाविक मुमुक्षुजनांत वारंवार पसार व्हावा याकरितां **श्री ना- नामहाराज साखरे** यांच्या ठिकाणीं त्र्यंबक हरी आवटे, इंदिरा छापखान्याचे मालक यांची आज ३०।३२ वर्षे असलेली भक्तिश्रद्धा व अध्यात्मिक ग्रंथप्रकाशनाची त्यांची आवड पाहून त्यांस तो प्रेमानें वारंवार प्रकाशनास दिला. त्यांनीं मोठ्या उत्साहानें सदर्हू ग्रंथास अनेक सद्- भक्तांच्या सूचनेवरून मोठा टाईप घातला आहे. त्यामुळें ज्ञानेश्वरीचा पाठ करणाऱ्या आबालवृद्धांच्या दृष्टीस को- णत्याही प्रकारचा त्रास न होतां पाठास सुलभ झालें आहे. ही सोय केल्यामुळें ग्रंथाचीं २०० पृष्ठें अधीक वा- ढलीं असूनही भाविक मुमुक्षु ग्राहकास सोयीवार पडेल अशीच सवलतीची किंमत ठेविली आहे. त्यांच्या प्रका- शनास वारंवार यश मिळो. असो. या ग्रंथांत दोष झाले नसतील असें मी म्हणत नाहीं तथापि विद्वान लोक ते दोष मला कळवून गुण मात्र ग्रहण करोत. अशी सर्व जीवांना बुद्धिदात्या नारायणाची प्रार्थना करून ही प्रस्तावना संपवितों.

विनायक नारायण जोशी साखरे.

श्रीनानामहाराज साखरे यांचे चिरंजीव,

हरिभक्तिपरायण विनायकबोवा साखरे.

चित्रशाळा प्रेस, पुणें.

॥ श्रीनारायणाष्टकम् ॥

श्रीज्ञानेश्वरभारतीकुमुदिनीगंधस्य यः पुष्पालिङ् ।
यश्चार्सीद्भवदावतापितजनत्रातस्य धाराधरः ॥
प्रारब्धोरितकर्मभिर्जनचयैर्यः पूरुषो भाविनो ।
ब्रह्मानंदजुषं तमस्तु नमनं नारायणाख्यं गुरुम् ॥ १ ॥
यं दूरीकृतविश्वभासतिमिरं कौतूलहोत्पादकम् ।
अद्वैताब्जविकासकं स्वमहसा मायाक्षपानाशकम् ॥
जीवालेरपि मोचकं रविनिभं प्राहुश्च यं कोविदा ।
ब्रह्मानंदजुषं तमस्तु नमनं नारायणाख्यं गुरुम् ॥ २ ॥
निर्मोहेन सदा स्वभक्तानिखिलस्वश्रेयसेनोद्भवत् ।
प्राणांतांबुभृदोघतीव्रमरुता स्वीयाऽशुभं नाशितम् ॥
वैराग्यामृतसेविनश्च सुहृदा येनैव कालो जितो ।
ब्रह्मानंदजुषं तमस्तु नमनं नारायणाख्यं गुरुम् ॥ ३ ॥
अंतःशत्रुजिते निजात्मकलया नित्यं जगद्व्यापिने ।
विश्वाभ्रस्य विहायसाय सततं यस्मै भवध्वंसिने ॥
संस्कारात्प्रतनाद्धि केशवपदे भक्तिः सदाऽरोचत ।
ब्रह्मानंदजुषं तमस्तु नमनं नारायणाख्यं गुरुम् ॥ ४ ॥
यस्माच्छात्रगणस्य संसृतिभवं दुःखं च मायाकृत ।
व्यामोहो विलयं जगाम सपदि स्वांतस्य यो मोहकः ॥

यस्माच्छांतिदमादिपीडिततमाः क्रोधादयो निर्गताः ।
ब्रह्मानंदजुषं तमस्तु नमनं नारायणाख्यं गुरुम् ॥ ५ ॥

सच्छिष्यैर्गुरुचिंतनं मलयजं कृत्वेंद्रियाणां गणं ।
पुष्पाणि प्रतिघादिकांश्च पडरीन्धूपं मनोदीपकम् ॥
नैवेद्यं च मतिं विधाय विहितं यस्याऽनिशं पूजनम् ।
ब्रह्मानंदजुषं तमस्तु नमनं नारायणाख्यं गुरुम् ॥ ६ ॥

अज्ञाहंमतिहारके भवभयान्नित्यं नृणां तारके ।
सर्वेषां सुखकारके जनमनस्संतापसंहारके ॥
उत्कर्षस्तमसश्च सत्त्वरजसोर्यस्मिन्विनष्टोऽभवत् ।
ब्रह्मानंदजुषं तमस्तु नमनं नारायणाख्यं गुरुम् ॥ ७ ॥

भो भोः संसृतिदुःखकर्षितजनव्रातस्य पीडापह ।
भोः सौख्यप्रद शांतियुक्तमनसां निर्द्वंद्वतैकप्रिय ॥
पाह्यस्मानिति यो मुमुक्षुनिवहैर्ज्ञानाप्तये प्रार्थितो ।
ब्रह्मानंदजुषं तमस्तु नमनं नारायणाख्यं गुरुम् ॥ ८ ॥

अज्ञानौघनिवारणात्तवपुषो भक्ते दयां कुर्वतः ।
प्राप्तज्ञानचकोरवृंदशशिनस्तस्य प्रशांतात्मनः ॥
संचक्रे शिवराम आहततनोश्चैतद्गुरोरष्टकम् ।
तेनैवाल्पधिया समर्पितमिदं श्रीसद्गुरोः पादयोः ॥९॥

इति श्रीगुरुनारायणाष्टकस्तोत्र संपूर्णम् ॥

उपक्रम.

गीताशास्त्र.

कौरव-पांडवांचें पूर्ववृत्त.

पूर्वी भरत कुलामध्यें **शंतनु** नांवाचा राजा राज्य
ा असतां त्यास **गंगा** नांवाच्या स्वर्गस्थ देवीचें द-
झालें. एकमेकांवर प्रेम जडून पुढें विवाहही झाला.
ही स्वर्गातील नदी असतां शापामुळें ती या मृत्यू-
त आली होती. त्यांचें लग्न झालें खरें, परंतु त्या-
असें ठरलें कीं, आपणांस होणारे संततीवर फक्त
च हक्क अमून तिचे मताविरुद्ध राजा वागल्यास
राजास सोडून जावें. पुढें गंगेस सात पुत्र झाले. ते
तेनें नदींत सोडून दिले, त्यामुळें राजास फार खेद
, परंतु गंगेचें अप्रतीम सौंदर्य व लग्नाचे वेळेचा
या दोन कारणानें त्यास कांहीं बोलतां येईना. पुढें
ा मुलगा झाला; त्यासही जेव्हां गंगा पाण्यांत सो-
ऊं लागली, तेव्हां राजाचा शोक अनिवार होऊन
" हा तरी मुलगा पाण्यांत टाकूं नको; माझ्याने
क सहन होत नाहीं " अशी तिची करुणास्वराने
केली. त्यावरून गंगेनें पुत्रास मारिलें नाहीं, परंतु
वेळचा करार राजानें मोडला म्हणून ती स्वतः
गेली. तशा प्रकारचा तिला उश्शापच होता. असो.
ठव्या पुत्राचें नांव देवव्रत होय. ह्यासच गांगेय
न. ह्यानीं आपल्या गुणानें सर्व प्रजाजनांचीं मनें
ग करून घेतलीं. त्याप्रमाणें राजाचेंही प्रेम त्याज-
, म्हणून त्यानें लौकरच देवव्रतास युवराज पदवी
आपण मृगया करूं लागला. पुढें एके दिवशीं
ती नामक एक कोळ्याची कुलीन परंतु गरीब
त्याचे दृष्टीस पडली. गंगेच्या विरहदुःखामुळें आ-
यवतीचें पाणीग्रहण करावें अशी त्यास इच्छा
ा ती त्यानें तिचे बापास कळविली. माझ्या मुलीस
त्रासच सर्व राज्य देईन, असें कबूल असल्यास
देतों, असें बापानें सांगितलें. देवव्रतावरील प्रे-
जास तें कबूल करवेना आणि सत्यवतीवरील
प्रेमही कमी होईना, ह्यामुळें राजा झुरणीस लागला. देव-
व्रतास ही हकीगत कर्णोपकर्णी समजली. आपल्यामुळें
पित्याचे मनोरथ पूर्ण न होऊन त्यास कष्ट होतात हें
चांगलें नाहीं, असें त्यास वाटून तो कोळ्याकडे गेला.
कोळ्यानें आपली अट देवव्रतास कळविली, ती त्यानें क-
बूल केली. तथापि कोळ्यास देवव्रतानें जर आपला रा-
ज्यावरील हक्क सोडला नाहीं तर सत्यवतीचे मुलास राज्य
मिळणार नाहीं, अशी शंका येऊन त्यानें ती देवव्रतास
स्पष्ट कळविली. त्यावर देवव्रतानें उत्तर दिलें कीं, मी
पूर्वीच राजास आपली प्रतिज्ञा कळविली आहे ती अशी:-

राज्यं तावत्पूर्वमेव मया त्यक्तं नराधिपाः ॥
अपत्य हेतो रपि च करिष्येऽद्य विनिश्चयं ॥
अद्य प्रभृतिमे दारा ब्रह्मचर्यं भविष्यति ॥

राज्यावरील माझा हक्क मी आतांच सोडून दिला आहे.
कदाचित् माझ्या प्रजेपासून तुम्हांस त्रास होईल, असें
तुम्हांस वाटत असेल तर " मी आजपासून आमरणांत
ब्रह्मचर्यव्रतानें राहीन, हें तुम्हांस प्रतिज्ञापूर्वक सांगतों "
हें ऐकून कोळ्यानें सत्यवती शंतनूस देण्याचें कबूल केलें.
देवव्रताचें हें पित्यावरील प्रेम व पित्याचे सुखासाठीं रा-
ज्यवैभव व स्त्रीसुख आमरणांत भोगावयाचें नाहीं, अशा
अर्थाची त्यानें केलेली घोर प्रतिज्ञा ऐकून आकाशांतून देवां-
नीं त्याजवर पुष्पवृष्टी केली आणि 'भिष्मोऽयं' (हा घोर
प्रतिज्ञा करणारा भीष्म आहे) अशी आकाशवाणी झाली.
तेव्हांपासून त्याचें नांव **भीष्म** असें पडलें.

भीष्माचें हें कृत्य पाहून शंतनूस फार संतोष झाला.
पुढें सत्यवतीपासून शंतनूस चित्रांगद व विचित्रवीर्य असे
दोन पुत्र झाले. पुढें शंतनू मरण पावला. नंतर भिष्मांनीं
चित्रांगदास राज्यावर बसविलें. तोही एका युद्धांत मृत
झाला. नंतर अल्पवयी विचित्रवीर्यास गादीवर बसवून
त्याचे नांवानें राज्यकारभार चालविला. पुढें काशी राजा-

च्या **अंबा, अंबिका** व **अंबालिका** ह्या तीन मुली. तिघी अंबिका व अंबालिका ह्या दोन मुलींचा चित्रवीर्याबरोबर विवाह केला.

शंतनु राजास गंगेपासून जन्मलेला मुलगा भीष्म पण त्यानें आजन्म ब्रह्मचारी रहाण्याची प्रतिज्ञा केली, व आपले दोन्ही पुत्र जाऊन त्याच्या **अंबिका** व **अंबालिका** ह्या दोन विधवा राहिल्या, हें पाहून सत्यवतीस अत्यंत दुःख झालें. नंतर तिनें भीष्माला त्या सुनांचे ठिकाणीं नियोगानें पुत्रोत्पत्ती कर, किंवा स्वतः राज्याभिषेक करून घेऊन व विवाह करून आपलें भारत कुळ समूळ नष्ट होणार नाही, अशी तजवीज कर असें सांगितलें, व त्यास दुसऱ्या आपद्धर्मांनीं संमतीही दिली. परंतु **आपली प्रतिज्ञा खरी करण्यासाठीं राजलक्ष्मी व स्त्रीसुख हीं त्यानें लाथेनें झुगारून दिलीं. केवढी सत्यप्रियता ही !** त्यानीं सत्यवतीला एकांत सांगितलें कीं, " सत्याच्युतिः क्षत्रियस्य न धर्मेषु प्रशस्यते " क्षत्रियानें कसल्याही प्रसंगीं **सत्यभ्रष्ट** होऊं नये, असें धर्मशास्त्र आहे. ह्या राज्याची काय किंमत आहे, परंतु त्रैलोक्याच्या राज्यसुखाकरितांही मी सत्य कधींही सोडणार नाहीं. आतां कुलाचें निसंतान होण्याचा दुर्धर प्रसंग आला असतां वेदवेत्त्या तपोनिष्ठ ब्राह्मणाकडून नियोगानें पुत्रोत्पत्ती करविण्याची क्षत्रियांना शास्त्राची आज्ञा आहे. पाहिजे तसें कर; असें सांगितल्यावरून सत्यवतीस आपण कोळ्याचे घरीं असतांना पराशरापासून व्यास नामक पुत्र झाल्याची हकीगत तिनें भीष्मास सांगून, त्याची योजना करण्याचें उभयतांचे मनानें ठरलें. लागलीच सत्यवतीनें व्यासांचें स्मरण केलें व व्यास तेथें आले. तिनें व्यासांना स्मरण करण्याचें कारण सांगितलें. व्यासांनीं त्या स्त्रियांस एक वर्ष व्रतस्थ रहाण्यास सांगितलें. परंतु इतका काल वाट पहाण्यास सत्यवती कबूल होईना. तेव्हां व्यासांनीं " ह्या राजकन्या जर माझें हें असलें वेडेंविद्रें रूप, हा वेष व ही माझ्या शरीराची दुर्गंधी सहन करतील तर मी आतांच तुझे मनोरथ पूर्ण करतों असें सांगितलें. नंतर सत्यवतीनें दोघी सुनांची मोठ्या कष्टानें व मिनतवारीनें संमती मिळविली. योग्य वेळीं थोरली सून अंबिका ऋतुस्नात झाल्यावर आपल्याकडे भीष्म येणार असें समजून विचार करीत बसली. इतक्यांत **कृष्णद्वैपायन** एकदम प्राप्त झाले. त्यांचें तें रूप, पिंगट जटा, वाढलेली दाढी, व लाल डोळे पाहून अंबिकेनें आपले डोळे झांकले, ते व्यास तेथून निघून जाईपर्यंत उघडले नाहींत. त्यामुळें तिला होणारा पुत्र सर्वगुणसंपन्न होऊनही जन्मांध होईल, असें व्यासांनीं सत्यवतीस सांगितलें. त्याप्रमाणें तिला जन्मांध पुत्र जाहाला, त्याचें नांव **धृतराष्ट्र** ह्यापेक्षां राजकुमार चांगला मुलगा व्हावा, ह्मणून सत्यवतीनें व्यासांचें स्मरण करून आपली धाकटी सून अंबालिका हिच्याकडे व्यासांस पाठविलें. तिनें व्यासांस पाहिल्याबरोबर भयभीत होऊन पांढरी पडली ह्मणून तिला होणारा पुत्र पांढऱ्या फिकट वर्णाचा होईल, असें व्यासांनीं सांगितलें. त्याप्रमाणें तीस पुत्र झाला, ह्मणून त्याचें पांडु असें ठेविलें. अंबालिकेस अशा मुलगा झाल्यावर तिनें आपलें थोरले सुनेस पुनः व्यासांचा सत्कार करण्यास सांगितलें. परंतु तिचें स्वतःचें धैर्य होईना, म्हणून तिनें आपले दासीस अलंकार वगैरे घालून त्याकडे पाठविलें. त्या दासीनें व्यासांचें ओंगळरूप मनांत न आणितां त्यांचें तपःसामर्थ्य व ज्ञान हीं मनांत आणून त्यांचा अत्यंत पूज्य बुद्धीनें व प्रेमानें सत्कार केला व त्यांचें मन संतुष्ट राहील असें केलें. त्यावरून व्यासांनीं " तुझे पोटीं होणारा पुत्र बुद्धिमान् व धर्मात्मा आणि महान् भगवद्भक्त निपजेल, " असा आशिर्वाद दिला. त्याप्रमाणें तिला पुत्र झाला, त्याचें नांव **विदूर** असें ठेविलें.

धृतराष्ट्र, पांडू व **विदूर** ह्या तिन्ही मुलांचे भीष्मांनीं पालन करून त्यांस वेदशास्त्र, धनुर्विद्या व अस्त्रविद्या ह्यांत प्रवीण केलें. त्यांत धनुर्विद्येंत पांडू विशेष प्रवीण होता. धृतराष्ट्राचें शरीरसामर्थ्य मोठें होतें व विदूर बुद्धिविषयक कामांमध्यें श्रेष्ठ होता. धृतराष्ट्र जन्मांध असल्यामुळें व विदूर **पारसव** ब्राह्मणापासून शूद्र स्त्रीचे ठिकाणीं [जन्मलेला दासीपुत्र,] असल्यामुळें त्यास राज्यावर बसविणें चांगले नाहीं, म्हणून भीष्मांनीं पांडूस राज्याभिषेक केला व तिघांचीही लग्नें केलीं. धृतराष्ट्राचे बायकोचें नांव गांधारी, पांडूस दोन बायका. एकीचें नांव **पृथा** (कुंती) व दुसरीचें नांव **माद्री**. देवक नांवाचे राजाची एक पारसवी कन्या होती, ती त्याने विदुरास दिली. व तिच्यापासून विदुरास शोभतील असे सद्गुणी पुत्र झाले. पांडूनें दिग्विजय करून अगणित संपत्ति व करभार हस्तनापुरास आणिला, व तें सर्व धन आपला वडील भाऊ जो **धृतराष्ट्र** ह्याच्या आज्ञेनें **भीष्म, सत्यवती** व आपल्या माता अंबिका व अंबालिका ह्यांचे चरणीं अर्पण केलें. नंतर कांहीं दिवसांनीं आपल्या दोघी बायका घेऊन हिमालयाचे दक्षिण उतरणी-

वरील अरण्यांत शिकारीकरितां जाऊन राहिला. गांधारीस शंभर पुत्र व एक कन्या झाली. त्यांत दुर्योधन जन्मास आला, त्यावेळीं तो गाढवासारखा ओरडूं लागला व दुःचिन्हें होऊ लागलीं. त्यावरून ब्राह्मणांनीं हा कुलक्षय करणारा होईल, त्यास आतांच टाकून द्या असें सांगितलें. परंतु पुत्रस्नेहामुळे धृतराष्ट्रानें तसें केलें नाहीं. शिवाय त्यास दासीपासून एक पुत्र झाला होता.

पांडुराजा अरण्यांत शिकार करण्याकरितां गेला असतां मृगाचें रूप धारण करणारा एक ऋषि व ऋषिपत्नी क्रीडा करीत असतां, त्यानें त्यास चुकून बाण मारिला, तेव्हां त्यांनीं मारण्याचे पूर्वी तूं आपल्या स्त्रियांशीं रममाण झाल्याबरोबर मरण पावशील, असा शाप दिला. त्यामुळें त्यास फार दुःख होऊन तो आपल्या बायकांसह तपःश्चर्या करूं लागला तथापि निपुत्रिक मरणें चांगलें नाहीं, जसें वाटून त्यानें नियोगानें पुत्रोत्पत्ती करून घ्यावी, म्हणून कुंतीजवळ गोष्ट काढली तें तिला कबूल होईना, परंतु पांडूचा फारच आग्रह पाहून लहानपणीं दुर्वास ऋषींची सेवा केल्यामुळें त्यांनीं तिला कांहीं मंत्र देऊन असा वर दिला होता कीं, ह्या मंत्राच्या जपानें तूं ज्या ज्या देवांस बोलावशील ते तुला दर्शन देऊन त्यांचेपासून पुत्र होतील, त्या मंत्राचा पाहिजे तर उपयोग कर. **कुंतीच्या** ह्या म्हणण्यास **पांडूनें** रुकार दिल्यावर तिनें प्रथम यमधर्मास बोलाविल्याबरोबर त्यांनीं दर्शन दिलें, व त्यांचेपासून तिला एक पुत्र जाला, त्याचें नांव **धर्म**. पुढें बलानें जेष्ठ असा पुत्र व्हावा, असें पांडूस वाटल्यावरून तिनें वायूस बोलाविलें. त्यापासून कुंतीस पुत्र जाहला त्याचे नांव **भीम**. नंतर इंद्रापासून अर्जुन असे तीन मुलगे उत्पन्न झाले. तिकडे हस्तनापुरींत धृतराष्ट्रास शंभर पुत्र व एक कन्या झाली हें पाहून माद्रीस फार वाईट वाटलें. नंतर पांडूचे आज्ञेवरून कुंतीनें एक मंत्र माद्रीस शिकविला. तो जपून माद्रीनें अश्विनी कुमारास बोलविलें. त्यांचेपासून माद्रीस नकूळ व सहदेव असे दोन पुत्र जाहले, त्यांसच पांडव असें म्हणतात, व धृतराष्ट्राचे पुत्रांस कौरव असें म्हणतात.

कौरव-पांडवांमध्यें युद्धांचा प्रसंग येण्याचीं कारणें.

कर्म बलवान् आहे, तें कांहीं खोटें नाहीं. ऋषींचा तसा शाप झाला असतांही पांडूस माद्रीबरोबर रममाण होण्याची इच्छा झाली. माद्री निषेध करीत असतांही तो तिचा उपभोग घेऊं लागल्याबरोबर मृत झाला, नंतर माद्रीनें आपले दोघे मुलगे नकूळ व सहदेव कुंतीचे स्वाधीन करून आपण पतीबरोबर सहगमन केलें. पुढें कुंती व तिचे पांच मुलगे तेथील ऋषि मंडळींनीं हस्तनापुरास आणून पावते केले. तेव्हांपासून कौरव व पांडव एकत्र राहूं लागले. त्यांचा विद्याभ्यास भीष्मांमीं यथासांग करविला. त्यांचे प्रथम गुरु कृपाचार्य होते. नंतर धनुर्विद्येमध्यें पारंगत अशी ज्यांची ख्याति अशा **द्रोणाचार्यांनीं** कौरव पांडवांस युद्धकलेंत निष्णात केलें. तथापि पांडवांची आणि त्यांतही विशेषतः भीमार्जुनांची विलक्षण ग्राहकशक्ती पाहून द्रोणाचार्यांनीं धनुर्वेदाचें रहस्य त्यांस सांगितलें. पांडवांचें हें युद्धप्राविण्य पाहून कौरवांचे मनांत मत्सरबुद्धी उत्पन्न झाली. येथून कौरव-पांडवांमध्यें द्वेष उत्पन्न होण्यास आरंभ झाला. पंडूचीही थोडींच, परंतु सद्गुणी मुलें **भीष्म** व धृतराष्ट्र ह्यांचेशिवाय सर्व वडील माणसांचे प्रीतीस पात्र झालीं. ह्यामुळें दिवसेंदिवस ज्यास्त द्वेष वाढूं लागला. शेवटीं पांडवांस राज्य द्यावें लागेल, निदान त्यांनीं अर्धा वांटा मागितल्यास तो तरी द्यावा लागेल, ही भिती कौरवांच्या मनांत उत्पन्न झाली, व तिला शकुनी मामांनीं जास्त भर घालून पांडवांचा नाश करावा, अशी सल्ला त्यांस दिली. ती सर्वानुमतें कायम झाल्यावर कौरवांनीं त्यांच्या नाशाचे पुष्कळ प्रयत्न केले. भीमास विष घातलें, पांडवांचें रहाण्याचे ठिकाणास आग लाविली, भीमास पाण्यांत बुडविण्याचा प्रयत्न तर केलाच, पांडूनें आपल्या सामर्थ्यानें अपार संपत्ति मिळविली. त्यामुळें कौरवांचे मनांत फारच खुपूं लागलें तीं त्याची संपत्ति हरण करावी या हेतूनें धर्मास द्यूत खेळण्यास बोलविलें व लबाडीनें त्याची सर्व संपत्ति हिरावून घेतली, व त्याच प्रसंगांत त्यांची महापतिव्रता व महासाध्वी द्रौपदी हिचा भर सभेंत अपमान केला आणि त्या द्यूताचे अटींत साधुवृत्तीचे पांडवांस १२ वर्षें वनवासांतही पाठविलें. एक वर्ष अज्ञातवासही सोसावयास लाविलें. असा पांडवांचा कौरव छल करीत असतांही प्रसंगविशेषीं पांडवांनीं कौरवांस साह्यही केलें. ह्यावरून घेण्यासारखी गोष्ट ही कीं, कोणच्याही प्रसंगांत आपलें कर्तव्य काय आहे, हें कोणीहि विसरूं नये. अशा रीतीनें दुःखभोग भोगून पांडव मुक्त झाल्यानंतर पांडवांनीं राज्यांतील आपला अर्धा वांटा मागितला. कौरवांचे मनांत त्यांना कांहींएक देऊं नये, असें होतें. म्हणून त्यांनीं अर्धा भाग देण्यास साफ नाकारलें. धर्म फार शांत होता, बाकीचे बंधु धर्माचे आज्ञेंत वागत असत, धर्माचे आज्ञेबाहेर जाण्याचें त्यांचें धैर्यच

होत नसे हा त्या वेळेच्या काळाचा महिमा आहे. धर्मांनीं कलहाचा प्रसंग येऊं नये, म्हणून वडिलार्जित मिळकतीपैकीं निदान पांचजणांस पांच गांव दिले तरी आम्ही संतुष्ट राहूं, असा दुर्योधनास निरोप पाठविला. आणि **भीष्म, द्रोण** व **विदुर** ह्या सर्वांनीं कौरव आणि त्यांचे मंत्री **शकुनीमामा** (हे कौरवांस चिथाऊन देणारे) अद्वितीय धनुर्धर आणि पांडवांशिवाय इतर सर्व लोकांशीं मोठ्या उदारवृत्तीनें वागणारा **कर्ण** ह्यांचें मन वळविण्याची खटपट केली, परंतु ती व्यर्थ गेली. आंधळ्या धृतराष्ट्राची न्यायानें वागावें अशी इच्छा खरी, परंतु पुत्रमोह आडवा आल्यामुळें ती मंद होऊन गेली होती. त्या मंदवृत्तीनें दुर्योधनास उपदेश केला, परंतु दुर्योधनानें किंवा त्याच्या मंत्र्यांनीं कोणा वेंही ऐकलें नाहीं. ह्याप्रमाणें सामाचे उपाय सर्व थकले. प्रत्यक्ष भगवान **श्रीकृष्ण**ही साम करण्यास गेले, परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. आयुष्य संपण्याचे वेळीं अश्विनीकुमारांनीं येऊन त्रैलोक्यचिंतामणीची जरी मात्रा दिली, तरी ती सुद्धां जशी व्यर्थ जाते, त्याप्रमाणें जन्मास आल्याबरोबर गाढवासारखें रडणारा, व सर्व कुळांचे नाशाकरितांच ज्याचा अवतार, त्यास साक्षात् भगवान येऊन जरी उपदेश करून गेले, तरी तो कसा पटणार ? असो. कोणच्याही उपायानें हा तंटा मिटत नाहीं, असें पाहून युद्ध करण्याविषयीं अत्यंत उत्सुक असे आपले बंधूस धर्मानें युद्ध करण्याची अगदीं निरुपायानें परवानगी दिली. राज्यांतील आपला वांटा मिळण्याकरितां व आपत्कालामध्यें सत्तेच्या जोरावर आपल्या धर्मपत्नींचा सर्व पांडवांच्या तोंडाला काळीमा लागेल अशीं कृत्यें करणाऱ्या दुष्ट कौरवांचा उत्तम प्रकारें सूड उगवावा, अशा हेतूनें पांडव युद्धास तयार झाले, कौरव तयार होतेच. दोन्ही पक्ष युद्धास सिद्ध झाले. त्यांत कौरवांचें सैन्य ११ अक्षौहिणी होतें आणि पांडवांचें ७ अक्षौहिणी होतें. एकंदर कौरव पांडवांचे युद्धांत १८ अक्षौहिणी सैन्य होतें.

कुरुक्षेत्रांत उभयतांचीं सैन्यें जाऊन दाखल झालीं. आतां युद्धास आरंभ होणार, तेव्हां साहजिकच धृतराष्ट्रास युद्धांतील सर्व हकीगत समजावी अशी प्रबळ इच्छा झाली. परंतु तो जन्मांध असल्यामुळें तेथें जाऊन युद्ध पहाणें त्यास शक्यच नव्हतें. ह्मणून त्याचे येथें घोड्याची परीक्षा करण्याकरितां ठेवलेला महाभाग्यवान संजय यांजवर भगवान व्यासांनीं अनुग्रह करून त्यास दिव्य चक्षू देऊन युद्धांत घडणाऱ्या सर्व गोष्टींचें ज्ञान येथें बसून होईल, असें सांगून त्यास धृतराष्ट्राजवळ बसाविलें आणि तेथील हकीगत धृतराष्ट्रास सांगण्यास आज्ञा दिली, त्याप्रमाणें संजयानें धृतराष्ट्रास त्यासमयीं झालेली हकीगत सांगितली.

युद्धास आरंभ होण्यापूर्वी कौरवांचें सैन्य पाहून त्यांतील कोणाबरोबर मी युद्ध करावें, असें अर्जुनास वाटल्यावरून त्यानें आपलें सर्व प्रकारें साह्य करणारा व ह्या युद्धाचे प्रसंगीं सारथी झालेला **श्रीकृष्ण भगवान** यांस आपला रथ दोन्ही सैन्यामध्यें नेऊन उभा करण्यास सांगितलें व त्याप्रमाणें कृष्णांनीं रथ नेऊन उभा केला.

गीताशास्त्र उत्पन्न होण्याचें कारण.

अर्जुन तेथें जाऊन पहातो तों दोन्ही सैन्यांत आपले आजे, चुलते, मामे, बंधु, मित्र, पुतणे; मुलगे, गुरु, आप्त, वगैरे सर्व आपलाच गोतावळा त्याच्या दृष्टीस पडला, आणि त्यास मोह उत्पन्न झाला. काय चमत्कार आहे ! जसें कांहीं कोणामध्यें युद्ध होणार आहे हें तेथें जाईतोंपर्यंत अर्जुनास माहीतच नव्हतें ! कौरव अन्यायानें वागतात म्हणून रात्रंदिवस द्वेष उत्पन्न होऊन त्यांच्या नाशाविषयीं उत्सुक असणारा, आपलेपेक्षां ज्यास्त धर्मानें वागणारा, सत्यप्रिय, व शांत अशा धर्मांची युद्ध करण्याविषयीं आज्ञेची वाट पाहणारा अर्जुन मोहित झाला. इतकेंच नव्हे, तर समरांगणांत प्राप्त झाल्यानंतर शत्रूस पाठ दाखवून युद्धापासून पराङ्मुख होणें महत्पाप आहे. असें माहीत असणारे अर्जुनास त्या प्रसंगीं शत्रूशीं युद्ध करणें हेंच महत्पाप असें उलटें वाटूं लागलें. मोह काय करील याचा नेम नाहीं, येथेंही अर्जुन थांबला नाहीं; तर अज्ञानानें व मोहानें उत्पन्न झालेला विचार, सर्वज्ञ सर्व जिवांना ज्ञान देणारा, जो भगवान श्रीकृष्ण ह्यासच उपदेशाच्या गोष्टी सांगू लागला. देवा ! आपल्या गोताचा नाश करणें हा अधर्म आहे. आणि ह्या युद्धापासून पराङ्मुख होऊन उदरनिर्वाहाकरितां अरण्यांत जाऊन कंदमुळें सेवन करणें, अगर भिक्षा मागून निर्वाह करणें हा **धर्म** आहे, असा माझा निश्चय आहे. म्हणून युद्ध करण्याविषयीं माझी प्रवृत्ति होत नाहीं. हें सर्व अर्जुनाचें भाषण ऐकून देव आश्चर्यचकित होऊन स्वस्थ बसले; परंतु अर्जुन खरोखरीच भाग्यवान् व त्याची आपले गुरु जे भगवान श्रीकृष्ण ह्यांचे वाक्यावर अत्यंत निष्ठा होती, म्हणून त्या देवांची सल्ला विचारली. देवांनीं प्रथम लौकिकदृष्टीनें व

वर उपदेश केला, परंतु तो अर्जुनास चांगलासा पटला नाहीं; म्हणून त्यानें आपली शिष्यबुद्धि प्रगट करून युद्ध करणें हें मला श्रेयस्कर आहे, किंवा युद्धापासून पराङ्मुख होणें हें मला श्रेयस्कर आहे, हें मोहामुळें माझें मला समजत नाहीं, म्हणून मी आपल्याला शिष्यबुद्धीनें शरण आलों आहें; माझें खरें कल्याण कशांत आहे, तें आपण कृपा करून सांगा. अशी प्रार्थना केल्यावर अर्जुनाचेंचसें काय, परंतु सर्व जीवांचें खरें कल्याण कशांत आहे, वर्णाश्रम भेदानें कोणाचा धर्म कोण, व अधर्म कोण वगैरे सांगून जो उपदेश केला त्यास भगवद्गीता म्हणतात. त्या वेळीं झालेला श्रीकृष्णार्जुन संवाद व्यासांनीं महाभारतांत श्लोकरूपानें ग्रथन केला. त्याचे सातशें श्लोक व अठरा अध्याय आहेत. त्यासच भगवद्गीता म्हणतात. ही गीता म्हणजे सर्व उपनिषदांचें सार असून मोक्षफल देणारी आहे, मोक्ष सर्वच जीवांना पाहिजे आहे, म्हणून गीतेचें यथार्थ रहस्य जीवांना समजावें म्हणून श्रीशंकराचार्यादिकांनीं त्यांजवर मोठगोठे व्याख्यानरूपी ग्रंथ लिहिले आहेत. परंतु संस्कृतानभिज्ञ लोकांस त्याजपासून उपयोग होत नाहीं. हें पाहून भगवान श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनीं गीतेवर भावार्थदीपिका म्हणून प्राकृत टीका केली तिलाच **ज्ञानेश्वरी** म्हणून नांव आहे. ज्या अर्थीं भगवान श्रीकृष्णांनीं सर्व जीवांचे कल्याणार्थ गीता सांगितली आहे, त्याअर्थीं ही सार्थ भगवद्गीता म्हणजे ज्ञानेश्वरी सर्व मनुष्यांस आपल्याच कल्याणार्थ अत्यंत आदरणीय आहे त्याप्रमाणें त्यांस बुद्धी होवो, अशी ईश्वराजवळ प्रार्थना आहे.

अनुक्रमणिका.

अध्याय.	विषयनिर्देश	श्लोकसंख्या.	ओवीसंख्या.
१	अर्जुनविषादयोग.	४७	२७५
२	सांख्ययोग.	७२	३७५
३	कर्मयोग.	४३	२७६
४	ज्ञान-कर्म-संन्यासयोग.	४२	२२४
५	संन्यासयोग.	२९	१८०
६	आत्मसंयमयोग.	४७	४९७
७	ज्ञानविज्ञानयोग.	३०	२१०
८	तारकब्रह्मयोग.	२८	२७१
९	राजविद्याराजगुह्ययोग.	३४	५३५
१०	विभूतिविस्तारयोग.	४२	३३५
११	विश्वरूपदर्शनयोग	५५	७०८
१२	भक्तियोग.	२०	२४७
१३	क्षेत्रक्षेत्रज्ञयोग.	३४	११७०
१४	गुणत्रयविभागयोग.	२७	४१५
१५	पुरुषोत्तमयोग.	२०	५९९
१६	दैवासुरसंपद्विभागयोग.	२४	४७३
१७	श्रद्धात्रयविभागयोग.	२८	४३३
१८	मोक्षसंन्यासयोग.	७८	१८१०

सार्थ

भावार्थदीपिका



अथवा

ज्ञा ने श्व री.

नमः परमात्मने ।



मंगलम् ।

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं ।
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ॥
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी- ।
मंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ १ ॥

नपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये ।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥ २ ॥

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ३ ॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ ४ ॥

ज्ञानेश्वरी.

अध्याय पहिला.

ॐनमोजी आद्या । वेदप्रतिपाद्या । जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा १
देवा तूंचि गणेशु । सकलार्थमतिप्रकाशु । म्हणे निवृत्तिदासु । अवधारिजोजी २
हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुवेश । तेथ वर्णवपु निर्दोष । मिरवत असे ३
स्मृति तेचि अवयव । देखा अंगीकभाव । तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ४
अष्टादश पुराणें । तींचि मणिभूषणें । पदपद्धती खेवणें । प्रमेयरत्नांचीं ५
पदबंध नागर । तेंचि रंगाथिलें अंबर । जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें ६
देखा काव्य नाटका । जे निर्धारितां सकौतुका । त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका । अर्थध्वनि ७ नाना प्रमेयांची परी । निपुणपणें पाहतां कुसरी । दिसती उचित पदें माझारीं । रत्नें भलीं ८ तेथ व्यासादिकांच्या मती । तेंचि मेखळा मिरवती । चोखाळपणें झळकती । पल्लवसडका ९ देखा षड्दर्शनें म्हणिपति । तेचि भुजांची आकृति । म्हणऊनि विसंवाद धरिती । आयुधें हातीं १० तरी तर्कु तोचि परशु । नीतिभेदु अंकुशु । वेदांतु तो महारसु । मोदकु मिरवे ११ एके हातीं दंतु । जो स्वभावता खंडितु । तो बौद्धमतसंकेतु । वार्तिकाचा १२ मग सहजें सत्कारवादु । तो पद्मकरु वरदु । धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु । अभय हस्तु १३ देखा विवेकवंतु सुविमळु । तोचि शुंडादंडु सरळु । जेथ परमानंदु केवळु । महासुखाचा १४ तरी संवादु तोचि दशनु । जो समता शुभ्रवर्णु । देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु । विघ्नराजु १५ मज अवगमलिया दोनी । मीमांसाश्रवणस्थानीं । बोधमदामृत मुनी । अली सेविती १६ प्रमेयप्रवाल सुप्रभ । द्वैताद्वैत तेचि निकुंभ । सरिसेपणें एकवटत इभ । मस्तकावरी १७ उपरि दशोपनिषदें । जियें उदारेंज्ञानमकरंदें । तियें कुसुमें मुगुटीं सुगंधें । शोभती भाळीं १८ अकार चरणयुगुल । उकार उदर विशाल । मकारु महा-

ज्ञानेश्वरी

अध्याय पहिला.

हे निर्गुणब्रह्मा आत्मरूपा, तूं सर्वांचा आदि अमून तुझें वेदांनीं वर्णन केलेलें आहे व तुझ्या स्वरूपास जाणणारा तूं (स्वयंप्रकाश) स्वतःच आहेस. तुला माझा नमस्कार असो; आणि तुझा जयजयकार होवो. १ श्रीनिवृत्तिदास ज्ञानदेव म्हणतातः—देवा, सकल जगाच्या बुद्धीला ज्ञानाचा प्रकाश देणारा जो गणपति, तो तूंच आहेस; कसा म्हणाल तर, ऐका महाराजः—२ स्वर व व्यंजनें ही ज्या रूपाची सुंदर कांति आहे, ते शब्दमात्र म्हणजे संपूर्ण वेद हींच तुझी उत्तम गणेशमूर्ति होय; ३ असें पहा कीं, मन्वादिकांच्या स्मृति हेच त्या शरिराचे अवयव असून त्याची अंगलोट अवर्णनीय आहे; व त्यांतील अर्थ ही सौंदर्यांची खाण आहे. ४ अठरा पुराणें हींच रत्नखचित भूषणें होत; व त्यांतील पदयोजना हा त्यांचा घाट असून त्यांतील गर्भित अर्थ हींच कोंदणें होत; ५ उत्तम पदरचना हेंच रंगविलेलें वस्त्र होय; व त्या पदांतील अलंकार हेच लकलकीत लांबरुंद बाण होत; ६ काव्यें आणि नाटकें पहा! त्यांची कौतुकानें योजना करूं म्हटलें, तर करगोट्याच्या घागऱ्यांच्या ठिकाणीं होते, आणि त्यांतील अर्थ हा त्या घागऱ्यांचा मंजुळ ध्वनि होतो; ७ मार्मिक दृष्टीनें पाहिलें म्हणजे, त्यांतील श्लेषांच्या पर्यायांचीं उत्तम स्थलें हींच कोणी ह्या घागऱ्यांमधील रत्नें शोभतात; ८ व्यासादिकांची बुद्धि हीच त्यांवरील मेखलेच्या (कमरेच्या शेल्याच्या) ठिकाणीं शोभते; व त्या बुद्धीचा सरळपणा मेखलेच्या पदराच्या शेंड्याप्रमाणें झळकतो;९ असें पहा कीं, सहा शास्त्रें हेच गणपतीचे सहा हात होत; आणि म्हणूनच त्यांतील भिन्न भिन्न अभिप्राय हीं त्या त्या हातांतील निरनिराळीं शस्त्रें होत; १० तरी त्यांतील तर्कशास्त्र हा फरशु, न्यायशास्त्र हा अंकुश, आणि वेदांतशास्त्र हे गोड व रसाळ मोदकाच्या ठिकाणीं शोभतें; ११ वार्तिककारांच्या व्याख्यानानें स्वभावतःच खंडित झालेलें बौद्धमत हें, एका हातांत असणाऱ्या मोडक्या दांताच्या ठिकाणीं शोभतें; १२ मग, कल्याणकारक व वरदायक असा जो हस्त, तो, सत्कारवाद म्हणजे ब्रह्मविषयकवाद होय; धर्माची स्थापना करणारा तो स्वभावसिद्ध अभयहस्त होय; १३ ज्या ठिकाणीं महासुखाचा परमानंद आहे, तो अति निर्मळ विचार हाच सरळ सोंडेचा सोट होय; १४ तसाच उत्तम संवाद हा सरळ व शुभ्र दांताचे ठिकाणीं असून, ज्ञानदृष्टि म्हणजे त्या विघ्नराजाचे सूक्ष्म नेत्र होत; १५ पूर्व व उत्तर ह्या मीमांसा मला कानांच्या ठिकाणीं भासल्या; बोधामृत हा गंडस्थलांतून निघणारा मद, व त्याचें सेवन करणारे मुनि हेच भ्रमर होत; १६ त्यांतील प्रमेयें (सिद्धांत) हींच गंडस्थलावरील सतेज पोंवळ्यांच्या ठिकाणीं असून, द्वैत व अद्वैत सिद्धांत हे गंडस्थलाच्या ठिकाणीं सारख्या प्रमाणानें शोभतात; १७ त्या गंडस्थलाच्या मुकुटावरील शोभणारीं सुगंधि फुलें म्हणजे ज्ञानमकरंदानें परिपूर्ण असलेलीं दशोपनिषदें होत; १८ ॐकारांतील अकार हा दोन्ही चरणांचे ठिकाणीं, उकार हा विशाल उदराचे ठिकाणीं, व मकार हा

मंडल । मस्तकाकारें १९ हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळलें । तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें । आदिबीज २० आतां अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी । ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां २१ मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसारपुरु । म्हणऊनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी २२ जैसें डोळ्या अंजन भेटे । ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे । मग बाम पाहिजे तेथ प्रगटे । महानिधी २३ का चिंतामणि आलिया हातीं । सदा विजयवृत्ति मनोरथीं । तैसा मी पूर्णकाम श्रीनिवृत्ति । ज्ञानदेवो म्हणे २४ म्हणोनि जाणतेन गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होईजे । जैसें मूळसिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती २५ का तीर्थें जिये त्रिभुवनीं । तियें घडती समुद्रावगाहनीं । ना तरी अमृतरसास्वादनीं । रस सकळ २६ तैसा पुढत-पुढती तोचि । मियां अभिवंदिला श्रीगुरुचि । जो अभिलषित मनोरुचि । पुरविता तो २७ आतां अवधारा कथा गहन । जे सकळा कौतुकां जन्मस्थान । कीं अभिनव उद्यान । विवेकतरूचें २८ ना तरी सर्व सुखाचि आदि । जे प्रमेयमहानिधी । नाना नवरससुधाब्धि । परिपूर्ण हे २९ कीं परमधाम प्रकट । सर्व विद्यांचें मूळपीठ । शास्त्रजातां विशिष्ट । अशेषांचें ३० ना तरी सकळ धर्मांचें माहेर । सज्जनांचें जिव्हार । लावण्यरत्नभांडार । शारदेचें ३१ नाना कथारूपें भारतीं । प्रकटली असे त्रिजगतीं । आविष्करोनि महामती । व्यासाचि ये ३२ म्हणोनि हा काव्यां रावो । ग्रंथ गुरुवतीचा ठावो । एथूनि रसां झाला आवो । रसाळपणाचा ३३ तेवींचि आइका आणीक एक । एथूनि शब्द-श्री सच्छास्त्रिक । आणि महाबोधीं कोंवळीक । दुणावली । ३४ एथ चातुर्य शाहणें झालें । प्रमेय रुचीस आलें । आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ३५ माधुर्यीं मधुरता । शृंगारीं सुरेखता । रूढपण उचितां । दिसलें भलें ३६ एथ कळा-विदपपण कळा । पुण्यासि प्रतापु आगळा । म्हणऊनि जनमेजयाचे अव-लीळा । दोष हरले ३७ आणि पाहतां नावेक । रंगी सुरंगतेची आगळिक । गुणां सुगुणपणाचें बिक । बहुवस एथ ३८ भानुचेनि तेजें धवळलें । जैसें त्रैलोक्य दिसे उजळिलें । तैसें व्यासमति कवळिलें । मिरवे विश्व ३९ का सु-क्षेत्रीं बीज घातलें । तें आपुलियापरी विस्तारलें । तैसें भारतीं सुरवाडलें ।

सर्व अवयवांत श्रेष्ठ अशा मस्तकाचे ठिकाणीं आहे; १९ अकार, उकार व मकार हे ज्या वेळेस एकत्र झाले, त्या वेळेस त्यांत शब्दब्रह्माचा समावेश होऊन ॐकार हें रूप बनलें. त्या आदि-बीजाला मी श्रीगुरु निवृत्तिनाथांच्या कृपेनें नमस्कार करितों. २० आतां अपूर्व अशा वाणीचे ठिकाणीं विलास करणारी, चातुर्य, अर्थ व कला यांची स्वामिणी, आणि विश्वाला मोहित करणारी अशी जी श्री सरस्वती, तिला मी नमस्कार करितों. २१ माझ्या हृदयांत वास करणारे जे सद्गुरु, त्यांच्या कृपेनें संसारमहापुरांतून मी पार पडलों; ह्मणून विचारावर माझी विशेष प्रीति जडली. २२ ज्याप्रमाणें (पायाळूच्या) डोळ्यांत अंजन घातलें म्हणजे त्याच्या दृष्टीस विशेष सामर्थ्य येऊन तो जिकडे पाहील तिकडे त्यास भूमिगत द्रव्याचा ठेवा दिसूं लागतो, २३ किंवा चिंतामणी हातीं आल्यावर ज्याप्रमाणें मनांतील हेतु सर्वकाळ पूर्ण होतात, त्याप्रमाणें, ज्ञानदेव म्हणतात कीं, श्रीगुरु निवृत्तींच्या कृपेनें माझे सर्व हेतु तडीस जातात. २४ म्हणून, जे सुज्ञ आहेत त्यांनीं श्रीगुरूची सेवा करून कृतकृत्य व्हावें. कसें म्हणाल तर—ज्याप्रमाणें झाडाच्या मुळाशीं पाणी घातलें म्हणजे फांद्या व पानें आपोआप टवटवीत होतात, २५ किंवा त्रिभुवनांत जितकीं तीर्थें आहेत तितक्या सर्वांचें श्रेय एका समुद्रांत स्नान केल्यानें येतें, अथवा अमृतरसाचें सेवन केलें असतां सर्व रस सेवन केल्याप्रमाणें होतें; २६ त्याचप्रमाणें, इच्छित कामना पूर्ण करणारे जे श्रीगुरु त्यांसच मी पुनः पुनः नमस्कार करितों. २७ आतां, यापुढें, सर्व कौतुक उत्पन्न करणारी, अथवा विचाररूप वृक्षांची अपूर्व बागच अशी गहन कथा ऐका. २८ किंवा जी सर्व सुखाचें कारण व सर्व सिद्धांताचें आगर अथवा नवरसांनीं पूर्ण भरलेला असा अमृतसिंधुच आहे; २९ किंवा मोक्षाचें उघड स्थान, अथवा सर्व विद्यांचें आदिस्थान, किंबहुना ती (कथा) सर्व शास्त्रांना आश्रय आहे. ३० ही सर्व धर्मांचें माहेर, किंवा सज्जनांचें हृदय, अथवा सरस्वतीच्या लावण्यरूपी रत्नांचा ठेवाच आहे. ३१ किंवा ही श्रीव्यासांच्या महामतींत प्रवेश करून भारतांत कथामिषानें या त्रिजगांत प्रकट झाली आहे. ३२ म्हणून ही कथा सर्व काव्यांचा राजा असून, सर्व ग्रंथांच्या थोरपणाचें ठिकाण आहे; व येथून शृंगारादिक नवरसांना रसाळपणाचा विशेष डौल आला. ३३ तसेंच, आणखी एक गोष्ट ध्यानांत ठेवा कीं, या कथेपासूनच शब्दरूपी लक्ष्मीस सच्छास्त्रीयपणा येऊन, आत्मबोधाला विशेष शोभा आली; ३४ या कथेपासूनच चातुर्य शाहाणें झालें; तत्त्वार्थाला ज्यास्त गोडी आली; आणि या कथेपासूनच सुखाच्या सौभाग्याची वृद्धि झाली ३५ माधुर्याला मधुरपणा, शृंगाराला सुरेखपणा व योग्य वस्तूस श्रेष्ठपणा येऊन त्या सर्व उत्तम रीतीनें शोभूं लागल्या. ३६ या कथेपासूनच कलांना कौशल्य प्राप्त झालें, व पुण्याचा प्रताप फार वाढला; म्हणूनच, [अठरा दिवसांत भारताचीं अठरा पर्वें ऐकल्यामुळें] जनमेजयाचे ब्रह्महत्त्येचे दोष सहज नाहींसे झाले. ३७ आणि क्षणभर पाहूं लागलें असतां शृंगारादिक रसांस विशेष सुरेखपणा आला, व गुणाला चांगुलपणाचें भरतें या कथेनें आलें. ३८ ज्याप्रमाणें सूर्योदय झाल्यावर त्रैलोक्यावर उजेड पडतो, त्याप्रमाणें व्यासांच्या बुद्धींतून ही कथा निघाल्यामुळें सर्व जगावर उजेड पडून तें शोभलें. ३९ किंवा चांगल्या शेतांत बीं पेरलें असतां त्याचा जसा सहज विस्तार होतो, तसे ह्या भारतांत सर्व विषय शो-

अर्थजात ४० ना तरी नगरांतरीं वसिजे । तरी नागराचि होईजे । तैसें व्यासोक्तितेजें । धवळत सकल ४१ कीं प्रथम वयसाकाळीं । लावण्याची नव्हाळी । प्रकटे जैसी आगळी । अंगनाअंगीं ४२ नातरी उद्यानीं माधवी घडे । तेथ वनशोभेची खाणी उघडे । आदिलापासोनि अपाडे । जियापरी ४३ नाना घनीभूत सुवर्ण । जैसें न्याहाळितां साधारण । मग अळंकारीं बरवेपण । निवाडु दावी ४४ तैसें व्यासोक्ति अळंकारिलें । आवडे तें बरवेपण पातलें । तें जाणोनि काय आश्रायिलें । इतिहासीं ४५ नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं । सानीव धरूनि आंगीं । पुराणें आख्यानरूपें जगीं । भारता आलीं ४६ म्हणऊनि महाभारतीं नाहीं । तें नोहेचि लोकीं तिहीं । येणें कारणें म्हणिपे पाही । व्यासोच्छिष्ट जगत्रय ४७ ऐसी जगीं सुरस कथा । जे जन्मभूमि परमार्था । मुनि सांगे नृपनाथा । जनमेजया ४८ जें अद्वितीय उत्तम । पवित्रैक निरुपम । परम मंगलधाम । अवधारिजो ४९ आतां भारतकमळ परागु । गीताख्यु प्रसंगु । जो संवादला श्रीरंगु । अर्जुनेसी ५० ना तरी शब्दब्रह्माब्धि । मथियला व्यासबुद्धि-। निवडिलें निरवधि । नवनीत हें ५१ मग ज्ञानाग्निसंपर्कें । कडसिलेंनि विवेकें । पद आलें परिपाकें । आमोदासी ५२ जें अपेक्षिजे विरक्तीं । सदा अनुभविजे संतीं । सोहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ५३ जे आकर्णिजे भक्तीं । जें आदिवंद्य त्रिजगतीं । जें भीष्मपर्वीं संगती । म्हणितली कथा ५४ जें भगवद्गीता म्हणिजे । जें ब्रह्मेशांनीं प्रशंसिजे । जें सनकादिकीं सेविजे । आदरेसीं ५५ जैसें शारदीयेचे चंद्रकळे । माजीं अमृतकण कोंवळे । ते वेंचिती मनें मवाळें । चकोरतलगें ५६ तियांपरी श्रोता । अनुभवावी हे कथा । अति हळुवारपण चित्ता । आणुनियां ५७ हें शब्दवीण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे । बोलाआदि झोंबिजे । प्रमेयासी ५८ जैसे भ्रमर परागु नेती । परी कमळदळें नेणती । तैसी परी आहे सेविती । ग्रंथीं इये ५९ का आपुला ठावो न सांडितां । आलिंगिजे चंद्रु प्रकटतां । हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ६० ऐसेनि गंभीरपणें । स्थिरावलेनि अंतःकरणें । आथिला तोचि जाणें । मानूं इये ६१ अहो अर्जुनाचिये पांती । जे परिसणया योग्य होती । तिहीं कृपा करूनि संतीं । अवधान द्यावें ६२ हें सलगी म्यां म्हणितलें । चरणां लागोनि विनविलें । प्रभू सखोल हृदय आपुलें । म्हणौनियां ६३ जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी

भिवंत झाले आहेत. ४० अथवा, नगरांत राहिल्यावर ज्याप्रमाणें मनुष्य शाहाणा होतो, त्याप्रमाणें व्यासांच्या वाणीच्या तेजामुळें सर्व जग स्वच्छ (ज्ञानमय) झालें. ४१ तसेंच, तारुण्यदशेंत सौंदर्याची शोभा स्त्रियांच्या अंगीं जशी विशेष दृष्टीस पडते, ४२ ज्याप्रमाणें वसंत ऋतु प्राप्त झाला असतां लहानापासून थोरापर्यंत सर्व वृक्षांस वनश्रीची विशेष शोभा येते, ४३ अथवा सोन्याच्या लगडी पाहिल्या असतां दिसण्यांत साधारण दिसतात, पण त्यांचेच दागिने वनविले म्हणजे त्यांची शोभा कांहीं निराळीच दिसते. ४४ व्यासांनीं अलंकृत केलेल्या वाटेल त्या कथेला पवित्रपणा आला, तें जाणूनच कीं काय इतिहासांनीं आपण होऊनच त्या कथेचा आश्रय केला, ४५ किंवा जगांत पूर्ण प्रतिष्ठा प्राप्त होईल ह्मणून अंगीं नम्रता धरून सर्व पुराणें आख्यानरूपानें भारतांत आलीं. ४६ म्हणून, भारतांत जी कथा नाहीं ती त्रैलोक्यांतही नाहीं. यावरून, सर्व जगांत ज्या कथा आहेत त्या व्यासांच्या उष्टया आहेत असें म्हणतात. ४७ सर्व जगांत गोड व परमार्थाच्या उत्पत्तीचें स्थानच अशी कथा वैशंपायन हे जनमेजय राजास सांगतात. ४८ जी कथा अद्वितीय, उत्तम, पावन करणारी, उपमारहित आणि मोक्षाचें माहेरघरच अशी आहे; ती ऐका. ४९ आतां, भारत हेंच कोणी कमल, व भगवंतांनीं स्वतः अर्जुनास सांगितलेला गीताविषय हाच त्यांतील पुष्परेणु होय. ५० अथवा, व्यासांनीं वेदरूप समुद्र बुद्धिरूप रवीनें घुसळून त्यांतून शेवटीं हें गीतारूप अनुपमेय नवनीत काढिलें; ५१ त्यास ज्ञानरूपी अग्नीची आंच देऊन विचाररूप कड आल्यावर गीता हें पद्यरूपी सुवासिक तूप झालें. ५२ ज्याची वैराग्यवान इच्छा करितात, संत नेहमीं अनुभव घेतात व ब्रह्मात्मैक्यभावानें निष्णात् झालेले ब्रह्मनिष्ठ ज्या ठिकाणीं रममाण होतात. ५३ जें भक्तांनीं ऐकण्याला योग्य व त्रैलोक्यांत परमपूज्य आहे, तें भीष्मपर्वामध्यें सांगितलें आहे. ५४ जिला ' भगवद्गीता ' असें म्हणतात; ब्रह्मा व शंकर हे जिची स्तुति करितात; व सनकादिक अति आदरानें जिचें सेवन करितात. ५५ ज्याप्रमाणें शरदृतूंतील पौर्णिमेच्या चांदण्याचें अति सूक्ष्म अमृत-कण चकोर पक्ष्यांचीं पिलें हळुवार मनानें (कुशलतेनें) प्राशन करितात, ५६ त्याचप्रमाणें श्रोत्यांनीं निष्काम व कुशाग्रबुद्धीनें या भगवद्गीतेचा अनुभव घ्यावा, [असें कां, तर, ज्या गीतेंतील परमतत्त्व शब्दातीत असल्यामुळें समजण्यास कठीण आहे म्हणून] ५७ या गीतेंतील कथेचा बोलल्याशिवाय विचार करावा, इंद्रियांना न कळत अनुभव घ्यावा, आणि ती ऐकण्याचे पूर्वी तिच्यांतील रहस्य जाणून घ्यावें. ५८ ज्याप्रमाणें भ्रमर कमलदलाला न समजूं देतां त्यांतील पुष्परेणु सेवन करतात, त्याप्रमाणें हा ग्रंथ समजून घेण्याची पद्धत आहे. ५९ किंवा चंद्रप्रकाश होण्याबरोबर चंद्रविकासिनी कमल उमलून आपली जागा न सोडतां ज्याप्रमाणें चंद्राला प्रीतीनें आलिंगन देण्याचें सौख्य जाणतें, ६० त्याप्रमाणें, शमदमांनीं ज्याचें अंतःकरण स्थिर झालें आहे, तोच या कथेचें रहस्य जाणील; असें आह्मी समजतों. ६१ [त्याप्रमाणें अर्जुन अधिकारी होता, ह्मणून महाराज संतांची प्रार्थना करितात.—] अहो, अर्जुनाच्या योग्यतेचे जे श्रवण करणारे असतील, त्या संतांनीं कृपा करून इकडे लक्ष द्यावें. [हें बोलणें जरा अधिक झालें म्हणून परिहार देतात.—] ६२ प्रभो, आपलें हृदय फार गंभीर आहे, ह्मणून माझी आपल्या चरणांपाशीं ही लडिवाळपणाची विनंती आहे. ६३ ज्याप्रमाणें आपलें मूल बोबडें बोललें तरी आईबापांना त्याचा

वाचा । तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी ६४ तैसा तुम्हीं मी अंगिकारिला । सज्जनीं आपुला म्हणितला । तरी उणें सहजें उपसाहला । प्रार्थूं काई ६५ परी अपराधु तो आणीक आहे । जे मी गीतार्थु कवळूं पाहें । ते अवधारा विनवूं लाहें । म्हणौनियां ६६ हें अनावर न विचारितां । वायांचि धिंवसा उपनला चित्ता । येऱ्हवीं भानुतेजीं काय खद्योता । शोभा आथी ६७ कीं टिटिभू चांचूवरी । माप सुये सागरीं । मी नेणतु त्यापरी । प्रवर्तें येथ ६८ आयका आकाश गिंवसावें । तरी आणीक त्याहूनि थोर होआवें । म्हणऊनि अपाडु हें आघवें । निर्धारितां ६९ तया गीतार्थाची थोरी । स्वयें शंभू विवरी । जेथ भवानी प्रश्नु करी । चमत्कारोनी ७० तेथ हरु म्हणे नेणिजे । देवी जैसें का स्वरूप तुझें । तैसें हें नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ७१ हा वेदार्थ सागरु । जया निद्रिताचा घोरु । तो स्वयें सर्वेश्वरु । प्रत्यक्ष अनुवादला ७२ ऐसें जें अगाध । जेथ वेडावती वेद । तेथ अल्प मी मतिमंद । काय होय ७३ हें अपार कैसेनि कवळावें । महातेज कवणें धवळावें । गगन मुठीं सुवावें । मशकें केवीं ७४ परी एथ असे एकु आधारु । तेणेंचि बोलें मी सधरु । जैं सानुकूळ श्रीगुरु । ज्ञानदेवो म्हणे ७५ येऱ्हवीं तरी मी मूर्खु । जरी जाहला अविवेकु । तरी संतकृपादीपकु । सोज्वळु असे ७६ लोहाचें कनक होये । हें सामर्थ्य परिसींच आहे । कीं मृतही जीवित लाहे । अमृतसिद्धि ७७ जरी प्रकटे सिद्धसरस्वती । तरी मुकया आथी भारती । एथ वस्तुसामर्थ्यशक्ती । नवल कायी ७८ जयातें कामधेनु माय । तयासी अप्राप्य कांहीं आहे । म्हणऊनि मी प्रवर्तों लाहें । ग्रंथीं इये ७९ तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें । करूनि घेयावें हें तुमतें । विनवितु असें ८० आतां देइजो अवधान । तुम्हीं बोलविल्या मी बोलेन । जैसें चेष्टे सूत्राधीन । दारुयंत्र ८१ तैसा मी अनुग्रहीतु । साधूंचा निरूपितु । ते आपुलियापरी अलंकरितु । भलतयापरी ८२ तंव श्रीगुरु म्हणती राही । हें तुज बोलावें नलगे कांहीं । आतां ग्रंथा चित्त देई । झडकरी वेगा ८३ या बोला निवृत्तिदासु । पावूनि परम उल्हासु । म्हणे पारियेसा मना अवकाशु । देऊनियां ८४

स्वभावतःच अधिक संतोष वाटतो, ६४ त्याप्रमाणें माझा तुह्मी सज्जनांनीं अंगीकार केला असून, ज्या अर्थीं मला आपला म्हटला आहे, त्या अर्थीं माझें जें कांहीं उणें असेल तें तुम्ही सहज सहन कराल! त्याबद्दल ह्मणजे मला आपली प्रार्थना केली पाहिजे असें नाहीं! ६५ परंतु जो अपराध ह्मणून माझ्या हातून घडत आहे, तो निराळाच आहे; तो हा कीं, गीतेचा अर्थ मी स्पष्ट करूं पहात आहें, आणि इकडे लक्ष द्या, अशी आपल्यासारख्यांना विनंती करीत आहें. ६६ हें गीतार्थाचें काम फार कठीण आहे, याचा विचार मनांत न करतां, तो स्पष्ट करण्याविषयीं माझ्या चित्तांत व्यर्थ धैर्य उत्पन्न झालें आहे; बाकी सूर्याच्या तेजापुढें काजव्याचें तेज काय पडणार? ६७ किंवा [आपलीं पिलें समुद्रानें वाहून नेलीं ह्मणून त्याचा सूड उगविण्याकरितां] ज्याप्रमाणें समुद्र कोरडा करण्यासाठीं टिटवीनें आपल्या चोंचीनें पाणी उपसण्याचा प्रयत्न केला, त्याप्रमाणें माझा अधिकार नसतां मी गीतेसारख्या ग्रंथाचा अर्थ करण्याकरितां प्रवृत्त झालों आहें. ६८ असें पहा, आकाशाचें आकलन करावयाचें म्हटलें ह्मणजे ज्याप्रमाणें त्याहून मोठें झालें पाहिजे, त्याप्रमाणें वास्तविक पाहतां, गीतेचें व्याख्यान करण्यास माझ्यापेक्षां अधिक योग्य पुरुष पाहिजे होता; कारण, हें कृत्य माझ्या शक्तीच्या बाहेर आहे. ६९ कारण या गीतार्थाची थोरवी एवढी आहे कीं, स्वतः शंकर त्याची चर्चा करीत असतां भवानीला चमत्कार वाटून तिनें शंकराला प्रश्न केला ७० असतां शंकर ह्मणाले, हे पार्वती, तुझें स्वरूप नित्य नूतन असल्यामुळें जसा त्याचा पार लागत नाहीं, त्याप्रमाणें गीतातत्त्व नित्य नूतन आहे ह्मणून तेंही जाणलें जात नाहीं. ७१ कारण, ज्या सर्वेश्वराच्या घोरण्यापासून सहज वेद उत्पन्न झाले, त्या जगदीश्वरानें प्रत्यक्ष स्वमुखानें हें गीताशास्त्र अर्जुनाला सांगितलें. ७२ असें हें गीताशास्त्र गहन असून याच्या ठिकाणीं वेदांची देखील मति गुंग होऊन गेली. तेव्हां अशा ठिकाणीं अल्प व मतिमंद असा जो मी, त्या माझी काय कथा! ७३ हें अपार गीतातत्त्व कोणत्या उपायानें समजून घ्यावें! सूर्याच्या तेजाला कोणी उजळा द्यावा! व चिलटानें आपल्या मुठींत आकाश कसें धरावें! ७४ परंतु, ज्ञानदेव ह्मणतात, ज्या अर्थीं श्रीगुरु मला अनुकूल आहेत, त्या अर्थीं एवढें महत्कृत्य करण्याला त्यांचाच एक आधार आहे, व याचमुळें मला धीर आला आहे. ७५ एरवीं जरी मी अज्ञानी व अविवेकी असलों तरी संतांच्या कृपारूपी दीपानें सोज्वळ (योग्य) झालों आहें. ७६ परिसाच्या सामर्थ्यानें लोखंडाचें सोनें होतें; किंवा मेलेल्या मनुष्यास अमृत पाजिलें असतां तो जिवंत होतो; ७७ अथवा सरस्वतीच प्रसन्न झाली तर मुक्याला देखील वाचा फुटते; तेव्हां यांत नवल नसून हें केवळ वस्तुमाहात्म्य आहे. ७८ कामधेनुच ज्याची आई, त्याला दुर्लभ असें काय आहे? ह्मणून मी हा ग्रंथ करण्यास प्रवृत्त झालों;७९ तरी कमी असेल तें पुरें करून घेऊन अधिक असेल तें सोडून द्या, एवढी माझी आपणांस विनंती आहे. ८० महाराज, आतां आपण इकडे लक्ष द्यावें; कारण, जर आपण मला बोलवाल तर मी बोलेन. ज्याप्रमाणें कळसूत्री लांकडाची बाहुली दोऱ्याचे आधारानें नाचते, ८१ त्याप्रमाणें तुम्ही मजवर अनुग्रह केला आहे, आणि साधूंनीं आज्ञा केली आहे. करितां, आतां आपल्या इच्छेस येईल त्याप्रमाणें मला सुशोभित करा; मजकडून बोलवा. ८२ तेव्हां श्रीगुरु ह्मणतातः पुरे! हें तूं आम्हांला सांगावेंस असें नाहीं; आतां गीतार्थ सांगण्याकडे लवकर लक्ष दे. ८३ अशी श्रीगुरूंची आज्ञा झालेली पाहून निवृत्तिदास ज्ञानदेव मनांत अति संतुष्ट होऊन म्हणतात कीं, मी बोलतों तें स्वस्थ मनानें ऐका. ८४

धृतराष्ट्र उवाचः—

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः । मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

तरी पुत्रस्नेहें मोहितु । धृतराष्ट्र असे पुसतु । म्हणे संजया सांगे मातु । कुरुक्षेत्रींची ८५ जें धर्मालय म्हणिजे । तेथ पांडव आणि माझे । गेले असती व्याजें । जुंझाचेनि ८६ तरी तेचि येतुला अवसरीं । काय किजत असे येरयेरीं । तें झडकरी कथन करी । मजप्रती ८७

संजय उवाचः—

दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा । आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥

राजोवाचः—

पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् । व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥

तिये वेळीं तो संजय बोले । म्हणे पांडवसैन्य उचललें । जैसें महाप्रळयीं पसरलें । कृतांतमुख ८८ तैसें तें घनदाट । उठावलें एकवाट । जैसें उसळलें कालकूट । धरी कवण ८९ नातरी वडवानलु सादुकला । प्रलयवातें पोखला । सागर शोपूनि उधवला । अंबरासी ९० तैसें दळ दुर्धर । नानाव्यूहीं परिकर । अवगमलें भयासुर । तिये काळीं ९१ तें देखोनियां दुर्योधनें । अव्हेरिलें कवणें मानें । जैसें न गणिजे पंचाननें । गजघटांतें ९२ मग द्रोणापासीं आला । तयातें म्हणे हा देखिला । कैसा दळभारु उचलला । पांडवांचा ९३ गिरिदुर्ग जैसे चालते । तैसे विविध व्यूह सभंवते । रचिले आथि बुद्धिमंतें । द्रुपदकुमरें ९४ जो का तुम्हीं शिक्षापिला । विद्या देऊनि कुरुठा केला । तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला । देखदेख ९५

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि । युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥

आणीकही असाधारण । जे शस्त्रास्त्रीं प्रवीण । क्षात्रधर्मीं निपुण । वीर आहाती ९६ जे बळें प्रौढी पौरुषें । भीमार्जुनांसारिखे । ते सांगेन कौतुकें । प्रसंगेंची ९७ एथ युयुधानु सुभटु । आला असे विराटु । महारथी श्रेष्ठु । द्रुपदु वीरु ९८

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् । पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥ ५ ॥

युधामन्युश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान् । सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥

चेकितान धृष्टकेतु । काशिराज वीर विक्रांतु । उत्तमौजा नृपनाथु । शैब्य देख ९९ हा कुंतिभोज पाहे । एथ युधामन्यु आला आहे । आणि पुरुजितादि राय हे । सकळ देखे १०० हा सुभद्राहृदयनंदनु । जो अपरुनवार्जुनु । तो

श्लोकान्वय–संजय, धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे युयुत्सवः समवेताः मामकाः पांडवाः च एव किम् अकुर्वत. ॥ १ ॥

श्लोकार्थ–धृतराष्ट्र म्हणालाः–संजया, धर्माचें ठिकाण जें कुरुक्षेत्र, तेथें युद्धाच्या इच्छेनें एके ठिकाणीं जमलेल्या माझ्या व पंडूच्या मुलांनीं काय केलें ? १

पुत्राच्या प्रेमानें मोहित झालेला धृतराष्ट्र राजा संजयास म्हणाला, " संजया, कुरुक्षेत्राची काय हकीकत आहे ती मला सांग. ८५ ज्या कुरुक्षेत्राला धर्माचें ठिकाण असें ह्मणतात, तेथें माझे व पंडूचे पुत्र युद्ध करण्याच्या निमित्तानें गेले आहेत, ८६ तर ते परस्परांत एवढा वेळपर्यंत काय करीत आहेत तें मला लवकर सांग. ८७ "

अन्वय—तदा व्यूढं पांडवानीकं दृष्ट्वा तु राजा दुर्योधनः आचार्यं उपसंगम्य वचनं अब्रवीत् ॥२॥ आचार्य, तव धीमता शिष्येण द्रुपदपुत्रेण व्यूढां एतां पांडुपुत्राणां महतीं चमूं पश्य. ॥ ३ ॥

अर्थ—संजय म्हणालाः—पांडवसैन्याची व्यूहरचना पाहून दुर्योधन राजा अंतर्यामीं भ्याला व द्रोणाचार्याजवळ जाऊन त्यांस म्हणाला, ॥२॥ अहो गुरुमहाराज, आपला बुद्धिमान् शिष्य जो द्रुपदाचा मुलगा धृष्टद्युम्न, त्यानें पांडवाच्या प्रचंड सेनेची ही व्यूहरचना केलेली पहा. ॥ ३ ॥

तेव्हां संजय म्हणालाः–ज्याप्रमाणें महाप्रलयाचे वेळीं काळाचें तोंड पसरलेलें असतें, त्याप्रमाणें पांडवांचें सैन्य खवळलें. ८८ सर्व पांडवसैन्य एकत्र जमून एका रोखानें सज्ज झालें, तेव्हां त्याला कोण आवरणार ? ज्याप्रमाणें कालकूट विष उसळलें असतां त्याचें शमन कोणाच्यानें करवत नाहीं, ८९ किंवा वडवानल पेटून तो प्रलयवातानें भडकल्यावर ज्याप्रमाणें समुद्रांतील पाण्याचें शोषण करून आकाशापर्यंत प्रदीप्त होतो, ९० त्याप्रमाणें पांडवांचें भयंकर सैन्य नानाप्रकारच्या व्यूहरचनेनें तयार केलेलें असल्यामुळें त्या वेळेस अति भेसूर असें दिसलें. ९१ परंतु ज्याप्रमाणें हत्तीचे कळप पाहून सिंह त्यांना कःपदार्थ मानतो, त्याप्रमाणें दुर्योधनानें पांडवांचें तें सैन्य पाहून त्यास यःकश्चित् मानलें. ९२ मग द्रोणाचार्यांजवळ त्यांचें मन कलुषित करण्याकरितां येऊन त्यांस ह्मणाला, पांडवांचें हें सैन्य कसें उसळलें आहे पाहिलेंना ? ९३ बुद्धिमान असा जो द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न, त्यानें या सैन्याची अशी चमत्कारिक रचना केली आहे कीं, तें चालत्या डोंगरीकिल्ल्यांप्रमाणेंच दिसत आहे. ९४ ज्या धृष्टद्युम्नाला तुम्हीं पढवून विद्येचें आगर केलें, त्यानें हा सेनासमुद्र चहूंकडे पसरविला आहे तो पहा. ९५

अन्वय—अत्र शूराः महेष्वासाः युधि भीमार्जुनसमाः युयुधानः विराटः महारथः द्रुपदः च. ॥ ४ ॥

अर्थ—या ठिकाणीं शूर, मोठीं धनुष्यें धारण करणारे, आणि युद्धामध्यें भीमार्जुनांसारखे पराक्रमी असे युयुधान, विराट, आणि महारथी द्रुपद हे आहेत. ॥४॥

याशिवाय आणखी शस्त्रास्त्रांत प्रवीण व क्षत्रधर्मांत निपुण असे महान् महान् योद्धे आहेत. ९६ जे बलानें, योग्यतेनें व पुरुषार्थानें भीमार्जुनांसारखे आहेत; यांचें सहज प्रसंगानुसार वर्णन करितों. ९७ या ठिकाणीं महायोद्धा युयुधान राजा, विराट राजा आणि श्रेष्ठ महारथी द्रुपद राजा हे आले आहेत. ९८

अन्वय—धृष्टकेतुः चेकितानः वीर्यवान् काशिराजः च पुरुजित् कुंतिभोजः च नरपुंगवः शैब्यः च ॥ ५ ॥ विक्रांतः युधामन्युः च वीर्यवान् उत्तमौजाः च सौभद्रः द्रौपदेयाः च सर्वे एव महारथः ॥ ६ ॥

अर्थ—धृष्टकेतु, चेकितान, पराक्रमी काशिराजा, पुरुजित्, कुंतिभोज व नरश्रेष्ठ शैब्य ॥५॥ शूर युधामन्यु, पराक्रमी उत्तमौजा, सुभद्रेचा मुलगा अभिमन्यु व द्रौपदीचे मुलगे हे सर्व महारथी आहेत ॥६॥

" चेकितान, धृष्टकेतु, पराक्रमी असा काशिराजा, नृपश्रेष्ठ उत्तमौजा व शैब्य राजा यांकडे पहा, ९९ हा कुंतिभोज पहा; तसाच येथें हा युधामन्यु आलेला आहे, आणि पुरुजित् आदिकरून सर्व राजे आले आहेत ते पहा. " १०० दुर्योधन ह्मणतोः–अहो द्रोणाचार्य, हा पहा सुभद्रेच्या अंतःकरणाला आल्हाद देणारा तिचा मुलगा प्रतिअर्जुन

अभिमन्यु म्हणे दुर्योधनु । देखे द्रोणा १ आणीकही द्रौपदीकुमर । हे सकळही महारथी वीर । मिती नेणिजे परी अपार । मीनले असती २

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम । नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥७॥
भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः । अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥

आतां आमुच्या दळीं नायक । जे रूढवीर सैनिक । ते प्रसंगें आइक । सांगिजती ३ उद्देशें एक दोनी । जायिजती बोलोनी । तुम्ही आदिकरूनी । मुख्य जे जे ४ हा भीष्म गंगानंदनु । जो प्रतापतेजस्वी भानु । रिपुगज-पंचाननु । कर्ण वीरु ५ या एकेकाचेनि मनोव्यापारें । हें विश्व होय संहरे । हा कृपाचार्यु न पुरे । एकलाचि ६ एथ विकर्ण वीरु आहे । हा अश्वत्थामा पैल पाहे । याचा आडदरु सदा वाहे । कृतांतु मनीं ७ समितिंजयो सौमदत्ति ।

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः । नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

ऐसे आणीकही बहुत आहाती । जयांचिया बळा मिती । धाताही नेणें ८ जे शस्त्रविद्यापारंगत । मंत्रावतार मूर्त । हो का जें अस्त्रजात । एथूनि रूढ ९ हे अप्रतिमल्ल जगीं । पुरता प्रतापु अंगीं । परी सर्व प्राणें मजचिलागीं । आराइले असती ११० पतिव्रतेचें हृदय जैसें । पतीवांचूनि न स्पर्शे । मी सर्वस्व यां तैसें । सुभटांसी ११ आमुचिया काजाचेनि पाडे । देखती आपुलें जीवित थोकडें । ऐसे निरवधि चोखडे । स्वामिभक्त १२ झुंजती कुळकणी जाणती । कळें कीर्तीसी जिती । हें बहु असो क्षात्रनीती । एथोनियां १३ ऐसे सर्वांपरि पुरते । वीर दळीं आमुतें । आतां काय गणूं यांतें । अपार हे १४

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् । पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

वरी क्षत्रियांमाजी श्रेष्ठु । जो जगजेठी जगीं सुभटु । तया दळवैपणाचा पाटु । भीष्मासि पैं १५ आतां याचेनि बळें गवसलें । हें दुर्ग जैसे पन्नासिले । येणें पाडें थेंकुलें । लोकत्रय १६ आधींच समुद्र पाही । तेथ दुवाडपण कवणा नाहीं । मग वडवानळु तैसेयाही । विरजा जैसा १७ ना तरी प्रलयवन्हि महावातु । या दोघां जैसा सांघातु । तैसा हा गंगासुतु । सेनापति १८ आतां येणेंसि कवण भिडे । हें पांडव सैन्य कीर थोकडें । परि वरचिलेनि पाडें । दिसत असे १९ वरी भी-

असा अभिमन्यु १ तसेच आणखी हे द्रौपदीचे मुलगे व सर्व महारथी ज्यांची गणती करितां येत नाहीं असे अपरिमित वीर या ठिकाणीं जमले आहेत. २

अन्वय—द्विजोत्तम, अस्माकं तु ये विशिष्टाः मम सैन्यस्य नायकाः तान् निबोध, संज्ञार्थं तान् ते ब्रवीमि ॥ ७ ॥ भवान् भीष्मः च कर्णः च समितिंजयः कृपः च अश्वत्थामा विकर्णः तथैव च सौमदत्तिः ॥ ८ ॥

अर्थ--अहो द्विजश्रेष्ठ, आतां, आमच्या पक्षांतील जे मुख्य मुख्य वीर माझ्या सैन्याचे अधिपति आहेत, त्यांचीं नांवें ऐक. माझ्या सैन्याचें सामर्थ्य आपल्या लक्षांत यावें, म्हणून तीं मी आपल्याला सांगतों. आपण स्वतः भीष्म, कर्ण, समितिंजय, कृपाचार्य, अश्वत्थामा, विकर्ण व त्याचप्रमाणें सौमदत्ति (भूरिश्रवा)॥८॥

आतां, आमच्या सैन्यांत प्रमुख असे महावीर कोणकोण आहेत ते प्रसंगानुरोधानें सांगतों ऐका. ३ आपण व इतर वीर जे आहेत, त्यांपैकीं दिग्दर्शनाकरितां कांहीं मुख्यमुख्यांचीं नांवें सांगतों, ऐका. ४ शौर्यानें व बलानें केवळ प्रतिसूर्यच असे हे गंगानंदन भीष्माचार्य, शत्रुरूपी हत्तीला केवळ सिंहासारखा भासणारा असा हा पराक्रमी कर्ण; ५ या एकेकाच्या नुसतें मनांत आलें तर ह्या विश्वाचा संहार होईल. फार कशाला, हे एकटे कृपाचार्य देखील या कृत्याला पुरे नाहींत का ? ६ हा या ठिकाणीं विकर्ण वीर आहे, तसाच तो पलीकडे अश्वत्थामा पहा; प्रत्यक्ष काळाला देखील त्याची भीति वाटते ! ७ युद्धामध्यें सदैव विजयी असणारा हा सौमदत्ति (भूरिश्रवा);

अन्वय—अन्ये च बहवः शूराः मदर्थे त्यक्तजीविताः (सन्ति) सर्वे नानाशस्त्रप्रहरणाः युद्धविशारदाः (सन्ति) ॥९॥

अर्थ—आणखीही पुष्कळ शूर वीर माझ्याकरितां जिवावर उदार झालेले आहेत. ते सर्व नानाप्रकारचीं शस्त्रास्त्रें धारण करणारे व युद्धविद्येंत कुशल असे आहेत. ॥ ९ ॥

त्याचप्रमाणें ज्यांच्या शौर्याचा अंत प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही लागत नाहीं असे आणखी किती तरी वीर आहेत, ८ कीं जे शस्त्रविद्येंत निपुण असून, अस्त्रविद्येचे तर साक्षात् अवतार आहेत. फार कशाला, यांच्यापासून अस्त्रविद्या जगांत इतकी प्रसिद्धीस आली ! ९ हे जरी अति बलवान् आहेत, व जगांत जरी यांच्या तोडीचे दुसरे योद्धे नाहींत, तरी ते जिवाभावानें मलाच अनुसरले आहेत.११० ज्याप्रमाणें पतिव्रतेचें मनसुद्धां पतीवांचून दुसरे ठिकाणीं जात नाहीं; केवळ पतीच्याच ठिकाणीं असतें, त्याप्रमाणें या वीरांना मी जीव कीं प्राण आहे. ११ हे स्वामिभक्तीविषयीं इतके निस्सीम आहेत कीं, आमच्या कामापुढें ते आपले प्राणही कमी योग्यतेचे समजतात. १२ हे युद्धकलेमध्यें निष्णात असून सर्व कला व कीर्ति यांचें जीवन आहेत. फार काय सांगावें, क्षत्रियांचा धर्म यांच्यापासूनच प्रसिद्धीस आला ! १३ याप्रमाणें आमच्या सैन्यांत सर्वतोपरी पराक्रमी असे अपार वीर आहेत; त्यांची किती ह्मणून गणती करावी. १४

अन्वय—तत् अस्माकं भीष्माभिरक्षितं बलं अपर्याप्तं (अस्ति) एतेषां तु भीमाभिरक्षितं इदं बलं पर्याप्तं (अस्ति) १०

अर्थ--भीष्मानें रक्षण केलेलें तें आमचें सैन्य अपरिमित आहे, आणि भीमानें रक्षण केलेलें पांडवांचें हें सैन्य परिमित आहे. ॥१०॥

तशांत, सर्व क्षत्रियांमध्यें श्रेष्ठ आणि जगांतील सर्व योद्धयांमध्यें प्रतापी असे जे भीष्माचार्य, त्यांच्याकडे या सर्व सैन्याचें आधिपत्य दिलेलें आहे. १५ त्यांनीं हें सर्व सैन्य आवरून अशा बेतानें रचिलें आहे कीं, जणूं काय हे किल्लेच बांधले आहेत; त्यांच्या शौर्यापुढें त्रिभुवन देखील तुच्छ आहे. १६ विचार केला असतां ज्याप्रमाणें सर्व प्रकारें समुद्र दुस्तर असून आणखी त्यास वडवानलानें साह्य व्हावें, १७ किंवा प्रलयकालच्या अग्नीला महावाताचें साहाय्य मिळून त्या उभयतांचा जसा संयोग व्हावा, तसें आमच्या या अफाट सैन्यास भीष्म हे सेनापति मिळाले आहेत. १८ तेव्हां या आमच्या सैन्याबरोबर कोण युद्ध करील ? पांडवांचें सैन्य खरोखर अगदीं थोडें आहे; परंतु त्याची रचना मात्र मोठी दिसते. १९ व त्याचें सेनापत्य

मसेनु बेथु । तो जाहला असे सेनानाथु । ऐसें बोलोनियां मातु । सांडिली तेणें १२०

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः । भीष्ममेवाभिरक्षंतु भवंतः सर्व एव हि ॥ ११ ॥

मग पुनरपि काय बोले । सकळ सैनिकांतें म्हणितलें । आतां दळभार आपुलाले । सरसे करा २१ जया जिया अक्षौहिणी । तेणें तिया आयणी । वरगण कवणकवणी । महारथीया २२ तेणें तिया आवरिजे । भीष्मातळीं राहिजे । द्रोणातें म्हणे पाहिजे । तुम्ही सकळ २३ हाचि एकु रक्षावा । मी तैसा हा देखावा । येणें दळभारु आघवा । साचु आमुचा २४

संजय उवाचः—

तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः । सिंहनादं विनद्योचैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

या राजाचिया बोला । सेनापति संतोषला । मग तेणें केला । सिंहनादु २५ तो गाजत असे अद्भुतु । दोन्ही सैन्यांआंतु । प्रतिध्वनि न समातु । उपजत असे २६ तयाचि तुलगासवें । वीरवृत्तीचेनि थावें । दिव्य शंख भीष्मदेवें । आस्फुरिला २७ ते दोन्ही नाद मीनले । तेथ त्रैलोक्य बधिरीभूत जाहलें । जैसें आकाश का पडिलें । तुटोनियां २८ घडघडीत अंबर । उचंबळत सागर । क्षोभलें चराचर । कांपत असे २९ तेणें महाघोषगजरें । दुमदुमिताती गिरिकंदरें । तंव दळामाजि रणतुरें । आस्फुरिलीं १३०

ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः । सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥

उदंड सैंघ वाजतें । भयानकें खाखातें । महाप्रळयो जेथें । धाकडांसी ३१ भेरी निशाण मांदळ । शंख काहळा भोंगळ । आणि भयासुर रणकोल्हाळ । सुभटांचे ३२ आवेशें भुजा त्राहाटिती । विसणेले हांका देती । जेथ महामद भद्रजाती । आवरती ना ३३ तेथ भेडांची कवण मातु । कांचया केर फिटतु । जेणें दचकला कृतांतु । आंग नेघे ३४ एकां उभयांचि प्राण गेले । चांगांचे दांत बैसले । बिरुदाचे दादुले । हिंवताती ३५ ऐसा अद्भुत तूरबंबाळु । ऐकोनि ब्रह्मा व्याकुळु । देव म्हणती प्रळयकाळु । वोढवला आजी ३६

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ । माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥
पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः । पौण्ड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥
अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः । नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

दांडग्या भीमसेनानें स्वीकारलें आहे. इतकें सांगूनही द्रोणाचार्याचे मनावर कांहीं परिणाम होत नाहीं असें पाहून तो स्तब्ध राहिला. १२०.

अन्वय—सर्वेषु च अयनेषु यथाभागं अवस्थिताः भवन्तः सर्वे एवहि भीष्मं एव अभिरक्षन्तु ॥ ११ ॥

अर्थ--सैनिकहो, व्यूहांत प्रवेश करण्याच्या मार्गीं तुम्ही सर्वांनीं आपआपल्या स्थानीं उभें राहून भीष्माचेंच सर्व प्रकारें रक्षण करावें. ॥११॥

मग फिरून सर्व सेनापतीस ह्मणाला:—अहो आतां आपआपलें सैन्य सज्ज करा. २१ ज्यांच्या ताब्यांत सैन्याच्या ज्या अक्षौहिणी आहेत, त्यांतील श्रेष्ठ महारथ्यांनीं आपआपल्या अक्षौहिणीपुढें जाऊन उभें रहावें. २२ आणि त्यांनीं त्या त्या अक्षौहिणी संभाळून भीष्मांच्या आज्ञेंत वागावें. नंतर तो द्रोणाचार्यांस म्हणाला, " तुम्हीं सर्व सैन्यावर देखरेख ठेवावी, २३ आणि भीष्मांस मजप्रमाणेंच समजून त्यांचें रक्षण करावें; कारण, आमच्या सर्व सैन्याची भिस्त त्यांच्यावरच आहे. " २४

अन्वय–तस्य हर्षं संजनयन् प्रतापवान् कुरुवृद्धः पितामहः उच्चैः सिंहनादं विनद्य शंखं दध्मौ ॥ १२ ॥

अर्थ--संजय ह्मणाला:--मग दुर्योधनाच्या मनास हर्ष उत्पन्न करण्याकरितां महाप्रतापी व कुरुकुलांत वृद्ध असे पितामह भीष्म यांनीं मोठ्यानें सिंहगर्जना करून शंख वाजविला ॥१२॥

राजा दुर्योधनाचें हें भाषण ऐकून भीष्मांस फार संतोष झाला, आणि त्यांनीं सिंहनाद केला. २५ तो नाद दोन्ही सैन्यांत दुमदुमून गेला; इतका कीं, त्याचा प्रतिध्वनि आकाशांत देखील मावेना. २६ तो प्रतिध्वनि होत आहे, तोंच वीरवृत्तीच्या बळानें भीष्मांनीं आपला दिव्य शंख वाजविला. २७ ते दोन्ही नाद एकत्र झाले तेव्हां आकाश कडकडून पडावें तसा भास झाला, आणि त्रैलोक्यांत सर्वांच्या कानठळ्या बसल्या ! २८ त्या वेळीं आकाश गडगडूं लागलें; समुद्र उसळूं लागला, हें स्थावरजंगम विश्व घाबरून जाऊन थरथर कांपूं लागलें; २९ आणि त्या महानादाच्या घोषानें पर्वतांच्या गुहांमधून देखील प्रतिध्वनि उठले; असें चालू असतां त्या सैन्यांत रणवाद्यें वाजूं लागलीं. १३०

अन्वय—ततः शंखाः च भेर्यः च पणवानकगोमुखाः (च) सहसा एव अभ्यहन्यंत सः शब्दः तुमुलः अभवत् १३

अर्थ--नंतर इतर योद्ध्यांनीं शंख, नौबदी, डंके, मृदंग व गोमुख या नांवांचीं रणवाद्यें एकदम वाजविलीं व त्यापासून प्रचंड नाद उत्पन्न झाला. ॥१३॥

त्या नानाप्रकारच्या रणवाद्यांचा ध्वनि इतका कर्कश आणि भयंकर होता कीं, बलवंतांना देखील तो महाप्रलय वाटला ! ३१ नौबद, निशाण, मांदळ (एक प्रकारचें रणवाद्य), शंख, झांज, तुतारी इत्यादि अनेक रणवाद्यांचा गजर, आणि वीरांचा युद्धसंबंधी रणकल्लोळ सुरू झाला. ३२कोणी आवेशानें दंड ठोकूं लागले, कोणी चवताळून मोठमोठ्यानें हांका मारू लागले, आणि हत्ती बेफान होऊन आवरतनासे झाले. ३३ त्या ठिकाणीं मित्र्याची गोष्ट कशाला विचारावी ? जे कचरले ते तर कस्पष्टाप्रपाणें उडूनच गेले; यमास सुद्धां दहशत बसून तो इकडे तोंड देखील करीनासा झाला! ३४ कित्येकांचें उभ्या उभ्याच जीव गेले; जे धैर्यवान होते, त्यांचीं दांतखिळी बसली; आणि जे नामांकित योद्धे होते, त्यांच्या अंगास कांपरें सुटलें! ३५ अशा प्रकारचा तो भयंकर वाद्यध्वनि ऐकून ब्रह्मदेव देखील व्याकुळ झाला; आणि इंद्रादि देव तर, ' आज हा प्रलयकालच ओढवला कीं काय ' असें म्हणूं लागले. ३६

अन्वय–ततः श्वेतैः हयैः युक्ते महति स्यंदने स्थितौ माधवः पांडवः च दिव्यौ शंखं प्रदध्मतुः ॥१४॥ हृषीकेशः पाञ्चजन्यं धनंजयः देवदत्तं भीमकर्मा वृकोदरः पौंड्रं महाशंखं दध्मौ ॥ १५ ॥ कुंतीपुत्रः युधिष्ठिरः राजा अनन्तविजयं नकुलः सहदेवः च सुघोषमणिपुष्पकौ दध्मतुः ॥१६॥

अर्थ--नंतर, पांढरे घोडे जोडलेल्या मोठ्या रथांत बसलेले कृष्ण व अर्जुन यांनीं दिव्य शंख वाजविले ॥१४॥ श्रीकृष्णांनीं पांचजन्य नांवाचा, अर्जुनानें देवदत्त नांवाचा व भयंकर कर्म करणाऱ्या भीमसेनानें पौंड्र नांवाचा महान् शंख वाजविला ॥१५॥ कुंतीपुत्र धर्मराज व नकुलसहदेव यांनीं (अनुक्रमें) अनंतविजय सुघोष व मणिपुष्पक हे शंख वाजविले ॥१६॥

ऐसी स्वर्गीं मातु । देखोनि तो आकांतु । तंव पांडवदळाआंतु । वर्तलें कायी ३७ हो का निजसार विजयाचें । कीं तें भांडार महातेजाचें । जेथ गरुडाचिये जावळियेचे । कांतले चाऱ्ही ३८ कीं पाखांचा मेरु जैसा । रहंवरु मिरवतसे तैसा । तेजें कोंदाटलिया दिशा । जयाचेनि ३९ जेथ अश्ववाहकु आपण । वैकुंठींचा राणा जाण । तया रथाचे गुण । काय वर्णूं १४० ध्वजस्तंभावरी वानरु । तो मूर्तिमंत शंकरु । सारथी शार्ङ्गधरु । अर्जुनेंसीं ४१ देखा नवल तया प्रभूचें । अद्भूत प्रेम भक्ताचें । जे सारथ्यपण पार्थाचें । करितु असे ४२ पाइकु पाठीसीं घातला । आपण पुढां राहिला । तेणें पांचजन्यु आस्फुरिला । अवलीळाचि ४३ परी तो महाघोषु थोरु । गर्जतु असे गंहिरु । जैसा उदेला लोपी दिनकरु । नक्षत्रांतें ४४ तैसे तूरबंबाळु भंवते । कौरवदळीं गाजत होते । ते हारपोनि नेणों केउते । गेले तेथ ४५ तैसाचि देखें येरें । निनादें अति गजरें । देवदत्त धनुर्धरें । आस्फुरिला ४६ ते दोनी शब्द अचाट । मीनले एकवट । तेथ ब्रह्मकटाह शतकूट । हो पाहत असे ४७ तंव भीमसेनु विसणैला । जैसा महाकाळु खवळला । तेणें पौंड्र आस्फुरिला । महाशंखु ४८ तो महाप्रलयजलधरु । जैसा घडघडिला गंहिरु । तंव अनंत विजयो युधिष्ठिरु । आस्फुरित असे ४९ नकुळें सुघोषु । सहदेवें मणिपुष्पकु । जेणें नादे अंतकु । गजबजला ठाके १५०

काश्यश्च परमेष्वासः शिखंडी च महारथः । धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते । सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक् पृथक् ॥ १८ ॥
स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् । नभश्च पृथिवींचैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥

तेथ भूपती होते अनेक । द्रुपद द्रौपदेयादिक । हा काशीपति देख । महाबाहू ५१ तेथ अर्जुनाचा सुतु । सात्यकि अपराजितु । धृष्टद्युम्न नृपनाथु । शिखंडी हन ५२ विराटादि नृपवर । जे सैनिक मुख्य वीर । तिहीं नानाशंख निरंतर । आस्फुरिले ५३ तेणें महाघोषनिर्घातें । शेष कूर्म अवचितें । गजबजोनि भूभारातें । सांडूं पाहती ५४ तेथ तिन्ही लोक डळमळित । मेरु मांदार आंदोळित । समुद्रजळ उसळत । कैलासवेरी ५५ पृथ्वीतळ उलथों पहात । आकाश असे आसुडत । तेथ सडा होत । नक्षत्रांचा ५६ सृष्टि गेली रे गेली । देवां मोकळवादी जाहली । ऐशी एक टाळी पिटिली । सत्यलोकीं ५७ दिहाचि

याप्रमाणें स्वर्गलोकांत दाणादाण उडून गेली असतां, इकडे पांडवसैन्यांत काय झालें पहा. ३७ जो रथ विजयाचें प्रत्यक्ष माहेरघर असून तेजाचें केवळ भांडारच, व ज्यास गरुडाप्रमाणें वेगवान असे चार घोडे जुंपलेले असून ३८ जो पक्षयुक्त मेरुपर्वताप्रमाणें दिसत होता, तो श्रेष्ठ रथ तेथें शोभूं लागला. त्याच्या तेजानें दाही दिशा लकलकीत दिसत होत्या, ३९ ज्या रथावर प्रत्यक्ष वैकुंठाधिपति श्रीकृष्ण सारथी होते, त्या रथाचे गुण कोठवर वर्णन करावे? १४० साक्षात् शंकराचा अवतार जो मारुति, तो त्याच्या ध्वजस्तंभावर असून, शार्ङ्ग धनुष्य धारण करणारे भगवान श्रीकृष्ण अर्जुनाचे सारथी होते. ४१ त्या प्रभूचें नवल केवढें तें पहाः—भक्ताच्या अत्यंत प्रेमामुळें पार्थाचें सारथ्य करूं लागले. ४२ आपल्या सेवकाला पाठीशीं घालून आपण पुढें झालेल्या भगवान श्रीकृष्णांनीं आपला पांचजन्य नांवाचा शंख सहज लीलेनें वाजविला; ४३ पण सूर्याचा उदय झाला ह्मणजे ज्याप्रमाणें नक्षत्रें लोपतात, त्याप्रमाणें त्या शंखाच्या महानादानें ४४ कौरवांच्या सैन्यामध्यें होत असलेला वाद्यगजर कोणीकडे नाहींसा झाला त्याचा पत्ता लागेना. ४५ त्याचप्रमाणें अर्जुनानेंही आपला देवदत्त नांवाचा गंभीर नादाचा शंख आवेशानें वाजविला. ४६ त्या वेळीं त्या दोन्ही शंखांचा अद्भूत ध्वनि एकत्र झाल्यामुळें ब्रह्मांडाचे शतशः तुकडे होतात कीं काय असें वाटूं लागलें! ४७ इतक्यांत भीमसेनालाही आवेश आला, आणि महाकाळाप्रमाणें खवळून त्यानें आपला पौन्ड्र नांवाचा महाशंख वाजविला. ४८ त्या शंखाचा भयंकर ध्वनि महाप्रलयाच्या मेघाप्रमाणें होत आहे, तों धर्मराजानें अनंतविजय नामक शंख वाजविला. ४९ नकुलानें सुघोष नांवाचा, आणि सहदेवानें मणिपुष्पक नांवाचा शंख वाजविला. त्या नादानें प्रत्यक्ष यमाचेंही धाबें दणाणून गेलें! १५०

अन्वय—परमेष्वासः काश्यः महारथः शिखंडी च धृष्टद्युम्नः विराटः च अपराजितः सात्यकिः च ॥१७॥ द्रुपदः द्रौपदेयाः च महाबाहुः सौभद्रः (च) सर्वशः पृथिवीपते पृथक् पृथक् शंखान् दध्मुः ॥१८॥ सः तुमुलः घोषः नभः च पृथिवीं च एव व्यनुनादयन् धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ॥ १९ ॥

अर्थ—राजा धृतराष्ट्रा महाधनुर्धारी काशिराजा, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट, अजिंक्य सात्यकि, द्रुपद, द्रौपदीचे मुलगे, व महापराक्रमी अभिमन्यु या सर्वांनीं आपआपले शंख वाजविले. ॥१७।१८॥ तो भयंकर शंखनाद आकाश व पृथ्वी यांत दुमदुमून गेला व त्यानें दुर्योधनादिकांचें हृदय विदारिलें! ॥ १९ ॥

द्रुपद राजा, महावीर काशिराजा, द्रौपदीचे पुत्र इत्यादि अनेक राजे व वीर, त्या ठिकाणीं जमले होते; ५१ त्याचप्रमाणें अर्जुनाचा मुलगा अभिमन्यु, अजिंक्य असा सात्यकि, नृपश्रेष्ठ धृष्टद्युम्न, शिखंडी, ५२ त्याचप्रमाणें विराट व इतर जे जे सेनानायक होते, तेही आपापले निरनिराळ्या तऱ्हेचे शंख एकसारखे वाजवूं लागले. ५३ त्या शंखांच्या महाध्वनीच्या आघातानें शेष व कूर्म हे एकदम दचकले, आणि पृथ्वीचा भार टाकून देण्यास प्रवृत्त झाले. ५४ त्या योगानें त्रैलोक्य डळमळूं लागलें, मेरु व मांदार हे हालूं लागले, समुद्राचे पाणी कैलासापर्यंत उसळलें, ५५ पृथ्वी पालथी होते कीं काय व आकाश कोसळून पडतें कीं काय असें वाटूं लागलें आणि नक्षत्रांचा सडा होऊं लागला! ५६ सत्यलोकीं, 'सृष्टि बुडालीरे बुडाली आतां देव निराधार झाले' अशी एकच हाकाटी झाली; ५७ सूर्य दिवसाच थांबला; आणि

दिन थोकला । जैसा प्रळयकाळ मांडला । तैसा हाहाकारु जाहला । तिहीं लोकीं ५८ तें देखोनि आदिपुरुष विस्मितु । म्हणे झणें होय पां अंतु । मग लोपिला अद्-भुतु । संभ्रमु तो ५९ म्हणोनि विश्व संवरलें । एऱ्हवीं युगान्त होतें वोडवलें । जैं महाशंख आस्फुरिले । कृष्णादिकीं १६० तो घोष तरी उपसंहरला । परी पडि-साद होता राहिला । तेणें दळभार विध्वंसिला । कौरवांचा ६१ जैसा गजघंटा-आंतु । सिंह लीला विदारितु । तैसा हृदयातें भेदितु । कौरवांचिया ६२ तो गाजत जंव आइकती । तंव उभेचि हियें घालिती । एकमेकांतें म्हणती । सावधरे सावध६३

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः । प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः ॥ २० ॥

तेथ बळें प्रौढीपुरते । महारथी वीर होते । तिहीं पुनरपि दळातें । आवरिलें ६४ मग सरिसेपणें उठावले । दुणवटोनि उचलले । तया दंडीं क्षोभलें । लोकत्रय६५ तेथ बाणवरी धनुर्धर । वर्षताति निरंतर । जैसे प्रळयांत जलधर । अनिवार का६६ ते दे-खलिया अर्जुनें । संतोष घेऊनि मनें । मग संभ्रमें दिठी सेने । घालितसे ६७ तंव सं-ग्रामीं सज्ज जाहले । सकळ कौरव देखिले । तंव लीलाधनुष्य उचलिलें । पंडुकुमरें६८

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते । अ. उ.-। सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥२१॥
यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् । कैर्मयासह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ॥ २२ ॥
योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः । धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥

ते वेळीं अर्जुन म्हणतसे देवा । आतां झडकरी रथु पेलावा । नेऊनि मध्यें घालावा । दोहीं दळां ६९ जंव मी नावेक । हे सकळ वीर सैनिक । न्याहाळीन अशेख । झुंजते जे १७० एथ आले असती आघवे । परी कवणेंसीं म्यां झुंजावें । हें रणीं लागे पहावें । म्हणऊनियां ७१ बहुतकरूनि कौरव । हे आतुर दुःख-भाव । वांटिवेवीण हांव । बांधिती झुंजीं ७२ झुंजाची आवडी धरिती । परी संग्रामीं धीर नव्हती । हें सांगोनि रायाप्रती । काय बोले ७३

संजय उवाचः—

एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत । सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥
भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् । उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥ २५ ॥
तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् । आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा २६
श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि । तान्समीक्ष्य स कौंतेयः सर्वान्बंधूनवस्थितान् ॥ २७ ॥
कृपया परयाऽऽविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।

आइका अर्जुन इतुकें बोलिला । तंव श्रीकृष्णें रथु पेलिला । दोहीं सैन्यांमाजीं केला । उभा तेणें ७४ जेथ भीष्मद्रोणादिक । जवळिकेची सन्मुख । पृथिवीपति

प्रळयकालचे वेळेप्रमाणें तिन्ही लोकांत हाहाकार उडून गेला. ५८ तें पाहून भगवान श्रीकृष्ण फार विस्मित झाले, आणि कदाचित् सृष्टीचा अंत होईल असें जाणून, त्यांनीं तो अद्भुत शंखनाद बंद केला, ५९ म्हणूनच हें जग वांचलें, नाहीं तर कृष्णादिकांनीं जेव्हां शंख वाजविले, तेव्हांच त्याचा अंत होण्याची वेळ आली होती. १६० तो शंखनाद बंद झाला, तथापि त्याचा जो प्रतिध्वनि घुमत होता, त्या योगानें कौरवसैन्याची दाणादाण झाली. ६१ सिंहाच्या सहज लीलेनें जसें हत्तीच्या समुदायाचें विदारण होतें, तसें त्या शंखनादानें कौरवांचें हृदय फाटून गेलें. ६२ तो ध्वनि ऐकून उभ्याउभ्याच सर्वांचें धैर्य सुटलें आणि एकमेकांस सावधरे सावध असें ह्मणूं लागले. ६३.

अन्वय–अथ कपिध्वजः पांडवः धार्तराष्ट्रान् व्यवस्थितान् दृष्ट्वा शस्त्रसंपाते प्रवृत्ते (सति) धनुः उद्यम्य ॥२०॥

अर्थ–नंतर ज्याच्या ध्वजस्तंभावर मारुति होता, अशा अर्जुनानें दुर्योधनादिक कौरव वीर युद्धाकरितां व्यवस्थित रीतीनें उभे राहिले आहेत असें पाहून, आतां शस्त्रांचे प्रहार सुरू होणार तों, धनुष्य उचलिलें, ॥२०॥

त्या ठिकाणीं, बलानें व पुरुषार्थानें युक्त असे जे महारथी होते, त्यांनीं सैन्याला पुनः धीर देऊन सावरिलें. ६४ मग ते मोठ्या तयारीनें पुढें सरसावले, व त्यांनीं दुप्पट आवेशानें चाल केली. तेव्हां त्या आवेशयुक्त सैन्याच्या योगानें त्रिभुवन अगदीं त्रस्त होऊन गेलें. ६५ त्या धनुर्धारी वीरांनीं बाणांची एकसारखी इतकी वृष्टि केली कीं, जणूं काय प्रलयकालची भयंकर पर्जन्यवृष्टीच होत आहे! ६६ तें पाहून अर्जुनाच्या मनाला फार संतोष झाला, व त्यानें, मोठ्या गंभीरतेनें सैन्यावर नजर टाकली. ६७ तेव्हां सर्व कौरव युद्धास सिद्ध झालेले पाहून पंडुपुत्रानें सहज लीलेनें धनुष्य उचललें. ६८

अन्वय–तदा महीपते, हृषीकेश इदं वाक्यं आह. अच्युत, अहं यावत् एतान् योद्धुकामान् अवस्थितान् निरीक्षे तावत् उभयोः सेनयोः मध्ये मे रथं स्थापय. अस्मिन् रणसमुद्यमे मया कैः सह योद्धव्यं (तत् अहं अवेक्षे) दुर्बुद्धेः धार्तराष्ट्रस्य युद्धे प्रियचिकीर्षवः ये एते अत्र समागताः तान् योत्स्यमानान् अहं अवेक्षे ॥२१।२२।२३॥

अर्थ–आणि, त्या वेळेस, हे धृतराष्ट्र राजा, अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला कीं, " हे कृष्णा, माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं युद्धाच्या इच्छेनें उभ्या असलेल्या वीरांना मी न्याहाळून पाहीपर्यंत उभा कर. ह्या रणामध्यें मला कोणाबरोबर युद्ध करावयाचें आहे, हें मी पाहतों व अधर्मनिष्ठ दुर्योधनाला यश मिळावें या हेतूनें जे हे योद्धे येथें आले आहेत, त्यांस मी अवलोकन करितों! " २१ २२।२३॥

मग अर्जुन म्हणाला, " देवा, आतां आपला रथ लौकर नेऊन दोन्ही सैन्यांचे मध्यें उभा करा. ६९ म्हणजे येथें युद्ध करण्याकरितां आलेल्या वीरांस मी क्षणभर न्याहाळून पाहीन. १७०कारण, येथें जरी सर्व वीर जमले आहेत, तरी समरांगणीं मला कोणकोणाशीं युद्ध करावयाचें आहे तें पाहिलें पाहिजे. ७१ हे उतावळे व दुष्टबुद्धि कौरव बहुतकरून अंगांत पराक्रम नसतां युद्धाविषयीं डौल मारीत असतात. ७२ यांना युद्धाची हौस आहे खरी, परंतु यांच्याच्यानें रणभूमीवर टिकाव धरवत नाहीं." इतकें राजाप्रत सांगून संजय पुढें ह्मणे:-७३

अन्वय–भारत, एवं गुडाकेशेन उक्तः हृषीकेशः उभयोः सेनयोः मध्ये भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षितां (प्रमुखतः) रथोत्तमं स्थापयित्वा पार्थ एतान् समवेतान् कुरून् पश्य इति उवाच. तत्र पार्थः पितॄन् अथ पितामहान् आचार्यान् मातुलान् भ्रातॄन् पुत्रान् पौत्रान् तथा सखीन् श्वशुरान् सुहृदः च एव उभयोः अपि अपश्यत्. सः कौन्तेयः तान् सर्वान् बंधून् अवस्थितान् समीक्ष्य परया कृपया आविष्टः विषीदन् इदम् अब्रवीत् ॥२४।२५।२६।२७॥

अर्थ–संजय म्हणालाः–राजा धृतराष्ट्रा, याप्रमाणें अर्जुन श्रीकृष्णांस बोलल्यावर श्रीकृष्णांनीं दोन्ही सैन्यांच्या मध्यभागीं भीष्म, द्रोण व सर्व राजे यांच्या समोर तो दिव्य रथ नेऊन उभा केला, आणि अर्जुनास म्हटलें " येथें आलेल्या सर्व कौरव मंडळींस अवलोकन कर " तेव्हां अर्जुनानें बडील, आजे, गुरु, मामे, भाऊ, मुलगे, नातू, मित्र, सासरे, व आपले हितकर्ते दोन्ही सैन्यांत आहेत असें पाहिलें. त्या आप्तसुहृदांना पाहून तो करुणेनें युक्त झाला व खिन्न होत्साता बोलला.॥२४–२७ ॥

राजा, ऐक, अर्जुनाचें हें भाषण श्रवण करतांच श्रीकृष्णांनीं रथ नेऊन दोन्ही सैन्यांच्यामध्यें उभा केला. ७४ ज्या ठिकाणीं भीष्मद्रोणादिक आप्तसं-

आणिक । बहुत आहाती ७५ तेथ स्थिर करूनियां रथु । अर्जुन असे पाहातु । तों दळभार समस्तु । संभ्रमेसी ७६ मग देवा म्हणे देख देख । हे गोत्रगुरु अशेख । तंव कृष्णमनीं नावेक । विस्मो जाहला ७७ तो आपणयां आपण म्हणे । एथ कायी कवण जाणे । हें मनीं धरिलें येणें । परि कांहीं आश्चर्य असे ७८ ऐसी पुढील से घेतु । तो सहज जाणे हृदयस्थु । परि उगा असे निवांतु । तिये वेळीं ७९ तंव तेथ पार्थ सकळ । पितृ पितामह केवळ । गुरु बंधु मातुळ । देखता जाहला १८० इष्ट मित्र आपुले । कुमरजन देखिले । हे सकळ असती आले । तयांमाजीं ८१ सुहृज्जन सासरे । आणीकही सखे सोइरे । कुमर पौत्र धनुर्धरें । देखिले तेथ ८२ जयां उपकार होते केले । कीं आपदीं जे रक्षिले । हे असो वडील धाकुले । आदिकरुनी ८३ ऐसें गोत्रचि दोहीं दळीं । उदित जालें असे कळी । हें अर्जुनें तिये वेळीं । अवलोकिलें ८४ तेथ मनीं गजबज जाहाली । आणि आपैसी कृपा आली । तेणें अपमानें निघाली । वीरवृत्ति ८५ जिया उत्तम कुळींचिया होती । आणि गुणलावण्य आथी । तिया आणिकीतें न साहती । सुतेजपणें ८६ नविये आवडीचेनि भरें । कामुक निज वनिता विसरे । मग पाडेंवीण अनुसरे । भ्रमला जैसा ८७ कीं तपोबळें ऋद्धी । पातलिया भ्रंशे बुद्धी । मग तया विरक्तता सिद्धि । आठवेना ८८ तैसें अर्जुना तेथ जाहलें । असतें पुरुषत्व गेलें । जें अंतःकरण दिधलें । कारुण्यासी ८९ देखा मंत्रज्ञ बरळु जाय । मग तेथ का जैसा संचारु होय । तैसा तो धनुर्धर महामोहें । आकळिला १९० म्हणऊनि असतां धीरु गेला । हृदया द्रावो आला । जैसा चंद्रकळीं शिवतला । सोमकांतु ९१ तयापरी पार्थु । अतिस्नेहें मोहितु । मग सखेद असे बोलतु । श्रीअच्युतेसीं ९२

अर्जुन उवाच—दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सं समुपस्थितम् ॥ २८ ॥
सीदंति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति । वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥ २९ ॥
गांडीवं स्रंसते हस्तात् त्वक्चैव परिदह्यते । न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥३०॥

तो म्हणे अवधारी देवा । म्यां पाहिला हा मेळावा । तंव गोत्रवर्गु आघवा । देखिला एथ ९३ हे संग्रामीं उदित । जहाले असती कीर समस्त । पण आपणपेयां उचित । केवीं होय ९४ येणें नांवेंचि नेणों कायी । मज आपणपें सर्वथा नाहीं । मन बुद्धी ठायीं । स्थिर नोहे ९५ देखे देह कांपत । तोंड असे कोरडें होत । विकळता उपजत । गात्रांसीही ९६ सर्वांगा कांटाळा आला ।

बंधी व अनेक राजे समोर उभे आहेत, ७५ त्या ठिकाणीं रथ उभा केला असतां अर्जुन त्या सैनेकडे गंभीरतेनें न्याहाळून पाहूं लागला. ७६ मग म्हणाला, " देवा, पहा पहा, हे तर सर्व आमचे आप्तवर्ग व गुरु आहेत ! " हें ऐकून श्रीकृष्णांस क्षणभर आश्चर्य वाटलें. ७७ ते आपल्या मनांत म्हणतात, अर्जुनानें हें मनांत काय आणलें कोण जाणे; परंतु ज्या अर्थी तो असें म्हणत आहे त्या अर्थी कांहीं तरी चमत्कारिक प्रकार आहे. ७८ दुसऱ्याचें मनोगत सहज जाणणारे असल्यामुळें त्यांनीं पुढील भविष्य जाणलें; परंतु त्या वेळेस कांहीं एक न बोलतां ते स्तब्ध राहिले. ७९ तेव्हां अर्जुनानें आपलें सर्व वडील, आजे, गुरु, बंधु व मामा असे पाहिलें. १८० आपले इष्टमित्र व मुलगे हे सर्व त्या ठिकाणीं आलेले पाहिले. ८१ तसेच अर्जुनानें आपले जिवलग मित्र, सासरे, आप्तवर्ग व व नातू हेही त्या ठिकाणीं आलेले पाहिले. ८२ ज्यांच्यावर त्यानें उपकार केले होते, व ज्यांचें संकटसमयीं रक्षण केलें होतें, फार काय, परंतु एकंदर वडील व धाकटे यांसुद्धां ८३ आपले सर्व गोत्रज दोन्ही सैन्यांत युद्धाकरितां तयार झालेले अर्जुनानें त्या वेळेस पाहिले. ८४

त्या वेळीं त्याचें मन बावरून जाऊन त्यास आपोआप करुणा उत्पन्न झाली, व त्या अपमानामुळें वीरवृत्ति अर्जुनास सोडून निघाली. ८५ ज्या स्त्रिया उत्तम कुळांतल्या असून गुणी व लावण्यवती असतात, त्यांना आपल्या सतेजपणामुळें दुसऱ्या स्त्रियांचें वर्चस्व सहन होत नाहीं. ८६ ज्याप्रमाणें नवीन स्त्रीच्या आवडीचे भरांत विषयी पुरुष आपल्या स्त्रीस विसरून भ्रम झालेल्या मनुष्याप्रमाणें योग्यतेवाचून तिच्या नादी लागतो.८७ किंवा तपश्चर्येच्या योगानें ऋद्धिसिद्धि प्रसन्न झाल्या असतां वैराग्यशील पुरुषांचे बुद्धीस भ्रम पडून त्याला ज्याप्रमाणें वैराग्याची आठवण राहात नाहीं, ८८ त्याप्रमाणें, अर्जुनानें आपल्या अंतःकरणांत करुणेस थारा दिल्यामुळें त्याचें पौरुषत्व गेलें. ८९ असें पहा कीं, मांत्रिक मंत्रोच्चार करण्यांत चुकूं लागला म्हणजे त्यालाच बाधा होते, त्याप्रमाणें अर्जुन महामोहानें व्याकुळ झाला, १९० व त्याचे ठिकाणीं स्वभावतःच असलेला धीर खचून जाऊन त्याच्या हृदयांत दयेचा पाझर फुटला ! ज्याप्रमाणें चंद्रकिरणांचा स्पर्श होण्याबरोबर चंद्रकांत मण्यास पाझर फुटतो, ८१ त्याप्रमाणें तो स्नेहानें अतिमोहित झाला, व मग खेदयुक्त अंतःकरणानें श्रीकृष्णांशीं बोलूं लागला.

अन्वय–कृष्ण, इमं स्वजनं युयुत्सुं समुपस्थितं दृष्ट्वा मम गात्राणि सीदन्ति मुखं च परिशुष्यति शरीरे वेपथुः च रोमहर्षः च जायते हस्तात् गांडीवं स्रंसते त्वक् च एव परिदह्यते अवस्थातुं न च शक्नोमि मे मनः च भ्रमति इव ॥२०॥

अर्थ–अर्जुन म्हणालाः–कृष्णा, हे आप्तजन युद्धासाठीं तयार झालेले पाहून ॥२८॥ माझीं गात्रें शिथिल झालीं, तोंडचें पाणी पळालें, शरिरास कंप सुटला, रोमांच उभे राहिले, ॥२९॥ गांडीव धनुष्य हातांतून गळून पडलें, सर्वांगाचा दाह होऊं लागला व आतां मला येथें उभें राहवत नाहीं ! माझें मन फार भ्रमण पावत आहे.॥३०॥

अर्जुन म्हणाला, " देवा असें पहा—मी हा सर्व सैन्यसमुदाय पाहिला, तों येथें सर्व माझें गोत्रजच माझ्या दृष्टीस पडले. ९३ हे सर्व युद्ध करण्याकरितां तयार झाले आहेत खरे; परंतु यांच्या बरोबर युद्ध करणें आपल्यास कसें उचित होईल, ९४ यांच्याशीं युद्ध करण्याची गोष्ट काढतांच माझें भान नाहींसें झालें आणि मन व बुद्धि हींही स्वस्थ नाहींत. ९५ हें पहा, माझ्या सर्व अंगास कंप सुटला असून तोंडास कोरड पडली आहे, व गात्रें शिथिल झालीं आहेत. ९६ सर्वांगावर कांटा उभा राहून अति त्रास झाल्यामुळें गांडीव ध-

अति संतापु उपनला । तेथें बेंबळ हातु गेला । गांडिवाचा ९७ तें न धरतचि निष्टलें । परि नेणेंचि हातोनि पडिलें । ऐसें हृदय असे व्यापिलें । मोहें येणें ९८ जें वज्रापासोनि कठिण । दुर्धर अतिदारुण । तयाहून असाधारण । हें स्नेह नवल ९९ जेणें संग्रामीं हरु जिंतिला । निवातकवचांचा ठावो फेडिला । तो अर्जुन मोहें कवळिला । क्षणामाजीं २०० जैसा भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ठ कोरडें । परि कळिकेमाजीं सांपडे । कोंवळिये १ तेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परि तें कमळदळ चिरूं नेणे । तैसें कठिण कोवळेंपणें । स्नेह देखा २ हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाही नयेचि आया । म्हणवूनि भुलविला ऐके राया । संजयो म्हणे ३ अवधारी मग तो अर्जुनु । देखोनि सकळ स्वजनु । विसरला अभिमानु । संग्रामींचा ४ कैसी नेणो सदयता । उपनली तेथें चित्ता । मग म्हणे कृष्णा आतां । नसिजे एथ ५ माझें अतिशयें मन व्याकुळ । होतसे वाचा बरळ । जे वधावे हे सकळ । येणें नांवें ६

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव । न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥३१॥

या कौरवां जरी वधावें । तरी युद्धिष्ठिरादिकां कां न वधावें । हे येरयेर आघवे । गोत्रज आमुचे ७ म्हणोनि जळो हें झुंज । प्रत्यया नये मज । एणें काय काज । महापापें ८ देवा बहुतीपरी पाहतां । एथ वोखटें होईल झुंजतां । वर कांहीं चुकवितां । लाभु आथी ९

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च । किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ३२
येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानिच । तइमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ३३
आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः । मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबंधिनस्तथा ३४

तया विजयवृत्ती कांहीं । मज सर्वथा काज नाहीं । एथ राज्य तरी कायी । हें पाहुनियां २१० या सकळांतें वधावें । मग जे भोग भोगावे । ते जळोत आघवे । पार्थु म्हणे ११ तेणें सुखेंविण होईल । तें भलतैसें साहिजेल । वरी जीवितही वेंचिजेल । याचिलागीं १२ परी यांसी घातु कीजे । मग आपण राज्यसुख भोगिजे । हें स्वप्नींही मन माझें । करूं न शके १३ तरी आम्हीं कां जन्मावें । कवणालागीं जियावें । जरी वडिलां यां चिंतावें । विरुद्ध मनें १४ पुत्रातें इच्छी कुळ । तयाचें कायि हेंचि फळ । जे निर्दळिजे केवळ । गोत्र आपुलें १५ हें मनींचि केविं धरिजे । आपण वज्राचेंया होईजे । वरी घडे तरी कीजे । भलें इयां १६ आम्हीं

नुष्य धरण्याचा हात ढिला पडला; ९७ व त्यामुळें तें माझ्या हातून केव्हां गळून पडले हें देखील मला समजलें नाहीं, इतकें माझें अंतःकरण आप्तवर्गाच्या मोहानें व्याप्त झालें आहे ! ९८ व त्यामुळें तें बरोबर धरलें गेलें नाहीं, ह्मणून माझें अंतःकरण वज्रापेक्षांही कठीण असून दुसऱ्यास दाद न देणारें असे अति भयंकर आहे, परंतु यापेक्षांही हा मोह विशेष कठीण आहे, हें मोठें आश्चर्य आहे ! " ९९ ज्यानें युद्धांत शंकरासही जिंकिलें, व निवातकवच राक्षसांचा मागमूस नाहींसा केला, तो अर्जुन मोहानें एका क्षणांत व्याप्त झाला! २०० भुंगा हा पाहिजे त्या वाळलेल्या लाकडास सहज भोंक पाडतो, परंतु कोंवळ्या कमळाच्या कळींमध्यें तीं मिटल्यावर अडकला जातो; १ तो त्या ठिकाणीं प्राणासही मुकेल, परंतु तें कमलदल फाडून बाहेर निघण्याचें त्याच्या मनांत सुद्धां येत नाहीं; त्याप्रमाणेंच आप्तवर्गाची मोहममता तोडण्यास सोपी असून कठीण झाली आहे. २ संजय म्हणतोः—राजा धृतराष्ट्रा, हा मोह ह्मणजे परमेश्वराची माया आहे. ही ब्रह्मदेवालाही आवरत नाहीं. ह्मणून अर्जुनास तिनें व्याकुळ केलें. ३ राजा, ऐक; मग आपले सर्व आप्तवर्ग पाहून अर्जुनाच्या हृदयांतील युद्धाविषयींचा अभिमान मावळून गेला. ४ त्या ठिकाणीं त्याचे मनांत करुणा कशी उद्भवली हें कळत नाहीं. मग तो श्रीकृष्णास ह्मणाला, देवा, मला वाटतें, आतां येथें राहूं नये. ५ या सर्वांस मारावयाचें ही गोष्ट मनांत आल्याबरोबर माझें मन अति व्याकुळ होऊन बोबडी वळली आहे. ६

अन्वय—केशव, विपरीतानि च निमित्तानि पश्यामि आहवे च स्वजनं हत्वा श्रेयः न अनुपश्यामि ॥३१॥

अर्थ—आणि, हे केशवा, येथें कांहीं विपरीत होईल अशीं चिन्हें दिसतात, व युद्धामध्यें स्वजनांचा घात केला असतां पुरुषार्थ होईल असें मला वाटत नाहीं. ॥३१॥

या कौरवांना जर मारावयाचें, तर मग धर्मराजादिकांना कां मारूं नये ? कारण, हे सर्व परस्पर आमचे गोत्रजच आहेत ७ ह्मणून, देवा, आग लागो या युद्धाला; मला कांहीं तें पसंत पडत नाहीं. असलें महापातक करून आम्हांला काय करावयाचें आहे ? ८ देवा, अनेक प्रकारें विचार करून पाहतां युद्ध केल्यास त्याचा परिणाम वाईटच होईल असें वाटतें; पण जर तें टाळलें तर मात्र कांहीं तरी कल्याण होईल. ९

अन्वय—कृष्ण, विजयं न कांक्षे न च राज्यं सुखानि च, गोविंद, नः राज्येन किम् भोगैः जीवितेन वा किम् ॥३२॥ येषां अर्थे नः राज्यं कांक्षितं भोगाः सुखानि च ते इमे आचार्याः पितरः पुत्राः तथा एव च पितामहाः मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः तथा संबंधिनः प्राणान् धनानि च त्यक्त्वा युद्धे अवस्थिताः ॥३३।३४॥

अर्थ—कृष्णा, मला जय, राज्य व सुखें यांची अपेक्षा नाहीं. गोविंदा, आम्हास राज्य व भोग भोगून किंवा जगून तरी काय करावयाचें आहे ? ॥३२॥ कारण, ज्यांच्याकरितां आम्हीं राज्य, भोग व सुखें यांची इच्छा करावयाची, ते हे गुरु, वडील, पुत्र, आजोबा, मामा, सासरे, नातू, मेहुणे व तसेच इतर आप्तवर्ग या ठिकाणीं आपल्या प्राणांवर व धनांवर उदार होऊन युद्धाकरितां उभे आहेत ! ॥३३।३४॥

अशा रीतीनें जय मिळविण्याची मला मुळींच गरज नाहीं, व असलें राज्य मिळवून तरी काय करावयाचें आहे ? २१० अर्जुन म्हणाला, या सर्वांचा वध करून जे भोग भोगावयाचे, त्या सर्वांस आग लागो ! ११ या असल्या सुखाशिवाय वाटतील तीं दुःखें आम्ही सोसूं, व यांच्याकरितां आम्ही आपले प्राण देखील खर्ची घालूं; १२ परंतु यांचा घात करून आपण राज्यसुख भोगावें ही गोष्ट माझ्या स्वप्नांतही येणार नाहीं. १३ जर आमच्या वडील मंडळीचें आम्ही अहित चिंतलें तर मग आम्हीं जन्मास तरी यावयाचें कशाकरितां व जगावयाचें तरी कोणासाठीं ? १४ कुळांत पुत्रप्राप्तीची इच्छा करितात, त्याचें हेंच का फळ ! कीं पुत्रानें आपल्या गोत्रजांचा संहार करावा ! १५ आपलें मन त्याजविषयीं वज्राप्रमाणें कठोर करण्याचें मनांत तरी कसें आणावें ? त्याचें आपल्या हातून जेवढें बरें होईल तेवढें करावें. १६

जें जें जोडावें। तें समस्तीं इहीं भोगावें। हें जीवितही उपकारावें। काजीं यांच्या १७ आम्ही दिगंतीचे भूपाळ। विभांडूनि सकळ। मग संतोषविजे कुळ। आपुलें जें १८ तेचि हे समस्त। परी कैसें कर्म विपरीत। जे जाहले असती उद्यत। झुंजावया १९ अंतोरिया कुमरें। सांडोनियां भांडारें। शस्त्राग्रीं जिव्हारें। आरोपुनी २२० ऐसियांतें कैसेनि मारूं। कवणावरी शस्त्र धरूं। निज हृदया करूं। घातु केवीं २१ हे नेणसी तूं कवण। परी पैल भीष्म द्रोण। जयांचे उपकार असाधारण। आह्मां बहूत २२ एथ शालक सासरे मातुळ। आणि बंधु कीं हे सकळ। पुत्र नातू केवळ। इष्टही असती २३ अवधारी अति जवळिकेचे। हे सकळही सोयरे आमुचे। म्हणोनि दोष आथी वाचे। बोलतांचि २४

एतान्न हंतुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन। अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥३५॥

हे वरी भलतें करितु। आतांचि येथें मारितु। परि आपण मनें घातु। न चिंतावा २५ त्रैलोक्यींचे अनकळित। जरी राज्य होईल प्राप्त। तरी हें अनुचित। नाचरें मी २६ जरी आजि एथ ऐसें कीजे। तरी कवणाच्या मनीं उरिजे। सांगे मुख केवीं पाहिजे। तुझें कृष्णा २७

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन। पापमेवाऽऽश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥

जरी वधु करूनि गोत्रजांचा। तरी वसौटा होऊनि दोषांचा। मज जोडिलासि तूं हातींचा। दूरी होसी २८ कुळहरणीं पातकें। तिये आंगीं जडती अशेखें। तये वेळीं तूं कवणें कें। देखावासी २९ जैसा उद्यानामाजीं अनळु। संचरला देखोनि प्रबळु। मग क्षणभरी कोकिळु। स्थिर नोहे २३० का सकर्दम सरोवरु। अवलोकूनि चकोरु। न सेवितु अव्हेरु। करूनि निघे ३१ तयापरी तूं देवा। मज झकऊं न येसी मावा। जरी पुण्याचा वोलावा। नाशिजैल ३२

तस्मान्नार्हा वयं हंतुं धार्तराष्ट्रान्स्वबांधवान्। स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ३७

म्हणोनि मी हें न करीं। इये संग्रामीं शस्त्र न धरीं। हें किडाळ बहुतीं परी। दिसतसे ३३ तुजसीं अंतराय होईल। मग सांगे आमचें काय उरेल। तेणें दुःखें हियें फुटेल। तुजवीण कृष्णा ३४ म्हणऊनि कौरव हे वधिजती। मग आम्ही भोग भोगिजती। हे असो मात आघडती। अर्जुन म्हणे ३५

यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः। कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकं ॥ ३८ ॥
कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम्। कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

हे अभिमानमदें भुललें। जरी पां संग्रामा आलें। तऱ्ही आम्ही हित आपुलें।

आम्हीं जें जें मिळवावें, त्या सर्वांचा त्यांनीं उपभोग घ्यावा, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या कामाकरितां आम्हीं आपलें जीवितही खर्च करावें. १७ आम्हीं देशोदेशीचे राजे जिंकावे, व त्यायोगें आपल्या कुळास संतोषित करावें. १८ पण कर्माची किती विपरीत गति आहे, कीं तेच हे आमचे सर्व गोत्रज आम्हांवरोवर युद्ध करण्यास उद्युक्त झाले आहेत! १९ बायका, मुलें व धन ह्या सर्वांस सोडून तरवारीच्या धारेवर ज्यांनीं आपले जीव ठेविले आहेत, २२० अशांना मी कसें मारूं, कोणावर शस्त्र धरूं, आणि मी आपल्याच जिवलगांचा कसा घात करूं? २१ हे कोण आहेत हें तुला माहीत नाहीं काय? ते पहा पलीकडे भीष्म व द्रोण आहेत. त्यांचे आमच्यावर महत् उपकार आहेत. २२ या ठिकाणीं मेहुणे, सासरे, मामा आणि बंधु, तसेच हे सर्व पुत्र, नातू व आप्तही आहेत. २३ हे पहा- हे सर्व आमचे फार जवळचे नातेवाईक आहेत, तेव्हां यांना मारण्याची गोष्ट नुसती तोंडावाटें काढली तरी देखील दोष घडतील.२४

अन्वय–मधुसूदन, (मां) घ्नतः अपि एतान् हन्तुं न इच्छामि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः अपि एतान् हन्तुं न इच्छामि महीकृते किं नु ॥३५॥

अर्थ–हे मधुसूदना, जरी ह्यांनीं माझा वध केला, तरी मी ह्यांना मारण्याची इच्छा करणार नाहीं त्रैलोक्याच्या राज्याकरितां देखील मी ह्यांना वधणार नाहीं; मग पृथ्वीच्या राज्याकरितां मी ह्यांना कसा मारीन! ॥३५॥

उलटपक्षीं ह्यांनीं वाटेल तें जरी केलें, किंवा आम्हांला येथेंच जरी मारिलें, तथापि आपण त्यांचा घात करण्याचें मनांत आणूं नये. २५ निष्कंटक असें त्रिभुवनाचें राज्य जरी प्राप्त झालें, तरी सुद्धां हें अनुचित कर्म मी करणार नाहीं. २६ कृष्णा, जर आज या ठिकाणीं आम्हीं त्यांचा वध केला, तर कोणाच्या मनांत आमच्याविषयीं आदर राहील? आणि तूंच सांग कीं, मग तुझें मुख तरी आमच्या कसें दृष्टीस पडेल? २७

अन्वय–जनार्दन, धार्तराष्ट्रान् निहत्य नः का प्रीतिः स्यात् एतान् आततायिनः हत्वा अस्मान् पापं एव आश्रयेत् २६

अर्थ–हे जनार्दना, कौरवांना मारून आम्हांला काय सुख होणार? ह्या आततायांच्या वधानें आम्हांस पापच लागेल! ॥३६॥

कारण, जर मी गोत्रजांचा वध करीन, तर मी दोषांचें घर होईन; व असें झाल्यानें, ज्या तुझी मला प्राप्ति झाली आहे तो तूंही हातचा जाशील. २८ कुलक्षय केला असतां अनंत पातकें लागतात; अशा प्रसंगीं तुम्हांला कोणीं, आणि कोठें शोधावें? २९ ज्याप्रमाणें वागेंत अग्नीचा मोठा भडका झाला असतां कोकिळ पक्षी एक क्षणभरही रहात नाहींत; २३० किंवा तलावांत चिखल झालेला पाहून चकोर पक्षी त्याचें सेवन न करितां तो सोडून चालते होतात, ३१ त्याप्रमाणें, देवा, जर माझी पुण्याई कमी होईल, तर आपण आपल्या मायेनें मला फसवून हातावर तुरी देऊन जाल! ३२

अन्वय–तस्मात् स्वबांधवान् धार्तराष्ट्रान् हन्तुं वयं अर्हाः न. माधव, स्वजनं हि हत्वा वयं कथं सुखिनः स्याम ३७

अर्थ–म्हणून, आपल्या बांधवांस–या कौरवांस–मारणें हें आम्हांस योग्य नाहीं. कारण, माधवा, आपल्या आप्तांना मारून आम्ही सुखी कसें होऊं? ॥३७॥

म्हणून ही गोष्ट मी कधीं करणार नाहीं, व या समरंगणांत हातांत शस्त्रही धरणार नाहीं; कारण, हें कृत्य बहुत प्रकारानें निंद्य आहे असें मला वाटतें. ३३ कृष्णा, आपण आम्हांला अंतरलां म्हणजे मग आमची काय गति होईल? त्या दुःखानें आमचें हृदय कीं हो फाटून जाईल! ३४ अर्जुन पुढें म्हणतो, म्हणून, देवा, ह्या कौरवांचा वध करून मग आम्हीं राज्याचा उपभोग घ्यावा ही गोष्ट कधींही घडणार नाहीं. ३५

अन्वय–यद्यपि एते लोभोपहतचेतसः कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकं न पश्यंति ३८ जनार्दन, कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिःअस्माभिः अस्मात् पापात् निवर्तितुम् कथं न ज्ञेयम् ३९

अर्थ–लोभानें चित्त भ्रष्ट झाल्यामुळें, कुलक्षय केल्यापासून लागणारा दोष व मित्राशीं वैर केल्यानें लागणारें पातक हीं जरी कौरव पहात नाहींत, ॥३८॥ तरी, हे जनार्दना, कुलक्षय केल्यापासून लागणारें पाप आह्मांस ढळढळीत दिसत असतांहि, या पापापासून निवृत्त होण्याविषयीं आह्मीं कसें जाणू नये? ॥३९॥

हे कौरव अभिमानानें उन्मत्त होऊन जरी युद्ध करण्यास आले आहेत, तरी आम्हीं आपलें हित

जाणावें लागे ३६ हें ऐसें कैसें करावें । जे आपुले आपण मारावे । जाणत जाणतांचि सेवावें । काळकूट ३७ हां जी मार्गीं चालतां । पुढां सिंह जाहला अवचिता । तो तंव चुकवितां । लाभु आथी ३८ असता प्रकाशु सांडावा । मग अंधकूप आश्रावा । तरी तेथ कवणु देवा । लाभु सांगे ३९ का समोर अग्नि देखोनी । जरी न वचिजे वोसंडोनी । तरी क्षणीं एका कवळूनि । जाळूं सके ४० तैसे दोष हे मूर्त । अंगीं वाजो असती पाहात । हें जाणतांही केवीं एथ । प्रवर्तावें ४१ ऐसें पार्थ तिये अवसरीं । म्हणे देवा अवधारी । या कत्र्मषाची थोरी । सांगेन तुज ४२

कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः । धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४० ॥

जैसें काष्ठें काष्ठ मथिजे । तेथ वन्हि एक उपजे । तेणें काष्ठजात जाळिजे । प्रज्वळलेनि ४२ तैसा गोत्रींची परस्परें । जरी वधु घडे मत्सरें । तरी तेणें महादोषें घोरें । कुळचि नाशे ४४ म्हणवूनि एणें पापें । वंशजधर्मु लोपे । मग अधर्मुचि आरोपे । कुळामाजी ४५

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः । स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥

एथ सारासार विचारावें । कवणें काय आचरावें । आणि विधिनिषेध आघवे । पारुषती ४६ असता दीपु दवडिजे । मग अंधकारीं राहाटिजे । तरी उजूचि का आडळिजे । जयापरी ४७ तैसा कुळीं कुळक्षयो होय । तये वेळीं तो आद्यधर्मु जाय । मग आन कांहीं आहे । पापावांचुनी ४८ जैं यमनियम ठाकती । तेथ इंद्रियें सैरा राहाटती । म्हणऊनि व्यभिचार घडती । कुळस्त्रियांसी ४९ उत्तम अधर्मीं संचरती । ऐसे वर्णावर्ण मिसळती । तेथ समूळ उपडती । जातिधर्म २५० जैसी चोहटाचिये बळी । पाविजे सैरा काउळीं । तैसीं महापापें कुळीं । संचरती ५१

संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च । पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥ ४२ ॥

मग कुळा तया अशेखा । आणि कुळघातकां । येरयेरां नरका । जाणें आथी ५२ देखे वंशवृद्धि समस्त । यापरी होय पतित । मग वोवांडिती स्वर्गस्थ । पूर्वपुरुष ५३ जेथ नित्यादि क्रिया ठाके । आणि नैमित्तिक क्रिया पारुखे । तेथ कवणा तिळोदकें । कवण अर्पी ५४ तरी पितर काय करिती । कैसेनि स्वर्गीं वसती । म्हणोनि तेही येती । कुळापासीं ५५ जैसा नखाग्रीं व्याळु लागे । तो शिखांत व्यापी वेगें । तेवीं आब्रह्म कुळ आवघें । आप्लविजे ५६

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः । उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥

कशांत आहे हें पाहिलें पाहिजे. ३६ आपले आप्त आपणच मारावे अशी गोष्ट कशी करावी ? असें पहा कीं, समजून उमजून कालकूट विष कसें प्यावें ? ३७ अहो, वाट चालत असतांना जर अकस्मात् आपल्या समोर सिंह आला, तर त्याला चुकवून जाणें हेंच श्रेयस्कर आहे. ३८ आपण आयते उजेडांत वसलों असून तेथून उठून जर अंधाऱ्या विहिरींत जाऊन वसलों, तर, देवा, त्यापासून काय लाभ होईल हें तुम्हींच सांगा बरें ! ३९ किंवा समोर अग्नि आहे असें पाहून जर तो आपण बाजूस टाकून गेलों नाहीं, तर एका क्षणांत तो आपल्यास व्यापून जाळून टाकील. २४० त्याप्रमाणें, हे मूर्तिमंत दोष आम्हांला लागतील असें कळल्यावरही आम्हीं हें काम करण्यास कसें प्रवृत्त व्हावें ? ४१ त्या वेळीं इतकें बोलून अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला, देवा, या पातकाची काय थोरवी आहे पहा. ४२

अन्वय–कुलक्षये सनातनः कुलधर्माः प्रणश्यंति उत धर्मे नष्टे अधर्मः कृत्स्नं कुलं अभिभवति ॥४०॥

अर्थ–कुलक्षयानें सनातन (वंशपरंपरा चालत आलेले) कुलाचार नाहींतसे होतात; आणि कुलाचार नाहीं. तसे झाले ह्मणजे अधर्मानें सर्व कूल व्यापून जातें॥४०॥

ज्याप्रमाणें लाकडावर लाकूड घांसलें असतां त्यापासून अग्नि उत्पन्न होतो, आणि त्याचा भडका झाला म्हणजे सर्व लाकडें जळून जातात, ४३ त्याप्रमाणें, आपल्या गोत्रांतच जर मत्सरानें एकमेकांनीं एकमेकांचा वध केला, तर त्या महाघोर दोषांच्या योगानें सर्व कुलाचा क्षय होतो. ४४ह्मणून या कुलक्षयाच्या पापापासून कुलधर्माचा लोप होतो, आणि मग त्या कुलांत अधर्माचा प्रवेश होतो. ४५

अन्वय–कृष्ण, अधर्माभिभवात् कुलस्त्रियः प्रदुष्यन्ति वार्ष्णेय, स्त्रीषु दुष्टासु वर्णसंकरः जायते ॥४१॥

अर्थ–कृष्णा, अधर्मानें कुल व्यापलें असतां, कुलस्त्रिया दुराचरणाविषयीं प्रवृत्त होतात; आणि, हे वार्ष्णेया, त्यांच्या दुष्ट आचरणापासून वर्णसंकर होतो. ॥४१॥

असें झाल्यावर मग सारासार विचार, योग्यायोग्य आचरण, कर्तव्याकर्तव्य वगैरे गोष्टी दूर राहतात. ४६ असलेला दिवा मालवून अंधारांत फिरूं लागलें म्हणजे ज्याप्रमाणें सहजच मनुष्य सरळ वाटेंतही ठेंचाळतो, ४७ त्याप्रमाणें, कुलक्षयामुळें कुलधर्म नष्ट झाल्यावर मग त्या कुळांत पापावांचून दुसरी कशाची प्राप्ति होणार ? ४८ मन व इंद्रियें यांचा निग्रह होईनासा झाला ह्मणजे इंद्रियें स्वैर वर्तन करूं लागतात, व म्हणून कुलस्त्रियांच्या हातून पापाचरण घडतें, ४९ आणि उत्तम व अधम यांचा समागम होऊन ब्राह्मण शूद्रादि परस्पर वर्ण ह्यांची भेसळ होते, व त्या योगानें सर्व ज्ञातिधर्म समूळ नाहींतसे होतात.२५० कावळे जसे चव्हाट्यावर ठेवलेल्या वळीवर चोहोंकडून झडप घालतात, त्याप्रमाणें, अशा कुलामध्यें चोहों बाजूंनीं महापातकांचा प्रवेश होतो. ५१

अन्वय–संकरः कुलघ्नानां कुलस्य च नरकाय एव. एषांहि पितरः लुप्तपिंडोदकक्रियाः (सन्तः) पतन्ति ॥४२॥

अर्थ–वर्णसंकर झाला ह्मणजे कुलाचा घात करणारे पुरुष व तें कुल यांना नरकप्राप्ति होने, आणि पिंडदान व तर्पणादि क्रिया बंद होऊन दोघांचे पितर निश्चयानें नरकांत पतन पावतात ! ॥४२॥

मग त्या कुलास आणि कुळांचा नाश करणारास अशा दोघांसही नरकप्राप्ति होते. ५२ [मग] हे पहा–याप्रमाणें सर्व वंशाची वृद्धि दूषित होऊन त्यांतील स्वर्गस्थ पूर्वज आपोआप पतन पावतात. ज्या कुलांत नित्य व नैमित्तिक कर्में घडत नाहींत, त्या ठिकाणीं पितरांना तिलोदक कोण अर्पण करणार ? ५५ अशी स्थिति झाल्यावर त्या पितरांनीं काय करावें ? व स्वर्गांत कसें रहावें ? ह्मणून तेहि आपल्या कुलापाशीं येतात. ५५ ज्याप्रमाणें नखास चावलेल्या सापाची वेदना शेंडीपर्यंत सर्वांग व्यापून टाकते, त्याप्रमाणें आप्तवर्गाचा वध करण्यापासून उत्पन्न होणारे हे दोष हल्लीं जिवंत असलेल्या कुलापासून मूळ पुरुषापर्यंत सर्वांस बुडवितात!५६

अन्वय–कुलघ्नानां एतैः वर्णसंकरकारकैः दोषैः शाश्वताः जातिधर्माः कुलधर्माः च उत्साद्यंते ॥४३॥

अर्थ–वर्णसंकर उत्पन्न करणाऱ्या ह्या कुलघातक पुरुषांच्या दोषांमुळें, पुरातन जातिधर्म व कुलधर्म नाहींतसे होतात. ॥४३॥

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन । नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् । यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥

देवा अवधारी आणीक एक । एथ घडे महापातक । जे संगदोषें हा लौकिक । भ्रंशु पावे ५७ जैसा घरीं आपुला । वानिवसें अग्नि लागला । तो आणिकांही प्रज्वळिला । जाळूनि घाली ५८ तैसिया तया कुळसंगती । जे जे लोक वर्तती । तेही बाधा पावती । निमित्तें येणें ५९ तैसें नाना दोषें सकळ । अर्जुन म्हणे तें कुळ । मग महाघोर केवळ । निरय भोगी २६० पडिलिया तिये ठायीं । मग कल्पांतींही उकलु नाहीं । येसणें पतन कुळक्षयीं । अर्जुन म्हणे ६१ देवा हें विविध कानीं ऐकिजे । परी अझुनिवरी त्रासु नुपजे । हृदय वज्राचें हें काय कीजे । अवधारी पां ६२ अपेक्षिजे राज्यसुख । जयालागीं तें तंव क्षणिक । ऐसें जाणतांही दोख । अव्हेरू ना ६३ जे हे वडिल सकळ आपुले । वधावया दिठी सूदले । सांग पां काय थेकुलें । घडलें आम्हां ६४

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः । धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥

आतां यावरी जें जियावें । तयापासूनि हें बरवें । जे शस्त्र सांडूनि साहावे । बाण यांचे ६५ तयावरी होय जितुकें । तें मरणही वरी निकें । परी येणें कल्मषें । चाड नाहीं ६६ ऐसें देखून सकळ । अर्जुनें आपुलें कुळ । मग म्हणे राज्य तें केवळ । निरयभोगु ६७

एवमुक्त्वाऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् । विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥४७॥

इति श्रीमद्भगवद्गीतासुपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादेऽर्जुन विषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः

ऐसें तिये अवसरीं । अर्जुन बोलिला समरीं । संजयो म्हणे अवधारी । धृतराष्ट्रातें ६८ मग अत्यंत उद्वेगला । न धरत गहिंवरू आला । तेथ उडी घातली खालां । रथौनियां ६९ जैसा राजकुमरु पदच्युतु । सर्वथा होय उपहतु । कां रवि राहुग्रस्तु । प्रभाहीनु २७० नातरी महासिद्धिसंभ्रमें । जिंतला तापसु भ्रमें । मग आकळूनि कामें । दीनु कीजे ७१ तैसा तो धनुर्धरु । अत्यंत दुःखें जर्जरु । दिसे जेथ रहंवरु । त्यजिला तेणें ७२ मग धनुष्य बाण सांडिले । न धरत अश्रुपात आले । ऐसें ऐक राया वर्तलें । संजयो म्हणे ७३ आतां यावरी तो वैकुंठनाथु । देखोनि सखेद पार्थु । कवणेपरी परमार्थु । निरूपील ७४ ते सविस्तर पुढारी कथा । अति सकौतुक ऐकतां । ज्ञानदेवो म्हणे आतां । निवृत्तिदासु २७५

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ श्लोक ४७, ओंव्या २७५.

अन्वय–जनार्दन, उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां नरके नियतं वासः भवति इति अनुशुश्रुम ॥४४॥ वत अहो महत् पापं कर्तुं वयं व्यवसिताः यत् राज्यसुखलोभेन स्वजनं हन्तुं वयं उद्यताः ॥४५॥

अर्थ–जनार्दना, ज्यांचे कुलधर्म नष्ट झाले आहेत, त्या मनुष्यांस निश्चयेंकरून नरकप्राप्ति होते असें आह्मी ऐकतों. ॥४४॥ अरेरे! राज्यसुखाच्या लोभानें आपल्या बांधवांस मारण्यास उद्युक्त झालों, हें केवढें मोठें पाप करण्यास आह्मी तयार झालो आहों! ॥४५॥

कृष्णा, या ठिकाणीं आणखी एक महापातक घडतें, तें कोणतें म्हणाल तर, या दोषापासून लोकाचार नाहींतसे होतात. ५७ ज्याप्रमाणें घराला एकाएकीं आग लागून तो अग्नि पेटल्यावर घराचे शेजारचीं दुसरींहि घरें जाळून टाकतो, ५८ त्याप्रमाणें, अशा कुलांचा ज्या लोकांस सहवास घडतो, त्यांनाहि त्यांच्या संगतीच्या योगानें पातक लागतें. ५९ अर्जुन म्हणतोः–देवा, त्याप्रमाणेंच, त्या कुलांत नाना प्रकारचे दोष घडून आले ह्मणजे मग त्याला भयंकर नरकवास भोगावा लागतो. २६० अर्जुन आणखी म्हणतो, त्या नरकांत पडल्यावर मग कल्पांतींहि तेथून त्याची सुटका होत नाहीं, इतकें या कुलक्षयापासून पतन होतें ६१ देवा, एवढा वेळपर्यंत चाललेली माझी ही कटकट ऐकूनहि तिजपासून अजून आपल्या मनास त्रास होत नाहीं, तर आपण आपलें मन एवढें कठोर कां केलें? ६२ असें पहा कीं, कुलक्षय करून ज्याच्याकरितां राज्यसुखाची इच्छा करावयाची, तें शरीर तर क्षणिक आहे असें जाणूनहि आम्ही कुलक्षयाचे दोष करण्याचें सोडूं नये काय? ६३ आमचे जे हे सर्व वडील जमले आहेत त्यांचा वध करावा या हेतूनें मीं त्यांच्याकडे दृष्टि फेंकली हें आमच्या हातून काय लहान पातक घडलें आहे सांगा बरें? ६४

अन्वय–यदि शस्त्रपाणयः धार्तराष्ट्राः अशस्त्रं अप्रतीकारं मां रणे हन्युः तत् मे क्षेमतरं भवेत् ॥४६॥

अर्थ–म्हणून, मी निःशस्त्र होऊन प्राणसंरक्षणार्थ कांहीं प्रयत्न करीत नसतांना, जरी ह्या शस्त्रधारी कौरवांनीं माझा वध केला, तरी त्यापासून देखील माझें अधिकच कल्याण होईल! ॥४६॥

तर असें करून जें वांचावें, त्यापेक्षां आपले हातांतील शस्त्र टाकून कौरवांचे बाण सहन करावे हें वरें. ६५ असें केल्यामुळें जरी मरण प्राप्त झालें, तरी तें चांगलें. परंतु यांचा वध करून पाप जोडण्याची माझी इच्छा नाहीं. ६६ याप्रमाणें अर्जुनानें आपलें सर्व कुल पाहून म्हटलें कीं, यांचा क्षय करून राज्य मिळविणें ह्मणजे केवळ नरकाची जोड करणें होय. ६७

अन्वय–एवं उक्त्वा शोकसंविग्नमानसः अर्जुनः सशरं चापं विसृज्य संख्ये रथोपस्थे उपाविशत् ॥४७॥

अर्थ–संजय ह्मणालाः–याप्रमाणें बोलून, ज्याचें अंतःकरण शोकाकुल झालें आहे असा तो अर्जुन बाण जोडलेलें धनुष्य खालीं ठेवून रणांत रथोपस्थीं बसला! ४७

संजय म्हणालाः–राजा धृतराष्ट्रा, ऐक. त्या वेळेस समरांगणांत उभा असलेला अर्जुन असें बोलला; ६८ आणि मग अत्यंत उदासीन झाला, व अनिवार गहिंवर येऊन त्यानें रथावरून खालीं उडी टाकली. ६९ ज्याप्रमाणें एकादा राजकुमर पदच्युत झाला ह्मणजे त्याला कोणीही मान देत नाहीं, किंवा राहूच्या योगानें सूर्यास ग्रहण लागलें ह्मणजे तो निस्तेज होतो, २७० किंवा तपस्वी महासिद्धीच्या प्राप्तीच्या भ्रमानें व्यापला ह्मणजे तपाचा त्याग करून कामाच्या सपाट्यांत सांपडून निंदेस पात्र होतो, ७१ त्याप्रमाणें तो अर्जुन रथाखालीं उतरल्यावर अत्यंत दुःखानें व्याप्त झालेला दिसला, ७२ संजय म्हणतो, राजा, आणखी असें झालें कीं, त्यानें धनुष्यबाण टाकून दिले, व त्याच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या. ७३ आतां यापुढें अर्जुनास दुःख झालेलें पाहून वैकुंठनाथ श्रीकृष्ण हे त्यास कशा रीतीनें तत्त्वज्ञानाचा बोध करतील, ७४ ती पुढें येणारी सविस्तर कथा उत्सुकतेनें ऐका, असें निवृत्तिनाथांचे दास श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणाले. २७५

ज्ञानेश्वरी.

अध्याय दुसरा.

संजय उवाचः—

तं तथा कृपयाऽऽविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् । विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

मग संजयो म्हणे रायातें । आइके तो पार्थु तेथें । शोकाकुल रुदनातें । करीतु असे १ तें कुळ देखोनि समस्त । स्नेह उपनलें अद्भुत । तेणें द्रवलें असे चित्त । कवणेपरी २ जैसें लवण जळें झळबलें । ना तरी अभ्र वातें हाले । तैसें सधीर परी विरमलें । हृदय तयाचें ३ म्हणोनी कृपा आकळिला । दिसतसे अति कोमाइला । जैसा कर्दमीं रुपला । राजहंसु ४ तयापरी तो पांडुकुमरु । महामोहें अति जर्जरु । देखोनी श्रीशार्ङ्गधरु । काय बोले ५

श्रीभगवानुवाचः—

कुतस्त्वा कष्मलमिदं विषमे समुपस्थितम् । अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

म्हणे अर्जुना आदि पाहीं । हें उचित काय इये ठायीं । तूं कवण हें कायी । करीत आहासी ६ तुज सांगे काय झालें । कवण उणें आलें । करितां काय ठेलें । खेदु कायिसा ७ तूं अनुचिता चित्त नेदिसी । धीरु कंहीं न संडिसी । तुझेनि नामें अपयशीं । दिशा लंघिजे ८ तूं शूरवृत्तीचा ठावो । क्षत्रियांमाजीं रावो । तुझिया लाठेपणाचा आवो । तिहीं लोकीं ९ तुवां संग्रामीं हरु जिंकिला । निवातकवचांचा ठावो फेडिला । पवाडा तुवां केला । गंधर्वांसी १० पाहतां तुझेनि पाडें । दिसे त्रैलोक्यही थोकडें । ऐसें पुरुषत्व चोखडें । पार्था तुझें ११ तो तूं कीं आजि एथें । सांडूनियां वीरवृत्तीतें । अधोमुख रुदनातें । करीतु आहासी १२ विचारी तूं अर्जुनु । कीं कारुण्यें किजसी दीनु । सांग पां अंधकारें भानु । ग्रासिला आथी १३ ना तरी पवनु मेघासि बिहे । कीं अमृतासि मरण आहे । पाहे पां इंधनचि गिळोनि जाये । पावकातें १४ कीं लवणेंचि जळ विरे । संसर्गें काळकूट मरे । सांग पां महाफणी दर्दुरें । गिळिजे कायी १५ सिंहासि झोंबे कोल्हा । ऐसा अपाडु आथि कें जाहला । परी तो त्वां साच केला । आजि एथ १६ म्हणोनि अझुनी अर्जुना । झणें चित्त देसी या

ज्ञानेश्वरी.

अध्याय दुसरा.

अन्वय–तथा कृपया आविष्टम् अश्रुपूर्णाकुलेक्षणं विषीदन्तं तं (अर्जुनं) मधुसूदनः इदं वाक्यं उवाच ॥१॥

अर्थ–संजय म्हणालाः–याप्रमाणें करुणेनें व्याप्त झालेल्या, डोळे पाण्यानें भरून आलेल्या, व खिन्न झालेल्या अर्जुनाला मधुसूदन असें बोलते झाले. ॥१॥

मग संजय धृतराष्ट्र राजास म्हणालाः–महाराज, ऐका. अर्जुन त्या ठिकाणीं शोकानें व्याकुळ होऊन रुदन करूं लागला. १ तें आपलें सर्व कुळ पाहून त्याच्या मनांत विलक्षण मोह उत्पन्न झाला, आणि त्या योगानें त्याचें चित्त द्रवलें; कसें ह्मणाल तर, २ पाण्यानें ज्याप्रमाणें मीठ विरघळतें, अथवा वाऱ्यानें ज्याप्रमाणें ढग नाहींतसे होतात, त्याप्रमाणें, तो मोठा धैर्यवान होता तरी त्याच्या हृदयास द्रव आला! ३ जसा राजहंस पक्षी चिखलांत रुतल्यावर म्लान दिसतो, तसा तो ममतेनें व्याकूळ होऊन अगदीं म्लान दिसूं लागला. ४ त्याप्रमाणें तो अर्जुन महामोहानें ग्रस्त झालेला पाहून भगवान श्रीकृष्ण म्हणालेः—५

अन्वय–अर्जुन, अनार्यजुष्टं अस्वर्ग्यं अकीर्तिकरं (च) इदं कश्मलं त्वा विषमे कुतः समुपस्थितम् ? ॥ २ ॥

अर्थ–श्रीभगवान म्हणालेः—अर्जुना, थोर लोकांना मान्य न होणारा, स्वर्गप्राप्तीचे आड येणारा, व कीर्तीचा नाश करणारा असा हा मोह तुला ह्या युद्धप्रसंगीं कोठून उत्पन्न झाला ? ॥ २ ॥

अर्जुना, अरे असें पहा, या ठिकाणीं तुला हें शोभतें काय? तूं कोण आहेस व हें काय करीत आहेस याचा अगोदर विचार कर. ६ तुला काय झालें? सांग बरें कोणतें कमी पडलें? काय करण्याचें राहिलें? आणि दुःख कशाकरितां झालें? ७ तूं अनुचित गोष्टीकडे कधीं लक्ष देत नाहींस, व कधींही धीर सोडीत नाहींस. तुझ्या केवळ नामस्मरणानें अपयश दिगंतीं पळून जातें. ८ तूं शौर्याचें केवळ आगर व क्षत्रियांचा मुकुटमणि आहेस, व तुझ्या शौर्याचा डंका त्रैलोक्यांत गाजत आहे. ९ तूं युद्धांत शंकरास जिंकिलेंस; निवातकवचांचा समूळ उच्छेद केलास; आणि आपलें यश गंधर्वांस गाण्यास विषय करून ठेविलेंस. १० अर्जुना, ज्या तुझा पराक्रम एवढा मोठा आहे कीं, त्याच्या तुलनेला हें त्रिभुवन देखील कमी आहे, ११ तोच तूं आज वीरवृत्ति सोडून खालीं तोंड घालून रडत बसला आहेस! १२ अर्जुना, विचार कर! तुला कारुण्यानें इतकें दीन करून टाकावें काय? अरे, अंधकारानें सूर्याला कधीं गिळून टाकलें आहे कां सांग बरें? १३ किंवा वाऱ्यास मेघाचें भय कधीं वाटलें आहे? अथवा अमृतास कधीं मरण आहे? किंवा लाकडानें कधीं अग्नि गिळला आहे? १४ अथवा मिठानें पाणी कधीं विरलें आहे? किंवा कालकूट विष हें दुसऱ्याच्या संसर्गानें मेलें आहें? अथवा मोठ्या भुजंगाला कधीं बेडकानें गिळलें आहे? १५ बरें, कधीं कोल्ह्यानें सिंहाबरोबर झोंबी केली आहे? अशा विलक्षण गोष्टी कधीं तरी घडल्या आहेत का? पण त्या तूं एथें आज खऱ्या करून दाखविल्यास! १६ अर्जुना, कदाचित् वाईट गोष्टींकडे लक्ष देखील हो!

हीना । वेगीं धीर करूनियां मना । सावधु होई १७ सांडी हें मूर्खपण । उठी घे धनुष्यबाण । संग्रामीं हें कवण । कारुण्य तुझें १८ हां गा तूं जाणता । तरी न विचारिसी कां आतां । सांगे जुंझावेळे सदयता । उचित कायी १९ हे असतिये कीर्तीसी नाशु । आणि पारत्रिकासि अपभ्रंशु । म्हणे जगन्निवासु । अर्जुनातें २०

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते । क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

म्हणोनि शोकु न करीं । तूं पुरता धीरु धरीं । हे शोच्यता अव्हेरीं । पंडुकुमरा २१ तुज नव्हे हें उचित । येणें नासेल जोडलें बहुत । तूं अझुनि वरी हित । विचारीं पां २२ येणें संग्रामाचेनि अवसरें । एथ कृपाळूपण नुपकरे । हे आतांचि काय सोयरे । जाहले तुज २३ तूं आधींचि काय नेणसी । कीं हे गोत्रज नोळखसी । वायांचि काय करिसी । अतिशो आतां २४ आजिचें हें झुंज । काय जन्मा नवल तुज । हें परस्परें तुम्हां व्याज । सदांचि आथी २५ तरी आतां काय जाहलें । कायि स्नेह उपनलें । हें नेणिजे परी कुडें केलें । अर्जुना तुवां २६ मोह धरिलिया ऐसें होईल । जे असती प्रतिष्ठा जाईल । आणि परलोकही अंतरेल । ऐहिकेंसी २७ हृदयाचें ढिलेपण । एथ निकयासि नव्हे कारण । हें संग्रामीं पतन जाण । क्षत्रियासी २८ ऐसेनि तो कृपावंतु । नानापरी असे शिकवितु । हें ऐकोनि पंडुसुतु । काय बोले २९

अर्जुन उवाचः—

कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन । इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥

देवा हें येतुलेवरी । बोलावें नलगे अवधारीं । आधीं तूंचि विचारी । संग्रामु हा ३० हें झुंज नव्हे प्रमादु । एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु । हा उघड लिंगभेदु । वोढवला आम्हां ३१ देखे मातापितरें अर्चिजती । सर्वस्वें तोष पावविजती । तियें पाठीं केवीं वधिजती । आपुलिया हातीं ३२ देवा संतवृंद नमस्कारिजे । कां घडे तरी पूजिजे । हें वांचूनि केवीं निंदिजे । स्वयें वाचा ३३ तैसे गोत्रगुरु आमुचे । हे पूजनीय आम्हां नियमाचे । मज बहुत भीष्मद्रोणांचें । वर्ततसे ३४ जयांलागीं मनें विरूं । आम्ही स्वप्नींही न शकों धरूं । तयां प्रत्यक्ष केवीं करूं । घातु देवा ३५ वरी जळो हें जियालें । एथ आघवेयांसि हेंचि काय जाहलें । जे यांच्या वधीं अभ्यासिले । मिरविजे आम्हीं ३६ मी पार्थु द्रोणाचा केला । येणें धनुर्वेदु मज दिधला । तेणें उपकारें काय

ह्मणून मनास लवकर धीर देऊन सावध हो. १७ हा वेडेपणा टाकून दे, ऊठ, व धनुष्यबाण हातीं घे. कारण, या रणभूमीवर तुझ्या या करुणेचा काय उपयोग ? १८ अर्जुना, अरे तूं ज्ञाता ना ? या वेळीं विचार कसा करीत नाहींस ? अरे, युद्धाचे प्रसंगीं दया असणें योग्य आहे कां सांग बरें ? १९ श्रीकृष्ण ह्मणतातः-अर्जुना, हें तुझें वर्तन आजपर्यंत संपादन केलेल्या कीर्तीचा नाश करणारें व परलोकप्राप्तीस अडथळा आणणारें आहे ! २०

अन्वय-पार्थ, क्लैब्यं मा गमः स्म. एतत् त्वयि न उपपद्यते. परंतप, इदं क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वा उत्तिष्ठ. ॥ ३ ॥

अर्थ-पार्था, नामर्दपणा धरूं नको. हा तुला शोभत नाहीं. शत्रूंस ताप देणाऱ्या अर्जुना, क्षुद्र असें हें मनाचें दुबळेपण टाकून युद्धाकरितां ऊठ. ॥३॥

ह्मणून, अर्जुना, तूं शोक करूं नको, पूर्ण धीर धर आणि तूं ज्याकरितां शोक करितोस ती गोष्ट सोडून दे. २१ तुला हें करणें चांगलें नाहीं. तूं आजपर्यंत जें कांहीं संपादन केलें आहेस, त्याचा या योगानें नाश होईल; ह्मणून तूं अझून तरी हित कशांत आहे पहा. २२ असल्या संग्रामाचे वेळीं कृपाळूपणा उपयोगीं नाहीं. हे कौरव काय आतांच तुझे नातलग झाले आहेत ? २३ अरे, ही गोष्ट तुला पूर्वी माहीत नव्हती का ? किंवा हे नातेवाईक आहेत हें तूं ओळखीत नव्हतास काय ? मग आतांच हा व्यर्थ पाल्हाळ कां लावला आहेस ? २४ काय सांगावें, आजचा हा युद्धप्रसंग तुझ्या सगळ्या जन्मांत अपूर्व आहे ! नाहींतर तुह्मां परस्परांमध्यें कलहाचीं कारणें नेहमीं आहेतच; २५ मग आतांच काय झालें ? हा मोह तुला कसा उत्पन्न झाला कोण जाणे ! पण, अर्जुना, तूं हें फार वाईट केलेंस. २६ जर तूं हा मोह धारण केलास, तर आजपर्यंत मिळविलेला लौकिक जाऊन इहपरलोकांसही अंतरशील. २७ तुझ्या अंतःकरणांतील नेभळेपणा तुझ्या कल्याणाला कारण होणार नाहीं. तो युद्धामध्यें क्षत्रियाला दुर्गतीला कारण होईल. २८ याप्रमाणें त्या दयाळू भगवंतांनीं पुष्कळ प्रकारें केलेला बोध ऐकून अर्जुन बोलला:-२९

अन्वय-मधुसूदन, अहं भीष्मं द्रोणं च सङ्ख्ये इषुभिः कथं प्रतियोत्स्यामि ? अरिसूदन ! (एतौ) पूजार्हौ (स्तः)॥४॥

अर्थ-अर्जुन म्हणालाः—हे मधुसूदना ! मी युद्धांत भीष्म व द्रोणाचार्य यांच्यावर बाण कसे सोडूं ! शत्रुदमना, हे पूजा करण्यास योग्य आहेत. ॥ ४ ॥

देवा ! ऐका. इतकें बोलायाचें कांहीं कारण नाहीं. ह्या युद्धाविषयीं आधीं आपणच विचार करा. ३० हें युद्ध नसून आमचे हातून मोठी अमर्यादा होत आहे; हें करण्याला आम्ही प्रवृत्त झालों तर हा दोष आहे; इतकेंच नव्हे, तर आम्हीं आराध्यदेवतांचा उघड उघड उच्छेद करीत आहों. ३१ असें पहा कीं, मातापितरांची सेवा करून त्यांना सर्व प्रकारें संतुष्ट ठेवावें; आणि मागून त्यांचाच आपण आपल्या हातानें वध कसा करावा ? ३२ देवा, साधुसंतांना नमस्कार करावा, घडेल तर त्यांची पूजा करावी, पण हें सोडून आपण आपल्याच मुखानें त्यांची निंदा कशी करावी ? ३३ त्याचप्रमाणें, हे तर आमचे कुलगुरु असून आह्मांला सर्वदा पूज्य आहेत. त्यांतून भीष्म व द्रोण यांचा तर मी फार ऋणी आहें. ३४ देवा, ज्यांच्याविषयीं आम्ही स्वप्नांत देखील वैर धरूं शकत नाहीं, त्यांचा प्रत्यक्ष घात कसा करावा बरें ? ३५ आज या सर्वांच्या बुद्धीला झालें तरी काय ? ज्या शस्त्रविद्येचा अभ्यास आम्हीं यांच्यापाशीं केला, तिचा उपयोग यांना मारण्याकडे करून त्याविषयीं प्रतिष्ठा मिरवावयाची असें जर होईल, तर जळो हें जिणें ! ३६ मी-अर्जुन-द्रोणाचार्यांचा शिष्य; त्यांनींच मला धनुर्विद्या शिकविली; तर आतां त्यांना

आभारैला । वधीं तयातें ३७ जेथींचिया कृपा लाहिजे वरु । तेथेंचि मनें व्यभिचारु । तरी काय मी भस्मासुरु । अर्जुन म्हणे ३८

गुरूनहत्वा हि महानुभावाञ्श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ॥
हत्वाऽर्थकामांस्तु गुरूनिहैव भुञ्जीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ॥ ५ ॥

देवा समुद्र गंभीर आइकिजे । वरि तोहि आहाच देखिजे । परी क्षोभु मनीं नेणिजे । द्रोणाचिये ३९ हें अपार जें गगन । वरी तयाही होईल मान । परी अगाध भलें गहन । हृदय याचें ४० वरी अमृतही विटे । कीं काळवशें वज्रही फुटे । परी मनोधर्मु न लोटे । विकरविलाही ४१ स्नेहालागीं माये । म्हणिपे तें कीरु होये । परी कृपा ते मूर्त आहे । द्रोणीं इये ४२ हा कारुण्याची आदि । सकल गुणांचा निधि । विद्यासिंधु निरवधि । अर्जुन ह्मणे ४३ हा येणें मानें महंतु । वरी आम्हांलागीं कृपावंतु । आतां सांग पां येथ घातु । चिंतूं येईल ४४ ऐसे हे रणीं वधावे । मग आपण राज्यसुख भोगावें । तें मना नये आघवें । जीवितेसीं ४५ हें येणें मानें दुर्धर । जे यांहीहुनी भोग सधर । ते असतु येथवर । भिक्षा मागतां भली ४६ ना तरी देशत्यागें जाइजे । का गिरिकंदर सेविजे । परी शस्त्र आतां न धरिजे । इयांवरी ४७ देवा नवनिशतीं शरीं । वावरोनी यांच्या जिव्हारीं । भोग गिंवसावे रुधिरीं । बुडाले जे ४८ ते काढूनि काय किजती । लिप्त केवीं सेविजती । मज नये हे उपपत्ति । याचिलागीं ४९ ऐसें अर्जुन तिये अवसरीं । म्हणे श्रीकृष्णा अवधारीं । परि तें मना नयेचि मुरारी । आइकोनियां ५० हें जाणोनि पार्थु बिहाला । मग पुनरपि बोलों लागला । म्हणे देवो कां चित्त या बोला । देतीचि ना ५१

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ॥
यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६ ॥

येऱ्हवीं माझ्या चित्तीं जें होतें । तें मी विचारूनि बोलिलों एथें । परी निकें काय यापरौतें । तें तुम्ही जाणा ५२ पैं विरु जयांसीं ऐकिजे । आणि या बोलींचि प्राणु सांडिजे । ते एथ संग्रामव्याजें । उभे आहाती ५३ आतां ऐसेयांतें वधावें । कीं अव्हेरूनियां निघावें । या दोहोंमाजीं बरवें । तें नेणों आम्ही ५४

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ॥
यच्छ्रेयःस्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ७ ॥

आह्मां काय उचित । तें पाहतां न स्मरे एथ । जे मोहें येणें चित्त । व्याकुळ

मारून त्यांच्या त्या उपकारांची फेड करूं होय? ३७ अर्जुन म्हणतोः—ज्यांच्या कृपेनें आम्ही वरप्राप्ति करून घ्यावी, त्यांच्याशींच कृतघ्नपणा करायाला मी का भस्मासुर आहे? ३८

अन्वय- महानुभावान् गुरून् हि अहत्वा, इहलोके भैक्ष्यं भोक्तुम् अपि श्रेयः (अस्तिः); गुरून् हत्वा तु इह एव रुधिरप्रदिग्धान् अर्थकामान् भोगान् भुञ्जीय ॥ ५ ॥

अर्थ—अत्यंत उदार अंतःकरणाच्या भीष्मद्रोणादि गुरुजनांस न मारितां ह्या लोकीं भिक्षा मागूनही निर्वाह करणें मला कल्याणकारक वाटतें. कारण, गुरुजनांना मारून त्यांच्या रक्तानें भरलेले व अर्थ व काम ह्यांनीं युक्त असे भोग इहलोकींच आम्हांला भोगावे लागतील! ५

देवा, समुद्र गंभीर आहे असें ऐकतों, तथापि तें वरकरणींच; परंतु द्रोणाचार्यांविषयीं म्हटलें तर त्यांना राग ह्मणजे काय हें माहीत सुद्धां नाहीं. ३९ आकाशाचा अंत नाहीं, पण त्याचेंही माप करतां येईल, परंतु द्रोणाचार्यांचें अंतःकरण इतकें खोल आहे कीं, त्याचें माप करतां येणार नाहीं. ४० कदाचित् अमृतही अंबेल, किंवा वज्रही फुटेल, पण द्रोणाचार्यांस प्रयत्नांतींही राग यावयाचा नाहीं. ४१ आईशिवाय इतरांची माया व्यर्थ होय अशी जी म्हण आहे, ती खरी आहे; परंतु द्रोणाचार्यांचे ठिकाणीं माया मूर्तिमंत वास करिते. ४२ अर्जुन म्हणतोः—हे आचार्य ह्मणजे दयेचा उगम, सर्व गुणांची खाण, व विद्येचे केवळ महानिधि आहेत; ४३ अशा प्रकारें हे सर्वश्रेष्ठ असून आह्मांविषयीं तर पूर्ण कृपावंत आहेत, तेव्हां यांचा घात करण्याचें मनांत येईल तरी का? ४४ अशांना रणांत मारून मग आपण राज्यसुख भोगावें ही गोष्ट माझ्या मनांत जीव गेला तरी येणार नाहीं; ४५ इतकें हें कृत्य कठीण आहे. यांच्यापेक्षां राज्योपभोग श्रेष्ठ असतील तर असोत बिचारे! पण त्यापेक्षां भिक्षा मागणेंच बरें! ४६ नाहींपेक्षां देशत्याग करावा, अथवा गिरिकंदरांत जाऊन रहावें, परंतु याजवर आतां शस्त्र ह्मणून धरूं नये. ४७ देवा, नवीन पाजळलेल्या बाणांनीं यांच्या मर्मस्थानीं प्रहार करून त्यांच्या रक्तपातानंतर मिळणारे रक्तांत बुडालेले भोग शोधीत बसूं काय? ४८ ते प्राप्त करून घेऊन करावयाचें काय? आणि रक्तानें भरलेले ते भोग कसे उपभोगावयाचे? ह्मणून हें करणें माझ्या मनास येत नाहीं. ४९ अशा प्रकारें बोलून त्या वेळेस अर्जुन श्रीकृष्णास म्हणालाः—" देवा ऐकलें का? " परंतु तें बोलणें कृष्णांस पसंत पडलें नाहीं, ५० असें पाहून अर्जुन आपल्या मनांत भिऊन पुनः म्हणालाः— देवा, माझ्या बोलण्याकडे आपण लक्ष कां देत नाहीं? ५१

अन्वय—नः कतरत् गरीयः, यद्वा (वयं तान्) जयेम यदि वा (ते) नः जयेयुः, एतत् अपि नच विद्मः यान् हत्वा न जिजीविषामः ते धार्तराष्ट्राः प्रमुखे अवस्थिताः एव. ६

अर्थ—(युद्ध किंवा भिक्षाटन यांपैकीं) कोणतें आम्हांस अधिक श्रेयस्कर आहे, व यांना आम्ही जिंकूं किंवा हे आम्हांला जिंकतील, हें मला कळत नाहीं. ज्या कौरवांना मारून आम्ही जगण्याची इच्छा करीत नाहीं, ते तर माझ्यासमोर युद्धास तयार होऊन उभे राहिले आहेतच! ६

बाकी माझ्या मनांत जें होतें, तें मी एथें विचार करून बोललों; परंतु यापेक्षां चांगलें कोणतें तें तुम्हांसच माहीत; ५२ हें पहा—ज्यांच्याशीं आमचें वैर आहे हीं अक्षरें ऐकल्यावरोवर आम्ही प्राण सोडावे, तेच रणभूमीवर संग्राम करण्याकरितां उभे आहेत, ५३ तर यांना मारावें किंवा सोडून निघून जावें, या दोहोंमध्यें चांगली गोष्ट कोणती हें आह्मांला समजत नाहीं. ५४

अन्वय—कार्पण्यदोषोपहतस्वभावः धर्मसंमूढचेताः (अहं) त्वां पृच्छामि. यत् निश्चितं श्रेयः स्यात् तन्मे ब्रूहि; अहं ते शिष्यः (अस्मि). त्वां प्रपन्नं मां शाधि. ॥ ७ ॥

अर्थ—अज्ञाननिमित्तक दोषामुळें माझें अंतःकरण दूषित झालें आहे, व माझें कर्तव्य काय आहे हें मला समजत नाहीं, म्हणून तुम्हांला मी विचारतों; तर यांत निश्चय करून कल्याणकारक जें असेल तें मला सांगा. मी तुमचा शिष्य आहें व तुम्हांला शरण आलों आहें, यास्तव मला उपदेश करा. ॥ ७ ॥

आम्हांस कोणती गोष्ट करणें योग्य आहे हें विचार करूनही सुचत नाहीं; कारण, या मोहानें

माझें ५५ तिमिरावरुद्ध जैसें । दृष्टीचें तेज भ्रंशे । मग पासींच असतां न दिसे । वस्तुजात ५६ देवा तैसें मज जाहलें । जें मन हें भ्रांती ग्रासिलें । आतां काय हित आपुलें । तेंही नेणें ५७ तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें । निकें तें आह्मां सांगावें । जे सखा सर्वस्व आघवें । आह्मांसि तूं ५८ तूं गुरु बंधु पिता । तूं आमुची इष्ट देवता । तूंचि सदा रक्षिता । आपदीं आमुतें ५९ जैसा शिष्यातें गुरू । सर्वथा नेणें अव्हेरू । कीं सरितांतें सागरू । त्यजी केवीं ६० नातरी अपत्यातें माये । सांडूनि जरी जाये । तरी तें कैसेनि जिये । ऐके कृष्णा ६१ तैसा सर्वांपरी आह्मांसी । देवा तूंचि एक आहासी । आणि बोलिलें जरी न मनिसी । मागील माझें ६२ तरी उचित काय आम्हां । जें व्यभिचरेना धर्मा । तें झडकरी पुरुषोत्तमा । सांगे आतां ६३

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणां ॥
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाऽऽधिपत्यम् ॥ ८ ॥

हें सकळ कुळ देखोनि । जो शोकु उपनलासे मनीं । तो तुझिया वाक्यावांचुनी । न जाय आणिकें ६४ एथ पृथ्वीतळ आपु होईल । हें महेंद्रपदही पाविजेल । परि मोह हा न फिटेल । मानसींचा ६५ जैसी सर्वथा बीजें आहाळलीं । तीं सुक्षेत्रीं जन्ही पेरिलीं । तरी न विरूढती सिंचलीं । आवडे तैसीं ६६ ना तरी आयुष्य पुरलें आहे । तरी औषधें कांहीं नोहे । एथ एकचि उपेगा जाये । परमामृत ६७ तैसे राज्यभोगसमृद्धि । उज्जीवन नोहे इये बुद्धि । एथ जिव्हाळा कृपानिधि । कारुण्य तुझें ६८ ऐसें अर्जुन तेथ बोलिला । जंव क्षणएक भ्रांती सांडिला । मग पुनरपि व्यापिला । उर्मी तेणें ६९ कीं मज पाहतां उर्मी नोहे । हें अनारिसें गमत आहे । तो ग्रसिला महामोहें । काळसर्पें ७० सवर्म हृदयकल्हारीं । तेथ कारुण्यवेळेच्या भरीं । लागला म्हणोनि लहरी । भांजेचि ना ७१ हें जाणोनि ऐसी प्रौढी । जो दृष्टिसवेंचि विष फेडी । तो धांवया श्रीहरी गारुडी । पातला कीं ७२ तैसिया पंडुकुमरा व्याकुळा । मिरवतसे श्रीकृष्णा जवळा । तो कृपावशें अवलीळा । रक्षील आतां ७३ ह्मणोनि तो पार्थु । मोहफणिग्रस्तु । म्यां ह्मणितला हा हेतु । जाणोनियां ७४ मग देखा तेथ फाल्गुनु । घेतला असे भ्रांती कवळूनु । जैसा घनपडळीं भानु । आच्छादिजे ७५ तयापरी तो धनुर्धरु । जाहलासे दुःखें जर्जरु । जैसा ग्रीष्मकाळीं

माझें चित्त व्याकुळ झालें आहे. ५५ ज्याप्रमाणें अंधारामुळें डोळ्यानें दिसेनासें झालें ह्मणजे जवळ असलेलाही पदार्थ दिसत नाहीं, ५६ त्याप्रमाणें, देवा, माझी स्थिति झाली आहे:--माझें मन भ्रांतीनें ग्रासून गेलें असून, आपलें हित कशांत आहे तेंही मला समजत नाहीं; ५७ तर श्रीकृष्णा, आपण विचार करून खरें असेल तें आम्हांला सांगा; कारण, आमचे इष्टमित्र वगैरे सर्वस्व आपण आहां. ५८ आमचे गुरु, बंधु, बाप, कुलदैवत आणि नेहमीं संकटसमयीं रक्षण करणारे आपणच आहां. ५९ ज्याप्रमाणें गुरु शिष्याचा अव्हेर करीत नाहीं. किंवा समुद्र नद्यांचा अव्हेर कसा करील ? ६० अथवा, देवा, आपणच विचार करा, कीं आई मुलास सोडून गेली तर तें कसें वांचेल ? ६१ त्याचप्रमाणें, सर्वतोपरी आम्हांस आपणच आहां व इतका वेळपर्यंत जें मी आपल्याला बोललों तें जर तुम्हांस पटत नसेल तर, ६२ पुरुषोत्तमा, जी गोष्ट आम्हांस उचित असून धर्मविरुद्ध नसेल, ती लवकर सांगा. ६३.

अन्वय-भूमौ असपत्नं ऋद्धं राज्यं सुराणां आधिपत्यं चापि अवाप्य हि, यत् मम इंद्रियाणां उच्छोषणं शोकं अपनुद्यात् तत् न प्रपश्यामि. ॥ ८ ॥

अर्थ-इहलोकीं पृथ्वीचें निष्कंटक व संपन्न राज्य आणि स्वर्गीं देवांचें आधिपत्य म्हणजे इंद्रपद मिळालें, तरीही, माझ्या इंद्रियांना शोषून टाकणारा हा शोक कोणत्या उपायांनीं दूर होईल हें मला कळत नाहीं ! ॥ ८ ॥

हे सर्व गोत्रज पाहून माझ्या मनांत जो शोक उत्पन्न झाला आहे, तो आपल्या उपदेशावांचून दुसऱ्या कोणत्याही उपायानें नाहींसा होणार नाहीं. ६४ या ठिकाणीं पृथ्वीचें राज्य मिळालें किंवा इंद्रपद प्राप्त झालें, तरी देखील माझ्या अंतःकरणांत उत्पन्न झालेला हा मोह दूर होणार नाहीं. ६५ ज्याप्रमाणें भाजलेलें बीं कितीही उत्तम जमिनींत पेरलें व त्यास मनमुराद पाणी घातलें तरी उगवत नाहीं, ६६ किंवा जेथें आयुष्य संपलें आहे तेथें एका परमामृताशिवाय इतर औषधांचा कांहीं उपयोग होत नाहीं, ६७ त्याप्रमाणें मला सर्व राज्यभोग व संपत्ति प्राप्त झाली तरी या मोहांतून पार पडण्यास त्यांचा बिलकूल उपयोग होणार नाहीं; तर, हे कृपानिधे, तुझ्या कृपेचा जिव्हाळाच उपयोगी पडेल. ६८ याप्रमाणें, क्षणभर भ्रांति दूर झाल्यामुळें अर्जुन त्या ठिकाणीं बोलला. परंतु त्याला पुनः मोहानें झपाटलें. ६९-ह्या अर्जुनाच्या स्थितीवर महाराज असें रूपक करितात कीं,-ह्याला मोहाची लहर नसून हा कांहीं निराळाच प्रकार असावासें मला वाटतें; तो कोणता ह्मणाल तर, महामोहरूपी काळसर्पानें अर्जुनास ग्रासलें; ७० आणि हृदयकमलांत कारुण्याची उसळी आली आहे अशी संधि साधून मर्मस्थानीं दंश केला असतां त्यास लहरीवर लहरी येऊन झेंडू फुटणार नाहीं काय ? ७१ असा प्रसंग पाहून, ज्याच्या कृपादृष्टीनें विष नाहींसें होतें असें ज्याचें ऐश्वर्य तो श्रीकृष्णरूपी गारुडी त्याचें रक्षण करण्याकरितां धांवून आला. ७२ तेव्हां अर्जुन श्रीकृष्णांजवळ मोहानें व्याप्त झालेल्या स्थितींत शोभूं लागला. त्याचें तो श्रीकृष्ण आपल्या कृपेनें आतां सहज रक्षण करील. ७३ ह्मणून, मोह हाच कोणी सर्प व त्यानें पार्थाला ग्रासलें आहे हा हेतु मनांत धरून मीं एथें हें रूपक केलें. ७४ ज्याप्रमाणें ढगांनीं सूर्य आच्छादित होतो, त्याप्रमाणें अर्जुन ह्या वेळीं भ्रांतीनें आच्छादित झाला. ७५ जसा उन्हाळ्यांत डोंगराला वणवा लागतो, तसा तो अर्जुन दुःखानें अ-

गिरिवरु । वणवला कां ७६ म्हणोनि सहजें सुनीळु । कृपामृतें सजळु । तो वोळला श्रीगोपाळु । महामेघु ७७ तेथ सुदशनांची द्युति । तेचि विद्युल्लता झळकती । गंभीर वाचा ते आयती । गर्जनेची ७८ आतां तो उदार कैसा वर्षेल । तेणें अर्जुनाचळु निवेल । मग नवी विरूडी फुटेल । उन्मेषाची ७९ ते कथा आइका । मनाचिया आराणुका । ज्ञानदेवो म्हणे देखा । निवृत्तिदासु ८०

संजय उवाचः--

एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतपः । न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥ ९ ॥

ऐसें संजयो असे सांगतु । म्हणे राया तो पार्थु । पुनरपि शोकाकुळितु । काय बोले ८१ आइकें सखेदु बोले श्रीकृष्णातें । आतां नाळवावें तुम्हीं मातें । मीं सर्वथा न झुंजें एथें । भरंवसेनी ८२ ऐसें येकि हेळां बोलिला । मग मौन धरूनि ठेला । तेथ श्रीकृष्णा विस्मो पातला । देखोनि तयातें ८३

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत । सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥ १० ॥

मग आपुलां चित्तीं म्हणे । एथ हें कायी आदरिलें येणें । अर्जुन सर्वथा कांहीं नेणें । काय कीजे ८४ हा उमजे आतां कवणेपरी । कैसेनि धीरू स्वीकारी । जैसा ग्रहातें पंचाक्षरी । अनुमानी कां ८५ ना तरी असाध्य देखोनि व्याधि । अमृतासम दिव्य ओषधि । वैद्य सूचि निरवधि । निदानींची ८६ तैसें विवरीतु असे श्रीअनंतु । तया दोहीं सैन्यांआंतु । जयापरी पार्थु । भ्रांति सांडी ८७ तें कारण मनीं धरिलें । मग सरोष बोलों आदरिलें । जैसें मातेच्या कोपीं थोकुलें । स्नेह आथी ८८ कीं औषधाचिया कडुवटपणीं । जैसी अमृताची पुरवणी । ते आहाच न दिसे परी गुणीं । प्रकट होय ८९ तैसीं वरिवरि पाहतां उदासें । आंत तरी अतिसुरसें । तियें वाक्यें हृषीकेशें । बोलों आदरिलीं ९०

श्रीभगवानुवाचः—

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे । गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥ ११ ॥

मग अर्जुनातें म्हणितलें । आम्हीं आजि हें नवल देखिलें । जें तुवां एथ आदरिलें । माझारींचि ९१ तूं जाणता तरी म्हणविसी । परी नेणिवेतें न संडिसी । आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी । बहुसाल नीति ९२ जात्यंधा लागे पिसें । मग तें सैरा धांवे जैसें । तुझें शाहाणपण तैसें । दिसतसे ९३ तूं आपणपें तरी नेणसी । परी या कोरवांतें शोचूं पहासी । हा बहु विस्मय आह्मांसी । पुढतपुढती ९४ तरी सांग पां अर्जुना । तुजपासूनि स्थिति या त्रिभुवना । हे अनादि

गदीं जर्जर होऊन गेला. ७६ म्हणून, वणवा लागलेल्या डोंगरावर जसे निळ्या रंगाच्या पाण्यानें भरलेले ढग कोसळून तो शांत करितात, तसा आधींच नीलवर्ण व कृपामृतरूप जलानें भरलेला तो महामेघरूप गोपाळ वळला. ७७ त्या श्रीकृष्णरूप मेघाचे ठिकाणीं दांतांची प्रभा हीच कोणी बीज चमकत होती, व गंभीर भाषण हीच कोणी एक गर्जना होती. ७८ असा तो श्रीभगवानरूप उदार मेघ आतां कशी वृष्टि करील, व त्या वृष्टीनें अर्जुनरूप पर्वत कसा शांत होईल, आणि त्याला ज्ञानाचा कसा नवा अंकुर फुटेल, ७९ ती कथा सावधान चित्तानें ऐका, असें निवृत्तिदास ज्ञानेश्वर महाराज म्हणाले. ८०

अन्वय–परंतपः गुडाकेशः हृषीकेशं एवम् उक्त्वा 'न योत्स्ये' इति गोविंद उक्त्वा तूष्णीं बभूव ह. ॥ ९ ॥

अर्थ–संजय म्हणालाः—शत्रूस ताप देणारा अर्जुन ह्याप्रमाणें श्रीकृष्णांस बोलून, 'मी आतां युद्ध करणार नाहीं' असें श्रीगोविंदाला म्हणून स्तब्ध राहिला ! ॥९॥

ह्याप्रमाणें धृतराष्ट्रास सांगून संजय आणखी म्हणतोः–राजा, पुनः तो अर्जुन शोकयुक्त अंतःकरणानें काय बोलूं लागला, ८१ अर्जुन, खेदयुक्त अंतःकरणानें म्हणतो, "देवा, ऐका. आपण मला युद्ध करण्याविषयीं कोणत्याही प्रकारें भीड घालूं नका. ह्या ठिकाणीं मी निःसंशय युद्ध करणार नाहीं." ८२ ह्याप्रमाणें एकदम बोलून पुढें कांहीं न बोलतां तो स्तब्ध राहिला. अशा स्थितींत त्याला पाहून भगवंतांस मोठें आश्चर्य वाटलें, ८३

अन्वय–भारत, उभयोः सेनयोः मध्ये विषीदन्तं (अर्जुनं) हृषीकेशः प्रहसन्निव इदं वचः उवाच. ॥ १० ॥

अर्थ–राजा, दोन्ही सैन्यांमध्यें खेद पावलेल्या अर्जुनास श्रीकृष्ण हंसल्यासारखें करून हें भाषण बोलले:–१०

भगवान आपल्या मनांत म्हणतातः ह्या प्रसंगीं अर्जुनाच्या मनानें हें काय घेतलें आहे कोण जाणे ! अर्जुनाला कांहीं कळत नाहीं याला काय करावें ! ८४ ह्याची कोणत्या उपायानें समजूत पडेल ! काय केलें असतां ह्याला धैर्य येईल ! असा विचार करूं लागले. ज्याप्रमाणें पंचाक्षरी जसा भूतबाधा निवारणाचा विचार करतो, ८५ अथवा रोग असाध्य आहेसें पाहतांच वैद्य जसा निदानींच्या अमृततुल्य दिव्य औषधीची तात्काळ योजना करतो, ८६ त्याप्रमाणें, त्या दोन्ही सैन्यांमध्यें स्थित असलेले भगवान श्रीकृष्ण विचार करूं लागले कीं, ज्या कारणानें याला शोकमोह उत्पन्न झाले आहेत, ती भ्रांति हा कसा सोडून देईल ? ८७ भ्रांतीचें कारण जें अज्ञान तें मनांत आणून मग त्यांनीं रोषयुक्त भाषण करण्यास आरंभ केला. ज्याप्रमाणें आईच्या रागांत गुप्तरूपानें स्नेह असतो, ८८ किंवा औषधाच्या कडवटपणांतच जसा अमृताचा पुरवठा असतो, तो वरकांती दिसत नाहीं तरी तो गुणामध्यें स्पष्ट होतो. ८९ त्याप्रमाणें, वरकांती क्रोधयुक्त परंतु अंतर्यामीं अतिममत्वानें भरलेला असा अर्जुनास श्रीकृष्णांनीं उपदेश करण्यास आरंभ केला. ९०

अन्वय–त्वं अशोच्यान् अन्वशोचः प्रज्ञावादान् च भाषसे; पंडिताः गतासून् अगतासून् च न अनुशोचन्ति. ॥११॥

अर्थ—श्रीकृष्ण म्हणालेः—ज्यांचा शोक करणें योग्य नाहीं त्यांचा तूं शोक करतोस, आणि मोठ्या ज्ञानाच्या गोष्टी सांगतोस ! जे ज्ञानी आहेत ते मेलेल्यांबद्दल किंवा जिवंत असलेल्यांबद्दल शोक करीत नाहींत. ॥ ११ ॥

मग अर्जुनास म्हणतातः–या युद्धसमयीं तूं मध्येंच काय आरंभिलें आहेस, हें आज नवलच दृष्टीस पडलें ! ९१ तूं आपल्याला तर मोठा ज्ञानी म्हणवितोस, पण अज्ञान सोडीत नाहींस; बरें, तुला एकादी गोष्ट शिकवावी म्हटलें, तर तूं आह्मांलाच शहाणपणाच्या गोष्टी सांगतोस. ९२ जन्मांधाला वेड लागल्यावर तो सैरावैरा धावतो, त्यापैकींच तुझें हें शहाणपण दिसतें. ९३ तूं आपल्या स्वस्वरूपास न जाणतां कौरवांकरितां शोक करतोस, ह्याबद्दल आह्मांस वारंवार आश्चर्य वाटतें. ९४ तर; अर्जुना, तूंच सांग बरें, कीं या विश्वाची जी अनादि रचना, ती खोटी असून या त्रैलोक्याचा पा-

विश्वरचना । तें लटकें कायी ९५ एथ समर्थु एक आथी । तयापासूनि भूतें होतीं । तरी हें वायांचि काय बोलती । जगामाजीं ९६ हो कां सांप्रत ऐसें जाहलें । जे हे जन्ममृत्यु तुवां सृजिले । आणि नाशु पावे नाशिलें । तुझेनि कायी ९७ तूं भ्रमलेपणें अहंकृति । यांसि घातु न धरिसी चित्तीं । तरी सांगें कायि हे होती । चिरंतन ९८ कीं तूं एक वधिता । आणि सकळ लोकु हा मरता। ऐसी भ्रांति झणें चित्ता । येवों देसी ९९ अनादिसिद्ध हें आघवें । होत जात स्वभावें । तरी तुवां कां शोचावें । सांगें मज १०० परी मूर्खपणें नेणसी । न चिंतावें तें चिंतिसी । आणि तूंचि नीति सांगसी । आह्मांप्रति १ देखें विवेकी जे होती । ते दोहींतेंही न शोचिती । जे होय जाय हे भ्रांती । म्हणऊनियां २

न त्वेवाहं जातुनाऽऽसं न त्वं नेमे जनाधिपाः । न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् १२

अर्जुना सांगेन आइक । एथ आम्ही तुम्ही देख । आणि हे भूपति । अशेख । आदिकरुनी ३ नित्यता ऐसेंचि असोनी । ना तरी निश्चित क्षया जाउनी । हे भ्रांति वेगळी करुनी । दोन्ही नाहीं ४ हें उपजे आणि नाशे । तें मायावशें दिसे । येऱ्हवीं तत्त्वता वस्तु जे असे । ते अविनाशचि ५ जैसें पवनें तोय हालविलें । आणि तरंगाकार जाहलें । तरी कवण कें जन्मलें । ह्मणोंये तेथ ६ तेंचि वायूचें स्फुरण ठेलें । आणि उदक सहज सपाट जाहलें । तरी आतां काय निमालें । विचारीं पां ७

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा । तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥

आइकें शरीर तरी एक । परी वयसाभेद अनेक । हें प्रत्यक्षचि देख । प्रमाण तूं ८ एथ कौमारत्व दिसे । मग तारुण्यीं तें भ्रंशे । परी देहचि हा न नाशे । एकेकासवें ९ तैसीं चैतन्याच्या ठायीं । इयें शरीरांतरें होतीं जातीं. पाहीं । ऐसें जाणे तया नाहीं । व्यामोहदुःख ११०

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः । आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥१४॥

एथ नेणावया हेंचि कारण । जे इंद्रियां आधीनपण । तिहीं आकळिजे अंतःकरण । म्हणऊनि भ्रमे ११ इंद्रियें विषय सेविती । तेथ हर्ष शोकु उपजती । ते अंतर आप्लविती । संगें येणें १२ जयां विषयांच्या ठायीं । एकनिष्ठता कहीं नाहीं । तेथ दुःख आणि कांहीं । सुखही दिसे १३ देखें शब्दाचि व्याप्ति । निंदा आणि स्तुति । तेथ द्वेषाद्वेष उपजती । श्रवणद्वारें १४ मृदु

लनकर्ता तूंच आहेस कीं काय ? ९५ या जगतामध्यें कोणी एक ईश्वर असून त्याच्यापासून प्राणिमात्राची उत्पत्ति होते असें जे लोक म्हणतात, तें खोटें आहे कीं काय ? ९६ तेव्हां मग असें झालें, कीं जन्ममृत्यु तूंच उत्पन्न केलेंस ? आणि जर तूंच मनांत आणिलेंस तरच ते नाश पावतील ? ९७ जरी भ्रममूलक अहंकारानें ग्रस्त होऊन या कौरवांचा घात करण्याचें तूं मनांत आणलें नाहींस, तरी हे चिरंजीव होतील का सांग बरें ? ९८ किंवा तूंच काय तो एक मारणारा आणि बाकीचे हे सर्व मरणारे अशी भ्रांति चित्तांत कदाचित् येऊं देशील हो ! ९९ अरे, या अनादिसिद्ध गोष्टी आपोआप घडताहेत; त्यांबद्दल तूं व्यर्थ शोक कां करतोस मला सांग पाहूं ! १०० परंतु मूर्खपणामुळें तुला हें समजत नाहीं; व ज्या गोष्टीचें चिंतन करूं नये त्या गोष्टींचें चिंतन करून उलट आणखी आह्मांलाच शहाणपणाच्या गोष्टी सांगतोस. १ हे पहा, जे विचारवंत आहेत, ते जन्म आणि मृत्यु ही भ्रांति आहे असें म्हणून दोहोंचाही शोक करीत नाहींत. २

अन्वय–अहं जातु न आसं (इति) न, (किं) तु आसं एव; त्वं (नासीः इति) न, (किंतु आसीः एव); इमे जनाधिपाः (न आसन् इति) न (किंतु आसन् एव); अतः परं सर्वे वयं न भविष्यामः इति न, (किं तु भविष्यामः एव.) १२

अर्थ–मी पूर्वी कधीं नव्हतों, किंवा तूंही कधीं नव्हतास; किंवा हे राजेही कधीं नव्हते; किंवा आपण सर्व ह्यापुढें (ह्या देहानंतर) कधीं असणार नाहीं, असें नाहीं !

अर्जुना, आणखी सांगतों, ऐक. तुम्ही, आम्ही व हे सर्व राजे जे ह्या ठिकाणीं जमले आहेत, ३ ते असेच राहतील किंवा लयाला जातील ही भ्रांति सोडून दिली म्हणजे ह्या दोन्ही गोष्टी खऱ्या नाहींत. ४ कां म्हणशील तर, उत्पत्ति किंवा नाश जे दिसतात, ते मायेच्या योगानें; एरव्हीं खरोखर आत्मा अविनाशीच आहे. ५ ज्याप्रमाणें वाऱ्यानें पाणी हालून तरंग उत्पन्न झाले, तेव्हां त्या ठिकाणीं कोण उत्पन्न झालें म्हणावें ! ६ बरें, वाऱ्याचें वाहणें नाहींसें झाल्यावर पाणी स्थिर झालें असतां, त्या ठिकाणीं कशाचा नाश झाला याचा विचार कर. ७

अन्वय–देहिनः अस्मिन् देहे यथा कौमारं यौवनं जरा तथा देहांतरप्राप्तिः [अस्ति]; तत्र धीरः न मुह्यति ॥ १३ ॥

अर्थ–देही–आत्मा, ह्याचा जो हा देह, त्याला जशा बाल्य, तारुण्य व वार्धक्य ह्या तीन अवस्था प्राप्त होतात, [परंतु त्या अवस्थांबरोबर हा देह जात येत नाहीं], तशीच आत्म्याला दुसऱ्या देहाची प्राप्ति होते, (परंतु आत्मा नाश पावत नाहीं); असें समजून ज्ञानी त्या देहांतरप्राप्तीबद्दल मोहांत पडत नाहींत. ॥ १३ ॥

आणखी असें पहा कीं, शरीर तर एकच असतें, पण वयपरत्वें त्यांत देखील भेद दृष्टीस पडतात, हें प्रत्यक्षच प्रमाण आहे. ८ त्याच शरीरावर बालपण आपण पाहतों; पुढें तेंच बालपण तारुण्यांत नाहींसें होतें; परंतु त्या प्रत्येकाबरोबर शरीर नाहींसें होत नाहीं. ९ त्याचप्रमाणें, असें पहा कीं, आत्म्याच्या ठिकाणीं अनंत शरीरें होतात जातात असें जाणणारास तुझ्याप्रमाणें मोहापासून दुःख होत नाहीं. ११०

अन्वय–कौंतेय, मात्रास्पर्शाः तु शीतोष्णसुखदुःखदाः आगमापायिनः अनित्याः (संति). भारत, तान् तितिक्षस्व. १४

अर्थ–अर्जुना, मात्रा म्हणजे इंद्रियें, ह्यांचे स्पर्श म्हणजे विषयांशीं संबंध हे शीत व उष्ण, आणि सुख व दुःख देणारे आहेत; ते विषयसंबंध उत्पत्तिनाशरूप आहेत म्हणून अनित्य आहेत; तर, हे भारता, ते मिथ्या समजून सहन कर. ॥ १४ ॥

इंद्रियांचे आधीन झाल्यामुळें हें मनुष्यास समजत नाहीं. इंद्रियांनीं मनुष्याचें अंतःकरण विषयाकडे ओढलें आहे. ह्मणून हा भ्रम होतो. ११ इंद्रियांनीं विषय सेवन केले, ह्मणजे सुखदुःखें उत्पन्न होतात; त्यामुळें अंतःकरण सुखदुःखांत गुंतून जातें. १२ ज्या शब्दादिक विषयांच्या ठिकाणीं एक स्थिति कधींच नसते, तेथें वेळेनुसार सुख किंवा दुःख दोन्हीही भासतात. १३ आतां शब्दविषयाची व्याप्ति पहा कीं, जर कानांनीं निंदा ऐकली, तर द्वेष उत्पन्न होतो; आणि स्तुति ऐकली तर समाधान होतें. १४ आतां मऊपणा व कठी-

आणि कठिण । हे स्पर्शाचे दोनी गुण । जे वपूचेनि संगें कारण । संतोषखेदां १५ भ्यासुर आणि सुरेख । हें रूपाचें स्वरूप देख । जें उपजवी सुखदुःख । नेत्रद्वारें १६ सुगंधु आणि दुर्गंधु । हा परिमळाचा भेदु । जो घ्राणसंगें विषादु । तोषु देता १७ तैसाचि द्विविध रसु । उपजवी प्रीतित्रासु । म्हणूनि हा अपभ्रंशु । विषयसंगु १८ देखें इंद्रिया आधीन होईजे । तैं शितोष्णांतें पाविजे । आणि सुखदुःखीं आकळिजे । आपणपें १९ या विषयांवांचूनि कांहीं । आणीक सर्वथा रम्य नाहीं । ऐसा स्वभावोचि पाहीं । इंद्रियांचा १२० हे विषय तरी कैसे । रोहिणीचें जळ जैसें । कां स्वप्नींचा आभासे । भद्रजाति २१ देखें अनित्य तियापरी । म्हणऊनि तूं अव्हेरीं । हा सर्वथा संगु न धरीं । धनुर्धरा २२

यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ । समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥

हे विषय जयातें नाकळिती । तया सुखदुःखें दोनी न पवती । आणि गर्भवासुसंगती । नाहीं तया २३ तो नित्यरूप पार्था । वोळखावा सर्वथा । जो या इंद्रियार्थां । नागवेचि २४

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः । उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥१६॥

आतां अर्जुना कांहीं एक । सांगेन मी आइक । जें विचारपर लोक । वोळखिती २५ या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असे सर्वगत । तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती २६ सलिलीं पय जैसें । एक होऊनि मीनलें असे । परी निवडूनि राजहंसें । वेगळें कीजे २७ कीं अग्निमुखें किडाळ । तोडोनियां चोखाळ । निवडिती केवळ । बुद्धिमंत २८ ना तरी जाणिवेच्या आयणी । करितां दधि कडसणी । मग नवनीत निर्वाणीं । दिसे जैसें २९ कीं भूस बीज एकवट । उपणितां राहे घनवट । तेथ उडे तें फलकट । जाणों आलें १३० तैसें विचारितां निरसलें । तें प्रपंचु सहजें सांडवलें । मग तत्त्वता तत्त्व उरलें । ज्ञानियांसी ३१ म्हणोनी अनित्याच्या ठायीं । तयां आस्तिक्यबुद्धि नाहीं । निष्कर्षु दोहींही । देखिला असे ३२

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् । विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥

देखें सारासार विचारितां । भ्रांति ते पाहीं असारता । तरी सार तें स्वभावता । नित्य जाणें ३३ हा लोकत्रयाकारु । तो जयाचा विस्तारु । तेथ नाम वर्ण आकारु । चिन्ह नाहीं ३४ जो सर्वदा सर्वगतु । जन्मक्षयातीतु । तया केलियाहि घातु । कदा नोहे ३५

णपणा हे स्पर्श या विषयाचे दोन भेद आहेत; परंतु ते त्वचेच्या ठिकाणीं भासल्यावर सुख व दुःख उत्पन्न होतें. १५ तसेंच, भेसूर आणि सुरेख अशीं दोन लक्षणें रूपविषयाचीं आहेत, पण तीं डोळ्यांनीं पाहिल्यावर दुःख व सुख उत्पन्न होतें. १६ त्याचप्रमाणें, गंधविषयाचे सुगंध व दुर्गंध हे दोन भेद आहेत. हे घ्राणेंद्रियद्वारा संतोष व असंतोष उत्पन्न करतात. १७ तद्वतच रसाच्या दोन स्वरूपांपासून प्रीति आणि त्रास हीं उत्पन्न होतात; ह्मणून, विषयसंग हाच मुख्य स्वरूपापासून भ्रष्ट करणारा आहे. १८ असें पहा की, जे इंद्रियाधीन होतात, त्यांना शीतोष्णांची बाधा होऊन ते आपोआपच सुखदुःखांचे आधीन होतात. १९ इंद्रियांची खोडच अशी आहे कीं, या विषयांशिवाय त्यांना जगतांत रम्य असें दुसरें कांहींच वाटत नाहीं. १२० हे विषय कसे आहेत, याचा विचार केला तर, मृगजळाप्रमाणें किंवा स्वप्नांतील ऐश्वर्याप्रमाणें भासतात. २१ तसे हे विषय अनित्य आहेत, असा निश्चय कर, आणि पार्था, त्यांची यत्किंचितही संगती न धरितां तूं त्यांचा त्याग कर. २२

अन्वय–पुरुषर्षभ, यं हि समदुःखसुखं धीरं पुरुषं एते (मात्रास्पर्शाः) न व्यथयन्ति, सः अमृतत्वाय कल्पते. १५

अर्थ–हे पुरुषश्रेष्ठा, ज्या, सुखदुःख समान (मिथ्या) मानणाऱ्या विवेकी पुरुषाला हे विषयसंबंध बाधा करूं शकत नाहींत, तो पुरुष मोक्षप्राप्तीस योग्य होतो. ॥१५॥

जो पुरुष या विषयाच्या स्वाधीन होत नाहीं, त्याला सुख व दुःख हीं दोन्ही प्राप्त होत नाहींत; आणि गर्भवासाची संगति घडत नाहीं. (जन्म प्राप्त होत नाहीं.) २३ अर्जुना, जो या विषयांच्या पाशांत सांपडत नाहीं. तोच अविनाशी आहे असें समज. २४

अन्वय–असतः भावः न विद्यते सतः अभावः न विद्यते, तत्त्वदर्शिभिः तु उभयोः अपि अनयोः अन्तः दृष्टः १६

अर्थ–जें असत् म्हणजे मिथ्या, तें खरेपणास कधीं यावयाचें नाहीं; आणि जें खरें आहे, त्याचा नाश कधीं व्हावयाचा नाहीं. परंतु सत् व असत् ह्यांविषयीं हा सिद्धांत तत्त्ववेत्त्यांनीं [मात्र] जाणलेला आहे ! ॥ १६ ॥

आतां, अर्जुना, तुला आणखी एक गोष्ट मी सांगतों, ती विचारवंत लोक ओळखतात. २५ ह्या जगामध्यें सर्वव्यापक असें जें एक गूढ चैतन्य आहे, त्याचा तत्त्वज्ञ लोक सदैव स्वीकार करतात. २६ दूध व पाणी एकत्र मिळविलें असतां ज्याप्रमाणें राजहंस पक्षी तें वेगळें करतात, २७ अथवा चतुर लोक डाकलग सोनें अग्नींत घालून ताव दिल्यावर शुद्ध करतात. २८ किंवा चातुर्यानें दहीं घुसळल्यानंतर शेवटीं जसें लोणी निघालेलें दृष्टीस पडतें, २९ अथवा कोंडा आणि धान्य हीं एकत्र असून वाऱ्यावर धरून उफणल्यावर ज्याप्रमाणें धान्य खालीं राहून फोल उडून जातें, १३० त्याप्रमाणें विचाराअंतीं प्रपंच सहजच नाहींसा होतो, आणि मग ज्ञानी पुरुषाला विचार करण्याला फक्त तत्त्व अर्थात् ब्रह्मच उरतें. ३१ ह्मणून, त्यांची असताचे ठिकाणीं आस्तिक्यबुद्धि नसते; कारण सत् आणि असत् या दोहोंचाही परिणाम त्यांस माहीत असतो. ३२

अन्वय–येन इदं सर्वं ततं तत् तु अविनाशि विद्धि. अस्य अव्ययस्य विनाशं कर्तुं कश्चित् न अर्हति. ॥ १७ ॥

अर्थ–ज्या चैतन्यानें सर्व जगत् व्यापलें आहे, तें नाश पावणारें नव्हे असें समज. असें नाशरहित जें चैतन्य, त्याचा नाश करण्यास कोणीही समर्थ नाहीं. १७

असें पहा कीं, खऱ्याखोट्यांचा विचार जर केला, तर सहजच, भ्रांति ही निःसार आहे आणि सार हें स्वभावतःच अविनाशी आहे हें ध्यानांत धर. ३३ ज्यापासून हें त्रैलोक्य झालें आहे, त्यास नांव, रंग, रूप हीं कांहीं चिन्हें नाहींत. ३४ तो सदैव सर्वव्यापक असून जन्ममरणातीत आहे; त्याचा नाश करूं ह्मटल्यास तो कधींसुद्धां होणार नाहीं. ३५

अंतवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः । अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ १८ ॥

आणि शरीरजात आघवें। हें नाशवंत स्वभावें। म्हणोनि तुवां झुंजावें। पंडुकुमरा३६

य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् । उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥१९॥

तूं धरूनि देहाभिमानातें । दिठी सूनि शरीरातें । मी मारिता हे मरते । म्हणत आहासी ३७ तरी अर्जुना तूं हें नेणसी । जरी तत्त्वता विचारिसी । तरी वधिता तूं नव्हेसी । हे वध्य नव्हती ३८

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वाऽभविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् । कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हंति कम् ॥२१॥

जैसें स्वप्नामाजिं देखिजे । तें स्वप्नींचि साच आपजे । मग चेऊनियां पाहिजे । तंव कांहीं नाहीं ३९ तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासी वायां । शस्त्रें हाणितलिया छाया । जैसी आंगीं न रुपे १४० कां पूर्ण कुंभ उलंडला । तेथ बिंबाकारु दिसे भ्रंशला । परी भानु नाहीं नासला । तयासवें ४१ ना तरी मठीं आकाश जैसें । मठाकृती अवतरलें असे । तो भंगलिया आपैसें । स्वरूपचि ४२ तैसें शरीराच्या लोपीं । सर्वथा नाशु नाहीं स्वरूपीं । म्हणऊनि तूं हें नारोपीं । भ्रांति बापा ४३

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोऽपराणि ॥
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥ २२ ॥

जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे । मग नूतन वेढिजे । तैसें देहांतरातें स्वीकारिजे । चैतन्यनाथें ४४

नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च । नित्यः सर्वगतःस्थाणुरचलोऽयं सनातनः ॥२४॥

हा अनादि नित्यसिध्दु । निरुपाधि विशुध्दु । म्हणऊनि शस्त्रादिकीं छेदु । न घडे यया ४५ हा प्रळयोदकें नाल्हवे । अग्निदाहो न संभवे । एथ महाशोषु न प्रभवे । मारुताचा ४६ अर्जुना हा नित्यु । अचळु हा शाश्वतु । सर्वत्र सदोदितु । परिपूर्णु हा ४७

अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते । तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥

हा तर्काचिये दिठी । गोचर नोहे किरीटी । ध्यान याचिये भेटी । उत्कंठा वाहे ४८ हा सदा दुर्लभु मना । आपु नोहे साधना । निःसीमु हा अर्जु

अन्वय–अनाशिनः अप्रमेयस्य नित्यस्य शरीरिणःइमे देहाः अन्तवन्तः (विवेकिभिः) उक्ताः; तस्मात्, भारत, युध्यस्व.॥१८॥

अर्थ–अविनाशी ज्याचें मान करतां येत नाहीं, आणि जो नित्य आहे, अशा आत्म्याचे जे हे देह,ते नाशवंत आहेत, असें ज्ञानी म्हणतात; म्हणून हे भारता, तूं युद्ध कर. १८

आणि, अर्जुना, शरीरमात्र स्वभावतःच नाशिवंत आहे, ह्याकरितां तूं युद्ध कर. ३६

अन्वय–यः एनं (देहिनं) हन्तारं वेत्ति यः च एनं हतं मन्यते, तौ उभौ न विजानीतः अयं न हन्ति न हन्यते १९

अर्थ–आत्मा मारणारा आहे व आत्मा मरणारा आहे असें जे समजतात, ते दोघेही अज्ञानी आहेत; कारण, आत्मा हा कोणास मारीतही नाहीं व कोणाकडून मारलाही जात नाहीं. ॥ १९ ॥

तूं देहाचा अभिमान धरून व शरीरावर दृष्टि ठेवून मी मारणारा आणि हे कौरव मरणारे असें ह्मणत आहेस. ३७ पण, अर्जुना, त्यांतील तत्त्वार्थ तुला कळत नाहीं; जर यथार्थ विचार करशील, तर तूं मारणारा नव्हेस, व ते मरणारेही नव्हत. ३८

अन्वय–अयं कदाचित् न जायते न म्रियते वा, (अयं) भूत्वा भूयः अभविता न, अयं अजः नित्यः शाश्वतः पुराणः, शरीरे च हन्यमाने (सति) न हन्यते. ॥ २० ॥ पार्थ, यः एनं अविनाशिनं नित्यं अजं अव्ययं वेद, सः पुरुषः कथं कं घातयति कं हन्ति ? (न कंचित्कथंचिदपि घातयति हन्ति वा)२१

अर्थ–हा [आत्मा] कधींही उत्पन्न होत नाहीं व कधींही मरत नाहीं; हा मागें जन्म पावला असून पुनः मृत्यु पावणार, असेंही नाहीं. हा जन्मरहित, नित्य, शाश्वत व अनादि आहे; आणि शरीराचा वध झाला तरी ह्याचा वध होत नाहीं. ॥ २० ॥ पार्था, हा अविनाशी, नित्य, जन्मरहित व विकार न पावणारा असा आहे असें जो जाणतो, तो पुरुष दुसऱ्याला कसा व कोणाकडून मारवील आणि मारील ? [तर तो मारविणारही नाहीं व मारणाराही नाहीं.]॥२१॥

ज्याप्रमाणें स्वप्नांतील विषय स्वप्नांतच खरे भासतात, परंतु जागृत झाल्यावर पहावें तों कांहींएक नसतें, ३९ त्याप्रमाणें हें सर्व मायिक असून तूं भ्रमांत व्यर्थ पडला आहेस. अरे, मनुष्याच्या सांवलीवर शस्त्रप्रहार केला तर तो जसा त्याच्या अंगांत रुपत नाहीं, १४० किंवा पाण्यानें भरलेलें भांडें पालथें केल्यावर त्यांतील सूर्यबिंब नाहींसें झालेलें दितसें; परंतु त्याच्याबरोबर खरा सूर्य नाश पावत नाहीं, ४१ अथवा आकाश हें बांधलेल्या घरांत त्या घराच्या आकृतीचें दिसतें, पण तें घर मोडल्यावर ज्याप्रमाणें त्याचें मूळ स्वरूपच राहतें, ४२ त्याचप्रमाणें, शरीर नाश पावलें तरी आत्म्याचा कधींही नाश होत नाहीं; ह्मणून, बाबारे! तूं नसतीच भ्रांति घेऊन बसूं नको. ४३

अन्वय–यथा नरः जीर्णानि वासांसि विहाय अपराणि नवानि गृह्णाति, तथा देही जीर्णानि शरीराणि विहाय अन्यानि नवानि संयाति ॥ २२ ॥

अर्थ–जसा पुरुष जुनीं वस्त्रें टाकून दुसरीं नवीं घेतो, तसा आत्मा जुनीं शरीरें टाकून दुसरीं नवीं धारण करितो.

मनुष्य ज्याप्रमाणें जुनें झालेलें वस्त्र टाकून नवें धारण करितो, त्याप्रमाणें हा चैतन्यनाथ–आत्मा एक देह टाकून दुसऱ्याचा स्वीकार करतो. ४४

अन्वय–एनं (प्रकृतं आत्मानं) शस्त्राणि न छिंदंति, एनं पावकः न दहति, एनं आपः न क्लेदयन्ति, एनं च मारुतः न शोषयति. ॥ २३ ॥ अयं अच्छेद्यः, अयं अदाह्यः, अयं अक्लेद्यः (अयं) च अशोष्यः एव (अस्ति.) अयं नित्यः सर्वगतः स्थाणुः अचलः सनातनः (अस्ति·) ॥ २४ ॥

अर्थ–ह्याला [आत्म्याला] शस्त्रें तोडीत नाहींत; ह्याला अग्नि जाळीत नाहीं; ह्याला पाणी भिजवीत नाहीं, व ह्याला वारा सुकवीत नाहीं. ॥ २३ ॥ हा छिन्न होण्याजोगा नाहीं, हा जाळतां येण्यासारखा नाहीं, हा भिजवितां येण्यासारखा नाहीं, व हा सुकवितां येण्याजोगा नाहीं; तर हा नाश न पावणारा, सर्वव्यापी, स्थिर, अचल, आणि त्रिकाल राहणारा असा आहे. ॥ २४ ॥

हा आत्मा जन्ममरणरहित असून नित्य स्वतःसिद्ध आहे; व तो उपाधिरहित असून शुद्ध आहे; ह्मणून, ह्याचा शस्त्रादिकांनीं सुद्धां घात होत नाहीं. ४५ हा प्रलयकालच्या पाण्यांत बुडत नाहीं. हा अग्नीपासून जळण्याचा संभव नाहीं; तसेंच वायूचीही याला शुष्क करण्याची शक्ति नाहीं. ४६ ह्मणून, अर्जुना, हा नित्य, क्रियारहित व शाश्वत असून सर्व ठिकाणीं पूर्ण भरलेला आहे. ४७

अन्वय–अयं अव्यक्तः अयं अचिन्त्यःअयं अविकार्यः उच्यते; तस्मात् एनं एवं विदित्वा (त्वं) अनुशोचितुं न अर्हसि. २५

अर्थ–ह्याला [आत्म्याला] आकार नाहीं; चित्तानें ह्याचें चिंतन करतां येत नाहीं; व हा विकाररहित आहे; असें म्हणतात. ह्यास्तव आत्मा हा अशा प्रकारचा आहे असें समजल्यावर तुला शोक करणें योग्य नाहीं. ॥२५॥

हा तर्कशास्त्राच्या दृष्टीनें दिसणारा नव्हे; ध्यानाला तर याच्या भेटीची उत्कंठा लागलेली असते; ४८

ना । पुरुषोत्तमु ४९ हा गुणत्रयारहितु । अनादि अविकृतु । व्यक्तीसी अतीतु । सर्वरूप १५० अर्जुना ऐसा हा जाणावा । सकळात्मकु देखावा । मग सहजें शोकु आघवा । हरेल तुझा ५१

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् । तथाऽपि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि २६

अथवा ऐसा नेणसी । तूं अंतवंतचि मानिसी । तऱ्ही शोचूं न पवसी । पंडुकुमरा ५२ जो आदि स्थिति अंतु । हा निरंतर असे नित्यु । जैसा प्रवाहो अनुस्यूतु । गंगाजळाचा ५३ तें आदि नाहीं खंडलें । समुद्रीं तरी असे मिनलें । आणि जातचि मध्यें उरलें । दिसे जैसें ५४ इयें तीन्ही तयापरी । सरसींच सदा अवधारीं । भूतांसि कवणीं अवसरीं । ठाकती ना ५५ म्हणोनि हें आघवें । एथ तुज नलगे शोचावें । जे स्थितीची हे स्वभावें । अनादि ऐसी ५६ ना तरी हें अर्जुना । नयेचि तुझिया मना । जे देखोनि लोकु अधीना । जन्मक्षया ५७ तरी येथ कांहीं । तुज शोकासि कारण नाहीं । हे जन्ममृत्यु पाहीं । अपरिहर ५८

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च । तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥२७॥

उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दिसे । हें घटिकायंत्र जैसें । परिभ्रमे गा ५९ ना तरी उदो अस्तु आपैसे । अखंडित होत जात जैसें । हें जन्ममरण तैसें । अनिवार जगीं १६० महाप्रळयअवसरें । हें त्रैलोक्यही संहरे । म्हणोनि हा न परिहरे । आदि अंतु ६१ तूं जरी हें ऐसें मानिसी । तरी खेदु कां करिसी । काय जाणतचि नेणसी । धनुर्धरा ६२ एथ आणिकही एक पार्था । तुज बहुतीं परी पहातां । दुःख करावया सर्वथा । विषो नाहीं ६३

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥

जियें समस्तें इयें भूतें । जन्माआदि अमूर्तें । मग पातलीं व्यक्तीतें । जन्मलेया ६४ तियें क्षयासि जेथ जाती । तेथ निभ्रांत आनें नव्हती । देखें पूर्व स्थितीच येती । आपुलिये ६५ येर मध्यें जें प्रतिभासे । तें निद्रिता स्वप्न जैसें । तैसा आकारु हा मायावशें । सत्स्वरूपीं ६६ ना तरी पवनें स्पर्शिलें नीर । पढियासे तरंगाकार । का परापेक्षा अळंकार । व्यक्ती कनकीं ६७ तैसें सकळ हें मूर्त । जाणपां मायाकरित । जैसें आकाशीं बिंबत । अभ्रपटळ ६८ तैसें आदीचि जें नाहीं । तयालागीं तूं रुदसी कायी । तूं अवीट तें पाही । चैतन्य एक ६९ जयाचि आदीचि भौगित । विषयीं त्यजिले संत । जयालागीं विरक्त । वनवासिये १७०

अर्जुना, हा मनास नेहमीं दुर्लभ, साधनानें प्राप्त न होणारा, अनंत व जीवमात्रांत श्रेष्ठ आहे. ४९ हा गुणत्रयापासून वेगळा, अनादि विकाररहित, आकाराच्या पलीकडला व वस्तुमात्राच्या स्वरुपांत व्याप्त आहे. १५० अर्जुना, अशा प्रकारें हा सर्वव्यापी आहे हें तूं जाणलेंस, ह्मणजे सहज शोकरहित होशील. ५१

अन्वय–अथ च (यदि) एनं नित्यजातं नित्यं मृतं वा मन्यसे, तथापि, महाबाहो, त्वं एवं शोचितुं न अर्हसि. २६

अर्थ–आतां, आत्मा नित्य उत्पन्न होतो व नित्य नाश पावतो, असें जरी तुझें मत असलें; तरी, अर्जुना, तुला त्याच्याबद्दल असा शोक करणें योग्य नाहीं. २६

अथवा अर्जुना, असें न जाणतां हा नाशवंत आहे असें जरी तूं मानलेंस, तरी देखील तुला शोक करण्याचें कारण नाहीं. ५२ कारण, गंगेच्या पाण्याचा ओघ ज्याप्रमाणें अखंड आहे, त्याप्रमाणें उत्पत्ति, स्थिति आणि लय हीं सारखीं चाललीं आहेत. ५३ तें गंगेचें पाणी उत्पन्न होत असतें, व मध्यें प्रवाहांत बहात असून शेवटीं समुद्रांत मिळतें, ५४ त्या आत्म्याला ह्या तिन्ही अवस्था नेहमीं सारख्याच आहेत. प्राणिमात्रास या तिन्ही अवस्था कोणत्याही वेळीं सोडीत नाहींत असें जाण. ५५ म्हणून तुला या सगळ्यांबद्दल शोक करण्याचें कारण नाहीं. या सर्वांचा स्वभावतःच अनादि सृष्टिक्रम चालत आलेला आहे. ५६ हें तुझ्या मनांत येत नसेल, तर प्राणिमात्र जन्ममरणाच्या आधिन आहे असें जर आहे, ५७ तर हें जन्ममरण न टळणारें आहे असें समजून तुला शोक करण्याचें कारण नाहीं. ५८

अन्वय–जातस्य हि मृत्युः ध्रुवः (अस्ति), मृतस्य च जन्म ध्रुवम् (अस्ति); तस्मात् अपरिहार्ये अर्थे त्वं शोचितुं न अर्हसि. २७

अर्थ–कारण, जो उत्पन्न झाला तो निश्चयेंकरून मरण पावतो, व जो मरतो तो निश्चयेंकरून पुनः जन्म पावतो; ह्यास्तव ही गोष्ट टाळतां येण्यासारखी नाहीं, म्हणून हिजबद्दल शोक करणें तुला योग्य नाहीं. ॥२७॥

जन्मास आलें तें नाश पावणार, व नाश पावलेलें पुनः जन्मास येणार हें रहाटगाडगें सारखें चालू आहे. ५९ अथवा सूर्याचे उदयास्त ज्याप्रमाणें आपोआप निरंतर होत असतात, चुकत नाहींत, त्याप्रमाणें या जगांत जन्ममरण अनिवार आहे. १६० महाप्रलयकालीं या त्रैलोक्याचाही संहार होतो, म्हणूनच आदि व अंत हे अपरिहार्य आहेत, ६१ अशी जर तुझी समजूत असेल, तर अर्जुना, खेद कां करतोस? आणि समजून उमजून वेडांत कां शिरतोस? ६२ पार्था, आणखीही एका बाजूनें विचार केला तर ह्या ठिकाणीं तुला दुःख करण्याचें कारण नाहीं. ६३

अन्वय–भारत, भूतानि अव्यक्तादीनि व्यक्तमध्यानि अव्यक्तनिधनानि एव (संति) तत्र परिदेवना का ?॥२८॥

अर्थ–हे भारता, सर्व भूतें मुळीं अव्यक्त म्हणजे अस्पष्ट स्थितींत असतात; नंतर मध्यें व्यक्तभावाला येतात; व शेवटीं अव्यक्तांतच जातात. तेव्हां त्यांच्याबद्दल शोक कसला करावयाचा ! ॥ २८ ॥

हे सर्व प्राणी उत्पत्तीपूर्वी निराकार असून, जन्मधारण केल्यावर आकाराला आले. ६४ ते जेथें लय पावतात, तेथेंही ते निःसंशय दुसऱ्या स्थितींत जात नाहींत, तर आपल्या पूर्वस्थितीला ह्मणजे अव्यक्ताला प्राप्त होतात. ६५ निजलेल्या मनुष्याला ज्याप्रमाणें स्वप्न दिसतें, त्याप्रमाणें, जन्म व मृत्यु या दोन अवस्थांमध्यें दिसणारे आकार मायेच्या योगानें ब्रह्मस्वरूपावर भासतात. ६६ किंवा उदकाला वाऱ्यानें स्पर्श केल्यावर त्याच्यावर जशा लाटा दिसतात, किंवा दुसऱ्याच्या इच्छेनें सुवर्णाच्या ठिकाणीं अलंकार होतो, ६७ त्याप्रमाणें, सर्व प्राणी मायेनें उत्पन्न झालेले आहेत असें समज. ज्याप्रमाणें आकाशांत ढग उत्पन्न होतात, त्याप्रमाणें जें मुळांतच नाहीं, त्याजबद्दल तूं कां रडतोस? तर अक्षय्य असें जें ब्रह्म त्याजकडे लक्ष दे. ६८।६९ साधूंना त्या ब्रह्माची आवड उत्पन्न झाल्यावर त्यांना विषय सोडून जातात, आणि त्या ब्रह्माकरितां ते वनवासी किंवा वैराग्यसंपन्न होतात; १७०

दिठी सूनि जयातें । ब्रह्मचर्यादि व्रतें । मुनीश्वर तपातें । आचरताती ७१

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ॥
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥ २९ ॥

एक अंतरीं निश्चळ । जें निहाळितां केवळ । विसरले सकळ । संसारजात ७२ एकां गुणानुवादु करितां । उपरति होऊनि चित्ता । निरवधि तल्लीनता । निरंतर ७३ एक ऐकतांचि निवाले । ते देहभावीं सांडिले । एक अनुभवें पातले । तद्रूपता ७४ जैसे सरिताओघ समस्त । समुद्रामाजिं मिळत । परी माघौते न समात । परतले नाहीं ७५ तैसिया योगीश्वरांचिया मती । मिळणीसवें एकवटती । परी जे विचारूनि पुनरावृत्ति । भजतीचिना ७६

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत । तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥३०॥

जें सर्वत्र सर्वही देहीं । जया करितांही घातु नाहीं । तें विश्वात्मक तूं पाहीं । चैतन्य एक ७७ जयाचेनि स्वभावें । हें होत जात आघवें । तरी सांग काय शोचावें । एथ तुवां ७८ एऱ्हवीं तरी पार्था । तुज कां नेणों न मनें चित्ता । परी किडाळ हें शोचितां । बहुतीं परी ७९

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि । धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥३१॥

तूं अझुनि कां न विचारिसी । काय हें चिंतितु आहासी । स्वधर्मु तो विसरलासी । तरावें जेणें १८० या कौरवां भलतें जाहलें । अथवा तुजचि कांहीं पातलें । कीं युगचि हें बुडालें । जऱ्ही एथ ८१ तरी स्वधर्मु एक आहे । तो सर्वथा त्याज्य नोहे । मग तरिजेल काय पाहें । कृपाळूपणें ८२ अर्जुना तुझें चित्त । जऱ्ही जाहलें द्रवीभूत । तऱ्ही हें अनुचित । संग्रामसमयीं ८३ अगा गोक्षीर जरी जाहलें । तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें । ऐसेनिहि विष होय सुदलें । नवज्वरीं देतां ८४ तैसें आनी आन करितां । नाशु होईल हिता । म्हणऊनि तूं आतां । सावध होईं ८५ वायांचि व्याकुळ कायी । आपुला निजधर्मु पाहीं । जो आचरितां बाधु नाहीं । कवणें काळीं ८६ जैसें मार्गेंचि चालतां । अपावो न पवे सर्वथा । कां दीपाधारें वर्ततां । नाडळिजे ८७तयापरी । पार्था । स्वधर्में राहाटतां । सकळ कामपूर्णता । सहजें होय ८८ म्हणोनि यालागीं पाहीं । तुम्हां क्षत्रियां आणीक कांहीं । संग्रामावांचूनि नाहीं । उचित जाणें ८९ निष्कपटा होआवें । उसिणा घाईं जुंझावें । हें असो काय सांगावें । प्रत्यक्षावरी १९०

आणि त्यावर दृष्टि ठेवून मननशील पुरुष ब्रह्मचर्यादि व्रतें व तपें आचरतात. ७१

अन्वय-कश्चित् एनं आश्चर्यवत् पश्यति; तथा एव च अन्यः एनं आश्चर्यवत् वदति; अन्यः च एनं आश्चर्यवत् शृणोति; कश्चित् एनं श्रुत्वा अपि न वेद. ॥ २९ ॥

अर्थ–कोणी आत्मस्वरूपाला आश्चर्य म्हणून पाहतो, कोणी आश्चर्य म्हणून त्याचें वर्णन करितो, कोणी आश्चर्य म्हणून ऐकतो, आणि कोणी त्याचे गुणानुवाद ऐकूनही त्याला जाणत नाहीं ! ॥ २९ ॥

त्या शुद्ध ब्रह्माकडे एकाग्र अंतःकरणानें पाहतां पाहतां कित्येकजण अंतर्यामीं निश्चल होऊन सर्व संसार विसरतात, ७२ कित्येक त्याचे गुणानुवाद गातांना चित्तास उपरति उत्पन्न होऊन शेवटीं त्याच्या ठिकाणीं सर्वदा निमग्न होतात, ७३ कोणी त्याचें स्वरूप ऐकूनच शांत होऊन देहाभिमानापासून निवृत्त होतात, आणि कोणी अनुभवानें तद्रूप होतात. ७४ ज्याप्रमाणें नद्यांचे सर्व ओघ समुद्रास मिळतात- परंतु समुद्रांत जागा नाहीं म्हणून मागें परतले नाहींत, ७५ त्याप्रमाणें ह्या थोर योग्यांच्या बुद्धि ब्रह्मसाक्षात्काराबरोबर तद्रूप होऊन जातात;–परंतु अशा रीतीनें विचार करून तद्रूप झालेले पुरुष पुन्हां संसाराला येत नाहींत. ७६

अन्वय–भारत, सर्वस्य देहे (वर्तमानः) अयं देही नित्यं अवध्यः तस्मात् त्वं सर्वाणि भूतानि शोचितुं न अर्हसि ३०

अर्थ–अर्जुना, सर्व देहांत विद्यमान असणारा देही जो हा आत्मा, तो कधींही वध पावत नाहीं; म्हणून सर्व भूतांच्याबद्दल शोक करणें तुला योग्य नाहीं. ॥ ३० ॥

अर्जुना, सर्वत्र, सर्वांतर्यामीं व्यापलेलें व ज्याचा घात करूं गेलें असतां होत नाहीं असें एक चैतन्यच असून तें जगद्रूप आहे हें लक्षांत ठेव; ७७ ज्या चैतन्याच्या ठिकाणीं सहजरीत्या जर सर्व गोष्टींची घडामोड होते, तर मग तूंच सांग कीं, अशाबद्दल शोक कां करावा ? ७८ पार्था, हें साहजिक तुझ्या तरी मनास कां येऊं नये, हें मला समजत नाहीं; परंतु एकंदरींत हा शोक करणें तुला निंद्य आहे. ७९

अन्वय–स्वधर्मं च अपि अवेक्ष्य विकंपितुं न अर्हसि. क्षत्रियस्य हि धर्म्यात् युद्धात् अन्यत् श्रेयः न विद्यते ॥३१॥

अर्थ–आणखी, स्वधर्माच्या दृष्टीनेंही त्वां कंपित होणें योग्य नाहीं; कारण, धर्मयुद्ध प्राप्त झालें असतां त्याहून क्षत्रियांना दुसरें कांहींही कल्याणकारक नाहीं. ॥ ३१ ॥

अरे, अजून तरी तूं कां विचार करीत नाहींस? हें काय तूं घेऊन बसला आहेस ? ज्या स्वधर्मानें मनुष्य तरतो, त्याला तूं अगदीं विसरलास ! १८० असें समज कीं, ह्या ठिकाणीं या कौरवांचें भलतेंच कांहीं झालें, किंवा तुझें कांहीं कमजास्त झालें, अथवा सगळें जग नाहींसें झालें, ८१ तरी स्वधर्म म्हणून जो आहे, तो कदापि त्याज्य नाहीं; त्याचा त्याग केल्यावर, तुझ्या मनांत जी दया उत्पन्न झाली आहे, तिच्यापासून तूं तरला जाशील काय ? ८२ अर्जुना, ह्या ठिकाणीं तुझे चित्तांत जरी दया उत्पन्न झाली आहे, तरी ती ह्या युद्धप्रसंगीं अयोग्य आहे. ८३ अरे, असें पहा कीं, गाईचें दूध उत्तम आहे, तरी तें पथ्याला सांगितलें नाहीं, असें असूनही जर तें नवज्वराच्या मनुष्यास दिलें, तर विषवत् होतें; ८४ त्याचप्रमाणें, भलत्यानें भलतेंच म्हणजे ब्राह्मणानें क्षत्रियादिकांच्या कर्माचें किंवा क्षत्रियादिकांनीं ब्राह्मणादिकांच्या कर्माचें आचरण केलें, तर त्याच्या हिताचा नाश होतो; म्हणून तूं आतां सावध हो, ८५ व्यर्थ शोकाकुल होऊं नको; आणि ज्याचें आचरण केलें असतां कोणतेही काळीं दोष घडत नाहीं, त्या आपल्या क्षत्रियधर्माकडे लक्ष दे. ८६ ज्याप्रमाणें योग्य मार्गानें चाललें म्हणजे कधींही अपाय घडत नाहीं, किंवा दिव्याच्या उजेडानें चाललें असतां ठेंच लागत नाहीं, ८७ त्याप्रमाणें, अर्जुना, जो स्वधर्मानें वागतो, त्याच्या सर्व कामना सहज पूर्ण होतात. ८८ ह्याकरितां, तुम्हां क्षत्रियांना संग्रामावांचून दुसरें कांहीं योग्य नाहीं. ८९ मनांत कपट न धरतां समोरासमोर उभे राहून एकमेकांवर प्रहार करून युद्ध करावें हें प्रत्यक्ष तुला माहीत आहेच; आणखी आम्हीं काय सांगावें ? १९०

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् । सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥ ३२ ॥

अर्जुना झुंज देखे आतांचें । हें हो कां जें दैव तुमचें । कीं निधान सकळ धर्माचें । प्रगटलें असे ९१ हा संग्रामु काय म्हणिपे । कीं स्वर्गुचि येणें रूपें । मूर्त कां प्रतापें । उदो केला ९२ ना तरी गुणाचेनि पतिकरें । आर्तीचेनि पडिभरें । हे कीर्तीचि स्वयंवरें । आली तुज ९३ क्षात्रियें बहुत पुण्य कीजे । तैं झुंज ऐसें लाहिजे । जैसें मार्गें जातां आडळिजे । चिंतामणि ९४ ना तरी जांभया पसरे मुख । तेथ अवचटें पडे पीयूख । तैसा संग्रामु हा देख । पातला असे ९५

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि । ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ३३

आतां हा ऐसा अव्हेरिजे । मग नाथिलें शोचूं बैसिजे । तरी आपण आहाणा होईजे । आपणपेयां ९६ पूर्वजांचें जोडलें । आपणचि होय धाडिलें । जरी आजि शस्त्र सांडिलें । रणीं इये ९७ असती कीर्ति जाईल । जगचि अभिशापु देईल । आणि गिंवसित पावतील । महादोष ९८ जैसी भातारेंहीन वनिता । उपहती पावे सर्वथा । तैशी दशा जीविता स्वधर्मेंवीण ९९ ना तरी रणीं शव सांडिजे । तें चौमेरीं गिधीं विदारिजे । तैसें स्वधर्महीना अभिभविजे । महादोषीं २००

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम् । संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ३४

म्हणोनि स्वधर्मु हा सांडसील । तरी पापा वरपडा होसील । आणि अपेश तें न वचेल । कल्पांतवरी १ जाणतेनि तंवति जियावें । जंव अपकीर्ति आंगा न पवे । आणि सांग पां केवीं निगावें । एथोनियां २ तूं निर्मत्सर सदयता । येथूनि निघसील कीर माघौता । परी ते गती समस्तां । न मनेल ययां ३ हे चहूंकडूनि वेढितील । बाणवरी घेतील । तेथ पार्था न सुटिजेल । कृपाळुपणें ४ ऐसेनिहि प्राणसंकटें । जरी विपायें पां निघणें घटे । तरी तें जियाले बोखटें । मरणाहुनी ५

भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः । येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५॥

तूं आणिकही एक न विचारिसी । एक संभ्रमें झुंजों आलासी । आणि सकणवपणें निघालासी । मागुता जरी ६ तरी तुझें तें अर्जुना । या वैरियां दुर्जनां । कां प्रत्यया येईल मना । सांगें मज ७

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः । निंदन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥३६॥

हे म्हणती गेला रे गेला । अर्जुन आम्हां बिहाला । हा सांगें बोलु उरला । निका कायी ८ लोक सायासें करूनि बहुतें । का वेंचिती आपुलीं जीवितें ।

अन्वय–पार्थ, अपावृतं स्वर्गद्वारं (इव) यदृच्छया उपपन्नं ईदृशं युद्धं सुखिनः क्षत्रियाः लभंते. ॥ ३२ ॥

अर्थ–पार्था, सहजगत्या प्राप्त झालेला हा युद्धप्रसंग म्हणजे स्वर्गाचें उघडलेलें द्वारच होय ! अशलें युद्ध भाग्यशाली क्षत्रियांनाच प्राप्त होतें. ॥ ३२ ॥

अर्जुना, हें युद्ध ह्मणजे तुमचें पूर्वजन्मींचें भाग्यच समजा ! अथवा सर्व धर्माचा ठेवाच प्रकट झाला असें ह्मणा ! ९१ अरे, याला काय युद्ध म्हणावें, कीं तुमच्या प्रतापानें मूर्तिमंत स्वर्गच उदयाला आला आहे कीं काय ? ९२ किंवा तुझ्या गुणांचा लौकिक ऐकून तुजवर अतिशय आसक्त झाल्यामुळें कीर्तिरूप स्त्रीच तुला वरण्यास आली आहे कीं काय असें वाटतें. ९३ अरे ! असल्या प्रकारचें युद्ध क्षत्रियाला सहज प्राप्त होणारें नव्हे, कारण–क्षत्रियानें पुष्कळ पुण्य करावें, तेव्हां त्याला हा असला युद्धप्रसंग प्राप्त होतो. परंतु, ज्याप्रमाणें एकाद्याला मार्गानें जातांना इच्छित फल देणारा चिंतामणि सांपडावा, ९४ किंवा जांभईनें तोंड पसरल्यावर अकस्मात् त्यांत अमृत पडावें, त्याप्रमाणें हा युद्धप्रसंगतुम्हांला प्राप्त झाला आहे!९५

अन्वय–अथ त्वं इमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि चेत् ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापं अवाप्स्यसि. ॥ ३३ ॥

अर्थ–असें असतां, जर तूं ह्या धर्मयुद्धाचा त्याग करशील, तर इहलोकींची कीर्ति व परलोकाला साधन जो स्वधर्म तो नाहींसा होऊन पापाची जोड करशील. ३३

आतां, असला हा संग्राम टाकून भलत्या गोष्टीचा शोक करीत बसलास, तर आपली आपणच हानि करून घेतल्यासारखें होईल. ९६ ह्या रणाचे ठिकाणीं जर तूं आज शस्त्र टाकून दिलेंस, तर पूर्वजांनीं जोडून ठेविलेली कीर्ति घालविलीस असें होईल; ९७ इतकेंच नव्हें, तर तुझ्या असलेल्या कीर्तिचाही नाश होईल, व सर्व जग तुझी निंदा करील; आणि मग तुझ्या ठिकाणीं वास्तव्य करण्याकरितां महादोष तुला शोधीत येतील. ९८ ज्याप्रमाणें पतिविरहित स्त्री सर्वथा तिरस्करणीय होते, त्याप्रमाणेंच स्वधर्मत्याग करणाराची अवस्था होते; ९९ अथवा रणांत प्रेत पडलें ह्मणजे ज्याप्रमाणें चोहोंकडून त्याला गिधाडें फाडतात, त्याप्रमाणें स्वधर्महीन मनुष्याला महादोष व्यापून नाश करितात. २००

अन्वय–अपि च भूतानि ते अव्ययां अकीर्तिं कथयिष्यंति, संभावितस्य च अकीर्तिः मरणात् अतिरिच्यते.॥३४॥

अर्थ–आणखी, सर्व लोक निरंतर तुझी अपकीर्ति वर्णन करतील. संभावित पुरुषाला अपकीर्ति ही मरणापेक्षांही अधिक दुःखकर आहे. ॥ ३४ ॥

एवढ्याकरितां जर तूं प्रस्तुत प्राप्त झालेल्या क्षत्रियधर्माचा त्याग करशील, तर तुला पाप लागेल आणि कल्पांतापर्यंतही अपयशाचा डाग नाहींसा होणार नाहीं. १ जोंपर्यंत अपकीर्ति झाली नाहीं तोंपर्यंतच ज्ञात्यानें जगावें; असें असतां तूंच सांग कीं, आतां एथून कसें परत जावें ? २ सदय अंतःकरणानें व मत्सररहित असा तूं माघारा फिरशील खरा, परंतु ह्या सर्वांना कांहीं ती गोष्ट पटणार नाहीं. ३ हे कौरव तुला चोहींकडून वेढतील, व तुजवर बाणांचा मारा करतील; पार्था, मग त्या प्रसंगीं ह्या तुझ्या कनवाळूपणानें कांहीं तुझी सुटका होणार नाहीं. ४ इतकेंही करून जर कदाचित् मोठ्या कष्टानें एथून तुझी सुटका झाली, तरी तें वांचणें मरणापेक्षांही वाईट आहे. ५

अन्वय–महारथाः त्वां भयात् रणात् उपरतं मंस्यन्ते येषां च त्वं बहुमतः भूत्वा लाघवं यास्यसि. ॥ ३५ ॥

अर्थ–[हे सर्व] महारथी तूं भयानें रणांतून पळून गेलास असें मानतील; आणि मग, तूं ह्या सर्वांना जो बहुमान्य आहेस, त्या तुला कमीपणा येईल ! ॥ ३५ ॥

आणखी एक गोष्टीचा तूं विचार केला नाहींस; तूं ह्या ठिकाणीं मोठ्या थाटानें युद्धास आला असून जर दयार्द्र होऊन माघारा जाण्यास निघालास, ६ तर, अर्जुना, तूंच सांग कीं, तुझें तें दयाळूपण हे तुझे दुर्जन वैरी कौरव ह्यांना खरें वाटेल का ? ७

अन्वय–तव सामर्थ्यं निन्दन्तः तव अहिताः बहून् अवाच्यवादान् वदिष्यंति; ततः दुःखतरं नु किम् ? ॥ ३६ ॥

अर्थ–तुझ्या सामर्थ्याची निंदा करून तुझें शत्रु न बोलावीं अशीं पुष्कळ दुर्भाषणें तुझ्यासंबंधानें बोलतील, ह्यापेक्षां अधिक दुःखकारक तें काय आहे ? ॥ ३६ ॥

हे ह्मणतील, " गेला रे गेला ! अर्जुन आह्मांला भिऊन पळून गेला " अरे, असा हा दोष तुझ्यावर राहिलेला चांगला कां ! ८ धनुर्धरा, पाहि-

परी वाढविती कीर्तीतें । धनुर्धरा ९ ते तुज अनायासें । अनकळित जोडिली असे । हें अद्वितीय जैसें । गगन आहे २१० तैसी कीर्ती निःसीम । तुझ्या ठायीं निरुपम । तुझे गुण उत्तम । तिहीं लोकीं ११ दिगंतीचे भूपति । भाट होऊनि वाखाणिती । जे ऐकिलिया दचकिती । कृतांतादिक १२ ऐसी महिमा घनवट । गंगा तैसी चोखट । जया देखीं जगीं सुभट । वांट जाहली १३ तें पौरुष तुझें अद्भुत । आइकोनियां हे समस्त । जाहले आथि विरक्त । जीवितेंसी १४ जैसा सिंहाचिया हांका । युगांतु होय मदमुखा । तैसा कौरवां अशेखां । धाकु तुझा १५ जैसे पर्वत वज्रातें । ना तरी सर्प गरुडातें । तैसे अर्जुना हे तूंतें । मानिती सदा १६ तें अगाधपण जाईल । मग हीणावो अंगा येईल । जरी मागुता निघसील । न झुंजतचि १७ आणि हे पळतां पळों नेदिती । धरूनि अवकळा करिती । न गणित कुटी बोलती । आइकतां तुज १८ मग ते वेळीं हियें फुटावें । आतां लाठेपणें कां न झुंजावें । हे जिंतलें तरी भोगावें । महीतळ १९

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् । तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥३७॥

ना तरी रणीं एथ । झुंजतां वेंचलें जीवित । तरी स्वर्गसुख अनकळित । पावसील २२० म्हणोनि ये गोठी । विचारु न करीं किरीटी । आतां धनुष्य घेऊनि उठीं । जुंझ वेगीं २१ देखें स्वधर्मु हा आचरतां । दोषु नाशे असतां । तुज भ्रांति हे कवण चित्ता । पातकाची २२ सांगें प्लवेंचि काय बुडिजे । कां मार्गीं जातां आडळिजे । परी विपायें चालों नेणिजे । तरी तेंही घडे २३ अमृतें तरीचि मरिजे । जरी विखेंसीं सेविजे । तैसा स्वधर्मीं दोषु पाविजे । हेतुकपणें २४ ह्मणोनियां पार्था । हेतू सांडूनि सर्वथा । तुज क्षात्रवृत्ति झुंजतां । पाप नाहीं २५

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ । ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥३८॥

सुखीं संतोषा न यावें । दुःखीं विषादा न भजावें । आणि लाभालाभ न धरावे । मनामाजीं२६एथ विजयपण होईल । कीं सर्वथा देह जाईल । हें आधींचि कांहीं पुढील । चिंतावेना २७ आपणयां उचिता । स्वधर्में राहाटतां । जें पावे तें निवांता । साहोनि जावें २८ ऐसेया मनें होआवें । तरी दोषु न घडे स्वभावें । ह्मणोनि आतां झुंजावें । निश्चिंत तुवां २९

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु । बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ३९

जे तितके सायास करून, किंवा प्रसंगीं प्राणही खर्ची घालून लोक ज्या कीर्तीचें संपादन करितात, ९ ती गगनाप्रमाणें अनुपमेय व निष्प्रतिबंध कीर्ति संपादण्याचा प्रसंग अनायासानें तुला आला आहे. २१० तुझी कीर्ति अमर्याद असून तुझे गुणही उपमारहित आहेत, अशी तिन्ही लोकांत ख्याति आहे. ११ देशांतरीचे राजेरजवाडे स्तुतिपाठक होऊन तुझी कीर्ति गातात, ती ऐकून यमादिक देखील तुला भितात ! १२ त्या कीर्तिचा महिमा गंगेच्या पाण्याप्रमाणें निर्मल व गहन आहे, आणि तो ऐकून जगांतील मोठमोठ्या योद्धयांना कीर्ती संपादन करण्याचा मार्ग झाला आहे. १३ असा तुझ्या अद्भुत शौर्याचा महिमा ऐकून हे सर्व कौरव आपल्या प्राणांवर उदार झाले आहेत. १४ ज्याप्रमाणें सिंहाची गर्जना ऐकल्याबरोबर उन्मत्त हत्तीलाही प्रळयकाळच ओढावला असें वाटतें, त्याप्रमाणें ह्या सर्व कौरवांस तुझा धाक वाटतो. १५ ज्याप्रमाणें पर्वत वज्राला किंवा सर्प गरुडाला मानतात, त्याप्रमाणें हे कौरव तुला नेहमीं मानतात. १६ तेव्हां आतां युद्ध न करितां जर माघारा फिरशील, तर ही तुझी थोरवी नाहींशी होऊन तुला हीनत्व प्राप्त होईल. १७ बरें, पळून जाऊं म्हणशील, तर हे तुला जाऊं देणार नाहींत; तुला धरून आणून तुझी फजिती करतील, आणि तुझ्या तोंडावर तुझी अतिशय निंदा करतील. १८ ते मर्मभेदक शब्द ऐकून मग अंत:करण विदीर्ण होण्यापेक्षां आतां शौर्यानें कां युद्ध करूं नये ? जर ह्यांना तूं जिंकलेंस तर पृथ्वीचें राज्य भोगशील. १९

अन्वय–हत: स्वर्गं प्राप्स्यसि वा जित्वा महीम् भोक्ष्यसे वा; तस्मात् कौंतेय, युद्धाय कृतनिश्चय: उत्तिष्ठ. ॥ ३७ ॥

अर्थ–युद्धांत मरण पावलास तर स्वर्गप्राप्ति होईल, अथवा युद्धांत जय पावलास तर पृथ्वीचें राज्य भोगशील; म्हणून, अर्जुना, युद्धाविषयीं निश्चय करून ऊठ. ॥३७॥

अथवा ह्या रणामध्यें युद्ध करतांना तूं मेलास, तर सहज स्वर्गसुख भोगशील; २२० म्हणून, अर्जुना, ह्याबद्दल आतां विचार करीत बसूं नको; तर ऊठ आणि हातांत धनुष्य घेऊन लवकर युद्धास आरंभ कर. २१ हें पहा–स्वधर्माचें आचरण केलें तर असलेले दोष नाश पावतात, असें असून त्याच्यापासून पातक लागेल हा भ्रम तुझ्या मनांत कोठून उत्पन्न झाला ? २२ तूंच सांग, कीं नावेंत बसणारा कधीं बुडेल का ? त्याचप्रमाणें चांगल्या रस्त्यानें जाणारा कधीं ठेंच लागून पडेल का ? परंतु ज्याला चालतां येत नाहीं, तो मात्र कदाचित् ठेंच लागून पडण्याचा संभव आहे. २३ दूध प्यालयानें मरण येणार नाहीं; परंतु तें विषाबरोबर सेवन केल्यास तो सेवन करणारा मरेल; त्याचप्रमाणें फलाच्या आशेनें स्वधर्माचें आचरण केल्यास मात्र दोष लागतील. २४ ह्मणून, अर्जुना, निष्काम होऊन क्षत्रियधर्मानें युद्ध कर, म्हणजे पातकाचा लेशही तुला लागणार नाहीं. २५

अन्वय–सुखदु:खे, लाभालाभौ, जयाजयौ समे कृत्वा तत: युद्धाय युज्यस्व, एवं पापं न अवाप्स्यसि. ॥ ३८ ॥

अर्थ–सुख व दु:ख, लाभ व हानि, जय व अपजय हीं सारखीं मानून मग युद्धास तयार हो; म्हणजे तुला पाप कधींही लागणार नाहीं. ॥ ३८ ॥

सुख प्राप्त झालें असतां संतोष मानूं नये, दु:ख प्राप्त झालें असतां खेद मानूं नये, आणि मनांत लाभालाभ धरूं नये. २६ ह्या समरांगणीं आपल्यास जय मिळेल किंवा आपण मरूं, ह्या पुढील गोष्टींचा अगोदरच विचार करीत बसूं नये. २७ आपण स्वधर्मानें वागत असतांना जें बरें वाईट प्राप्त होईल, तें निमूटपणानें सहन करावें. २८ अशा रीतीनें मनाचा निश्चय केला, ह्मणजे सहजच दोष घडत नाहींत; म्हणून तूं निश्चयानें आतां युद्धास आरंभ कर. २९

अन्वय–पार्थ, एषा ते सांख्ये बुद्धि: अभिहिता, योगे तु इमां शृणु, यया बुद्धया युक्त: (त्वं) कर्मबंधं प्रहास्यसि.३९

अर्थ–पार्था, आतांपर्यंत तुला सांख्यबुद्धि [परमार्थशास्त्रांतील ज्ञान] सांगितली. आतां, कर्मयोगाविषयींची जी बुद्धि–जिच्या योगानें कर्मबंध नाहींसा होतो–ती ऐक. ३९

हे सांख्यस्थिति मुकुलित । सांगितली तुज येथ । आतां बुद्धियोगु निश्चित । अवधारीं पां २३० जया बुद्धियुक्ता । जाहलिया पार्था । कर्मबंधु सर्वथा । बाधूं न पवे ३१ जैसें वज्रकवच लेइजे । मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे परी जैतेंसी उरिजे । अचुंबित ३२

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते । स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥४०॥

तैसें ऐहिक तरी न नशे । आणि मोक्षु तो उरला असे । जेथ पूर्वानुक्रमु दिसे । चोखाळत ३३ कर्माधारें राहाटिजे । परी कर्मफळ न निरीक्षिजे । जैसा मंत्रज्ञु न बंधिजे । भूतबाधा ३४ तियापरी जे सुबुद्धि । आपुलालिया निरवधि । हा असतांचि उपाधि । आकळूं न सके ३५ जेथ न संचरे पुण्यपाप । जें सूक्ष्म अति निष्कंप । गुणत्रयादि लेप । न लगती जेथ ३६ अर्जुना ते पुण्यवशें । जरी अल्पचि हृदयीं बुद्धि प्रकाशे । तरी अशेषही नाशे । संसारभय ३७

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन । बहुशाखाह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥४१॥

जैसी दीपकळिका धाकुटी । परी बहु तेजातें प्रगटी । तैसी सद्बुद्धि हे थेकुटी । ह्मणों नये ३८ पार्था बहुतीं परी । हे अपेक्षिजे विचारशूरीं । जे दुर्लभ चराचरीं । सद्वासना ३९ आणिकासारिखा बहुवसु । जैसा न जोडे परिसु । कां अमृताचा लेशु । दैवगुणें २४० तैसी दुर्लभ जे सद्बुद्धि । जिये परमात्माचि अवधि । जैसा गंगेसी उदधि । निरंतर ४१ तैसें ईश्वरावांचुनि कांहीं । जिये आणीक लाणी नाहीं । ते एकचि बुद्धि पाहीं । अर्जुना जगीं ४२ येर ते दुर्मती । जे बहुधा असे विकरती । तेथ निरंतर रमती । अविवेकिये ४३ ह्मणोनि तयां पार्था । स्वर्ग संसार नरकावस्था । आत्मसुख सर्वथा । दृष्ट नाहीं ४४

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः । वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥४२॥
कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् । क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥४३॥
भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् । व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥४४॥

वेदाधारें बोलती । केवळ कर्म प्रतिष्ठिती । परी कर्मफळीं आसक्ती । धरूनियां ४५ म्हणती संसारीं जन्मिजे । यज्ञादिक कर्म कीजे । मग स्वर्गसुख भोगिजे । मनोहर ४६ एथ हेंवांचूनि कांहीं । आणिक सर्वथा सुखचि नाहीं । ऐसें अर्जुना बोलती पाहीं । दुर्बुद्धि ते ४७ देखें कामनाअभिभूत । होऊनि कर्में आचरत । ते केवळ भोगीं चित्त । देऊनियां ४८ क्रियाविशेषें बहुतें । न लोपिती विधीतें ।

एथपर्यंत हा ज्ञानयोग तुला संक्षिप्तपणें सांगितला; आतां बुद्धियोग (कर्माशीं ज्ञानाचा संबंध-कर्मयोग . सांगतों ऐक. २३० अर्जुना, पुरुष बुद्धियोगाला प्राप्त झाला असतां त्याला कर्मबंधाची मुळींच बाधा होत नाहीं. ३१ ज्याप्रमाणें अंगांत वज्रकवच घातलें म्हणजे शस्त्रांची वृष्टि सहन करून विजय खात्रीनें मिळतो. ३२

अन्वय–इह अभिक्रमनाशः न अस्ति, प्रत्यवायः न विद्यते अस्य धर्मस्य स्वल्पं अपि (अनुष्ठानं) महतः भयात् त्रायते. ॥ ४० ॥

अर्थ–ह्या कर्मयोगांत आरंभिलेलें कर्म मध्येंच बंद पडलें असतां घडलेलें कर्म नाश पावत नाहीं, व त्याला अडचण किंवा संकट येत नाहीं; आणि या धर्माच्या थोड-क्या देखील अनुष्ठानानें मोठ्या भयापासून रक्षण होतें. ४०

त्याप्रमाणें इहलोकचें सुख नाहींसें न होतां मोक्ष अंतरत नाहीं. ज्या कर्मयोगांत पूर्वीं झालेलें कर्म पुढें खंड पडला तरी नासत नाहीं. ३३ कर्माच्या आधारानें वागणूक ठेवावी, परंतु त्या कर्मापासून होणाऱ्या फलाची इच्छा धरूं नये; जसा पंचाक्षरी भूतापासून बाधा पावत नाहीं, ३४ त्याचप्रमाणें, [कर्मफलाच्या ठिकाणीं आसक्ति न ठेवतां निरभिमानबुद्धीनें कर्म करण्याची] सद्बुद्धी ज्याला प्राप्त झाली आहे, त्याला जन्ममरणाचा उपाधि बाधा करीत नाहीं. ३५ ज्या बुद्धीला पापपुण्याची बाधा होत नाहीं; जी अतिशय सूक्ष्म असून निश्चल आहे; आणि सत्त्व, रज, व तम हे तिन्ही गुण जिच्यांत प्रवेश करीत नाहींत; ३६ अर्जुना, अशी जी सुबुद्धि, ती पुण्याईनें थोडीशी जरी एकाद्याला प्राप्त झाली तरी ती सर्व संसारभयाचा नाश करिते.३७

अन्वय–कुरुनंदन, इह व्यवसायात्मिका बुद्धिः एका एव, अव्यवसायिनां हि बुद्धयः बहुशाखाः अनन्ताः च (सन्ति).४१

अर्थ–अर्जुना, ह्या कर्मयोगामध्यें निश्चयात्मक बुद्धि एकच आहे, आणि अनिश्चित पुरुषांच्या बुद्धि अनेक भेदांनीं युक्त व अनंत असतात. ॥ ४१ ॥

ज्याप्रमाणें दिव्याची ज्योत लहान असूनही तिचा प्रकाश मोठा पडतो, त्याप्रमाणें, सद्बुद्धि अल्प जरी असली, तरी तिला लहान समजूं नये. ३८ अर्जुना, जे ज्ञानी आहेत ते बहुतकरून हिची इच्छा करतात. परंतु ती सद्बुद्धि जगतांत फार दुर्लभ आहे. ३९ ज्याप्रमाणें इतर दगडांसारखे परीस कांहीं पुष्कळ सांपडत नाहींत, अथवा लेशमात्र अमृत प्राप्त होण्यास देखील दैवयोगच लागतो, २४० त्याप्रमाणें, परमेश्वरप्राप्तींतच जिचें पर्यवसान होतें अशी ही सद्बुद्धि फार दुर्लभ आहे. ज्याप्रमाणें गंगेचें पर्यवसान निरंतर समुद्रच आहे. ४१ त्याप्रमाणें, अर्जुना, जिला ईश्वरप्राप्तीवांचून दुसरी कांहीं प्राप्ति नाहीं, अशी जगतामध्यें एकच बुद्धि आहे. ४२ इजशिवाय इतर बुद्धि त्या दुर्बुद्धि होत; त्यांचे ठिकाणीं विकार उत्पन्न होतात व तेथें अविचारी लोक नेहमीं रमतात. ४३ ह्मणून, अर्जुना, त्या लोकांना स्वर्ग, संसार आणि नरकावस्था प्राप्त होते;परंतु आत्मसुख कधीं माहीतच नाहीं.

अन्वय–पार्थ, वेदवादरताः अन्यत् न अस्ति इति वादिनः अविपश्चितः कामात्मानः स्वर्गपराः भोगैश्वर्यगतिं प्रति क्रियाविशेषबहुलां जन्मकर्मफलप्रदां यां पुष्पितां वाचं प्रवदन्ति तया अपहृतचेतसां भोगैश्वर्यप्रसक्तानां समाधौ व्यवसायात्मिका बुद्धिः न विधीयते ॥ ४२ ॥ ४३ ॥ ४४ ॥

अर्थ–अर्जुना, वेदाच्या नुसत्या अर्थवादांतच रत झालेले व कर्मावांचून दुसरें कांहीं नाहीं असें म्हणणारे अविचारी लोक, व त्याप्रमाणेंच विषयभोगांविषयीं तत्पर व स्वर्गप्राप्तीचा हेतु धरणारे लोक, भोग व ऐश्वर्य हीं मिळण्यासाठीं अनेक प्रकारच्या विशिष्ट क्रिया सांगणारी, व जन्म आणि कर्म हीं फळें देणारी जी पुष्पित [बाह्यतः मोहक दिसणारी] वाणी बोलतात, त्या वाणीला ज्यांचें चित्त वश झालें आहे त्या, भोग व ऐश्वर्य यांच्याविषयीं तत्पर असलेल्या लोकांच्या मनांत निश्चयात्मक म्हणजे आत्मतत्त्वविषयक किंवा कर्मयोगविषयक बुद्धि वसत नाहीं. ४२।४३।४४॥

ते वेदाचे आधारानें बोलून कर्ममार्गाचें श्रेष्ठत्व स्थापन करतात, परंतु त्या कर्माचे फलावर लोभ ठेवतात. ४५ त्यांचें असें ह्मणणें असतें कीं, मृत्युलोकीं जन्म घेऊन यज्ञादिक कर्मे आचरावीं, व आल्हादायक असें स्वर्गसुख भोगावें. ४६ अर्जुना, ते दुर्बुद्धि नेहमीं असें म्हणतात कीं, एथें ह्या स्वर्गसुखावांचून निरंतर सुख देणारें असें दुसरें सुखच नाहीं. ४७ हें पहा–ते केवळ भोगाच्या इच्छेनें आसक्त झाल्यामुळें कर्मफलावर दृष्टि देऊनच सकाम कर्मे करतात, ४८ व अनेक प्रकारचीं अनुष्ठानें

निपुण होऊनि धर्मातें। अनुष्ठिती ४९ परी एकाचि कुडें करिती। जे स्वर्गकामु मनीं धरिती। यज्ञपुरुषा चुकती। भोक्ता जो २५० जैसा कर्पूराचा राशि कीजे। मग अग्नि लाऊनि दीजे। कां मिष्टान्नीं संचरविजे। काळकूट ५१ दैवें अमृतकुंभ जोडला। तो पायें हाणोनि उलंडिला। तैसा नासिती धर्मु निपजला। हेतुकपणें ५२ सायासें पुण्य अर्चिजे। मग संसारु कां अपेक्षिजे। परी नेणती ते काय कीजे। अप्राप्त देखें ५३ जैसी रांधवणी रससोय निकी। करूनियां मोलें विकी। तैसा भोगासाठीं अविवेकी। धाडिती धर्मु ५४ ह्मणोनि हे पार्था। दुर्बुद्धि देख सर्वथा। तयां वेदवादरतां। मनीं वसे ५५

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन। निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान्॥४५॥

तिहीं गुणीं आवृत्त। हे वेद जाण निभ्रांत। ह्मणोनि उपनिषदादि समस्त। सात्त्विक ते ५६ येर रजतमात्मक। जेथ निरूपिजे कर्मादिक। जे केवळ स्वर्गसूचक धनुर्धरा ५७ ह्मणोनि तूं जाण। हे सुखदुःखांसीच कारण। एथ ह्मणें अंतःकरण रिगों देसी ५८ तूं गुणत्रयातें अव्हेरीं। मी माझें हें न करीं। एक आत्मसुख अंतरीं। विसंब ह्मणीं ५९

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके। तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः॥४६॥

जरी वेदें बहुत बोलिलें। विविध भेद सूचिले। तन्ही आपण हित आपुलें। तेंचि घेपें २६० जैसा प्रगटलिया गभस्ती। अशेषही मार्ग दिसती। तरी तेतुलेहि काय चालिजती। सांगें मज ६१ कां उदकमय सकळ। जन्ही जाहलें असे महीतळ। तरी आपण घेपें केवळ। आर्तीचजोगें ६२ तैसे ज्ञानी जे होती। ते वेदार्थातें विवरिती। मग अपेक्षित तें स्वीकारिती। शाश्वत जें ६३

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संङ्गोऽस्त्वकर्मणि॥४७॥

ह्मणोनि आइकें पार्था। याचिपरी पहातां। तुज उचित होय आतां। स्वकर्म हें ६४ आम्हीं समस्तही विचारिलें। तंव ऐसेंचि हें मना आलें। जे न सांडिजे तुवां आपुलें। विहित कर्म ६५ परी कर्मफळीं आस न करावी। आणि कुकर्मीं संगति न व्हावी। हे सत्क्रियाचि आचरावी। हेतूविण ६६

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय। सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते॥४८

विधियुक्त करून तीं शेवटास नेण्याकारितां फार दक्षतेनें धर्माचरण करतात, ४९ परंतु, अर्जुना, ते एक गोष्ट फार वाईट करतात. ती ही कीं, ते मनामध्यें स्वर्गेच्छा धारण करतात; आणि यज्ञभोक्ता जो ईश्वर त्याला विसरतात. २५० ज्याप्रमाणें कापुराच्या शुभ्र राशीस अग्नि लावून तो व्यर्थ जाळून टाकावा. अथवा मिष्टान्नांत काळकूट विष मिसळावें, ५१ किंवा दैवयोगानें मिळालेल्या अमृताचा कुंभ पायानें पालथा करावा, त्याप्रमाणें, फलप्राप्तीचे हेतूनें प्राप्त झालेला धर्म हे लोक वायां दवडतात. ५२ असें पहा कीं, मोठ्या श्रमानें पुण्य संपादन करून मग संसाराची इच्छा कां करावी ? परंतु काय करावें, हें त्या अज्ञानी लोकांना समजत नाहीं. ५३ ज्याप्रमाणें उत्तम स्वयंपाकीण नानातऱ्हेचा चांगला स्वयंपाक तयार करून तें अन्न द्रव्याच्या आशेनें विकते, त्याप्रमाणें अविचारी लोक हे सुखोपभोगासाठीं धर्म गमावितात. ५४ ह्मणून, पार्था, वेदांतील अर्थवादांत मग्न झालेल्या लोकांच्या मनांत नेहमीं दुर्बुद्धिच वास करिते हें लक्षांत असूं दे.५५

अन्वय–अर्जुन, वेदाः त्रैगुण्यविषयाः(सन्ति).(त्वं) निस्त्रैगुण्यः निर्द्वंद्वः नित्यसत्त्वस्थः निर्योगक्षेमः आत्मवान् च भव.४५

अर्थ–अर्जुना, वेदांत सत्त्व, रज व तम ह्या तीन गुणांचेंच प्रतिपादन केलें आहे, म्हणून तूं गुणातीत हो; मी व माझें हें द्वंद्व टाकून दे; नित्य शुद्ध सत्त्वगुणानें स्थिर हो; योगक्षेम म्हणजे चरितार्थ कसा चालेल, ह्याची काळजी सोड; आणि आत्मस्वरूपीं चित्त ठेव. ॥४५॥

तूं निश्चयानें असें समज कीं, वेद हे तीन गुणांनीं (सत्त्व रज, तम ह्यांनीं) भरलेले आहेत; ह्मणून सर्व उपनिषदें ह्यांची सत्त्वगुणामध्यें गणना केली जाते. ५६ धनुर्धरा, बाकी ज्यामध्यें कर्म, उपासना इत्यादिकांचें निरूपण केलेलें आहे, ते सर्व रज व तम ह्या गुणांनीं युक्त असून केवळ स्वर्गसूचकच आहेत. ५७ म्हणून, तूं असें पक्कें समज कीं, हे सुखदुःखांनाच कारण आहेत; व ह्याकरितां, तूं आपलें मन कदाचित् तेथें शिरूं देशील हो! तर तसें करूं नको. ५८ तूं ह्या गुणत्रयाची त्रिपुटी टाकून दे, व अहंममता सोडून अंतःकरणांत आत्मसुखाचा विसर पडूं देऊं नको हो ! ५९

अन्वय–यावान् अर्थः उदपाने (तावान्) सर्वतः संप्लुतोदके (भवति); (यावान् च अर्थः) सर्वेषु वेदेषु तावान् विजानतः ब्राह्मणस्य (भवति). ॥ ४६ ॥

अर्थ–अल्प जलाशयांत जीं स्नानपानादिक कामें पृथक् पृथक् होतात, तीं सर्व मोठ्या जलाशयांत एकदम होतात. तसें, सर्व वेदांतील जें पृथक् पृथक् फल तें ब्रह्मज्ञान्याला एकदम प्राप्त होतें. ॥ ४६ ॥

जरी वेदांत पुष्कळ गोष्टी सांगितल्या असून पुष्कळ प्रकार सुचविले आहेत, तरी ज्यांत आपलें हित आहे तोच मार्ग स्वीकारला पाहिजे. २६० ज्याप्रमाणें सूर्योदय झाल्यावर अनेक रस्ते दृष्टीस पडतात, परंतु तितके रस्ते मनुष्य आक्रमूं शकतो काय सांग बरें ? ६१ अथवा, सर्व पृथ्वी उदकमय झाली तरी जसें आपल्या इच्छेपुरतेंच पाणी घेतलें पाहिजे, ६२ त्याप्रमाणें ज्ञानी जे आहेत, ते वेदार्थाचा विचार करून अपेक्षित अशा शाश्वत ब्रह्माचा तेवढा स्वीकार करतात. ६३

अन्वय–(पार्थ,) ते अधिकारः कर्मणि एव; कदाचन फलेषु मा; (त्वं) कर्मफलहेतुः मा भूः अकर्मणि च ते सङ्गः मा अस्तु. ॥ ४७ ॥

अर्थ–अर्जुना, तूं कर्माचाच अधिकारी आहेस, तूं फलाचा अधिकारी कधींही होऊं नकोस, व कर्माच्या फलाची इच्छा देखील धारण करूं नकोस, आणि कर्म न करण्याविषयींही आग्रह धरूं नकोस. ॥ ४७ ॥

म्हणून, पार्था, ऐक. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून पाहतां तुला स्वकर्मच उचित आहे. ६४ आम्हीं सर्व गोष्टींचा विचार करून पाहिला, तों आमचे मनास असें आलें कीं, आपलें कर्तव्यकर्म सोडूं नये. ६५ पण कर्मफलाची इच्छा न ठेवतां, आणि निषिद्ध कर्माचा अंगीकार न करतां सत्कर्माचेंच निष्काम आचरण करावें. ६६

अन्वय–धनंजय (त्वं) संगं त्यक्त्वा सिद्ध्यसिद्ध्योः समः भूत्वा योगस्थः (सन्) कर्माणि कुरु, समत्वं योगः उच्यते. ४८

अर्थ–हे धनंजया, कर्मांविषयीं आसक्ति न ठेवितां कर्मांच्या कर्तेपणाचा अभिमान व फलाची इच्छा टाकून कर्म कर. आरंभिलेलें कर्म शेवटास गेलें अगर न गेलें तरी हर्ष व शोक मानूं नको. योगाचा आश्रय करून कर्म कर. सुखदुःखांचे ठिकाणीं समता असणें ह्यालाच योग ह्मणतात. ४८

तूं योगयुक्त होउनी । फळाचा संगु टाकुनी । मग अर्जुना चित्त देउनी । करीं कर्मे ६७ परी आदरिलें कर्म दैवें । जरी समाप्तीतें पावे । तरी विशेषें तेथ तोषावें । हेंही नको ६८ कीं निमित्तें कोणे एकें । तें सिद्धी न वचत ठाके । तरी तेथिचेनि अपरितोखें । क्षोभावें ना ६९ आचरतां सिद्धी गेलें । तरी काजाचि कीर आलें । परी ठेलियाही सगुण जहालें । ऐसेंचि मानीं २७० देखें जेतुलालें कर्म निपजे । तेतुलें आदिपुरुषीं अर्पिजे । तरी परिपूर्ण सहजें । जहालें जाणें ७१ देखें संतासंतकर्मीं । हें जें सरिसेपण मनोधर्मीं । तेचि योगास्थिति उत्तमीं । प्रशंसिजे७२

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय । बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥४९॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते । तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥५०॥

अर्जुना समत्व चित्ताचें । तेंचि सार जाण योगाचें । जेथ मन आणि बुद्धीचें । ऐक्य आथी ७३ तो बुद्धियोग विवरितां । बहुतें पाडें पार्था । दिसे हा अरुता । कर्मभोगु ७४ परी तेंचि कर्म आचरिजे । तरीच हा योगु पाविजे । जें कर्मशेष सहजें । योगास्थिति ७५ ह्मणोनि बुद्धियोगु सधरु । तेथ अर्जुना होईं स्थिरु । मनें करीं अव्हेरु । फळहेतूचा ७६ जे बुद्धियोगा योजिले । तेचि पारंगत जाहले । इहीं उभयबंधीं सांडिले । पापपुण्यीं ७७

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः । जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥५१॥

ते कर्मीं तरी वर्तती । परी कर्मफळा नातळती । आणि यातायाति न लोपती । अर्जुना तयां ७८ मग निरामयभरित । पावती पद अच्युत । ते बुद्धियोगयुक्त । धनुर्धरा ७९

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति । तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥५२॥

तूं ऐसा तैं होसी । जैं मोहातें यया सांडिसी । आणि वैराग्य मानसीं । संचरेल २८० मग निष्कळंक गहन । उपजेल आत्मज्ञान । तेणें निचाड होईल मन । अपैसें तुझें ८१ तेथ आणिक कांहीं जाणावें । कां मागिलातें स्मरावें । हें अर्जुना आघवें । पारुषेल ८२

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला । समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥५३॥

इंद्रियांचिया संगति । जियें पसरु होतसे मति । ते स्थिर होईल मागुति । आत्मस्वरूपीं ८३ समाधिसुखीं केवळ । जैं बुद्धि होईल निश्चळ । तैं पावसी तूं सकळ । योगस्थिति ८४

अर्जुना, त्वां योगयुक्त होऊन फलाची इच्छा टाकून द्यावी, व मन लावून कर्में करावीं. ६७ परंतु आरंभिलेलें कर्म दैवयोगानें पूर्ण झालें तरी त्याचा संतोष मानूं नये; ६८ किंवा कोणत्याही कारणानें तें कर्म सिद्धीस न जातां तसेंच राहिलें, तरी त्याबद्दल मनांत असंतोष मानून त्रासूं नये. ६९ कर्म करतांना जर शेवटास गेलें, तर तें खरोखर उपयोगालाच आलें; परंतु कदाचित् विघ्न येऊन अपुरतें राहिलें, तरीही बरेंच झालें असें समज. २७० कारण, असें पहा–जेवढें कर्म घडेल तेवढें ईश्वराला अर्पण करावें. म्हणजे सहजरीत्या पूर्ण झालें असें समज. ७१ आणखी असें पहा कीं, चांगल्या व वाईट कर्माचे ठिकाणीं मनोधर्म सारखा राहणें हीच योगस्थिति असें उत्तम लोक म्हणतात. ७२

अन्वय–धनंजय, (फलाभिसंधिनाकृतं) कर्म बुद्धियोगात् दूरेण अवरं हि, (यतः एवं, ततः) बुद्धौ शरणं अन्विच्छ. फलहेतवः कृपणाः (संति.) ॥ ४९ ॥ बुद्धियुक्तः इह उभे सुकृतदुष्कृते जहाति. तस्मात् योगाय युज्यस्व; योगः कर्मसु कौशलम् (अस्ति.) ॥ ५० ॥

अर्थ–अर्जुना, बुद्धियोगापेक्षां म्हणजे ईश्वराला अर्पण करण्याच्या हेतूनें केलेल्या कर्मापेक्षां फलाच्या हेतूनें केलेलें कर्म फार कमी योग्यतेचें आहे; म्हणून बुद्धियोगालाच शरण जा. कर्माच्या फलाची इच्छा करणारे अति दीन होत. ॥४९॥ बुद्धियोगानें युक्त असा पुरुष, कर्माचें फल जें पापपुण्य त्यापासून ह्या लोकींच मुक्त होतो; म्हणून समत्वबुद्धियोग साध्य करून घे. कर्माचें कौशल्य ईश्वराला कर्म अर्पण करण्यांतच आहे. ॥ ५० ॥

अर्जुना, ज्या ठिकाणीं मन (क्रिया) आणि बुद्धि (ज्ञान) ह्यांचें ऐक्य आहे, त्याच ठिकाणीं चित्ताची समता राहते, आणि तेंच योगाचें सार आहे. ७३ पार्था, विचारांतीं बुद्धियोगाची व कर्मयोगाची तुलना केली असतां हा (अहंकारयुक्त व फलेच्छारहित) कर्मयोग फार कमी योग्यतेचा आहे. ७४ परंतु त्या कर्माचेंच आचरण केलें, ह्मणजे हा बुद्धियोग साध्य होतो; आणि अशा रीतीनें कर्मसिद्धि झाली ह्मणजे त्याला योगस्थिति म्हणतात. ७५ म्हणून, अर्जुना, बुद्धियोग हाच पायाशुद्ध आहे, आणि त्याचेच ठिकाणीं तूं आपलें मन लाव; परंतु मनांत फलप्राप्तीची आशा करूं नको. ७६ ज्यांची बुद्धियोगाकडे प्रवृत्ति झाली, तेच पार पडतात;आणि पाप व पुण्य या दोहोंच्या बंधनांतून सुटतात. ७७

अन्वय–बुद्धियुक्ताः हि मनीषिणः (भूत्वा) कर्मजं फलं त्यक्त्वा जन्मबंधविनिर्मुक्ताः (सन्तः) अनामयं पदं गच्छंति. ५१

अर्थ–ह्मणून समत्वबुद्धियुक्त असे पुरुष ज्ञानी होऊन कर्मफलाची आशा सोडून, व जन्मबंधापासून मुक्त होऊन सर्व उपद्रवांनीं रहित अशा [परब्रह्म] पदाप्रत पावतात. ॥ ५१ ॥

अर्जुना, त्यांनीं जरी कर्मे केलीं, तरी ते कर्मांच्या फलांची इच्छा धरीत नाहींत, म्हणून ते जन्ममरणाच्या यातायातीनें लिप्त होत नाहींत म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडत नाहींत. ७८ धनुर्धरा, मग बुद्धियोगयुक्त होऊन ब्रह्मानंदानें भरलेलें अविनाशी असें पद ते पावतात. ७९

अन्वय–यदा ते बुद्धिः मोहकलिलं व्यतितरिष्यति, तदा त्वं श्रोतव्यस्य श्रुतस्य च निर्वेदं गंतासि. ॥ ५२ ॥

अर्थ–जेव्हां तुझी बुद्धि मोहरूपी अज्ञान तरून जाईल, तेव्हां तूं ऐकावयाचें व ऐकलेलें ह्यांबद्दल विरक्त होशील. ॥ ५२ ॥

जेव्हां तूं ह्या मोहाचा त्याग करशील, तुझ्या मनांत वैराग्य प्रवेश करील, २८० त्या योगानें निर्दोष आणि गहन असें आत्मज्ञान उत्पन्न होऊन तुझें अंतःकरण सर्व प्रकारें निरिच्छ होईल त्या वेळीं तूं अच्युतपदाला पावशील. ८१ त्या पदप्राप्तीनंतर पुढल्याबद्दल कांहीं विचार करणें किंवा मागील गोष्टी आठवणें हे सर्व प्रकार जागचे जागीं राहतील. ८२

अन्वय–यदा ते श्रुतिविप्रतिपन्ना बुद्धिः निश्चला (भूत्वा) समाधौ अचला स्थास्यति, तदा योगं अवाप्स्यसि. ॥५३॥

अर्थ–वेदांतील नानाप्रकारचीं वाक्यें श्रवण करून घोंटाळ्यांत पडलेली तुझी बुद्धि जेव्हां घोंटाळ्यांतून सुटून समाधीमध्यें म्हणजे आत्म्याच्या ठिकाणीं स्थिर होईल, तेव्हां तूं योगाप्रत प्राप्त होशील. ॥ ५३ ॥

इंद्रियांच्या संगतीनें जी बुद्धि चंचल होते ती आत्मस्वरूपाची प्राप्ति झाल्यावर मग सहज स्थिर होते. ८३ समाधिसुखाचे ठिकाणीं जेव्हां तुझी बुद्धि स्थिर होईल, तेव्हांच तुला सर्व योगस्थिति साधेल. ८४

अर्जुन उवाचः—

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव । स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ५४

तेथ अर्जुन म्हणे देवा । हाचि अभिप्रावो आघवा । मी पुसेन आतां सांगावा । कृपानिधी ८५ मग अच्युत म्हणे सुखें । जें किरीटी तुज निकें । तें पूस पां उन्मेखें । मनाचेनि ८६ या बोला पार्थें । म्हणितलें सांग पां श्रीकृष्णातें । काय म्हणिपे स्थितप्रज्ञातें । वोळखों केवीं ८७ आणि स्थिरबुद्धि जो म्हणिजे । तो कैसिया चिन्हीं जाणिजे । जो समाधिसुख भुंजे । अखंडित ८८ तो कवणें स्थिती असे । कैसेनि रूपीं विलसे । देवा सांगावें हें ऐसें । लक्ष्मीपती ८९ तंव परब्रह्म अवतरणु । जो षड्गुणाधिकरणु । तो काय तेथ नारायणु । बोलतु असे ९०

श्रीभगवानुवाचः—

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् । आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ५५

म्हणे अर्जुना पारियेसीं । जो हा अभिलाषु प्रौढ मानसीं । तो अंतराय स्वसुखेंसी । करीत असे ९१ जो सर्वदा नित्यतृप्तु । अंतःकरणभरितु । परी विषयामाजि पतितु । जेणें संगें कीजे ९२ तो कामु सर्वथा जाये । जयाचें आत्मतोषीं मन राहे । तोचि स्थितप्रज्ञु होये । पुरुष जाणें ९३

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥५६॥

नाना दुःखीं प्राप्ती । जयासी उद्वेगु नाहीं चि । आणि सुखाचिया आर्तीं । अडपेजेना ९४ अर्जुना तयाच्या ठायीं । कामक्रोधु [निर्मुक्ताः] नाहीं । आणि भयातें नेणे कहीं । परिपूर्णु तो ९५ ऐसा जो निरवधि । तो जाण पां स्थिरबुद्धि । जो निरसूनि उपाधि । भेदरहितु ९६

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् । नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५७॥

जो सर्वत्र सदा सरिसा । परिपूर्ण चंद्रु कां जैसा । अधमोत्तम प्रकाशा- । माजीं न म्हणे ९७ ऐसी अनवच्छिन्न समता । भूतमात्रीं सदयता । आणि पालटु नाहीं चित्ता । कवणे वेळे ९८ गोमटें कांहीं पावे । तरी संतोषें तेणें नाभिभवे । जो ओखटेनि नागवे । विषादासी ९९ ऐसा हरिखशोकरहितु । जो आत्मबोधभरितु । तो जाण पां प्रज्ञायुक्तु । धनुर्धरा १००

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः । इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५८॥

कां कूर्माचियापरी । उवाइला अवेव पसरी । ना तरी इच्छावशें आवरी । आपुले आपण १ तैसीं इंद्रियें आपैतीं होती । जयाचें म्हणितलें करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिति । पातली असे २

अन्वय–केशव, समाधिस्थस्य स्थितप्रज्ञस्य का भाषा ? स्थितधीः किं प्रभाषेत ? किं आसीत ? किं व्रजेत ? ॥५४॥

अर्थ–अर्जुन म्हणालाः—हे केशवा, ज्याची बुद्धि स्थिर होऊन योगस्थ झाली आहे, त्या स्थितप्रज्ञ पुरुषाचें लक्षण काय ? तो बोलतो काय ? बसतो कसा ? आणि जातो कोठें ? ॥ ५४ ॥

त्या वेळीं अर्जुन म्हणालाः—श्रीकृष्णा, कृपानिधे, ह्याजबद्दलचा खुलासा मी जो विचारीन, तो कृपा करून मला सांगा ८५मग श्रीकृष्ण म्हणतात—" अर्जुना, जें तुला संतोषित मनानें योग्य वाटेल तें खुशाल विचार. " ८६ असें म्हटल्यावर अर्जुन श्रीकृष्णांस म्हणाला, " स्थितप्रज्ञ (ज्याची बुद्धि स्थिर आहे तो) कोणाला म्हणावें, व तो ओळखावा कसा, हें उघड करून सांगा. ८७ ज्याला स्थिरबुद्धि म्हणतात, व जो निरंतर समाधिसुख भोगतो, तो कोणत्या चिन्हांनीं ओळखावा ? ८८ देवा, लक्ष्मीपते, तो कोणत्या स्थितींत असतो, व कोणत्या रूपानें वर्तन करतो, हें कृपा करून मला सांगा." ८९ तेव्हां षड्गुणैश्वर्यसंपन्न, सर्व गुणांचें अधिष्ठान व परब्रह्मावतार असे भगवान श्रीकृष्ण बोलूं लागले.

अन्वय–पार्थ, यदा (नरः) मनोगतान् सर्वान् कामान् प्रजहाति आत्मनि एव आत्मना तुष्टः (भवति), तदा स्थितप्रज्ञः उच्यते. ॥ ५५ ॥

अर्थ–श्रीकृष्ण म्हणालेः—हे अर्जुना, जेव्हां मनुष्य मनांत असलेल्या सर्व वासना अगदीं निःशेष टाकून आत्मसमाधानानें आपल्या ठिकाणींच संतुष्ट होईल, तेव्हां त्याला स्थितप्रज्ञ असें म्हणावें. ॥ ५५ ॥

श्रीभगवान म्हणतातः—अर्जुना, ऐक. मनांतील जी बलवत्तर इच्छा, ती आत्मसुखाला विघ्न आणते. ९१ जो सर्वदा तृप्त असून ज्याचें अंतःकरण आत्मज्ञानानें भरलेलें आहे, आणि ज्याच्या संगतीनें विषयांमध्यें पतन घडतें, ९२ त्या कामाची ज्याच्या मनांतून पूर्ण निवृत्ति होऊन ज्याचें मन आत्मसंतोषांत म्हणजे स्वानंदांत रममाण असतें, तोच पुरुष स्थिरबुद्धि असें जाणावें. ९३

अन्वय–दुःखेषु अनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः वीतरागभयक्रोधः मुनिः स्थितधीः उच्यते. ॥ ५६ ॥

अर्थ–ज्याचें मन दुःखप्राप्तीनें खेद पावत नाहीं, व सुखाविषयीं ज्याला इच्छा नाहीं; आणि काम, क्रोध व भय हे विकार ज्याच्या अंतःकरणांतून गेलेले आहेत, असा जो मुनि त्याला स्थितप्रज्ञ असें म्हणतात. ॥५६॥

नानाप्रकारचीं दुःखें प्राप्त झालीं असतां ज्याच्या मनांत त्रास उत्पन्न होत नाहीं, आणि जो सुखाच्या इच्छेमध्यें अडकून रहात नाहीं; ९४ अर्जुना, त्या सत्पुरुषाचें अंतःकरणांतून कामक्रोध सहज नाहींतसे झालेले असतात, व त्या पूर्णावस्थेस पोहोंचलेल्या पुरुषास भयाचें नांव देखील माहीत नसतें; ५९ अशा प्रकारें संसार सोडून देऊन जो केवळ भेदरहित झालेला असतो तोच पुरुष स्थिरबुद्धि असें समजावें. ९६

अन्वय–यः सर्वत्र अनभिस्नेहः तत् तत् शुभाशुभं प्राप्य न अभिनन्दति न द्वेष्टि, तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता. ॥५७॥

अर्थ–सर्व विषयांविषयीं ज्याचें ममत्व नष्ट झालें आहे, व ज्याला चांगले अगर वाईट विषय प्राप्त झाले तरी त्यांपासून सुख किंवा दुःख होत नाहीं, त्याचीच बुद्धि स्थिर झाली असें समजावें. ॥ ५७ ॥

पौर्णिमेचा चंद्र जसा चांगल्या किंवा वाईट लोकांस सारखा प्रकाश देतो, तसा जो सर्वांशीं सदैव सारखें वर्तन ठेवितो; ९७ त्याप्रमाणेंच अखंड समता आणि प्राणिमात्राविषयीं सदयता असून ज्याच्या चित्ताची स्थिति कधींही पालटत नाहीं; ९८ कांहीं चांगलें प्राप्त झालें तरी त्याच्या संतोषानें ज्याला गर्व होत नाहीं, व वाईट गोष्टीपासून ज्याला दुःख होत नाहीं, ९९ असा जो हर्षशोकरहित असून नेहमीं आत्मविचारांत निमग्न असतो, तोच, अर्जुना, स्थिरबुद्धि असें जाण. ३००

अन्वय–यदा च कूर्मः अङ्गानि इव अयं इंद्रियार्थेभ्यः इंद्रियाणि सर्वशः संहरते, (तदा) तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता. ५८

अर्थ–ज्याप्रमाणें कांसव आपले अवयव आपले इच्छेप्रमाणें आंवरून घेतें, त्याप्रमाणें सर्व विषयांपासून इंद्रियें मागारीं ओढून आपले ताब्यांत मनुष्य जेव्हां ठेवतो, तेव्हां त्याची बुद्धि स्थिर झाली असें म्हणावें. ॥ ५८ ॥

किंवा, कांसव आनंदांत असतां आपले हातपाय पसरतें, अथवा हवे असल्यास आपले आपण आंवरून धरतें; १ त्याप्रमाणें, ज्याचीं इंद्रियें स्वाधीन होऊन ज्याच्या ताब्यांत वागतात त्याची बुद्धि स्थिरता पावली असें समज. २

विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिनः । रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥५९॥

अर्जुना आणिकही एक । सांगेन ऐकें कवतिक । या विषयांतें साधक । त्यजिती नियमें ३ श्रोत्रादि इंद्रियें आवरिती । परि रसने नियमु न करिती । ते सहस्रधा कवळिजती । विषयीं इहीं ४ जैसी वरिवरी पालवी खुडिजे । आणि मुळीं उदक घालिजे । तरी कैसेनि नाशु निपजे । तया वृक्षा ५ तो उदकाचेनि बळें अधिकें । जैसा आडवेनि आंगें फांके । तैसा मानसीं विषो पोखे । रसनाद्वारें ६ येरां इंद्रियां विषय तुटे । तैसा नियमूं न ये रस हटें । जें जीवन हें न घटे । येणेंविण ७ मग अर्जुना स्वभावें । ऐसिही नियमातें पावे । जैं परब्रह्म अनुभवें । होऊनि जाइजे ८ तैं शरीरभाव नासती । इंद्रियें विषय विसरती । जैं सोहंभावप्रतीति । प्रगट होय ९

यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः । इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥६०॥

येऱ्हवीं तरी अर्जुना । हें आया नये साधना । जे राहटताती जतना । निरंतर ३१० जयातें अभ्यासाची घरटी । यमनियमांची ताटी । जे मनातें सदा मुठी । धरूनि आहाती ११ तेही किजती कासाविसी । या इंद्रियांची प्रौढी ऐसी । जैसी मंत्रज्ञातें विवसी । भुलवी कां १२ देखें विषय हे तैसे । पावती ऋद्धिसिद्धीचेनि मिषें । मग आकळिती स्पर्शें । इंद्रियांचेनी १३ तिये संधीं मन जाये । मग अभ्यासीं ठोटावलें ठाये । ऐसें बळकटपण आहे । इंद्रियांचें १४

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः । वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ६१

ह्मणोनि आइकें पार्था । यांतें निर्दळी जो सर्वथा । सर्व विषयीं आस्था । सांडूनियां १५ तोचि तूं जाण । योगनिष्ठेसि कारण । जयाचे विषयसुखें अंतःकरण । झकवेना १६ जो आत्मबोधयुक्तु । होऊनि असे सततु । जो मातें हृदयाआंतु । विसंबेना १७ येऱ्हवीं बाह्य विषय तरी नाहीं । परी मानसीं होईल जरी कांहीं । तरी साद्यंतुचि पाहीं । संसारु असे १८ जैसा कां विषाचा लेशु घेतलियां होय बहुवसु । मग निभ्रांत करी नाशु । जीवितासि १९ तैसी विषयाची शंका । मनीं वसती देखा । घातु करी अशेखा । विवेकजाता ३२०

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते । संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ६२
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः । स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ६३

जरी हृदयीं विषय स्मरती । तरी निसंगाही आपजे संगती । संगें प्रगटे मूर्ति । अभिलाषाची २१ जेथ कामु उपजला । तेथ क्रोधु आधींचि आला

अन्वय–निराहारस्य देहिनः विषयाः रसवर्जं विनिवर्तंते; अस्य रसः अपि परं दृष्ट्वा निवर्तते. ॥ ५९ ॥

अर्थ–आहार न करणाऱ्या पुरुषांचे विषय नाहींतसे होऊन त्यांचे ठिकाणीं फक्त प्रीति उरते; परंतु ती प्रीतिही ब्रह्मसाक्षात्कार झाल्यावर नाहींशी होते. ५९

अर्जुना, आणखी एक मौजेची गोष्ट तुला सांगतों, ऐक. जे साधक या विषयांचा नियमानें त्याग करितात, २ श्रोत्रादि इंद्रियांचें आकलन करितात, परंतु जिव्हेचा मात्र निग्रह करीत नाहींत, ते नानातऱ्हेनें ह्या विषयांमध्यें गुरफटले जातात. ४ एकाद्या वृक्षाचे वरचे वरचे शेंडे खुडले आणि मुळाशीं पाणी घातलें तर त्या वृक्षाचा नाश कसा होईल? ५तो जसा उदकाच्या बळानें आडवा फुटतो, त्याप्रमाणें ह्या रसनेच्या द्वारें अंतःकरणांत विषय अधिकाधिकच पुष्ट होतात; ६ इतर विषयांचे विषय कमी केले असतां कमी होतात; पण त्याचप्रमाणानें जिव्हेचा विषय हट्टानें कमी करतां येत नाहीं; कारण, तें जीवन आहे, त्याशिवाय हें शरीर चालावयाचें नाहीं. ७ परंतु, अर्जुना, साधक जेव्हां परब्रह्माचा अनुभव घेतो, तेव्हां रसनेचें (रसना शब्दानें उपलक्षित वासना) सहज नियमन होऊं शकतें. ८ ज्या वेळीं, आपण ब्रह्म आहों असा मनुष्यास अनुभव येतो, त्या वेळीं शरीराचे व्यवहार बाधित (दृढ मिथ्यात्व निश्चय) होऊन इंद्रियें विषयांना विसरून जातात. ९

अन्वय–कौंतेय, प्रमाथीनि इंद्रियाणि यततः विपश्चितः अपि पुरुषस्य मनः प्रसभं हरन्ति हि. ॥ ६० ॥

अर्थ–अर्जुना, बलवान् इंद्रियें, मनुष्य विद्वान् असून इंद्रियनिग्रह करण्याचा यत्न करीत असला तरी त्याचें मन बलात्कारानें आपल्याकडे ओढून घेतात. ॥ ६० ॥

एरवीं, अर्जुना, इंद्रियांना जिंकण्याबद्दल जे निरंतर यत्न करतात, त्यांच्या देखील हीं आधीन होत नाहींत. ३१० जो आपल्या भोंवतीं अभ्यासाची गस्त ठेवून यमनियमांचें कुंपण करितो, आणि मन सदा मुठींत बाळगतो, ११ त्याला सुद्धां हीं इंद्रियें व्याकूळ करून टाकतात, असा या इंद्रियांचा प्रताप आहे. ज्याप्रमाणें मांत्रिकाला जखीण भुलवून टाकते, १२ त्याप्रमाणें हे विषय ऋद्धिसिद्धीच्या रूपानें योग्याला प्राप्त होऊन इंद्रियद्वारां योग्याचें मन भ्रष्ट करतात. १३ अशा संधींत जर मन सांपडलें तर अभ्यास जागच्या जागीं राहतो, अशी ह्या इंद्रियांची मोठी शक्ति आहे ! १४

अन्वय–तानि सर्वाणि (इंद्रियाणि) संयम्य युक्तः (सन्) मत्परः असीत. यस्य हि वशे इंद्रियाणि (सन्ति) तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता. ॥६१॥

अर्थ–म्हणून, तीं सर्व इंद्रियें आपल्या ताब्यांत ठेवून ज्ञानी पुरुषानें माझ्या ठिकाणींच आपलें मन स्थिर करावें. ज्यांचीं इंद्रियें स्वाधीन असतात,तो निश्चल बुद्धीचा असें समजावें ॥ ६१ ॥

म्हणून, पार्था, सर्व विषयांचे ठिकाणची इच्छा सोडून इंद्रियांना जो जिंकतो, १५ व ज्याचें अंतःकरण विषयाच्या सुखानें भुलून जात नाहीं,तोच योगनिष्ठा प्राप्त होण्यास योग्य असें जाण. १६ कारण, तो नेहमीं आत्मबोधानें युक्त होऊन राहतो, व तो अंतःकरणांत मला कधीं विसरत नाहीं.१७ जरी कोणी बाहेरचे विषय सोडून कर्मेंद्रियांना आंवरून धरून स्वस्थ बसला, व त्यानें मनांत जरी विषयांची इच्छा केली, तथापि तो जन्ममरणाचे फेऱ्यांतून सुटला असें म्हणतां येत नाहीं. १८ विष हें सेवन करतेवेळीं जरी थोडें असलें तरी तें शरीरांत पसरून जिवाचा निःसंशय नाश करितें,१९त्याप्रमाणें मनांत ज्याप्रमाणें, विषयांची थोडी जरी इच्छा राहिली,तरी ती सर्व विचारसमूहाचा घात करिते ! ३२०

अन्वय–विषयान् ध्यायतः पुंसः संगः तेषु उपजायते. संगात् कामः संजायते, कामात् क्रोधः अभिजायते, क्रोधात् संमोहः भवति, संमोहात् स्मृतिविभ्रमः (भवति), स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशः (भवति), बुद्धिनाशात् (पुमान्) प्रणश्यति. ॥६२॥६३॥

अर्थ–विषयांचें चिंतन करणाऱ्या पुरुषाच्या ठिकाणीं विषयांची आसक्ति [प्रीति] उत्पन्न होते. प्रीतिमुळें काम [प्रबळ इच्छा] उत्पन्न होते, त्या इच्छेच्या आड कोणी आलें असतां क्रोध, क्रोधापासून मूर्खपणा, मूर्खपणापासून स्मृतिनाश, स्मृतिनाशापासून बुद्धिनाश व बुद्धिनाशामुळें पुरुषाचा सर्वस्वीं नाश होतो ! ॥६२॥६३॥

अंतःकरणांत विषयांची नुसती आठवण झाली, तरी विरक्तालाही त्याच्या प्राप्तीविषयीं मूर्तिमंत इच्छा म्हणजे काम उत्पन्न होतो. २१ काम उत्पन्न झाला कीं, त्या ठिकाणीं आधीं क्रोध आलेलाच, व क्रो-

क्रोधीं असे ठेविला । संमोह जाणें २२ संमोहा जालिया व्यक्ति । तरी नाशु पावे स्मृति । चंडवातें ज्योति । आहत जैसी २३ कां अस्तमानीं निशी । जैसा सूर्यतेजातें ग्रासी। तैसी दशा स्मृतिभ्रंशीं । प्राणियासी २४ मग अज्ञानांध केवळ । तेणें आप्लविजे सकळ । तेथ बुद्धि होय व्याकुळ । हृदयामाजीं २५ जैसें जात्यंधा पळणी पावे । मग ते काकुळती सैरा धांवे। तैसे बुद्धीसि होती भंवे । धनुर्धरा २६ ऐसा स्मृतिभ्रंशु घडे । मग सर्वथा बुद्धि अवघडे । तेथ समूळ हें उपडे । ज्ञानजात २७ चैतन्याच्या भ्रंशीं । शरिरा दशा जैशी । तैसें पुरुषा बुद्धिनाशीं । होय देखें २८ ह्मणोनि आइकें अर्जुना । जैसा विस्फुलिंग लागे इंधना । मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना । पुरों शके २९ तैसें विषयांचें ध्यान । जरी विषायें वाहे मन । तरी येसणें हें पतन । गिंवसीत पावे ३३०

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् । आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥६४॥

ह्मणोनि विषय हे आघवे । सर्वथा मनौनि सांडावे । मग रागद्वेष स्वभावें। नाशतील ३१ पार्था आणिकही एक । जरी नाशले रागद्वेष । तरी इंद्रिया विषयीं बाधक । रमतां नाहीं ३२ जैसा सूर्य आकाशगतु । रश्मिकरें जगातें स्पर्शतु । तरी संगदोषें काय लिंपतु । तेथिचेनि ३३ तैसा इंद्रियार्थीं उदासीन । आत्मरसोंचि निर्भिन्न । जो कामक्रोधविहीन । होऊनि असे ३४ तरी विषयांतही कांहीं । आपणपेंवांचूनि नाहीं । मग विषय कवण कायी । बाधितील कवणा ३५ जरी उदकीं उदकें बुडिजे । कां अग्नि आगी पोळिजे । तरी विषयसंगें आप्लविजे । परिपूर्णु तो ३६ ऐसा आपणचि केवळु । होऊनि असे निखळु । तयाचि प्रज्ञा अचळु । निभ्रांत मानीं ३७

प्रसादे सर्वदुःखानां ह्यानिरस्योपजायते । प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥६५॥

देखें अखंडित प्रसन्नता । आथी जेथ चित्ता । तेथ रिगणें नाहीं समस्तां । संसारदुःखां ३८ जैसा अमृताचा निर्झरु । प्रसवे जयाचा जठरु । तया क्षुधेतृषेचा अडदरु । कहींचि नाहीं ३९ तैसें हृदय प्रसन्न होये । तरी दुःख कैचें कें आहे । तेथें आपैसी बुद्धि राहे । परमात्मरूपीं ३४० जैसा निर्वातीचा दीपु । सर्वथा नेणे कंपु । तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूपु । योगयुक्तु ४१

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चाऽयुक्तस्य भावना । न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ६६

ये युक्तीचि कडसणी । नाहीं जयाच्या अंतःकरणीं । तो आकळिला जाण

धामध्यें अविचार आपला ठेविलेला असावयाचाच ! २२ ज्याप्रमाणें दिव्याची ज्योत वाऱ्यानें नाहींशी होते, त्याप्रमाणें अविचारामुळें स्मृति म्हणजे आत्मज्ञान नाश पावते. २३ संध्याकाळ होतांच रात्र जशी सूर्यतेजाला गिळून टाकते, त्याप्रमाणें स्मृतीचा भ्रंश झाल्यावर मनुष्याची दशा होते. २४ मग अज्ञानामुळें त्याची बुद्धि केवळ आंधळी होऊन तो सर्व गोष्टींस आंचवतो, आणि त्याला कांहीं सुचेनासें होतें. २५ जन्मांधाला पळण्याचा प्रसंग आल्यावर तो जसा दीन होऊन सैरावैरा धांवूं लागतो, त्याप्रमाणें, अर्जुना, बुद्धीला भ्रमण होतें. २६ अशा रीतीनें बुद्धीला भ्रंश झाला म्हणजे बुद्धि घोंटाळ्यांत पडते, आणि मग सर्व ज्ञान नष्ट होतें. २७ शरीरांतील प्राण निघून गेला म्हणजे जसा देह प्रेतरूपी होतो, त्याप्रमाणें बुद्धि नष्ट झाल्यावर जिवाची स्थिति होते. २८ ह्मणून, अर्जुना, ऐक:—इंधनाला ठिणगी लागून ती भडकली ह्मणजे जशी त्रिभुवनाला देखील पुरते, २९ त्याप्रमाणें अंत:करणांत यत्किंचित् जरी विषयांचें स्मरण झालें, तरी एवढा हा अनर्थ ओढवतो ! ३३०

अन्वय—विधेयात्मा तु रागद्वेषवियुक्तैः आत्मवश्यैः इंद्रियैः विषयान् चरन् प्रसादम् अधिगच्छति. ॥ ६४ ॥

अर्थ—प्रीति व द्वेष टाकून ज्यानें आपलीं इंद्रियें आपल्या आधीन ठेविलीं आहेत, त्यानें विषयांचें जरी सेवन केलें तरी त्या जितेंद्रियाच्या अंत:करणाची प्रसन्नता बिघडत नाहीं. ॥६४॥

ह्मणून, मनांतून सर्व विषय काढून टाकावे, ह्मणजे राग, प्रीति आणि द्वेष [अप्रीति] हे आपोआप नाहींतसे होतात. ३१ पार्था, आणखी तुला सांगतों कीं, राग व द्वेष नाहींतसे झाल्यावर जरी इंद्रियें विषयांचे ठिकाणीं रममाण झालीं, तरी ते विषय बाधक होत नाहींत. ३२ ज्याप्रमाणें, आकाशांतून सूर्य हा आपल्या किरणरूपी हातांनीं जगतांतील वस्तूंना स्पर्श करितो, परंतु त्यांच्या संसर्गदोषानें लिप्त होतो कीं काय ? [नाहीं !] ३३ त्याप्रमाणें, जो विषयांचे ठिकाणीं उदासीन, आत्मस्वरूपाचे ठिकाणीं निमग्न, व कामक्रोधापासून अलिप्त असतो, ३४ आणि, अर्जुना, जो विषयांमध्यें आपल्या स्वरूपाशिवाय दुसरें कांहींच पहात नाहीं, त्याला विषय कसले ? आणि बाधणार तरी काणाला ? ३५ जर पाण्यांत पाणी बुडेल, किंवा अग्नीनें अग्नि जळेल, तर मात्र तो परिपूर्णत्वास पावलेला पुरुष विषयांचे संगतीनें बुडेल. ३६ अशा प्रकारें जो आपण स्वत:च सर्वरूप होऊन राहतो, तोच अचलप्रज्ञ (स्थिरबुद्धि) असें निभ्रांत समज. ३७

अन्वय—प्रसादे अस्य सर्वदु:खानां हानिः उपजायते, प्रसन्नचेतसः हि बुद्धिः आशु पर्यवतिष्ठते. ॥ ६५ ॥

अर्थ—चित्ताला प्रसन्नता प्राप्त झाली म्हणजे त्याच्या सर्व दु:खाचा नाश होतो, आणि प्रसन्नचित्त झालेल्या पुरुषाची बुद्धि लवकर आत्म्याच्या ठिकाणीं स्थिर होते. ६५

असें पहा कीं, ज्या ठिकाणीं मनाची पूर्ण शांति आहे, तेथें ह्या सर्व संसारदु:खांचा प्रवेश होत नाहीं. ३८ ज्याचे उदरांतच अमृताचा झरा उत्पन्न झाला आहे, त्याला जशी तहानभुकेची कधींच पीडा होत नाहीं, ३९ त्याप्रमाणें, ज्याचें हृदय प्रसन्न आहे, त्याला दु:ख कसलें ! आणि तें होणार तरी कोठून ! त्याची बुद्धि आपोआप परमात्मस्वरूपीं जडून राहते; ३४० ज्याप्रमाणें निवाऱ्यांतील दिव्याची ज्योत मुळींच कधींही हालत नाहीं, त्याप्रमाणें, जो स्थिरबुद्धि आहे, तो आत्मस्वरूपसमाधीमध्यें निश्चलपणें रत असतो. ४१

अन्वय—अयुक्तस्य बुद्धिः नास्ति अयुक्तस्य च भावना न (अस्ति) अभावयतः च शांतिः न (अस्ति) अशांतस्य सुखं कुतः ? ६६

अर्थ—ज्याचें अंत:करण स्वस्थ नसतें, त्याला आत्मज्ञानाची बुद्धि नसते; ज्याच्या ठिकाणीं मनोनिग्रह नसतो त्याला आत्म्याचें ध्यान असत नाहीं; ज्याला आत्म्याचें ध्यान नाहीं त्याला शांति नाहीं; व ज्याला शांति नाहीं त्याला सुख कोठून असणार ? ॥ ६६ ॥

हा योगयुक्तीचा विचार ज्याचे अंत:करणांत नाहीं, त्याला शब्दादिक विषय आपले पाशांत गों-

गुणीं । विषयादिकीं ४२ तया स्थिरबुद्धि पार्था । कहीं नाहीं सर्वथा । आणि स्थैर्याची आस्था । तेही नुपजे ४३ निश्चलत्वाची भावना । जरी नव्हेचि देखें मना । तरी शांति केवीं अर्जुना । आपु होय ४४ जेथ शांतीचा जिव्हाळा नाहीं । तेथ सुख विसरोनि न रिघे कहीं । जैसा पापियाच्या ठायीं । मोक्षु न वसे ४५ देखें अग्निमाजिं घापती । तियें बीजें जरी विरूढती । तरी अशांता सुखप्राप्ती । घडों शके ४६ ह्मणोनि अयुक्तपण मनाचें । तेंचि सर्वस्व दुःखाचें । या कारणें इंद्रियांचें । दमन निकें ४७

इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते । तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥६७॥

इंद्रियें जें जें भ्हणती । तें तेंचि जे पुरुष करिती । ते तरलेचि न तरती । विषयसिंधु ४८ जैसी नाव थडिये ठाकितां । जरी वरपडी होय दुर्वाता । तरी चुकलाही मागौता । अपावो पावे ४९ तैसी प्राप्तेंही पुरुषें । इंद्रियें लाळिलीं जरी कौतुकें । तरी आक्रमिला जाण दुःखें । संसारिकें ३५०

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः । इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥६८॥

ह्मणोनि आपुलीं आपणपया । जरी इंद्रियें येती आया । तरी अधिक कांहीं । धनंजया । सार्थक असे ५१ देखें कूर्म जियापरी । उवाइला अवयव पसरी । ना तरी इच्छावशें आवरी । आपणपेंचि ५२ तैसीं इंद्रियें अपैतीं होती । जयाचें ह्मणितलें करिती । तयाची प्रज्ञा जाण स्थिती । पावली असे ५३ आतां आणिक एक गहन । पूर्णाचें चिन्ह । अर्जुना तुज सांगेन । परिसपां ५४

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ६९

देखें भूतजात निदेलें । तेथेंचि जया पाहलें । आणि जीव जेथ चेइले । तेथ निद्रितु जो ५५ तोचि तो निरुपाधि । अर्जुना तो स्थिरबुद्धि । तोचि जाणें निरवधि । मुनीश्वर ५६

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशंति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविशंति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥७०॥

पार्था आणीकही परी । तो जाणों येईल अवधारीं । जैसी अक्षोभता सागरीं । अखंडित ५७ जऱ्ही सरितावोघ समस्त । परिपूर्ण होऊनि मिळत । तऱ्ही अधिक नोहे ईषत् । मर्यादा न संडी ५८ ना तरी ग्रीष्मकाळीं सरिता । शोषूनि जाती समस्ता । परी न्यून नव्हे पार्था । समुद्रु जैसा ५९ तैसा प्राप्तीं ऋद्धिसिद्धि । तयासि क्षोभु नाहीं बुद्धि । आणि न पवतां न बाधी । अधृति तयातें ३६० सांगें

वून घेतात. ४२ पार्था, त्याच्या बुद्धीला कधींही स्थिरता नसते, व तिचे प्राप्तीविषयीं त्याचे अंत:करणांत इच्छाही उत्पन्न होत नाहीं. ४३ अर्जुना, स्थिरपणाची भावना त्याचे अंत:करणांत मुळींच जर उत्पन्न होत नाहीं तर त्याला शांति कशाची प्राप्त होणार ! ४४ पाण्याकडे मोक्ष जसा ढुंकूनही पहात नाहीं, त्याप्रमाणें जेथें शांतीचा लेशही नाहीं तेथें सुख हें चुकून देखील जात नाहीं. ४५ हें पहा—जर विस्तवांत घातलेलीं धान्याचीं बीजें उगवलीं, तरच शांतिहीन मनुष्याला सुखप्राप्ति घडूं शकेल. ४६ म्हणून मनाचा अनियमितपणा हेंच दु:खाचें कारण आहे; ह्याकरितां इंद्रियनिग्रह करणें हेंच उत्तम. ४७

अन्वय—चरतां इंद्रियाणां हि यन्मन: अनुविधीयते, तत् अंभसि वायु: नावं इव अस्य प्रज्ञां हरति. ॥ ६७ ॥

अर्थ—स्वैर संचार करणाऱ्या इंद्रियांच्या मागोमाग जेव्हां मन जातें तेव्हां तें, समुद्रांत वारा जसा नावेला ओढतो, तसें मनुष्याच्या बुद्धीला ओढतें. ॥६७॥

जे पुरुष इंद्रियांचे इच्छेप्रमाणें वागतात, ते ह्या विषयरूप सागरांतून आपण तरलों आहों असें समजत असले तरी खरोखर तरत नाहींत. ४८ ज्याप्रमाणें एकादी नाव तीराजवळ टेंकतें न टेंकते तोंच जर वादळ उत्पन्न झालें तर चुकवून आलेल्या अपायांत फिरून सांपडते, ४९ त्याप्रमाणें सिद्ध ह्मणजे कृतार्थ होण्याच्या वेतांत आलेल्या पुरुषानें जरी इंद्रियांचें कौतुकानें लालन केलें, तरी तो संसारदु:खांनीं व्यापिला जातो असें समज. ३५०

अन्वय—तस्मात्, हे महाबाहो, यस्य इंद्रियाणि इंद्रियार्थेभ्य: सर्वश: निगृहीतानि, तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता. ॥ ६८ ॥

अर्थ—म्हणून, हे महाबाहो अर्जुना, इंद्रियांचे अर्थ जे विषय, त्यांपासून इंद्रियें सर्वप्रकारेंकरून जो आंवरून धरतो, त्याची बुद्धि स्थिर झाली असें समज. ॥ ६८ ॥

ह्मणून धनंजया, आपलीं इंद्रियें आपल्या आधीन झालीं ह्मणजे मग ह्यापेक्षां अधिक सार्थक तें काय आहे ? ५१ पहा कीं—ज्याप्रमाणें कांसव आपले पसरलेले अवयव स्वेच्छेनें स्वत:च आंवरतें, ५२ त्याप्रमाणें, ज्यांचीं इंद्रियें स्वाधीन असून तो म्हणेल त्याप्रमाणें करतात, त्याचीच बुद्धि स्थिरत्वाप्रत पावली असें समज. ५३ अर्जुना, आतां, ज्ञान्यास ओळणण्याची आणखी एक सूक्ष्म खूण तुला सांगतों, ती ऐक. ५४

अन्वय—या सर्वभूतानां निशा तस्यां संयमी जागर्ति. यस्यां भूतानि जाग्रति सा पश्यत: मुने: निशा. ॥ ६९ ॥

अर्थ—स्वरूपाविषयीं अज्ञान हीच रात्र. सर्व भूतांची जी रात्र त्या रात्रीचे समयीं योगी पुरुष जागा असतो व स्वरूपानुभवरूप जागृति भोगतो; आणि ज्या रात्रीचे ठिकाणीं सर्व भूतें सत्यबुद्धीनें जागीं असतात, त्या रात्रीचे ठिकाणीं संसाराविषयीं योगी पुरुषाला झोंप आलेली असते.

सर्व प्राण्यांस अज्ञात असलेल्या आत्मस्वरूपाविषयीं ज्याला पूर्ण ज्ञान आहे, आणि ज्या व्यावहारिक विषयाच्या प्राप्तीविषयीं प्राणीमात्र जागे आहेत, त्या विषयसुखाचे ठिकाणीं जो निजलेला आहे, ५५ तोच; अर्जुना, उपाधिरहित, स्थिरबुद्धि, गंभीर आणि मुनीमध्यें ह्मणजे मनन करणारांमध्यें श्रेष्ठ आहे असें समज. ५६

अन्वय—यद्वत् आप: अपूर्यमाणं अचलप्रतिष्ठं समुद्रं प्रविशंति, तद्वत् सर्वे कामा: यं प्रविशंति स: शांति आप्नोति; कामकामी न. ॥ ७० ॥

अर्थ—चोहोंकडून पाण्यानें भरणाऱ्या व मर्यादा न सोडणाऱ्या समुद्रांत जशा सर्व नद्या वगैरे प्रवेश करितात, तसे, सर्व काम ज्याचे ठिकाणीं प्रवेश करितात, त्याला शांति मिळते, जो कामाची इच्छा करितो त्याला शांति मिळत नाहीं ॥७०॥

पार्था, आणखी एका पर्यायानें तो स्थितप्रज्ञ मनुष्य ओळखतां येतो, तो कोणता तो ऐक. समुद्राचे ठिकाणीं जशी निरंतर परिपूर्णता असते तशी ह्या पुरुषाचे ठिकाणीं असते. ५७ जरी समुद्रास पावसाळ्यांत नद्यांचे प्रवाह भरपूर होऊन मिळतात, तरी तो किंचितही अधिक न होतां आपली मर्यादा उल्लंघन करीत नाहीं; ५८ किंवा, अर्जुना उन्हाळ्यांत सर्व नद्यांचें पाणी जरी आटलें तरी तो समुद्र ज्याप्रमाणें यत्किंचित्सुद्धां कमी होत नाहीं, ५९ त्याप्रमाणें ऋद्धिसिद्धि प्रसन्न झाल्यानें तो पुरुष उल्हास पावत नाहीं, आणि प्रसन्न न झाल्या तरी असंतुष्ट होत नाहीं. ३६० पहा कीं, सूर्याचे

सूर्याच्या घरीं । प्रकाशु काय वातीवेरी । कां न लविजे तरी अंधारीं । कोंडेल तो ६१ देखें ऋद्धिसिद्धि तयापरी । आली गेली से न करी । तो विगुंतला असे अंतरीं । महासुखीं ६२ जो आपुलेनि नागरपणें । इंद्रभुवनातें पाबळें ह्मणे । तो केवीं रंजे पालिवणें । भिल्लांचेनि ६३ जो अमृतासी ठी ठेवी । तो जैसा कांजी न सेवी । तैसा स्वसुखानुभवी । न भोगी ऋध्दि ६४ पार्था नवल हें पाहीं । जेथ स्वर्गसुख लेखनीय नाहीं । तेथ ऋद्धिसिद्धि कायी । प्राकृता होती ६५

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः । निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥७१॥

ऐसा आत्मबोधें तोषला । जो परमानंदें पोखला । तोचि स्थिरप्रज्ञु भला । वोळख तूं ६६ तो अहंकारातें दंडुनी । सकळ कामु सांडुनी । विचरे विश्व होऊनि । विश्वाचीमाजीं ६७

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति । स्थित्वाऽस्यामंतकालेऽपिब्रह्मनिर्वाणमृच्छति७२

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥

हे ब्रह्मस्थिति निःसीम । जया अनुभविता निष्काम । ते पावले परब्रह्म । अनायासें ६८ जे चिद्रुपीं मिळतां । देहांतीचि व्याकुळता । आड ठाकों न सके चित्ता । प्राज्ञा जया ६९ तेचि हे स्थिति । स्वमुखें श्रीपति । सांगत अर्जुनाप्रति । संजयो म्हणे ३७० ऐसें कृष्णवाक्य ऐकिलें । तेथ अर्जुनें मनीं ह्मणितलें । आतां आमुचिया काजा कीर आलें । उपपत्ति इया ७१ जें कर्मजात आघवें । एथ निराकारिलें देवें । तरी पारुषलें म्यां झुंजावें । म्हणूनियां ७२ ऐसा श्रीअच्युताचिया बोला । चित्तीं धनुर्धर उवायिला । आतां प्रश्नु करील भला । आशंकोनी ७३ तो प्रसंगु असे नागरु । जो सकळ धर्मासि आगरु । कीं विवेकामृतसागरु । प्रांतहीनु ७४ जो आपण सर्वज्ञनाथु । निरूपिता होईल श्रीअनंतु । ज्ञानदेवो सांगेल मातु । निवृत्तिदासु ३७५

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां द्वितीयोऽध्यायः ॥२॥ श्लोक ७२, ओंव्या ३७५.



घरीं दिव्याचे ज्योतीचा प्रकाश केला तरच उजेड पडतो, किंवा तो न लावला तर तो अंधारांत कोंडला जातो काय ? ६१ त्याप्रमाणें, त्या पुरुषाच्या घरीं ऋद्धिसिद्धि आल्या काय व गेल्या काय, त्यांची आठवणसुद्धां त्याला होत नाहीं. कारण, त्याचें अंतःकरण महासुखांत ह्मणजे परमात्मसुखाचे ठिकाणीं निमग्न असतें. ६२ जो आपल्या वराच्या सौंदर्यापुढें इंद्रभुवनालासुद्धां तुच्छ मानतो, त्याला भिल्लांच्या पालांपासून कसें समाधान होणार !६३ जो अमृताला देखील नांवें ठेवितो तो जसा कांजी पीत नाहीं, तसा आत्मानंदानें तृप्त असणारा पुरुष क्षुल्लक ऋद्धिसिद्धींचा उपभोग घेत नाहीं. ६४ अर्जुना, काय चमत्कार आहे पहा--ज्या पुरुषाच्या ठिकाणीं स्वर्गासारख्या सुखाचा जमाखर्च नाहीं, त्याला सामान्य ऋद्धिसिद्धीची कथा काय ! असें असून त्याच्या ठिकाणीं ऋद्धिसिद्धि पाहिजेतच असें ह्मणतात हें किती आश्चर्य ! ६५

अन्वय–यः पुमान् सर्वान् कामान् विहाय निस्पृहः निर्ममः निरहंकारः (सन्) चरति, सः शांति अधिगच्छति ७१

अर्थ–जो पुरुष सर्व वासनांचा त्याग करून, निस्पृह होऊन, आणि मी व माझें हें द्वंद्व टाकून निरहंकार असतो त्याला शांतिसुख प्राप्त होतें. ॥७१॥

ह्याप्रमाणें आत्मबोधानें संतोष पावलेला आणि परमानंदांत निमग्न झालेला तोच खरा स्थिरबुद्धि असें तूं समज. ६६ तो मीपणा दवडून, सर्व विषय सोडून,जगदाकार होऊन जगांत संचार करितो.६७

अन्वय–पार्थ, एषा ब्राह्मी स्थितिः, एनां प्राप्य न विमुह्यति, अंतःकाले अपि अस्यां स्थित्वा निर्वाणं ब्रह्म ऋच्छति.

अर्थ–अर्जुना, ह्याच स्थितीला ब्रह्मस्थिति (सर्व कर्म सोडून ब्रह्मरूपानें असणें) ह्मणतात, ही प्राप्त झाली असतां प्राणी मोह पावत नाहीं, ह्या स्थितींत असून मरण आलें तरीही तो जन्ममरणरहित असें जें ब्रह्म त्याला प्राप्त होतो. ॥७२॥

अशा निःसीम ह्मणजे अमर्याद ब्रह्मस्थितीचा निष्काम पुरुष अनुभव घेऊं लागले असतां ते अनायासेंच परब्रह्मास (आत्मस्वरूपास) जाऊन मिळतात. ६८ ज्ञानस्वरूपीं मिळाल्यावर ज्या ब्रह्मस्थितीनें देहांतीची व्याकुळता त्यांच्या चित्तांत येऊं शकत नाहीं. ६९ संजय धृतराष्ट्रास ह्मणतोः राजा, तींच ही स्थिति श्रीकृष्णांनीं स्वतः अर्जुनास सांगितली. ३७० असें श्रीकृष्णांचें बोलणें ऐकल्यावर अर्जुन मनांत ह्मणाला कीं, ही युक्ति आतां आमच्या बरी पथ्यावर पडली ! ७१ ज्या सर्व कर्मांचा देवांनीं निषेध केला, त्या निषेधानें, मी युद्ध करावें असें देवांचें ह्मणणें सहज बाजूस राहतें.७२ ह्याप्रमाणें श्रीकृष्णांचें भाषण ऐकून अर्जुन आपले मनांत फार हर्षित झाला. आतां तो शंका घेऊन पुढें गहन प्रश्न करील. ७३ तो संवाद फार सुरस असून सर्व धर्मांचें उत्पत्तिस्थान अथवा अमर्याद विचारामृतसमुद्रच आहे. ७४ त्या संवादाचें निरूपण जगदीश्वर स्वतः करतील, व ती गोष्ट निवृत्तिदास जे ज्ञानदेव ते सांगतील. ३७५

ज्ञानेश्वरी.

अध्याय तिसरा.

अर्जुन उवाच—

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन । तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥१॥

मग आइका अर्जुनें ह्मणितलें । देवा तुम्हीं जें वाक्य बोलिलें । तें निकें म्यां परिसिलें । कमळापती १ तेथ कर्म आणि कर्ता । उरेचिना पाहतां । ऐसें मत तुझें श्रीअनंता । निश्चित जरी २ तरी मातें केवीं श्रीहरी । म्हणसी पार्था संग्रामु करीं । इये लाजसीना महाघोरीं । कर्मीं सुतां ३ हां गा कर्म तूंचि अशेष । निराकरिसी निःशेष । तरी मजकरवीं हें हिंसक । कां करविसी ४ तरी हेंचि विचारीं श्रीहृषीकेशा । तूं मानु देसी कर्मलेशा । आणि येसणी हे हिंसा । करवीत आहासी ५

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे । तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥२॥

देवा तुवांचि ऐसें बोलावें । तरी आम्हीं नेणतीं काय करावें । आतां संपलें ह्मणों पां आघवें । विवेकाचें ६ हां गा उपदेशु जरी ऐसा । तरी अपभ्रंशु तो कैसा । आतां पुरला आह्मां धिंवसा । आत्मबोधाचा ७ वैद्यु पथ्य वारूनि जाये मग जरी आपणाचि विष सुये । तरी रोगिया कैसेनि जिये । सांगें मज ८ जैसें आंधळें सुइजे आव्हांटा । कां माजवण दीजे मर्कटा । तैसा उपदेशु हा गोमटा । वोढवला आह्मां ९ मी आधींचि कांहीं नेणें । वरी कवळिलों मोहें येणें । श्रीकृष्णा विवेकु या कारणें । पुसिला तुज १० तंव तुझी एकेक नवाई । एथ उपदेशामाजिं गोवाई । तरी अनुसरलीया काई । ऐसें कीजे ११ आम्हीं तनुमनुजीवें । तुझिया बोला वोटंगावें । आणि तुवांचि ऐसें करावें । तरी सरलें ह्मणें १२ आतां ऐसियापरी बोधिसी । तरी निकें आह्मां करिसी । एथ ज्ञानाची आस कायसी । अर्जुन ह्मणे १३ तरी यें जाणिवेचें कीर सरलें । परी आणीक एक असें जाहलें । जें थितें हें डहुळलें । मानस माझें १४ तेवींचि श्रीकृष्णा हें तुझें । चरित्र कांहीं नेणिजे । जरी चित्त पाहसी माझें । येणें मिषें १५ ना

ज्ञानेश्वरी.

अध्याय तिसरा.

अन्वय–जनार्दन, ते कर्मणः बुद्धिः ज्यायसी मता चेत्' तत्, केशव, मां घोरे कर्मणि किं नियोजयसि? ॥१॥

अर्थ–अर्जुन म्हणालाः–हे जनार्दना, कर्मयोगापेक्षां बुद्धियोग श्रेष्ठ आहे, असें जर तुझें मत आहे, तर मग केशवा, मला घोर कर्म करण्याला कां प्रवृत्त करितोस?१

ज्ञानोबाराय ह्मणतातः–कोणत्या प्रकारानें अर्जुनानें शंका केली ते ऐकाः- मग अर्जुन म्हणतोः- देवा कमलापते, तुम्ही जें बोललां, तें मी लक्ष्यपूर्वक ऐकलें. १ आत्मस्वरूपाच्या ठिकाणीं कर्म आणि कर्ता हीं विचार करून पाहतां उरतच नाहींत. श्रीअनंता, हेंच जर आपलें निश्चित मत असेल, २ तर मग, हृषीकेशा, 'पार्था, तूं संग्राम कर' असें मला कां सांगता? ह्या भयंकर कर्मांत मला घालतांना तुम्हांला संकोच कसा वाटत नाहीं? ३ हें पहा–सर्व कर्मांचा तुम्ही निषेध करतां, तर मग माझ्या हातून असलें हिंसात्मक कर्म कां करवितां? ४ तर, हृषीकेशा, ह्याचा आपणच विचार करा कीं, आपण कर्ममार्गाला इतका मान देऊन माझ्या हातून ही एवढी भयंकर हिंसा करवीत आहां! ५

अन्वय–व्यामिश्रेण इव वाक्येन मे बुद्धिं मोहयसि इव, तत् निश्चित्य एकं वदयेन अहं श्रेयः आप्नुयाम्. ॥२॥

अर्थ–ह्या आपल्या जणूं काय घोंटाळ्याच्या बोलण्यानें तूं माझ्या मनाला भ्रम उत्पन्न करीत आहेस; तेव्हां तूं असें एक निश्चित सांग कीं, ज्याच्या योगानें मी आपलें कल्याण करून घेईन. ॥२॥

देवा, तुम्हीच जर असें बोलूं लागलां, तर आम्हीं अज्ञान्यांनीं काय करावें? तर आतांच सर्व विचार संपला असें ह्मणण्याची पाळी आली. ६ अज्ञान घालविण्याकरितां जर असा संदिग्ध उपदेश कराल, तर ह्याहून भ्रम निराळा तो कोणता? आतां आमची आपणापासून आत्मबोध करून घेण्याची इच्छा पूर्णच झाली ह्मणावयाची! ७ मला सांगा कीं, वैद्य हा रोग्याची प्रकृति पाहून त्यावर पथ्याची योजना करून गेल्यावर जर आपण होऊनच औषधांत विष घालील, तर रोग्यानें जगावें कसें? ८ ज्याप्रमाणें अंधळ्यास आडवाटेला लावावें, किंवा माकडाला मद्य पाजावें, तसा आपला हा उत्तम उपदेश आह्मांस चांगलाच फळला! ९ देवा, असें पहा; मला आधींच कांहीं समजत नाहीं; त्यांतून मी ह्या मोहानें ग्रस्त झालों आहे; ह्मणून तुम्हांला विचाराची गोष्ट पुसली, १० तों तुमचें आपलें एकेक नवलच! तुमच्या उपदेशांत साराच घोटाळा! तर शरणागताशीं असें का वागावयाचें! ११ आम्हीं कायावाचामनेंकरून आपल्या बोलण्यावर भरंवसा ठेवावा, आणि तुम्हींच जर असें करूं लागलां, तर मग आटोपलेंच ह्मणावयाचें! १२ अर्जुन म्हणतोः–" आतां अशा प्रकारें जर आपण बोध करीत असलां, तर मग आमचें चांगलेंच करीत आहां! १३ तर आतां एथें ज्ञानाची आशा कशाला पाहिजे? ज्ञान संपादन करण्याची हौस संपली; परंतु उलटें एक असें झालें कीं, माझ्या मनाची स्थिरता जाऊन तें जास्त घोंटाळ्यांत मात्र पडलें! १४ त्याचप्रमाणें, श्रीकृष्णा, तुमची लीला आम्ही कांहीं जाणूं शकत नाहीं. ह्या उपदेशाच्या मिषानें जर आपण माझें मन पहात असाल तर कोण जाणे! १५ किंवा

तरी झकवीतु अहासी मातें । कीं तत्त्वाचि कथिसी ध्वनितें । हें अवगमितां निरुतें । जाणवेना १६ म्हणोनि आइकें देवा । हा भावार्थु आतां न बोलावा । मज विवेकु सांगावा । मल्हाटा जी १७ मी अत्यंत जड असें । परी ऐसाही निकें परियेसें । श्रीकृष्णा बोलावें तुवां तैसें । एकनिष्ठ १८ देखें रोगातें जिणावें । औषध तरी देयावें । परी तें अति रुच्य व्हावें । मधुर जैसें १९ तैसें सकळार्थभरित । तत्त्व सांगावें उचित । परी बोधें माझें चित्त । जयापरी २० देवा तुजऐसा निजगुरु । आजि आर्तींधणी कां न करूं । एथ भीड कवणाची धरूं । तूं माय आमुची २१ हां गा कामधेनूचें दुभतें । दैवें जाहलें जरी आपैतें । तरी कामनेची कां तेथें । वानी कीजे २२ जरी चिंतामणी हाता चढे । तरी वांछेचें कवण सांकडें । कां आपुलेनि सुरवाडें । इच्छावें ना २३ देखा अमृतसिंधूतें ठाकावें । मग ताहानाचि जरी फुटावें । तरी सायासु कां करावे । मागील ते २४ तैसा जन्मांतरीं बहुतीं । उपासितां श्रीलक्ष्मीपती । तूं दैवें आजि हातीं । जाहलासी जरी २५ तरी आपुलिया सवेशा । कां न मागावासि परेशा । देवा सुकाळु हा मानसा । पाहला असे २६ देखें सकळार्तींचें जियालें । आजि पुण्य यशासि आलें । हे मनोरथ जहाले । बिजयी माझे २७ जी जी परममंगळधामा । सकळदेवोत्तमा । तूं स्वाधीन आजि आह्मां । म्हणऊनियां २८ जैसें मातेच्या ठायीं । अपत्या अनवसरु नाहीं । स्तन्यालागूनि पाहीं । जियापरी २९ तैसें देवा तूतें । पुसिजतसे आवडतें । आपुलेनि आर्तें । कृपानिधी ३० तरी पारत्रिकीं हित । आणि आचरितां तरी उचित । तें सांगें एक निश्चित । पार्थु म्हणे ३१

श्रीभगवानुवाचः—

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ । ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥३॥

या बोला श्रीअच्युतु । म्हणतसे विस्मितु । अर्जुना हा ध्वनितु । अभिप्रावो ३२ जे बुद्धियोगु सांगतां । सांख्यमतसंस्था । प्रकटिली स्वभावता । प्रसंगें आम्हीं ३३ तो उद्देशु तूं नेणसीचि । म्हणोनि क्षोमलासि वायांचि । तरी आतां जाणें म्यांचि । उक्त दोन्ही ३४ अवधारीं वीरश्रेष्ठा । ये लोकीं या दोन्ही निष्ठा । मजचिपासूनि प्रगटा । अनादिसिद्ध ३५ एक ज्ञानयोगु म्हणिजे । जो सांख्यीं अनुष्ठिजे । जेथ बोळखीसवें पाविजे । तद्रुपता ३६ एक कर्मयोगु जाण । जेथ साधकजन निपुण । होऊनियां निर्वाण । पावती बेळे ३७ हे मार्गु तरी दोन्ही

मला फसवीत आहां, का गूढार्थानें ब्रह्मस्वरूप सांगत आहां, ह्याचें अनुमान करतां खरें कांहींच कळत नाहीं. १६ म्हणून, देवा, ऐका. हा गूढार्थ न सांगतां, जो कांहीं आपला विचार असेल तो अडाण्यालाही समजेल अशा प्रकारें स्पष्ट सांगा. १७ श्रीकृष्णा, मी अतिशय मंदबुद्धि आहे; तेव्हां अशा मलाही चांगलें समजेल, असें एक निश्चयात्मक बोलणें आपण बोला. १८ असें पहा—औषध देऊन रोग तर नाहींसा व्हावा, परंतु तें औषध मधुर व रुचकर असावें; १९ त्याचप्रमाणें, सर्व अर्थानें परिपूर्ण व [आचरण्यास] योग्य असें तत्त्व आपण सांगा; पण ज्या रीतीनें माझ्या मनाला त्याचा पूर्ण बोध होईल त्या रीतीनें सांगा. २० देवा, तुमच्यासारखा गुरु मला मिळाला असतां आज मी आपल्या मनाची इच्छा कां न तृप्त करून घ्यावी ? ह्या ठिकाणीं मी भीड कोणाची धरावी ? तूं माझी माउली आहेस ! २१ असें पहा कीं, दैवयोगानें कामधेनूचें दुभतें प्राप्त झाल्यावर इच्छित मागण्यास कां कमी करावें ? २२ किंवा चिंतामणि हातीं आल्यावर मग इच्छित वस्तु मागण्याचें संकट कां पडावें ? आपल्याला जें अपेक्षित असेल तें कां न मागावें ? २३ पहा कीं, अमृतसिंधूचे कांठीं उभें राहून अमृत न पितां जर तहानेनें तरफडावें तर मग अमृतसिंधूजवळ येण्याचे श्रम तरी कां घ्यावे ? २४ त्याचप्रमाणें, हे कमलापते, तुझी जन्मोजन्मीं उपासना करितां करितां दैवयोगानें आज जर तूं लाधला आहेस, २५ तर मग, परमेश्वरा, आपल्याच इच्छेनें तुमच्यापाशीं आम्ही घाटेल तें कां मागूं नये ? देवा, आज मनांतील हेतु पूर्ण होण्याचा दिवस उगवला आहे ! २६ हें पहा—आज माझ्या सर्व इच्छा परिपूर्ण होऊन व माझें पूर्वपुण्य फळास येऊन सर्व मनोरथ सिद्धीस गेले; २७ कारण, कल्याणाचें आदिपीठ व सर्व देवांचे देव जे तुम्ही ते आज आमच्या आधीन झालां आहां २८ आईचें स्तनपान करण्यास मुलाला जशी वेळअवेळ ह्यांची अडचण नसते, २९ त्याप्रमाणें, देवा कृपानिधे, मी तुम्हांला माझे इच्छेनुरूप वाटेल तें विचारीत आहें. " ३० अर्जुन म्हणतो, " म्हणून, देवा, इहलोकीं आचरण्यास योग्य व परलोकीं हितकारक अशी एक निश्चित गोष्ट सांगा. " ३१

अन्वय—अनघ, अस्मिन् लोके मया द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता:—सांख्यानां ज्ञानयोगेन, योगिनां कर्मयोगेन. ॥३॥

अर्थ—श्रीभगवान् म्हणाले:—हे निष्पाप अर्जुना, ह्या लोकीं सृष्टीचे आरंभीं व मीं हे दोन प्रकारचे मार्ग सांगितले आहेत. सांख्यविचार करणारांना ज्ञानयोग, व कर्म करणारांना कर्मयोग. ॥३॥

हें बोलणें ऐकून श्रीकृष्ण आश्चर्यानें म्हणतात:—अर्जुना, तुला जो सांगितला तो गर्भितार्थ आहे. ३२ ईश्वरार्पण कर्ममार्ग सांगतांना प्रसंगानुसार जो ज्ञानमार्गाचा महिमा आम्ही सांगून गेलों, ३३ तो आमचा हेतु तूं जाणत नाहींस, म्हणून व्यर्थ क्षोभलास; तेव्हां आतां हें ध्यानांत ठेव कीं, ज्ञानयोग आणि कर्मयोग हे दोन्ही मार्ग मींच सांगितलेले आहेत, ३४ हे वीरश्रेष्ठा, ऐक; ह्या पृथ्वीवर हे दोन्ही संप्रदाय माझ्यापासूनच पूर्वापार प्रकट झाले आहेत, ३५ जड चैतन्याचा विचार करणारे ज्याचें आचरण करतात, व ज्या योगानें ब्रह्मरूपाची ओळख होतांक्षणींच ते तद्रूप होऊन जातात, त्या एका संप्रदायाला ज्ञानयोग म्हणतात. ३६ दुसऱ्यास कर्मयोग म्हणतात. त्या योगांत तत्पर असे मुमुक्षुजन अवकाशानें (ज्ञानोत्तरकालीं) मोक्षास पावतात. ३७ तयार असलेल्या व तयार

परी एकवटती निदानीं । जैसी सिद्धसाध्यभोजनीं । तृप्ती एक ३८ कां पूर्वापर सरिता । भिन्न दिसती पाहतां । मग सिंधुमिळणीं ऐक्यता । पावती शेखीं ३९ तैसीं दोनीही मतें । सूचिती एका कारणातें । परी उपास्ति ते योग्यते । आधीन असे ४० देखें उत्प्लवनासारिसा । पक्षी फळासि झोंबे जैसा । सांगें नरु केवीं तैसा । पावे वेगा ४१ तो हळू हळू ढाळेंढाळें । केतुलेनि एके वेळे । तया मार्गाचेनि बळें । निश्चित ठाकी ४२ तैसें देख पां विहंगममतें । अधिष्ठूनि ज्ञानातें । सांख्य सद्य मोक्षातें । आकळिती ४३ येर योगिये कर्माधारें । विहितेंचि निजाचारें । पूर्णता अवसरें । पावते होती ४४

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते । न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥४॥

वांचोनि कर्मारंभ उचित । न करितां सिध्दवत । कर्महीना निश्चित । होईजेना ४५ कीं प्राप्तकर्म सांडिजे । येतुलेनि नैष्कर्म्य होइजे । हें अर्जुना वायां बोलिजे । मूर्खपणें ४६ सांगें पैलतीरा जावें । ऐसें व्यसन कां जेथ पावे । तेथ नावेतें त्यजावें । घडे केवीं ४७ ना तरी तृप्ति इच्छिजे । तरी कैसेनि पाकु न कीजे । कीं सिध्दुही न सेविजे । केवीं सांगें ४८ जंव निरार्तता नाहीं । तंव व्यापारु असे पाहीं । मग संतुष्टीच्या ठायीं । कुंठे सहजें ४९ क्षणोनि आइकें पार्था । जया नैष्कर्म्यपदीं आस्था । तया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ५० आणि आपुलिये चाडे । आपादिलें हें मांडे । कीं त्यजिलें कर्म सांडें । ऐसें आहे ५१ हें वायांचि सैरा बोलिजे । उकलु तरी देखोनि पाहिजे । परी त्यजितां कर्म न त्यजे । निभ्रांत मानीं ५२

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् । कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥५॥

जंव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान । जे चेष्टा ते गुणाधीन । आपैसी असे ५३ देखें विहित कर्म जेतुलें । तें सळें जरी वोसंडिलें । तरी स्वभाव काय निमाले । इंद्रियांचे ५४ सांगें श्रवणीं ऐकावें ठेलें । कीं नेत्रींचें तेज गेलें । हें नासारंध्र बुझालें । परिमळु नेघे ५५ ना तरी प्राणापानगति । कीं निर्विकल्प जाहली मति । कीं क्षुधातृषादि आर्ति । खुंटलिया ५६ हे स्वप्नावबोधु ठेले । चरण चालों विसरले । हें असो काय निमाले । जन्ममृत्यू ५७ हें न ठकेचि जरी कांहीं । तरी सांडिलें तें कायी । म्हणोनि कर्मत्यागु नाहीं । प्रकृतिमंतां ५८ कर्म पराधीनपणें । निपजतसे प्रकृतिगुणें । येरीं

करून घेतलेल्या अन्नाच्या भोजनापासून जशी सारखीच तृप्ति होते, तसा ह्या दोन्ही मार्गाचा साक्षात् व परंपरेनें परिणाम एकच आहे. ३८ किंवा पूर्व पश्चिम दिशांकडे जाणाऱ्या नद्या पाहिल्या तर भिन्न दिसतात, परंतु समुद्रांत मिळण्याचे वेळीं अखेरीस त्या जशा एकत्र होतात, ३९ तशीं हीं दोन्हीं मतें एकच तत्त्वाचीं सूचक आहेत; परंतु त्यांची उपासना उपासकाच्या योग्यतेवर अवलंबून आहे. ४० असें पहा—पक्षी एका उड्डाणावरोबर झाडाच्या फळास धरतो; पण त्याच वेगानें मनुष्यास तें फळ कसें प्राप्त करून घेतां येईल सांग बरें? ४१ तो हळू हळू फांदीफांदीवरून तो मार्ग क्रमितां क्रमितां कांहीं वेळानें फळावर खरोखर जाऊन पोहोंचेल; ४२ त्याचप्रमाणें, ज्ञानमार्गाचें जे आचरण करितात, ते ज्ञानी विहंगममार्गानें तात्काल मोक्ष प्राप्त करून घेतात, ४३ इतर योगी कर्ममार्गानें (पिपीलिकामार्गानें) विहित वर्णाश्रमधर्मांचें आचरण करून परंपरेनें [ज्ञानोत्तरकालीं] मोक्ष प्राप्त करून घेतात. ४४

अन्वय—कर्मणाम् अनारंभात् पुरुषः नैष्कर्म्यं न अश्नुते कर्मणां च संन्यसनात् एव सिद्धिं न समधिगच्छति. ॥४॥

अर्थ—कर्मांचें आचरण न केल्यानें पुरुषाला कर्मशून्यत्व प्राप्त होत नाहीं, व केवळ कर्मसंन्यास केल्यानेंही सिद्धि प्राप्त होते असें नाहीं. ॥४॥

कोणीही मनुष्य आरंभापासूनच विहित कर्में टाकून जर ज्ञानवानाप्रमाणें नैष्कर्म्य होऊं ह्मणेल, तर निश्चयानें त्याला तसें होतां येणार नाहीं. ४५ अर्जुना, जीं ज्याला विहित कर्में करावयाचीं, तीं टाकल्यानें तो कृतार्थ होईल असें ह्मणणें हा निव्वळ मूर्खपणा होय. ४६ नदी दुथडी भरली आहे, व ती उतरून पलीकडे जाण्याची जेथें आवश्यकता आहे तेथें नावेशिवाय जाऊं म्हटलें तर कसें जातां येईल सांग बरें? ४७ किंवा भोजनापासून जो तृप्तीची इच्छा करतो, त्याला स्वयंपाक न करतां अथवा तयार असलेलें अन्न न खातां ती कशी प्राप्त होईल? ४८ जोंपर्यंत निरिच्छता प्राप्त झाली नाहीं, तोंपर्यंत खटपट ही आहेच; तीच प्राप्त झाली, ह्मणजे आत्मसंतोष होऊन खटपट साहजिकच थांबते. ४९ ह्मणून, पार्था, ज्याला परमात्मप्राप्तीची इच्छा आहे, त्याला विहित कर्माचरण कधींही सोडतां येत नाहीं; ५० आणि दुसरें असें कीं, आपल्या इच्छेनेंच कर्माचा स्वीकार व त्याग करूं ह्मटल्यानें तो होईल काय? ५१ हें बोलणें व्यर्थ बहकल्यासारखें आहे. ह्याचा नीट विचार करून पाहिला तर कर्म टाकल्यानें कर्माचा त्याग होत नाहीं असें पक्कें समज. ५२

अन्वय—कश्चित् जातु क्षणमपि अकर्मकृत् न हि तिष्ठति, सर्वः हि अवशः (सन्) प्रकृतिजैः गुणैः कर्म कार्यते. ॥५॥

अर्थ—कारण, कोणताही प्राणी कर्म केल्यावांचून एक क्षणभरही स्वस्थ असत नाहीं; प्रकृतीपासून उत्पन्न झालेले सत्त्वादिक गुण हे परतंत्र असलेल्या सर्वांकडून कर्में करवितात. ॥ ५ ॥

जोंपर्यंत मायेचा आश्रय आहे तोंपर्यंत मायेच्या सत्वादि गुणाच्या आधीन सर्व व्यापार असतात, म्हणून कर्म स्वीकारणें अगर टाकणें, हें बोलणें अज्ञानपणाचें आहे. ५३ असें पहा कीं, विहित कर्माचा आरंभ कर्त्याचे इच्छेवर अवलंबून आहे, म्हणून द्वेषानें किंवा त्रासानें जरी त्याग केला, तरी स्वाभाविक कर्म उत्पन्न करण्याचे इंद्रियांचे धर्म नष्ट होतील काय? ५४ सांग पाहूं; विहित कर्मत्याग केला म्हणून कानांचें ऐकणें बंद झालें? कां डोळ्यांची दृष्टि गेली? का नाकाची भोंकें बुजून जाऊन वास येईनासा झाला? ५५ किंवा प्राणापानवायूंची गति बंद झाली? का मन हें कल्पनारहित झालें? अथवा भूकतहान ह्यांची इच्छा नाहींशी झाली? ५६ का स्वप्न व जागृति ह्या अवस्था बंद झाल्या? किंवा पाय चालणें विसरले? इतकेंच नव्हे, तर जन्ममरण तरी चुकलें आहे काय? ५७ मग हे इंद्रियांचे व्यापार जर बंद रहात नाहींत, तर मग सोडलें तें काय? म्हणून, देहाभिमान्याकडून कर्मत्याग कधींही होणार नाहीं. ५८ कर्म हें पराधीन ह्मणजे मायेच्या गुणा-

धरीं मोकलीं अंतःकरणें । वाहिजे वायां ५९ देखें रथीं आरूढिन्ने । मग जरी निश्चळु बैसिजे । तरी चळु होऊनि हिंडिजे । परतंत्रा ६० कां उचलिलें वायुवशें । चळे शुष्क पत्र जैसें । निचेष्ट आकाशें । परिभ्रमें ६१ तैसें प्रकृतिआधारें । कर्मेंद्रियविकारें । नैष्कर्महीं व्यापारें । निरंतर ६२ म्हणऊनि संगु जंव प्रकृतीचा । तंववरी त्यागु न घडे कर्माचा । ऐसियाहि करूं म्हणती तयांचा । आग्रहोचि उरे ६३

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् । इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ६

जे उचित कर्म सांडिती । मग नैष्कर्म्य होऊं पाहती । परी कर्मेंद्रियप्रवृत्ती । निरोधुनी ६४ तयां कर्मत्यागु न घडे । जें कर्तव्य मनीं सांपडे । वरी नटती तें फुडें । दरिद्र जाण ६५ ऐसे ते पार्था । विषयासक्त सर्वथा । ओळखावे तत्त्वता । भ्रांति नाहीं ६६आतां देईं अवधान । प्रसंगें तुज सांगेन । या नैराश्याचें चिन्ह । धनुर्धरा६७

यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्याऽऽरभतेऽर्जुन । कर्मेंन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥७॥

जो अंतरीं दृढ । परमात्मरूपीं गूढ । बाह्य भागू तरी रूढ । लौकिक जैसा ६८ जो इंद्रियां आज्ञा न करी । विषयांचें भय न धरी । प्राप्त कर्म नाव्हेरी । उचित जें जें ६९ तो कर्मेंद्रियें कर्मीं । राहटतां तरी न नियमी । परी तेथिचेनि ऊर्मी । झांकोळेना ७० तो कामनामात्रें न घेपे । मोहमळें न लिंपें । जैसें जळीं जळें न शिंपे । पद्मपत्र ७१ तैसा संसर्गामाजि असे । सकळांसारिखा दिसे । जैसें तोयसंगें आभासे । भानुबिंब ७२ तैसा सामान्यत्वें पाहिजे । तरी साधारणुचि देखिजे । येरवीं निर्धारितां नेणिजे । सोय जयाची ७३ ऐशा चिन्हीं चिन्हितु । देखसी तोचि मुक्तु । आशापाशरहितु । वोळख पां ७४ अर्जुना तोचि योगी । विशेषिजे जो जगीं । म्हणोनि ऐसा होय यालागीं । म्हणिपें तूतें ७५ तूं मानसा नियमु करीं । निश्चळु होय अंतरीं । मग कर्मेंद्रियें व्यापारीं । वर्ततु सुखें ७६

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः । शरीरयात्राऽपि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥८॥

म्हणोनि नैष्कर्म्य होआवें । तरी एथ तें न संभवे । आणि निषिद्ध केवीं राहाटावें । विचारीं पां ७७ म्हणोनि जें जें उचित । आणि अवसरेंकरूनि प्राप्त । तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ७८ पार्था आणिकही एक । नेणसी तूं हें कवतिक । जें ऐसें कर्ममोचक । आपैसें असे ७९ देखें अनुक्रमाधारें । स्वधर्मु जो आचरे । तो मोक्षु तेणें व्यापारें । निश्चित पावे ८०

च्या आधीन असल्यामुळें मी कर्म करीन अगर सोडीन असें समजणें व्यर्थ होय. ५९ पहा कीं, रथांत बसल्यावर मग जरी स्तब्ध बसून राहिलें, तरी तो रथाच्या आधीन असल्यामुळें रथाचें फिरणें ह्मणजे ह्याचेंच फिरणें असें होतें; ६० किंवा झाडाचें वाळलेलें पान निश्चेष्ट असतांही ज्याप्रमाणें वायूच्या वेगानें उडून आकाशांत भ्रमण करितें, ६१ त्याप्रमाणें, मायेच्या आश्रयानें व कर्मेंद्रियांच्या विकारानें नैष्कर्म्य स्थितीला पोंचलेला पुरुषही नेहमीं शारीरिक कर्म करितो, ६२ ह्मणून, जोंपर्यंत मायेचा संबंध आहे, तोंपर्यंत कर्माचा त्याग केव्हांही घडणार नाहीं; असें असूनही जे कर्माचा त्याग करूं म्हणतात, त्यांचा तो रिकामा आग्रह मात्र उरतो. ६३

अन्वय–यः विमूढात्मा कर्मेंद्रियाणि संयम्य मनसा इंद्रियार्थान् स्मरन् आस्ते सः मिथ्याचारः उच्यते. ॥६॥

अर्थ–जो महामूर्ख पुरुष कर्मेंद्रियांचें संयमन करून इंद्रियांच्या विषयांचें चिंतन करीत राहतो, त्याला दांभिक–दुराचारी असें ह्मणतात. ॥६॥

विहित कर्माचा त्याग करून व कर्मेंद्रियांचा निग्रह करून एवढ्यानेंच जे पुरुष कर्मातीत होऊं इच्छितात, ६४ त्यांना कर्मत्याग घडत नाहीं. कारण, त्यांच्या मनामध्यें कर्तव्य शेष राहून कर्मातीत झाल्याचें वरवर दाखवितात, तें निव्वळ दरिद्रि आहे, ६५ पार्था, असे हे प्राणी नेहमीं विषयासक्त असतात असें निःसंशय जाण. ६६ आतां, अर्जुना, प्रसंगानुसार तुला खऱ्या निरिच्छ मनुष्याचीं लक्षणें सांगतों तीं लक्षपूर्वक ऐक. ६७

अन्वय–अर्जुन, यः तु इंद्रियाणि मनसा नियम्य असक्तः (सन्) कर्मेंद्रियैः कर्मयोगं आरभते, स विशिष्यते. ॥७॥

अर्थ–परंतु, अर्जुना, जो मनानें इंद्रियांचें नियमन करून आसक्ति न ठेवितां कर्मेंद्रियांनीं कर्मयोगाचें आचरण आरंभितो, तो खरा श्रेष्ठ होय. ॥७॥

जो अंतर्यामीं निश्चल व परमात्म्याचे ठिकाणीं तल्लीन, तथापि बाह्यात्कारीं लोकाचाराप्रमाणें वागणारा, ६८ तसाच जो इंद्रियांना आज्ञा करीत नाहीं, विषयांचीं भीति बाळगीत नाहीं, आणि ज्या ज्या वेळेस जीं जीं कर्मे करावयाचीं तीं कर्मे टाकीत नाहीं; ६९ कर्मेंद्रियांकडून कर्मे होत असतांना तो त्यांना आवरीत नाहीं, पण त्यांच्या विकारांच्या आधीन होत नाहीं. ७० तो वासनेनें आकळला जात नाहीं; व त्याच्या मनाला मोहाची बाधा होत नाहीं. कमळाचें पान जसें रात्रंदिवस पाण्यांत असून पाण्यानें भिजत नाहीं. ७१ त्याप्रमाणें, संसारामध्यें राहून तो इतर जनांसारखा दिसतो. ज्याप्रमाणें पाण्याच्या संगतीनें सूर्यबिंब पाण्यांत दिसतें. ७२ त्याप्रमाणें, वरकांती पाहतां तो मनुष्य साधारणसा दिसतो; बाकी निश्चयानें त्याची आत्मस्थिति ओळखतां येत नाहीं. ७३ अशा गुणांनीं जो युक्त असेल, व जो निरिच्छ असेल, तोच मुक्त असें तूं समज. ७४ अर्जुना, तोच योगी व तोच जगांत स्तुतीस पात्र असतो, म्हणून तूं असा हो असें मी तुला म्हणतों. ७५ तूं आपल्या मनाला आंवरून धर, व अंतर्यामीं स्थिरबुद्धि हो. (मग) कर्मेंद्रियें खुशाल आपापले व्यापार करोत. ७६

अन्वय–त्वं नियतं कर्म कुरु, अकर्मणः कर्म ज्यायः (अस्ति), ते शरीरयात्रा अपि च अकर्मणः न प्रसिद्धयेत्.

अर्थ–अरे, तूं विहित कर्माचें आचरण कर. कर्म न करण्यापेक्षां कर्म करणें हेंच श्रेयस्कर आहे. कर्म केल्यावांचून तुझ्या शरीराचा निर्वाह देखील होणार नाहीं. ॥८॥

म्हणून, कर्मरहित होणें हें ह्या संसारांत असंभवनीय आहे; मग शास्त्रविरुद्ध आचरण कां करावें, ह्याचा विचार कर. ७७ म्हणून, जें जें योग्य व समयानुसार प्राप्त झालेलें कर्म असेल, तें तें तूं निष्कामबुद्धीनें कर. ७८ अर्जुना, आणखी एक कौतुक तुला माहीत नाहीं; तें हें कीं, निष्काम बुद्धीनें केलेलें हें कर्म कर्मापासून म्हणजे संसारांतून सोडविणारें होतें. ७९ पहा–अधिकाराप्रमाणें स्वधर्माचें जो आचरण करतो, तो त्या आचरणानेंच निश्चयेंकरून मोक्ष पावतो. ८०

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः । तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥९॥

स्वधर्मु जो बापा । तोचि नित्ययज्ञु जाण पां । म्हणोनि वर्ततां तेथ पापा। संचारु नाहीं ८१ हा निजधर्मु जैं सांडे । आणि कुकर्मीं रति घडे । तैंचि बंधु पडे । संसारिक ८२ म्हणोनि स्वधर्मानुष्ठान । तें अखंड यज्ञ याजन । जो करी तया बंधन । कांहींच न घडे ८३ हा लोकु कर्मैं बांधिला । जो परतंत्राभूत झाला । तो नित्य यज्ञातें चुकला । म्हणोनियां ८४ आतां येचिविशीं पार्था। तुज सांगेन एक मी कथा । जैं सृष्ट्यादि संस्था । ब्रह्मेनें केली ८५

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः । अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥१०॥

तैं नित्ययागसहितें । सृजिलीं भूतें समस्तें । परी नेणतीचि तियें यज्ञातें। सूक्ष्म म्हणउनी ८६ ते वेळीं प्रजीं विनविला ब्रह्मा । देवा काय आश्रयो एथ आम्हां । तंव म्हणे तो कमळजन्मा । भूतांप्रति ८७ तुम्हां वर्णविशेषवशें । आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे । यातें उपासा मग आपैसे । पुरती काम ८८ तुम्ही व्रत नियमु न करावे । शरीरातें न पीडावें। दुरी केंही न वचावें। तीर्थांसी गा ८९ योगादिकें साधनें । साकांक्ष आराधनें । मंत्रयंत्रविधानें । झणीं करा ९० देवतांतरा न भजावें । हें सर्वथा कांहीं न करावें । तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ९१ अहेतुकें चित्तें । अनुष्ठा पां ययातें । पतिव्रता पतीतें । जियापरी ९२ तैसा स्वधर्मरूप मखु । हाचि सेव्यु तुम्हां एकु । ऐसें सत्यलोकनायकु । बोलता जाहला ९३ देखा स्वधर्मातें भजाल । तरी कामधेनु हा होईल । मग प्रजाहो न संडील । तुमतें कदा ९४

देवान्भावयताऽनेन ते देवा भावयंतु वः । परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥११॥

जैं येणेंकरूनि समस्तां । परितोषु होईल देवतां । मग ते तुम्हां ईप्सितां। अर्थांतें देती ९५ या स्वधर्मपूजा पूजितां । देवतागणां समस्तां । योगक्षेमु निश्चिता। करिती तुमचा ९६ तुम्ही देवांतें भजाल । देव तुम्हां तुष्टतील । ऐसी परस्परें घडेल । प्रीति जेथ ९७ तेथ तुम्ही जें करूं म्हणाल । तें आपैसें सिद्धी जाईल। वांछितही पुरेल । मानसींचें ९८ वाचासिद्धि पावाल । आज्ञापक होआल । म्हणिये तुमतें मागतील । महाऋद्धि ९९ जैसें ऋतुपतीचें द्वार । वनश्री निरंतर । वोळंगे फळभार । लावण्येसी १००

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः । तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः १२

अन्वय–यज्ञार्थात् कर्मणः अन्यत्र अयं लोकः कर्मबंधनः (अस्ति) कौंतेय, (त्वं) मुक्तसंगः (सन्) तदर्थं कर्म समाचर. ॥९॥

अर्थ–अर्जुना, ईश्वरार्पणबुद्धीवांचून [फलाच्या इच्छेनें] केलेल्या कर्माच्या योगानें हा जीव बांधला जातो; म्हणून, अर्जुना, कर्तेपणाचा अभिमान सोडून ईश्वरार्पणबुद्धीनें तूं कर्म कर. ॥९॥

बाबारे ! आपल्या धर्माप्रमाणें आचरण करणें हाच नित्ययज्ञ असें समज; म्हणून त्याप्रमाणें वर्तन केल्यावर त्यांत पापाचा रिघाव होत नाहीं. ८१ प्राणी जेव्हां हा स्वधर्म टाकतात आणि वाईट कर्माच्या ठिकाणीं प्रवृत्त होतात, तेव्हांच जन्ममरणाचे फेऱ्यांत पडतात. ८२ म्हणून स्वधर्माप्रमाणें आचरण करणें हाच अखंड यज्ञ असें समज; आणि जो पुरुष हा यज्ञ करतो, त्याला कांहीं सुद्धां बंधन होत नाहीं.८३ हें सर्व जग कर्मानें बांधलें जाऊन मायेचे पाशांत गुंतलें आहे, तें स्वकर्माला चुकलें म्हणूनच. ८४ पार्था; आतां तुला मी ह्याविषयीं एक कथा सांगतों. ज्या वेळेस ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण केली,

अन्वय–प्रजापतिः पुरा सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा ' अनेन (यूयं) प्रसविष्यध्वम् एषः वः इष्टकामधुक् (अस्तु)' इति उवाच ॥१०॥

अर्थ–सृष्टीच्या आरंभीं यज्ञासहवर्तमान प्रजा उत्पन्न करून ब्रह्मदेव त्यांना म्हणालाः–तुम्ही स्वधर्मरूप यज्ञानें धर्माचरण करा, ह्मणजे हा यज्ञ तुमचे इच्छित मनोरथ पूर्ण करील. ॥१०॥

त्या वेळेस प्राणी व त्यांनीं नित्य आचरण्याचे धर्म हीं दोन्ही बरोबर उत्पन्न केलीं; परंतु ते गहन असल्यामुळें प्राण्यांना समजले नाहींत; ८६ तेव्हां त्यांनीं ब्रह्मदेवाची प्रार्थना केली कीं, " देवा, ह्या ठिकाणीं आम्हांला काय तरणोपाय आहे ? " तेव्हां तो त्यांना म्हणालाः–८७ " तुमच्या वर्णाश्रमांप्रमाणें आम्हीं पूर्वीच धर्म नियमित केले आहेत, त्याप्रमाणें तुम्ही आचरण करा ह्मणजे तुमचे हेतु सहज पूर्ण होतील. ८८ तुम्ही व्रतवैकल्यें करूं नका, उपासतापास करून शरिरास कष्ट देऊं नका; व तीर्थयात्रांकरितां दूर जाण्याचे श्रम करूं नका; ८९ योगादिक साधनें, तसेंच कामनिक आराधना व मंत्रतंत्रादि अनुष्ठानें कदाचित् करण्याच्या नादीं लागाल हो ! तसेंच ९० इतर देवांस भजूं नका, व ह्या गोष्टी करूं नका. तर तुम्ही आपल्या वर्णाश्रमाप्रमाणें जो धर्म सांगितला आहे, त्याचें सुखानें आचरण करा. ९१ ज्याप्रमाणें पतिव्रता आपल्या पतीची सेवा निष्काम बुद्धीनें करिते, त्याप्रमाणें तुम्ही आपल्या स्वधर्माचें निष्काम बुद्धीनें आचरण करा " ९२ ब्रह्मदेव म्हणालेः–" स्वधर्माचें आचरण हाच एक तुमचा यज्ञ होय; म्हणून त्याचें आचरण करा. ९३" जनहो, असें पहा कीं, तुम्ही जर स्वधर्मानें वागाल तर तो कामधेनूसारखा फलद्रूप होऊन तुह्मांला कधींही अंतर देणार नाहीं९४

अन्वय–अनेन (यूयं) देवान् भावयत, ते देवाः वः भावयन्तु; (एवं) परस्परं भावयंतः परम् श्रेयः अवाप्स्यथ. ११

अर्थ–ह्या स्वधर्मरूप यज्ञानें तुम्ही देवांचें पूजन करा, ह्मणजे ते देव तुह्मांवर प्रसन्न होतील; व ह्याप्रमाणें तुम्ही परस्परांना संतुष्ट करून आपलें उत्तम कल्याण करून घ्याल ॥११

ह्या स्वधर्माच्या आचरणानें सर्व देवता संतोष पावतील,आणि मग त्या तुम्हांला,इच्छित फल देतील.९५ अशा रीतीनें स्वधर्माचरणरूप पूजेनें सर्व देवतागणांचें पूजन केलें असतां त्या तुम्हांस अप्राप्य वस्तूची प्राप्ति करून देऊन प्राप्त वस्तूचें संरक्षण निःसंशय करतील. ९६ तुम्ही देवांना भजाल तर देवही तुम्हांवर संतुष्ट होतील; आणि अशा प्रकारें एकमेकांचें एकमेकांवर जेव्हां प्रेम जडेल, ९७ तेव्हां तुम्हीं जें करूं म्हणाल तें सहज सिद्धीस जाईल;आणि तुमच्या मनांतील सर्व वासना पूर्ण होतील. ९८ वाणीनें बोलाल तें सिद्ध होईल, आणि तुम्ही दुसऱ्यांना आज्ञा करणारे व्हाल, व महाऋद्धि नेहमीं तुमच्या आज्ञेंत राहून ' सेवा घ्या ' असें म्हणतील. ९९ वसंत ऋतूचे द्वारांत ज्याप्रमाणें वनशोभा ही आपल्या फलपुष्पभाराच्या लावण्यानें निरंतर वास करिते, १००

अन्वय–देवाः यज्ञभाविताः (संतः) वः इष्टान् भोगान् दास्यंते. तैः दत्तान् [भोगान्] एभ्यः अप्रदाय यः भुंक्ते सः स्तेनः एव हि. ॥१२॥

अर्थ–यज्ञानें पूजन केलेले देव संतुष्ट होऊन तुह्मांस तुमचे इच्छित भोग देतील. देवतांनीं दिलेले भोग त्यांना अर्पण न करितां जो आपण स्वतः भोगतो, तो चोरच समजावा. ॥१२॥

तैसें सर्व सुखेंसहित । दैवचि मूर्तिमंत । येईल देखा काढत । तुम्हांपाठीं १ ऐसे समस्त भोगभरित । होआल तुम्ही अनार्त । जरी स्वधर्मेंनिरत । वर्ताल बापा २ कां जालिया सकल संपदा । जो अनुसरेल इंद्रियमदा । लुब्ध होऊनियां स्वादा । विषयांचिया ३ तिहीं यज्ञभाविकीं सुरीं । जे हे संपत्ति दिधली पुरी । तयां स्वधर्मीं सर्वेश्वरीं । न भजेल जो ४ अग्निमुखीं हवन । न करील देवतापूजन । प्राप्तवेळे भोजन । ब्राह्मणाचें ५ विमुख होईल गुरुभक्ती । आदर न करील अतिथी । संतोष नेदील ज्ञाती । आपुलिये ६ ऐसा स्वधर्मक्रियारहितु । आथिलेपणें प्रमत्तु । केवल भोगासक्तु । होईल जो ७ तया मग अपावो थोर आहे । जेणें तें हातींचें सकळ जाये । देखा प्राप्तही न लाहे । भोग भोगूं ८ जैसें गतायुषी शरिरीं । चैतन्य वासु न करी । कां निदैवाच्या घरीं । न राहे लक्ष्मी ९ तैसा स्वधर्मु जरी लोपला । तरी सर्व सुखांचा थारा मोडला । जैसा दीपासवें हरपला । प्रकाशु जाय ११० तैसी निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे । आइका प्रजाहो फुडें । विरंचि म्हणे ११ म्हणऊनि स्वधर्मु जो सांडील । तयातें काळु दंडील । चोरु म्हणूनि हरील । सर्वस्व तयाचें १२ मग सकळ दोषु भंवते । गिंवसोनि घेती तयातें । रात्रिसमयीं स्मशानातें । भूतें जैसीं १३ तैसीं त्रिभुवनींचीं दुःखें । आणि नानाविधें पातकें । दैन्यजात तितुकें । तेथेंचि वसे १४ ऐसें होय तया उन्मत्ता । मग न सुटे बापा रुदतां । कल्पांतींही सर्वथा । प्राणिगणहो १५ म्हणऊनि निजवृत्ति हे न संडावी । इंद्रियें बरळों नेदावीं । ऐसें प्रजांतें शिकवी । चतुराननु १६ जैसें जळचरा जळ सांडे । मग तत्क्षणीं मरण मांडे । हा स्वधर्मु तेणें पाडे । विसंबों नये १७ म्हणोनि तुम्हीं समस्तीं । आपुलालिया कर्मीं उचितीं । निरत व्हावें पुढतपुढती । म्हणिपत असें १८

यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः । भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥ १३ ॥

देखा विहित क्रियाविधि । निर्हेतुका बुद्धि । जो असतिये समृद्धि । विनियोगु करी १९ गुरु गोत्र अग्नि पूजी । अवसरीं भजे द्विजीं । निमित्तादिकीं यजी । पितरोद्देशें १२० या यज्ञक्रिया उचिता । यज्ञेशीं हवन करितां । हुतशेष स्वभावतः । उरे जें जें २१ तें सुखें आपुले घरीं । कुटुंबेसीं भोजन करी । कीं भोग्याचि तें निवारी । कल्मषातें २२ तें यज्ञावशिष्ट भोगी । म्हणोनि सांडिजे तो अघीं । जयापरी महारोगी । अमृतासिद्धि २३ कीं तत्त्वनिष्ठु जैसा । नागवे भ्रांतिलेशा ।

त्याप्रमाणें, तुम्ही जेथें असाल, तेथें सर्व सुखांसह मूर्तिमंत देव तुमचा शोध करीत येईल. १ बाबांनो ! जर तुम्ही एकनिष्ठेनें स्वधर्माचें आचरण कराल, तर तुम्ही ऐश्वर्ययुक्त होऊन तुम्हांला कसलीहि इच्छा राहणार नाहीं; २ सकल संपत्ति प्राप्त झाली असतां विषयसेवनाच्या गोडीला लंपट होऊन इंद्रियांच्या स्वैरवर्तनास अनुमोदन देईल, ३ यज्ञानें संतुष्ट झालेल्या देवांनीं जी ही आपल्यास पूर्ण संपत्ति दिली आहे, त्या संपत्तीनें व स्वधर्माचरणानें जो ईश्वरास भजणार नाहीं, ४ जो अग्नींत आहुति देणार नाहीं, देवतापूजन करणार नाहीं, यथाकालीं ब्राह्मणास भोजन घालणार नाहीं, ५ अथवा गुरुभक्तीला जो कंटाळेल, अतिथींचा आदरसत्कार करणार नाहीं, व आपल्या जातीस संतोष देणार नाहीं, ६ असा जो स्वधर्माचें आचरण करीत नाहीं, श्रीमंतीनें ज्याला गर्वाचा ताठा भरला आहे आणि जो केवळ विषयासक्त झाला आहे, ७ त्याला महत्संकटें येतात; त्या योगानें जवळ असलेलें ऐश्वर्य नाहींसें होतें, आणि असलेले भोग सुद्धां भोगवत नाहींत. ८ ज्याप्रमाणें, आयुष्य संपलेल्या शरीरांत जीव वास करीत नाहीं किंवा करंट्याचे घरीं लक्ष्मी रहात नाहीं, ९ त्याप्रमाणें, स्वधर्माचा लोप झाला ह्मणजे सुखाचें आश्रयस्थान नष्ट झालें म्हणून समजावें. दीप मालवतांक्षणींच जसा प्रकाश नाहींसा होतो, ११० त्याप्रमाणें, ब्रह्मदेव म्हणतो, " प्रजाजनहो ! जो आपापल्या वर्णाश्रमधर्माचें आचरण सोडतो, त्याचें स्वातंत्र्य खरोखर नष्ट होतें. ११ म्हणून, स्वधर्माचा जो त्याग करील, त्याला काळ शिक्षा करील, आणि हा चोर आहे असें समजून त्याच्या सर्वस्वाचें हरण करील. १२ मग, रात्र झाल्यावर स्मशानाला जशीं भूतें वेढतात, तशीं सर्व संकटें त्याच्याजवळ येऊन त्याला वेढतात. १३ तसेंच, त्रिभुवनांतील सर्व दुःखें, आणि हजारों प्रकारचीं पातकें, आणि झाडून सर्व दारिद्र्य हीं त्याचे ठिकाणीं वास करितात. १४ जनहो, ह्याप्रमाणें त्या उन्मत्त मनुष्याची स्थिति होते, आणि अशा दुःखांत प्राणी रडूं लागले तरी त्यांना कल्पांतींही दुःखें सोडीत नाहींत. " १५ ब्रह्मदेव प्रजेला असा बोध करतात कीं, " म्हणून आपला स्वधर्म सोडूं नका, आणि इंद्रियांना स्वैर वर्तन करूं देऊं नका. १६ ज्याप्रमाणें माशाला पाण्यांतून बाहेर काढण्याबरोबर लागलीच मृत्यु येतो त्याप्रमाणें तुमची स्थिति होईल, ह्मणून तुम्ही स्वधर्म विसरूं नका." १७ ब्रह्मदेव म्हणतोः–ह्मणून तुम्हीं सर्वांनीं आपापलें उचित कर्म आचरण्याविषयीं नेहमीं तत्पर रहावें. १८

अन्वय–यज्ञशिष्टाशिनः सन्तः सर्वकिल्बिषैः मुच्यंते; ये तु पापाः आत्मकारणात् पचन्ति ते तु अघं भुंजते. ॥१३॥

अर्थ–यज्ञाचा अवशिष्ट प्रसाद जे ग्रहण करितात, ते श्रेष्ठ पुरुष सर्व पापांपासून मुक्त होतात; पण जे पातकी प्राणी आपल्याकरितां पाक करून भोजन करितात, ते पातकच सेवन करितात. ॥१३॥

हें पहा–जो विहित कर्माचें निष्काम बुद्धीनें आचरण करण्यामध्यें असलेल्या संपत्तीचा विनियोग करतो, १९ आपले गुरु, आप्त व अग्नि ह्यांची पूजा करतो, आणि आलेल्या ब्राह्मणांची सेवा करतो, व आपल्या पितरांच्या श्राद्धतिथि वगैरे पाळतो, १२० आणि ह्याप्रमाणें विहित कर्माचरण व पंचमहायज्ञादि करून जें यज्ञशेष बाकी राहील २१ तें सुखानें आपण कुटुंबासह सेवन करतो, त्यांच्या सर्व पातकांचा त्या यज्ञशेषसेवनानेंच नाश होतो. २२ अमृताचें सेवन केल्यापासून ज्याप्रमाणें महारोगाचा नाश होतो, त्याप्रमाणें यज्ञावशिष्ट अन्नाचें सेवन केल्यानें पातकें त्याला सोडून जातात. २३ ज्याप्रमाणें ब्रह्मनिष्ठाला भ्रांतिलेशही

तो शेष भोगीं तैसा । नाकळे दोषा २४ म्हणोनि स्वधर्में जें अर्जे । तें स्वधर्मेंचि विनियोगिजे । मग उरे तें भोगिजे । संतोषेसीं २५ हें वांचूनि पार्था । राहाटों नये अन्यथा । ऐसी आद्य हे कथा । श्रीमुरारि सांगे २६ जे देहचि आपणपें मानिती । आणि विषयांतें भोग्य म्हणती । यापरतें न स्मरती । आणिक कांहीं २७ हें यज्ञोपकरण सकळ । नेणतसा ते बरळ । अहंबुद्धि केवळ । भोगूं पाहती २८ इंद्रियरुचीसारखे । करविती पाक निके । ते पापिये पातकें । सेविती जाण २९ हें संपत्तिजात आघवें । हवनद्रव्य मानावें । मग स्वधर्मयज्ञें अर्पावें । आदिपुरुषीं १३० हें सांडोनियां मूर्ख । आपणपेंयालागीं देख । निफजविती पाक । नानाविध ३१ जिहीं यज्ञु सिद्धी जाये । परेषा तोषु होये । तें हें सामान्य अन्न न होये । म्हणोनियां ३२ हें न म्हणावें साधारण । अन्न ब्रह्मरूप जाण । हें जीवनहेतु कारण । विश्वा यया ३३

अन्नाद्भवंतिभूतानि पर्जन्यादन्नसंभवः । यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् । तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

अन्नास्तव भूतें । प्ररोह पावती समस्तें । मग पर्जन्यु या अन्नातें । सर्वत्र प्रसवे ३४ तया पर्जन्या यज्ञीं जन्म । यज्ञातें प्रगटी कर्म । कर्मासि आदि ब्रह्म । वेदरूप ३५ तया वेदांतें परात्पर । प्रसवतसे अक्षर । म्हणऊनि हें चराचर । ब्रह्मबद्ध ३६ परी कर्माचिये मूर्ति । यज्ञीं अधिवासु श्रुति । ऐकें सुभद्रापति । अखंड गा ३७

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः । अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥१६॥

ऐशी हें आदि परंपरा । संक्षेपें तुज धनुर्धरा । सांगितली या अध्वरा । लागूनियां ३८ म्हणूनि समूळ हा उचितु । स्वधर्मरूप क्रतु । नानुष्ठी जो मत्तु । लोकीं इये ३९ तो पातकांची राशी । जाण भार भूमीसी । जो कुकर्में इंद्रियांसी । उपेगा गेला १४० तें जन्मकर्म सकळ । अर्जुना अति निष्फळ । जैसें कां अभ्रपटळ । अकाळींचें ४१ कां गळां स्तन अजेचे । तैसें जियालें देखें तयाचें । जया अनुष्ठान स्वधर्माचें । घडेचिना ४२ ह्मणोनि ऐकें पांडवा । हा स्वधर्मु कवणें न संडावा । सर्वभावें भजावा । हाचि एकु ४३ हां गा शरीर जरी जाहलें । तरी कर्तव्य वोघें आलें । मग उचित कां आपुलें । वोसंडावें ४४ परिसपां सव्यसाची । मूर्ति लाहोनि देहाची । खंती करिती कर्माची । ते गांवढे गा ४५

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः । आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥१७॥

आकलन करीत नाहीं, त्याप्रमाणें यज्ञ करून शेष राहिलेल्या अन्नाचें सेवन करणाऱ्याला दोष आकलन करीत नाहींत. २४ म्हणून, स्वधर्मानें संपादन केलेलें द्रव्य स्वधर्मानेंच खचावें आणि बाकी राहील त्याचा संतोषानें उपभोग घ्यावा. २५ भगवान श्रीकृष्ण सांगतातः-पार्था, अशी ही आद्यस्थिति आहे; ह्याशिवाय मनुष्यानें अन्य मार्गानें वागूं नये. २६ जे पुरुष आपल्या शरिरासच आत्मा असें मानतात, विषयांचें सेवन हीच भोग्यवस्तु असें मानून त्यांशिवाय दुसरें कांहीं जाणत नाहींत, २७ हें सर्व साहित्य यज्ञसंबंधी आहे हें न जाणून जे भ्रांतींत असतात, आणि अहंकारबुद्धीनें फक्त विषयोपभोगावरच ज्यांची दृष्टि असते, २८ जे आपणांस आवडणारीं उत्तम पक्कानें तयार करून आपणच त्यांचें सेवन करतात, ते पापी असून पातकांचेंच सेवन करतात असें जाण. २९ ही सर्व संपत्ति स्वधर्मरूप यज्ञाचें हवनद्रव्य आहे, असें समजून ती स्वधर्मयज्ञानेंच परमेश्वरास अर्पण करावी. १३० हें सर्व सोडून मूर्ख लोक आपल्या करिताच नानाप्रकारचे पदार्थ तयार करवितात. ३१ ज्या अन्नापासून यज्ञाची सिद्धि होते, आणि ईश्वर संतुष्ट होतो, तें हें अन्न सामान्य नाहीं; म्हणून, ३२ ह्या अन्नाला साधारण असें न समजतां तें ब्रह्मरूप आहे असें समज. कारण, सर्व जगाचें हें जीवित होय. ३३

अन्वय–अन्नात् भूतानि भवंति, पर्जन्यात् अन्नसंभवः (भवति), यज्ञात् पर्जन्यः भवति, यज्ञः कर्मसमुद्भवः (अस्ति). ॥ १४ ॥ (त्वं) कर्म ब्रह्मोद्भवं, ब्रह्म अक्षरसमुद्भवं विद्धि, तस्मात् सर्वगतं ब्रह्म यज्ञे नित्यं प्रतिष्ठितम् (अस्ति) ॥१५॥

अर्थ–अन्नापासून भूतें (प्राणी) उत्पन्न होतात; तें अन्न पर्जन्यापासून होतें; तो पर्जन्य यज्ञापासून होतो; व तो यज्ञ कर्मापासून उत्पन्न होतो; ॥१४॥ कर्म वेदापासून उत्पन्न होतें, व वेद परमेश्वरापासून उत्पन्न होतो, असें तूं समज; आणि ह्याकरितां, सर्वगत जो वेद तो स्वधर्मरूप यज्ञांत नित्य वास करितो.

अन्नापासून प्राणिमात्राची उत्पत्ति होते, आणि पर्जन्यापासून सर्व ठिकाणीं अन्न उत्पन्न होतें. ३४ त्या पर्जन्याची उत्पत्ति यज्ञापासून, आणि यज्ञाची कर्मापासून होते. कर्माची उत्पत्ति वेदरूप ब्रह्मापासून, ३५ आणि त्या वेदाची उत्पत्ति परमात्म्यापासून होते; म्हणून हें सर्व जगत् परमात्म्यापासून उत्पन्न झालेलें आहे. ३६ पण, हे सुभद्रापते, ऐकः कर्माची मूर्ति जो यज्ञ, त्यांत वेदरूपीब्रह्म निरंतर वास करितें. ३७

अन्वय–पार्थ, एवं प्रवर्तितं चक्रं यः इह न अनुवर्तयति सः अघायुः इंद्रियारामः (च) मोघं जीवति. ॥१६॥

अर्थ–पार्था, अशा प्रकारें चालू असलेल्या चक्राला अनुसरून जो ह्या लोकीं वागत नाहीं, त्याचें जिणें व्यर्थ होय. तो इंद्रियलंपट पातकी आपलें आयुष्य व्यर्थ घालवितो! ॥१६॥

ह्याप्रमाणें, धनुर्धरा, ह्या स्वधर्मरूप यज्ञाची मूळपीठिका तुला संक्षेपानें सांगितली. ३८ म्हणून, जो उन्मत्त पुरुष सर्व प्रकारें उचित अशा ह्या स्वधर्मरूप यज्ञाचें ह्या लोकीं आचरण करीत नाहीं, ३९ तसेंच, जो दुराचारी इंद्रियांना विषय पुरावेण्यांत काल घालवितो, तो पापराशी भूमीला केवळ भारभूत आहे असें समज. १४० ज्याप्रमाणें अकाली आकाशांत आलेले ढग निरुपयोगी असतात, त्याप्रमाणें, अर्जुना, त्या उन्मत्त मनुष्याची सर्व जन्मांतील कर्में निष्फल होत. ४१ ज्याला स्वधर्माचें अनुष्ठान घडत नाहीं, त्याचें जिणें शेळीच्या गळ्यांतील स्तनांप्रमाणें व्यर्थ होय. ४२ म्हणून, पांडवा, ऐक; हा स्वधर्म कोणी सोडूं नये, आणि सर्वभावानें ह्याचेंच आचरण करावें. ४३ पहा कीं, शरीर जरी प्राप्त झालें आहे, तरी पूर्वकर्तव्य कर्म हें ओघानें आलेंच, असें जर आहे तर आपलें उचित कर्म कां सोडावें? ४४ हे सव्यसाची, हा मनुष्यदेह प्राप्त झाला असतां उचीत कर्म करण्याची ज्यांना खंती येते, ते मूर्ख असें समज. ४५

अन्वय–यः तु मानवः आत्मरतिः एव स्यात् च आत्मतृप्तः (स्यात्) च आत्मनि एव संतुष्टः (स्यात् च) तस्य कार्यं न विद्यते. ॥१७॥

अर्थ–परंतु जो आत्म्याचेच ठिकाणीं रममाण झालेला आहे, व आत्मसुखानें तृप्त झाला असून आत्मानंदानेंच संतुष्ट आहे, त्याला कांहीं कर्तव्य उरत नाहीं. १७

देखें असतेनि देहधर्में । एथ तोचि एकु न लिंपे कर्में । जो अखंडित रमे । आपणपांचि ४६ जे तो आत्मबोधें तोषला । तरी कृतकार्यु देखें जाहला । ह्मणोनि सहजें सांडवला । कर्मसंगा ४७

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन । न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥१८॥

तृप्ति जालिया जैसीं । साधनें सरतीं आपैसीं । देखें आत्मतुष्टीं तैसीं । कर्में नाहीं ४८ जंववरी अर्जुना । तो बोधु भेटेना मना । तंवचि यया साधना । भजावें लागे ४९

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर । असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥१९॥

ह्मणऊनि तूं नियतु । सकळ कामरहितु । होऊनियां उचितु । स्वधर्में रहाटें ५० जे स्वधर्में निष्कामता । अनुसरले पार्था । ते कैवल्यपर तत्त्वता । पावले जगीं ५१

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः । लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥२०॥

देख पां जनकादिक । कर्मजात अशेख । न सांडितां मोक्षसुख । पावते जाहले ५२ याकारणें पार्था । होआवी कर्मीं आस्था । हे आणिकाही एका अर्था । उपकारेल ५३ जे आचरतां आपणपयां । देखी लागेल लोका यया । तरी चुकेल अपाया । प्रसंगेंचि ५४ देखें प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले । तयाही कर्तव्य असे उरलें । लोकांलागीं ५५ मार्गीं अंधासरिसा । पुढें देखणाही चाले जैसा । अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा । आचरोनि ५६ हां गा ऐसें जरी न कीजे । तरी अज्ञाना काय उमजे । तिहीं कवणेपरी जाणिजे । मार्गातें या ५७

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥२१॥

एथ वडील जें जें करिती । तया नाम धर्मु ठेविती । तेंचि येर अनुष्ठिती । सामान्य सकळ ५८ हें ऐसें असे स्वभावें । ह्मणोनि कर्म न संडावें । विशेषें आचरावें । लागे संतीं ५९

न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥२२॥

आतां आणिकाचिया गोठी । कायेशा सांगों किरीटी । देखें मीचि इये राहाटी । वर्तत असें १६० काय सांकडें कांहीं मातें । कीं कवणें एकें आर्तें । आचरें मी धर्मातें । म्हणसी जरी ६१ तरी पुरतेपणालागीं । आणिकु दुसरा नाहीं जगीं । ऐसी सामग्री माझ्या अंगीं । जाणसी तूं ६२ मृत गुरुपुत्र आणिला । तो तुवां पवाडा देखिला । तोही मी उगला । कर्मीं वर्तें ६३

हें पहा, जो पुरुष आत्मस्वरूपामध्यें निमग्न आहे, तो मात्र देहधर्मांत असूनही कर्मानें लिप्त होत नाहीं. ४६ कारण, तो आत्मबोधानें संतोष पावलेला असल्यामुळें कृतकार्यच झालेला असतो, ह्मणून सहजीच कर्मसंगापासून मुक्त होतो. ४७

अन्वय–इह तस्य कृतेन अर्थः न एव, अकृतेन (अपि कश्चन (अर्थः) न, सर्वभूतेषु च अस्य कश्चित् अर्थव्यपाश्रयः न. १८

अर्थ–ह्या लोकीं कर्म केल्यापासून त्याला मुळींच कांहीं लाभ नसतो. तसेंच कर्म न केल्यापासूनही त्याची कांहीं हानि होत नाहीं; व कोणत्याही प्राण्यापासून त्याचें कसलेंही कार्य साधावयाचें नसतें. ॥१८॥

ज्याप्रमाणें तृप्ति झाल्यावर तिचीं साधनेंही आपोआप संपतात, त्याप्रमाणें स्वस्वरूपानंदांत निमग्न झाल्यावर कर्मेंही उरत नाहींत. ४८ अर्जुना, जोंपर्यंत अशा प्रकारचें आत्मज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत ह्या साधनाचें आचरण करावें लागतें. ४९

अन्वय–तस्मात् (त्वं) असक्तः (सन्) सततं कार्यं कर्म समाचर. पूरुषः हि असक्तः (सन्) कर्म आचरन् परं आप्नोति. १९

अर्थ–ह्या कारणास्तव, फलाची इच्छा टाकून तूं नेहमीं विहित कर्म कर. कारण, फलाविषयीं निष्काम असणारा पुरुष (विहित) कर्माच्या आचरणानें–चित्तशुद्धीमुळें–परमपद प्राप्त करून घेतो. ॥१९॥

म्हणून, नेहमीं फलाची आशा सोडून देऊन तूं उचित अशा आपल्या धर्माचें आचरण कर. १५० पार्था, ह्या जगांत खरोखर ज्यांनीं स्वधर्माचें आचरण निष्कामबुद्धीनें केलें ते मोक्षपदास गेले. ५१

अन्वय–जनकादयः कर्मणा एव संसिद्धिं आस्थिताः हि, (त्वं) अपि लोकसंग्रहं एव संपश्यन् (कर्म) कर्तुं अर्हसि. २०

अर्थ–जनकादिक ज्ञानी कर्मच करून मुक्त झाले; आणि लोकहिताकडे लक्ष देऊन तुलाही कर्मच करणें योग्य आहे. ॥२०॥

हें पहा—कर्माचा मुळींच त्याग न करितां सनकादिक मोक्षपदास गेले. ५२ ह्याकरितां, पार्था, कर्माचे ठिकाणीं तूं आस्था ठेव. कारण त्यापासून आणखीही एक उपयोग होणार आहे; ५३ त्या कर्माचें आपल्याकडून तसें आचरण झालें असतां ह्या लोकांना वळण लागेल, आणि त्यामुळें त्यांचीं दुःखें अनायासें नाहींतशीं होतील. ५४ असें पहा कीं, जे कृतार्थ होऊन निष्काम झाले आहेत, त्यांनाही लोकांवर उपकार करण्याचें कर्तव्य राहिलेंच आहे. ५५ अंधळ्यांच्या रांगेंतील पुढारी डोळस मनुष्य जसा त्यांच्याप्रमाणेंच मार्ग चालतो, त्याप्रमाणें ज्ञान्यांनीं स्वतः धर्माचें आचरण करून अज्ञानी जनांस धर्माचे मार्गास लावावें. ५६ अरे, जर ज्ञान्यांनीं अशा प्रकारचें वर्तन केलें नाहीं, तर अज्ञानी लोकांस कसें वळण लागेल? आणि त्यांना हा मार्ग कोणच्या उपायानें समजेल? ५७

अन्वय–यत् यत् श्रेष्ठः आचरति, तत् तत् एव इतरः जनः (आचरति; सः यत् प्रमाणं कुरुते, लोकः तत् अनुवर्तते. २१

अर्थ–श्रेष्ठ पुरुष जें जें कर्म आचरण करितो, तें तेच कर्म इतर लोक करितात; आणि तो पुरुष जे प्रमाण ठरवितो, त्याचेंच लोक अनुकरण करितात. ॥२१॥

ह्या लोकीं श्रेष्ठ लोक जें आचरण करतात, त्यालाच धर्म असें नांव ठेवून इतर सर्व लोक त्याचेंच आचरण करितात. ५८ ही गोष्ट साहजिक असल्यामुळें, कर्माचा त्याग करितां येत नाहीं; आणि साधुसंतांना तर कर्माचें आचरण विशेषेंकरून करावें लागतें. ५९

अन्वय–पार्थ, (यद्यपि) मे त्रिषु लोकेषु किंचन कर्तव्यं न अस्ति अनवाप्तं अवाप्तव्यं च न (अस्ति, तथापि) अहं कर्मणि वर्ते एव. ॥२२॥

अर्थ–पार्था, त्रैलोक्यामध्यें मला कांहीं करावयाचें आहे, अथवा कांहीं अप्राप्य प्राप्त करून घ्यावयाचें आहे, असें नाहीं; तथापि (लोकसंग्रहाकरितां) मी कर्म करितोंच. ॥२२॥

अर्जुना, आतां, फार लांब दुसऱ्याच्या गोष्टी कशाला सांगत बसूं, मीच या धर्माचरणांत वागत आहे. १६० आतां, मला कांहींतरी एकादें संकट पडलें असेल, किंवा कोणती तरी इच्छा असेल, म्हणून मी स्वधर्माचें आचरण करितों असें जर तूं म्हणशील, ६१ तर ह्या जगांत माझ्याइतका गुण व ऐश्वर्य ह्यांनीं संपन्न दुसरा कोणीं नाहा, हें माझें सामर्थ्य तुला माहीत आहेच; ६२ सांदीपनि गुरूचा मेलेलाही मुलगा आणून दिला, तो पराक्रम तूं पाहिलास; पण असाही जो निरिच्छ, तो सुद्धां कर्ममार्गाचें मुकाट्यानें आचरण करीत आहें. ६३

यदि ह्यहं न वर्तेय जातु कर्मण्यतंद्रितः । मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥२३॥

परी स्वधर्मीं वर्तें कैसा । साकांक्षु कां होय जैसा । तयाचि एका उद्देशा- लागोनियां ६४ जे भूतजात सकळ । असे आम्हांचि आधीन केवळ । तरी न व्हावें बरळ । ह्मणोनियां ६५

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् । संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः २४

आम्ही पूर्णकाम होउनी । जरी आत्मस्थिती राहुनी । तरी प्रजा हे कैसेनि । निस्तरेल ६६ इहीं आमुची वास पाहावी । मग वर्ततीपरी जाणावी । ते लोक-स्थिति आघवी । नासिली होईल ६७ ह्मणोनि समर्थु जो एथें । आथिला सर्व-ज्ञते । तेणें सविशेषें कर्मातें । त्यजावें ना ६८

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत । कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥

देखें फळाचिया आशा । आचरे कामुकु जैसा । कर्मीं भरू होआवा तैसा । निराशाही ६९ जे पुढतपुढती पार्था । हे सकळ लोकसंस्था । रक्षणीय सर्वथा । ह्मणऊनियां १७० मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरे लावावें । अलौलिका नोहावें । लोकांप्रति ७१

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् । जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥२६॥

जें सायासें स्तन्य सेवी । तें पक्कान्नें केवीं जेवी । ह्मणोनि बाळका जैसीं नेदावीं । धनुर्धरा ७२ तैसी कर्मीं जया अयोग्यता । तयाप्रति नैष्कर्म्यता । न प्रगटावी खेळतां । आदिकरुनी ७३ तेथें सत्क्रियाचि लावावी । तेचि एकी प्रशं-सावी । नैष्कर्मीही दावावी । आचरोनि ७४ तया लोकसंग्रहालागीं । वर्ततां कर्मसंगीं । तो कर्मबंधु आंगीं । वाजेलना ७५ जैसी बहुरूपियांची रावो राणी । स्त्रीपुरुषभावो नाहीं मनीं । परी लोकसंपादणी । तैसीच करिती ७६

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः । अहंकारविमूढात्मा कर्ताऽहमिति मन्यते ॥२७॥

देखें पुढिलाचें वोझें । जरी आपुला माथां घेइजे । तरी सांगें कां न दा-टिजे । धनुर्धरा ७७ तैसीं शुभाशुभें कर्में । जियें निफजती प्रकृतिधर्में । तियें मूर्ख मतिभ्रमें । मी कर्ता म्हणे ७८ ऐसा अहंकारादि रूढ । एकदेशी मूढ । तया हा परमार्थ गूढ । प्रगटावा ना ७९ हें असो प्रस्तुत । सांगिजेल तुज हित । तें अर्जुना देऊनि चित्त । अवधारीं पां १८०

अन्वय–यदि हि अहं अतंद्रितः (सन्) कर्मणि जातु न वर्तेय, (तर्हि) पार्थ, मनुष्याः सर्वशः मम वर्त्म अनुवर्तंते. (तेऽपि कर्म न कुर्युः). ॥२३॥

अर्थ–पार्था, जर मी आळस टाकून कर्माचें कधींही आचरण करणार नाहीं, तर हे सर्व लोक सर्वांशीं माझ्या मार्गाला अनुसरून चालू लागतील. (तेही कर्म करणार नाहींत.)

परंतु त्या एका लोककल्याणाच्या उद्देशानेंच मी स्वधर्माचें आचरण कशा प्रकारें करितों, कीं जसा कांहीं सकाम पुरुषच ! ६४ कारण, सर्व प्राणी आमच्यावर अवलंबून आहेत, तेव्हां त्यांनीं कर्मभ्रष्ट होऊं नये. ६५

अन्वय–अहं कर्म न कुर्यां चेत् इमे लोकाः उत्सीदेयुः, संकरस्य कर्ता स्यां, इमाः च प्रजाः उपहन्याम्. ॥२४॥

अर्थ–जर मी कर्म करणार नाहीं, तर सर्व प्रजांचा नाश केल्याचा दोष मलाच लागेल; प्रजांचा वर्णसंकर मीच केलासें होईल; व सर्व लोकांना मारणारा मीच होईन !२४

आम्ही निष्काम होऊन आत्मानंदामध्येंच राहिलों आणि धर्माचरण न केलें, तर प्रजेचा तरुणोपाय कसा होईल ? ६६ वास्तविक संप्रदाय असा कीं, लोकांनीं आमच्या वर्तनाकडे पाहून धर्माच्या वागणुकीचे प्रकार समजून घ्यावे, ही जी लोकांची राहाटी आहे, ती आम्हीं धर्माचरण न केलें तर बिघडून जाईल. ६७ म्हणून, जो समर्थ व सर्वज्ञानसंपन्न असेल, त्यानें विशेषेंकरून कर्माचा त्याग कधींही करूं नये. ६८

अन्वय–भारत, अविद्वांसः यथा कर्मणि सक्ताः (सन्तः कर्म) कुर्वन्ति, तथा लोकसंग्रहं चिकीर्षुः विद्वान् (कर्मणि) असक्तः (सन् कर्म) कुर्यात्. ॥२५॥

अर्थ–हे भारता, जसे अविद्वान् लोक कर्मफलाच्या ठिकाणीं सक्त होऊन कर्म करितात, तसें विद्वानांनी लोकसंग्रहार्थ फलाची इच्छा न धरितां कर्म करावें.॥२५॥

फलाची इच्छा करणारा पुरुष ज्याप्रमाणें कर्माचरण करितो, त्याप्रमाणें ज्ञानवानानेंही कर्माचरणांत विशेष भर ठेविला पाहिजे. ६९ कारण, पार्था, पुढें होणाऱ्या लोकसमुदायाचें रक्षण करणें अवश्य आहे म्हणून. १७० थोरांनीं सन्मार्गानें वागून लोकांची धर्माचरणाकडे दिशा लावावी, परंतु आपण स्वर्गादि लोकप्राप्तीविषयीं आसक्ति ठेवूं नये. ७१

अन्वय–विद्वान् कर्मसंगिनां अज्ञानां न बुद्धिभेदं जनयेत् (किंतु) युक्तः समाचरन् सर्वं कर्माणि जोषयेत्. ॥२६

अर्थ–विद्वान् मनुष्य नें फलाच्या आशेनें कर्म करणाऱ्या अज्ञानी लोकांचा बुद्धिभेद करूं नये; तर उलट त्या कर्माचें आपण निष्कामबुद्धीनें आचरण करून त्यांना कर्म करण्याविषयीं अभिरुचि उत्पन्न करावी. ॥२६॥

त्याचप्रमाणें कर्माचरणें करून चित्तशुद्धि होण्याचे पूर्वी त्यांना नैष्कर्म ब्रह्मस्थितीचेंही ज्ञान सांगूं नये. कारण, धनुर्धरा, जें मूल स्तनपान देखील मोठ्या अयासानें करितें, तें पक्कानें कसें बरें खाणार? ह्मणून त्याला ज्याप्रमाणें तीं देऊं नये, ७२ त्याचप्रमाणें कर्माचरण करण्यासही जो अनधिकारी आहे, त्याला ज्ञानमार्गाची थोरवी थेटेंत सुद्धां सांगूं नये. ७३ त्याला सत्कर्माचेंच आचरण करण्यास लावावें, सत्कर्माचीच प्रशंसा करावी, आणि निष्काम झालेल्या पुरुषांनींही सत्कर्म आचरण करून दाखवावें. ७४ वर्णाश्रमधर्मरक्षणाकरितां कर्ममार्गाचें आचरण करीत असतां त्यांना कर्मसंबंध भोगावा लागणार नाहीं. ७५ बहुरूप्यांनीं जरी राजाराणीची सोंगें घेतलीं, तरी त्यांच्या मनांत स्त्रीपुरुषभाव मुळींच नसतो; पण लोकांना दाखविण्याकरितां ते तसेच वागतात. ७६

अन्वय–प्रकृतेः गुणैः सर्वशः (अपि) कर्माणि क्रियमाणानि (सन्ति), अहंकारविमूढात्मा ' अहं कर्ता ' इति मन्यते. ॥२७॥

अर्थ–सर्व कर्में सर्व प्रकारें प्रकृतीच्या गुणांनीं होत असूनही, अहंकारानें ज्याचें मन मोहित झालें आहे असा मनुष्य तीं कर्में 'मीं केलीं' असें मानितो. २७

आतां तींच कर्में अज्ञान्यास कशीं बाधक होतात असें म्हणशील तर–अर्जुना, असें पहा कीं, दुसऱ्याचें ओझें आपल्या डोक्यावर जर घेतलें, तर आपली मान का अवघडणार नाहीं ? ७७ प्रकृतीचे गुण, जीं बरीं वाईट कर्में उत्पन्न करितात, तीं बुद्धिभ्रंशामुळें मूर्ख होऊन मींच केलीं असें म्हणतों. ७८ अशा रीतीनें साडेतीन हात देहाचाच अभिमान धारण करणाऱ्या पुरुषाला हा नैष्कर्म स्थितीचा परमार्थ प्रकट करूं नये. ७९ कारण अनधिकारामुळें परमार्थ तत्त्व कळणार नाहीं आणि कर्मापासूनही भ्रष्ट होईल.–असो. अर्जुना, हें राहूं दे. प्रस्तुत तुझें हीत कशांत आहे, तें तुला सांगतों, लक्ष देऊन ऐक. ८०

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः । गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते ॥२८॥

जे तत्त्वज्ञानियांच्या ठायीं । तो प्रकृतिभावो नाहीं । जेथ कर्मजात पाहीं । निफजत असे ८१ ते देहाभिमानु सांडुनी । गुणकर्मे वोलांडुनी । साक्षिभूत होउनी । वर्तती देहीं ८२ म्हणूनि शरीरीं जरी होती । तरी कर्मबंधा नातळती । जैसा कां भूतचेष्टा गभस्ती । घेपवेना ८३

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जंते गुणकर्मसु । तानकृत्स्नविदो मंदान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥२९॥

एथ कर्मीं तोचि लिंपे । जो गुणसंभ्रमें घेपे । प्रकृतीचेनि आटोपें । वर्ततु असे ८४ इंद्रियें गुणाधारें । राहाटती निजव्यापारें । तें परकर्म बलात्कारें । आपादी जो ८५

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा । निराशीर्निर्ममो भूत्वा युद्धचस्व विगतज्वरः ३०

तरी उचितें कर्में आघवीं । तुवां आचरोनि मज अर्पावीं । परी चित्तवृत्ति न्यासावी । आत्मरूपीं ८६ आणि हें कर्म मी कर्ता । कां आचरेन या अर्था । ऐसा अभिमानु झणें चित्ता । रिघों देसी ८७ तुवां शरीरपरा नोहावें । कामनाजात सांडावें । मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ८८ आतां कोदंड घेऊनि हातीं । आरूढ पां इयें रथीं । देईं आलिंगन वीरवृत्ती । समाधानें ८९ जगीं कीर्ति रूढवीं । स्वधर्माचा मानु वाढवीं । इया भारापासोनि सोडवीं । मेदिनी हे १९० आतां पार्था निःशंकु होईं । या संग्रामा चित्त देईं । एथ हेंवांचूनि कांहीं । बोलों नये९१

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठंति मानवाः । श्रद्धावंतोऽनसूयंतो मुच्यंते तेऽपि कर्मभिः ॥३१॥

हें अनुपरोध मत माझें । जिहीं परमादरें स्वीकारिजे । श्रद्धापूर्वक अनुष्ठिजे । धनुर्धरा ९२ तेही सकळ कर्मीं वर्ततु । जाण पां कर्मरहितु । म्हणोनि हें निश्चितु । करणीय गा ९३

ये त्वेतदभ्यसूयंतो नानुतिष्ठंति मे मतम् । सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥३२॥

नातरी प्रकृतिमंतु होउनी । इंद्रियां लळा देउनी । जे हें माझें मत अव्हेरुनी । ओसंडिती ९४ जे सामान्यत्वें लेखिती । अवज्ञा करूनि देखिती । कां हा अर्थवादु म्हणती । वाचाळपणें ९५ ते मोहमदिरा भुलले । विषयविखें घारले । अज्ञानपंकीं बुडाले । निभ्रांत मानीं ९६ देखें शवाच्या हातीं दिधलें । जैसें कां रत्न वायां गेलें । नातरी जात्यंधा पाहलें । प्रमाण नोहे ९७ कां चंद्राचा उदयो जैसा । उपयोगा नवचे वायसा । मूर्खा विवेकु हा तैसा । रुचेल ना ९८ तैसे जे पार्था । विमुख या परमार्था । तयांसी संभाषण सर्वथा । करा-

अन्वय–महाबाहो, गुणकर्मविभागयोः तत्त्ववित् तु गुणाः गुणेषु वर्तन्ते इति मत्वा न सज्जते. ॥२८॥

अर्थ–हे महाबाहो, गुणकर्मांच्या विभागांचें तत्त्व जाणणारा पुरुष तर, गुण हे गुणांचे ठिकाणीं ह्मणजे इंद्रियें हीं विषयांचे ठिकाणीं राहतात, असें मानून गुणकर्मांच्या ठिकाणीं आसक्त होत नाहीं. ॥२८॥

ज्या ठिकाणीं सर्व कर्म उत्पन्न होतें, तो प्रकृतीचा विकार ज्ञान्यांचे ठिकाणीं मुळींच नसतो. ८१ ते ज्ञानी देहाचा अभिमान सोडून व गुणकर्मातीत होऊन देहांत फक्त साक्षित्वानें वागतात. ८२ म्हणून सूर्य ज्याप्रमाणें जगतावर प्रकाश पाडीत असून जगाच्या कर्मांनीं लिप्त होत नाहीं, त्याप्रमाणें, ते जरी देह धारण करितात, तरी देहकर्मांनीं बद्ध होत नाहींत. ८३

अन्वय–प्रकृतेः गुणसंमूढाः गुणकर्मसु सज्जन्ते, कृत्स्नवित् तान् अकृत्स्नविदः मन्दान् न विचालयेत्. ॥२९॥

अर्थ–प्रकृतीच्या गुणांनीं जे मोहित झाले आहेत, ते गुणांनीं केलेल्या कर्मांच्या ठिकाणीं सक्त होतात. अशा मंदबुद्धि व अल्पज्ञ लोकांचा ज्ञानी पुरुषानें बुद्धिभेद करूं नये. ॥२९॥

प्रकृतीच्या आधीन होऊन जो वागतो, व गुणांच्या सपाट्यांत सांपडतो, तोच कर्मानें लिप्त होतो. ८४ इंद्रियें गुणांच्या आधीन होऊन आपआपल्या व्यापारांत वर्तत असतां, तें दुसऱ्याचें कर्म 'मीच करतों' असें तो मुद्दाम अंगावर घेतो. ८५

अन्वय–मयि सर्वाणि कर्माणि अध्यात्मचेतसा संन्यस्य निराशीः निर्ममः विगतज्वरः भूत्वा युद्ध्यस्व. ॥३०॥

अर्थ–अर्जुना, माझ्या ठायीं विचारपूर्वक सर्व कर्मे अर्पण कर; कर्मफलाचे ठिकाणीं आशा धरूं नको; कर्तेपणाचा अभिमान सोड; आणि शोकरहित होऊन युद्ध कर. ॥३०॥

ह्मणून, सर्व विहित कर्मांचें आचरण करून त्वां तीं मला अर्पण करावीं, पण चित्तवृत्ति मात्र सदैव आत्मस्वरूपीं ठेवावी. ८६ ह्या कर्मांचा मी कर्ता आहें आणि अमुक फलासाठीं हें मी करीत आहें, असा अभिमान तूं आपल्या चित्तांत उत्पन्न होऊं देशील हो, ८७ तूं शरिराच्या स्वाधीन न होतां सर्व इच्छा सोडून दे, आणि मग सकल भोग यथाकालीं भोग. ८८ एवढ्याकरितां आतां हातांत धनुष्य घेऊन ह्या रथावर बैस, आणि आनंदानें वीरवृत्तीचा स्वीकार कर. ८९ जगांत तूं आपली कीर्ति वाढीव, स्वधर्माचा महिमा वाढीव; आणि दुर्योधनादिक दुष्टांच्या भारापासून ह्या पृथ्वीला सोडीव. १९० पार्था, आतां तूं निःशंक होऊन ह्या युद्धाचे ठिकाणीं लक्ष दे; ह्याशिवाय दुसरें कांहीं बोलूं नको. ९१

अन्वय–ये मानवाः श्रद्धावंतः अनसूयन्तः (संतः) इदं मे मतं नित्यं अनुतिष्ठन्ति, ते अपि कर्मभिः मुच्यन्ते ॥३१॥

अर्थ–जे लोक श्रद्धेनें व धिक्कार न करितां माझ्या ह्या मताचें नेहमीं अनुष्ठान करितात, ते देखील कर्मबंधापासून मुक्त होतात. ॥३१॥

अर्जुना, ह्या माझ्या अबाधित मताचा जे मोठ्या आदरानें स्वीकार करून त्याचें श्रद्धापूर्वक आचरण करतील, ९२ ते सकल कर्मांचें आचरण करून कर्मरहित आहेत असें जाण. म्हणून, हें माझें मत निश्चयानें आचरण्यास योग्य आहे. ९३

अन्वय–ये तु एतत् अभ्यसूयंतः (संतः) मे मतं न अनुतिष्ठंति, तान् सर्वज्ञानविमूढान् अचेतसः नष्टान् विद्धि.

अर्थ–जे ह्या माझ्या मताची निंदा करून त्याचें अनुष्ठान करीत नाहींत, ते लोक, सर्व ज्ञानविहीन, मूर्ख, चित्तभ्रष्ट व नष्ट झाले असें जाण. ॥३२॥

नाहीं तर, देहाचे पाशांत गुंतून व इंद्रियांचे लाड पुरवून जे माझे मताचा तिरस्कार करून, टाकून देतात, ९४ जे त्याला सामान्य समजतात, व त्याची थट्टा करितात, किंवा वाचाळपणें ती व्याजस्तुति आहे असें म्हणतात, ९५ ते मोहरूपी मद्यपान करून भुललेले व विषयरूप विषानें व्यापलेले आणि अज्ञानरूपी चिखलांत रुतलेले आहेत असें निःसंशय समज. ९६ पहा कीं, प्रेताच्या हातीं परीक्षकरितां दिलेलें रत्न जसें वायां जातें, किंवा, जो जन्मापासून अंधळा आहे त्यानें दिवस उगवला असें जर म्हटलें तर त्याचें बोलणें जसें लोक खरें मानीत नाहींत, ९७ अथवा चंद्रप्रकाश ज्याप्रमाणें कावळ्याच्या उपयोगीं पडत नाहीं, त्याप्रमाणें, जे मूर्ख आहेत त्यांना हा विचार रुचत नाहीं. ९८ तसेंच, पार्था, जे जन ह्या परमार्थाविषयीं बहिर्मुख आहेत, त्यां-

वेना ९९ ह्मणोनि ते न मानिती। आणि निंदाही करूं लागती। सांगें पतंगु काय साहती। प्रकाशातें २०० पतंगा दिपीं आलिंगन। तेथ त्यासी अचुक मरण। तेवीं विषयाचरण। आत्मघाता १

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि। प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥३३॥

ह्मणोनि इंद्रियें एकें। जाणतेनि पुरुखें। लाळावीं ना कौतुकें। आदिकरुनी २ हां गा सर्पेसीं खेळों येईल। कीं व्याघ्रसंसर्ग सिद्धि जाईल। सांगें हाळाहाळ जिरेल। सेविलिया काई ३ देखें खेळतां अग्नि लागला। मग तो न सांवरे जैसा उधवला। तैसा इंद्रियां लळा दिधला। भला नोहे ४ एऱ्हवीं तरी अर्जुना। या शरीरा पराधीना। कां नाना भोगरचना। मेळवावी ५ आपण सायासेंकरूनि बहुतें। सकऱ्हही समृद्धिजातें। उदोअस्तु या देहातें। प्रतिपाळावें कां ६ सर्वस्वें शिणोनि एथें। अर्जवावीं संपत्तिजातें। तेणें स्वधर्मु सांडूनि देहातें। पोखावें काई ७ मग हें तंव पांचमेळावा। शेखीं अनुसरेल पंचत्वा। ते वेळीं केला कें गिंवसावा। शीणु आपुला ८ ह्मणूनि केवळ देहभरण। ते जाणें उघडी नागवण। यालागीं एथ अंतःकरण। देयावेंना ९

इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ। तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥३४॥

एऱ्हवीं इंद्रियांचिया अर्था-। सारिखा विषयो पोखितां। संतोषु कीर चित्ता आपजेल २१० परी तो संवचोराचा सांगातु। जैसा नावेक स्वस्थु। जंव नगराचा प्रांतु। सांडिजेना ११ बापा विषाची मधुरता। झणें आवडी उपजे चित्ता। परी तो परिणामु विचारितां। प्राणु हरी १२ देखें इंद्रियीं कामु असे। तो लावी सुखदुराशे। जैसा गळीं मीनु आमिषें। भुलविजे गा १३ परी तयामाजी गळु आहे। जो प्राणातें घेऊनि जाये। तो जैसा ठाउवा नोहे। झांकलेपणें १४ तैसे अभिलाषें येणें कीजेल। विषयांची आशा धरिजेल। तरी वरपडा होइजेल। क्रोधानळा १५ जैसा कवळोनियां पारधी। घातेचिये संधी। आणी मृगातें बुद्धी साधावया १६ एथ तैसीचि परी आहे। ह्मणूनि संगु हा तुज नोहे। पार्था दोन्ही कामक्रोध हे। घातकु जाणें १७ ह्मणऊनि हा आश्रोचि न करावा। मनेंही आठवो न धरावा। एकु निजवृत्तीचा वोलावा। नासो नेदी १८

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्। स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥३५॥

अगा स्वधर्मु हा आपुला। जरी कां कठिणु जाहला। तरी हाचि अनुष्ठिला। भला देखें १९ येरु आचारु जो परावा। तो देखतां कीर बरवा। परी

त्याशीं भाषण सुद्धां करूं नये. ९९ कारण ज्याप्रमाणें पतंग दिव्याचा मत्सर करितात, त्याप्रमाणें ते जन त्या विचारावर भरवंसा न ठेवितां उलट त्यांची निंदा करतात. २०० पतंगानें दिव्याला आलिंगन दिलें असतां तेथेंच त्याचें जसें बिनचुक मरण आहे, तसें विषयाचरण करण्यांतच आत्मघात आहे. १

अन्वय–ज्ञानवान् अपि स्वस्याः प्रकृतेः सदृशं चेष्टते, भूतानि प्रकृतिं यांति, निग्रहः किं करिष्यति । ॥३३॥

अर्थ–ज्ञाता देखील आपल्या स्वभावाला अनुसरून वागतो, व सर्व भूतंही आपल्या स्वभावाला अनुसरून वागतात, तर तेथें निश्चयाचें काय चालणार ? ॥३३॥

म्हणून, कोणी विचारवान् मनुष्यानें ह्या इंद्रियांचे कौतुकानें देखील लाड पुरवूं नयेत. २ अरे, असें पहा–सर्पाबरोबर खेळतां येईल का ? किंवा वाघाचा सहवास सिद्धीस जाईल का ? अथवा हालाहल विष प्राशन केलें तर तें जिरेल का सांग पाहूं ? ३ हें पहा–बुद्धिपूर्वक नव्हे, परंतु सहज खेळतांना जरी अग्नि लागला, तरी तो जसा भडकल्यावर आवरत नाहीं, तसें कौतुकानें इंद्रियांचे लाड पुरविणें चांगलें नाहीं. ४ अर्जुना, वास्तविक पाहतां हें शरीर पराधीन (गुणाधीन) जर आहे, तर त्याच्याकरतां यत्नानें विषयोपभोग मिळविण्याची खटपट कां करावी ? ५ पुष्कळ यत्न करून आणि सर्व गोष्टी संपादन करून ह्या देहाचें अहोरात्र लालन कां करावें ? ६ ह्या ठिकाणीं सर्व परिश्रम करून, पुष्कळ संपत्ति मिळवून, व स्वधर्माचा त्याग करून केवळ देहाचें पोषण कां करावें ? ७ मग हें पंचतत्त्वांचें झालेलें शरीर शेवटीं पंचतत्त्वांतच जाऊन मिळाल्यावर त्या वेळीं आपण केलेली खटपट कोठें शोधीत बसावें ? ८ ह्मणून केवळ शरीरपोषण करणें म्हणजे प्रत्यक्ष हानि आहे असें समज. ह्याकरितां, त्याच विचारांत आयुष्य घालवूं नये. ९

अन्वय–इंद्रियस्य अर्थे इंद्रियस्य रागद्वेषौ व्यवस्थितौ (स्तः) तयोः वशं न आगच्छेत् ; तौ हि अस्य परिपंथिनौ

अर्थ–इंद्रियांचे अर्थ जे विषय, त्यांच्या ठिकाणीं इंद्रियांची प्रीति (राग) किंवा अप्रीति (द्वेष) हीं ठरलेलींच आहेत. त्या रागद्वेषांना वश होऊं नये; कारण, ते मनुष्याचा घात करितात ॥३४॥

विषय सेवनापासून प्रत्यक्ष सुख प्राप्त होत असतां, त्यांत सुख नाहीं, हें ह्मणणें सयुक्तिक नाहीं असें तुला वाटत असेल, सहज विचार केला असतां, इंद्रियांना आवडेल त्याच विषयांचें सेवन केलें, तर चित्ताला समाधान होईल हे खरें; २१० परंतु तें समाधान ह्मणजे संभावित चोराची गांठ पडल्यावर तो जसा नगरसीमा ओलांडीपर्यंत क्षणभर स्वस्थ असतो, (आणि मग घोर वनांत गेल्यावर जसा सर्वस्वी नाश करितो,) तसें होय. ११ बाबारे, वचनाग (विषाची कांडी) प्रथम खातांना गोड लागतो खरी, परंतु त्याच्या परिणामाचा विचार केला असतां तो प्राणनाशक असतो, त्याप्रमाणें १२ इंद्रियांचे ठिकाणीं असणारा जो काम तो विषयसुखाच्या दुराशेला लावतो. ज्याप्रमाणें मासा गळाला लावलेल्या आमिषाला भुलतो, १३ परंतु अमिषाचे आंत गळ झांकलेला आहे तो आपला प्राण घेईल, हें त्याला कळत नाहीं. १४ त्याप्रमाणें, विषयसुखाच्या अभिलाषानें जो विषयाची इच्छा करील, तो क्रोधाग्नींत पडेल. १५ ज्याप्रमाणें पारधी मृगाला धरण्याकरितां चारी बाजूंनीं मारण्याची संधि साधून वळवून आणितात, १६ त्याप्रमाणें ह्या विषयसुखाची तऱ्हा आहे; ह्मणून, पार्था, कामक्रोध हे घातक समजून त्यांचा संग तूं करूं नको; १७ आणि ह्या विषयांना थारा न देतां मनाला त्याची आठवण देखील होऊं देऊं नको, तसेंच आत्मज्ञानाचा ओलावा नाहींसा होऊं देऊं नको. १८

अन्वय–स्वधर्मः विगुणः (अपि) स्वनुष्ठितात् परधर्मात् श्रेयान् (अस्ति); स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मः भयावहः (अस्ति). ३५

अर्थ–आपला धर्म जरी वैगुण्ययुक्त असला, तरी उत्तम प्रकारें आचरिलेल्या परधर्मापेक्षां तो चांगला आहे. स्वधर्माचरणांत मृत्यु जरी आला तरी तो कल्याणप्रद आहे. (परंतु) परधर्म भय देणारा आहे ॥३५॥

अरे, आपला धर्म जरी आचरण्यास काठिण असला, तरी त्याचेंच आचरण करणें उत्तम होय. १९ दुसऱ्याचा धर्म खरोखर दिसण्यांत जरी चांगला

आचरतेनि आचरावा । आपुलाचि २२० सांगें शुद्रघरीं आघवीं । पक्कान्नें आहाति बरवीं । तीं द्विजें केवीं सेवावीं । दुर्बळु जरी जाहला २१ हें अनुचित कैसेनि कीजे । अग्राह्य केवीं इच्छिजे । अथवा इच्छिलेंही पाविजे । विचारीं पां २२ तरी लोकांचीं धवळारें । देखोनियां मनोहरें । असतीं आपुलीं तणारें । मोडावीं केवीं २३ हें असो वनिता आपुली । कुरूप जरी जाहली । तऱ्ही भोगितां तेचि भली । जियापरी २४ तेवीं आवडे तैसा सांकडु । आचरतां जरी दुवाडु । तऱ्ही स्वधर्मुचि सुरवाडु । परत्रींचा २५ हां गा साकर आणि दूध । हें गौल्य कीर प्रसिद्ध । परी कृमिदोषीं विरुद्ध । घेपे केवीं २६ ऐसेनिही जरी सेविजेल । तरी ते आळुकीचि उरेल । जे तें परिणामीं पथ्य नव्हेल । धनुर्धरा २७ ह्मणोनि आणिकांसी जें विहित । आणि आपणपेयां अनुचित । तें नाचरावें जरी हित । विचारिजे २८ या स्वधर्मातें अनुष्ठितां । वेचु होईल जीविता । तोहि निका वर उभयतां । दिसत असे २९ ऐसें समस्तसुरशिरोमणी । बोलिले जेथ श्रीशार्ङ्गपाणी । तेथ अर्जुन म्हणे विनवणी । असे देवा २३० हें जें तुम्हीं सांगितलें । तें सकळ कीर म्यां परिसिलें । तरी आतां पुसेन कांहीं आपुलें । अपेक्षित ३१

अर्जुन उवाच:—

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः । अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥३६॥

तरी देवा हें ऐसें कैसें । जे ज्ञानियांही स्थिति भ्रंशे । मार्गु सांडुनी अनारिसे । चालत देखों ३२ सर्वज्ञुही जे होती । हेयोपादेयही जाणती । तेही परधर्में व्यभिचरती । कवणें गुणें ३३ बीजा आणि भुसा । अंधु निवाडु नेणे जैसा । नावेक देखणाही तैसा । बरळे कां पां ३४ जे असता संगु सांडिती । तेचि संसर्गु करितां न धाती । वनवासीही सेविती । जनपदातें ३५ आपण तरी लपती । सर्वस्वें पाप चुकविती । परी बळात्कारें सुइजती । तयाचि माजीं ३६ जयाची जीवें घेती विवसी । तेचि जडोनि ठाके जीवेंसीं । चुकवितां ते गिंवसी । तयातेंचि ३७ ऐसा बलात्कारु एकु दिसे । तो कवणाचा एथ आग्रहो असे । हें बोलावें हृषीकेशें । पार्थु म्हणे ३८

श्रीभगवानुवाच:—

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः । महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥३७॥

तंव हृदयकमळआरामु । जो योगियांचा निष्कामकामु । तो म्हणतसे पुरु

असला, तरी आचरण करणारांनीं आपल्याच धर्माचें आचरण केलें पाहिजे. २२० ब्राह्मण जरी द्ररिद्री झाला, तरी त्यानें शूद्राच्या घरचीं उत्तम पक्कान्नें कशीं सेवावीं सांग बरें ? २१ असें हें अनुचित कर्म कसें करावें ? आणि जी गोष्ट घेण्यास योग्य नाहीं, तिची इच्छा कशी करावी ? अथवा जरी इच्छित प्राप्त झालें, तरी तें घ्यावें का ? ह्याचा विचार कर. २२ तसेंच, लोकांचे मोठमोठे सुंदर वाडे पाहून आपल्या असलेल्या गवतीं झोंपड्या मोडाव्या का ? २३ हें असो, आपली स्त्री कुरूप असली तरी तीच आपल्यास भोगण्यास ज्याप्रमाणें योग्य होय, २४ त्याप्रमाणें, वाटेल तसा कठिण आणि आचरण्यास दुर्घट असा स्वधर्म असला, तरी तोच परलोकाचा सखा होय. २५ असें पहा कीं, दूध आणि साखर हे दोन पदार्थ गोड आहेत म्हणून प्रसिद्ध आहे; पण ज्यांना जंत झाले आहेत, त्यांना ते विरुद्ध आहेत, त्यांनीं ते कसे सेवन करावे ? २६ अर्जुना, इतक्यावरही जर रोग्यानें ते सेवन केले, तर त्याचा तो हटवादीपणाच आहे. कारण, परिणामीं ते त्यास हितकर होणार नाहींत. २७ ह्मणून, आम्हांला हित विचारशील तर जें दुसऱ्यास उचित असून आपल्यास अनुचित आहे, त्याचें आचरण करूं नये. २८ स्वधर्माचें आचरण करीत असतांना जरी आपला जीव खर्ची पडला, तरी तो दोन्ही लोकीं खरोखर श्रेष्ठ असा मानला जातो. २९ देवाधिदेव श्रीशार्ङ्गपाणि ह्यांचें हें भाषण ऐकून अर्जुन म्हणाला:—देवा, माझी एक विनंति आहे: २३० आपण जें मला आतां सांगितलें, तें मीं सर्व नीट ऐकलें; तर आतां मला जें कांहीं पाहिजे आहे तें मी विचारितों. ३१

अन्वय—वार्ष्णेय, अथ केन प्रयुक्तः अयं पुरुषः अनिच्छन् अपि बलात् नियोजितः इव पापं चरति ? ॥३६॥

अर्थ—अर्जुन म्हणालाः—कृष्णा, तर मग जीवाला विषयांची इच्छा नसूनही, कोणाच्या प्रेरणेनें तो जीव बलात्कारानें ढकलल्याप्रमाणें पापाचरण करितो ? ॥३६॥

देवा, ज्ञान्यांची सुद्धां स्थिति भ्रष्ट होऊन ते भलत्याच मार्गानें जातात हें कसें ? ३२ ते सर्वज्ञ असून व त्यांना त्याज्य काय व ग्राह्य काय हें माहीत असून ते परधर्माचें आचरण कां करितात ? ३३ जसे अंधळ्या मनुष्यास धान्य आणि कोंडा निराळे करतां येत नाहींत, तसें क्षणभर डोळसासही कां व्हावे ? ३४ जे असलेला संग सोडतात, तेच पुनः संग करूनही तृप्त होत नाहींत; व वनवासांत असलेलेही व्यावहारिक लोकांचें आचरण करितात. ३५ वास्तविक ते पापापासून अलिप्त असावे, व पाप आपल्या हातून होऊं नये अशी इच्छा करितात, परंतु त्यांना बलात्कारें करून पापांत कोणीं तरी घातल्याची प्रतीति येते. ३६ ज्या विषयांची ते मनापासून भीति बाळगतात, तेच विषय त्यांच्या जिवाशीं जडून राहतात. ते चुकवायाचा प्रयत्न केला तरी ते पुनः त्यांतच गुरफटतात. ३७ अशा रीतीनें ज्ञानवानांच्या विषय सेवनांत बलात्कार दिसतो, तो बलात्कार करण्याचा आग्रह कोणाचा आहे, हें आपण कृपा करून सांगावें, असें अर्जुन म्हणाला. ३८

अन्वय—एषः कामः एषः क्रोधः रजोगुणसमुद्भवः (अस्ति, एषः) महाशनः महापाप्मा (अस्ति; त्वं) एनं इह वैरिणं विद्धि. ॥३७॥

अर्थ—श्रीभगवान म्हणालेः—हा काम व हाच क्रोध. ह्याची उत्पत्ति रजोगुणापासून आहे. हा अधाशी व महापापी आहे. तूं या लोकीं याला वैरी समज. ॥३७॥

तेव्हां हृदयास रमविणारा, आणि योगीजन ज्याची निष्कामबुद्धीनें इच्छा करतात असा जो पुरुषोत्तम

तोत्तमु । सांगेन आइक ३९ तरी हे कामु क्रोधु पाहीं । जयांतें कृपेची सांठवण नाहीं । हे कृतांताच्या ठायीं । मानिजती २४० हे ज्ञाननिधीचे भुजंग । विषयदरीचे वाघ । भजनमार्गींचे मांग । मारक जे ४१ हे देहदुर्गींचे धोंड । इंद्रियग्रामींचे कोंड । यांचें व्यामोहादिक दबड । जगावरी ४२ हे रजोगुण मानसींचे । समूळ आसुरियेचे । धालेपण ययांचें । अविद्या केलें ४३ हे राजाचे कीर जाहले । परी तमासी पढियंते भले । तेणें निजपद यां दिधलें । प्रमादमोहो ४४ हे मृत्यूच्या नगरीं । मानिजती निकियापरी । जे जीविताचे वैरी । ह्मणऊनियां ४५ जयासि भुकेलियां आमिषा । हें विश्व न पुरेचि घांसा । कुळवाडियांचिया आशा । चाळीत असे ४६ कौतुकें कवळितां मुठी । जिये चवदा भुवनें थेंकुटीं । तिये भ्रांतिही धाकुटी । वाल्हीदुल्ही ४७ जे लोकत्रयाचें भातुकें । खेळतांचि खाय कवतिकें । तिच्या दासीपणाचेनि बिकें । तृष्णा जिये ४८ हें असो मोहें मानिजे । यांतें अहंकारें घेपे दीजे । जेणें जग आपुलेनि भोजें । नाचवीत असे ४९ जेणें सत्याचा भोकसा काढिला । मग अकृत्य तृणकुटा भरिला । तो दंभु रूढविला । जगीं इहीं २५० साध्वी शांति नागविली । मग माया मांगी शृंगारिली । तियेकरवीं विटाळविलीं । साधुवृंदें ५१ इहीं विवेकाची त्राय फेडिली । वैराग्याची खाल काढिली । जितया मान मोडिली । उपशमाची ५२ इहीं संतोषवन खांडिलें । धैर्यदुर्ग पाडिले । आनंदरोप सांडिलें । उपडूनियां ५३ इहीं बोधाचीं रोपें लुंचिलीं । सुखाची लिपि पुसिली । जिव्हारीं आगी सूदली । तापत्रयाची ५४ हे आंगा तंव घडले । जीवींचि आथी जडले । परी नातुडती गिंवसिले । ब्रह्मादिकां ५५ हे चैतन्याचे शेजारीं । वसती ज्ञानाच्या एका हारीं । म्हणोनि प्रवर्तले महामारी । सांवरती ना ५६ हे जळेंवीण बुडविती । आगीवीण जाळिती । न बोलतां कवळिती । प्राणियांतें ५७ हे शस्त्रेंवीण साधिती । दोरेंवीण बांधिती । ज्ञानियासी तरी वधिती । पैज घेउनी ५८ हे चिखलेंवीण रोंविती । पाशिकेंवीण गोंविती । हे कवणाजोगे न होती । आंतौटेपणें ५९

धूमेनाऽऽव्रियते वह्निर्यथाऽऽदर्शो मलेन च । यथोल्बेनाऽऽवृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८॥

जैसी चंदनाची मुळी । गिंवसोनि घेपे व्याळीं । नातरी उल्बाची खोळी । गर्भस्थासी २६० कां प्रभावीण भानु । धूमेवीण हुताशनु । जैसा दर्पण मळ-

तो म्हणाला:—सांगतों ऐक. ३९ हृदयामध्यें वास करणारे हे काम आणि क्रोध हेच पुरुषास पापामध्यें प्रवृत्त करणारे आहेत, कारण ज्या कामक्रोधांच्या ठिकाणीं दया ह्मणून बिलकूल नाहीं, फार काय सांगावें, दुसऱ्याचा नाश करण्याविषयीं यमाप्रमाणें यांचें सामर्थ्य आहे. २४० काय सांगूं, हे कामक्रोध ज्ञानरूप धनाच्या ठेवीवरील नाग, व विषयखोऱ्यांतील वाघ आणि भजनमार्गाचे मारेकरी मांग आहेत. ४१ देहरूप किल्ल्यावरील मोठे दगड व इंद्रियरूप गांवांतील कोंडवाडे आहेत, आणि भ्रांति वगैरे उत्पन्न करण्याचा ह्यांचा जगावर दपटशा आहे. ४२ हे मनाच्या ठिकाणीं भासणारे मुळापासून असुरी संपत्तींतील असून रजोगुणाचें कार्य आहेत. ह्यांची तृप्ती अविद्येकडून होते. ४३ हे रजोगुणापासून झालेले आहेत खरे, परंतु तमोगुणाचे फार आवडते आहेत; म्हणून तमोगुणानें आपलें सर्वस्व—माजुरपणा व अज्ञान-ह्यांस दिलें आहे. ४४ हे जीवीताचे शत्रु आहेत, म्हणून मृत्यूचे नगरांत ह्यांना चांगल्या प्रकारचा मान मिळतो. ४५ काय चमत्कार सांगावा, ह्यांच्या नुसत्या भुकेच्या इच्छेला हें विश्व एक घांसाला देखील पुरत नाहीं, आणि आशा ही ह्यांच्या व्यापाराची वृद्धि करिते. ४६ जिनें सहज आपल्या मुठी वळल्या असतां त्यांत मावण्याला चौदा भुवनेंही कमीच; अशा तऱ्हेची जी भ्रांति ती आशेची धाकटी बहीण आहे. ४७ जी ही भ्रांति केवळ भातुकली खेळतां खेळतां सहज तिन्ही लोक खाऊन टाकते; आणि तृष्णा जी पुष्ट होते, ती हिच्या दास्यत्वाच्या बळावरच ! ४८ हें असो; पण ह्या कामक्रोधांना मोहाच्या घरीं प्रतिष्ठा आहे; आणि ज्या अहंकारानें सर्व जगाला नाचवून सोडलें आहे, त्या अहंकाराची ह्यांशीं देवघेव आहे. ४९ ज्या दंभानें सत्याचा कोथळा फोडून त्यांत दुष्ट कृत्यांचा पेंढा भरला, त्या दंभाला ह्यांनींच जगांत प्रसिद्धीला आणलें. २५० ह्यांनीं पतिव्रतारूप शांतीला लुबाडून घेऊन मायारूप मांगिणीला सजविलें आणि तिच्याकडून साधूंचे समुदाय भ्रष्ट करविले ! ५१ ह्यांनीं विवेकाचा ठिकाण नाहींसा केला; वैराग्याची खोड मोडली आणि जित्या उपशमाची मान तोडली ! ५२ ह्यांनीं संतोषरूपी वन तोडून टाकिलें, धैर्यरूपी किल्ले जमीनदोस्त केले. आणि आनंदरूपी रोपडें उपटून टाकिलें. ५३ ह्यांनीं ज्ञानाचीं रोपें खुडून टाकलीं, सुखाचें नांवसुद्धां पुसून टाकलें, आणि प्राणिमात्रांच्या हृदयांत त्रिविध तापांची आग उत्पन्न केली. ५४ हे शरीराबरोबर घडलेले असून जिवांतच जडून राहिले आहेत; परंतु शोध करायाला गेलें असतां सांपडत नाहींत. ५५ हे ब्रह्मस्वरूपाच्या शेजारीं आणि ज्ञानाच्या पंक्तीला वास करितात, म्हणून जगताचा महाप्रलय करण्यास प्रवृत्त होऊन कोणाला आंवरत नाहींत. ५६ पाण्याशिवाय बुडवितात, अग्नीशिवाय जाळतात आणि प्राण्याला न कळतां ग्रासतात. ५७ हे शस्त्राशिवाय मारतात, दोराशिवाय बंधन करतात, आणि तत्त्ववेत्त्यांना तर पैजेनें आपल्या आधीन करून घेतात. ५८ हे चिखलाशिवाय रोंवतात, पाशाशिवाय लोकांना बांधून ठेवितात, आणि शरिराच्या इतक्या अंतर्यामीं पोंहोंचल्यामुळें ह्यांच्या साम्यतेचे दुसरे कोणी नाहींत. ५९

अन्वय-यथा धूमेन वन्हिः आव्रियते, यथा च आदर्शः मलेन (आव्रियते), यथा गर्भः उल्वेन आवृतः, तथा तेन (कामेन) इदं आवृतम् ॥३८॥

अर्थ-जशा धुरानें अग्नि, मळानें आरसा, व खोळीनें गर्भ आच्छादिलेला असतो, तसें हें शुद्ध ज्ञान ह्या कामानें आच्छादिलेलें आहे. ॥३८॥

अर्जुना, फार काय सांगावें, जेथें ज्ञान आहे तेथें हे काम क्रोध आहेतच— जसा साप चंदनाच्या मुळाला वेढून राहतो, किंवा मोठेनें गर्भ जसा आच्छादित असतो; २६० अथवा प्रभेशिवाय सूर्य, धुराशिवाय अग्नि किंवा मळाशिवाय आरसा हीं ज्याप्रमाणें सांपडाव-

हीनु । कहींच नसे ६१ तैसें इहींवीण एकलें । आम्हीं ज्ञान नृकुपेनाहीं देखिलें । जैसें कोंडोनि पां गुंतलें । बीज निपजे ६२

आवृत्तं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा । कामरूपेण कौंतेय दुष्पूरेणाऽनलेन च ॥ ३९ ॥

तैसें ज्ञान तरी शुद्ध । परी इहीं असें प्ररुद्ध । म्हणोनि ६३ अगाध । होऊनि ठेलें ६३ आधीं यांतें जिणावें । मग तें ज्ञान पावावें । तंव पराभवो न संभवे । रागद्वेषां ६४ यांतें साधावयालागीं । जें बळ बाणिजे आंगीं । तें इंधनें जैसीं आगी । सावावो होय ६५

इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते । एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

तैसे उपाय कीजती जे जे । ते यांसीचि होती विरजे । म्हणोनि हटियातें जिणिजे । इहींचि जगीं ६६ ऐसियांही सांकडां बोला । एक उपायो आहे भला । तो करितां जरी आंगवला । तरी सांगेन तुज ६७

तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ । पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥

यांचा पहिला कुरुठा इंद्रियें । एथूनि प्रवृत्ति कर्मातें वियें । आधीं निर्दळूनि घालीं तियें । सर्वथैव ६८

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः । मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥

मग मनाची धांव पारुषेल । आणि बुद्धीची सोडवण होईल । इतुकेनि थारा मोडेल । या पापियांचा ६९

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना । जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ४३ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतियोऽध्यायः

हे अंतरींहूनि जरी फिटले । तरी निभ्रांत जाण निवटले । जैसें रश्मीवीण उरलें । मृगजळ नाहीं २७० तैसे रागद्वेष जरी निमाले । तरी ब्रह्मींचें स्वराज्य आलें । मग तो भोगी सुख आपुलें । आपणचि ७१ ते गुरुशिष्याची गोठी । पदपिंडाची गांठी । तेथ स्थिर राहोनि नुठीं । कवणे काळीं ७२ ऐसें सकळ सिद्धांचा रावो । देवी लक्ष्मीयेचा नाहो । राया ऐकें देवदेवो । बोलता जाहला ७३ आतां पुनरपि तो अनंतु । आद्य एकी मातु । सांगेल तेथ पंडुसुतु । प्रश्नु करील ७४ तया बोलाचा हन पाडु । कीं रसवृत्तीचा निवाडु । येणें श्रोतयां होईल सुरवाडु । श्रवणसुखाचा ७५ ज्ञानदेवो म्हणे निवृत्तीचा । चांग उठावा करूनि उन्मेषाचा । मग संवादु श्रीहरिपार्थांचा । भोगावा बापा २७६

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां तृतियोऽध्यायः ॥ ३ ॥ श्लोक ४३, ओव्या २७६.

याचीं नाहींत, ६१ त्याप्रमाणें कामक्रोधांशिवाय शुद्ध ज्ञान आमच्या दृष्टीस कधीं पडलें नाहीं. ६२

अन्वय–कौंतेय, ज्ञानिनः नित्यवैरिणा एतेन कामरूपेण दुष्पूरेण च अनलेन (इव) ज्ञानं आवृतम्. ॥३९॥

अर्थ–हे कौंतेया, ज्ञान्याचें नित्य वैर करणारा, व कधींही तृप्त न होणाऱ्या अग्नीप्रमाणें असणारा, अशा ह्या इच्छारूप कामानें ज्ञान झांकून टाकलें आहे. ॥३९॥

तसें ज्ञान हें स्वतः जरी शुद्ध आहे, तरी कामक्रोधांनीं आच्छादित असतें, ह्मणूनच तें महाबलवान होऊन बसलें आहे. ६३ अगोदर कामक्रोधास जिंकावें, मग ज्ञान प्राप्त होणार, पण त्या कामक्रोधास जिंकणें अगोदर कठीण! ६४ कारण, ह्यांना जिंकण्याकरितां जें जें अवसान आणावें तें तें उलट त्यांनाच साह्यकारी होतें. जसें अग्नी विझविण्याकरितां लांकडें टाकलीं असतां तीं त्यालाच साह्य करितात, ६५.

अन्वय–इंद्रियाणि, मनः, बुद्धिः अस्य अधिष्ठानं उच्यते. एषः एतैः ज्ञानं आवृत्य देहिनं विमोहयति. ॥४०॥

अर्थ–इंद्रियें, मन आणि बुद्धि हीं त्या कामाचीं राहण्याचीं स्थानें होत, असें सांगितलेलें आहे. ह्मणून हा काम इंद्रियादिकांच्या योगें जीवाचें ज्ञान झांकून टाकून त्याला मोहांत पाडितो. ॥४०॥

त्याप्रमाणें, जे जे उपाय करावे ते ते ह्यांनाच साह्यकारी होतात; ह्मणून ह्या जगामध्यें हटयोग्यांना देखील [सुद्धां] हेच जिंकितात. ६६ मग हे काम क्रोध अजिंक्यच झाले असें तुला वाटेल, तर तसें मात्र नाहीं. अर्जुना, अशाही संकटांतून पार पडण्यास एक उत्तम उपाय आहे; तो तुला साधेल तर सांगतों. ६७

अन्वय–भरतर्षभ, तस्मात् त्वं आदौ इंद्रियाणि नियम्य ज्ञानविज्ञाननाशनं एनं पाप्मानं प्रजहि. ॥४१॥

अर्थ–ह्मणून, अर्जुना, तूं प्रथम इंद्रियांना जिंक; आणि शास्त्रीय व स्वानुभविक ज्ञानाचा नाश करणाऱ्या अशा ह्या महापापी कामाला मारून टाक. ॥४१॥

ह्यांचें मूळ वास्तव्य इंद्रियांचे ठिकाणीं आहे, आणि इंद्रियांपासून कर्माची प्रवृत्ति होते, ह्मणून त्या इंद्रियांना अगोदर सर्वथैव जिंक. ६८

अन्वय–इंद्रियाणि पराणि आहुः, इंद्रियेभ्यः मनः परं (अस्ति), बुद्धिः तु मनसः परा (अस्ति); यः बुद्धेः परतः सः तु (परमात्मा). ॥४२॥

अर्थ–देहापेक्षां इंद्रियें सूक्ष्म, इंद्रियांपेक्षां मन सूक्ष्म, मनापेक्षां बुद्धि सूक्ष्म, व बुद्धीपेक्षां परमात्मा सूक्ष्म, असें ज्ञानी ह्मणतात. ॥४२॥

असें झालें म्हणजे मनाची धांव कुंठित होऊन बुद्धीची सोडवणूक होईल आणि मग तेथून ह्या दुष्टांचें विन्हाड मोडेल. ६९

अन्वय–महाबाहो, एवं आत्मानं बुद्धेः परं बुद्ध्वा (आत्मानं) आत्मना संस्तभ्य दुरासदं कामरूपं शत्रुं जहि. ॥४३

अर्थ–हे महाबाहो, ह्याप्रमाणें बुद्धीपेक्षां सूक्ष्म ह्मणजे बुद्धीच्या पलीकडे असणाऱ्या परमात्म्याला जाणून जिंकण्यास कठीण अशा कामरूपी शत्रूस जिंक. ॥४३॥

ह्याप्रमाणें ह्यांची अंतःकरणांतून वस्ती मोडली ह्मणजे हे खास मेले असें समज. ज्याप्रमाणें सूर्यकिरणांशिवाय मृगजल दृष्टीस पडवयाचें नाहीं, २७० त्याप्रमाणें, राग आणि द्वेष जर नाश पावले, तर ब्रह्मरूपी स्वराज्यच हातीं आलें असें समज, मग तो आपलेंच सुख आपण भोगतो. ७१ हीच गुरुशिष्यांची गुह्य गोष्ट; हेंच जीवब्रह्माचें ऐक्य. तूं येथें स्थिर होऊन येथून कधींही हालूं नको. ७२ संजय म्हणतोः–राजा, ऐक; सकलसिद्धमुगुटमणि लक्ष्मीपति श्रीकृष्ण ह्याप्रमाणें बोलले. आतां ह्यापुढें भगवान श्रीकृष्ण एक पुरातन कथा सांगतील, ती ऐकून अर्जुन प्रश्न करील. ७३ ७४ त्या कथेची योग्यता व रसिकपणा हीं ऐकून श्रोत्यांना श्रवणसुखाचा सुकाळ होईल. ७५ निवृत्तीचे दास जे ज्ञानदेव, ते म्हणतात, "बापांनो, आत्मज्ञानप्राप्तीच्या चांगल्या तयारीनें तुम्ही कृष्णार्जुनसंवाद ऐका." २७६

ज्ञानेश्वरी.

अध्याय चौथा.

आजि श्रवणेंद्रिया पाहलें। जे येणें गीतानिधान देखिलें। आतां स्वप्नचि हें तुकलें। साचासरिसें १ आधींचि विवेकाची गोठी। वरी प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी। आणि भक्तराजु किरीटी। परिसत असे २ जैसा पंचमालापु सुगंधु। कीं परिमळु आणि सुस्वादु। तैसा भला जाहला विनोदु। कथेचा इये ३ कैसी आगळिक दैवाची। जे गंगा जोडली अमृताची। हो कां जपतपें श्रोतयांचीं। फळा आलीं ४ आतां इंद्रियजात आघवें। तिहीं श्रवणाचें घर रिघावें। मग संवादसुख भोगावें। गीताख्य हें ५ हा अतिसो अतिप्रसंगें। सांडूनि कथाचि ते सांगें। जे कृष्णार्जुन दोघे। बोलत होते ६ ते वेळीं संजयो रायातें म्हणे। अर्जुनु अधिष्ठिला दैवगुणें। जे अतिप्रीति श्रीनारायणें। बोलतु असे ७ जे न संगेचि पितया वसुदेवासी। जें न संगेचि माते देवकीसी। जें न संगेचि बंधु बळिभद्रासी। तें गुह्य अर्जुनेंशीं बोलत ८ देवी लक्ष्मीयेवढी जवळिक। परी तेही न देखे या प्रेमाचें सुख। आजि कृष्णस्नेहाचें बिक। यातेंचि आथी ९ सनकादिकांचिया आशा। वाढीनल्या होतिया कीर बहुवसा। परी त्याही येणें मानें यशा। येतीचिना १० या जगदीश्वराचें प्रेम। एथ दिसतसे निरुपम। कैसें पार्थें येणें सर्वोत्तम। पुण्य केलें ११ हो कां जयाचिया प्रीती। अमूर्त हा आला व्यक्ती। मज एकवंकी याची स्थिति। आवडतु असे १२ एव्हवीं हा योगियां नाडळे। वेदार्थासी नाकळे। जेथ ध्यानाचेही डोळे। पावतीना १३ तो हा निजस्वरूप। अनादि निष्कंप। परी कवणें मानें सकृप। जाहला आहे १४ हा त्रैलोक्यपटाची घडी। आकाराची पैलथडी। कैसा याचिये आवडी। आवरला असे १५

श्रीभगवानुवाच:—

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्। विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥१॥

मग देव म्हणे पंडुसुता। हाचि योगु आम्हीं विवस्वता। कथिला परी ते

ज्ञानेश्वरी.

अध्याय चौथा.

गीताशास्त्राच्या प्रथम तीन अध्यायांचें व्याख्यान केल्यानंतर आपल्या श्रोत्रेंदियांचें भाग्य वर्णन करण्याचे मिषानें मुमुक्षूंस ग्रंथामध्यें रुची उत्पन्न होण्याकरितां महाराज अवतरण देतात:—

आज कानांना उजाडलें म्हणजे त्यांचा भाग्योदय झाला; कारण, यथार्थ गीता श्रवण होणें बहुतेक स्वप्नवत आहे! असा गीतेचा ठेवा आज त्यांनीं पाहिला. आतां जागृत झाल्यावर स्वप्नांतील गोष्ट खोटीशी भासते; पण ती आज खरी झाली! १ आधींच आत्मविचाराची गोष्ट, त्यांत श्रीकृष्ण जगजेठी प्रतिपादन करणारा, आणि भक्तशिरोमणि अर्जुन ऐकणारा.२ पंचम स्वर आणि त्यांतच उत्तम सुवास व गोडी या तिहींचा ऐक्यभाव असतां जसा आनंद होईल तसा प्रकार या गीतारूपी कथामृताचा आहे, म्हणजे यांत सर्व इंद्रियांना आनंद होईल अशी गोडी आहे. ३ दैवाची थोरवी काय वर्णावी, कीं जिच्यामुळें श्रोत्यांचीं जपतपें फळास येऊन अमृतरूप गंगाच त्यांना प्राप्त झाली.४ म्हणून, सर्व इंद्रियांनीं आपआपलीं कामें सोडून श्रवणाचे ठिकाणीं वास करून कृष्णार्जुन संवादरूप गीतेचें सुख घ्यावें. ५ तेव्हां संतमंडळी ज्ञानेश्वरास म्हणाली कीं, आतां तुझा पाल्हाळ व अधिक प्रसंग पुरे करून कृष्णार्जुन जें बोलत होते ती कथा आम्हांला सांग. ६त्या वेळेस संजय धृतराष्ट्रास म्हणाला:—दैवीसंपत्तीनें युक्त असलेल्या अर्जुनास श्रीकृष्ण अति प्रेमानें म्हणाले:—अति प्रेमानें कशावरून म्हणशील तर—७ जें गुह्य श्रीकृष्णांनीं आपला पिता वसुदेव, माता देवकी व बंधु बलराम ह्यांसही सांगितलें नाहीं, तें अर्जुनास सांगितलें. ८ लक्ष्मी देवी नेहमीं सन्निध राहणारी, पण तिलाही ज्या प्रेमसुखाचा अनुभव लाभला नाहीं, त्या कृष्णप्रेमाचा उमाळा आज पार्थावरच आला आहे; काय चमत्कार सांगावा—९ सनकादिक त्याचीं बहुत दिवसांपासून इच्छा करीत होते, पण त्यांनाही इतक्या योग्यतेचें तें प्रेम प्राप्त झालें नाहीं. १० त्याचे ठिकाणीं जगदीश्वराचें अनुपमेय प्रेम दृष्टीस पडतें, यावरून या अर्जुनानें किती सर्वोत्कृष्ट पुण्य केलें असावें! ११ पहा कीं, ज्याच्या प्रीतीकरितां निराकार साकार झाला, ह्यावरून मला तर असें वाटतें कीं, ह्या दोघांची स्थिति (देह) जरी भिन्न आहे, तरी दोघे एकरूपच आहेत. १२ एरव्हीं हा भगवान् योग्यांना आढळत नाहीं, वेदालाही आकलन होत नाहीं, व त्याचे ठिकाणीं ध्यानाचीही दृष्टि पोहोंचत नाहीं. १३ असा जो आत्मस्वरूप अनादि अविक्रिय भगवान्, तो अर्जुनावर कसा कृपावंत झाला आहे! १४ हा त्रैलोक्यरूप वस्त्राच्या संकोचविस्तारांचें अधिष्ठान आहे. (त्रैलोक्य हें ह्याचें रूप असून त्याची घडी करून हा अवतार घेऊन आला आहे,) आणि आकाराच्या पलीकडला असून हा अर्जुनाला इतक्या प्रेमानें कसा स्वाधीन झाला नकळे! १५

अन्वय—अहं इमं अव्ययं योगं विवस्वते प्रोक्तवान्; विवस्वान् मनवे प्राह; मनुः (च) इक्ष्वाकवे अब्रवीत्. ॥१॥

अर्थ—श्रीभगवान म्हणालेः—हा नाशरहित कर्मयोग आम्हीं पूर्वी सूर्याला सांगितला; सूर्यानें मनूला सांगितला; आणि मनूनें इक्ष्वाकूला सांगितला. ॥१॥

मग श्रीकृष्ण अर्जुनास म्हणालेः— हा कर्मयोग आम्हीं पूर्वी विवस्वानाला—सूर्याला—सांगितला; परंतु

वार्ता । बहुतां दिवसांची १६ मग तेणें विवस्वतें रवी । हे योगस्थिति आघवी। निरूपिली बरवी । मनूप्रती १७ मनूनें आपण अनुष्ठिली । मग इक्ष्वाकुवा उपदेशिली । ऐसी परंपरा विस्तारिली । आद्य हे गा १८

एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः । स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥२॥

मग आणिकही या योगातें । राजर्षि जाहले जाणते । परि तेथोनि आतां सांप्रतें । नेणिजे कोण्ही १९ जे प्राणिया कामीं भरु । देहाचिवरी आदरु । म्हणोनि पडिला विसरु । आत्मबोधाचा २० अव्हांटलिया आस्थाबुद्धि । विषयसुखचि परमावधि । जीवु तैसा उपाधि । आवडे लोकां २१ एरवीं तरी खवणेयांच्या गांवीं । पाटाउवें काय करावीं । सांगें जात्यंधा रवी । काय आथी २२ कां बहिरयांच्या आस्थानीं । कवण गीतातें मानी । कीं कोल्हेया चांदणी । आवडी उपजे २३ पैं चंद्रोदया आरौतें । जयांचे डोळे फुटती असते । ते काउळे केवीं चंद्रातें । वोळखती २४ तैसी वैराग्याची शिव न देखती । जे विवेकाची भाष नेणती । ते मूर्ख केवीं पावती । मज ईश्वरातें २५ कैसा नेणों मोहो वाढीनला । तेणें बहुतेक काळु व्यर्थ गेला । म्हणोनि योगु हा लोपला । लोकीं इये २६

स एवाऽयं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः । भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ३

तोचि हा आजि आतां । तुजप्रती कुंतीसुता । सांगितला आम्हीं तत्वता । भ्रांति न करीं २७ हें जीवींचें निज गुज । परी केवीं राखों तुज । जे पढियेसी तूं मज । म्हणऊनियां २८ तूं प्रेमाचा पुतळा । भक्तीचा जिव्हाळा । मैत्रियेचि चित्कळा । धनुर्धरा २९ तूं अनुसंगाचा ठावो । आतां तुज काय वंचूं जावो । जन्ही संग्रामारूढ आहों । जाहलों आम्हीं ३० तरी नावेक हें सहावें । गाजाबज्यही न धरावें । परी तुझें अज्ञानत्व हरावें । लागे आधीं ३१

अर्जुन उवाचः—

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः । कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४ ॥

तंव अर्जुन म्हणे श्रीहरी । माय आपुलेयाचा स्नेहो करी । येथ विस्मयो काय अवधारीं । कृपानिधि ३२ तूं संसारश्रांतांची साउली । अनाथ जीवांची माउली । आमुतें कीर प्रसवली । तुझीच कृपा ३३ देवा पांगुळ एकादें विजे । तरी जन्मौनि जोजारु साहिजे । हें बोलों काय तुझें । तुजचि पुढां ३४ आतां पुसेन जें मी कांहीं । तेथ निकें चित्त देईं । तेवींचि देवें कोपावें ना कांहीं । बोला एका ३५ तरी मागील जे वार्ता । तुवां सांगितली होती अनंता । ते

त्या गोष्टीला पुष्कळ दिवस झाले. १६ मग सूर्यानें हा सर्व योग वैवस्वत मनूला सांगितला; १७ आणि मनूनें त्याचें आचरण करून इक्ष्वाकुनामक आपल्या पुत्रास त्याचा उपदेश केला, अशी ही मुळापासून परंपरा चालत आली आहे. १८

अन्वय–परंतप, एवं परंपराप्राप्तं इमं (योगं) राजर्षयः विदुः; सः योगः महता कालेन इह नष्टः ॥२॥

अर्थ–अर्जुना, अशा परंपरेनें प्राप्त होऊन हा योग राजर्षींना समजला. परंतु तोच योग पुष्कळ काल गेल्यामुळें ह्या लोकीं नष्ट झाला. ॥२॥

पुढें आणखीही कांहीं राजर्षींना हा योग माहीत होता परंतु त्यानंतर आजपर्यंत कोणालाही तो माहीत नाहीं. १९ कारण, प्राणिमात्राची आवड विषयसेवनाविषयीं असून, देहावरच विशेष प्रेम असल्यामुळें त्यांना आत्मबोधाचा विसर पडला. २० अस्तिक्यबुद्धि आडमार्गानें गेल्यामुळें विषयसुख ह्मणजेच इतिकर्तव्यता असें लोकांना वाटून, ते जीवाप्रमाणेंच विषयरूप उपाधीवर प्रेम करूं लागले! २१ असें पहा–ओसाड गांवांत उंची वस्त्रांची चाड काय असणार? किंवा जन्मांधाला सूर्याचा काय उपयोग सांग बरें? २२ किंवा वहिऱ्यांच्या सभेंत गाण्याला कोण मान देईल? अथवा कोल्ह्याला चांदण्यापासून कसा आनंद होईल? २३ तसेंच, चंद्रोदयापूर्वी ज्यांचे डोळे फुटतात–मिटतात–ते कावळे चंद्रास कसे ओळखतील? २४ त्याचप्रमाणें, ज्यांनीं वैराग्याची शीवसुद्धां पाहिली नाहीं, आणि ज्यांना विचाराचें नांव देखील माहीत नाहीं, त्या मूर्खांना मज परमेश्वराचा लाभ कसा होईल? २५ हा मोह इतका कसा वाढला कोण जाणे; पण त्यामुळें बहुतेक काळ व्यर्थ गेला; आणि म्हणून ह्या लोकीं हा योग बुडाला. २६

अन्वय–सः एव अयं पुरातनः योगः मया अद्य ते प्रोक्तः, (त्वं) मे भक्तः असि, सखा च (असि); इति हि एतत् उत्तमं रहस्यं (त्वे मया कथितम्). ॥३॥

अर्थ–तोच हा पुरातन योग मीं तुला सांगितला, तू माझा भक्त व सखा आहेस, म्हणूनच हें उत्कृष्ट रहस्य मीं तुला कथन केलें ॥३॥

हे कुंतीसुता, खरोखर तोच हा योग तुला आज आम्हीं सांगितला आहे. तूं कांहींसुद्धां शंका धरूं नको. २७ हा योग म्हणजे माझा जीव कीं प्राण आहे; परंतु तुजपासून तो चोरून कसा ठेवावा? कारण, तूं माझा फार आवडता भक्त आहेस. २८ धनुर्धरा, तूं केवळ प्रेमाची मूर्ति असून भक्तीचा जिव्हाळा, जिवलग मित्रत्वाचें तर केवळ जीवन; २९ आणि माझ्या ऐक्यभावाचें ठिकाण तूं आहेस, म्हणून आपण जरी युद्धास सिद्ध झालों आहों तरी हा योग तुझ्यापासीं चोरून कसा ठेवावा; ३० कारण, युद्धाची गडबड असली तरी ती क्षणभर एके बाजूस ठेवून त्यास न जुमानतां प्रथम तुझें अज्ञान आम्हांस दूर केलें पाहिजे. ३१

अन्वय–भवतः जन्म अपरं, विवस्वतः जन्म परं (अस्ति; अतः) त्वं आदौ प्रोक्तवान् इति एतत् (अहं) कथं विजानीयाम्? ॥४॥

अर्थ–अर्जुन ह्मणालाः—कृष्णा, तुमचा जन्म अलीकडचा, आणि सूर्य तर प्राचीन काळचा; तेव्हां तुम्ही त्याला प्रथम योग सांगितला, हें मी कसें समजावें? ॥४॥

त्या वेळेस अर्जुन म्हणतो, "हे कृपानिधे, श्रीहरि! आईनें आपल्या लेंकरावर प्रेम केलें तर त्यांत आश्चर्य तें कोणतें? ३२ तूं संसारांत थकलेल्यांची सावली व दीन जनांची माऊली आहेस; आणि जणूं काय आमचा जन्म तुमचेच कृपेपासून झाला आहे. ३३ देवा, आईला पांगळें मूल झालें, तर त्याच्या जन्मापासून तिला त्रास सोसावा लागतो, हें सर्व तुम्ही जाणतां; तर आम्ही तुमच्या पुढें तुमचें महत्त्व काय बोलावें? ३४ आतां मी जें कांहीं विचारणार आहें, त्याकडे चांगलें लक्ष द्यावें; व त्या गोष्टीचा राग मनांत आणूं नये. ३५ हे अनंता, तुम्हीं जी मागील गोष्ट म्हणून सांगितली, (सूर्याला हा कर्मयोग मी सांगितला त्याची) ती माझ्या मनाला

नावेक मज चित्ता । मानेचिना ३६ जे तो विवस्वतु म्हणजे कायी । ऐसें हें वडिलां ठाउवें नाहीं । तरी तुवांचि केवीं पाहीं । उपदेशिला ३७ तो तरी आइकिजे बहुतां काळांचा । आणि तूं तंव श्रीकृष्ण सांपेचा । क्षणोनि गा इये मातुचा । विसंवादु ३८ तेवींचि देवा चरित्र तुझें । आपण कांहींचि नेणिजे । हें लटिकें केवीं म्हणिजे । एकिहेळां ३९ परी होचि मातु आघवी । मी परियेसें ऐशी सांगावी । जे तुवांचि रवी केवीं पाही । उपदेशु केला ४०

श्रीभगवानुवाचः--

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन । तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥५॥

तंव श्रीकृष्ण म्हणे पंडुसुता । तो विवस्वतु जैं होता । तैं आम्ही नसों ऐसी चित्ता । भ्रांति जरी तुज ४१ तरी तूं गा हें नेणसी । पैं जन्में आम्हा तुम्हासी । बहुतें गेलीं परी न स्मरसी । आपुलीं तूं ४२ मी जेणें जेणें अवसरें । जें जें हो ऊनि अवतरें । तें समस्तही स्मरें । धनुर्धरा ४३

अजोऽपिसन्नव्ययात्माभूतानामीश्वरोऽपिसन् । प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥६॥

क्षणोनि हें आघवें । मागील मज आठवे । मी अजुही परि संभवें । प्रकृतियोगें ४४ माझें अव्ययत्व तरी न नसे । परी होणें जाणें एक दिसे । तें प्रतिबिंबे मायावशें । माझ्याचि ठायीं ४५ माझी स्वतंत्रता तरी न मोडे । परी कर्माधीनु ऐसा आवडे । तेही भ्रांतिबुद्धि तरी घडे । एऱ्हवीं नाहीं ४६ कीं एकचि दिसे दुसरें । तें दर्पणाचेनि आधारें । एऱ्हवीं काय वस्तुविचारें । दुजें आहे ४७ तैसा अमूर्तीचि मी किरीटी । परी प्रकृति जैं अधिष्ठीं । तैं साकारपणें नटनटीं । कार्यालागीं

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत । अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥७॥

जें धर्मजात आघवें । युगायुगीं म्यां रक्षावें । ऐसा ओघु हा स्वभावें । आघु असे ४९ म्हणोनि अजत्व परतें ठेवीं । मी अव्यक्तपणही नाठवीं । जे वेळीं धर्मातें अभिभवी । अधर्मु हा ५०

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥८॥

ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें । मी साकारु होऊनि अवतरें । मग अज्ञानाचे आंधारें । गिळूनि घालीं ५१ अधर्माची अवधी तोडी । दोषांचीं लिहिलीं फाडीं । सज्जनांकरवीं गुढी । सुखाची उभवीं ५२ दैत्यांचीं कुळें नाशीं साधूंचा मानु गिंवशीं । धर्मासीं नीतीशीं । शेंज भरीं ५३ मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळीं । तैं योगियां पाहे दिवाळी । निरंतर ५४

रुचत नाहीं. ३६ सूर्य म्हणजे कोण हें आमच्या वाडवडिलांनासुद्धां माहीत नाहीं. तर त्याला आपण कधीं व कसा उपदेश केला ? ३७ तो सूर्य तर फार जुनाट आहे असें ऐकतों, आणि आपण तर श्रीकृष्णा, हल्लींचे. म्हणून, ह्या गोष्टींत आम्हांला विरोध दिसतो. ३८ तशांतून देवा, तुमचें चरित्र अगाध ! आम्हांस कांहीं कळत नाहीं; तेव्हां, आपण म्हणतां तें खोटें आहे असें तरी आम्ही एकदम कसें म्हणावें ? ३९ तेव्हां मी सूर्याला उपदेश केला, हें जें आपण म्हणतां तें मला समजेल अशा रीतीनें स्पष्ट सांगा. " ४०

अन्वय–परंतप अर्जुन, मे तव च बहूनि जन्मानि व्यतीतानि; तानि सर्वाणि अहं वेद, त्वं न वेत्थ. ॥५॥

अर्थ–श्रीभगवान म्हणालेः—हे शत्रुतापना अर्जुना, माझे व तुझ बहुत जन्म होऊन गेले; त्या सर्वांचें स्मरण मला आहे, तुला (मात्र) नाहीं ! ॥५॥

तेव्हां श्रीकृष्ण म्हणालेः—अर्जुना, ज्या वेळेस तो सूर्य होता, त्यावेळेस आम्ही नव्हतों अशी जरी तुझ्या मनांत शंका आली, ४१ तरी तुला हें माहीत नाहीं, कीं तुझे व माझे जन्म पुष्कळ झाले, परंतु तुझ्या जन्मांची तुला आठवण नाहीं. ४२ अर्जुना, मीं ज्या ज्या वेळेस जे जे अवतार घेतले, त्या सर्व अवतारांचें मला स्मरण आहे. ४३

अन्वय–(अहं) अजः अव्ययात्मा अपि सन् भूतानां ईश्वरः अपि सन् स्वां प्रकृतिं अधिष्ठाय आत्ममायया संभवामि. ६

अर्थ–मी जन्मनाशरहित व सर्व भूतांचा नियंता असूनही, स्वकीय प्रकृतीचा स्वीकार करून आपल्या मायेनें जन्म घेतों. ॥६॥

म्हणून, मला मागील सर्व गोष्टींचें स्मरण आहे. मी जन्मरहित असूनही मायेचे योगानें अवतार घेतों; ४४ माझें अव्ययत्व नाहींसें होत नाहीं; पण अवतार घेणें व तो संपविणें हें जें भासतें, तें मायेच्या योगानें माझ्या ठिकाणींच भासतें. ४५ माझ्या स्वातंत्र्याचा तर भंग होत नाहींच; पण मी कर्माधीन आहें असें जें लोकांस वाटतें, तें भ्रांतीमुळें वाटतें; बाकी खरोखर पाहतां तसें कांहीं नाहीं. ४६ किंवा एकच वस्तु आरशाच्या योगानें दोन ठिकाणीं दिसते, पण वस्तुस्थितीचा विचार केला तर त्या दोन का आहेत ? ४७ त्याचप्रमाणें, अर्जुना, मी तर निराकारच आहे. पण जगत्कार्यासाठीं मायेचा स्वीकार करून नटाप्रमाणें बाह्यतः आकार धारण करितों. ४८

अन्वय–भारत, यदा यदा हि धर्मस्य ग्लानिः भवति अधर्मस्य (च) अभ्युत्थानं (भवति), तदा अहं आत्मानं सृजामि ७

अर्थ–अर्जुना, जेव्हां जेव्हां धर्म क्षीण होतो, आणि अधर्म वाढतो, तेव्हां तेव्हां मी अवतार घेतों. ॥७॥

धर्म म्हणून जेवढे आहेत त्यांचें म्यां युगायुगांचे ठायीं रक्षण करावें असा हा क्रम अगदीं मुळापासून चालत आलेला आहे, ४९ म्हणून, ज्या ज्या वेळीं अधर्मानें धर्माचा ऱ्हास होतो, त्या त्या वेळीं मी आपला जन्मरहितपणा बाजूला ठेवतों, व निराकारपणाची आठवणही धरीत नाहीं. ५०

अन्वय–साधूनां परित्राणाय, दुष्कृतां विनाशाय, धर्मसंस्थापनार्थाय च अहं युगे युगे संभवामि. ॥८॥

अर्थ–साधूचें रक्षण करण्याकरितां, दुष्टांचा समूळ नाश करण्याकरितां, व धर्म स्थापन करण्याकरितां मी युगायुगांच्या ठिकाणीं अवतीर्ण होतों. ॥८॥

त्या वेळीं भक्तांच्या कैवारानें मी देह धारण करून अवतार घेतों, आणि मग अज्ञानरूप अंधेरास गिळून टाकतों. ५१ अधर्माची मर्यादा तोडतों, दोषांनीं केलेल्या सनदा फाडून टाकतों, आणि जे साधु आहेत त्यांजकडून सुखाचे ध्वज उभारवितों. ५२ दैत्यकुलांचा नाश करतों, साधूंना योग्य मान देववितों, आणि धर्म व नीति ह्यांची ओटी भरतों (गांठ घालतों.) ५३ अविचाररूप काजळी काढून विचाररूप दिवा प्रज्वलित करतों, त्या वेळीं योगी लोकांना निरंतर आनंदाची दिवाळी भासते. ५४

सत्सुखें विश्व कोंदे । धर्मचि जगीं नांदे । भक्तां निघती दोंदें । सात्त्विकाचीं ५५ तैं पापांचा अचळु फिटे । पुण्यांची पहांट फुटे । जैं मूर्ति माझी प्रगटे । पंडुकुमरा ५६ ऐसेया काजालागीं । अवतरें मी युगींयुगीं । परी हेंचि वोळखे जो जगीं । तो विवेकिया ५७

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः । त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ९

माझें अजत्वें जन्मणें । अक्रियताचि कर्म करणें । हें अविकार जो जाणे। तो परममुक्त ५८ तो चालिला संगें न चले । देहींचा देहा नाकळे । मग पंचत्वीं तंव मिळे । माझ्याचि रूपीं ५९

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः । बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥१०॥

एऱ्हवीं परापर न शोचिती । जे कामनाशून्य होती । वाटा कें वेळीं न बचती । क्रोधाचिया ६० सदा मियांचि आथिले । माझिया सेवा जियाले । कीं आत्मबोधें तोषले । वीतराग जे ६१ जे तपोतेजाचिया राशी । कीं एकायतन ज्ञानासी । जे पवित्रता तीर्थांसी । तीर्थरूप ६२ ते मद्भावा सहजें आले । मी तेचि ते होऊनि ठेले । जे मज तयां उरले । पदर नाहीं ६३ सांगें पितळेची गंधिकाळिक । जैं फिटली होय निःशेख । तैं सुवर्ण काई आणिक । जोडूं जाइजे ६४ तैसे यमनियमीं कडसले । जे तपोज्ञानें चोखाळले । मी तेचि ते जाहले । एथ संशयो कायसा ६५

ये यथा मां पपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् । मम वर्त्माऽनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥११॥

एऱ्हवीं तरी पाहीं । जे जैसे माझ्या ठायीं । भजती तयां मीही । तैसाचि भजें ६६ देखें मनुष्यजात सकळ । हें स्वभावता भजनशीळ । जाहलें असे केवळ । माझ्याचि ठायीं ६७ परी ज्ञानेंवीण नाशिले । जे बुद्धिभेदासी आले । तेणेंचि त्या कल्पिलें । अनेकत्व ६८ ह्मणऊनि अभेदीं भेदु देखती । यया अनाम्या नामें ठेविती । देवी देवो म्हणती । अचर्चीतें ६९ जें सर्वत्र सदा सम तेथ विभाग अधमोत्तम । मतिवशें संभ्रम । विवंचिती ७०

कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः । क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥१२॥

मग नानाहेतुप्रकारें । यथोचितें उपचारें । मानिलीं देवतांतरें । उपासिती ७१ तेथ जें जें अपेक्षित । तें तैसेंचि पावती समस्त । परी तें कर्मफळ निश्चित । वोळख तूं ७२ वांचूनि देतें घेतें आणिक । निभ्रांत नाहीं सम्यक । एथ कर्मीचि

सत्सुखें विश्व कोंदे । धर्मचि जगीं नांदे । भक्तां निघती दोंदें । सात्त्विकाचीं ५५ तैं पापांचा अचळु फिटे । पुण्यांची पहांट फुटे । जैं मूर्ति माझी प्रगटे । पंडुकुमरा ५६ ऐसेया काजालागीं । अवतरें मी युगींयुगीं । परी हेंचि वोळखे जो जगीं । तो विवेकिया ५७

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः । त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ९

माझें अजत्वें जन्मणें । अक्रियताचि कर्म करणें । हें अविकार जो जाणे। तो परममुक्त ५८ तो चालिला संगें न चले । देहींचा देहा नाकळे । मग पंचत्वीं तंव मिळे । माझ्याचि रूपीं ५९

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः । बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥१०॥

एऱ्हवीं परापर न शोचिती । जे कामनाशून्य होती । वाटा कें वेळीं न बचती । क्रोधाचिया ६० सदा मियांचि आथिले । माझिया सेवा जियाले । कीं आत्मबोधें तोषले । वीतराग जे ६१ जे तपोतेजाचिया राशी । कीं एकायतन ज्ञानासी । जे पवित्रता तीर्थांसी । तीर्थरूप ६२ ते मद्भावा सहजें आले । मी तेचि ते होऊनि ठेले । जे मज तयां उरले । पदर नाहीं ६३ सांगें पितळेची गंधिकाळिक । जैं फिटली होय निःशेख । तैं सुवर्ण काई आणिक । जोडूं जाइजे ६४ तैसे यमनियमीं कडसले । जे तपोज्ञानें चोखाळले । मी तेचि ते जाहले । एथ संशयो कायसा ६५

ये यथा मां पपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् । मम वर्त्माऽनुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥११॥

एऱ्हवीं तरी पाहीं । जे जैसे माझ्या ठायीं । भजती तयां मीही । तैसाचि भजें ६६ देखें मनुष्यजात सकळ । हें स्वभावता भजनशीळ । जाहलें असे केवळ । माझ्याचि ठायीं ६७ परी ज्ञानेंवीण नाशिले । जे बुद्धिभेदासी आले । तेणेंचि त्या कल्पिलें । अनेकत्व ६८ ह्मणऊनि अभेदीं भेदु देखती । यया अनाम्या नामें ठेविती । देवी देवो म्हणती । अचर्चीतें ६९ जें सर्वत्र सदा सम तेथ विभाग अधमोत्तम । मतिवशें संभ्रम । विवंचिती ७०

कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः । क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥१२॥

मग नानाहेतुप्रकारें । यथोचितें उपचारें । मानिलीं देवतांतरें । उपासिती ७१ तेथ जें जें अपेक्षित । तें तैसेंचि पावती समस्त । परी तें कर्मफळ निश्चित । वोळख तूं ७२ वांचूनि देतें घेतें आणिक । निभ्रांत नाहीं सम्यक । एथ कर्मीचि

फळसूचक । मनुष्यलोकीं ७३ जैसें क्षेत्रीं जें पेरिजे । तेंवांचूनि आन न निपजे। कां पाहिजे तेंचि देखिजे । दर्पणाधारें ७४ नातरी कडेयातळवटीं । जैसा आपुलाचि बोलु किरीटी। पडिसादु होऊनि उठी। निमित्तयोगें ७५ तैसा समस्तां यां भजना। मी साक्षिभूतु पैं अर्जुना। एथ प्रतिफळे भावना। आपुलाली ७६

चातुर्वण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः । तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥१३॥

आतां याचिपरी जाण । चाऱ्ही हे वर्ण। सृजिले म्यां गुण- । कर्मविभागें ७७ जे प्रकृतीचेनि आधारें गुणाचेनि व्यभिचारें । कर्में तदनुसारें । विवंचिलीं ७८ एथ एकचि हे धनुष्यपाणी । परी जाहले गा चहूं वर्णीं । ऐसी गुणकर्मकडसणी । केली सहजें ७९ म्हणोनि आइकें पार्था। हे वर्णभेदसंस्था। मी कर्ता नव्हे सर्वथा । याचिलागीं ८०

न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा। इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बद्ध्यते १४

हें मजचिस्तव जाहलें । परी म्यां नाहीं केलें। ऐसें जेणें जाणितलें। तो सुटला गा

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः । कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥

मागील मुमुक्षु जे होते। तिहीं ऐशिया जाणोनि मातें। कर्में केलीं समस्तें। धनुर्धरा ८२ परि तें बीजें जैसीं दग्धलीं। नुगवतीचि पेरिलीं। तैसीं कर्मेंचि परि तयां जाहलीं। मोक्षहेतु ८३ एथ आणिकही एक अर्जुना। हे कर्माकर्मविवंचना। आपुलिये चाडें सज्ञाना। योग्यु नोहे ८४

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः। तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्१६

कर्म म्हणिपे तें कवण । अथवा अकर्मा काय लक्षण । ऐसें विचारितां विचक्षण । गुंफोनि ठेले ८५ जैसें कां कुडें नाणें । खऱ्याचेनि सारखेपणें । डोळ्याचेंहि देखणें । संशयीं घाली ८६ तैसें नैष्कर्म्यतेचेनि भ्रमें । गिंवसिजत आहाती कर्में । जे दुजी सृष्टि मनोधर्में । करूं सकती ८७ वांचूनि मूर्खांची गोठी कायसी। एथ मोहले गा क्रांतदर्शी। म्हणोनि आतां तोचि पारियेसीं। सांगेन तुज८८

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः । अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥१७॥

तरी कर्म म्हणजे स्वभावें । जेणें विश्वाकारु संभवे । तें सम्यक आधीं जाणावें । लागे एथ ८९ मग वर्णाश्रमासि उचित । जें विशेष कर्मविहित । तेंही बोळखावें निश्चित । उपयोगेंसीं ९० पाठीं जें निषिद्ध म्हणिपें । तेंही बुझावें

नुष्यलोकीं कर्मापासूनच फलप्राप्ति होते. ७३ जसें जमिनींत जें धान्य पेरावें त्यावांचून दुसरें उत्पन्न व्हावयाचें नाहीं, किंवा आरशांत जें पहावें तेंच दृष्टीस पडतें, ७४ किंवा, अर्जुना, डोंगराच्या कड्याखालीं ज्याप्रमाणें आपलाच शब्द आपण बोलल्यानें प्रतिध्वनि घेऊन उठतो, ७५ त्याचप्रमाणें, अर्जुना, प्रत्येक उपासनेला मीच आधारभूत आहे, म्हणून प्रत्येकास त्याचे भावनेप्रमाणें फलप्राप्ति होते. ७६

अन्वय–मया गुणकर्मविभागशः चातुर्वर्ण्यं सृष्टं; तस्य कर्तारं अपि मां अकर्तारं अव्ययं विद्धि ॥१३॥

अर्थ–गुणकर्मांच्या विभागानुसार (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे) चार वर्ण मीं उत्पन्न केले; (आणि म्हणून) ह्या वर्णांचा मी कर्ता असें दिसलें, तरी मी अकर्ता व अविकारी आहें, असें जाण. ॥१३॥

आतां ह्याचप्रमाणें तूं हेंही लक्षांत ठेव कीं, हे जे चार वर्ण आहेत; तेही गुण व कर्म यांच्या विभागानें मींच उत्पन्न केले आहेत; ७७ आणि त्या चाऱ्ही वर्णांच्या कर्मांची आपापल्या प्रकृतिधर्मानें आणि गुणांच्या तारतम्यानें व्यवस्था केली आहे. ७८ अर्जुना, हे सर्व लोक एकच असून, गुण व कर्म ह्यांच्या योगानें त्यांच्या चार वर्णांची व्यवस्था सहज झाली. ७९ गुणकर्मानुरूपच वर्णभेदाची व्यवस्था झाली आहे, म्हणून, पार्था, या वर्णभेदाच्या स्थापनेचा मी मुळींच कर्ता नाहीं. ८०

अन्वय–मां कर्माणि न लिंपन्ति, मे कर्मफले स्पृहा न, इति यः मां अभिजानाति, सः, कर्मभिः न बध्यते ॥१४॥

अर्थ–कर्में मला बद्ध करीत नाहींत, आणि कर्मफलाविषयीं मला आसक्तिही नाहीं. मी असा आहें असें जो जाणतो त्यालाही कर्में बद्ध करीत नाहींत. ॥१४॥

हा वर्णभेद जरी माझ्यापासून झाला आहे म्हणजे माझ्या सत्तेनें झाला आहे; तरी तो मीं केला नाहीं असें जो जाणतो तोच कर्मातीत झाला. ८१

अन्वय–एवं ज्ञात्वा, पूर्वैः मुमुक्षुभिः अपि पूर्वैः पूर्वतरं कृतं कर्म कृतं, तस्मात् त्वं कर्म एव कुरु. ॥१५॥

अर्थ–(मी कर्म करून अकर्ता आहें) असें माझ्याविषयीं जाणून पूर्वीच्या मुमुक्षूंनीं देखील त्यांच्या पूर्वीच्या मुमुक्षूंनीं पूर्वीच्या काळीं जशीं कर्में केलीं होतीं तशीं कर्में केलीं; म्हणून तूंही तसें कर्मच कर. ॥१५॥

अर्जुना, पूर्वीचे जे मुमुक्षु झाले, त्यांनीं अशा प्रकारेंच मला जाणून सर्व कर्में केलीं, ८२ परंतु ज्याप्रमाणें भाजलेलें बीं पेरलें असतां मुळींच उगवत नाहीं, त्याप्रमाणें त्यांचीं निष्काम कर्मेंच त्यांना मोक्षप्राप्तीस कारणीभूत झालीं. ८३ आणि अर्जुना, त्यांत आणखी एक गोष्ट अशी आहे कीं, हें कर्म आहे कीं अकर्म आहे ह्याचा विचार आपल्याच मतानें ठरविणें बुद्धिमानाससुद्धां कठीण आहे. ८४

अन्वय–किं कर्म किं अकर्म इति अत्र कवयः अपि मोहिताः तत् कर्म ते प्रवक्ष्यामि, यत् ज्ञात्वा अशुभात् मोक्ष्यसे ॥१६॥

अर्थ–कर्म ह्मणजे काय, व अकर्म ह्मणजे काय, हें जाणण्याविषयीं मोठे दूरदर्शी देखील मोहांत पडले आहेत ! असें जें कर्म, तें मी तुला सांगतों. तें जाणलें असतां तू संसारदुःखापासून मुक्त होशील. ॥१६॥

कर्म म्हणतात तें कोणतें, व अकर्माचें लक्षण काय हा विचार करतां करतां शहाणे देखील घोटाळ्यांत पडले. ८५ जसें खोटें नाणें खऱ्यासारखें हुबेहूब दिसल्यानें सराफाच्याही डोळ्यांस संशयांत घालते, ८६ तसें संकल्पमात्रेंकरून प्रतिसृष्टि निर्माण करण्याचें सामर्थ्य ज्यांना आहे ते ज्याला भ्रमानें नैष्कर्म्य असें समजतात तें वास्तविक कर्म असून ते कर्माचे पाशांत सांपडतात. ८७ कर्माकर्म विचारामध्यें मोठमोठ्या सर्वज्ञांची त्रेधा उडते मग मूर्खांची–अज्ञान्यांची गोष्ट कशाला पाहिजे ? म्हणून, तीच गोष्ट सांगतों ती ऐक. ८८

अन्वय–कर्मणः (तत्त्वं) हि बोद्धव्यं, निकर्मणः अपि (तत्त्वं) च बोद्धव्यं, अकर्मणः (तत्त्वं) च बोद्धव्यं; कर्मणः गतिः गहना (अस्ति). ॥१७॥

अर्थ–कर्माचें, व अकर्माचें तत्त्व यथार्थ जाणलेंच पाहिजे. कारण, त्या कर्मादिकांचें यथार्थ तत्त्व समजण्यास फार कठीण आहे. ॥१७॥

ईश्वराचे ठिकाणीं जीवांच्या कर्मानुसार विश्व उत्पन्न करण्याचा जो संकल्प, त्याचें नांव कर्म. त्याचें यथार्थ स्वरूप समजून घेतलें पाहिजे. ८९ मग जें कर्म वर्णाश्रमास योग्य व वेदांत सांगितलेलें आहे, त्याचीही अनुष्ठान, प्रकार व फल यासुद्धां ओळख करून घेतली पाहिजे. ९० आतां ज्याच्या ठिकाणीं सर्व कर्माचा निषेध सांगितला आहे, असा जो परमात्मा, तो आपलें स्वरूपच आहे अशा रीतीनें

नुष्यलोकीं कर्मापासूनच फलप्राप्ति होते. ७३ जसें जमिनींत जें धान्य पेरावें त्यावांचून दुसरें उत्पन्न व्हावयाचें नाहीं, किंवा आरशांत जें पहावें तेंच दृष्टीस पडतें, ७४ किंवा, अर्जुना, डोंगराच्या कड्याखालीं ज्याप्रमाणें आपलाच शब्द आपण बोलल्यानें प्रतिध्वनि घेऊन उठतो, ७५ त्याचप्रमाणें, अर्जुना, प्रत्येक उपासनेला मीच आधारभूत आहे, म्हणून प्रत्येकास त्याचे भावनेप्रमाणें फलप्राप्ति होते. ७६

अन्वय–मया गुणकर्मविभागशः चातुर्वर्ण्यं सृष्टं; तस्य कर्तारं अपि मां अकर्तारं अव्ययं विद्धि ॥१३॥

अर्थ–गुणकर्मांच्या विभागानुसार (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे) चार वर्ण मीं उत्पन्न केले; (आणि म्हणून) ह्या वर्णांचा मी कर्ता असें दिसलें, तरी मी अकर्ता व अविकारी आहें, असें जाण. ॥१३॥

आतां ह्याचप्रमाणें तूं हेंही लक्षांत ठेव कीं, हे जे चार वर्ण आहेत; तेही गुण व कर्म यांच्या विभागानें मींच उत्पन्न केले आहेत; ७७ आणि त्या चाऱ्ही वर्णांच्या कर्मांची आपापल्या प्रकृतिधर्मानें आणि गुणांच्या तारतम्यानें व्यवस्था केली आहे. ७८ अर्जुना, हे सर्व लोक एकच असून, गुण व कर्म ह्यांच्या योगानें त्यांच्या चार वर्णांची व्यवस्था सहज झाली. ७९ गुणकर्मानुरूपच वर्णभेदाची व्यवस्था झाली आहे, म्हणून, पार्था, या वर्णभेदाच्या स्थापनेचा मी मुळींच कर्ता नाहीं. ८०

अन्वय–मां कर्माणि न लिंपन्ति, मे कर्मफले स्पृहा न, इति यः मां अभिजानाति, सः, कर्मभिः न बध्यते ॥१४॥

अर्थ–कर्में मला बद्ध करीत नाहींत, आणि कर्मफलाविषयीं मला आसक्तिही नाहीं. मी असा आहें असें जो जाणतो त्यालाही कर्में बद्ध करीत नाहींत. ॥१४॥

हा वर्णभेद जरी माझ्यापासून झाला आहे म्हणजे माझ्या सत्तेनें झाला आहे; तरी तो मीं केला नाहीं असें जो जाणतो तोच कर्मातीत झाला. ८१

अन्वय–एवं ज्ञात्वा, पूर्वैः मुमुक्षुभिः अपि पूर्वैः पूर्वतरं कृतं कर्म कृतं, तस्मात् त्वं कर्म एव कुरु. ॥१५॥

अर्थ–(मी कर्म करून अकर्ता आहें) असें माझ्याविषयीं जाणून पूर्वीच्या मुमुक्षूंनीं देखील त्यांच्या पूर्वीच्या मुमुक्षूंनीं पूर्वीच्या काळीं जशीं कर्में केलीं होतीं तशीं कर्में केलीं; म्हणून तूंही तसें कर्मच कर. ॥१५॥

अर्जुना, पूर्वीचे जे मुमुक्षु झाले, त्यांनीं अशा प्रकारेंच मला जाणून सर्व कर्में केलीं, ८२ परंतु ज्याप्रमाणें भाजलेलें बीं पेरलें असतां मुळींच उगवत नाहीं, त्याप्रमाणें त्यांचीं निष्काम कर्मेंच त्यांना मोक्षप्राप्तीस कारणीभूत झालीं. ८३ आणि अर्जुना, त्यांत आणखी एक गोष्ट अशी आहे कीं, हें कर्म आहे कीं अकर्म आहे ह्याचा विचार आपल्याच मतानें ठरविणें बुद्धिमानाससुद्धां कठीण आहे. ८४

अन्वय–किं कर्म किं अकर्म इति अत्र कवयः अपि मोहिताः तत् कर्म ते प्रवक्ष्यामि, यत् ज्ञात्वा अशुभात् मोक्ष्यसे ॥१६॥

अर्थ–कर्म ह्मणजे काय, व अकर्म ह्मणजे काय, हें जाणण्याविषयीं मोठे दूरदर्शी देखील मोहांत पडले आहेत ! असें जें कर्म, तें मी तुला सांगतों. तें जाणलें असतां तू संसारदुःखापासून मुक्त होशील. ॥१६॥

कर्म म्हणतात तें कोणतें, व अकर्माचें लक्षण काय हा विचार करतां करतां शहाणे देखील घोटाळ्यांत पडले. ८५ जसें खोटें नाणें खऱ्यासारखें हुबेहूब दिसल्यानें सराफाच्याही डोळ्यांस संशयांत घालते, ८६ तसें संकल्पमात्रेंकरून प्रतिसृष्टि निर्माण करण्याचें सामर्थ्य ज्यांना आहे ते ज्याला भ्रमानें नैष्कर्म्य असें समजतात तें वास्तविक कर्म असून ते कर्माचे पाशांत सांपडतात. ८७ कर्माकर्म विचारामध्यें मोठमोठ्या सर्वज्ञांची त्रेधा उडते मग मूर्खांची–अज्ञान्यांची गोष्ट कशाला पाहिजे ? म्हणून, तीच गोष्ट सांगतों ती ऐक. ८८

अन्वय–कर्मणः (तत्त्वं) हि बोद्धव्यं, निकर्मणः अपि (तत्त्वं) च बोद्धव्यं, अकर्मणः (तत्त्वं) च बोद्धव्यं; कर्मणः गतिः गहना (अस्ति). ॥१७॥

अर्थ–कर्माचें, व अकर्माचें तत्त्व यथार्थ जाणलेंच पाहिजे. कारण, त्या कर्मादिकांचें यथार्थ तत्त्व समजण्यास फार कठीण आहे. ॥१७॥

ईश्वराचे ठिकाणीं जीवांच्या कर्मानुसार विश्व उत्पन्न करण्याचा जो संकल्प, त्याचें नांव कर्म. त्याचें यथार्थ स्वरूप समजून घेतलें पाहिजे. ८९ मग जें कर्म वर्णाश्रमास योग्य व वेदांत सांगितलेलें आहे, त्याचीही अनुष्ठान, प्रकार व फल यासुद्धां ओळख करून घेतली पाहिजे. ९० आतां ज्याच्या ठिकाणीं सर्व कर्माचा निषेध सांगितला आहे, असा जो परमात्मा, तो आपलें स्वरूपच आहे अशा रीतीनें

यथार्थ दृढनिश्चय झाला असतां, पुरुष कर्मामध्यें सहजच गुंतणार नाहीं, ९१ अशा विचाराचा जर अभाव असला, तर सर्व जग आपल्या ताब्यांत ठेवील; अशी कर्माची व्याप्ति फार जबर आहे. परंतु, प्रस्तुत हें असो. आतां वर सांगितल्याप्रमाणें कर्माकर्माचें यथार्थ ज्ञान प्राप्त असणाऱ्या पुरुषाचीं चिन्हें सांगतों; ऐक. ९२

अन्वय–यः कर्मणि अकर्म पश्येत्, अकर्मणि च यः कर्म पश्येत्, सः मनुष्येषु बुद्धिमान्, सः युक्तः, (सः) कृत्स्नकर्मकृत् (अस्ति). १८

अर्थ–जो कर्मांत अकर्म पाहतो, व अकर्मांत कर्म पाहतो, तो सर्व मनुष्यांत बुद्धिमान्, योगी व सर्व कर्मे करणारा होय. ॥१८॥

फळाची आशा न धरितां जो कर्माचें आचरण करितो, पण तें कर्म आपण करितों असें मानीत नाहीं. ९३ आणि त्याला अशा प्रकारें कर्मातीतपणा इतका चांगला समजला असतो कीं, त्याला आत्मस्वरूपाशिवाय जगांत दुसरें कांहीं उरलें नाहीं म्हणून कर्तव्य नाहींसें झालें. ९४ तथापि लोकदृष्ट्या तो सगळीं कर्मे नीट रीतीनें आचरीत आहे असें दिसलें तरी वरच्या लक्षणानें युक्त तोच ज्ञानी आहे. ९५ ज्याप्रमाणें एकादा मनुष्य नदीच्या कांठीं उभा राहिल्यावर आपलें प्रतिबिंब पाण्यांत पाहत असला तरी 'पाण्याहून मी वेगळा आहें' असें तो निःसंशय समजतो, ९६ अथवा नावेंत बसून जाणाऱ्या मनुष्यास नदीच्या कांठावरील झाडें धांवतात असें दिसतें, परंतु तोच खरें पाहूं लागला म्हणजे त्याला तीं झाडें अचल आहेत असें समजतें. ९७ त्याप्रमाणें, सर्व कर्मे करीत असतां, आपल्या ठिकाणीं कर्म प्रतितीला येतें तें अगदीं खोटें असून कर्मरहित जो परमात्मा तोच आपलें स्वरूप आहे असें जो जाणतो. ९८ आणि सूर्य उगवतो व मावळतो एवढ्याच प्रमाणावरून तो चालतो असें आपल्यास दिसतें तसें कर्म आचरीत असतां तें आपण करीत नाहीं असें जो जाणतो, ९९ तो मनुष्यासारखा जरी दिसतो, तरी तो मनुष्य नसून परब्रह्मच आहे असें समजावें. ज्याप्रमाणें सूर्याचें प्रतिबिंब पाण्यांत पडलें तरी सूर्य त्यांत नसतो, १०० असा जो पुरुष त्यानें कांहीं पाहिलें नाहीं, तरी सर्व विश्व पाहिलें, कांहीं केलें नाहीं, तरी सर्व केलें, कांहीं भोगिलें नाहीं, तरी यच्चयावत् भोग भोगिले. १ तो एकाच ठिकाणीं जरी बसला, तरी सर्वत्र गमन त्यानेंच केलें. हें असो, फार काय सांगावें, सर्व विश्वरूप तो बनला आहे.२

अन्वय–यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः (सन्ति), तं बुधाः ज्ञानाग्निदग्धकर्माणं पंडितं आहुः ॥१९॥

अर्थ–ज्याच्या सर्व कर्मांचे आरंभ फलाची इच्छा व कर्तेपणाचा अभिमान यांविरहित असतात, त्याला ज्ञानी जन 'ज्ञानाग्नीनें सर्व कर्मे दग्ध झालेला पंडित' असें म्हणतात. ॥१९॥

ज्या पुरुषाला कर्माचरणाविषयीं खेद होत नाहीं, परंतु कर्मफलाची इच्छा ज्याचे मनांत मुळींच उद्भवत नाहीं, २ आणि अमुक एक कर्म मी करीन अथवा अमुक कर्म सुरू केलेलें शेवटास नेईन, असा संकल्प देखील ज्याचे मनास स्पर्श करीत नाहीं, ४ कां ? तर–ज्ञानरूप अग्नीचे मुखांत ज्यानें आपलीं सर्व कर्मे जाळून टाकलीं आहेत,असा तो पुरुष म्हणजे मनुष्यरूपानें परब्रह्मच अवतरला आहे असें समज.५

अन्वय– यः,) कर्मफलासंगं त्यक्त्वा नित्यतृप्तः निराश्रयः (भवति), सः कर्मणि अभिप्रवृत्तः अपि न एव किंचित् करोति. ॥२०॥

अर्थ–जो कर्माचे फलाची इच्छा सोडून देतो, आणि (आत्मानंदांत) नित्य तृप्त राहून कशाचाही आश्रय करीत नाहीं, तो सर्व कर्मे करीत असला तरी वस्तुतः कांहींच करीत नाहीं. ॥२०॥

जो शरिराविषयीं उदासीन असतो, आणि कर्मापासून होणाऱ्या फलप्राप्तीविषयीं निरिच्छ असतो, व जो नेहमीं आनंदस्वरूपांत निमग्न असतो. ६पार्था, जो संतोषाच्या गाभाऱ्यामध्यें बसून आत्मबोधाचें पक्वान्न जेवीत असतां तो पुरे म्हणत नाहीं, ७

अन्वय–निराशीः यतचित्तात्मा, त्यक्तसर्वपरिग्रहः केवलं शारीरं कर्म कुर्वन् किल्बिषं न आप्नोति. ॥२१॥

अर्थ–ज्यानें आशा सोडली आहे, आपलें चित्त व बुद्धि हीं स्वाधीन ठेवलीं आहेत, आणि (अशा प्रकारें निरिच्छ होऊन) सर्व संग्रह सोडला आहे, त्यानें शरीरनिर्वाहापुरतीं (भिक्षाटनादिक) कर्मे केलीं तरी त्याला कर्माचा दोष लागत नाहीं. (संसार प्राप्त होत नाहीं.) २१

यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः । समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबद्ध्यते ॥२२॥

कैसी अधिकाधिक आवडी । घेत महासुखाची गोडी । सांडोनियां आशा कुरोंडी । अहंभावेंसीं ८ ह्मणोनि अवसरें जें जें पावे । तेणेंचि तो सुखावे । आपुलें आणि परावें । दोन्ही नाहीं ९ तो दिठीं जें पाहे । तें आपणचि होऊनि जाये । आइके तें आहे । तोचि जाहला ११० चरणीं हन चाले । मुखें जें जें बोले । ऐसें चेष्टाजात तितुलें । आपणचि जो ११ हें असो विश्व पाहीं । जयासि आपणपेंवांचूनि नाहीं । आतां कवण तें कर्म कायी । बाधी तयातें १२ हा मत्सरु जेथ उपजे । तेतुलें नुरेचि जया दुजें । तो निर्मत्सरु काइ ह्मणिजे । बोलवरी १३ ह्मणोनि सर्वांपरी मुक्तु । तो सकर्मुचि कर्मरहितु । सगुण परि गुणातीतु । एथ भ्रांति नाहीं १४

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः । यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥२३॥

तो देहसंगें तरी असे । परि चैतन्यासारिखा दिसे । पाहतां परब्रह्माचेनि कसें । चोखाळु भला १५ ऐसाही परी कौतुकें । जरी कर्में करी यज्ञादिकें । तरी तियें लया जाती निःशेखें । तयाचाचि ठायीं १६ अकाळींचीं अभ्रें जैशीं । उर्मीवीण आकाशीं । हरपती आपैशीं । उदयलीं सातीं १७ तैसीं विधिविधानें विहितें । जरी आचरे तो समस्तें । तरी तियें ऐक्यभावें ऐक्यातें । पावतीचि गा १८

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् । ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥२४॥

हें हवन मी होता । कां इये यज्ञीं हा भोक्ता । ऐसिया बुद्धीसि नाहीं भिन्नता । ह्मणऊनियां १९ जे इष्टयज्ञ यजावे । तें हविर्मंत्रादि आघवें । तो देखतसे अविनाशभावें । आत्मबुद्धि १२० ह्मणऊनि ब्रह्म तेंचि कर्म । ऐसें बोधा आलें जया सम । तया कर्तव्य तें नैष्कर्म्य । धनुर्धरा २१ आतां अविवेक कुमारत्वा मुकले । जयां विरक्तीचें पाणिग्रहण जाहलें । मग उपासन जिहीं आणिलें । योगाग्नीचें २२

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते । ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥२५॥

जे यजनशील अहर्निशी । जिहीं अविद्या हविली मनेंसीं । गुरुवाक्यहुताशीं । हवन केलें २३ तिहीं योगाग्निकीं यजिजे । तो दैवयज्ञु ह्मणिजे । जेणें आत्मसुख कामिजे । पंडुकुमरा २४ आतां अवधारी सांगेन आणिक । जे ब्रह्माग्नी साग्निक । तयांतें यज्ञचि यज्ञु देख । उपासिजे २५

अन्वय–यदृच्छालाभसंतुष्टः, द्वंद्वातीतः, विमत्सरः, सिद्धौ असिद्धौ च समः (पुरुषः) कृत्वा अपि न निबद्ध्यते.२२

अर्थ–सहजगत्या मिळेल त्यांत संतुष्ट असणारा, (मी व माझें या) द्वंद्वाच्या पलीकडे गेलेला, मत्सररहित, आणि कर्म पूर्ण किंवा अपूर्ण झालें असतां हर्ष किंवा खेद न मानणारा असा पुरुष संपूर्ण कर्मे करीत असतांही कर्मबंधानें लिप्त होत नाही. ॥२२॥

जो अहंकारासुद्धां आशेची ओंवाळणी करून अधिकाधिक प्रेमानें ब्रह्मसुखाची गोडी घेतो, ८ म्हणून ज्या ज्या वेळेस जें जें मिळेल त्यांतच तो सुख मानतो, आणि ज्याला आपलें आणि दुसऱ्याचें असा भेद नाहीं, ९ तो आपल्या दृष्टीनें जें जें पाहतो व ऐकतो, तें तो आपणच होतो. ११० पायानें चालतो, तोंडानें बोलतो, व त्याचप्रमाणें शरिरानें जितके व्यापार करतो, ते सर्व आपणच बनतो; ११ हें असो; फार काय सांगावें–जगतांत पाहिलें असतां आत्मस्वरूपावांचून ज्याला दुसरें कांहीं दिसत नाहीं, त्याला कोणत्या कर्मापासून कसली बाधा होणार? १२ हा मत्सर ज्या द्वैताच्या ठिकाणीं उत्पन्न होतो, तितकें सुद्धां द्वैत ज्याला दिसत नाहीं तो निर्मत्सर आहे, हें काय शब्दानें सांगितलें पाहिजे! १३ तो सर्व प्रकारें मुक्त आहे,तो सर्व कर्मे करीत असतांही कर्मरहित आहे, तो सगुण दिसतो, पण गुणातीत असतो यांत संशय नाहीं. १४

अन्वय–गतसंगस्य, मुक्तस्य, ज्ञानावस्थितचेतसः, यज्ञाय कर्म आचरतः (तत्) समग्रं प्रविलीयते. ॥२३॥

अर्थ–जो सर्वसंगविवर्जित असून धर्माधर्माच्या बंधांतून पार पडला आहे, आणि ज्याचें चित्त ज्ञानाचे ठिकाणीं स्थिर झालें आहे, तो जरी यज्ञ शेवटास नेण्याच्या उद्देशानें कर्म करीत असला, तरी त्याचें तें कर्म फलासहवर्तमान लय पावतें. ॥२३॥

तो देहधारी आहे तरी निर्गुणासारखा दिसतो, आणि ब्रह्माच्या कसाला लावून पाहिला तर त्याच्यासारखा शुद्ध दिसतो; १५ असा जरी तो केवळ मुक्त आहे, तरी एकादे वेळेस कौतुकानें यथाविधि यज्ञादिक कर्मांचें आचरण करितो, तरी तीं संपूर्ण कर्मे त्याच्याच ठिकाणीं लयाला जातात. १६ ज्याप्रमाणें आकाशांत अकालीं उत्पन्न झालेले पोकळ ढग वृष्टि केल्यावांचून आपोआप लयाला जातात, १७ त्याप्रमाणें, तो जरी वेदविहित कर्मे यथाविधि आचरीत असला, तरी त्या कर्मांच्या ठिकाणीं त्याचा दुजाभाव नसल्यामुळें तीं त्याचेच ठायीं लय पावतात. १८

अन्वय–ब्रह्म (एव) अर्पणं, ब्रह्म (एव) हविः, ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् (च) ब्रह्मकर्मसमाधिना तेन ब्रह्म एव गंतव्यं. २४

अर्थ–(कां कीं,) होमसाधन, होमद्रव्य, अग्नि, होता आणि हवनक्रिया हीं त्या ब्रह्मवेत्त्याच्या दृष्टीनें ब्रह्मच आहेत, आणि ब्रह्मरूप कर्माच्या ठिकाणीं लय लागून राहिलेल्या त्या ब्रह्मवेत्त्याला प्राप्त होणारें फलही ब्रह्मच आहे. ॥२४॥

हें एक हवन, त्याचा मी एक कर्ता, किंवा ह्या यज्ञाचा भोक्ता अमुक, अशा प्रकारें त्याच्या बुद्धीचा भिन्नभाव नाहीं; म्हणून, १९ जे जे इष्ट यज्ञ करतो, त्यांतील होमद्रव्यें व मंत्र हीं सर्व आत्मस्वरूप म्हणजे ब्रह्मस्वरूपच आहेत असें तो समजतो. १२० म्हणून, अर्जुना, ब्रह्म तेंच कर्म अशी समबुद्धि ज्याच्या अंतःकरणांत बाणली त्यानें कर्म केलें तरी तें नैष्कर्म्यच होय. २१ ज्याची अविचाररूप बाल्यावस्था गेल्यावर विरक्तीशीं लग्न लागलें, (कारण लग्न झाल्यावांचून अग्निसेवा करितां येत नाहीं) मग जीव ब्रह्मैक्यरूप जो योगाग्नी त्याची उपासना ज्यांनीं आरंभिली, २२

अन्वय–अपरे योगिनः दैवं एव यज्ञं पर्युपासते. अपरे ब्रह्माग्नौ यज्ञं यज्ञेन एव उपजुह्वति. ॥२५॥

अर्थ–दुसरे कित्येक योगी दैवयज्ञच (इंद्रादिक देवतांकरितां केलेला यज्ञच) करितात; आणि दुसरे कित्यक, ब्रह्मरूप अग्नीचे ठिकाणीं (यज्ञसंज्ञक) स्वधर्मानें यज्ञाचें (आत्म्याचें) हवन करितात. ॥२५॥

आणि रात्रंदिवस यज्ञ करणारे आहेत त्यांनीं गुरुवाक्यरूप अग्नींत मनासह अज्ञानाचें हवन केलें. २३ अर्जुना, ज्याला आत्मसुखाची इच्छा असेल त्यांनींच ह्या योगाग्नीचें यजन करावें, व ह्यालाच दैवयज्ञ असें म्हणतात. २४ आतां, जे ब्रह्माग्नीचे अग्निहोत्री स्वकर्मानें ईश्वराराधन करतात, त्यांजविषयीं वर्णन करितों तें ऐक. २५

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति । शब्दादीन्विषयानन्य इंद्रियाग्निषु जुह्वति ॥२६॥

एक संयमाग्निहोत्री । ते युक्तित्रयाच्या मंत्रीं । यजन करिती पवित्रीं । इंद्रियद्रव्यीं २६ एकीं वैराग्य रवि विवळे । तंव संयती विहार केले । तेथ अपावृत्त जाहले । इंद्रियानळ २७ तिहीं विरक्तीचि ज्वाळा घेतली । तंव विकारांचीं इंधनें पालिपलीं । तेथ आशाधूमें सांडिलीं । पांचही कुंडें २८ मग वाक्यविधीचिया निरवडी । विषय आहुती उदंडीं । हवन केलें कुंडीं । इंद्रियाग्नीच्या २९

सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे । आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥२७॥

एकीं ययापरी पार्था । दोषु क्षाळिले सर्वथा । आणिकीं हृदयारणीं मंथा । विवेकु केला १३० तो उपशमें निहटिला । धैर्यभारें दाटिला । गुरुवाक्यें काढिला । बळकटपणें ३१ ऐसें समरसें मथन केलें । तेथ झडकरी काजा आलें । जे उज्जीवन जहालें । ज्ञानाग्नीचें ३२ पहिला ऋद्धिसिद्धीचा संभ्रमु । तो निवतोंनि गेला धूमु । मग प्रगटला सूक्ष्मु । विस्फुलिंगु ३३ तया मनाचें मोकळें । तेंचि पेटवण घातलें । जें यमदमीं हळुवारलें । आइतें होतें ३४ तेणें सादुकपणें ज्वाळा समृद्धा । मग वासनांतराचिया समिधा । स्नेहेंसीं नानाविधा । जाळिलिया ३५ तेथ सोहंमंत्रें दीक्षितीं । इंद्रियकर्माचिया आहुती । तिये ज्ञानानळी प्रदीप्तीं । दिधलिया ३६ पाठीं प्राणक्रियेचिये स्रुवेनिशीं । पूर्णाहुती पडली हुताशीं । तेथ अवभृथ समरसीं । सहजें जहालें ३७ मग आत्मबोधींचें सुख । जें संयमाग्नीचें हुतशेष । तोचि पुरोडाशु देख । घेतला तिहीं ३८ एक ऐशिया इहीं यजनीं । मुक्त ते जाहले त्रिभुवनीं । या यज्ञक्रिया तरी आनानीं । पार्थ प्राप्य तें एक ३९

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे । स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥२८॥

एक द्रव्ययज्ञु म्हणिपती । एक तपसामग्रिया निपजविती । एक योगयागुही आहाती । जे सांगितले १४० एकीं शब्दीं शब्दु यजिजे । तो वाग्यज्ञु म्हणिजे । ज्ञानें ज्ञेय गमिजे । तो ज्ञानयज्ञु ४१ हें अर्जुना सकळ कुवाडें । जे अनुष्ठितां अतिसांकडें । परी जितेंद्रियासीचि घडे । योग्यतावशें ४२ ते प्रवीण तेथ भले । आणि योग्यसमृद्धि आथिले । म्हणोनि आपणपां तिहीं केलें । आत्महवन४३

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे । प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥२९॥

अन्वय–अन्ये श्रोत्रादीनि इंद्रियाणि संयमाग्निषु जुह्वति. अन्ये शब्दादीन् विषयान् इंद्रियाग्निषु जुह्वति. ॥२६॥

अर्थ–कोणी श्रोत्रादि ज्ञानेंद्रियांचें हवन संयमरूपी अग्नींत करितात; आणि दुसरे कोणी शब्दादि पंचविषयांचें हवन इंद्रियरूपी अग्नींत करितात. ॥२६॥

कोणी आत्मसंयमरूप अग्नीमध्यें होम करणारे– ते कायिक, वाचिक व मानसिक या तीन युक्तिमंत्रांनीं पवित्र इंद्रियरूप द्रव्यानें हवन करतात; २६ कोणी वैराग्यरूपी सूर्य उगवल्यावर संयमाग्नीचें उद्धरण करून तो प्रज्वलित झाल्यावर इंद्रियरूप अग्नि ज्ञानानें पेटवितात; २७ त्या इंद्रियाग्नीनें वैराग्यरूप ज्वाला घेतली तेव्हां लागलीच विषयविकाररूप लांकडें पेटलीं; तेव्हां ज्ञानेंद्रियांच्या पांच विषयांच्या कुंडांचा आशारूप धुरानें त्याग केला. २८ मग वेदांत सांगितलेल्या विधीच्या योगानें इंद्रियरूप अग्नि पेटलेल्या कुंडांत विषयांच्या मोठ्या आहुति दिल्या. २९

अन्वय–अपरे ज्ञानदीपिते आत्मसंयमयोगाग्नौ सर्वाणि इंद्रियकर्माणि प्राणकर्माणि च जुह्वति. ॥२७॥

अर्थ–दुसरे कोणी ज्ञानानें प्रदीप्त झालेल्या मनोनिग्रहरूपी अग्नींत सर्व इंद्रियांचीं व प्राणांचीं कर्में हवन करितात. ॥२७॥

पार्था, अशा प्रकारें कोणी आपल्या सर्व दोषांचें क्षालन केलें; कोणी हृदयरूप अरणीवर विचाररूप मंथा केला, व १३० तो धैर्यरूप भारानें दाबून आणि शांतिरूप रज्जूनें घुसळून, गुरुवाक्यरूप मंत्रानें मंथन केला. ३१ अशा प्रकारें सर्व वृत्तींचें ऐक्य करून मंथन केल्यानें तेथें तत्काल कार्य झालें. (तें कोणतें ?) तर ज्ञानाग्नि प्रज्वलित झाला ! ३२ तेव्हां प्रथम ऋद्धिसिद्धींचा मोह हाच उत्पन्न झालेला धूर नाहींसा होऊन मग सूक्ष्म अशी अग्नीची ठिणगी उत्पन्न झाली. ३३ यमदमांनीं शुष्क (वाळलेलें) झालेलें जें निर्दोष मन, त्याचें अग्नीला पेटवण घातलें. ३४ त्याच्या साहाय्यानें मोठी ज्वाला उत्पन्न झाली. नंतर वासनारूप समिधांना अनेक प्रकारचा मोह हें घृत लावून त्या जाळल्या, ३५ नंतर जीवरूप दीक्षितानें ज्ञानरूपी प्रदीप्त केलेल्या अग्नीत इंद्रियकर्मांची आहुति दिली. ३६ शेवटीं, प्राणकर्म ह्याच स्रुवा नांवाच्या यज्ञपात्रासह अग्नीमध्यें पूर्ण आहुति दिल्यावर, ऐक्यबोध हें [यज्ञाच्या शेवटचें] अवभृथस्नान सहज घडलें, ३७ आणि संयमाग्नीत इंद्रियादिक होमद्रव्यांचें हवन करून वाकी राहिलेलें जें आत्मसुख, तेंच पुरोडाश ह्मणून घेतलें. ३८ कोणी अशा रीतीनें यज्ञ करून त्रिभुवनांत मुक्त झाले; ह्मणून या यज्ञक्रिया जरी नानाप्रकारच्या आहेत, तरी त्यांची अखेर फलप्राप्ति एकच आहे. ३९

अन्वय–अपरे संशितव्रताः द्रव्ययज्ञाः तपोयज्ञाः योगयज्ञाः तथा च स्वाध्यायज्ञानयज्ञाः यतयः (सन्तिः). २८

अर्थ–दुसरे कोणी आरंभिलेलें कर्म निश्चयानें कडेला नेणारे यति असून द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ स्वाध्याय (वेदाध्ययन) नामक यज्ञ व ज्ञानयज्ञ असे मोक्षप्राप्तीकरितां नानाप्रकारचे यज्ञ करितात. ॥२८॥

हे जे योग सांगितले, त्यांपैकीं एकाला ' द्रव्ययज्ञ ' म्हणतात, एकाला (तपःसामर्थ्यानें केलेला ' तपोयज्ञ ' म्हणतात. एकाला (अष्टांगसाधनानें साधलेला) ' योगयज्ञ ' म्हणतात. १४० ज्यामध्यें शब्दानें शब्दाचा होम केला जातो, त्याला ' वाग्यज्ञ ' ह्मणतात; आणि ज्या यज्ञांत ज्ञानानें ब्रह्म मिळतें, त्याला ' ज्ञानयज्ञ ' म्हणतात. ४१ अर्जुना, हे सर्व यज्ञ फार विकट असून यांचें आचरण करणें फार दुर्घट आहे; परंतु ज्यानें इंद्रियें जिंकलीं आहेत, त्यास मात्र ते अधिकारपरत्वें करितां येतील. ४२ योगसमृद्धीनें सुसंपन्न असलेले पुरुषच हे यज्ञ करूं शकतील; कारण त्यांनीं आपल्या जीवाचें आत्म्याचे ठिकाणीं हवन केलेलें असतें. ४३

अन्वय–तथा, अपरे अपाने प्राणं जुह्वति, प्राणे च अपानं (जुह्वति; तथा अपरे) प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः (सन्ति). ॥२९॥

अर्थ–त्याचप्रमाणें, कोणी अपानवायूच्या ठिकाणीं प्राणवायूचा प्रक्षेप (पूरक) करितात; कोणी प्राणवायूच्या ठिकाणीं अपानवायूचा प्रक्षेप (रेचक) करितात; आणि कोणी प्राण व अपान ह्या दोन वायूंचा निरोध (कुंभक) करितात; ह्यांना प्राणायामपरायण योगी म्हणतात. ॥२९॥

मग अपानाग्नीचेनि मुखीं । प्राणद्रव्यें देखीं । हवन केलें एकीं । अभ्यासयोगें ४४ एक अपानु प्राणीं अर्पिती । एक दोहींतेंही निरुंधिती । ते प्राणायामी ह्मणिपती । पंडुकुमरा ४५

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति । सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥३०॥

एक वज्रयोगक्रमें । सर्वाहारसंयमें । प्राणीं प्राणु संभ्रमें । हवन करिती४६ ऐसे मोक्षकाम सकळ । समस्त हे यजनशीळ । जिहीं यज्ञद्वारा मनोमळ । क्षाळण केले ४७ जया अविद्याजात जालिता । जें उरलें निजस्वभावता । जेथ अग्नि आणि होता । उरेचिना ४८ जेथ यजितयाचा कामु पुरे । यज्ञींचें विधान सरे । मागुतें जेथूनि वोसरें । क्रियाजात ४९ विचार जेथ न रिगे । हेतु जेथ न निगे । जें द्वैतदोषसंगें । सिंपेचिना १५०

यज्ञशिष्टामृतभुजो यांति ब्रह्म सनातनम् । नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥३१॥

ऐसें अनादिसिद्ध चोखट । जें ज्ञान यज्ञावशिष्ट । तें सेविती ब्रह्मनिष्ठ । ब्रह्माहंमंत्रें ५१ ऐसे शेषामृतें धाले । कीं अमर्त्यभावा आले । ह्मणोनि ब्रह्म ते जहाले । अनायासें ५२ येरां विरक्ति माळ न घालिचि । जयां संयमाग्नीची सेवा न घडेचि । जे योगयागु न करितीचि । जन्मले साते ५३ जयां ऐहिक धड नाहीं । तयांचें परत्र पुससी काई । ह्मणोनि असो हे गोठी पाहीं । पंडुकुमरा ५४

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे । कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥३२॥

ऐसें बहुतीं परी अनेग । जे सांगितले तुज कां याग । ते विस्तारूनि वेदेंचि चांग । म्हणितले आहाती ५५ परि तेणें विस्तारें काय करावें । होंचि कर्मसिद्धि जाणावें । येतुलेनि कर्मबंधु स्वभावें । पावेल ना ५६

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप । सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥३३॥

अर्जुना वेदु जयांचें मूळ । जे क्रियाविशेषें स्थूळ । जया नव्हाळियेचें फळ स्वर्गसुख ५७ ते द्रव्यादियागु कीर होती । परी ज्ञानयज्ञाची सरी न पवती । जैसी तारातेजसंपत्ती । दिनकरापाशीं ५८ देखें परमात्म सुखनिधान । साधावया योगीजन । जे न विसंबिती अंजन । उन्मेषनेत्रीं ५९ जें धांवतया कर्मांची लाणी । नैष्कर्म्यबोधाची खाणी । जें भुकेलिया धणी । साधनाची१६०

कोणी अभ्यासाचे योगानें अपानवायुरूप अग्नींत प्राणवायुरूप द्रव्याचें हवन करितात; ४४ हे पंडुकुमरा, कोणी अपानवायु प्राणवायूंत मिळवितात; आणि कोणी दोन्ही वायूंचा निरोध करितात; त्यांना 'प्राणायामी' यज्ञ करणारे असें ह्मणतात. ४५

अन्वय अपरे नियताहाराः (रूनतः) प्राणान् प्राणेषु जुह्वति. एते सर्वे अपि यज्ञविदः यज्ञक्षपितकल्मषाः (सन्ति).३०

अर्थ–दुसरे, आहार नियमित करून प्राणांतच प्राणांचें हवन करितात. हे सर्व यज्ञ जाणणारे योगी यज्ञानें पापांचा नाश करितात. ॥३०॥

कोणी हठयोगाच्या क्रमानें सर्व आहार जिंकून प्राणवायुरूपी अग्नींत त्वरेनें प्राणांचें हवन करतात. ४६ अशा प्रकारें मोक्षप्राप्तीचीच इच्छा करणारे हे सर्व सांगितलेले यज्ञकर्ते असून, त्यांनीं त्या यज्ञांच्या द्वारें आपले कामक्रोधादिक विकार नाहींतसे केलेले असतात. ४७ अशा प्रकारें सर्व अविद्या–अज्ञान–जाळून टाकल्यामुळें त्याला स्वाभाविकपणेंच शुद्ध स्वरूप उरतें, व अग्नि आणि यज्ञ करणारा असा द्वैतभाव रहात नाहीं; ४८ ज्या ठिकाणीं यज्ञ करणाराची इच्छा पूर्ण होऊन यज्ञक्रिया संपतात, आणि अर्थात् शेवटीं सर्व कर्मे नाहींतशीं होतात; ४९ ज्या ठिकाणीं विचाराचा शिरकाव होत नाहीं, कामनेचा स्पर्श होत नाहीं, व द्वैतदोषांचा स्पर्श होत नाहीं; १५०

अन्वय–कुरुसत्तम, यज्ञशिष्टामृतभुजः सनातनं ब्रह्म यान्ति. अयज्ञस्य अयं लोकः न अस्ति; कुतः अन्यः ? ३१

अर्थ–हे कुरुकुलश्रेष्ठा, यज्ञाचा अवशिष्ट प्रसाद घेणारे लोक सनातन ब्रह्मप्रत प्राप्त होतात. यज्ञ न करणाराला इहलोक देखील नाहीं, मग परलोक कोठून मिळणार ?३१

असें जें अनादिसिद्ध व शुद्धयज्ञावशिष्ट ब्रह्म, त्या ब्रह्माचें, ब्रह्मनिष्ठ लोक हे अहं ब्रह्मास्मि–मी ब्रह्म आहें–या मंत्रानें सेवन करितात. (ब्रह्मरूप होतात.) ५१ ह्याप्रमाणें यज्ञाचें शिलक राहिलेलें ज्ञानरूप अमृत पिऊन जे तृप्त होऊन अमर होतात, ते सहज ब्रह्मत्व पावतात. ५२ ज्यांच्या हातून या यज्ञाचें आचरण घडत नाहीं, ज्यांना विरक्ति माळ घालीत नाहीं, ज्यांना आत्मसंयमन करतां येत नाहीं, व जे जन्मास आले असतां योगयागही करीत नाहींत; ५३ अर्जुना, ज्यांची इहलोकीं धडगत नाहीं, त्यांची परलोकची हालहवाल कशाला पुसतोस ? त्यांच्याविषयीं गोष्टच बोलणें नको. ५४

अन्वय–एवं बहुविधाः यज्ञाः ब्रह्मणः मुखे विततः (सन्तिः त्वं) तान् सर्वान् कर्मजान् विद्धि; एवं ज्ञात्वा (त्वं) विमोक्ष्यसे. ॥३२॥

अर्थ–ह्याप्रमाणें, जे अनेक प्रकारचे यज्ञ वेदांनीं सांगितले आहेत, ते सर्व कर्मापासून उत्पन्न होणारे आहेत असें समज.असें तूं जाणलेंस ह्मणजे तूं मोक्ष पावशील.३२

अशा प्रकारें जे तुला पुष्कळ प्रकारचे (बारा) यज्ञ सांगितले, त्यांच्याबद्दल वेदांत पुष्कळ विस्तारानें चांगलें वर्णन केलें आहे. ५५ परंतु वेदांतील त्यांचें वर्णन ऐकून आपल्याला काय करावयाचें आहे ? त्यांतील सार हेंच कीं, हे सर्व यज्ञ कर्मापासून उत्पन्न झालेले आहेत, एवढें जाणलें असतां कर्माची बाधा होणार नाहीं. ५६

अन्वय–परंतप, द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः श्रेयान्; पार्थ, सर्वं अखिलं कर्म ज्ञाने परिसमाप्यते. ॥३३॥

अर्थ–हे शत्रुतापना, द्रव्यानें साध्य होणाऱ्या यज्ञापेक्षां ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे; कारण, पार्था, यच्चयावत् सर्व कर्मांचा ज्ञानामध्यें अंतर्भाव होतो. ॥३३॥

अर्जुना, ज्या यज्ञाचें मूळ वेद आणि ज्यांत क्रियांचा खटाटोप फार आहे व ज्यांचें प्रथम फल स्वर्ग आहे, ५७ ते कर्मयज्ञ आहेत खरे, परंतु सूर्यापुढें जसें नक्षत्रांचें तेज लोपतें, त्याप्रमाणें ते ज्ञानयज्ञाची बरोबरी पावत नाहींत. ५८ जें ज्ञानांजन डोळ्यांत घालून आत्मसुखरूप ठेवा मिळविण्याकरितां योगीजन रात्रंदिवस जागृत असतात, ५९ जें ज्ञान आरंभिलेल्या कर्माचें प्राप्यस्थान आहे, जें ब्रह्मावबोधाची खाण आहे, व आत्मप्राप्तीकरितां भुकेलेल्या साधकांच्या तृप्तीचें स्थान आहे, १६० ज्या

जेथ प्रवृत्ति पांगुळ जाहली । तर्काची दिठी गेली । जेणें इंद्रियें विसरलीं । विषयसंगु ६१ मनाचें मनपण गेलें । जेथ बोलाचें बोलकेपण ठेलें । जयामाजि सांपडलें । ज्ञेय दिसे ६२ जेथ वैराग्याचा पांगु फिटे । विवेकाचाही सोसु तुटे । जेथ न पाहतां सहज भेटे । आपणपें ६३

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥३४॥

तें ज्ञान पैं बरवें । जरी मनीं आथि आणावें । तरी संता यां भजावें । सर्वस्वेशीं ६४ जे ज्ञानाचा कुरुठा । तेथ सेवा हा दारवंठा । तो स्वाधीन करी सुभटा । वोळगोनी ६५ तरी तनुमनुजीवें । चरणासीं लागावें । आणि अगर्वता करावें । दास्य सकळ ६६ मग अपेक्षित जें आपुलें । तेंही सांगतील पुसिलें । जेणें अंतःकरण बोधलें । संकल्पा नये ६७

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव । येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥३५॥

जयाचेनि वाक्य उजिवडें । जाहलें चित्त निधडें । ब्रह्माचेनि पाडें । निःशंकु होय ६८ ते वेळीं आपणपेयां सहितें । इयें अशेषेंही भूतें । माझ्या स्वरूपीं अखंडितें । देखसी तूं ६९ ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल । तैं मोहांधकार जाईल । जैं श्रीगुरुकृपा होईल । पार्था गा १७०

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृतमः । सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥३६॥

जरी कल्मषाचा आगरु । तूं भ्रांतीचा सागरु । व्यामोहाचा डोंगरु । होउनी अससी ७१ तऱ्ही ज्ञानशक्तिचेनि पाडें । हें आघवेंचि गा थोकडें । ऐसें सामर्थ्य असे चोखडें । ज्ञानीं इये ७२ देखें विश्वभ्रमाऐसा । जो अमूर्ताचा कडवसा । तो जयाचिया प्रकाशा । पुरेचिना ७३ तया कायसे हे मनोमळू । हें बोलतांचि अति किडाळू । नाहीं येणें पाडें ढिसाळू । दुजें जगीं ७४

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन । ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥३७॥

सांगें भुवनत्रयाची काजळी । जे गगनामाजि उधवली । तिये प्रळयींचे बाहुटळी । काय अभ्र पुरे ७५ कीं पवनाचेनि कोपें । पाणियेंचि जो पळिपे । तो प्रळयानळू दडपे । तृणें काष्ठें काई ७६

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते । तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति ॥३८॥

ठिकाणीं कर्माची इच्छा राहिली व तर्क बंद राहिला, आणि ज्याच्या योगानें इंद्रियें विषय सेवन करणें विसरलीं, ६१ ज्या ठिकाणीं मनाचें मनपण गेलें, जेथें शब्दाची धांव खुंटली, आणि ज्या ठिकाणीं अंतर्गत जें ब्रह्म तें प्राप्त होतें, ६२ ज्या ठिकाणीं वैराग्याची कष्टप्रद स्थिति नाहींशी होते, विचाराची हाव नष्ट होते, आणि श्रमावांचून आत्मज्ञान होतें, ६३

अन्वय–तत्त्वदर्शिनः ज्ञानिनः तत् ज्ञानं प्रणिपातेन, परिप्रश्नेन, सेवया उपदेक्ष्यंति इति (त्वं) विद्धि. ॥३४॥

अर्थ–तत्त्वदर्शी ज्ञान्यांना नमस्कार करून नंतर प्रश्न करून त्यांची सेवा केली असतां ते त्या ज्ञानाचा तुला उपदेश करतील असें समज. ॥३४॥

असें जें सर्वोत्कृष्ट ज्ञान, तें तुला मिळविण्याची इच्छा असेल तर तूं ब्रह्मज्ञानसंपन्न असे जे संत त्यांची सेवा कर. ६४ ते संत ज्ञानाचें घर असून सेवाधर्म हा त्या घराचा उंबरठा आहे; तर अर्जुना, तूं तिकडे वळून सेवाधर्मरूपी उंबरठा आपल्या स्वाधीन करून घे. ६५ म्हणजे संतांची सेवा करती कशी म्हणशील तर–शरीरानें, मनानें व जीवानें सर्व प्रकारांनीं गर्वरहित होऊन चरणांची सेवा करावी. ६६ अशा प्रकारच्या सेवेनें प्रसन्न झाल्यानंतर त्या प्रसन्नस्थितींत त्यांना शिष्यांनीं जन्ममरण दुःखरूपसंसारनिवृत्तीविषयीं प्रश्न केला असतां तेही कृपेनें उपदेश करितात. त्या उपदेशापासून होणाऱ्या बोधाचें ऐश्वर्य असें आहे कीं, पुनश्च शिष्याचे अंतःकरणांत संसाराची कल्पनाही येत नाहीं. ६७

अन्वय–पांडव, यत् ज्ञात्वा पुनः एवं मोहं न यास्यसि, येन सर्वाणि भूतानि अशेषेण आत्मनि अथो मयि द्रक्ष्यसि.

अर्थ–हे पांडुपुत्रा, तें ज्ञान प्राप्त झालें असतां पुनः असा [भेदरूपी] मोह तुला होणार नाहीं; आणि त्या ज्ञानानें हीं सर्व भूतें तूं आपल्या स्वतांचे ठायीं आणि माझे ठायीं पाहशील. ॥३५॥

ज्यांच्या उपदेशापासून ब्रह्माप्रमाणें निःसंशय व निर्धास्तअंतःकरण ज्या वेळेस होईल, ६८ त्यावेळीं आपणासहवर्तमान सर्व भूतें माझ्या अखंड स्वरूपाच्या ठिकाणीं तूं पाहशील. ६९ पार्था, अशा रीतीनें जेव्हां सत्पुरुषांची कृपा होईल, तेव्हां तुझे अंतःकरणांत ज्ञानाचा उदय होऊन मोहरूपी अंधकार नाहींसा होईल. १७०

अन्वय–(त्वं) सर्वेभ्यः पापेभ्यः अपि पापकृतमः असि चेत् सर्वं वृजिनं ज्ञानप्लवेनैव (त्वं) संतरिष्यसि. ॥३६॥

अर्थ–तूं जरी सर्व पाप्यांपेक्षां अतिपापी असलास, तरी ज्ञानरूप नौकेच्याच साधनानें सर्व पापरूप समुद्र अनायासें तरून जाशील, ॥३६॥

तूं पातकाचें आगर, भ्रांतीचा सागर अथवा भ्रमाचा पर्वत जरी असलास, ७१ तरी ज्ञानाच्या शक्तीपुढें हें सर्व तुच्छ आहे; असें ह्या ज्ञानाच्या अंगीं उत्तम सामर्थ्य आहे. ७२ ज्या परमात्मज्ञानाचा उदय होतांच हें विश्व सत्य आहे अशा प्रकारचा भ्रम नष्ट होऊन जातो, ७३ त्या ज्ञानापुढें मनांतील अज्ञानाची काय कथा ? म्हणून तुझे मनांत ही शंका येणें हेंच बरोबर नाहीं; कारण ह्या जगांत ज्ञानाच्या तोडीची दुसरी वस्तूच नाहीं. ७४

अन्वय–अर्जुन, यथा समिद्धः अग्निः एधांसि भस्मसात् कुरुते, तथा ज्ञानाग्निः सर्वं कर्माणि भस्मसात् कुरुते. ३७

अर्थ–अर्जुना, प्रज्वलित झालेला अग्नि जसा काष्ठांचें भस्म करून टाकतो, तसा ज्ञानाग्नि सर्व कर्मांचें भस्म करून टाकतो. ॥३७॥

त्रैलोक्य पेटल्यावर आकाशांत पसरलेल्या त्याच्या धूराला पार उडवून देणारी जी प्रळयकाळची वावटळ, तिला ढग नाहींतसे करणें अवघड आहे का ? ७५ किंवा वाऱ्याच्या सहाय्यानें भडकला असतां जो पाणीही जाळून टाकतो, तो प्रलयकाळचा अग्नि गवत आणि काष्ठें ह्यांनीं विझेल का ? ७६

अन्वय–ज्ञानेन हि सदृशं इह पवित्रं न विद्यते; योगसंसिद्धः (पुरुषः) स्वयं तत् ज्ञानं कालेन आत्मनि विन्दति. ३८

अर्थ–कारण, ज्ञानाच्या बरोबरीचें पवित्र असें दुसरें ह्या जगांत कांहीं नाहीं, आणि योगानें युक्त झालेला पुरुष कालेंकरून तें [आत्मविषयक] ज्ञान स्वतांच मिळवितो. ॥३८॥

ह्मणोनि असो हें न घडे । तें विचारितांचि असंगडें । पुढती ज्ञानाचेनि पाडें । पवित्र न दिसे ७७ एथ ज्ञान हें उत्तम होये । आणिकही एक तैसें कें आहे । जैसें चैतन्य कां नोहें । दुसरें गा ७८ या महातेजाचेनि कसे। जरी चोखाळु प्रतिबिंब दिसे । कां गिंवसिलें गिंवसे । आकाश हें ७९ नातरी पृथ्वीचेनि पाडें । कांटाळें जरी जोडे । तरी उपमा ज्ञानीं घडे । पंडुकुमरा १८० ह्मणूनि बहुतीं परी पाहतां । पुढतीपुढती निर्धारितां । हे ज्ञानाची पवित्रता । ज्ञानींचि आथि ८१ जैसी अमृताची चवी निवडिजे । तरी अमृताचिसारिखी ह्मणिजे । तैसें ज्ञान हें उपमिजे । ज्ञानेसींचि ८२ आतां यावरी जें बोलणें । तें वायांचि वेळु फेडणें । तंव साचचि हें पार्थु म्हणे । जें बोलत असां ८३ परि तेंचि ज्ञान केवीं जाणावें । ऐसें अर्जुनें जंव पुसावें । तंव तें मनोगत देवें । जाणितलें ८४ मग ह्मणतसे किरीटी । आतां चित्त देयीं इये गोठी । सांगेन ज्ञानाचिये भेटी । उपावो तुज ८५

श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संनतेंद्रियः । ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ॥३९॥

तरी आत्मसुखाचिया गोडिया । विटे जो कां सकळ विषयां । जयाच्या ठायीं इंद्रियां । मानु नाहीं ८६ जो मनासी चाड न सांगे । जो प्रकृतीचें केलें नेघे । जो श्रद्धेचेनि संभोगें । सुखिया जाहला ८७ तयातेंचि गिंवसित । तें ज्ञान पावे निश्चित । जयामाजि अचुंबित । शांति असे ८८ तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे । आणि शांतीचा अंकुर फुटे । मग विस्तार बहु प्रकटे । आत्मबोधाचा ८९ मग जेउती वास पाहिजे । तेउती शांतीचि देखिजे । तेथ आपपरु नेणिजे । निर्धारितां १९० ऐसा हा उत्तरोत्तरु । ज्ञानबीजाचा विस्तारु । सांगतां असे अपारु । परि असो आतां ९१

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति । नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ४०

ऐकें जया प्राणियाच्या ठायीं । इया ज्ञानाची आवडी नाहीं । तयाचें जियालें ह्मणों काई । वरी मरण चांग ९२ शून्य जैसें गृह । कां चैतन्येंवीण देह । तैसें जीवित तें संमोह । ज्ञानहीन ९३ अथवा ज्ञान कीर आपु नोहे । परि ते चाड एकी जरी वाहे । तरी तेथ जिव्हाळा कांहीं आहे । प्राप्तीचा पैं ९४ वांचूनि ज्ञानाची गोठी कायसी । परि ते आस्थाही न धरी मानसीं । तरी

असो. ह्या गोष्टी कधीं घडून येणाऱ्या नाहींत, आणि त्यांचा विचार करणें हें असंगत दिसतें; म्हणून ज्ञानाचा जों जों विचार करावा, तों तों त्याच्या योग्यतेची पवित्र वस्तु दुसरी कोणतीच दिसत नाहीं. ७७ ज्याप्रमाणें चैतन्याला दुसरा पडोसा नाहीं, त्याप्रमाणें ह्या लोकीं ज्ञान ही उत्तम वस्तु असून त्याच्या बरोबरची दुसरी वस्तु कोठें मिळणार ? ७८ जर सूर्याचे कसोटीला त्याच्या प्रतिबिंबाचें तेज लागेल, किंवा आकाशाला आपल्या कवळ्यांत कवटाळतां येईल, ७९ किंवा पृथ्वीच्या बरोबरीची दुसरी वजनदार वस्तु सांपडेल, तरच, अर्जुना, ज्ञानाच्या किमतीची दुसरी वस्तु मिळेल. १८० म्हणून, पुष्कळ प्रकारानें वारंवार विचार करून पाहतां, ह्या ज्ञानाचा पवित्रपणा ज्ञानालाच आहे. ८१ अमृताची चव कोणीं विचारिली असतां ती जशी अमृतासारखीच असें म्हणावें लागतें, तशी ज्ञानाला ज्ञानाचीच उपमा ! ८२ आतां ह्यापेक्षां ज्ञानाविषयीं जास्त वाटावाट करणें म्हणजे वेळ व्यर्थ घालविणें होय. तेव्हां अर्जुन म्हणाला, " तुम्ही बोलतां तें खरें आहे " ८३ ' पण तें ज्ञान कोणत्या उपायानें प्राप्त करून घ्यावें 'असें जों अर्जुन पुसणार, तोंच त्याचे मनांतील हेतु देवांनीं जाणला; ८४ आणि मग अर्जुनास म्हटलें:—हे किरीटी ज्ञानप्राप्तीचा जो उपाय मी तुला आतां सांगणार आहें, त्या गोष्टीकडे लक्ष दे. ८५

अन्वय—श्रद्धावान, तत्परः, संयतेंद्रियः (च) ज्ञानं लभते; ज्ञानं लब्ध्वा अचिरेण परां शांन्ति अधिगच्छति. ३९

अर्थ—परम विश्वासू, ज्ञानप्राप्तीविषयीं तत्पर, आणि इंद्रियें जिंकलेला, अशा पुरुषास ज्ञान प्राप्त होतें; व तें प्राप्त झाल्यावर लवकरच उत्तम शांति प्राप्त होते. ॥३९॥

आत्मसुखाच्या गोडीनें ज्याचें मन सर्व विषयांविषयीं विटून जातें, आणि ज्याच्या ठिकाणीं इंद्रियांची मुळींच प्रतिष्ठा नाहीं, ८६ जो आपली इच्छा आपल्या मनाला कळूं देत नाहीं, जो प्राचीन कर्मसंस्कारानें उत्पन्न केलेल्या वासना विचारांत घेत नाहीं, दाबून टाकतो, आणि जो ज्ञानप्राप्तीच्या श्रद्धेनें संतोष पावतो, ८७ त्याच पुरुषास ज्या ज्ञानांत ओतप्रोत शांति भरलेली असते, असें ज्ञान शोधीत येऊन निश्चयानें प्राप्त होतें. ८८ तें ज्ञान मनाच्या ठिकाणीं स्थिर झालें म्हणजे मग शांतीचा अंकूर फुटून पुढें आत्मबोधाचा विस्तार होतो. ८९ मग तो जिकडे पाहील तिकडे त्याला शांतीच दिसते, आणि त्या शांतीचे ठिकाणीं खरोखर आपपरभाव नसतो. १९० अशा रीतीनें ज्ञानाविषयीं जेवढें वर्णन करावें, तेवढें थोडेंच आहे; तर ती गोष्ट आतां राहूं दे. ९१

अन्वय—अज्ञः च अश्रद्दधानः च संशयात्मा (च) विनश्यति; संशयात्मनः अयं लोकः न अस्ति, परलोकः न (अस्ति), सुखं (च न अस्ति.) ॥४०॥

अर्थ—अज्ञानी, अविश्वासी व संशययुक्त असा पुरुष नाशाप्रत पावतो; [स्वार्थाला मुकतो;] आणि त्या संशयी पुरुषास इहलोक, परलोक व मोक्षसुख हीं प्राप्त होत नाहींत. ॥४०॥

हें पहा—ज्या मनुष्याचे ठिकाणीं अशा प्रकारच्या ज्ञानाची आवड नाहीं, त्याचें जिणें काय म्हणावयाचें ? त्यापेक्षां मरण चांगलें ! ९२ एकादें ओसाड घर किंवा प्राणावांचून जसें शरीर, त्याचप्रमाणें ज्ञानहीन मनुष्याचें जीवित मोहयुक्त होय. ९३ खरें ज्ञान प्राप्त झालें नसलें, परंतु तें प्राप्त होण्याबद्दल जो मनुष्य इच्छा बाळगतो, त्याला कांहीं ज्ञानप्राप्तीचा संभव आहे. ९४ ज्ञान असण्याविषयींची गोष्ट राहिली; परंतु तें प्राप्त व्हावें, अशी ज्यास कळकळही नाहीं, तो संशयरूप अग्नींत प-

तो संशयरूप हुताशीं । पडिला जाण ९५ जे अमृतही परि नावडे । ऐसें सावियाचि आरोचकु जैं पडे । तैं मरण आलें असे फुडें । जाणों एकीं ९६ तैसा विषयसुखें रंजे । जो ज्ञानेसींचि माजे । तो संशयें अंगिकारिजे । एथ भ्रांति नाहीं ९७ मग संशयीं जरी पडिला । तरी निभ्रांत जाणें नासला । तो ऐहिकपरत्रा मुकला । सुखासि गा ९८ जया काळज्वरु आंगीं बाणे । तो शीतोष्णें जैशीं नेणे । आगी आणि चांदिणें । सरिसेंचि मानी ९९ तैसें साच आणि लटिकें । विरुद्ध आणि निकें । संशयीं तो नोळखे । हिताहित २०० हा रात्रिदिवसु पाहीं । जैसा जात्यंधा ठाउवा नाहीं । तैसें संशयीं असतां कांहीं । मना नये १

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् । आत्मवंतं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥४१॥

ह्मणऊनि संशयाहूनि थोर आणिक नाहीं पाप घोर । हा विनाशाची वागुर । प्राणियासी २ येणें कारणें तुवां त्यजावा । आधीं हाचि एकु जिणावा । जो ज्ञानाचिया अभावा- । माजि असे ३ जैं अज्ञानाचें गडद पडे । तैं हा बहुवस मनीं वाढे । ह्मणोनि सर्वथा मार्गु मोडे । विश्वासाचा ४ हृदयीं हाचि न समाये । बुद्धीतें गिंवसूनि ठाये । तेथ संशयात्मक होये । लोकत्रय ५

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः । छित्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥४२॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम चतुर्थोऽध्यायः४

ऐसा जरी थोरावे । तरी उपायें एकें आंगवे । जरी हातीं होय बरवें । ज्ञान खड्ग ६ तरी तेणें ज्ञानशस्त्रें तिखटे । निखळु हा निवटे । मग निःशेखता फिटे । मानसींचा ७ याकारणें पार्था । उठीं वेगीं वरौता । नाशु करोनि हृदयस्था । संशयासी ८ ऐसें सर्वज्ञाचा बापु । जो श्रीकृष्णु ज्ञानदीपु । तो म्हणतसे सकृपु । ऐकें राया ९ तंव या पूर्वापर बोलाचा । विचारूनि कुमरु पंडूचा । कैसा प्रश्नु अवसरीचा । करिता होईल २१० ते कथेची संगति । भावाची संपत्ति । रसाची उन्नति । म्हणिपेल पुढां ११ जयाचिया बरवेपणीं । कीजे आठां रसांची वोवाळणी । जो सज्जनाचिये आयणी । विसांवा जगीं १२ तो शांतुचि अभिनवेल । ते परियसा मन्हाठे बोल । जे समुद्राहूनि सखोल । अर्थभरित १३ जैसें बिंब तरी बचकेंचि एवढें । परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडें । श-

डला असें समज. ९५ कां कीं, अमृतहीं आवडत नाहीं अशी अरुचि जेव्हां सहज उत्पन्न होते, तेव्हां त्या मनुष्याचें मरण ओढवलें आहे असें जाणावें. ९६ त्याचप्रमाणें, विषयसुखांतच जो आनंद मानतो, आणि ज्ञानप्राप्तीविषयीं बेपरवा असतो, त्याला संशयानें ग्रासलें यांत संशय नाहीं. ९७ अशा रीतीनें जो संशयांत पडला, तो निःसंशय भ्रष्ट झाला; म्हणून तो इहलोकच्या व परलोकच्या सुखांस आंचवला ! ९८ ज्याला सन्निपात ज्वर झाला आहे, त्याला ज्याप्रमाणें शीत, उष्ण कळत नाहीं, आणि तो ऊन व चांदणें सारखेंच मानतो, ९९ त्याचप्रमाणें खरें, खोटें, अनुकूल व प्रतिकूल, हित, अहित हीं संशयी पुरुषाला कळत नाहींत, २०० ज्याप्रमाणें जन्मांधास रात्र व दिवस ठाऊक नसतात, त्याचप्रमाणें संशयी पुरुषाला कशाचीच ओळख नसते. १

अन्वय–धनंजय, योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयं आत्मवंतं कर्माणि न निबध्नंति. ॥४१॥

अर्थ–अर्जुना, योगानें ज्यानें सर्व कर्मांचा संन्यास केला आहे, ज्ञानानें ज्याचे संशय नाहींतसे झाले आहेत, व आत्मस्वरूप ज्याला प्राप्त झालें आहे, त्या पुरुषाला कर्मापासून बंधन प्राप्त होत नाहीं. ॥४१॥

म्हणून संशयापेक्षां दुसरें भयंकर पाप कोणतेंच नाहीं. प्राण्यांचा नाश करण्याचें हें एक जाळें आहे, २ ह्याकरितां तूं त्याचा संग सोडून आधीं ह्याला जिंक. ह्याचें वास्तव्य ज्ञानाच्या अभावीं असतें. ३ जेव्हां अज्ञानाचा निबिड काळोख असतो, तेव्हां हा संशय मनांत जास्त वाढतो, म्हणून तो विश्वासाचें नांव देखील येऊं देत नाहीं. ४ हा अंतःकरणांतच भरून राहतो असें नाहीं, तर हा बुद्धीलाही ग्रासून टाकितो, आणि मग त्या मनुष्याला तिन्ही लोक संशयात्मकच दिसूं लागतात. ५

अन्वय–भारत, तस्मात् अज्ञानसंभूतं हृत्स्थं आत्मनः एनं संशयं ज्ञानासिना छित्वा योगम् आतिष्ठ बुद्धाय (च) उत्तिष्ठ. ॥४२॥

अर्थ–म्हणून, अर्जुना, अज्ञानापासून उत्पन्न झालेला हा हृदयांतील संशय आपल्या ज्ञानरूप शस्त्रानें नाहींसा करून [ईश्वरार्पणरूप] कर्मयोगाचें अवलंबन कर, आणि युद्धास ऊठ. ॥४२॥

पण इतका जरी तो वाढला, तरी त्याला स्वाधीन करून घेण्याला एक उपाय आहेः तीव्र ज्ञानखड्ग जर हातीं असेल, ६ तर त्या तिखट शस्त्राच्या योगानें हा सर्व नाहींसा होतो; आणि मग त्याचा मनांतून समूळ नाश होतो. ७ म्हणून, पार्था, आपल्या मनांतील संशय नाहींसा करून लवकर ऊठ. ८ संजय धृतराष्ट्र राजास म्हणतोः राजा, ऐकः ज्ञानीजनांचे जनक जे ज्ञानदीप भगवान् श्रीकृष्ण ते अशा रीतीनें मोठ्या कृपेनें अर्जुनास म्हणाले. ९ तेव्हां, ह्या सर्व पूर्वापार कथेचा विचार करून तो अर्जुन समयोचित असा प्रश्न करील. २१० त्या कथेची जुळणी, अभिप्रायाची शोभा व रसाची गोडी पुढें सांगण्यांत येईल. ११ ज्याच्या बोलाच्या चांगलेपणावरून आठही रस ओंवाळून टाकावे, आणि जो सज्जनांच्या बुद्धीला ह्या जगतामध्यें विश्रांतीचें स्थान होय. १२ ज्या मराठी बोलापासून शांतरसच प्रगटेल, व जो समुद्रापेक्षां गंभीर असून अर्थभरित आहे, तो बोल ऐका. १३ जसें सूर्यबिंब हें बचकेंत मावण्याएवढेंच दिसतें, परंतु त्याचें प्रकाशाला त्रिभुवनसुद्धां पुरत नाहीं, तशी

ब्दाची व्याप्ति तेणें पाडें । अनुभवावी १४ नातरी कामितयाचिया इच्छा । फळे कल्पवृक्षु जैसा । बोलु व्यापकु होय तैसा । तरी अवधान द्यावें १५ हें असो काय म्हणावें । सर्वज्ञु जाणती स्वभावें । तरी निकें चित्त द्यावें । हे विनंती माझी १६ जेथ साहित्य आणि शांति । हे रेखा दिसे बोलती । जैसी लावण्यगुण कुळवती । आणि पतिव्रता १७ आधींचि साखर आवडे । तेचि जरी ओखदां जोडे । तरी सेवावी ना कां कोडें । नावानावा १८ सहजें मलयानिलु मंदु सुगंधु । तया अमृताचा होय स्वादु । आणि तेथेंचि जोडे नादु । जरी दैवगत्या १९ तरी स्पर्शें सर्वांग निववी । स्वादें जिव्हेतें नाचवी । तेवींचि कानांकरवीं । म्हणवी बापु माझा २२० तैसें कथेचें इये ऐकणें । एक श्रवणासि होय पारणें । आणि संसारदुःख मूळवणें । विकृतीविणें २१ जरी मंत्रोंचि वैरी मरे । तरी वायां कां बांधावीं कटारें । रोग जाय दुधसाखरें । तरी निंब कां पियावा २२ तैसा मनाचा मारु न करितां । आणि इंद्रियां दुःख न देतां । एथ मोक्षु असे आयता । श्रवणाचिमाजि २३ ह्मणोनि आथिलिया आराणुका । गीतार्थु हा निका । ज्ञानदेवो म्हणे आइका । निवृत्तिदासु २२४

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ श्लोक ४२, ओंव्या २२४.

या शब्दार्थाची व्याप्ति आहे असें अनुभवावें; १४ किंवा कल्पवृक्ष जसा कामीजनांच्या इच्छा पूर्ण करितो, तसे हे बोल सर्व इच्छा पूर्ण करणारे आहेत. म्हणून ह्यांच्याकडे लक्ष पुरवावें. १५ श्रोतेहो, तुम्हांला आणखी काय काय सांगावें ? तुम्ही जाणतेच आहां, तेव्हां नीट लक्ष द्यावें एवढीच माझी विनंती आहे. १६ ज्याप्रमाणें एकादी स्त्री सुंदर, गुणी आणि कुलशीलवती असून पतिव्रता असते, त्याप्रमाणें, या बोलण्याचे पद्धतीवरून, या बोलामध्यें सर्व अलंकार व शांति हीं स्पष्ट दिसतात. १७ अगोदर साखरेची आवड असून, ती जर औषधाच्या अनुपानांत दिली, तर ती आनंदानें वरचेवर कां न खावी ? १८ साहजिकपणें मैलागिरी पर्वतावरील सुगंध व मंद असा वारा वहात असून त्याला जर अमृताची गोडी आली, आणि दैवयोगानें तेथें जर पंचमसुरासारखा नाद कानीं आला, १९ तर त्या वाऱ्याच्या स्पर्शानें जसें सर्व अंग गार होईल, आणि गोडीनें जिव्हेला समाधान होईल, तसेंच मधूर स्वर ऐकल्यावर कान वाहवा म्हणतील, २२० त्याचप्रमाणें, हीच कथा ऐकल्यानें कानांचें पारणें फिटेल, आणि संसारदुःखापासून कांहींएक विकार न होतां तें आपोआप नाहींसें होईल. २१ जर मंत्रानेंच शत्रूचा नाश होईल, तर मग कंवरेला कट्यार कां बांधावी ? तसें दुधसाखरेनें जर रोग नाहींतसे होतील, तर कडुनिंबाचें सेवन कां करावें ? २२ त्याचप्रमाणें मनाला न जिंकतां व इंद्रियांना दुःख न देतां या श्रवणामध्येंच प्रत्यक्ष मोक्ष आहे; २३ म्हणून, निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणतात, " तुमच्या मनांत जितकी उत्कंठा असेल, तितक्या उत्कंठेनें हा गीतेचा अर्थ ऐका. " २२४

ज्ञानेश्वरी.

अध्याय पांचवा.

अर्जुन उवाचः—

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि । यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥१॥

मग पार्थु श्रीकृष्णातें म्हणे । हां हो हें कैसें तुमचें बोलणें । एक होय तरी अंतःकरणें । विचारूंये १ मागां सकळ कर्मांचा संन्यासु । तुम्हींचि निरोपिला होता बहुवसु । तरी कर्मयोगीं केवीं अतिरसु । पोखीतसां पुढती २ ऐसें व्यर्थ हें बोलतां । आम्हां नेणतयांच्या चित्ता । आपुलिये चाडे श्रीअनंता । उमजु नोहे ३ ऐकें एकसारातें बोधिजे । तरी एकनिष्ठचि बोलिजे । हें आणिकीं काय सांगिजे । तुम्हांप्रति ४ तरी याचिलागीं तुमतें । म्यां राउळासि विनविलें होतें । जे हा परमार्थु ध्वनितें । न बोलावा ५ परी मागील असो देवा । आतां प्रस्तुतीं उकलु देखावा । सांगें दोहोंमाजि बरवा । मार्गु कवण ६ जो परिणामींचा निर्वाळा । अचुंबितु ये फळा । आणि अनुष्ठितां प्रांजळा । सावियाचि ७ जैसें निद्रेचें सुख न मोडे । आणि मार्गु तरी बहुसाळ सांडे । तैसें सोहोकासन सांगडें । सोहपें होय ८ येणें अर्जुनाचेनि बोलें । देवो मनीं रिझले । मग होईल ऐकें म्हणितलें । संतोषोनियां ९ देखा कामधेनुऐसी माये । सदैवा जया होये । तो चंद्रुही परी लाहे । खेळावया १० पाहें पां श्रीशंभूची प्रसन्नता । तया उपमन्यूचिया आर्ता । काय क्षीराब्धि दूधभाता । देइजेचिना ११ तैसा औदार्याचा कुरुठा । श्रीकृष्ण आपु जाहलिया सुभटा । कां सर्व सुखांचा वसौटा । तोचि नोहावा १२ एथ चमत्कारु कायसा । गोसावी श्रीलक्ष्मीकांताऐसा । आतां आपुलिया सवेसा । मागावा कीं १३ ह्मणोनि अर्जुनें ह्मणितलें । तें हांसोनि येरें दिधलें । तेंचि सांगेन बोलिलें । काय कृष्णें ॥ १४ ॥

श्रीभगवानुवाचः—

संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ । तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥२॥

तो म्हणे गा कुंतीसुता । हे संन्यासयोगु विचारितां । मोक्षकरु तत्त्वता ।

ज्ञा ने श्व री.

अध्याय पांचवा.

अन्वय–कृष्ण, कर्मणां संन्यासं पुनः योगं च शंससि; एतयोः यत् एकं श्रेयः तत् मे सुनिश्चितं ब्रूहि. ॥१॥

अर्थ–अर्जुन म्हणालाः—कृष्णा, एकदा कर्मसंन्यासाची प्रशंसा करितां, व पुनः कर्मयोगाची प्रशंसा करितां; तेव्हां या दोहोंमध्यें जें एक कल्याणकारक असेल, तें निश्चयेंकरून मला सांगा. ॥१॥

मग अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला, " अहो, असलें कसलें हें तुमचें [दुट्टप्पी] बोलणें ? तुम्ही एक कांहीं तरी सांगाल तर त्याचा अंतःकरणपूर्वक विचार करतां येईल. १ सर्व कर्मांचा त्याग करावा, असें परोपरीनें पूर्वी तुम्हींच निरूपण केलें; आणि आतां कर्म करण्याविषयीं पुनः आग्रह कां वाढवितां ? २ हे अनंता, असें तुमचें व्यर्थी बोलणें आमच्यासारख्या अज्ञान जनांच्या चित्ताला आमच्या बुद्धीनें उमजत नाहीं. ३ हें पहा देवा, एक तत्त्वाचा बोध करणें असेल, तर एकच मार्ग सांगावा, हें दुसऱ्यांनीं का आपल्याला सांगावयास पाहिजे. ४ तरी याचकरितां मीं पूर्वी तुमची विनवणी केली होती कीं, हा परमार्थ गूढ अर्थानें सांगूं नका; ५ पण, देवा, ती मागील गोष्ट राहूं द्या, प्रस्तुत दोन्ही मार्गांपैकीं उत्तम मार्ग कोणता हें स्पष्ट करून सांगा. ६ तो मार्ग शेवटपर्यंत सोबत देऊन बिनचूक फलप्रद होणारा व आचरण्यास सुलभ असा असावा. ७ ज्याप्रमाणें सोपें व सुखावह वाहन असलें म्हणजे झोंप न मोडतां पुष्कळ मार्ग क्रमिला जातो, त्याप्रमाणें तुम्ही मला सुलभ साधन सांगा. " ८ याप्रमाणें अर्जुनाचें बोलणें ऐकल्यावर देव मनांत फार प्रसन्न झाले, आणि परम उल्हासानें अर्जुनास म्हणाले, "तूं म्हणतोस त्याप्रमाणें होईल. " ९ ऐक. ज्ञानेश्वर म्हणतातः—पहा–ज्या प्रारब्धवान् पुरुषाला कामधेनूसारखी आई मिळाली आहे, त्याला खेळण्याला चंद्र देखील मिळेल. १० आणखी असें पहा कीं, उपमन्यूला श्रीशंकर प्रसन्न झाल्यावर त्याचे इच्छेप्रमाणें दूधभाताचे ऐवजीं त्याला त्यांनीं क्षीरसमुद्र दिला नाहीं का ? ११ त्याचप्रमाणें, औदार्याचें भांडार असा जो श्रीकृष्ण परमात्मा, तो अर्जुनास प्राप्त झाला असतां सुखाचें वसतीस्थान त्यांनीं कां न व्हावें ? अर्थात् होईलच. १२ किंवा, श्रीलक्ष्मीकांतासारखा ज्याचा धनी, त्यानें आपले इच्छेप्रमाणें मागावें यांत चमत्कार तो कोणता? १३ म्हणून, अर्जुनानें जें जें मागितलें, तें तें त्याला सुप्रसन्न वदनानें श्रीकृष्णांनीं दिलें, तें काय तें आतां सांगतों. १४

अन्वय–संन्यासः कर्मयोगः च उभौ निःश्रेयसकरौ (स्तः); तयोः तु कर्मसंन्यासात् कर्मयोगः विशिष्यते. ॥२॥

अर्थ–श्रीभगवान म्हणालेः—कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे दोन्ही मोक्षदायक आहेत; परंतु त्या दोहोंमध्यें, कर्मसंन्यासापेक्षां कर्मयोग श्रेष्ठ आहे. ॥२॥

भगवान् म्हणालेः–हे कुंतीसुता, खरोखर विचार केला असतां, कर्मयोग आणि कर्मत्याग हे दो-

दोनीही होती १५ तरी जाणानेणा सकळां । हा कर्मयोगु कीर प्रांजळा । जैसें नाव स्त्रियां बाळां । तोयतरणीं १६ तैसें सारासार पाहिजे । तरी सोहपा हाचि देखिजे । येणें संन्यासफळ लाहिजे । अनायासें १७ आतां याचिलागीं सांगेन। तुज संन्यासियाचें चिन्ह । मग सहजें हें अभिन्न । जाणसी तूं १८

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो , द्वेष्टि न काङ्क्षति । निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ३

तरी गेलियाची से न करी । न पवतां चाड न धरी । जो सुनिश्चळु अंतरीं। मेरु जैसा १९ आणि मी माझें ऐसी आठवण । विसरलें जयाचें अंतःकरण। पार्था तो संन्यासी जाण । निरंतर २० जो मनें ऐसा जाहला । संगीं तोचि सांडिला । ह्मणोनि सुखें सुख पावला । अखंडित २१ आतां गृहादिक आघवें । तें कांहीं नलगे त्यजावें । जे घेतें जाहलें स्वभावें । निःसंगु ह्मणऊनि २२ देखें अग्नि विझोनि जाये । मग जे राखोंडी केवळु होये । तैं ते कापुसें गिंवसूंये । जियायरी २३ तैसा असतेनि उपाधी । नाकळिजे तो कर्मबंधीं । जयाचिये बुद्धी । संकल्पु नाहीं २४ ह्मणोनि कल्पना जैं सांडे । तैंचि गा संन्यासु घडे । इयें कारणें दोनी सांगडे । संन्यासयोगु २५

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः । एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विंदते फलम् ॥४॥

एऱ्हवीं तरी पार्था । जे मूर्ख होती सर्वथा । ते सांख्ययोगुसंस्था । जाणती केवीं २६ सहजें ते अज्ञान । ह्मणोनि म्हणती ते भिन्न । एऱ्हवीं दीपाप्रति काई आनान । प्रकाशु आहाती २७ पैं सम्यक एणें अनुभवें । जिहीं देखिलें तत्त्व आघवें । ते दोहींतेंही ऐक्यभावें । मानिती गा २८

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते । एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति५

आणि सांख्यीं जें पाविजे । तेंचि योगीं गामिजे । ह्मणोनि ऐक्य दोहींतें सहजें । इयापरी २९ देखें आकाशा आणि अवकाशा । भेदु नाहीं जैसा । तैसें ऐक्य योगसंन्यासा । वोळखे जो ३० तयासींचि जगीं पाहलें । आपणपें तेणेंचि देखिलें । जया सांख्ययोग जाणवले । भेदेंविण ३१

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः । योगयुक्तो मुनिर्ब्रह्म नचिरेणाऽधिगच्छति ॥६॥

जो युक्तिपंथें पार्था । चढे मोक्षपर्वता । तो महासुखाचा निमथा । वहिला पावे ३२ येरा योगास्थिति जया सांडे । तो वायांचि गा हव्यासीं पडे । परि प्राप्ति कहीं न घडे । संन्यासाची ३३

न्हीही मोक्षदायकच आहेत. १५ तथापि, नाव जशी बायकांना व मुलांना उदक तरून जाण्यास सोपी आहे, तसा जाणत्याला व नेणत्याला संसाररूपी समुद्र तरून जाण्यास हा कर्मयोग खरोखर सुलभ आहे. १६ सारासार विचार करितां हाच योग सोपा आहे, आणि ह्याचें आचरण केलें असतां अनायासें करून कर्मत्यागाचेंही फल मिळतें. १७ याच कारणाकरितां तुला कर्मसंन्यास करणारांचें चिन्ह सांगेन, म्हणजे कर्मयोग आणि संन्यासयोग हे दोन्ही एकच आहेत अशी तुझी सहज खातरी होईल. १८

अन्वय–यः न द्वेष्टि न काङ्क्षति, सः नित्यसंन्यासी ज्ञेयः. महाबाहो, सः हि निर्द्वंदः सन्) बंधात् सुखं प्रमुच्यते. ३

अर्थ–अर्जुना, जो पुरुष कोणाचा द्वेष करीत नाहीं, व अभिलाष धरीत नाहीं, तो नित्यसंन्यासी समजावा; कारण, तो द्वंद्वरहित होऊन संसारबंधनापासून सुखानें मुक्त होतो. ॥३॥

जो गेल्या वस्तूची आठवण करीत नाहीं, आणि एकादी वस्तु मिळाली नाहीं तर तिची इच्छा करीत नाहीं; जो मेरु पर्वताप्रमाणें अंतर्यामीं स्थिर असतो; १९ आणि पार्था, ज्याचे अंतःकरणांत मी आणि माझें अशी आठवण देखील होत नाहीं; तो नित्य संन्यासी असे जाण. २० ज्याच्या मनाची अशी स्थिति झाली आहे, त्यालाच विषयेच्छा सोडून गेल्यामुळें, जो निःसंग झाला आहे, त्यालाच अखंड सुखाची प्राप्ती होते. २१ अशा मनुष्याला गृहादिक वगैरे कांहींएक सोडण्याचें कारण नाहीं, कां कीं, त्याच्या मनानें, ह्यांचा माझा कांहींएक संबंध नाहीं, असें निश्चित घेतलें असतें. २२ विस्तव विझाल्यावर मग त्याची झालेली नुसती राख जशी पिंजलेल्या कापसांत ठेवतां येते, २३ त्याचप्रमाणें ज्याच्या बुद्धीला, मी कर्ता आहें, असा विकार होत नाहीं, तो संसारांत राहून कर्मबंधनानें आकळिला जात नाहीं. २४ म्हणून, जेव्हां मनांतील कल्पना नाहींतशा होतात, तेव्हांच संन्यास घडतो, आणि याच कारणामुळें कर्मत्याग आणि कर्मयोग हे दोन्ही सारखे आहेत. २५

अन्वय–सांख्ययोगौ पृथक् (इति) बालाः प्रवदंति, पण्डिताः न (प्रवदंति); एकम् अपि सम्यक् आस्थितः (पुरुषः) उभयोः फलं विन्दते. ॥४॥

अर्थ–सांख्ययोग [कर्मसंन्यास] व कर्मयोग हे दोन्ही फलदृष्टीनें वेगळे आहेत, असें अज्ञानी म्हणतात, परंतु ज्ञानी तसें म्हणत नाहींत; कारण, दोहोंपैकीं एकाचेंही अनुष्ठान चांगल्या रीतीनें करणाराला दोन्ही योगांचें फल मिळतें. ॥४॥

याशिवाय, पार्था, जे सर्वस्वीं अज्ञानी आहेत, त्यांना ज्ञानयोग व कर्मयोग यांची व्यवस्था कशी समजेल ? २६ त्यांच्या स्वाभाविक अज्ञानामुळें, हे दोन्ही योग भिन्न आहेत असें ते म्हणतात; परंतु पहा कीं, झरोक्यांतून पडलेल्या एकाच दिव्याच्या प्रकाशांत कांहीं भिन्नपणा येतो काय ? २७ तथापि, या प्रकारें करून ज्यांनीं सम्यक् ज्ञानांनीं परब्रह्मरूपाचें तत्त्व जाणलें आहे, ते, हे दोन्ही योग एकच आहेत असें मानतात. २८

अन्वय–यत् स्थानं सांख्यैः प्राप्यते, तत् योगैः अपि गम्यते; यः सांख्यं च योगं च एकं पश्यति सः पश्यति. ५

अर्थ–जें पद सांख्यांना मिळतें, तेंच योग्यांनाही मिळतें; म्हणून, सांख्य व योग हे फलदृष्ट्या एकच आहेत असें जो समजतो, तोच खरा ज्ञानी होय. ॥५॥

आणि ज्ञानयोगापासून जी प्राप्ति होते, तीच कर्मयोगापासूनही होते; म्हणून अशा प्रकारें या दोहोंमध्यें सहजींच ऐक्य आहे. २९ हें पहा–आकाश आणि पोकळी यांत जसा भेद नाहीं, तसा ज्ञानयोग आणि कर्मयोग यांत भेद नाहीं, हें जो जाणतो, ३० ज्यानें ज्ञानयोग आणि कर्मयोग यांत भिन्नभाव नाहीं हें जाणलें, त्यालाच ह्या जगतामध्यें उजाडलें; [ज्ञानप्राप्ती झाली]व त्यानेंच आत्मस्वरूप पाहिलें. ३१

अन्वय–महाबाहो, संन्यासः तु अयोगतः आप्तुं दुःखम् योगयुक्तः मुनिः नचिरेण ब्रह्म अधिगच्छति. ॥६॥

अर्थ–हे महाबाहो, कर्मयोगावांचून कर्मसंन्यास प्राप्त करून घेणें फार कठीण आहे. कर्मयोगयुक्त मुनीला संन्यास त्वरित प्राप्त होतो. ॥६॥

पार्था, जो कर्ममार्गानें मोक्षरूप पर्वतावर चढतो, तो त्या पर्वताच्या ब्रह्मरूपी शिखरावर लवकरच पोहोंचतो. ३२ एऱ्हवीं जे कर्ममार्गाचें आचरण करीत नाहींत, ते ज्ञानप्राप्तीविषयीं व्यर्थ हव्यास करतात, परंतु त्यांना तें कधीं प्राप्त होत नाहीं. ३३

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः । सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥७॥

जेणें भ्रांतीपासूनि हिरतलें । गुरुवाक्यें मन धुतलें । मग आत्मस्वरूपीं घातलें । हरौनियां ३४ जैसें समुद्रीं लवण न पडे । तंव वेगळें अल्प आवडे । मग होय सिंधूचि एवढें । मिळे तेव्हां ३५ तैसें संकल्पोनि काढिलें । जयाचें मनचि चैतन्य जाहलें । तेणें एकदेशियें परी व्यापिलें । लोकत्रय ३६ आतां कर्ता कर्म करावें । हें खुंटलें तया स्वभावें । आणि करी जरी आघवें । तरी अकर्ता तो ३७

नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् । पश्यञ्शृण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन् ८
प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिषन्नपि । इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तंत इति धारयन् ॥९॥

जे पार्था तया देहीं । मी ऐसा आठऊ नाहीं । तरी कर्तृत्व कैचें काई । उरे सांगें ३८ ऐसें तनुत्यागेंवीण । अमूर्ताचे गुण । दिसती संपूर्ण । योगयुक्ता ३९ एरव्हीं आणिकांचिये परी । तोही एक शरीरी । अशेषाही व्यापारीं वर्ततु दिसे ४० तोही नेत्रीं पाहे । श्रवणीं ऐकतु आहे । परि तेथींचा सर्वथा नोहे । नवल देखें ४१ स्पर्शासि तरी जाणे । परिमळु सेवी घ्राणें । अवसरोचित बोलणें । तयाहि आथी ४२ आहारातें स्वीकारी । त्यजावें तें परिहरी । निद्रेचिया अवसरीं । निदिजे सुखें ५३ आपुलेनि इच्छावशें । तोही गा चालतु दिसे । पैं सकळ कर्म ऐसें । राहाटे कीर ४४ हें सांगों काई एकैक । देखें श्वासोश्वासादिक । आणि निमिषोन्मिष । आदिकरूनि ४५ पार्था तयाचे ठायीं । हें आघवेंचि आथि पाहीं । परी तो कर्ता नव्हे कांहीं । प्रतीतिबळें ४६ जैं भ्रांतिसेजे सुतला । तैं स्वप्नसुखें भुतला । मग तो ज्ञानोदयीं चेइला । ह्मणोनियां ४७

ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः । लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा १०

आतां अधिष्ठानसंगती । अशेषाही इंद्रियवृत्ती । आपुलालिया अर्थीं । वर्तत आहाती ४८ दीपाचेनि प्रकाशें । गृहींचे व्यापार जैसे । देहीं कर्मजात तैसें । योगयुक्ता ४९ तो कर्में करी सकळें । परी कर्मबंधा नाकळे । जैसें न सिंपे जळीं जळें । पद्मपत्र ५०

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि । योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये ११

देखें बुद्धीची भाष नेणिजे । मनाचा अंकुर नुदैजे । ऐसा व्यापारु तो बोलिजे । शारीरु गा ५१ हेंच मराठे परियेशीं । तरी बाळकाची चेष्टा जैशी ।

अन्वय–योगयुक्तः, विशुद्धात्मा, विजितात्मा, जितेंद्रियः, सर्वभूतात्मभूतात्मा (च) कुर्वन् अपि न लिप्यते. ॥७॥

अर्थ–ज्या कर्मयोग्याचें अंतःकरण शुद्ध झालेलें आहे, ज्यानें देह व इंद्रियें हीं स्वाधीन ठेविलीं आहेत, आणि ज्याचा आत्मा सर्व भूतांचा आत्मा झालेला आहे, त्या पुरुषानें कर्में केलीं तरी तो बद्ध होत नाहीं. ॥७॥

ज्यानें आपलें मन भ्रांतीपासून सोडवून व गुरुवाक्यानें शुद्ध करून आत्मस्वरूपाचे ठिकाणीं लीन केलें; ३४ जोंपर्यंत समुद्रांत मीठ घातलें नाहीं, तोंपर्यंत तें जसें समुद्रापासून वेगळें असून लहान दिसतें, व तेंच समुद्रांत घातलें म्हणजे समुद्रभर पसरतें; ३५ त्याचप्रमाणें, ज्याचें मन संकल्पापासून काढल्यावर ब्रह्मरूपीं मिळालें आहें, त्याचें मन दिसण्यांत एकदेशीय खरें; पण त्यानें त्रिभुवन व्यात केलें ! ३६ मग त्याला 'मी एक कर्ता' 'हें एक कर्म,' व 'अमुक एक क्रिया करावयाची' या गोष्टी स्वभावतांच नाहींतशा होतात; आणि लोकदृष्ट्या त्यानें जरी सर्व कर्में केलीं, तरी तीं वास्तविक न केल्यासारखींच आहेत. ३७

अन्वय–युक्तः तत्त्ववित् पश्यन्, शृण्वन्, स्पृशन्, जिघ्रन्, अश्नन्, गच्छन्, स्वपन्, श्वसन, प्रलपन्, विसृजन्, गृह्णन्, उन्मिषन्, निमिषन् अपि, इंद्रियाणि इंद्रियार्थेषु वर्तंते इति धारयन्, अहं किंचित् एव न करोमि इति मन्यते. ॥८।९॥

अर्थ–योगयुक्त झालेला तत्त्ववेत्ता पुरुष आपण स्वतः पहात असतां, ऐकत असतां, स्पर्श करीत असतां, वास घेत असतां, खात असतां, गमन करीत असतां, निद्रित असतां, श्वासोच्छ्वास करीत असतां, बोलत असतां, मलादि टाकीत असतां, ग्रहण करीत असतां किंवा डोळ्यांची उघडझांप करीत असतां, 'इंद्रियें आपापल्या विषयांचे ठायीं प्रवृत्त होत आहेत' असा निश्चय करून, 'मी कांहीं सुद्धां करीत नाहीं' असें मानतो. ॥८।९॥

कारण, पार्था, त्याला देहाच्या ठिकाणीं आत्मबुद्धिचीच आठवण नसल्यावर मग त्याच्या ठिकाणीं 'मी कर्ता' हा अभिमान कोठून उरणार सांग बरें ! ३८ याप्रमाणें शरिराचा त्याग न करितां त्या योगयुक्त पुरुषाचे अंगीं निराकार ब्रह्माचे सर्व गुण दृष्टीस पडतात. ३९ बाकी इतर लोकांप्रमाणें तोही शरिरधारी असून सर्व व्यापार करतो असें दिसतें; ४० तो नेत्रानें पाहतो, कानानें ऐकतो, तरी शरीराच्या भावांत तो लिप्त होत नाहीं, हें नवल पहा ! ४१ त्याला स्पर्श झालेला समजतो, तो नाकानें वास घेतो, आणि त्याला समयोचित भाषणही करतां येतें; ४२ तो जेवतो, टाकावयाची वस्तु टाकतो, झोंपेच्या वेळीं सुखानें झोंप घेतो, ४३ आपले इच्छेप्रमाणें तो चालतो, व त्याचप्रमाणें, ज्या ज्या वेळेस जीं जीं कर्में करावयाचीं तीं सर्व करतो; ४४ हें आणखी एक एक काय सांगूं ? हें पहा–श्वासोच्छ्वास करणें, तसेंच डोळे मिटणें व उघडणें इत्यादि ४५ सर्व कांहीं गोष्टी त्याचे ठिकाणीं दृष्टीस पडतात; परंतु, पार्था, आत्मानुभवाचे बळानें तो त्या गोष्टींचा कर्ता नव्हे. ४६ जेव्हां तो भ्रांतिरूप विछान्यावर निजला होता, तेव्हां स्वप्नसुखानें भुलला होता; परंतु आतां त्याला ब्रह्मज्ञानाची जागृति झाली, म्हणून तो कर्ता नव्हे. ४७

अन्वय–यः संगं त्यक्त्वा ब्रह्मणि कर्माणि आधाय (तानि) करोति, सः पद्मपत्रम् अम्भसा इव पापेन न लिप्यते. ॥१०॥

अर्थ–जो फलाची इच्छा सोडून सर्व क्रिया ब्रह्मार्पणबुद्धीनें करितो, तो, कमळाचें पान जसें पाण्यांत असूनही भिजत नाहीं, तसा [कर्में करीत असूनही तज्जन्य] पापानें लिप्त होत नाहीं. ॥१०॥

आतां, आत्म्याच्या आश्रयानें सर्व इंद्रियांच्या वृत्ति आपल्या विषयांत राहटत असतात; ४८ दिव्याच्या उजेडानें ज्याप्रमाणें घरांतील सर्व व्यवहार चालतात; (पण स्वतः दिवा त्यांपासून अगदीं अलिप्त असतो;) त्याप्रमाणें, ज्ञान्याकडून कर्में होत असतात; [पण] ४९ कमळाचें पान जसें पाण्यांत असूनही भिजत नाहीं, तसा तो ज्ञानी सर्व कर्में करीत असतांही कर्मबंधनानें आकाळिला जात नाहीं. ५०

अन्वय–योगिनः आत्मशुद्धये कायेन, मनसा, बुद्धया, केवलैः इंद्रियैः अपि संगं त्यक्त्वा कर्म कुर्वन्ति. ॥११॥

अर्थ–योगी हे आत्मशुद्धीकरितां केवळ शरीराचीं, मनाचीं, बुद्धीचीं व इंद्रियांचीं अशीं चार प्रकारचीं कर्में फलासक्ति टाकून करितात. ॥११॥

ज्यांत बुद्धीची खूण दिसत नाहीं, व मनाचा अंकूर उगवत नाहीं, त्या व्यापाराला 'देहव्यापार' म्हणावें. ५१ यापेक्षां ज्यास्त स्पष्ट करून सांगतों ऐक. जसे लहान मुलाचे व्यापार मन किंवा बुद्धी

योगिये कर्मे करिती तैशीं । केवळा तनु ५२ मग पांचभौतिक संचलें । जेव्हां शरीर असे निदेलें । तेथें मनचि राहाटे एकलें । स्वप्नीं जेवीं ५३ नवल ऐकें धनुर्धरा । कैसा वासनेचा पसारा । देहा होऊं नेदी उजगरा । परी सुखदुःखें भोगी ५४ इंद्रियांच्या गांवीं नेणिजे । ऐसा व्यापारु जो निपजे । तो केवळु गा ह्मणिजे । मानसाचा ५५ योगिये तोही करिती । परी कर्मे ते न बंधिजती। जे सांडिली आहे संगती । अहंभावाची ५६ आतां जाहालिया भ्रमहत । जैसें पिशाचाचें चित्त । मग इंद्रियांचें चेष्ठित । विकळु दिसे ५७ स्वरूप तरी देखे। आळविलें आइके । शब्दु बोले मुखें । परी ज्ञान नाहीं ५८ हें असो काजें-विण । जें जें कांहीं कारण । तें केवळ कर्म जाण । इंद्रियांचें ५९ मग सर्वत्र जें जाणतें । तें बुद्धीचें कर्म निरुतें । वोळख अर्जुनातें । म्हणे हरी ६० ते बुद्धि धुरे करुनी । कर्म करिती चित्त देउनी । परी ते नैष्कर्म्यापासुनी । मुक्त दि-सती ६१ जें बुद्धीचिये ठावूनि देहीं । तयां अहंकाराची सेचि नाहीं । ह्मणोनि कर्म करितां पाहीं । चोखाळले ६२ अगा करितेनवीण कर्म । तेंचि तें नैष्कर्म्य । हें जाणती सुवर्म । गुरुगम्य जें ६३ आतां शांतरसाचें भरितें ।। सांडीत आहे पात्रातें । जें बोलणें बोलापरौतें । बोलवलें ६४ एथ इंद्रियांचा पांगु । जया फि-टला आहे चांगु । तयासीचि आथि लागु । परिसावया ६५ हा असो अतिप्रसंगु न संडीं पां कथालागु । होईल श्लोकसंगति भंगु । ह्मणऊनियां ६६ जे मना आकळितां कुवाडें । घाघुसितां बुद्धी नातुडे । तें दैवाचेनि सुरवाडें । सांगवलें तुज ६७ जें शब्दातीत स्वभावें । तें बोलींचि जरी फावे । तरी आणिकें काय करावें । कथा सांगें ६८ हा आर्तिविशेषु श्रोतयांचा । जाणोनि दास निवृत्तीचा । म्हणे संवादु दोघांचा । परिसोनि परिसा ६९ मग श्रीकृष्ण म्हणे पार्थातें । आतां प्राप्ताचें चिन्ह पुरतें । सांगेन तुज निरुतें । चित्त देईं ७०

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीम् । अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबद्ध्यते१२

तरी आत्मयोगें आथिला । जो कर्मफळाशीं विटला । तो घर रिघोनि वरिला । शांती जगीं ७९ येरु कर्मबंधें किरीटी । अभिलाषाचिया गांठी । कळासला खुंटी । फळभोगाच्या ७२

सर्वकर्माणि मनसा संन्यस्याऽऽस्ते सुखं वशी । नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३॥

जैसा फळाचिये हांवें । तैसें कर्म करी आघवें । मग न कीजेचि येणें भावें ।

यांना सोडून होतात, तसे योगीलोक हे केवळ देहानें कर्मे करितात. ५२ अशा प्रकारें पांच तत्त्वांनीं बनलेलें हें शरीर जेव्हां निजलें असतें, तेव्हां मन हें स्वप्नांतल्याप्रमाणें एकटेंच व्यापार करीत असतें. ५३ अर्जुना, हें एक नवल ऐक; वासनेचा असा पसारा आहे कीं, तो देहाला कळूं न देतां त्याजकडून सुख-दुःखें भोगवितो. ५४ इंद्रियांना माहीत पडल्याशिवाय जो व्यापार होतो, त्यालाच केवळ मनाचा व्यापार असें म्हणावें. ५५ योगीलोक ह्याही मनोव्यापाराचें आरचण करितात, परंतु ते कर्मानें बांधले जात नाहींत; कारण, त्यांनीं अहंकाराचा त्याग केलेला असतो. ५६ ज्या वेळेस एकाद्या मनुष्याचें मन भ्रमिष्ट झालेलें असतें, किंवा जसें पिशाचाची बाधा झालेल्याचें चित्त असतें, त्या वेळेस इंद्रियांचें सर्व व्यापार अव्यवस्थित दिसतात; (मनाला आणि बुद्धीला ते धरून नसतात; कारण भ्रम नाहींसा झाल्यावर त्यांची त्याला आठवण नसते.) ५७ समोर मनुष्य आलें असतां त्याला दिसतें; कोणी हांक मारली असतां ऐकूं येते व तो स्वतः बोलतो; परंतु त्याचे ठिकाणीं ज्ञानाचा अभाव असतो. (चित्त जाग्यावर नसतें.) ५८ असो; तत्त्वार्थ काय कीं, निष्कारण जें कांहीं करणें, तें फक्त इंद्रियांचेंच कर्म होय असें समज. ५९ श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतातः—ह्या व्यतिरिक्त, सर्व जाणून जें कर्म करणें, तें बुद्धीचें कर्म असें समज. ६० ते योगी बुद्धीला पुढें करून मनापासून कर्माचें आचरण करतात, परंतु ते कर्मातीत ब्रह्मभावाच्याही पलीकडे असून मुक्त आहेत. ६१ कारण, बुद्धीपासून देहापर्यंत त्यांना अहंकाराची आठवण सुद्धां होत नाहीं. म्हणून ते कर्म करीत असले तरी शुद्ध होत. ६२ ' कर्म करणारा मी आहें ' असा भाव न ठेवितां जें कर्म करणें, तेंच नैष्कर्म्य होय, हें गुरुपासून कळणारें तत्त्व ते जाणतात. ६३ आह्मी आतां जें शब्दांनीं प्रतिपादन करतां येणार नाहीं तें बोललों, म्हणून शांतिरस इतका अधिक झाला कीं, तो ज्या पात्रांत भरला आहे, तें पात्र भरून तो खालीं सांडत आहे! ६४ हें ऐकण्याचा अधिकारी कोण असें म्हणशील तर, जो इंद्रियद्वारां प्राप्त होणाऱ्या नाशिवंत सुखांतच तृप्ति मानितो, अशा तऱ्हेचें दारिद्र्य ज्याचें नष्ट झालें आहे, असा जो वैराग्यसंपन्न तो. ६५ [मग श्रोते ज्ञानेश्वरास म्हणतात.] " अहो, हें विषयांतर पुरे करा; कथेचा संबंध सोडूं नका; कारण श्लोकांच्या संगतीचा बिघाड होईल. ६६ जें मनानें समजण्यास अवघड, व विचार करूनही बुद्धीला न सांपडणारे, तें दैवाच्या अनुकूलतेनें तुम्ही आम्हांस सांगितलें. ६७ जें मुळींच बोलतां येत नाहीं, तें जर बोलण्यांत सांपडलें, तर आणखी उपाय कशास पाहिजेत! परंतु, हें असो; आतां कथा सांगा." ६८ ऐकणारांची ही उत्कट इच्छा जाणून निवृत्तिदास ज्ञानदेव म्हणालेः-दोघांचा संवाद जो एवढा वेळ ऐकिला, त्याचें मनन करून पुढें तोच ऐका. ६९ मग श्रीकृष्ण पार्थाला म्हणालेः—पूर्ण ब्रह्मनिष्ठाला ओळखण्याचें खरें चिन्ह कोणचें तें मी सांगतों, चांगलें लक्ष दे. ७०

अन्वय—युक्तः कर्मफलं त्यक्त्वा नैष्ठिकीं शांतिम् आप्नोति; अयुक्तः कामकारेण फले सक्तः (सन्) निबद्ध्यते. ॥१२॥

अर्थ—आत्मनिष्ठ पुरुष हा कर्मफलांचा त्याग करून अढळ शांति प्राप्त करून घेतो; आणि आत्मनिष्ठ नसणारा पुरुष, वासनेनें प्रेरित होऊन फलासक्त झाल्यामुळें बद्ध होतो. ॥१२॥

हें पहा—आत्मज्ञानानें जो पूर्ण भरला, व ज्याला कर्मफलाचा अगदीं वीट आला, त्याला या जगामध्यें घरीं बसल्याच शांति येऊन वरते. (प्राप्त होते.) ७१ अर्जुना, दुसरा जो संसारी, तो कर्मबंधानें बांधला जाऊन अभिलाषाच्या गांठीनें फलभोगाच्या खुंट्याला वळकट बांधला जातो. ७२

अन्वय—वशी देही सर्वकर्माणि मनसा संन्यस्य नवद्वारे पुरे न एव कुर्वन् न कारयन् सुखम् आस्ते. १३

अर्थ—परमार्थज्ञान झालेला देही, मनापासून सर्व कर्मांचा त्याग करून, ह्या नवद्वारपुरांत [शरिरांत] कांहीं एक न करितां व कांही एक न करवितां सुखानें राहतो. १३

फलेच्छेनें कर्माचरण करणाऱ्याप्रमाणें जो सर्व कर्मे यथासांग करतो, परंतु त्या कर्मांचा मी कर्ता नव्हे, असें समजून कर्मांचा त्याग करितो. त्या पुरुषाची

उपेक्षी जो ७३ तो जयाकडे वासु पाहे। तेउती सुखाची सृष्टि होये। तो म्हणे तेथ राहे। महाबोधु ७४ नवद्वारें देहीं। तो असतुचि परि नाहीं। करितुचि न करी कांहीं। फलत्यागी ७५

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः। न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥१४॥

जैसा का सर्वेश्वरु। पाहिजे तंव निर्व्यापारु। परि तोचि रची विस्तारु। त्रिभुवनाचा ७६ आणि कर्ता ऐसें म्हणिपे। तरी कवणें कर्मीं न शिंपे। जे हातुपावो न लिंपे। उदासवृत्तीचा ७७ योगनिद्रा तरी न मोडे। अकर्तेपणा सळु न पडे। परि महाभूतांचें दळवाडें। उभारी भले ७८ जगाच्या जीवीं आहे। परी कवणाचा कहीं नोहे। जगचि हें होय जाये। तो शुद्धीही नेणे ७९

नाऽऽदत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः। अज्ञानेनावृत्तं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः १५

पापपुण्यें अशेषें। पासींचि अमतु न देखें। आणि साक्षीही होऊं न ठके। येरी गोठी कायसी ८० पैं मूर्तींचेनि मेळें। तो मूर्तचि होऊनि खेळे। परि अमूर्तपण न मैळे। दादुलयाचें ८१ तो सृजी पाळी संहारी। ऐसें बोलती जे चराचरीं। तें अज्ञान गा अवधारीं। पंडुकुमरा ८२

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः। तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥१६॥

तें अज्ञान जैं समूळ तुटे। तैं भ्रांतीचें मसैरे फिटे। मग अकर्तृत्व प्रगटे मज ईश्वराचें ८३ एथ ईश्वरु एक अकर्ता। ऐसें मानलें जरी चित्ता। तरी तोचि मी हें स्वभावता। आदीचि आहे ८४ ऐसेनि विवेकें उदो चित्तीं। तयासि भेदु कैंचा त्रिजगतीं। देखे आपुलिया प्रतीति। जगचि मुक्त ८५ जैशी पूर्वदिशेच्या राउळीं। उदया येतांचि सूर्य दिवाळी। कीं येरीही दिशा तियेचि काळीं। काळिमा नाहीं ८६

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः। गच्छंत्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥१७॥

बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान। ब्रह्मरूप भावी आपणा आपण। ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण। तत्परायण अहर्निशीं ८७ ऐसें व्यापक ज्ञान भलें। जयांचिया हृदया गिंवसित आलें। तयांचि समता दृष्टि बोलें। विशेषूं काई ८८ एक आपणपांचि जैसें। ते देखती विश्व तैसें। हें बोलणें कायसें। नवलु एथ ८९ परी दैव जैसें कवतिकें। कहींचि दैन्य न देखे। कां विवेकु हा नोळखे। भ्रांतीतें जेवीं ९० क्षतरी अंधकाराची वानी। जैसा सूर्यो न देखे स्वप्नीं। अमृत नायके कानीं।

काय योग्यता सांगावी—७३ तो पुरुष जिकडे जिकडे पाहतो, तिकडे तिकडे सुखमय सृष्टि होते; आणि तो म्हणेल तेथें ब्रह्मज्ञान उभें राहतें. ७४ एक फलाची इच्छा धरली नाहीं, म्हणजे तो नवद्वारांच्या देहांत असूनही नसल्यासारखा आहे; आणि सर्व कर्में करूनही त्यानें तीं न केल्याप्रमाणें आहेत.७५

अन्वय–प्रभुः लोकस्य कर्तृत्वं न सृजति, कर्माणि (च) न (सृजति), कर्मफलसंयोगं (च) न (सृजति) स्वभावः तु प्रवर्तते. ॥१४॥

अर्थ–ईश्वर जीवाचीं कर्में, कर्तेपणा व फलांचा संबंध हीं तिन्हीं उत्पन्न करीत नाहीं; परतु हा सर्व मायेचा खेळ आहे

जसा ईश्वर पाहिला असतां अकर्ता आहे,परंतु (मायोपाधीचा आरोप त्याजवर केला ह्मणजे) या त्रिभुवनाचा विस्तार तोच करतो (असें दिसतें;) ७६ आणि तो कर्ता आहे असें म्हटलें तर, तो कोणत्याही कर्मानें लिप्त होत नाहीं. कारण त्याची उदासीन वृत्ति असल्याकारणानें कोणतेंही कर्म त्याला स्पर्श करीत नाहीं. ७७ त्याच्या योगनिद्रेचा मुळींच भंग होत नाहीं; व त्याच्या अकर्तेपणालाही घडी लागत नाहीं, ह्मणजे अकर्तेपणा मोडत नाहीं. पण तो महाभूतांच्या समुदयांची उत्तम उभारणी करितो! ७८ पहायला लागलें तर ह्या जगांत प्राणिमात्राच्या ठायीं हा आहे, परंतु केव्हांही कोणाचा नसतो; आणि हें जगत् उत्पन्न होतें व लयास जातें, याची त्याला वार्ता देखील नसते! ७९

अन्वय–विभुः कस्यचित् पापं न आदत्ते, सुकृतं च एव न (आदत्ते); ज्ञानम् अज्ञानेन आवृतम्, तेन जन्तवः मुह्यन्ति. १५

अर्थ–ईश्वर कोणाचें पाप व पुण्य आपलेकडे घेत नाहीं; पण ज्ञान हें अज्ञानानें आच्छादित झाल्यामुळें सर्व जीव मोह पावतात. ॥१५॥

पापपुण्य सर्व त्याच्या जवळ असूनही तो पहात नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्याला साक्षिभूत सुद्धां नसतो; मग दुसऱ्या गोष्टीबद्दल कशाला विचारावें? ८० तथापि मूर्ति धारण करून तो देहाच्या बरोबर खेळतो, (अवतार घेऊन जगामध्यें वावरतो,) परंतु त्या प्रभूचें निराकारपण मोडत नाहीं. ८१ असें असतां अर्जुना, तो उत्पन्न करतो, पालन करतो, आणि संहार करतो, असें जे लोक म्हणतात, तें सर्व अज्ञानामुळें म्हणतात असें समज.८२

अन्वय–येषां तु तत् अज्ञानं आत्मनः ज्ञानेन नाशितं, तेषां तत् ज्ञानम् आदित्यवत् परं प्रकाशयति. ॥१६॥

अर्थ–ज्यांच्या ठिकाणचें तें अज्ञान आत्मस्वरूपाच्या ज्ञानानें नष्ट झालें आहे, त्यांचें तें सूर्याप्रमाणें उज्ज्वल असें ज्ञान परब्रह्मास्वत प्रकाशित करितें. ॥ १६ ॥

तें अज्ञान जेव्हां समूळ नाहींसें होतें, तेव्हां भ्रांतिरूप काळोखी नाहींशी होते; असें झालें म्हणजे मग ईश्वराचें अकर्तेपण स्पष्ट समजून येतें. ८३ अशा प्रकारें ईश्वर हा अकर्ता आहे अशी जर मनाची खातरी झाली, तर तोच मी आहें हें पूर्वीपासून सिद्धच आहे; (तेव्हां अर्थात् मीही अकर्ता आहें हें सिद्धच झालें!) ८४ याप्रमाणें विवेकानें ज्याचे चित्तांत उजेड पडतो, त्याला या त्रिजगतांत भेद रहात नसून, आपले अनुभवावरून सर्व जग मुक्तच आहे असें तो समजतो. ८५ कसा? तर–पूर्वेस सूर्य उगवतांच प्रकाश पडतो त्या वेळेस दुसऱ्याही दिशांचा अंधार नाहींसा होतो त्याप्रमाणें.८६

अन्वय–तद्बुद्धयः, तदात्मानः, तन्निष्ठाः, तत्परायणाः, ज्ञाननिर्धूतकल्मषाः च (पुरुषाः) अपुनरावृत्तिं गच्छंति १७

अर्थ–त्या परब्रह्माचे ठिकाणींच ज्यांची बुद्धि रममाण झाली आहे, तेंच ज्यांचा आत्मा आहे, त्याचेच ठिकाणीं ज्यांची पूर्ण निष्ठा आहे, जे तत्परायण–ब्रह्मपरायणच झाले आहेत, आणि आत्मज्ञानामुळें ज्यांचीं सर्व पातकें धुऊन गेलीं आहेत, ते जन्ममरणाच्या येरझारा करीत नाहींत. ॥ १७ ॥

ज्याच्या बुद्धीचा निश्चय आत्मज्ञानाविषयीं आहे, व जो आपण आपल्याला ब्रह्मरूप मानतो, आणि रात्रंदिवस ब्रह्मपरायण होऊन आपली ब्रह्मस्थिति पूर्णपणें राखतो; ८७ असें सर्वव्यापक ज्ञान ज्यांना शोधीत आलें, त्यांची समदृष्टि होते हें विशेषेंकरून शब्दानें बोलून काय दाखवावें? ८८ जसे ते आपणास सच्चिदानंद ब्रह्मरूप आहोंत असें समजतात, त्याप्रमाणें ते सर्व विश्वाला मानतात यांत आश्चर्य तें काय? ८९ ज्याप्रमाणें भाग्य हें कौतुकानें देखील दारिद्र्याचा अनुभव घेत नाहीं, किंवा विचाराला जशी भ्रांतीची ओळख देखील नसते, ९० अथवा सूर्य जसा स्वप्नांत देखील अंधकाराचें स्वरूप पहात नाहीं, किंवा अमृत कानानें देखील मृ-

मृत्युकथा ९१ हें असो संतापु कैसा । चंद्रु न स्मरे जैसा । भूतीं भेदु नेणती तैसा । ज्ञानिये ते ९२

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि । शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥१८॥

मग हा मशकु हा गजु । कीं श्वपचु हा द्विजु । पैल इतरु हा आत्मजु । हें उरलें कें ९३ ना तरी हे धेनु हें श्वान । एक गुरु एक हीन । हें असो कैचें स्वप्न जागतया ९४ एथ भेदु तरी कीं देखावा । जरी अहंभाव उरला होआवा । तो आधींचि नाहीं आघवा । आतां विषमु काई ९५

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः । निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः १९

ह्मणोनि सर्वत्र सदा सम । तें आपणचि अद्वय ब्रह्म । हें संपूर्ण जाणें वर्म समदृष्टीचें ९६ जिहीं विषयसंगु न सांडितां । इंद्रियांतें न दंडितां । परि भोगिली निसंगता । कामनेविण ९७ जिहीं लोकांचेनि आधारें । लौकिकेंचि व्यापारें । परि सांडिलें निदसुरें । लौकिकु हें ९८ जैसा जनामाजि खेचरु । असतुचि जना नोहे गोचरु । तैसा शरीरीं परि संसारु । नोळखे तयातें ९९ हें असो पवनाचेनि मेळें । जैसें जळींचि जळ लोळे । तें आणिकें म्हणती वेगळें । कल्लोळ हें १०० तैसें नाम रूप तयाचें । एऱ्हवीं ब्रह्मचि तो साचें । मन साम्या आलें जयाचें । सर्वत्र गा १ ऐसेनि समदृष्टी जो होये । तया पुरुषा लक्षणही आहे । अर्जुना संक्षेपें सांगेन पाहें । अच्युत म्हणे २

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाऽप्रियम् । स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः २०

तरी मृगजळाचेनि पूरें । जैसें न लोटिजे कां गिरिवरें । तैसा शुभाशुभीं न विकरे । पातलिया जो ३ तोचि तो निरुता । समदृष्टि तत्त्वता । हरि म्हणे पंडूसुता । तोचि ब्रह्म ४

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम् । स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षयमश्नुते ॥२१॥

जो आपणपैं सांडूनि कांहीं । इंद्रियग्रामावरी येणेंचि नाहीं । तो विषय न सेवी हें काई । विचित्र येथ ५ सहजें स्वसुखाचेनि अपारे । सुरवाडलेनि अंतरें । रचिला ह्मणऊनि बाहिरें । पाऊल न घली ६ सांगें कुमुददळाचेनि ताटें । जो जेविला चंद्रकिरणें चोखटें । तो चकोरु काई वाळुवंटें । चुंबितु असे ७ तैसें आत्मसुख उपाइलें । जयासि आपणपेंचि फावलें । तया विषयो सहज सांडवले । ह्मणों काई ८ एऱ्हवी तरी कौतुकें । विचारूनि पाहें पां निकें या विषयांचेनि सुखें । झकविजती कवण ९

त्यूची वार्ता ऐकत नाहीं; ९१ हें असो, परंतु ज्याप्रमाणें चंद्र हा उष्मा कसा आहे तें जाणत नाहीं, त्याचप्रमाणें, ज्ञानी जे आहेत, त्यांना प्राणिमात्रांत भेद दिसत नाहीं. ९२

अन्वय–पंडिताः विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे, गवि, हस्तिनि, शुनि श्वपाके च एव समदर्शिनः (संति). ॥१८॥

अर्थ–ज्ञाते–आत्मनिष्ठ पुरुष, विद्या व नम्रता या गुणांनीं युक्त असा ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रें व चांडाळ या सर्वांचे ठिकाणीं समत्व [ब्रह्मच] पाहतात. ॥१८॥

मग हें मशक किंवा हा हत्ती, तसाच हा अंत्यज किंवा हा ब्राह्मण, तसेंच हा माझा मुलगा किंवा दुसऱ्याचा, हें त्यांच्यापाशीं कोठूत उरणार? ९३ किंवा ही गाय अथवा हा कुत्रा, एक थोर एक लहान, अशा तऱ्हेचें द्वैतभावाचें स्वप्न अद्वैतबोधाचे ठिकाणीं जागृत असलेल्या पुरुषांना कोठून पडणार? ९४ जेथें मीपणा उरला असेल, तेथेंच भेद दृष्टीस पडेल; परंतु तो जेथें अजीबात नाहींसा झाला असेल, तेथें भिन्नपणा कोठून असणार?९५

अन्वय–येषां मनः साम्ये स्थितम् तैः इह एव सर्गः जितः; ब्रह्म हि निर्दोषं समं (च अस्तिः) तस्मात् ते ब्रह्मणि स्थिताः (संति). ॥१९॥

अर्थ–ज्यांचें मन सम अवस्थेमध्यें [ब्रह्माचे ठिकाणीं] स्थिर झालें आहे, ते या लोकींच जन्म व मरण जिंकितात. कारण, ब्रह्म हें दोषरहित व सम आहे; म्हणून, ते पुरुष ब्रह्माचे ठिकाणीं स्थित असतात. ॥ १९ ॥

म्हणून, ज्याची नेहमीं सर्वत्र सारखी दृष्टि आहे, तो स्वतांच अद्वितीय ब्रह्म आहे ही समदृष्टीची पूर्ण खूण आहे असें समज. ९६ ज्यानें विषयसंग तर सोडला नाहीं आणि इंद्रियांना दंडही केला नाहीं, असें असून संपूर्ण भोग भोगीत असतांही वासनेवांचून अकर्तेपणाचा अनुभव घेतला आहे; ९७ ज्यानें लोकांच्या आश्रयानें वागून, आणि सर्व व्यावहारिक व्यापार करूनही लौकिकांत असलेलें अज्ञान सोडून दिलें आहे; ९८ तो पुरुष, पिशाच ज्याप्रमाणें सर्व लोकांत असूनही दिसत नाहीं,त्याप्रमाणें, शरीरधारी असूनही संसार त्याला ओळखीत नाहीं. ९९ हें असो; वाऱ्यामुळें पाण्यांत प्राणी उसळतें; पण त्याला ज्याप्रमाणें इतर लोक पाण्याहून वेगळ्या 'लाटा' असें म्हणतात, १०० त्याप्रमाणें, ज्याचें मन सर्व ठिकाणीं समतेला पावलें आहे. त्याचें शरीर आणि नांव हीं जरी जगाप्रमाणेंच आहेत,तथापि तो साक्षात् ब्रह्मच आहे;१ भगवान् म्हणतातः–अर्जुना, अशी ज्याची समदृष्टि झालेली आहे, त्या पुरुषाचें लक्षणही आहे, तें संक्षेपानें तुला सांगतों; ऐक. २

अन्वय–स्थिरबुद्धेः, असंमूढः, ब्रह्मणि स्थितः, ब्रह्मवित् प्रियं प्राप्य न प्रहृष्येत्, अप्रियं प्राप्य च न उद्विजेत्. २०

अर्थ–ज्याची बुद्धि स्थिर झाली आहे, ज्याचें सर्व अज्ञान नष्ट झालें आहे, व जो ब्रह्माचे ठिकाणीं स्थित झाला आहे, असा ब्रह्मवेत्ता पुरुष आवडता विषय प्राप्त झाला असतां सुख मानीत नाहीं, व नावडता विषय प्राप्त झाला असतां दुःखी होत नाहीं. ॥ २० ॥

ज्याप्रमाणें मृगजलाच्या पुरानें डोंगर वाहून जात नाहींत. त्याचप्रमाणें, जो चांगली किंवा वाईट गोष्ट प्राप्त झाली असतां तिच्यापासून विकार पावत नाहीं,२ तोच खरा. श्रीहरि म्हणतातः-अर्जुना,त्यानेंच समदृष्टीचें तत्त्व जाणलें;आणि तोच स्वयमेव ब्रह्म होय. ४

अन्वय–यः बाह्यस्पर्शेषु असक्तात्मा (सः) आत्मनि यत् सुखं (तत्) विन्दति, सः ब्रह्मयोगयुक्तात्मा अक्षयं सुखम् अश्नुते. ॥२१॥

अर्थ–ज्या पुरुषाचें मन बाह्य विषयांच्या ठिकाणीं आसक्त नसतें, त्याला आत्म्याचे ठिकाणचें जें सुख तें मिळतें. तोच पुरुष जेव्हां ब्रह्मयोगयुक्त होतो, तेव्हां अक्षय सुखाला पावतो. ॥ २१ ॥

जो आत्मस्वरूपाला सोडून कधींही इंद्रियांधीन होत नाहीं, तो विषयांचें सेवन करीत नाहीं यांत नवल तें कोणतें? ५ आत्मसुखाच्या पूर्णतेनें त्याचें अंतःकरण स्वाभाविकतांच संतुष्ट झालेलें असतें, म्हणून तो बाहेर पाऊल घालीत नाहीं. (इंद्रियांकडे त्याचें मन वळत नाहीं.) ६ ज्या चकोर पक्ष्यानें चंद्रविकासी कमलांच्या पानांत उत्तम किरणांचें भोजन केलें आहे, तो वाळवंटांत वाळू चिवडीत बसेल काय? ७ ज्याला आपल्याच ठिकाणीं आत्मस्वरूप प्राप्त झालें आहे, त्याला विषयांचा सहज त्याग झाला हें म्हटलें पाहिजे का?८बाकी या विषयांच्या सुखानें कोण फसले जातात याचा कौतुकानें आपल्याशीं सहज चांगला विचार करून पहा!९

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते । आद्यंतवंतः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥२२॥

जिहीं आपणपें नाहीं देखिलें । तेचि इहीं इंद्रियार्थीं रंजले । जैसें रंकु कां आळुकैलें । तुषांतें सेवी ११० नातरी मृगें तृषापीडितें । संभ्रमें विसरोनि जळांतें । मग तोयबुद्धी बरडीतें । ठाकूनि येती ११ तैसें आपणपें नाहीं दिठे । जयातें स्वसुखाचे सदा खरांटे । तयासीचि विषय हे गोमटे । आवडती १२ एऱ्हवीं विषयीं सुख आहे । हें बोलणेंचि सारिखें नोहे । तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे । जगामाजीं १३ सांगें वात वर्ष आतपु धरे । ऐसे अभ्रच्छायाचि जरी सरे । तरी त्रिमाळिकें धवळारें । करावीं कां १४ क्षणोनि विषयसुख जें बोलिजे । तें नेणतां गा वायां जल्पिजे । जैसें मद्यूर कां क्षणिजे । विषकंदातें १५ नातरी भौमा नाम मंगळु । रोहिणीतें म्हणती जळु । तैसा सुखप्रवादु बरळु । विषयिकु हा १६ हे असो आघवी बोली । सांग पां सर्पफणीची साउली । ते शीतल होईल केतुली । मूषकासी १७ जैसा आमिषकवळु पांडवा । मीनु न सेवी तंवचि बरवा । तैसा विषयसंगु आघवा । निभ्रांत जाणें १८ हे विरक्तांचिये दिठी जैं न्याहाळिजे किरीटी । तैं पांडुरोगाचिये पुष्टी- । सारिखें दिसे १९ क्षणोनि विषयभोगीं जें सुख । तें साद्यंतचि जाण दुःख । परि काय कीजे मूर्ख । न सेवितां न सरे १२० तें अंतर नेणती बापुडे । म्हणोनि अगत्य सेवणें घडे । सांगें पूयपंकींचे किडे । काय चिळसी घेती २१ तयां दुःखियां दुःखचि जिव्हार । ते विषयकर्दमींचे दर्दुर । ते भोगजळींचे जलचर । सांडिती केवीं २२ आणि दुःखयोनि जिया आहाती । तिया निरर्थका तरी नव्हती । जरी विषयांवरी विरक्ती । धरिती जीव २३ नातरी गर्भवासादि संकट । कां जन्ममरणींचे कष्ट । हे विसांवेंवीण वाट । वाहवी कवणें २४ जरी विषयीं विषयो सांडिजेल । तरी महादोषीं कें वसिजेल । आणि संसारु हा शब्दु नव्हेल । लटिका जगीं २५ म्हणोनि अविद्याजात नाथिले । तें तिहींचि साच दाविलें । जिहीं सुखबुद्धी घेतलें । विषयदुःख २६ याकारणें गा सुभटा । हा विचारितां विषय वोखटा । तूं झणें कहीं या वाटा । विसरोनि जाशी २७ पैं यातें विरक्त पुरुष । त्यजिती कां जैसें विष । निराशा तयां दुःख । दाविलें नावडे २८

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् । कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥२३॥

ज्ञानियांच्या हृन ठायीं । याची मातुही कीर नाहीं । देही देहभावो जिहीं

अन्वय–कौंतेय, संस्पर्शजाः हि ये भोगाः ते आद्यन्तवन्तः, दुःखयोनयः एव सन्तिः (अतः) बुधः तेषु न रमते. ॥२२॥

अर्थ–कां कीं, अर्जुना, जे विषयांचे भोग इंद्रियांना प्राप्त होतात, ते उत्पत्ति व नाश यांनीं युक्त असून दुःखासच कारण आहेत; म्हणून ज्ञानी पुरुष त्यांचे ठिकाणीं रममाण होत नाहीं. ॥ २२ ॥

ज्याप्रमाणें दरिद्री भुकेनें व्याप्त झाल्यावर कोंडादेखील खातो, त्याप्रमाणें, ज्यांनीं आत्मस्वरूपाचा अनुभव घेतला नाहीं, तेच ह्या इंद्रियापासून होणाऱ्या विषयसुखांत रममाण होतात ! ११० किंवा तहानेनें व्याकूळ झालेलीं हरणें भ्रमानें खऱ्या पाण्याला विसरून माळ जमिनीवर उत्पन्न होणाऱ्या उन्हाच्या झळ्यांनाच पाणी असें समजून धांवून येतात, ११ त्याप्रमाणें, ज्यांनीं आत्मसुखाचा अनुभव घेतला नाहीं, ज्यांना स्वात्मसुखाचा सदोदित तोटा असतो, त्यांनाच हें विषयसुख चांगलें असें वाटतें ! १२ सहज पाहिलें असतां विषयांत सुख आहे हें म्हणणेंच योग्य नाहीं; तथापि सुख आहे असें धरून चाललें तर मग विजेच्या चमकण्यापासून पडणाऱ्या उजेडांत जगांतील व्यापार कां न व्हावे ? १३ तूं हें सांग कीं, वारा, पाऊस आणि ऊन यांचें निवारण जर अभ्रांच्या छायेपासून होईल, तर तीन मजली घरें बांधण्याचें कारण तरी काय ? १४ म्हणून, विषाच्या कांद्याला (बचनागाला) ज्याप्रमाणें अज्ञानपणानें गोड म्हणतात, त्याप्रमाणें, विषयांचे ठिकाणीं सुख आहे हें व्यर्थ बडबडणें आहे. १५ किंवा भौम ह्या गृहास जसें मंगळ हें नांव आहे, परंतु त्याचा अनुभव तसा नाहीं; किंवा मृगजलाला जल म्हणतात, तसें विषयसेवनांत सुख आहे हें म्हणणें व्यर्थ आहे. १६ हें सर्व बोलणें राहूं द्या. परंतु तूं असें सांग कीं, नागाच्या फणीची छाया उंदराला कितपत सुखावह होईल बरें ! १७ अर्जुना, गळाला लावलेल्या मांसाला मासा तोंड लावीत नाहीं तोंपर्यंतच चांगलें; त्याचप्रमाणें, विषयसंगाचा जोंपर्यंत अनुभव घेतला नाहीं, तोंपर्यंतच तें चांगलें आहे असें वाटतें ! १८ हे किरीटी, जर विरक्ताच्या दृष्टीनें हे विषय पाहिले, तर पंडुरोग्याच्या पुष्टीसारखे [निःशक्त असून] लठ्ठ दिसतात. १९ म्हणून, विषयोपभोगांत ज्याला सुख म्हणावयाचें, तें मुळापासून अखेरपर्यंत दुःखच आहे असें समज. परंतु मूर्ख जन काय करतील ! कारण त्याचें सेवन केल्यावाचून त्यांना दुसरा मार्गच नाहीं ! १२० त्यांना त्याचें वर्म न समजल्यामुळें त्याचें सेवन करणें भाग पडतें. पुवांत असणाऱ्या किड्यांना पुवांची किळस कधीं तरी आली आहे का सांग बरें ! २१ त्या दुःखितांना दुःखच प्रीय (जीवन) असतें; कारण, ते विषयरूप चिखलांतले वेडूक व विषयोपभोगरूप जलांतील मासे असल्यानें विषयांचें सेवन कसें सोडतील ? २२ जर विषयांचे ठिकाणीं जीवमात्र विरक्ति धरतील, तर जितक्या दुःखदायक योनी आहेत, तितक्या व्यर्थ होणार नाहींत का ? २३ किंवा गर्भवासांत होणारीं दुःखें अथवा जन्ममरणांचे कष्ट यांचे अविश्रांतपणें चालावे लागणारे मार्ग कोणीं चालावे ? २४ जर विषयासक्त जनांनीं विषयोपभोग सोडले, तर महादोषांनीं कोठें वस्ती करावी ? आणि मग 'संसार' हा शब्द जगांत खोटा नाहीं का होणार ? २५ म्हणून, जे विषयांच्या भोगांपासून होणाऱ्या दुःखालाच सुख मानतात, ते, ' लटकें ' असें जें सर्व अज्ञान तें खरें आहे असें त्यांनीं लोकांस दाखविलें. २६ याकरितां, अर्जुना, विचार करून पाहतां हे विषय फार वाईट आहेत, म्हणून तूं कदाचित् चुकून या मार्गाला जाशील हो ! २७ कारण, जे विरक्त पुरुष आहेत, ते या विषयसुखाला विषाप्रमाणें मानून त्याचा त्याग करतात; आणि ते निरिच्छ असल्यामुळें विषयांनीं दाखविलेलें सुखरूपी दुःख त्यांना आवडत नाहीं. २८

अन्वय–इह एव शरीरविमोक्षणात् प्राक् यः कामक्रोधोद्भवं वेगं सोढुं शक्नोति, सः नरः युक्तः, सः सुखी भवति.२३

अर्थ–ह्या लोकींच देहपाताच्या पूर्वी कामक्रोधांपासून उत्पन्न झालेले वेग सहन करण्यास जो समर्थ आहे, तोच पुरुष योगी व तोच पुरुष सुखी होय. ॥ २३ ॥

ज्ञान्यांच्या ठिकाणीं तर निश्चयानें ह्या विषयांची गोष्ट सुद्धां निघत नाहीं; कारण ते देहधारी असूनही

स्ववश केले २९ जयांतें बाह्याची भाष । नेणिजेचि निःशेष । अंतरीं सुख। एक आथि १३० परि तें वेगळेपणें भोगिजे । जैसें पक्षिये फळ चुंबिजे । तैसें नव्हे तेथ विसरिजे । भोगितेपणही ३१ भोगीं अवस्था एक उठी । ते अहंकाराचा अचळु लोटी । मग सुखेंसि घे आंटी । गाढेपणें ३२ तिये आलिंगनमेळीं । होय आपैंआप कवळीं । तेथ जळ जैसें जळीं । वेगळें न दिसे ३३ कां आकाशीं वायु हारपे । तेथ दोन्ही हे भाष लोपे । तैसें सुखाचि उरे स्वरूपें। सुरतीं तिये ३४ ऐशी द्वैताची भाष जाय । मग म्हणों जरी एकचि होय। तरी तेथ साक्षी कवणु आहे । जाणते जें ३५

योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव यः । स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ॥२४॥
लभंते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः । छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥२५॥

ह्मणोनि असो हें आघवें । एथ न बोलणें काय बोलावें । ते खुणाचि पावेल स्वभावें । आत्माराम ३६ जे ऐसेनि सुखें मातले । आपणपांचि आपण गुंतले।ते मी जाणें निखिळ वोतले । सामरस्याचे ३७ ते आनंदाचे अनुकार। सुखाचे अंकुर । कीं महाबोधें विकार । केले जैसे ३८ ते विवेकाचे गांव । कीं परब्रह्मींचे स्वभाव । नातरी अळंकारले अवयव । ब्रह्मविद्येचे ३९ ते सत्त्वाचे सात्त्विक । कीं चैतन्याचे आंगिक । हें बहु असो एकैक । वानिसी काई १४० तूं संतस्तवनीं रतसी । तरी कथेची से न करिसी । कीं निराळीं बोल देखसी। सनागर ४१ परि तो रसातिशयो मुकुळीं । मग ग्रंथार्थदीपु उजळीं । करी साधुहृदयराउळीं । मंगळउखा ४२ ऐसा श्रीगुरूचा उवायिला । निवृत्तीदासासी पातला । मग तो म्हणे श्रीकृष्ण बोलिला । तेंचि आइका ४३ अर्जुना अनंत सुखाच्या डोहीं । एकसरां तळुचि घेतला जिहीं । मग स्थिराऊनि तेही । तेंचि जाहले ४४ अथवा आत्मप्रकाशें चोखें । जो आपणपोंचि विश्व देखे । तो देहेंचि परब्रह्म सुखें । मानूं येईल ४५ जें साचोकारें परम । ना तें अक्षर निःसीम । जिये गांवींचे निष्काम । अधिकारिये ४६ जें महर्षी वाढले । विरक्तां भागा फिटलें । जें निःसंशया पिकलें । निरंतर ४७

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् । अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥२६॥

जिहीं विषयापासोनि हिरतलें । चित्त आपुलें आपण जिंतिलें । ते निश्चित जेथ सुतले । चेतीचिना ४८ तें परब्रह्म निर्वाण । जें आत्मविदांचें कारण ।

त्यांनीं देहधर्म आपल्या ताब्यांत ठेविले आहेत. २९ ज्यांना अंतर्यामीं आत्मसुखाचा लाभ झाला आहे, ते विषयांची गोष्ट देखील जाणत नाहींत. १३० परंतु त्या आत्मसुखाचा उपभोग घेण्याची रीत निराळी आहे. कशी? तर जसे पक्षी फळाचें चुंबन करीत असतां त्या ठिकाणीं भोक्ता, भोग्यवस्तु आणि भोग ही त्रिपुटी असते, तशी नसून, त्या ठिकाणीं ते भोक्तेपणही विसरतात. ३१ आत्मसुखाचा भोग घेण्याकरितां जी एक वृत्ति उत्पन्न होते, ती अहंकाराचा नाश करिते, व मग दृढपणानें सुखाला आलिंगन देते; (आपण सुखरूप बनते;) ३२ आणि त्या आलिंगनाचे भरांत आपोआप एकरूपता होऊन जाते. ज्याप्रमाणें पाणी पाण्यांत मिसळल्यावर वेगळें दिसत नाहीं; ३३ किंवा आकाशांतील वायु नाहींसा झाल्यावर त्या ठिकाणीं आकाश आणि वायु हा भेद नाहींसा होतो, त्याप्रमाणें वृत्ति व आत्मा यांच्या एकपणांत फक्त सुखच राहतें. ३४ याप्रमाणें ज्या वेळेस दुजेपणा नाहींसा होऊन एकत्व प्राप्त होतें त्यावेळीं एकत्वाला जाणणारा तरी दुसरा साक्षी कोण आहे? ३५

अन्वय–यः अंतःसुखः, अन्तरारामः, तथा यः अंतर्ज्योतिः एव, सः योगी ब्रह्मभूतः (सन्) निर्वाणम् ब्रह्म अधिगच्छति. ॥२४॥ क्षीणकल्मषाः, छिन्नद्वैधाः, यतात्मानः, सर्वभूतहिते रताः (च) ऋषयः निर्वाणं ब्रह्म लभन्ते. ॥२५॥

अर्थ–जो योगी आपले ठिकाणीं सुखी झाला आहे, आपलेच ठिकाणीं कृतकृत्य होऊन बसला आहे, व ज्याला आपले ठिकाणीं ब्रह्माचा प्रकाश झाला आहे. तो ब्रह्मरूप होऊन शांत असें जें ब्रह्म त्या ब्रह्माप्रत प्राप्त होतो. ॥ २४ ॥ ज्यांचीं पापें नाहींतशीं झालीं आहेत, ज्यांचा द्वैतभाव गेला आहे, ज्यांनीं आपलीं अंतःकरणें जिंकिलीं आहेत, व जे सर्व भूतांचे हिताविषयीं तत्पर आहेत, असे ऋषि, शांत असें जें ब्रह्म त्याप्रत जातात. ॥२५॥

म्हणून, हें सर्व राहूं द्या. कारण, येथें (अनुभवाशिवाय) न बोलतां येणारी गोष्ट ती नुसती बोलून काय उपयोग? जो स्वतः आत्मस्वरूपी झाला, त्यालाच त्याची खूण सहज समजेल. ३६ अशा सुखानें जे परिपूर्ण झाले, आणि स्वस्वरूपांत जे निमग्न होऊन राहिले, ते मद्रूप होऊन ब्रह्मानंदाचे निखालस पुतळेच ओतले आहेत, असें मी समजतों. ३७ ते आनंदाच्या स्वरूपसुखाचे अंकूर, किंवा आत्मबोधाचें क्रीडास्थानच होत. ३८ ते विचाराचे गांव, परब्रह्मींचे स्वभाव, इतकेंच नव्हे तर त्यांचे अवयव ब्रह्मविद्येच्या अलंकारांनीं सुशोभित केलेले आहेत. ३९ ते सत्त्वाचेही सात्विक किंवा चैतन्याचेच रूप आहेत. असें महाराज त्यांचें वर्णन करण्याच्या भरांत असतां श्रीगुरु निवृत्तिनाथ म्हणतात, हें असूं दे, त्या पुरुषांचें किती वर्णन करशील? १४० तूं साधुजनांची स्तुति करूं लागलास म्हणजे तुला कथेची आठवणसुद्धां नसून दुसरा प्रसंग उत्तम प्रकारें वर्णन करितोस. ४१ परंतु आतां ती स्तुति पुरे कर, आणि गीतार्थरूपी दीप उजळून साधुजनांच्या हृदयमंदिरांत मंगलदायक ज्ञानाचा उजेड कर. ४२ या प्रमाणें निवृत्तिदासाला गुरूंचा इषारा मिळाल्यावर मग तो म्हणाला कीं, कृष्ण काय बोलले तेंच ऐका. ४३ अर्जुना, आत्मसुखाच्या डोहांत ज्यांनीं एकदम तळाशींच बुडी दिली आहे, ते तेथेंच स्थिर होऊन आत्मस्वरूपच बनले; ४४ किंवा आत्म्याच्या निर्मळ प्रकाशानें जो आपल्या ठिकाणींच विश्व पाहतो, तो देहामध्यें असूनही परब्रह्म झाला असें खुशाल मानतां येईल. ४५ जें खरोखर अति उत्तम, अविनाशी व अमर्याद असें ब्रह्मसुख, त्याचे अधिकारी निरिच्छ हेच होतात. ४६ तें सुख महर्षींकरितांच राखून ठेविलें; विरक्तांच्याच वांटणीस आलें; आणि तें निःसंदेह जीवांकरितांच निरंतर पिकलें आहे. ४७

अन्वय–कामक्रोधवियुक्तानां, यतचेतसां, विदितात्मनां, यतीनां अभितः निर्वाणं ब्रह्म वर्तते. ॥२६॥

अर्थ–कामक्रोधावरहित, चित्त स्वाधीन केलेले, आणि आत्मस्वरूप जाणलेले योगी जिवंतपणीं व मरणानंतर शांत असें ब्रह्मच असतात. ॥ २६ ॥

ज्यांनीं आपलें मन विषयांपासून माघारें घेऊन जिंकलें आहे, ते जेथें निजले तेथून निश्चयानें जागे. होत नाहींत. (ते ब्रह्माकार होऊन देहभानावर येत नाहींत.) ४८ हे पांडुकुमरा, ते पुरुष म्हणजे, आत्म-

तेंचि ते पुरुष जाण । पंडुकुमरा ४९ ते ऐसे केसेंनि जहाले । जे देहींचि ब्रह्मत्वा आले । हें पुससी तरी भलें । संक्षेपें सांगों १५०

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः । प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ ॥२७॥
यतेंद्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः । विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ॥२८॥

तरी वैराग्याचेनि आधारें । जिहीं विषय दवडूनि बाहिरें । शरीरीं एकंदरें केलें मन ५१ सहजें तिहीं संधी भेटी । जेथ भ्रूपल्लवा पडे गांठी । तेथ पाठिमोरी दिठी । पारुखोनियां ५२ सांडूनि दक्षिण वाम । प्राणापानसम । चित्तेसीं व्योम- । गामिये करिती ५३ तेथ जैसीं रथ्येादकें सकळें । घेऊनि गंगा समुद्रीं मिळे । मग एकेक वेगळें । निवडूं नये ५४ तैसी वासनांतराची विवंचना । मग आपैसी पारुखे अर्जुना । जे वेळीं गगनीं लयो मना । पवनें कीजे ५५ जेथ हें संसारचित्र उमटे । तो मनोरूप पटु फाटे । जैसें सरोवर आटे । मग प्रतिभा नाहीं ५६ तैसें मन एथ मुद्दल जाय । मग अहंभावादिक कें आहे । ह्मणोनि शरीरींचि ब्रह्म होये । अनुभवी तो ५७

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् । सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥२९॥
इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे संन्यासयोगोनाम पंचमोऽध्यायः ५

आम्हीं मागां हन सांगितलें । जे देहींचि ब्रह्मत्व पावले । ते येणें मार्गें आले । ह्मणऊनियां ५८ आणि यमनियमांचे डोंगर । अभ्यासाचे सागर । क्रमोनि हें गार । पातले ते ५९ तिहीं आपणपें करूनि निर्लेप । प्रपंचाचें घेतलें माप । मग त्याचाचेंचि रूप । होऊनि ठेले १६० ऐसा योगयुक्तीचा उद्देशु । जेथ बोलिला हृषीकेशु । तेथ अर्जुनु सुदंशु । म्हणोनि चमत्कारला ६१ तें देखिलिया कृष्णें जाणितलें । मग हांसोनि पार्थातें ह्मणितले । काई पां चित्त उवाइलें । इये बोलीं तुझें ६२ तंव अर्जुन म्हणे देवो । परचित्तलक्षणांचा रावो । भला जाणितला जी भावो । मानसु माझा ६३ म्यां जें कांहीं विवरूनि पुसावें । तें आधींचि जाणितलें देवें । तरी बोलिलें तेंचि सांगावें । विवळ करूनि ६४ एच्हवीं तरी अवधारा । जो दाविला तुम्हीं अनुसारा । तो पव्हण्याहूनि पायउतारा । सोहपा जैसा ६५ तैसा सांख्याहूनि प्रांजळा । आह्मांसारिखिया अभोळां । एथ आहति परि कांहीं काळा । तो साहों ये वर ६६ ह्मणोनि एक वेळ देवा । तोचि पडताळा घेयावा । विस्तरेल तरी सांगावा । साद्यंतुचि ६७ तंव

ज्ञान्याचें कारण जें कैवल्य परब्रह्म तेंच होत. ४९ ते असे कशानें झाले, आणि देहांत असतां ब्रह्मत्वास कशानें पावले, हें तूं विचारशील, तर तुला संक्षेपानें सांगतों, ऐक. १५०

अन्वय–यः मुनिः बाह्यान् स्पर्शान् बहिः कृत्वा, भ्रुवोः अन्तरे चक्षुः (कृत्वा), नासाभ्यन्तरचारिणौ प्राणापानौ समौ कृत्वा च यतेन्द्रियमनोबुद्धिः, विगतेच्छाभयक्रोधः, मोक्षपरायणः (स्यात्), सः सदा मुक्तः एव. ॥२७॥२८॥

अर्थ–शब्दादिक बाह्य विषय बाहेर टाकून, भुकुटीमध्यें दृष्टि स्थापन करून, व नासिकेच्या आंत संचार करणारे प्राणापान वायु एकत्र करून, इंद्रियें, मन व बुद्धि यांना आपल्या अधीन करून, आणि इच्छा, भय व क्रोध नाहींतशीं करून जो योगी मोक्षपरायण असतो, तो सदा मुक्तच आहे. ॥ २७ ॥ २८ ॥

तर वैराग्याच्या आधारानें विषयांना बाहेर घालवून जे शरिराचे ठिकाणीं आपलें मन एकनिष्ठ करतात, ५१ इडापिंगला सोडून व सुषुम्नेमध्यें प्राण नेऊन, ललाटचक्रामध्यें स्वरूपाकडे दृष्टि मावारी फिरवून स्थिर करतात; ५२ डावी आणि उजवी नाकपुडी सोडून प्राण व अपान या वायूंस एक करून चित्ताला चिदाकाशांत नेतात,५३ मग रस्त्यावरील (बरें वाईट) सर्व प्रकारचें उदक घेऊन गंगा समुद्रास मिळाल्यावर ज्याप्रमाणें त्यांतून रस्त्यावरील उदक वगैरे वेगळें निवडितां येत नाहीं, ५४ त्याप्रमाणें, अर्जुना, ज्या वेळेस चिदाकाशांत मनाचा प्राणाच्या निरोधानें लय होतो, त्या वेळीं वासनांचा विचार आपोआप नाहींसा होतो.५५ ज्या मनोरूप पटावर हें संसाररूपी चित्र उमटलेलें असतें, तो पट आपोआप फाटतो. ज्याप्रमाणें सरोवर आटल्यावर त्यांत प्रतिबिंब दिसत नाहीं, ५६ त्याप्रमाणें, जेथें मुद्दल मनच नाहींसें होतें, तेथें अहंकार इत्यादि कोठून राहणार ? म्हणूनच, ब्रह्मस्वरूपाचा अनुभव घेणारा शरिरी असतांनाच ब्रह्म होतो. ५७

अन्वय–यज्ञतपसां भोक्तारं, सर्वलोकमहेश्वरं, सर्वभूतानां सुहृदं मां ज्ञात्वा शान्तिम् ऋच्छति. ॥२९॥

अर्थ–सर्व यज्ञ व तपश्चर्या ह्यांचा भोक्ता, सर्व लोकांचा महेश्वर, व सर्व भूतांचा हितकर्ता, असा जो परमेश्वर, तो मीच आहें, म्हणून जो मला जाणतो, तो शांतिसुखाप्रत प्राप्त होतो. ॥ २९ ॥

जिवंतपणींच कांहीं लोक ब्रह्म झाले म्हणून आम्ही पूर्वी तुला सांगितलें, ते तरी या योगमार्गानें आले म्हणूनच; ५८ आणि म्हणूनच ते यमनियमरूपी योगमार्गाचे डोंगर व योगाभ्यासरूप सागर ओलांडून पार झाले; (ब्रह्मत्व पावले;) ५९ आणि त्यांनींच आपल्या स्वतांला उपाधिरहित करून प्रपंच आजमावला, म्हणून ते स्वतः खऱ्या ब्रह्माचें स्वस्वरूप बनून राहिले. १६० याप्रमाणें जेव्हां, श्रीकृष्णांनीं योगयुक्तीचा अभिप्राय प्रदर्शित केला, तेव्हां, अर्जुन मार्मिक होता म्हणून त्याला मोठा चमत्कार वाटला. ६१ हें पाहून कृष्ण त्याच्या मनांतील उद्देश जाणून हास्यवदनानें पार्थास म्हणाले, " मीं जें तुला सांगितलें, त्यामुळें तुझें मन कां बरें प्रसन्न झालें ? " ६२ तेव्हां अर्जुन म्हणतो, " देवा, दुसऱ्याच्या मनांतील अभिप्राय जाणणारांचे तुम्ही राजे आहां, यामुळें माझ्या मनांतील भाव तुम्ही चांगला जाणला. ६३ देवा, मीं जें कांहीं तुम्हांस विचारपूर्वक पुसावें,तें तुम्हीं आधींच जाणलें; तर तुम्ही जें कांहीं म्हणतां, तें अधिक स्पष्ट करून सांगा. ६४ बाकी योगशास्त्राचा जो मार्ग तुम्हीं सांगितला, तो कसा आहे म्हणाल तर, खोल पाण्यांतून पोहून जाण्यापेक्षां पायउतार जसा सोपा असतो तसा आहे. ६५ त्याचप्रमाणें, ज्ञानयोगापेक्षां अष्टांगयोग आमच्यासारख्या निर्बळांना सुगम आहे; परंतु तो कांहीं कालाच्या अवधीनें साध्य होणारा असला तरी चालेल. ६६ म्हणून, देवा, तो योग आणखी एक वेळ सांगावा. आतां अशानें विस्तार होईल खरा; पण तो साद्यंत सांगाच. " ६७ तेव्हां श्रीकृष्ण म्हणाले, " असें का ? तुला

श्रीकृष्ण म्हणती हो कां। तुज हा मार्गु गमला निका। तरी काय जाहलें आइकींजो कां। सुखें बोलों ६८ अर्जुना तूं परिससी। परिसोनि अनुष्ठिसी। तरी आम्हांसीचि वानी कायसी। सांगावयाची ६९ आधींच चित्त मायेचें। वरी मिष जाहलें पढियंतयाचें। आतां तें अद्‌भुतपण स्नेहाचें। कवण जाणे १७० ते ह्मणों कारुण्यरसाची वृष्टि। कीं नवया स्नेहाची सृष्टि। हें असो नेणिजे दृष्टी। हरीची वानूं ७१ जे अमृताची वोतली। कीं प्रेमाचि पिऊन मातली। ह्मणोनि अर्जुनमोहें गुंतली। निघों नेणे ७२ हें बहु जें जें जल्पिजेल। तेथें कथेसि फांकु होईल। परि तें स्नेहरूपा न येल। बोलवरी ७३ ह्मणोनि विसुरा काय येणें। तो ईश्वरु कवळावा कवणें। जो आपुलें मान नेणे। आपणचि ७४ तरी मागील ध्वनीआंतु। मज गमला सावियाची मोहितु। जे बलात्कारें असे म्हणतु। परिस बापा ७५ अर्जुना जेणें जेणें भेदें। तुझें का चित्त बोधें। तैसें तैसें विनोदें। निरूपिजेल ७६ तो काइसया नांव योगु। तयाचा कवण उपेगु। अथवा अधिकारप्रसंगु। कवणा येथ ७७ ऐसें जें जें कांहीं। उक्त असे इये ठाईं। तें आघवेंचि पाहीं। सांगेन आतां ७८ तूं चित्त देऊनि अवधारीं। ऐसें ह्मणोनि श्रीहरी। बोलिजेल ते पुढारी। कथा आहे ७९ श्रीकृष्ण अर्जुनासी संगु। न सांडोनि सांगेल योगु। तो व्यक्त करूं प्रसंगु। म्हणे निवृत्तिदासु १८०

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ श्लोक २९, ओंव्या १८०.

हा योगमार्ग चांगला आवडला असला तर सांगायला आमचें काय जातें, आम्हीं आनंदानें सांगूं. खुशाल ऐक. ६८ अर्जुना, तूं ऐकतोस आणि त्याप्रमाणें आचरण करतोस; असें असतांना आम्हीं तुला सांगण्याची कमरता कां करावी?" ६९ या श्रीकृष्णार्जुनांच्या बोलण्यावर ज्ञानेश्वर महाराज उत्प्रेक्षा करितात—अगोदर आईचें चित्त,आणि त्यांत आवडत्या मुलाचें निमित्त झालें, तर त्या ठिकाणच्या स्नेहाचा अद्भुतपणा कोण जाणील! १७० त्या स्नेहाला कारुण्यरसाची वृष्टि झाली, किंवा अद्भुत स्नेहाची सृष्टीच निर्माण झाली असें म्हटलें तरी चालेल; परंतु हें असो, भगवंताच्या कृपादृष्टीचें कोणीं वर्णन करावें! ७१ ती दृष्टि अमृताच्या मुशींतच ओतली किंवा प्रेम पिऊन उन्मत्त झाली, म्हणून अर्जुनाच्या मोहांत गुंतून तिला बाहेर निघतां येईना. ७२ हिच्याबद्दल जों जों जास्त बोलावें,तों तों कथेचें विषयांतर होईल; तथापि श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या स्नेहाचें वर्णन शब्दानें बोलून करतां येणार नाहीं. ७३ ज्या ईश्वराला स्वतः आपलें माप करतां येत नाहीं, त्या ईश्वराला कोणीं जाणावें? म्हणून हा विचार करीत बसण्यांत काय अर्थ आहे! ७४ परंतु मागें सांगितलेल्या अभिप्रायावरून मला असें वाटतें कीं, तो प्रस्तुत अर्जुनाविषयीं फार मोहित झाला आहे; कारण अर्जुनाला आग्रह करून, ऐक असें म्हणत आहे. ७५ अर्जुना, ज्या ज्या प्रकारानें तुझ्या मनाला बोध होईल, त्या त्या प्रकारानें तुला कौतुकानें आम्ही हा योगमार्ग सांगूं. ७६ त्या योगाला काय म्हणतात, त्याचा उपयोग कोणता, आणि तो आचरण्यास अधिकारी कोण,७७ असें जें जें कांहीं या संबंधानें योग्य असेल, तें सर्व आतां तुला आम्ही सांगतों, ७८ म्हणून तूं चित्त देऊन ऐक. असें बोलून श्रीहरींनीं जें कांहीं सांगितलें,ती कथा पुढें (पुढील अध्यायांत)आहे.७९ निवृत्तिदास ज्ञानेश्वर महाराज म्हणतात कीं, द्वैत कायम ठेवून श्रीकृष्णांनीं अर्जुनाला जो योग सांगितला, तो आम्ही स्पष्ट करून सांगतों. १८०

पुढील अध्यायांतील सकल संसारदुःख निवृत्त करणारा ब्रह्मविद्यायोग भाग्यवानावांचून प्राप्त होत नाहीं अशी स्थिति असतां, व्यासांच्या अनुग्रहानें युद्धांत होणारी हकीकत संजयास कळून तो धृतराष्ट्रास सांगत असतां, व ब्रह्मविद्या सांगण्याच्या उद्देशानें श्रीकृष्णार्जुन युद्धामध्यें गेले नसतां, आणि श्रीकृष्णार्जुन या उभयतांचा निकट संबंध असतांही अर्जुनास ब्रह्मविद्येचें उपोषण होतें; म्हणून अर्जुनास मोह उत्पन्न होऊन तो श्रीकृष्णास शरण गेला, तेव्हां त्याच्या मोहनिवृत्तीकरितां ब्रह्मविद्या सांगण्याचा श्रीकृष्णास सहजच प्रसंग आला, त्यामुळें अर्जुनाचें ब्रह्मविद्याउपोषणाचें पारणें फिटलें; तेव्हां तो ब्रह्मविद्याश्रवणाचा लाभ संजय व धृतराष्ट्र यांस पाहुण्याप्रमाणें आयताच प्राप्त झाला.

ज्ञानेश्वरी.

अध्याय सहावा.

मग रायातें म्हणे संजयो । तोचि अभिप्रावो अवधारिजो । कृष्ण सांगती आतां जो । योगरूप १ सहजें ब्रह्मरसाचें पारणें । केलें अर्जुनालागीं नारायणें । कीं तेचि अवसरीं पाहुणे । पातलों आह्मी २ कैसी दैवाची आगळिक नेणिजे । जैसें तान्होलिया तोय सेविजे । कीं तेंचि चवी करूनि पाहिजे । तंव अमृत आहे ३ तैसें आम्हां तुम्हां जाहलें । जें आडमुठीं तत्त्व फावलें । तंव धृतराष्ट्रें म्हणितलें । हें न पुसों तूतें ४ तया संजया येणें बोलें । रायाचें हृदय चोजवलें । जे अवसरीं आहे घेतलें । कुमरांचिया ५ हें जाणोनि मनीं हांसिला । म्हणे म्हातारा मोहें नाशिला । एऱ्हवीं बोलु तरी भला जाहला । अवसरीं इये ६ परि तें तैसें कैसेनि होईल । जात्यंधा कैसें पाहेल । तेवींचि येरुसे घेईल । ह्मणोनि बिहे ७ परि आपण चित्तीं आपुला । निकियापरी संतोषला । जे तो संवादु फावला । कृष्णार्जुनांचा ८ तेणें आनंदाचेनि धालेपणें । साभिप्राय अंतःकरणें । आतां आदरेंसीं बोलणें । घडेल तया ९ तो गीतेमाजि षष्ठींचा । प्रसंगु असे आयणीचा । जैसा क्षीरार्णवीं अमृताचा । निवाडु जाहला १० तैसें गीतार्थाचें सार । जें विवेकसिंधूचें पार । नानायोगवेभव भांडार । उघडलें कां ११ जें आदिप्रकृतीचें विसवणें । जें शब्दब्रह्मासि न बोलणें । जेथूनि गीतावल्लीचें ठाणें । प्ररोहो पावे १२ तो अध्याय सहावा । वरि साहित्याचिया बरवा । सांगिजेल म्हणोनि परिसावा । चित्त देऊनी १३ माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके । ऐसी अक्षरें रसिकें । मेळवीन १४ जिये कोंवळिकेचेनि पाडें । दिसती नादींचे रंग गोडे । वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि १५ ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणींचि होती जिभा । बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां १६ सहजें शब्दु तरी विषो श्रवणाचा । परि रसना म्हणे रसु हा आमुचा । घ्राणासि गावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल १७ नवल बोलतीये रेखेची वाहणी ।

ज्ञानेश्वरी.

अध्याय सहावा.

मग संजय धृतराष्ट्रास म्हणाला, "राजा, आतां, भगवान् योगाबद्दल जो आपला अभिप्राय सांगतील तो ऐक. १ संजय ब्रह्मविद्येची व आपल्या भाग्याची थोरवी धृतराष्ट्राजवळ अडीच ओंव्यांत वर्णन करितो. नारायणांनीं अर्जुनाला सहज ज्ञानरसाचें पारणें केलें, तों तेच वेळीं आम्ही तेथें पाहुणे म्हणून गेलों होतों. २ दैवाची थोरवी काय वर्णावी! तहान लागलेल्या मनुष्यानें पाणी पिण्याकरितां म्हणून पाण्याचें भांडें तोंडीं लावावें, व त्याची चव घेतांच पाण्याचे ऐवजीं त्याला ज्याप्रमाणें अमृतच मिळावें, ३ त्याचप्रमाणें, राजा, एकादी आडगिऱ्हाइकी मूल्यवान् वस्तु थोड्क्यांत प्राप्त होते, त्याप्रमाणें मला व तुला परमात्मतत्त्व प्राप्त झालें." परंतु धृतराष्ट्र संजयाला म्हणाला कीं, "तुला ब्रह्मरसाबद्दल मी कांहीं विचारीत नाहीं!" ४ या बोलण्यावरून धृतराष्ट्र राजाचें मन पुत्रांची हकीकत ऐकण्याविषयीं उत्कंठित झालें आहे असें संजयानें जाणलें; ५ हें जाणून तो मनांत विस्मय पावला आणि म्हणाला: अरे! अरे! "हा वृद्ध धृतराष्ट्र पुत्रवात्सल्यानें अगदीं वेडावला आहे; एऱ्हवीं येथपर्यंतचा कृष्णार्जुनांचा संवाद अति उत्तम झाला. ६ परंतु या संवादाची गोडी याला कोठून लागणार? कारण. जो जन्मांध आहे त्याला कसें दिसेल? परंतु त्याला असें स्पष्ट जर बोलावें, तर राग येईल, म्हणून संजय भीतीनें स्पष्ट बोलला नाहीं. ७ तथापि श्रीकृष्णार्जुनांच्या परस्पर संवादापासून तो आपल्या मनांत उत्तम प्रकारें संतोषित झाला. ८ ह्या आनंदाच्या तृप्तीनें व प्रफुल्लित अंतःकरणानें तो आतां मोठ्या अदबीनें धृतराष्ट्राला अभिप्राय सांगेल. ९ क्षीरसागराचें मंथन करतांना जशी अमृताची प्राप्ति झाली, त्याप्रमाणें गीतेमध्यें सहाव्या अध्यायाचा प्रसंग उत्तम असून बुद्धीनें जाणावयाचा आहे. १० तो अध्याय गीतार्थाचें सार होय, व आत्मानात्मविचाररूपी समुद्राची पैलथडी होय. अथवा, जणूं काय योगसंपत्तीचा जामदारखानाच उघडला आहे. ११ जें आदिमायेचें विश्रांतिस्थान, व ज्या ठिकाणीं वेदांनाही मौन धारण करावें लागतें, आणि ज्यापासून गीतारूप वेलीला अंकूर फुटला, १२ तो हा सहावा अध्याय सर्व अलंकारादि साहित्यांनीं परिपूर्ण असा सांगेन, तो चित्त देऊन ऐका, अशी महाराज संतांना विनंती करितात. १३ माझें बोल शुद्ध प्राकृत आहेत खरे; परंतु ते प्रतिज्ञेनें सहज अमृतालाही जिंकतील अशा गोड अक्षरांनीं मी सांगेन. १४ त्या बोलांच्या मृदुपणानें सप्तस्वरांपासून होणारा आनंदही कमी असा भासेल, किंवा त्यांच्या छंदानें सुवासही कमीपणा पावेल. १५ पहा कीं, गोडीच्या आशेनें कानालाच जिव्हा फुटतील, व इंद्रियें आपआपसांत कलह करूं लागतील. कां कलह करतील तर—१६ शब्दविषय, सहज पाहिलें तर कानाचा आहे; परंतु जीभ, हा रस आमचा आहे असें म्हणेल, व नाकालाही हा आमचा, गंध विषय आहे, असा भास होण्याला कारण, हा शब्द विषयच होईल. १७ यापेक्षां आणखी नवल कोणतें,

देखतां डोळा पुरों लागे धणी । ते म्हणती उघडली खाणी । रूपाची हे १८
जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनाचि धांवें बाहिरें । बोलु भुजाही आविष्करे।
आलिंगावया १९ ऐशीं इंद्रियें आपुलालिया भावीं । झोंबती परि तो सरिसे-
पणेंचि बुझावी । जैसा एकला जग चेववी। सहस्रकरु २० तैसें शब्दाचें व्याप-
कपण । देखिजे असाधारण । पाहातयां भावज्ञां फावती गुण । चिंतामणीचे
२१ हें असो तया बोलांचीं ताटें भलीं । वरी कैवल्यरसें वोगरलीं । ही प्रति-
पत्ति मियां केली । निष्कामासी २२ आतां आत्मप्रभा निच नवी । तेचि क-
रूनि ठाणदिवी । जो इंद्रियांतें चोरूनि जेवी । तयासीचि फावे २३ येथ श्र-
वणाचेनि पांगें-। वीण श्रोतयां व्हावें लागे । हे मनाचेनि निजांगें । भोगिजे
गा २४ आहाच बोलाची वालीफ फेडिजे । आणि ब्रह्माचियाचि आंगा घ-
डिजे । मग सुखेंसीं सुरवाडिजे । सुखाचिमाजि २५ ऐसें हळुवारपण जरी ये-
ईल । तरीच हें उपेगा जाईल । एऱ्हवीं आघवी गोष्टी होईल । मुकया बहि-
रयाची २६ परी तें असो आतां आघवें । नलगे श्रोतयांतें कडसावें । जे अ-
धिकारिये एथ स्वभावें । निष्कामकामु २७ जिहीं आत्मबोधाचिया आवडी ।
केली स्वर्गसंसाराची कुरोंडी । तेवांचूनि एथिंची गोडी । नेणती आणिक २८
जैसा वायसीं चंद्र नोळखिजे । तैसा प्राकृतीं ग्रंथु हा नेणिजे । आणि तो हि-
मांशुचि जेविं खाजें । चकोराचें २९ तैसा सज्ञानासी तरी हा ठावो । आणि
अज्ञानासी आन गांवो । ह्मणोनि बोलावया विषय पहाहो । विशेषु नाहीं३०
परि अनुवादलों मी प्रसंगें । तें सज्जनीं उपसाहावें लागे । आतां सांगेन काय
श्रीरंगें । निरोपिलें जे ३१ तें बुद्धीही आकळितां सांकडें । ह्मणऊनि बोलीं
विपायें सांपडे । परि श्रीनिवृत्तिकृपादीप उजियेडें । देखेन मी ३२ जें दिठीही
न पविजे । तें दिठीविण देखिजे । जरी अतींद्रिय लाहिजे । ज्ञानबळ ३३ ना
तरी जें धातुर्वादाही न जोडे । तें लोहींचि पंधरें सांपडे । जरी दैवयोगें चडे।
परिसु हाता ३४ तैसी गुरुकृपा होये । तरी करितां काय आपु नोहे । म्हण-
ऊनि ते अपार मातें आहे। ज्ञानदेवो म्हणे ३५ तेणें कारणें मी बोलेन। बोलीं
अरूपाचें रूप दावीन। अतींद्रिय परि भोगवीन। इंद्रियांकरवीं ३६ आइका यश
श्री औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य। हे साही गुणवर्य। वसती जेथ ३७ म्हणोनि
तो भगवंतु। जो निःसंगाचा सांगातु। तो म्हणे पार्था दत्तचित्तु। होई आतां ३८

कीं, बोलण्याची नुसती सरणी पाहून डोळे तृप्त होतील; आणि त्यांना असें वाटूं लागेल कीं, हे बोल नसून ही प्रत्यक्ष रूपाची खाणच निर्माण झाली आहे! १८ जेव्हां शब्द जुळून संपूर्ण वाक्य बाहेर पडेल, तेव्हां इंद्रियांना मागें टाकून मनच बाहेर निघेल;आणि आपले बाहु उभारून त्या वाक्याला आलिंगन देण्याला धावेल. १९ याप्रमाणें सर्व इंद्रियें आपापल्या धर्माप्रमाणें त्या बोलाला झोंबतील, परंतु तो शब्दही सगळ्यांना सारखेपणानें शांत करील. ज्याप्रमाणें एकटा सूर्य सर्व जगाच्या व्यवहाराला प्रवृत्त करितो. २० त्याप्रमाणें शब्दांचा व्यापकपणा अलौकिक आहे असें समजा; आणि पाहूं गेलें असतां, जो त्यांचा अर्थ जाणणारा आहे, त्याला त्यांचे ठिकाणीं चिंतामणीसारखे गुण आढळून येतात. २१ हें असो; त्या बोलांचीं मोठालीं ताटें बनवून त्यांत मोक्षरस वाढून, निष्कामी जनांना ही ग्रंथरूपी मेजवानीच केली आहे. २२ या मेजवानींत उजेडाकरितां नित्य नवी अशी आत्मज्योतीची ठाणवई करून, त्या उजेडांत जो इंद्रियांना न कळत मेजवानीचें सेवन करील, त्यालाच तिची प्राप्ति होईल. २३ या ठिकाणीं श्रवणाचें साधन जे कान ते टाकून देऊन श्रोत्यांनीं मनानेंच उपभोग घ्यावा. २४ बोलरूपी साल अगोदर काढून टाकून बोलाचें लक्ष जें ब्रह्म तेथें तद्रूप होऊन मग मुखानेंच मुखाची गोडी घ्यावी. २५ इतक्या तऱ्हेचें सूक्ष्म मन जर होईल, तरच त्याचा उपयोग होईल; नाहींतर सर्व गोष्टी मुक्यानें बोलून बहिऱ्यानें ऐकल्याप्रमाणें होतील.२६ परंतु तें प्रतिपादन आतां असो! श्रोत्यांची चिकित्सा करण्याची ही वेळ नव्हे, सामान्यतः जे निष्काम पुरुष असतील तेच या मेजवानीचे अधिकारी आहेत. २७ ते निष्काम कसे म्हणशील तर—ज्यांनीं ब्रह्मज्ञानाच्या आवडीकरितां स्वर्ग आणि संसार यांच्या प्राप्तीची ओंवाळणी केली आहे, त्यांच्याशिवाय इतरांना या बोलाची गोडी कळणार नाहीं. २८ कावळ्याला जशी चंद्राची ओळख नाहीं; तशी या गीता ग्रंथाची प्राकृत जनांना ओळख नाहीं. परंतु तोच चंद्र जसा चकोराचें खाद्य आहे, [तद्वत्, कर्माच्या फलांची ज्यांना आशा नाहीं, त्यांनाच या गीता ग्रंथाची ओळख आहे.] २९ तसेंच. जे ज्ञानी आहेत, त्यांना हा ग्रंथ म्हणजे विश्रांतीचें ठिकाण आहे, आणि जे अज्ञानी आहेत, त्यांना परक्या गांवाप्रमाणें आहे. म्हणून या विषयावद्दल विशेष बोलण्याचें कारण नाहीं. ३० परंतु प्रसंगानुसार मीं जें बोललों, त्याची सज्जनांनीं मला क्षमा करावी आपुटें, श्रीरंगांनीं जें काय सांगितलें आहे तें मी सांगेन. ३१ तें बोलणें बुद्धीलाही कळण्याला कठीण आहे, म्हणून माझ्या सांगण्यांत कदाचित् आलें तर येईल; परंतु श्रीगुरु निवृत्ति महाराजांच्या कृपारूप दीपाच्या उजेडानें मी तें जाणून बोलेन. ३२ गुरुकृपेचें काय ऐश्वर्य सांगावें—इंद्रियातीत असें जें ब्रह्मज्ञान, तें जर प्राप्त झालें, तर जी गोष्ट दृष्टीस न पडणारी ती दृष्टीशिवाय दिसेल. ३३ जर दैवयोगानें हातास परीस लागला, तर किमयागारासही जें न मिळणारें तें सोनें लोखंडांत सांपडतें; ३४तसें, जर सद्गुरूची कृपा होईल, तर प्रयत्न केला असतां काय प्राप्त होणार नाहीं ? म्हणून, ज्ञानदेव म्हणतात, अशी जी सद्गुरुकृपा, ती मजवर पूर्ण आहे. ३५ त्यायोगानें मी बोलेन, माझ्या बोलण्यांत निराकार वस्तु सर्वांस दाखवीन, आणि जी वस्तु इंद्रियातीत आहे, ती इंद्रियांकडून भोगवीन, ३६ पहा—यश, लक्ष्मी, औदार्य, ज्ञान, वैराग्य आणि ऐश्वर्य हे सहा गुण ज्या श्रीकृष्णाचे ठिकाणीं वास करतात,३७ म्हणून त्याला भगवान् असें म्हणतात; व ज्यांनीं सर्वसंग परित्याग केला आहे त्यांचा जो मित्र, तो पार्थास असें म्हणाला कीं,आतां चित्त देता हो.३८

श्रीभगवानुवाचः—

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः । स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः १

आइकें योगी आणि संन्यासी जनीं । हे एकचि सिनानें झणीं मानीं । एन्हवीं विचारिजती जंव दोन्ही । तंव एकचि ते ३९ सांडिजे दुजया नामाचा आभासु । तरी योगु तोचि संन्यासु । पाहतां ब्रह्मीं नाहीं अवकाशु । दोहींमाजीं ४० जैसें नामाचेनि अनारिसेपणें । एका पुरुषातें बोलावणें । कां दोहीं मार्गीं जाणें । एकाचि ठाया ४१ नातरी एकचि उदक सहजें । परि सिनाना घटीं भरिजे । तैसें भिन्नत्व जाणिजे । योगसंन्यासांचें ४२ आइकें सकळ संमतें जगीं । अर्जुना गा तोचि योगी । जो कर्मे करूनि रागी । नोहेचि फळीं ४३ जैसी मही हे उद्भिजें । जनी अहंबुद्धीवीण सहजें । आणि तेथिंचीं तियें बीजे । अपेक्षीना ४४ तैसा अन्वयाचेनि आधारें । जातीचेनि अनुकारें । जें जेणें अवसरें । करणें पावे ४५तें तैसेंचि उचित करी । परी साटोपु नोहे शरीरीं । आणि बुद्धिही करोनि फळवेरीं । जायेचिना ४६ ऐसा तोचि संन्यासी । पार्था गा परियेसी । तोचि भरंवसेनिसीं । योगीश्वरु ४७ वांचूनि उचित कर्म प्रासंगिक । तयातें म्हणे हें सांडावें बद्दक । तरी टांकोटांकीं आणिक एक । मांडीचि तो ४८ जैसा क्षाळूनियां लेपु एकु । सवेंचि लाविजे आणिकु । तैसेनि आग्रहाचा पाइकु । विचंबे वायां ४९ गृहस्थाश्रमाचें वोझें । कपाळीं आधींचि आहे सहजें । कीं तेचि संन्याससवां ठेविजे । सरिसें पुढती ५० ह्मणूनि अग्निसेवा न सांडितां । कर्माची रेखा नोलांडितां । आहे योगसुख स्वभावता । आपणपांचि ५१

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव । न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥२॥

ऐकें संन्यासी तोचि योगी । ऐसी एकवाक्यतेची जगीं । गुढी उभविली अनेगीं । शास्त्रांतरी ५२ जेथ संन्यासिला संकल्पु तुटे । तेथचि योगाचें सार भेटे । ऐसें हें अनुभवाचेनि घटें । साचें जया ५३

आरुरुक्षोर्मनेयोगं कर्म कारणमुच्यते । योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥

आतां योगाचळाचा निमथा । जरी ठाकावा आथि पार्था । तरी सोपाना या कर्मपथा । चुका झणीं ५४ येणें यमनियमांचेनि तळवटे । रिगे आसनाचिये पाउलवाटें । येई प्राणायामाचेनि आडकंठें । वरौता गा ५५ मग प्रत्याहाराचा अधाडा । जो बुद्धीचियाहि पायां निसरडा । जेथ हटिये सांडिती होड़ा कडेलग ५६ तरी अभ्यासाचेनि बळें । प्रत्याहारीं निराळें । नखीं लागेल ढाळें-

अन्वय–यः कर्मफलं अनाश्रितः (सन्) कार्यं कर्म करोति, सः (अपि) संन्यासी योगी च (भवति; केवलं) निरग्निः अक्रियः च न. ॥१॥

अर्थ–श्रीभगवान म्हणालेः—जो अग्निसेवा व विहित कर्मे करीत नाहीं, तोच केवळ संन्यासी व योगी असें नव्हे; तर जो कर्माचे फलाची इच्छा न करितां विहित कर्मे करितो, तोही संन्यासी व योगी होय. ॥ १ ॥

श्रीकृष्ण म्हणतातः—पार्था, हें पहा-योगी आणि संन्यासी हे या जगांत एकच आहेत. ते वेगळे आहेत असें मानशील हो; कारण,ह्या दोहोंचा सहज विचार केला तर ते एकच आहेत. ३९ त्यांच्यावर दोन नांवांचा आरोप मात्र आहे तो सोड. कारण, ब्रह्मदृष्टीनें पाहूं गेलें असतां या दोहोंत भेद नाहीं, म्हणून योग तोच संन्यास होय. ४० जसें नांवाच्या वेगळेपणानें एकाच पुरुषाला हांका मारणें किंवा एकाच ठिकाणाला दोन मार्गानें जाणें;४१ किंवा एकच उदक दोन भांड्यांत भरल्यावर पाण्याला जसा दुजा भाव नाहीं, तसा योग आणि संन्यास यांत भेद नाहीं असें जाण. ४२ अर्जुना, जो कर्मे करून त्यांच्या फलांची इच्छा धरीत नाहीं, तोच या जगतांत सर्वांच्या बुद्धीनें योगी असा समजला जातो. ४३ पृथ्वी ही वृक्षादिकांना उत्पन्न करून त्यांच्या उत्पत्तीबद्दल कांहीं अहंकारबुद्धि दाखवीत नाहीं;आणि त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या फलांचीही ज्याप्रमाणें इच्छा करीत नाहीं,४४ त्याचप्रमाणें, आत्मबोधाच्या आधारानें आणि जातीस अनुरूप असें जें कर्म ज्या कालीं करण्याचा प्रसंग येईल, ४५ तें सर्व यथाविधि करून तो आपल्या शरिरांत अहंकार उत्पन्न होऊं देत नाहीं, आणि बुद्धीला फलाच्या आशेकडे जाऊं देत नाहीं. ४६ पार्था-ऐक. असा जो पुरुष, तोच संन्यासी, आणि तोच निःसंशय योगीश्वर होय. ४७ या हातोटीशिवाय,जो कोणी, नित्यनैमित्तिक कर्मे बद्धक आहेत असें समजून त्यांचा त्याग करतो,आणि लागलीच दुसरीं कर्मे करण्यास प्रवृत्त होतो;४८ जसा कोणी एक लेप धुऊन टाकून दुसरा लेप लावण्याचे खटपटींत पडतो, त्याप्रमाणें उचित कर्म त्याग करून दुसरें कर्म करण्याच्या आग्रहांत पडून व्यर्थ त्रास सोसतो.४९गृहस्थाश्रमाचें ओझें सर्वांच्या कपाळीं अगोदर सहजींच लागलें आहे;परंतु गृहस्थाश्रमाचें आचरण यथाविधि न करितां संन्यास घेऊन पहिलें ओझें टाकून लगेच दुसरें ओझें डोक्यावर घेतो. ५० म्हणून, श्रौतस्मार्त होमादिक कर्मांचें यथाविधि आचरण न टाकतां कर्मांची मर्यादा ओलांडली नाहीं, तर आपल्याजवळ सहजानुसार योगसुख आहे. ५१

अन्वय–पांडव, (पंडिताः) यं संन्यासमिति प्राहुः तं योगं विद्धि; असंन्यस्तसंकल्पः कश्चन योगी न भवति हि. २

अर्थ–हे अर्जुना, ज्याला संन्यास असें म्हणतात, तोच योग असें तूं समज. कारण, संकल्पत्यागावाचून कोणीही योगी होत नाहीं. ॥ २ ॥

ऐकः 'संन्यासी तोच योगी' असा एकवाक्यतेचा ध्वज अनेक शास्त्रांनीं या जगांत उभारला आहे.५२ ज्या पुरुषाच्या ठिकाणीं त्याग झाल्यामुळें संकल्प नष्ट झाला, त्याचे ठिकाणीं, योगाचें सार जें ब्रह्म त्याची भेट होते, असें अनुभवाअंतीं ज्याचें ठरलें आहे. ५२

अन्वय–योगम् आरुरुक्षोः मुनेः कर्म कारणम् उच्यते; योगारूढस्य तस्यैव शमः कारणम् उच्यते. ॥३॥

अर्थ–ज्या मुनीला ध्यानयोग प्राप्त करून घ्यावयाचा आहे, त्याला विहित कर्मांचें आचरण हेंच साधन होय; व योग प्राप्त झाल्यावर तो पूर्णत्वास येण्याला कर्मनिवृत्ति हेंच साधन होय. ॥ ३ ॥

पार्था, अशा प्रकारें योगरूप पर्वताच्या माथ्यावर ज्याला जाण्याची इच्छा असेल, त्यानें कर्ममार्गाचा सोपा जिना आचरण्यास चुकूं नये हो! ५४ या कर्ममार्गानें जावयास लागलें, म्हणजे पहिल्यानें या पर्वताचा यमनियमरूपी तळ लागतो; नंतर आसनांच्या पाऊल वाटेनें प्राणायामरूप कड्यानें वर जावें लागतें, ५५ नंतर, प्रत्याहार हाच कोणी अर्धा तुटलेला कडा लागतो. त्याच्यावरून बुद्धीचेही पाय निसरतात; आणि तो तुटलेला कड्याचा मार्ग ओलांडतांना हठयोग्यांच्यासुद्धां प्रतिज्ञा शेवटास जात नाहींत. ५६ तथापि अभ्यासाच्या बळानें प्रत्याहाररूप शून्यासारख्या कठीण मार्गांत फक्त वैराग्यच

ढाळें वैराग्याची ५७ ऐसा पवनाचेनि पाठारें । येतां धारणेचेनि पैसारें । क्रमी ध्यानाचें चवरें । सांपडे तंव ५८ मग तया मार्गाची धांव । पुरेल प्रवृत्तीची हांव । जेथ साध्यासाधना खेंव । समरसें होय ५९ जेथ पुढील पैस पारुखे । मागील स्मरावें तें ठाके । ऐसिये सरिसीये भूमिके । समाधि राहे ६० येणें उपायें योगारूढु । जो निरवधि जाहला प्रौढु । तयाचिया चिन्हांचा निवाडु । सांगेन आइकें ६१

यदा हि नेंद्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते । सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥४॥

तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा । नाहीं विषयांचिया येरझारा । जो आत्मबोधाच्या वोवरां । पहुडला असे ६२ जयाचें सुखदुःखाचेनि आंगें । झगटलें मानस चेवो नेघे । विषय पासींही आलियां से न रिघे । हें काय ह्मणऊनि ६३ इंद्रियें कर्माच्या ठायीं । वाढीनलीं परि कहीं । फळहेतूची चाड नाहीं । अंतःकरणीं ६४ असतेनि देहें एतुला । जो चेतुचि दिसे निदेला । तोचि योगारूढु भला । वोळखें तूं ६५ तेथ अर्जुन म्हणे अनंता । हें मज विस्मो बहु आइकतां । सांगें तया ऐसी योग्यता । कवणें दीजे ६६

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् । आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥५॥

तंव हांसोनि श्रीकृष्ण म्हणे । तुझें नवल ना हें बोलणें । कवणासि काय दिजेल कवणें । अद्वैतीं इये ६७ पैं व्यामोहाचिये शेजे । बळिया अविद्या निद्रितु होईजे । ते वेळीं दुःस्वप्न हा भोगिजे । जन्ममृत्यूंचा ६८ पाठीं अवसांत येचेवो । तैं तें अवघेंचि होय वावो । ऐसा उपजे नित्य सद्भावो । तोहि आपणपांचि ६९ ह्मणऊनि आपणचि आपणया । घातु कीजतु असे धनंजया । चित्त देऊनि नाथिलिया । देहाभिमाना ७०

बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः । अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥६॥

हा विचारूनि अहंकार सांडिजे । मग असतीच वस्तु होइजे । तरी आपली स्वास्ति सहजें । आपण केली ७१ एऱ्हवीं कोशकीटकाचिया परी । तो आपणयां आपण वैरी । जो आत्मबुद्धि शरीरीं । चारुस्थळीं ७२ कैसे प्राप्तीचिये वेळे । निदैवा अंधळेपणाचे डोहळे । कीं असते आपुले डोळे । आपण झांकीं ७३ कां कवण एकु भ्रमलेपणें । मी तो नव्हे गा चोरलों म्हणे । ऐसा नाथिला छंदु अंतःकरणें । घेऊनि ठाके ७४ एरवीं होय तें तोचि आहे । परि काई कीजे बुद्धि तैसी नोहे । देखा स्वप्नींचेनि घायें । कीं मरे साचें ७५ जैसी ते शुकाचेनि

हळू हळू चढूं शकतें. ५७ अशा रीतीनें वायुरूप घोड्याच्या पाठीवर बसून मार्ग क्रमीत असतां चित्त स्थिर करण्याच्या विस्तृत जाग्यावर आल्यानंतर ध्यानाचा शेवट स्वाधीन होईपर्यंत मार्ग क्रमण करितो. ५८ मग ज्या ठिकाणीं साध्य व साधन एक होतात, त्या ठिकाणीं मार्गाची धांव व प्रकृतीची हाव संपते. ५९आणि ज्या ठिकाणीं पुढील पाऊल टाकणें बंद होऊन मागीलही आठवण राहत नाहीं,अशा समान भूमिकारूप समाधीवर तो पुरुष राहतो. ६०या उपायानें जो योगारूढ होतो, तो निःसंशय परिपूर्ण झाला. आतां त्याच्या चिन्हांचा निर्णय तुला सांगतों तो ऐक. ६१

अन्वय–यदा हि (पुमान्) इंद्रियार्थेषु न कर्मसु न अनुषज्जते सर्वसंकल्पसंन्यासी च (भवति), यदा योगारूढः उच्यते ४

अर्थ–जेव्हां योगी विषयांचे ठिकाणीं व कर्मांचे ठिकाणीं सक्त होत नाहीं, आणि सर्व संकल्प टाकून देतो, तेव्हां त्याला योगारूढ असें म्हणतात. ॥ ४ ॥

हें पहा–जो आत्मबोधाच्या तळघरांत निजलेला असतो, म्हणजे ज्याला आत्मज्ञान झालेलें असतें, त्याच्या इंद्रियांच्या घरीं विषयांचें येणें जाणें बंद होतें. ६२ सुखदुःखांशीं झगडतांना ज्याचें मन जागें होत नाहीं. तसेंच त्याच्याजवळ जरी विषय मूर्तिमंत येऊन उभे राहिले, तरी ते कोण आहेत याबद्दल त्याला भानही नसतें. ६३ कदाचित् इंद्रियें कर्म करण्याला प्रवृत्त झालीं, तरी त्याला अंतःकरणांत फलाच्या हेतूची इच्छा नसते. ६४ एवढे देहाचे व्यापार चालले असतांना जो झोपेंतल्या स्थितीप्रमाणें उदासीन दिसतो, त्यालाच खरा योग साध्य झाला असें तूं समज. ६५ अशी योग्याची स्थिति ऐकून अर्जुन देवास म्हणतोः हे अनंता, तुम्ही जें सांगतां, तें ऐकून मला नवल वाटतें; तर त्या योग्याला अशी योग्यता कोण देतो हें मला सांगा. ६६

अन्वय–आत्मना आत्मानम् उद्धरेत्, आत्मानं न अवसादयेत्; आत्मा एव हि आत्मनः बंधुः, आत्मा एव आत्मनः रिपुः

अर्थ–आपण आपल्या आत्म्यानें आत्म्याचा उद्धार करून घ्यावा; आपल्या आत्म्याला अधोगतीस नेऊं नये; कारण आत्मा हाच आत्म्याचा हितकर्ता व आत्मा हाच आत्म्याचा शत्रु होय. ॥ ५ ॥

त्या वेळेस श्रीकृष्ण हंसून म्हणतातः––तुझ्या बोलण्याचें मला नवल वाटतें. कारण अशा अद्वैत स्थितींत अर्शा वास्तविक स्थिति आहे. परंतु कोणाला कोणी काय द्यावयाचें आहे? ६७ मनुष्य भ्रांतिरूप शय्येवर बळकट अज्ञानानें जेव्हां निजलेला असतो, त्या वेळेस जन्ममृत्यूंचीं दुष्ट स्वप्नें भोगतो. ६८ नंतर अकस्मात् जागा झाल्यावर तीं जन्ममरणरूप सर्व स्वप्नें व्यर्थ होतात; आणि आपण खरे जिवंत आहों असा त्यास निश्चय होतो, तोही त्यास आपल्यावरच होतो म्हणजे जीवितावस्था व मृतावस्था ह्या दोन्ही अवस्थेचा आश्रय हाच असतो. ६९,म्हणून,हे धनंजया,खोट्या देहाचा अभिमान धरून मनुष्य आपणच आपल्या घातास प्रवृत्त होतो. ७०

अन्वय–येन आत्मना एव आत्मा जितः, तस्य आत्मनः बंधुः आत्मा; अनात्मनः तु शत्रुत्वे आत्मा एव शत्रुवत् वर्तेत. ॥ ६ ॥

अर्थ–ज्यानें आत्म्याच्या साहाय्यानेंच आत्मा जिंकिला त्याच्या आत्म्याचा बंधु म्हणजे हितकर्ता त्याचा आत्माच होय; परंतु ज्यानें आत्मा जिंकिला नाहीं, त्याचा आत्माच त्याचा शत्रु होतो. ॥ ६ ॥

विचार करून हा अहंकार सोडला म्हणजे मूळचा असलेला ब्रह्मरूप हा होतो, असें झालें म्हणजे आपण आपलें कल्याण केलें असें सहज होतें. ७१ नाहींतर जो मुशोभित अशा शरिराचे ठिकाणीं लुब्ध होऊन आत्मस्वरूप विसरतो व आपलेपणा मानितो, तो कोशकिड्याप्रमाणें आपला आपण वैरी होतो. ७२ काय सांगावें, लाभाची वेळ आली असतां हतभागी मनुष्याला अंधळेपणाचे डोहळे आठवून तो जसे आपले डोळे झांकून वस्तुलाभाला अंतरतो; ७३ किंवा एकादा मनुष्य भ्रमानें माझा मीच हरवलों असें म्हणतो, आणि अंतःकरणांत तोच खोटा भाव धरून बसतो. ७४ एरव्हीं या भ्रमाशिवाय पाहूं गेलें असतां तो स्वतांच ब्रह्मरूप आहे; परंतु कांहीं केल्यानें त्याचे बुद्धीला मी ब्रह्मरूप आहे असें भान न होतां, मी दुःखी आहें असा भास होतो. परंतु तेव्हांही त्याची ब्रह्मरूपता नष्ट होत नाहीं. पहा कीं–स्वप्नांतील तरवारीचे वारानें कोणी खरोखर मरतो काय? ७५ राघूला धरण्या-

आंगभारें । नळिका भोविन्नली एरी मोहरें । तेणें उडावें परि न पुरे । मनशंका ७६ वायांचि मान पिळी । अटुवें हियें आंवळी । टिटांतु नळी । धरूनि ठाके ७७ म्हणे बांधला मी फुडा । ऐसिया भावनेचिया पडे खोडां । कीं मोकळिया पायांचा चवडा । गोंवी अधिकें ७८ ऐसा काजेंवीण आंतुडला । तो सांग पां काय आणिकें बांधला । मग न सोडीच जन्ही नेला । तोडूनि अर्धा ७९ ह्मण- ऊनि आपणयां आपणचि रिपु । जेणें वाढविला हा संकल्पु । येर स्वयंबुद्धी म्हणे बापु । जो नाथिलें नेघे ८०

जितात्मनः प्रशांतस्य परमात्मा समाहितः । शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥७॥
ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः । युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ॥८॥

तया स्वांतःकरणजिता । सकळकामोपशांता । परमात्मा परौता । दूर नाहीं८१ जैसा किडाळाचा दोषु जाये । तरी पंधरें तेंचि होये । तैसें जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्पलोपीं ८२ हा घटाकारु जैसा । निमालिया तया अवकाशा । नलगे मिळों जाणें आकाशा । आना ठाया ८३ तैसा देहाहंकारु नाथिला । हा समूळ जयाचा नाशिला । तोचि परमात्मा संचला । आधींचि आहे ८४ आतां शीतोष्णाचिया वाहणी । तेथ सुखदुःखाची कडसणी । इयें नसमाती कांहीं बोलणीं । मानापमानाचीं ८५ जे जिये वाटा सूर्यु जाये । तेउतें तेजाचें विश्व होये । तैसें तया पावे तें आहे । तोचि म्हणउनी ८६ देखें मेघौनि सुटती धारा । तिया न रुपती जैसिया सागरा । तैसीं शुभाशुभें योगीश्वरा । नव्हती आनें ८७ जो हा विज्ञानात्मकु भावो । तया विवरितां जाहला वावो । मग लागला जंव पाहों । तंव ज्ञान तें तोचि ८८ आतां व्यापकु कीं एकदेशी । हे ऊहापोही जे ऐसी । ते करावी ठेली आपैशी । दुजेनवीण ८९ ऐसा शरीरिचि परि कौतुकें । परब्रह्माचेनि पाडें तुके । जेणें जिंतलीं एकें । इंद्रियें गा ९० तो जितेंद्रियु सहजें । तोचि योगयुक्तु म्हणिजे । जेणें सानें थोर नेणिजे । कवणे कालीं ९१ देखें सोनयाचें निखळ । मेरुयेसणें ढिसाळ । आणि मातियेचें डिखळ । सरिसोंचि मानी ९२ पाहतां पृथ्वीचें मोल थोडें । ऐसें अनर्घ्य रत्न चोखडें । देखे दगडाचेनि पाडें । निचाडु ऐसा ९३

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु । साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ९ ॥

तेथ सुहृद आणि शत्रु । कां उदासु आणि मित्रु । हा भावभेदु विचित्रु ।

करितां टांगलेली झाडावरील नळी त्याच्या अंगभारानें उलट फिरली असतां, तो उडून न जातां आपणच फिरलों अशी मनांत शंका येऊन ती जशी सोडीत नाहीं, ७६ व्यर्थ मान हालवतो, आणि छातीनें व चवड्यानें ती नळी आवळून चोंचीनें धरून ओरडतो, आणि म्हणतो कीं, ७७ मी खरोखर बांधला गेलों; अशाच समजुतीनें खोड्यांत पडतो, आणि मोकळ्या पायांचे चवड्यानें नळी अधीक बळकट धरतो. ७८ अशा स्थितींत त्याला अर्धा तोडून जरी नेला तरी तो ती नळी सोडीत नाहीं; असा जो निरर्थक सांपडला, त्याला कोणी दुसरें बांधावयास आलें होतें का सांग बरें ? ७९ म्हणून, ज्यानें मनांतील संकल्प जास्ती वाढविले आहेत, तो आपला आपणच शत्रु होय.पण जो पुरुष वृथाभिमान धारण करीत नाहीं, तो आत्मज्ञानी होय. ८०

अन्वय–जितात्मनः प्रशांतस्य परमात्मा समाहितः (भवति. यदा) योगी विजितेंद्रियः, ज्ञानविज्ञानतृप्तात्मा, समलोष्टाश्मकांचनः, शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः (समः), कूटस्थः (भवति, तदा) युक्तः इति उच्यते. ॥७।८॥

अर्थ–ज्यानें आपलें मन जिंकिलें व ज्याच्या मनाला प्रसन्नता प्राप्त झाली, तो जीव परमात्मरूपी आहे. जेव्हां योगी आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेवितो; ब्रह्मज्ञान व आत्मसाक्षात्काराचें ज्ञान यांनीं तृप्त असतो; माती, दगड व सोनें हीं सारखीं समजतो; शीत उष्ण, सुख-दुःख, तसेंच मान-अपमान, हीं सारखीं मानितो; आणि निर्विकारस्वरूपीं मन स्थिर ठेवितो; तेव्हां त्याला ' युक्त ' असें ह्मणतात. ॥७।८॥

ज्यानें आपलें मन जिंकिलें आहे, व ज्याच्या सर्व वासना शांत झाल्या आहेत, त्याला इतरांप्रमाणें परमात्मा लांब नाहीं. ८१ सोन्याचा हिणकटपणा तावून नाहींसा झाल्यावर तेंच जसें उत्तम सोनें होतें, तद्वत् मनांतील संकल्प नाहींतसे होतांच जीवास ब्रह्मत्व येतें. ८२ घटांतील आकाशाला,घटाचा नाश झाल्यावर जसें महाकाशाला मिळण्याकरितां दुसरे ठिकाणीं जावें लागत नाहीं, ८३ तसा ज्याच्या देहांतील खोट्या अहंकाराचा समूळ नाश झाला तो पुरुष मुळचाच परमात्मा आहे.८४ अशा स्थितींत शीत किंवा ऊष्ण, सुख किंवा दुःख, मान किंवा अपमान प्राप्त झाले असतांही ज्याचे ठिकाणीं त्याचा विचार संभवत नाहीं. ८५ कारण ज्या ज्या वाटेनें सूर्य जातो, त्या त्या वाटेनें त्यास सर्व विश्व प्रकाशित दिसतें, त्याप्रमाणें, त्याला जी जी वस्तु आढळतें, ती ती–तो स्वतः ब्रह्मरूप बनल्यामुळें–ब्रह्मरूपीच भासते. ८६ पहा कीं, मेघांपासून सुटणाऱ्या पावसाच्या धारा ज्याप्रमाणें समुद्राला खुपत नाहींत, त्याचप्रमाणें, जो ब्रह्मरूप बनला आहे त्याला शुभाशुभ कर्में हीं आपल्या रूपाहून भिन्न वाटत नाहींत. ८७ प्रत्यक्ष दिसणाऱ्या संसाराचा विचार केला असतां ज्याला संसार मिथ्या झाला आणि ज्या ज्ञानानें संसार मिथ्या झाला तें ज्ञानही आपलेंच स्वरूप आहे, ८८ असा निश्चय झाल्यानंतर, मी व्यापक आहे किंवा अव्यापक आहें अशी वाटाघाट करूं लागल्यास, ती जागच्या जागींच राहते; कारण, त्यास द्वैतभाव नसतो. ८९ अशा रीतीनें शरिरांत राहून ज्यानें आपलीं इंद्रियें जिंकलीं आहेत, त्यास सहजच ब्रह्माची योग्यता आली आहे.९० तोच सहज जितेंद्रिय आणि तोच योगी होय. कारण, त्याला लहान आणि थोर हा भेद कधीं नसतो. ९१ किती अभेदबुद्धि म्हणून सांगावी, असें पहा कीं, शुद्ध सोन्याचा मेरूएवढा पर्वत व मातीचें ढेंकूळ हीं दोन्हीं जो सारखींच मानतो,९२ ज्याचें मोल पाहूं गेलें असतां त्यापुढें पृथ्वीचेंही मोल थोडें आहे, अशा रत्नाला केवळ दगडाप्रमाणें मानण्याइतका जो निरिच्छ असतो, ९३

अन्वय–यः सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु, साधुषु, पापेषु च अपि समबुद्धिः (अस्ति, सः) विशिष्यते. ॥९॥

अर्थ–ज्या योग्याची सुहृद [प्रत्युपकाराची आशा न धरितां उपकार करणारा], मित्र [सहवासानें प्रीति करणारा], शत्रु, उदासीन, मध्यस्थ, द्वेष करण्यास योग्य, व आप्तसंबंधी याचे ठिकाणीं, आणि साधूचे व तशीच पाप्याचे ठिकाणींही समबुद्धि असते, तो सर्वांत श्रेष्ठ होय.

त्याचे ठिकाणीं आप्त आणि शत्रु अथवा उदासीन आणि मित्र अशा विचित्र कल्पना कोठून

कल्पू कैंचा ९४ तया बंधु कोण कांह्याचा । द्वेषिया कवणु तयाचा । मीचि विश्व ऐसा जयाचा । बोधु जाहला ९५ मग तयाचिये दिठी । अधमोत्तम असे किरीटी । काय परिसाचिये कसवटी । वानिया कीजे ९६ ते जैसी निर्वाण वर्णुचि करीं । तैसी जयाचि बुद्धी चराचरीं । होय साम्याचि उजरी । निरंतर ९७ जे ते विश्वाळंकाराचें विसुरे । जरी आहाती आनानें आकारें । तरी घडले एकचि भांगारें । परब्रह्में ९८ ऐसें जाणणें जें बरवें । तें फावलें तया आघवें । ह्मणोनि आहाचवाहाचे न झकवे । येणें आकारचित्रें ९९ घापे पटामाजि दृष्टी । दिसे तंतूंची सैंघ सृष्टी । परी तो एकवांचूनि गोठी । दुजी नाहीं १०० ऐसेनि प्रतीती हें गवसे । ऐसा अनुभव जयातें असे । तोचि समबुद्धी हें अनारिसें । नव्हे जाणें १ जयाचें नांव तीर्थरावो । दर्शनें प्रशस्तीसि ठावो । जयाचेनि संगें ब्रह्मभावो । भ्रांतासही २ जयाचेनि बोले धर्मु जिये । दिठी महासिद्धीतें विये । देखें स्वर्गसुखादि इयें । खेळु जयाचा ३ विपायें जरी आठवला चित्ता । तरी दे आपुली योग्यता । हें असो तयातें प्रशंसिता । लाभु आथि ४

योगी युंजीत सततमात्मानं रहसि स्थितः । एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥१०॥

पुढती अस्तवेना ऐसें । जया पाहले अद्वैतदिवसें । मग आपणपांचि आपणु असे । अखंडीत ५ ऐसिया दृष्टी जो विवेकी । पार्था तो एकाकी । सहजें अपरिग्रही जे तिहीं लोकीं । तोचि ह्मणऊनि ६ ऐसियें असाधारणें । निष्पन्नाचीं लक्षणें । आपुलेनि बहुवसपणें । श्रीकृष्ण बोले ७ जो ज्ञानियांचा बापु देखणेयांचे दिठीचा दीपु । जया दादुलयाचा संकल्पु । विश्व रची ८ प्रणवाचिये पेठे । जाहलें शब्दब्रह्म माजिठें । तें जयाचिये यशा धाकुटें । वेढूं न पुरे ९ जयाचेनि आंगिकें तेजें । आवो रविशशीचिये वणिजे । ह्मणऊनि जग हें वशेजे- । वीण असे तया ११० हां गा नामचि एक जयाचें । पाहतां गगनही दिसे टांचें । गुण एकैक काय तयाचे । आकळशील तूं ११ ह्मणोनि असो हें वानणें । सांगों नेणों कवणाचीं लक्षणें । दावावीं मिषें येणें । कां बोलिलों ते १२ ऐकें द्वैताचा ठावोचि फेडी । ते ब्रह्मविद्या किजेल उघडी । तरि अर्जुना पढिये हे गोडी । नासेल हन १३ ह्मणोनि तें तैसें बोलणें । नव्हे सपातळ आड लावणें । केलें मनचि वेगळवाणें । भोगावया १४ जया सोहंभाव अटकु । मोक्षसुखालागोनि रंकु । तयाचिये दिठीचा झणें कळंकु । लागेल तुझिया प्रेमा

येणार? ९४ मीच जग आहे, असा ज्याच्या मनांत बोध झाला आहे, त्याला बंधु कोण आणि द्वेषी कशाचा? ९५ मग, अर्जुना, त्याच्या दृष्टीला लहान आणि थोर असा कोठून भास होणार? असें पहा कीं, परिसाच्या कसोटीस लागल्यावर निरनिराळे कस लागतील काय? ९६ ती कसोटी सर्व धातूंना उत्तम सोनेंच करिते, तशी त्याची बुद्धि नेहमीं चराचरांचे ठिकाणीं केवळ एकत्वच जाणते. ९७ कां म्हणशील तर—विश्वरूप अलंकारांचे ठसे जरी पुष्कळ आकारांचे आहेत, तरी ते एकाच परब्रह्मरूपी सुवर्णाचे घडलेले आहेत; ९८ असें शुद्ध व खरें तत्त्व ज्याला पूर्णपणें समजलें आहे, तो चित्रविचित्र रचनेनें वरचेवर फसला जात नाहीं. ९९ वस्त्राकडे पाहिलें असतां जसें तें सर्व तंतुमय दिसतें, तसें त्याला ब्रह्मावांचून जगतांत दुसरें कांहीं दिसत नाहीं. १०० अशा रीतीनें सर्व जग भरलेलें आहे असा ज्याला अनुभव येतो, तोच समबुद्धि होय, हें खोटें नाहीं असें पक्कें समज. १ ज्याचें नांव तीर्थराज होय, ज्याचें दर्शन घेतलें असतां अंतःकरणाला समाधान होतें, आणि ज्याच्या संगतीनें अहंकारानें भ्रमित झालेल्या पुरुषांची भ्रांति जाऊन तो ब्रह्मस्वरूप होतो, २ ज्याचें बोलणें हें धर्माचें जीवन, आणि दृष्टि ही महासिद्धि उत्पन्न करणारी होय, व स्वर्गादि सुखें हे ज्याचें खेळ आहेत, ३ अशा मनुष्याची जरी चित्तांत आठवण झाली, तरी तो आपली योग्यता देतो. फार काय सांगावें, त्याची स्तुति केली असतां महान् लाभच आहे. ४

अन्वय—योगी रहसि स्थितः एकाकी, यतचित्तात्मा, निराशीः, अपरिग्रहः (च सन्) सततं आत्मानं युंजीत. १०

अर्थ—योग्यानें एकटेंच एकांतांत वास करून, आणि मन व देह स्वाधीन ठेवून, कशाचीही आशा व संग्रह न करितां सतत आत्मध्यान करावें. ॥ १० ॥

जो कधींही मावळत नाहीं असा ज्ञानसूर्य ज्याचे हृदयांत उदय पावला आहे, तो आपण आपल्या ठिकाणींच सदोदीत ब्रह्मानंदांत असतो. ५ पार्था, अशा दृष्टीनें जो विचार करितो, तोच अद्वितीय व तोच तिन्ही लोकीं संग्रह न करणारा असें जाण. ६ अशा प्रकारें आपल्या स्वतांच्याहीपेक्षां विशेष गौरवानें श्रीकृष्णांनीं साधूंचीं मुख्य लक्षणें सांगितलीं. ७ जो सर्व ज्ञानी लोकांत श्रेष्ठ, व सर्व पाहाणाऱ्यांच्या दृष्टीचा प्रकाशक, आणि ज्या समर्थाच्या केवळ संकल्पानें विश्वाची रचना होते; ८ ॐकाराच्या बाजारांत जें शब्दब्रह्मरूप उत्तम वस्त्र निघालें, तें ज्याच्या यशास आच्छादन करण्यास पुरत नाहीं; म्हणजे श्रीकृष्णाचें तर नाहींच परंतु त्याच्या यशाचेंही वेद वर्णन करूं शकत नाहींत; ९ ज्याच्या अंगाच्या तेजानें सूर्य आणि चंद्र यांच्या व्यापारांस प्रतिष्ठा येते, तेव्हां हें जग त्याच्या आधाराशिवाय आहे काय? ११० पहा कीं, ज्याच्या नुसत्या नांवापुढें गगन तुच्छ दिसतें, असे याचे किती गुण तूं जाणशील? ११ म्हणून ही प्रशंसा आतां पुरे; कारण, अशा लक्षणांनीं युक्त जो श्रीकृष्ण भगवान् तो ज्या साधूंचें वर्णन करितो, त्यांचीं लक्षणें आम्ही सांगूं शकत नाहीं; परंतु कांहीं सांगावीं म्हणून सांगितलीं. १२ जीं ब्रह्मविद्या द्वैताचा नाश करते, ती जर स्पष्ट केली, तर आपला प्रियकर असा जो अर्जुन, त्याची प्रीति नाहींशी होईल, १३ म्हणून ब्रह्मज्ञानाविषयीं स्पष्ट न बोलतां पडद्यानें बोलून अर्जुनाचें मन त्याच्या व आपल्या प्रेमाचा उपभोग घेण्याकरितां वेगळे ठेविलें. १४ जे अहंब्रह्म ह्या स्फुरणांतच अडकून मोक्षसुखाच्या प्राप्तीकरितां दीन झाले आहेत, त्यांच्या दृष्टीचा कलंक कदाचित् तुझ्या ठिकाणीं असलेल्या प्रेमाला

१५ विषायें अहंभाव ययाचा जाईल । मी तेंचि हा जरी होईल । तरि मग काय कीजेल । एकलेया १६ दिठीचि पाहतां निविजे । कां तोंड भरोनि बोलिजे । नातरी दाट्टनि खेंव दीजे । ऐसें कोण आहे १७ आपुलिया मना बरवी । असमाई गोठी जीवीं । ते कवणेंसि चावळावी । जरी ऐक्य जाहलें १८ इया काकुळती जनार्दनें । अन्योपदेशाचेनि हाता शनें । बोलामाजि मन मनें । आलिंगु सरलें १९ हें परिसतां जरी कानडें । तरी जाण पां पार्थ उघडें । कृष्णसुखाचेनि रूपडें । वोतलें गा १२० हें असो वयसेचिये शेवटीं । जैसें एकचि विये वांझोटी । मग ते मोहाची त्रिपुटी । नाचों लागे २१ तैसें जाहलें श्रीअनंता । ऐसें तरि मी न म्हणता । जरी तयाचा न देखता । अतिशयो एथ २२ पाहा पां नवल कैसें चोज । कें उपदेशु केउतें झुंज । परि पुढें वालभाचें भोज । नाचत असे २३ आवडी आणि लाजवी । व्यसन आणि शिणवी । पिसें आणि न भुलवी । तरी तें काई २४ ह्मणऊनि भावार्थु तो ऐसा । अर्जुन मैत्रियेचा कुवासा । कीं सुखें शृंगारलिया मानसा । दर्पणु तो २५ यापरी बाप पुण्यपवित्र । जगीं भक्तिबीजासि सुक्षेत्र । तो श्रीकृष्णकृपे पात्र । याचिलागीं २६ हो कां आत्मनिवेदनातळींची । जे पीठिका होय सख्याची । पार्थु अधिष्ठात्री तेथिंची । मातृका गा २७ पासींचि गोसावी न वर्णिजे । मग पाइकाचा गुण घेइजे । ऐसा अर्जुन तो सहजें । पढिये हरी २८ पाहा पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे । ते पतीहूनि काय न वानिजे । पतिव्रता २९ तैसा अर्जुनचि विशेषें स्तवावा । ऐसें आवडलें मज जीवा । जे तो त्रिभुवनींचिया दैवां । एकायतनु जाहला १३० जयाचिया आवडीचेनि पांगें । अमूर्तुही मूर्ति आवगे । पूर्णाहि परी लागे । अवस्था जयाची ३१ तंव श्रोते म्हणती दैव । कैसी बोलाची हवाव । काय नादातें हन बरव । जिणोनि आली ३२ हांहो नवल नोहे देशी । मऱ्हाटी बोलिजे तरी ऐशी । वाणें उमटताहे आकाशीं । साहित्य रंगाचें ३३ कैसें उन्मेखचांदिणें तार । आणि भावार्थु पडे गार । हेचि श्लोकार्थ कुमुदिनी फार । साविया होती ३४ चाडाचि निचाडां करी । ऐसी मनोरथीं ये थोरी । तेणें विवळले अंतरीं । तेथ डोलु आला ३५ तें निवृत्तिदासें ज्ञाणितलें । मग अवधान द्या ह्मणितलें । नवल पांडवकुळीं पाहलें । कृष्णदिवसें ३६ देवकीया उदरीं वाहिला । यशोदा सायासें पाळिला । शेखीं उपेगा

लागेल. १५ कदाचित् अर्जुनाचा मीपणा जाऊन 'मी तोच हा' असें जर होईल, तर मग मी एक-ट्यानें काय करावयाचें आहे? १६ पाहिल्याबरोबर डोळे शांत होण्यास, व तोंड भरून बोलण्यास, किंवा आनंदानें दृढ आलिंगन देण्याला दुसरें कोण आहे? १७ जर अर्जुनाचें आणि माझें ऐक्य झालें, तर आपल्या मनांत न मावणारी अशी उत्तम गोष्ट ती कोणाजवळ बोलावी? १८ अशा आडचणीमुळें श्रीकृष्णानीं बोलण्यांत साधूंचीं लक्षणें सांगून उपदेश केला व त्याचें मन वळवलें. १९ हें ऐकणाराला जरी अशक्य वाटेल, तरी पार्थ हा खरोखर श्रीकृष्णाच्या सुखाचीच ओतीव मूर्ति आहे असें पक्कें समजा. १२० हें असो; एकाद्या वांज स्त्रीला, तिचें वय होऊन गेल्यानंतर, एकच मूल झालें म्हणजे ती जशी त्याच्यावरील प्रेमाची प्रत्यक्ष पुतळी होऊन नाचूं लागते, २१ तशी श्रीकृष्णांची गोष्ट झाली आहे! त्यांचें अर्जुनावरील अतिशय प्रेम जर दृष्टोत्पत्तीस न येतें, तर मी असें बोललों नसतों. २२ पहा पहा, हें काय नवल व कोण आवड! कीं कसला युद्ध प्रसंग, आणि ह्यांत हा काय ब्रह्मज्ञानाचा उपदेश! परंतु अशा ठिकाणीं भगवंताच्या प्रीतीचें चित्र जो अर्जुन, त्याच्यापुढें प्रेमाचें कौतुक नाचत आहे! २३ आवडी असून लाज वाटत असेल, व्यसन असून शीण वाटत असेल, वेड लागून जर बुद्धि भ्रष्ट होत नसेल तर तीं आहेत असें म्हणण्यांत अर्थ काय? २४ या गोष्टीचें सार इतकेंच कीं, अर्जुन हा श्रीकृष्णांच्या मैत्रीचें घर होय, किंवा सुखानें शृंगारलेलें श्रीकृष्णाचें मन पाहण्याचा आरसाच होय. २५ अशा प्रकारें अर्जुन हा धन्य, पुण्यपवित्र आणि भक्तिरूप बीज पेरण्याचें उत्तम शेत असल्यामुळेंच श्रीकृष्णकृपेस पात्र झाला! २६ श्रवणापासून आत्मनिवेदनापर्यंत जी नऊ प्रकारची भक्ति आहे त्यांपैकीं आत्मनिवेदनाच्या अलीकडची जी सख्य नांवची आठवी भक्ति, त्या ठिकाणची अर्जुन ही मुख्य देवता आहे. २७ मालक (भगवान्) श्रेष्ठ शेजारीं असतां त्याचें वर्णन न करितां सेवकाच्या गुणांचें वर्णन केलें असतां मालकाला आवडावें अशा योग्यतेचा अर्जुन हा भगवंताचा आवडता आहे. २८ जी पतिव्रता आपल्या पतीची प्रीतीनें सेवा करिते आणि पतीस मान्य होते, त्या पतिव्रतेची पतीपेक्षां वाखाणणी करीत नाहींत काय? २९ त्याचप्रमाणें, अर्जुनाचीच विशेष स्तुति करावी असें माझ्या मनास वाटलें. कारण, तो त्रिभुवनाच्या सर्व भाग्याला एकटाच पात्र झाला आहे! १३० ज्याच्या आवडीच्या वेडानें निराकार अशा ब्रह्माला देखील अवतार घेणें भाग पडलें; आणि त्याच्या सर्व इच्छा पूर्ण असूनही अर्जुनाच्या सख्याची त्याला उत्कंठा उत्पन्न झाली! ३१ तेव्हां श्रोते म्हणाले:—दैवाची गति काय विचित्र आहे! आणि तशीच वर्णन करण्याची शैली तरी काय आहे कीं, जिच्या सुंदरपणानें नादब्रह्मालाही जिंकलें आहे! ३२ शुद्ध मराठी भाषेंत जर अशा रीतीचें वर्णन करितां येतें कीं, ज्याच्यापासून हृदयावर शृंगारादि नवरसांचे निरानिराळे ठसे उमटतात, तर हें अतिशय नवल नव्हे काय? ३३ ज्ञानेश्वरांचें हें बोलणें कसें आहे म्हणाल तर-ज्ञानरूप चंद्राच्या चांदण्याप्रमाणें स्वच्छ असून, त्याच्या भावार्थापासून मनाला आनंद होतो; म्हणून गीतेच्या श्लोकांचा अर्थ चंद्रविकासी कमलाप्रमाणें सहज उमलला आहे! ३४ त्या बोलण्याची अशी योग्यता आहे कीं, ब्रह्मविद्या ऐकणाराची इच्छा याच्या श्रवणापासून तृप्त होते; अशा या बोलापासून श्रोते अंतर्यामीं प्रसन्न होऊन डोलूं लागले. ३५ असा श्रोत्यांच्या मनांतील भाव निवृत्तिदास ज्ञानदेव यांनीं जाणून, मग, 'श्रोतेहो, इकडे लक्ष द्या' असें ते म्हणाले. कृष्णरूप दिवसानें पांडवकुलावर प्रकाश केला. (श्रीकृष्णांनीं पांडवांवर कृपा केली.) ३६ [तो कृष्ण कसा आहे म्हणाल, तर] ज्याला देवकीनें आपल्या उदरांत नऊ महिने वागविलें, यशोदेनें अति कष्टानें ज्याचें लालनपा-

गेला पांडवांसी ३७ ह्मणऊनि बहुदिवस वोळगावा । कां अवसरु पाहोनि विनवावा । हाही सोसु तया सदैवा । पडेचिना ३८ हें असो कथा सांगें वेगीं । मग अर्जुन म्हणे सलगी । देवा इयें संतचिन्हें आंगीं । न ठकती माझ्या ३९ एन्हवीं या लक्षणांचिया निजसारा । मी अपाडें कीर अपुरा । परि तुमचेनि बोलें अवधारा । थोरावें जरी १४० जी तुम्ही चित्त देयाल । तरी ब्रह्म मियां होइजेल । काय जहालें अभ्यासिजेल । सांगाल जें ४१ हांहो नेणों कवणाची काहाणी । आइकोनि श्लाघिजत असों अंतःकरणीं । ऐसी जाहलेपणाची शिरयाणी । कायसी देवा ४२ हें आंगें म्यां होइजो कां । येतुलें गोसावी आपुलेपणें कीजो कां । तंव हांसोनि श्रीकृष्ण होकां । करूं म्हणती ४३ देखा संतोषु एक न जोडे । तंवचि सुखाचें सैंघ सांकडें । मग जोडालिया कवणेकडे । अपुरें असे ४४ तैसा सर्वेश्वरु बळिया सेवकें । ह्मणोणि ब्रह्मही होय तो कौतुकें । परि कैसा भारें आतला पिकें । दैवाचेनि ४५ जो जन्मसहस्रांचियासाठीं । इंद्रादिकांही महागु भेटी । तो आधीनु केतुला किरीटी । जे बोलुही न साहे ४६ मग ऐका जें पांडवें । ह्मणितलें म्यां ब्रह्म होआवें । तें अशेषही देवें । अवधारिलें ४७ तेथ ऐसेंचि एक विचारिलें । जे या ब्रह्मत्वाचे डोहळे जाहले । परि उदरा वैराग्य आहे आलें । बुद्धीचिया ४८ एन्हवीं दिवस तरी अपुरे । परी वैराग्यवसंताचेनि भरें । जे सोहंभाव महुरें । मोडोनि आला ४९ ह्मणोनि प्राप्तिफळीं फळतां । यया्सि वेळु न लगेल आतां । होय विरक्तु ऐसा अनंता । भरंवसा जाहला १५० म्हणे जें जें हा अधिष्ठील । तें आरंभींच यया फळेल । ह्मणोनि सांगितला न वचेल । अभ्यासु वायां ५१ ऐसें विवरोनियां श्रीहरी । ह्मणितलें तिये अवसरीं । अर्जुना हा अवधारीं । पंथराजु ५२ तेथ प्रवृत्तितरूच्या बुडीं । दिसती निवृत्तिफळाचिया कोडीं । जिये मार्गींचा कापडी । महेशु आझुनी ५३ पैल योगिवृंदें वहिलीं । आडवीं आकाशीं निघालीं । कीं तेथ अनुभवाच्या पाउलीं । धोरणु पडिला ५४ तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें । धांव घेतली एकसरें । कीं येर सकळ मार्ग निदसुरे । सांडूनियां ५५ पाठीं महर्षी येणें आले । साधकांचे सिद्ध जाहाले । आत्मविद थोरावले । येणेंचि पंथें ५६ हा मार्गु जैं देखिजे । तैं ताहान भूक विसरिजे । रात्रिदिवसु नेणिजे । वाटे इये ५७ चालतां पाउल जेथ पडे । तेंथ अपवर्गाची खाणी उ-

ला
न केलें, तो शेवटीं पांडवांच्या उपयोगीं पडला ! ३७ म्हणून, पुष्कळ दिवस त्याची सेवा करावी, किंवा समय पाहून त्याची विनवणी करावी, इतका देखील प्रयास त्या दैववान् अर्जुनाला पडला नाहीं! ३८ श्रोते म्हणतात, "हें असो. आतां पुढें कथाभाग लवकर सांगा." तेव्हां ज्ञानेश्वर म्हणतात:— अर्जुन लडिवाळपणानें म्हणतो कीं, " देवा, तुम्हीं हीं जी संतांचीं चिन्हें सांगितलीं, तीं माझ्या अंगीं वसत नाहींत, ३९ एव्हवीं या लक्षणांचें तात्पर्य जाणण्यास मी खरोखर अयोग्य आणि अपुरा असा आहें; परंतु तुमच्या सांगण्यानें जर मला योग्यता आली तर येईल. १४० जर तुम्हीं मनांत आणलें, तर मी ब्रह्म सुद्धां होईन ! तुम्ही ज्याचा मला अभ्यास करावयास सांगाल, तो करण्याला मला काय अशक्य आहे ? ४१ ही तुम्ही कोणाची गोष्ट सांगितली हें मला कांहीं कळत नाहीं; परंतु ती ऐकल्यापासून तिची स्तुति करावी असें अंतःकरणांत वाटतें; तर ही योग्यता ज्याच्या अंगांत असेल,त्याच्या आनंदास पारावारच नाहीं ! ४२ प्रभो, याचप्रमाणें माझे अंगीं योग्यता येईल एवढें आपण कराल काय ? " तेव्हां श्रीकृष्ण हंसून म्हणाले कीं, " हो, तुला आम्ही ब्रह्मरूपी करूं. " ४३ असें पहा कीं, जर एक संतोष प्राप्त न झाला तर चोंहींकडे सुखाची उणीव असते परंतु तो प्राप्त झाल्यावर मग कोठें सुखाची उणीव येईल ? ४४ त्याचप्रमाणें; जो सर्वेश्वराचा पूर्ण सेवक बनला आहे, तो सहज ब्रह्मरूपी होऊं शकेल; पण अर्जुन सुदैवाच्या पिकाच्या भारानें किती लवला आहे पहा: ४५जो ईश्वर हजारों जन्मांनीं इंद्राला सुद्धां भेटण्यास दुर्मिळ आहे, तो अर्जुनाच्या इतका अधीन झाला आहे कीं, त्याचें बोलणें खालीं पडूं देत नाहीं.४६ तेव्हां ऐका कीं, अर्जुनानें मी ब्रह्म व्हावें असें जें म्हटलें तें देवांनीं सर्व ऐकिलें. ४७ त्या वेळेस देवांच्या मनांत असा विचार उत्पन्न झाला कीं, अर्जुनाला ब्रह्म होण्याविषयींचे डोहाळे लागले आहेत, यावरून त्याच्या बुद्धीच्या उदरांत वैराग्याचा गर्भ राहिला आहे. ४८ अथवा, अर्जुन हा नूतन झाड असूनही वैराग्यरूप वसंताच्या भरानें अहंब्रह्मरूप मोहरानें वांकला आहे; ४९ म्हणून याला मोक्षरूप फलाची प्राप्ति अगदीं लवकर होईल; कारण हा विरक्त झाला आहे;अशी श्रीकृष्णाचीही खातरी झाली. १५० श्रीकृष्ण म्हणतात:—आतां हा अर्जुन जें अनुष्ठान करील, त्याचें त्याला लागलीच फळ मिळेल; म्हणून, त्याला जर हा अभ्यास करावयास सांगितला तर तो वाया जाणार नाहीं. ५१ अशा प्रकारें त्या वेळीं श्रीहरींनीं मनांत विचार करून म्हटलें:—अर्जुना, आम्ही जो तुला योगमार्ग सांगणार आहों, तो सर्व मार्गांचा राजा आहे; तो तूं ऐक. ५२ तो योग असा आहे कीं, ज्याच्या प्रवृत्तिरूपी वृक्षाखालीं कोव्यवधि मोक्षफलें दृष्टीस पडतात; (ज्याचें आचरण करूं लागलें असतां मोक्षप्राप्ति होते;) त्या या मार्गाची श्रीशंकर हे अद्यापपावेतों यात्रा करीत आहेत ! ५३ दुसरे योगिजनही, प्रथम हृदयाकाशांत आडव्यातिडव्या मार्गानें चालू लागले, नंतर अनुभवानें त्यास मार्गाचें धोरण सांपडलें. ५४ आणि मग त्यांनीं इतर अज्ञानरूप सर्व मार्ग सोडून त्या योग्यांनीं आत्मबोधाच्या सरळ मार्गानें एकदम धांव घेतली ! ५५ पूर्वीचे महर्षि याच मार्गानें आले, आणि ते साधकांचे सिद्ध बनले,त्याचप्रमाणें, तत्त्वज्ञानी हे याच पंथानें श्रेष्ठत्वास पावले. ५६ या मार्गानें जाण्याचा विचार करीत असतां तहान व भूक हीं हारपतात, व याची वाट चालत असतांना रात्र व दिवस यांची आठवण होत नाहीं. ५७ या मार्गाचें क्रमण करीत असतां, ज्या ठिकाणीं मनुष्य पाऊल टाकील त्या ठिकाणीं मोक्षाची खाणच उत्पन्न होते; व कदाचित् तो आ-

घडे । आव्हांटलिया तरी जोडे । स्वर्गसुख ५८ निगिजे पूर्वींलिया मोहरा। कीं येइजे पश्चिमेचिया घरा । निश्चळपणें धनुर्धरा । चालणें एथिंचें ५९ येणें मार्गें जया ठाया जाइजे । तो गांवो आपणचि होइजे । हें सांगों काय सहजें। जाणसी तूं १६० तेथ पार्थें ह्मणितलें देवा । तरि तेंचि मग केव्हां । कां आर्तिसमुद्रौनि न काढावा । बुडतु जी मी ६१ तंव कृष्ण म्हणती ऐसें । हें उत्सुखळ बोलणें कायसें । आह्मी सांगतसों आपैसे । वरि पुशिलें तुवां ६२

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरंमासनमात्मनः । नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥११॥

तरी विशेषें आतां बोलिजेल । परि तें अनुभवें उपेगा जाईल । म्हणोनि तैसें एक लागेल । स्थान पाहावें ६३ जेथ आराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे । वैराग्यासी दुणीव चढे । देखिलिया जें ६४ जो संतीं वसविला ठावो । संतोषासि सावावो । मना होय उत्सावो । धैर्याचा ६५ अभ्यासुचि आपणयातें करी । हृदयातें अनुभव वरी । ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ६६ जया आड जातां पार्था । तपश्चर्या मनोरथा । पाखांडियाही आस्था । समूळ होय ६७ स्वभावें वाटे येतां । जरी वरपडा जाहला अवचितां । तरि सकामुही परि माघौता । निघों विसरे ६८ ऐसेनि न राहतयातें राहवी । भ्रमतयातें बैसवी । थापट्टनि चेवी । विरक्तीतें ६९ हें राज्य वर सांडिजे । मग निवांता एथेंचि असिजे । ऐसें शृंगारियांहि उपजे । देखत खेंवो १७० जें येणेंमानें बरवंट । आणि तैसोंचि अति चोखट । जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ७१ आणिकही एक पहावें । जें साधकीं वसतें होआवें । आणि जनाचेनि पायरवें । रुळेचिना ७२ जेथ अमृताचेनि पाडें । मुळाहीसकट गोडें । जोडती दाटें झाडें । सदा फळती ७३ पाउला पाउला उदकें । वर्षाकाळेंही अति चोखें । निर्झरें का विशेखें । सुलभें जेथ ७४ हा आतपुही अळुमाळु । जाणिजे तरी शीतळु । पवनु अति निश्चळु । मंद झुळके ७५ बहुतकरूनि निःशब्द । दाट न रिघे श्वापद । शुक हन षट्पद । तेउतें नाहीं ७६ षाणिलगें हंसें । दोनी चारी सारसें । कवणें एके वेळे बैसे । तरी कोकिळही होकां ७७ निरंतर नाहीं । तरि आलीं गेलीं कांहीं । होतु कां मयूरेंही । आम्ही ना न ह्मणों ७८ परि अवश्यक पांडवा । ऐसा ठाव जोडावा । तेथ निगूढ मठ होआवा । का शिवालय ७९ दोहीं माजि आवडे तें । जें मानलें होय

डमार्गानें गेला तरी स्वर्गसुख मिळतें. ५८ तो पूर्वेच्या वाटेनें निवून म्हणजे प्रवृत्तीची वाट सोडून (इंद्रियांचें आकलन करून) पश्चिमेस येतो, (निवृत्तीच्या वाटेला लागतो.) हे धनुर्धरा, या ठिकाणचें चालणें कोणतें म्हणशील तर निश्चळपणें वसणें हें होय. ५९ या मार्गानें ज्या ठिकाणाला जातो, त्या ठिकाणीं तो गांवच आपण बनतो, हें काय सांगावें ! हें तुला माहितच आहे. १६० तेव्हां पार्थ म्हणाला, " देवा तर तुम्ही हें योगशास्त्र मला केव्हां सांगाल ? कारण, उत्कंठारूप समुद्रांत बुडालेला जो मी, त्या मला वर कां न काढावा ? " ६१ तेव्हां कृष्ण म्हणालेः—आम्ही होऊन तुला सांगत असतांना मग प्रश्न करण्याचा इतका उतावीळपणा कां करतोस ? ६२

अन्वय–शुचौ देशे न अत्युच्छ्रितं, न अतिनीचं, चैलाजिनकुशोत्तरं आत्मनः स्थिरं आसनं प्रतिष्ठाप्य. ॥११॥

अर्थ–योग्यानें शुद्ध प्रदेशीं, प्रथम दर्भ, त्यावर मृगाजिन, आणि त्यावर वस्त्र असें स्थिर आसन घालावें; तें फार उंच असूं नये, किंवा फार सखलही असूं नये. ११

तर आतां आम्ही तुला स्पष्टपणें सांगतों; पण त्याचा अभ्यास केल्यावर उपयोग घडेल, म्हणून तशा रीतीच्या योगाभ्यासाकरितां एक जागा शोधून काढावी. ६३ ती जागा अशी असावी कीं, ज्या ठिकाणीं करमणुकीची हौस पुरी होत असल्यामुळें, बसल्यावर उठूं नये असें वाटावें; आणि जी पाहतांक्षणींच वैराग्य दुप्पट वाढावें. ६४ ती जागा पूर्वी सत्पुरुषांनीं वसविलेली असावी, व तिच्यापासून मनाच्या संतोषाला साहाय्य व्हावें, व धैर्याचा उत्कर्ष व्हावा. ६५ त्या जागेंत अभ्यास करण्यास उत्तेजन यावें आणि मनाला अनुभवानें माळ घालावी, अशी त्या जागेची रम्यपणाबद्दल नेहमीं योग्यता असावी. ६६ पार्था, त्या जागेच्या जवळून गेलें असतां पाखांड्याचेही मनांत तपश्चर्या करण्याबद्दल आस्था उत्पन्न व्हावी. ६७ एकादा मनुष्य सहज वाट चालत असतां जर अवचित त्या ठिकाणीं येईल, तर, जरी तो कामेच्छु असून आपल्या घरीं जात असला, तरी तें ठिकाण सोडून जाऊं नये असें त्याला वाटावें. ६८ अशा रीतीनें ज्याला त्या ठिकाणीं राहण्याची इच्छा नाहीं त्यालाही ती जागा राहवून घेते, आणि फिरणारास वसवून घेते, व वैराग्यास हालवून जागे करिते.६९ एकादा राजा, किंवा विलासी पुरुष जरी असला, तरी त्यालाही ती जागा पाहतांक्षणींच असें वाटावें कीं, आपलें राज्य सोडून या ठिकाणीं एकांतवासांत राहावें. १७० अशा प्रकारानें जें स्थान उत्तम,आणि त्याचप्रमाणें अति शुद्ध, त्या ठिकाणीं ब्रह्मानंद प्रत्यक्ष अनुभवास येतो. ७१ आणखी एक गोष्ट साधकानें पहावीः ती ही कीं, त्या ठिकाणीं साधकांची वस्ती असून इतर मनुष्यांची वर्दळ लागणार नाहीं. ७२ त्या ठिकाणीं अमृतासारखीं मुळांसुद्धां गोड व नेहमीं फळांनीं युक्त अशीं दाट झाडें असावीं; ७३ तेथें पावलापावलावर पाण्याचे झरे असावे; ते असे कीं, ज्यांचें पाणी पावसाळ्यांतही निर्मळ असतें; व तें पुष्कळ असून, उतरण्यास किंवा पाणी काढण्यास सोपें असावें.७४ त्या ठिकाणीं सूर्याचें ऊन सौम्य असावें,आणि कदाचित् ऊन स्वच्छ पडलें तर त्यापासून ताप उत्पन्न होऊं नये. तसाच वारा मंद व शीतल वाहत असावा. ७५ तेथें बहुतकरून गडबड नसावी, व श्वापदांची गर्दी नसावी; परंतु राघू आणि भ्रमर हे जुजबी असावेत. ७६ त्या ठिकाणी बदकें, हंस, दोन चार चक्रवाक पक्षी, तसेंच एकादे वेळेस कोकिळ पक्षी येऊन बसला तरी चालेल. ७७ नेहमीं नव्हत,पण येऊन जाऊन मोर असले तरी आम्ही त्यांना नको म्हणणार नाहीं. ७८ परंतु, हे पांडवा अवश्यमेव अशा तऱ्हेची एक जागा पहावी, आणि त्या ठिकाणीं गुप्त गुहा किंवा शिवालय असावें; ७९ आणि दोहोंतून जें आपणास आवडेल किंवा आ-

चित्तें । बहुतकरूनि एकांतें । बैसिजे गा १८० ह्मणोनि तैसें तें जाणावें । मनराहतें पाहावें । राहेल तेथ रचावें । आसन ऐसें ८१ वरी चोखट मृगसेवडी । माजी धूतवस्त्राची घडी । तळवटीं अमोडी । कुशांकूर ८२ सकोमळ सरिसे । सुबद्ध राहती आपैसे । एकपाडें तैसें । वोजा घालीं ८३ परि सावियाचि उंच होईल । तरि आंग हन डोलेल । नीच तरी पावेल । भूमिदोषु ८४ ह्मणोनि तैसें न करावें । समभावें धरावें । हें बहु असो होआवें । आसन ऐसें ८५

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः । उपविश्यासने युंज्याद्योगमात्मविशुद्धये ॥१२॥

मग तेथ आपण । एकाग्र अंतःकरण । करूनि सद्गुरुस्मरण । अनुभविजे ८६ जेथ स्मरतेनि आदरें । सबाह्य सात्त्विकें भरे । जंव काठिण्य विरे । अहंभावाचें ८७ विषयांचा विसरु पडे । इंद्रियांची कसमस मोडे । मनाची घडीघडे । हृदयामाजीं ८८ ऐसें ऐक्य हें सहजें । फावे तंव राहिजे । मग तेणेंचि बोधें बैसिजे । आसनावरी ८९ आतां आंगातें आंग वरी । पवनातें पवनु धरी । ऐसी अनुभवाची उजरी । होंचि लागे १९० प्रवृत्ति माघौति मोहरे । समाधि ऐलाडी उतरे । आघवें अभ्यासूं सरे । बैसतखेंवो ९१ मुद्रेची प्रौढी ऐशी । तेचि सांगिजेल आतां परियेसीं । तरी ऊरु या जघनासी । जडोनि घालीं ९२ चरणतळें देव्हडीं । आधारद्रुमाच्या बुडीं । सुघटितें गाढीं । संचरीं पां ९३ सव्य तो तळीं ठेविजे । तेणें सिवणीमध्यें पीडिजे । वरी बैसे तो सहजें । वाम चरणु ९४ गुद मेंढ्राआंतौतीं । चारी अंगुळें निगुतीं । तेथ सार्ध सार्ध प्रांतीं । सांडूनियां ९५ माजि अंगुळ एक निगे । तेथ टांचेचेनि उत्तरभागें । नेहेटिजे वरि आंगें । पेललेनी ९६ उचलिलें कां नेणिजे । तैसें पृष्ठांत उचलिजे । गुल्फद्वय धरिजे । तेणेंचि मानें ९७ मग शरीर संचु पार्था । अशेषही सर्वथा । पाष्णींचा माथा । स्वयंभु होय ९८ अर्जुना हें जाण । मूळबंधाचें लक्षण । वज्रासन गौण । नाम यासी ९९ ऐसी आधारीं मुद्रा पडे । आणि आधींचा मार्गु मोडे । तेथ अपानु आंतुलेकडे । वोहोटों लागे २००

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः । संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥१३॥

तंव करसंपुट आपैसें । वाम चरणीं बैसे । तंव बाहुमूळीं दिसे । थोरीव आली १ माजि उभारलेनि दंडें । शिरकमळ होय गाढें । नेत्रद्वारींचीं कवाडें । लागूं पाहती २ वरचिलें पातीं ढळती । तळींचीं तळीं पुंजाळती । तेथ अधों-

पल्या चित्तास पसंत पडेल, त्या ठिकाणीं बहुतक रून एकांतवासांत बसावें; १८० म्हणून अशी सर्व सोय पाहून त्या ठिकाणीं मन स्थिर होतें किंवा नाहीं हें पहावें, आणि स्थिर झाल्यास तेथें आसन घालावें; त्याचा प्रकार असा: ८१ वर धूतवस्त्राची घडी असून त्याच्याखालीं कृष्णाजिन व त्याच्याखालीं साग्र दर्भांचें आसन. ८२ ते दर्भ कोमल, सारखे आणि आपोआप एके ठिकाणीं राहतील अशा चांगल्या व्यवस्थेनें जोडलेले असावें. ८३ परंतु तें आसन कदाचित् उंच झालें तर अंग डोलेल,आणि अगदीं सखल झालें तर भूमीचा गारवा अगर वाळवी इत्यादिकांपासून इजा होईल,८४ म्हणून तसें न करितां तें समभाग घालावें. अशा रीतीनें आसनाची योजना करावी. ८५

अन्वय–तत्र आसने उपविश्य, मनः एकाग्रं कृत्वा, यतचित्तेन्द्रियक्रियः (सन्) आत्मविशुद्धये योगं युञ्ज्यात्. ॥१२॥

अर्थ–त्या आसनावर बसून, मन एकाग्र करून आणि चित्त व इंद्रियें यांना जिंकून आपल्या अंतःकरणाची शुद्धि करण्याकरितां योगाभ्यास करावा. ॥ १२ ॥

मग त्या ठिकाणीं मनाची एकाग्रता करून सद्गुरूचें स्मरण करून आत्मसुखाचा अनुभव घ्यावा. ८६ त्या ठिकाणीं, अहंभाव नाहींसा होऊन अष्टसात्त्विकभाव अंतर्बाह्य उत्पन्न होत तोंपर्यंत सद्गुरूचें आदरानें स्मरण करावें. ८७ जेथें विषयांची आठवण देखील राहणार नाहीं, इंद्रियांची विषयांवरील इच्छा नाहींशी होईल, आणि मनाची हांव मोडून हृदयांत घडी बनेल, ८८ अशा रीतीनें सहज ऐक्य होईपर्यंत त्या ठिकाणीं रहावें; आणि मग असा मनाला बोध झाल्यावर आसनावर बसावें. ८९ नंतर अंगानें अंग सावरावें व प्राणापानवायूनें प्राणापानाला आंवरावें; अशा रीतीनें अनुभव वाटूं लागतो. १९० त्या ठिकाणीं प्रवृत्ति मागें फिरून समाधि सहज साध्य होतो. मग आसनावर बसल्या बरोबर सर्व अभ्यास आपोआप पूर्ण होतात. ९१ मुद्रेची जी थोरवी आहे, तिचें आतां वर्णन करितों, तें ऐक. पोटऱ्या मांड्यांस लावून आसन घालावें. ९२ एका पायावर दुसरा पाय वांकडा ठेवून गुदस्थानाच्या बुडाशीं टांच स्थिर आणि बळकट लावावी. ९३ उजवा पाय खालीं ठेवून, त्यानें वृषणापासून गुदस्थानापर्यंत असणारी शिवणरेषा मध्यें दाबावी. नंतर डावा पाय उजव्या पायावर सहज ठेवावा. ९४ अपानद्वार आणि शिश्न यांमध्यें जी चार बोटें जागा आहे, ती मागेंपुढें दीडदीड बोट सोडून ९५ मध्यें जी एक बोट जागा राहते, ती, शरीर तोलून धरून टांचेच्या वरच्या भागानें दाबावी. ९६ शरीर उचललेलें आहे असें समजूं न देतां पाठीच्या कण्याचा शेवटला भाग उचलावा आणि त्याचप्रमाणें दोन्ही पायांचे घोटे सरळ धरावे. ९७ मग, पार्था, हें सर्व शरीर घोट्याच्या माध्यावर आधाराशिवाय स्वतःसिद्ध राहतें. ९८ अर्जुना, हें मूळबंध नामक आसनाचें लक्षण होय. यालाच वज्रासन असें एक गौण नांव आहे. ९९ अशा रीतीनें मूळबंधाचें आसन केलें, म्हणजे खालचा रस्ता बंद होतो; आणि मग अपानवायु आंतल्या आंत वर जाऊं लागतो. २००

अन्वय–स्थिरः (भूत्वा) कायशिरोग्रीवं अचलं समं धारयन् स्वं नासिकाग्रं संप्रेक्ष्य दिशः अनवलोकयन् च(योगं कुर्यात्)

अर्थ–साधकानें स्वतः स्थिर होऊन शरीर, डोकें व मान हीं नीट स्थिर धरावीं, व आपल्या नाकाच्या शेंड्याकडे दृष्टि ठेवून इकडे तिकडे न पाहतां योगाभ्यास करावा. ॥ १३ ॥

नंतर डाव्या पायावर सहज दोन्ही हात द्रोणाकार करून ठेवावे, म्हणजे अर्थात् बाहुटे उंच होतात. १ नंतर, शरीर स्थिर राहिल्यानें शिरकमल हें आंत गढतें, आणि त्यामुळें डोळ्यांच्या पापण्या मिटूं लागतात. २ वरची पापणी खालीं येते व खालची पापणी प्रफुल्लित झाल्यामुळें मोठी होते. असें झालें म्हणजे डोळ्यांची अर्धी उघडलेलीं व

न्मीलित स्थिती । उपजे तया ३ दिठी राहोनि आंतुलेकडे । बाहेर पाउल घाली कोडें । ते ठायीं ठावो पडे । नासाग्रपीठीं । ४ ऐसें आंतुच्या आंतुचि रचे । बाहेरी मागुतें न वचे । ह्मणोनि राहणें आधिये दिठीचें । तेथेंचि होय ५ आतां दिशांची भेटी घ्यावी । कां रूपाची वास पहावी । हे चाड सरे आघवी । आपैसया ६ मग कंठनाळ आटे । हनुवटी हडती दाटे । ते गाढी होऊनि नेहटे । वक्षस्थळीं ७ माजि घंटिका लोपे । वरी बंधु जो आरोपे । तो जाळंधरु ह्मणिपे । पंडुकुमरा ८ नाभी वरी पोखे । उदर हें थोके । अंतरीं फांके । हृदयकोशु ९ स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं । नाभिस्थानातळवटीं । बंधु पडे किरीटी । वोढियाणा तो २१० ऐसी शरीराबाहेरलीकडे । अभ्यासाची पाखर पडे ।

प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः । मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः १४

तंव आंतु त्राय मोडे । मनोधर्माची ११ कल्पना निमे । प्रवृत्ती शमे । आंग मन विरमे । सावियाचि १२ क्षुधा काय जाहाली । निद्रा केउती गेली । हे आठवणही हारपली । न दिसे वेगां १३ जो मूळबंधें कोंडला । अपानु माघौता मुरडला । तो सर्वांचि वरी सांकडला । धरी फुगूं १४ क्षोभलेपणें माजे । उवाइला ठायीं गाजे । मणिपूरेंसीं झुंजे । राहोनियां १५ मग थावलिये वाहटुळी । सैंघ घेऊनि घर डहुळी । बाळपणींची कुहीटुळी । बाहेर घाली १६ भीतरीं वळी न धरे । कोट्यामाजी संचरे । कफपित्ताचे थारे । उरों नेदी १७ धातूंचे समुद्र उलंडी । मेदाचे पर्वत फोडी । आंतील मज्जा काढी । अस्तिगत १८ नाडीतें सोडवी । गात्रांतें विघडवी । साधकातें भेडसावी । परि बिहावे ना १९ व्याधीतें दावी । सर्वांचि हरवी । आप पृथ्वी कालवी । एकवाट २२० तंव येरीकडे धनुर्धरा । आसनाचा उबारा । शक्ति करी उजगारा । कुंडलिनीतें २१ नागिणीचें पिलें । कुंकुमें नाहलें । वळण घेऊनि आलें । सेजे जैसें २२ तैसी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी । अधोमुख सर्पिणी । निदेली असे २३ विद्युल्लतेची विडी । वन्हिज्वाळांची घडी । पंधरेयाची चोखडी । घोंटीव जैशी २४ तैसी सुबंध आटली । पुटीं होती दाटली । ते वज्रासनें चिमुटली । सावधु होय २५ तेथ नक्षत्र जैसें उलंडलें । कीं सूर्याचें आसन मोडलें । तेजाचें बीज विरूढलें । अंकुरेंशीं २६ तैसी वेढियातें सोडिती । कवतिकें आंग मोडिती । कंदावरी शक्ती । उठिली दिसे २७ सहजें बहुतां दिवसांची भूक ।

अर्धी मिटलेली अशी दृष्टि होते. ३ अशा रीतीनें दृष्टि आंतल्या आंत राहून कौतुकानें फार बाहेर आलीच तर नाकाच्या शेंड्यापर्यंत येते. ४ अशी आंतल्या आंत दृष्टि कायम होऊन पुनः बाहेर येत नाहीं, म्हणून दृष्टीचें नाकाच्या शेंड्यावर राहणें कायम होतें. ५ यामुळें, इतर दिशांकडे पहावें किंवा स्वरूप दृष्टीस पडेल म्हणून वाट पहावी ही इच्छा आपोआप नाहींशी होते. ६ मग गळ्याची नळी आंत झांकली जाते, आणि हनुवटी गळ्याखालच्या खळगीला लागते व उरावर दृढ होऊन दाबून राहते. ७ हे पांडुकुमरा, नंतर कंठमणि दिसेनासा होतो. अशा रीतीनें जी मुद्रा बनते, तिला जालंधरबंध असें ह्मणतात. ८ बेंबी वर फुगते, पोट सपाट होतें, व हृदयकोश अंतर्यामीं पसरतो. ९ अर्जुना, गुदद्वारावरच्या भागावर आणि वेंबीच्या खालच्या भागामध्यें जी मुद्रा बनते, तिला वोढियाणाबंध असें ह्मणतात. २१० अशा रीतीनें शरिराच्या बाहेरील भागानें अभ्यासक्रम सुरू झाला,

अन्वय–प्रशांतात्मा, विगतभीः, ब्रह्मचारिव्रते स्थितः, मनः संयम्य, मच्चित्तः, मत्परः (च) युक्तः आसीत ॥१४॥

अर्थ–योग्यानें शांत अंतःकरण ठेवून निर्भय होऊन ब्रह्मचर्यव्रत आचरून व मनाचें संयमन करून, व माझें चिंतन करीत मत्परायण होऊन ध्यानस्थ रहावें ॥१०॥

म्हणजे आंत मनाच्या धर्माचें बळ नाहींसें होतें, ११ (ते मनोधर्म कोणते तें ऐक) कल्पना खुंटते, मनाची हांव कमी होते, आणि मनोविकार आपोआप बंद पडतात; १२ भूक काय झाली व झोंप कोणीकडे गेली ह्यांची आठवण नाहींशी होऊन त्यांचा पत्ता देखील लागत नाहीं. १३ मूलबंधानें कोंडलेला अपानवायु माघारी फिरला, म्हणजे सहज वर अडकून फुगा धरतो. १४ तो क्षोभून बलवत्तर होतो, अडकलेल्या जागीं गुरगुरतो, आणि राहून राहून लिंगचक्राशीं धडका मारितो. १५ मग अशा रीतीनें माजलेली वावटळ चोहोंकडे पोटांत फिरून ढवळाढवळ करिते, आणि बालपणापासून सांचलेली कुजकी घाण बाहेर काढण्याचा प्रयत्न करिते. १६ तो वायु पोटांत तळाशीं न मुरडतां कोठ्यांत शिरतो, आणि कफपित्तांचा नाश करतो. १७ सप्त धातूंचीं स्थानें ओलांडतो, मेदाचे डोंगर फोडतो, आणि हाडांतील रस बाहेर काढतो, १८ नाड्या सोडवतो, अवयवांना शिथिल करतो, आणि योगसाधन करणाराला भीति घालतो; परंतु त्यानें भिऊं नये. १९ तो व्याधि उत्पन्न करतो, आणि लागलीच नाहींशी करतो, व कफ वगैरे ओलसर पदार्थ आणि मांस वगैरे जड पदार्थ एकत्र करतो; २२० अर्जुना, दुसरीकडे काय प्रकार होतो म्हणशील, तर आसनाच्या ऊष्णतेनें कुंडलिनी नांवाची शक्ति जागी होते. २१ नागिणीचें पिल्लू कुंकवानें नाहालेलें जसें वेटोळें करून निजतें, २२ त्याप्रमाणें ती कुंडलिनी लहानसे साडेतीन वेढे घालून खालीं तोंड करून सर्पाप्रमाणें निजलेली असते. २३ ती विजेच्या कंकणाप्रमाणें, किंवा अग्निज्वालेच्या घडीप्रमाणें अथवा घोटून चकचकीत केलेल्या सोन्याच्या वेढ्याप्रमाणें, २४ नाभिस्कंदांत जी दाटून बसलेली असते, ती मूळबंधाच्या चिमट्यानें जागी होते. २५ तेव्हां, नक्षत्र तुटून पडतेवेळीं जसें चकाकतें, किंवा सूर्याचें आसन ढळावें अथवा तेजाचें बीं पेरून त्याला जसा अंकूर यावा, २६ त्याप्रमाणें ती कुंडलिनी आपले वेढे सोडून कौतुकानें आळस देऊन नाभीवर उभी राहिलेली दिसते. २७ ती सहजच फार दिवसांची भुकेलेली; त्यांत तिला जागें केल्याचें नि-

वरि चेवविली तें होय मिष । मग आवेसें पसरी मुख । ऊर्ध्वा उजू २८ तेथ हृदयकोशातळवटीं। जो पवनु भरे किरीटी। तया सगळेयाचि मिठी। देऊनि घाली २९ मुखींच्या ज्वाळीं । तळीं वरी कवळी । मांसाची वडवाळी । आरोगूं लागे २३० जे जे ठाय समांस । तेथ आहाच जोडे घाउस। पाठी एकदोनी घांस । हियाही भरी ३१ मग तळवे तळहात शोधी । उर्ध्वींचे खंड भेदी । झाडा घे संधी । प्रत्यंगाचा ३२ अधोभाग तरी न संडी । परि नखींचेंही सत्त्व काढी । त्वचा धुवूनि जडी । पांजरेशीं ३३ अस्थींचे नळे निरपे । शिरांचे हीर वोरपे । तंव बाहेरी विरूढी करपे । रोमबीजांची ३४ मग सप्तधातूंच्या सागरीं । ताहानेली घोंट भरी । आणि सवेंचि उन्हाळा करी । खडखडीत ३५ नासापुटौनि वारा । जो जातसे अंगुळें बारा । तो गच्च धरूनि माघारा । आंतु घाली ३६ तेथ अधवरौतें। आकुंचे ऊर्ध्वतळौतें खाचे। तया खेंवामाजि चक्राचे। पदर उरती ३७ एऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती । परी कुंडलिनी नावेक दुश्चित्त होती। ते तयातें म्हणे परौती। तुम्हीचि कायसि एथें ३८ आयकें पार्थिव धातु आघवी । आरोगिता कांहीं नुरवी । आणि आपातें तंव ठेवी । पुसोनियां ३९ ऐसी दोनी भूतें खाये। ते वेळीं संपूर्ण धाये। मग सौम्य होऊनि राहे । सुषुम्नेपाशीं २४० तेथ तृप्तीचेनि सुंतोषें। गरळ जें वमी मुखें । तेणें तियेचेनि पीयूषें । प्राणु जिये ४१ तो अग्नि आंतूनि निघे । परि सबाह्य निववूंचि लागे। ते वेळीं कसु बांधिती आंगें। सांडिली पुढती ४२ मार्ग मोडिती नाडीचे । नवविधपण वायूचें। जाय ह्मणऊनि शरीराचे। धर्मु नाहीं ४३ इडा पिंगळा एकवटती । गांठी तिन्ही सुटती । साही पदर फुटती । चक्रांचे हे ४४ मग शशी आणि भानु । ऐसा कल्पिजे जो अनुमानु । तो वातीवरी पवनु । गिंवसितां न दिसे ४५ बुद्धीची फुळिका विरे। परिमळु घ्राणीं उरे। तोही शक्तीसवें संचरे। मध्यमेमाजीं ४६ तंव वरिलेकडोनि ढाळें। चंद्रामृताचें तळें । कानवडोनि मिळे । शक्तिमुखीं ४७ तेणें नाळकें रस भरे । तो सर्वांगामाजि संचरे । जेथिंचा तेथ मुरे । प्राणपवनु ४८ तातलिये मुसें। मेण निघोनि जाय जैसें। मग कोंदली राहे रसें। वोतलेनि ४९ तैसें पिंडाचेनि आकारें। ते कळाचि कां अवतरे। वरी त्वचेचेनि पदरें। पांगुरली असे २५० जैसी आबाळाची बुंथी । करूनि राहे गभस्ती । मग फिटलीया दीप्ती । धरून ये ५१

मित्त झाल्यामुळें मग आवेशानें तोंड उघडून ती वर नीट उभी राहते. २८ हे किरीटी, तेव्हां हृद यकमलाच्या खालीं जो वारा भरलेला असतो, त्यास गळ्याला ती कवटाळून मिठी घालते; २९ आणि मुखांतील ज्वालांनीं खालवरचे मांसादिकांचे घांस करून खाऊं लागते. २३० ज्या ठिकाणीं मांस असेल, त्याचा सहज घांस घेते. आणि मागाहून त्या राहिलेल्या भागांचेही घांस घेते; ३१ मग पायांचे तळ व हातांचे तळ यांचें शोधन करून वरील अंगाचा भेद करिते, आणि दरएक अंगाचा व सांध्यांचा झाडा घेते. ३२ आपली मूळ जागा न सोडतां नखांतीलही सत्व काढते, व त्वचा धुऊन हाडांच्या व शीरांच्या सांपळ्यास मिळविते. ३३ अस्थींच्या नळ्यांतील रस काढून शिरांचे गाभे ओरपून टाकिते, त्या योगानें बाहेरील केसांच्या मुळांची वाढ करपून जाते. ३४ नंतर, सप्तधातूंच्या सागरांत आपली तहान भागविते, आणि त्याबरोबर जिकडे तिकडे शरीर खडखडीत कोरडें करून टाकिते. ३५ नाकपुड्यांतून जो बारा बोटें वाहणारा वारा, त्या प्राणवायूस गच्च धरून आंत ओढते. ३६ त्या वेळेस प्राण व अपान हे दोन वायु आकुंचित होतात व प्राण अपानास दाबून धरतो, आणि त्या दोघांच्या आलिंगनामध्यें चक्रांचे सांगाडे उरतात. ३७ प्राण व अपान वायु हे दोन्ही त्याच वेळेस एके ठिकाणीं मिळालेले असतात; परंतु ती कुंडलिनी क्षणभर बावरी होऊन "तुम्ही माघारे जा, तुमचें काय काम?" असें त्यांना म्हणते. ३८ अर्जुना, ऐक. शरिरांतील सर्व पृथ्वीचा भाग खाऊन टाकून कांहीं शिलक ठेवीत नाहींत, व तसाच उदकाचा भाग सर्व चाटूनपुसून टाकते. ३९ अशा रीतीनें दोन्ही भूतांचा भाग खाऊन तृप्त झाल्यावर मग सौम्य होऊन स्वस्थपणें सुषुम्ना नाडीपाशीं राहते. २४०त्या ठिकाणीं तृप्तीच्या भरांत ती मुखांतून जी गरळ ओकते, त्या गरळरूपी अमृताच्या योगानें प्राण रक्षण होतात. ४१ तो गरळरूप अग्नि बाहेर निघतो खरा परंतु सर्व अंगांतील दाह शमवितो; त्यामुळें अंगांतील पूर्वी गेलेलें सामर्थ्य फिरून येऊं लागतें, ४२ नाडीचें वाहणें बंद होतें, व नऊ वायूंचे व्यापार बंद होतात, म्हणून शरिराचे धर्म रहात नाहींत. ४३ इडा व पिंगळा ह्या एक होतात, तिन्ही गांठी सुटतात आणि साही चक्रांचे संबंध नाहींतसे होतात. ४४ मग, चंद्र आणि सूर्य अशीं ज्या वायूला नांवें आहेत, तो दिव्याच्या उजेडानें पाहूं गेलें असतां दिसत नाहीं. ४५ बुद्धीची ज्ञानकळा जागचे जागीं नाहींशी होते, आणि नाकामध्यें उरलेला सुगंधही कुंडलिनीबरोबर सुषुम्नेंत जातो. ४६ त्या वेळीं, भ्रुकुटीचक्रामध्यें जें चंद्रामृताचें तळें आहे, त्याला हळूच धक्का बसून तें वांकडें होतें, व त्यांतील अमृत कुंडलिनीच्या मुखांत पडूं लागते. ४७ त्यामुळें तिच्यांत रस भरून तो सर्वांगांत पसरतो, आणि तो प्राणवायूनें जेथच्या तेथेंच मुरतो. ४८ तापलेल्या मुशींतील मेण नाहींसें होऊन ती ज्याप्रमाणें ओतलेल्या रसानें गच्च भरून राहते. (मुशीचा आकार रसाला येतो,) ४९ त्याचप्रमाणें, ते शरीर इतकें तेजस्वी दिसतें कीं, जणू काय मूर्तिमंत तेजच त्या ठिकाणीं अवतरलें आहे! २५० सूर्य अभ्राच्या बुरख्यांत दडून राहिलेला असतो; परंतु तेंच आभाळ नाहींसें झाल्यावर तो ज्याप्रमाणें आपले तेजानें वर येतो, ५१ त्याचप्रमाणें, शरिरावर त्व-

तैसा आहाचवरि कोरडा । त्वचेचा असे पातोडा । तो झडोनि जाय कोंडा । जैसा होय ५२ मग काश्मीरीचे स्वयंभ । कां रत्नबीजा निघाले कोंभ । अवयवकांतीची भांब । तैसी दिसे ५३ नातरी संध्यारागींचे रंग । काढूनि वळिलें तें आंग । कीं अंतर्ज्योतीचें लिंग । निर्वाळिलें ५४ कुंकुमाचें भरींव । सिद्धरसाचें वोतींव । मज पाहतां सावेव । शांतिचि ते ५५ तें आनंदचित्रींचे लेप । नातरी महासुखाचें रूप । कीं संतोषतरूचें रोप । थांवलें जैसें ५६ तो कनकचंपकाचा कळा । कीं अमृताचा पुतळा । नाना सांसिनला मळा । कोंवळिकेचा ५७ हो कां जे शारदियेचेनि वोलें । चंद्रबिंब पाल्हेलें । कां तेजचि मूर्ता बैसलें । आसनावरी ५८ तैसें शरीर होये । जे वेळीं कुंडलिनी चंद्र पिये । मग देहाकृति बिहे । कृतांतु गा ५९ वार्धक्य तरी बहुडे । तारुण्याची गांठी विघडे । लोपली उघडे । बाळदशा २६० वयसा तरी येतुलेवरी । एऱ्हवीं बाळाचा बळार्थु करी । धैर्याची थोरी । निरूपमु ६१ कनकद्रुमाच्या पालवीं । रत्नकळिका नित्य नवी । नखें तैसीं बरवीं । नवीं निघती ६२ दांतही आन होती । परि अपाडें सानेजती । जैसी दुबाहीं बैसे पांती । हिरेयांची ६३ माणिकुलियांचिया कणिया । साबियाचि अनुमानिया । तैसिया सर्वांगीं उधवती अणिया । रोमांचिया ६४ करचरणतळें । जैसीं कां रातोत्पलें । पाखाळींव होती डोळे । काय सांगो ६५ निडाराचेनि कोदाटें । मोतियें नावरती संपुटें । मग शिवणी जैसी उतटे । शुक्तिपल्लवांची ६६ तैसी पातियांचिये कवळिये न समाये । दिठी जाकळोनि निघों पाहे । आधिलीचि परी होये । गगना कवळिती ६७ आइकें देह होय सोनियाचें । परि लाघव ये वायूचें । जे आप आणि पृथ्वीचे । अंशु नाहीं ६८ मग समुद्रापैलीकडील देसे । स्वर्गींचा आलोचु आइके । मनोगत वोळखे । मुंगियेचें ६९ पवनाचा वारिकां वळघे । चाले तरी उदकीं पाउल न लागे । येणें येणें प्रसंगें । येती बहुता सिद्धि २७० आइकें प्राणाचा हात धरुनी । गगनाची पाउठी करुनी । मध्यमेचेनि दादराहुनी । हृदया आली ७१ ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा । जया विश्वबीजाचिया कोंभा । साउली केली ७२ जे शून्यलिंगाची पिंडी । जे परमात्मया शिवाची कंडी । जे प्रणवाची उघडी । जन्मभूमी ७३ हें असो ते कुंडलिनीबाळी । हृदयाआंतु आली । तंव अनुहताची बोली । चावळे ते ७४ शक्तीचिया आंगा लागलें । बु-

चेचा जो उगाच पापुद्रा असतो, तो कोंड्याप्रमाणें निघून जातो, ५२ मग केशराच्या स्वयमेव रंगासारखी, अथवा रत्नरूप बीजाला निघालेल्या कोंबासारखी त्या अवयवकांतीची झांक दिसते. ५३ नाहींतर संध्याकाळच्या आकाशाच्या रंगाची लाली काढून तें अंग बनविलें असावें काय, अथवा आत्मचैतन्याच्या तेजाचें लिंग केलें असावें, ५४ किंवा तें कुंकुमानें भरलेलें आणि आत्मरसानें ओतलेलें, अथवा ती मूर्तिमंत शांतिच असावी असें मला वाटतें. ५५ तें आनंदरूपी चित्राचा रंग, किंवा परब्रह्म सुखाचें रूप, अथवा संतोषरूपी वृक्षाचें रोप आहे असें भासतें. ५६ तो सोनचांफ्याचा कळा किंवा अमृताचा पुतळा, अथवा नाजुकपणाचा भर आलेला असा मळाच. ५७ शरदृतूच्या पौर्णिमेच्या ओलाव्यानें चंद्रबिंब शोभावें, किंवा जणू काय मूर्तिमंत तेजच आसनावर बसावें, ५८ त्याप्रमाणें, कुंडलिनी चंद्रामृताच्या तळ्यांतील अमृत प्याल्यावर शरीर दिसूं लागतें. मग त्या शरिराला यम देखील भितो! ५९ वृद्धपणा मागें फिरतो, तारुण्याची ज्वानी मोडते, आणि गेलेली बाल्यावस्था पुनः प्राप्त होते. २६० वयानें पाहिलें तरी एवढासाच दिसतो; परंतु, अतिशय पराक्रम करतो; व त्याचें धैर्य अनुपम असते. ६१ सुवर्णवृक्षाच्या पालवींतून रत्नाची कळी सतत नवी निघावी, त्याप्रमाणें नवीं नखें निघून सतेज दिसतात. ६२ दांतही दुसरे होतात, परंतु अतिशय बारीक बनतात—जणूं काय दोहीं बाजूंला हिऱ्यांच्या पंक्तीच मांडल्या आहेत! ६३ सर्व अंगावरील रोमांचीं अग्रें माणकांच्या कण्याप्रमाणें लहान अशी सतेज उद्भवतात. ६४ हातापायांचे तळवे कमळाप्रमाणें लाल बनतात, आणि डोळे स्वच्छ होतात. आणखी काय सांगावें? ६५ मोत्यें पक्वदशेला येऊन फुगल्याकारणानें शिंपींत मात नाहींत म्हणून शिंपीचा सांधा उकलतो, ६६ त्याप्रमाणें दृष्टि पापण्यांच्या कवळींत न मावतां लांबवर पोहोंचवून बाहेर येऊं पाहते. ती दृष्टि पहिलीच खरी, परंतु सगळ्या गगनाला व्यापते. ६७ अर्जुना, ऐक: देहाची सुवर्णासारखी कांति होते, परंतु तो सर्व वायुमय असतो. त्यांत आप आणि पृथ्वी यांचा अंशही नसतो. ६८ मग त्याला समुद्रापलीकडीलही वस्तु दिसतात, स्वर्गांतील मसलती समजतात, व मुंगीच्याही मनांतील भाव ओळखता येतात. ६९ तो वाऱ्याच्या घोड्यावर स्वार होतो, पाण्यावर चालतांना पाण्याला पाय लागत नाहींत, अशा प्रकारें प्रसंगानुसार त्याला पुष्कळ सिद्धि प्राप्त होतात. २७० पहा कीं, प्राणवायूचा हात धरून व हृदयाकाशाच्या पायऱ्या करून सुषुम्नेच्या जिन्यानें हृदयांत आलेली, ७१ व जीवात्म्याला शोभा देणारी जी कुंडलिनी जगदंबा, ती जगद्बीजाचा कोंब (गाभा) जो जीव त्याच्यावर सावली करते. ७२ जी निराकार ब्रह्माची साकारमूर्ति, जी परमात्म्या शिवाची संबळी, जी ॐकाराची केवळ जन्मभूमीच. ७३ आणखी काय सांगावें! ती कुंडलिनी बाळी हृदयांत आली म्हणजे अखंड ॐकाराचा ध्वनी होऊं लागतो. ७४ त्या कुंडलि-

ऱ्हीचें चैतन्य होतें जाहलें । तें तेणें आइकिलें । अळुमाळु ७५ घोषाच्या कुंडीं । नादचित्रांचीं रूपडीं । प्रणवाचिया मोडी । रेखिलीं ऐसीं ७६ हेंचि कल्पावें तरी जाणिजे । परी कल्पितें कैचें आणिजे । तरी नेणों काय गाजे । तिये ठायीं ७७ विसरोनि गेलों अर्जुना । जंव नाशु नाहीं पवना । तंव वाचा आथी गगना । ह्मणऊनि धुमे ७८ तया अनाहताचेनि मेघें । आकाश दुमदुमों लागे । तंव ब्रह्मस्थानींचें बेगें । सहज फिटे ७९ आइकें कमळगर्भाकारें । जें महदाकाश दुसरें । जेथ चैतन्यें आधारुरें । करूनि असिजे २८० तया हृदयाच्या परिवरीं । कुंडलिनिया परमेश्वरी । तेजाची शिदोरी । विनियोगिली ८१ बुद्धीचेनि शाकें । हातबोनें निकें । द्वैत तेथ न देखे । तैसें केलें ८२ निजकांती हारविली । मग प्राणुचि केवळ जाहाली । ते वेळीं कैसी गमली । ह्मणावी पां ८३ हो कां जे पवनाचि पुतळी । पांघुरली होती सोनसळी । ते फेडूनियां वेगळी । ठेविली तिया ८४ नातरी वायूचेनि आंगें झगटली । दीपाची दिठी निवटली । कां लखलखोनि हारपली । वीजु गगनीं ८५ तैसी हृदयकमळवेर्‍हीं । दिसे जैसी सोनियाची सरी । नातरी प्रकाशजळाची झरी । वाहत आली ८६ मग ते हृदयभूमी पोकळे । जिराली कां एके वेळे । तैसें शक्तीचें रूप मावळे । शक्तीचिमाजी ८७ तेव्हां तरी शक्तीचि ह्मणिजे । एर्‍हवीं तो प्राणु केवळ जाणिजे । आतां नादबिंदु नेणिजे । कळाज्योती ८८ मनाचा हन मारु । कां पवनाचा आधारु । ध्यानाचा आदरु । नाहीं परी ८९ हे कल्पना घे सांडी । ते नाहीं इये परवडी । हे महाभूतांची फुडी । आटणी देखा २९० पिंडें पिंडाचा ग्रासु । तो हा नाथसंकेतींचा दंशु । परि दाऊनि गेला उद्देशु । महाविष्णु ९१ तया ध्वनिताचें केणें सोडुनी । यथार्थाचि घडी झाडुनी । उपलविली म्यां जाणुनी । ग्राहीक श्रोते ९२

युंजन्नेवं सदाऽऽत्मानं योगी नियतमानसः । शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥१५॥

ऐकें शक्तीचें तेज जेव्हां लोपे । तेथ देहाचें रूप हारपे । मग तो डोळ्यामाजि लपे । जगाचिया ९३ एर्‍हवीं आधिलाचि ऐसें । सावयव तरी दिसे । परी वायूचें कां जैसें । वळिलें होय ९४ नातरी कर्दळीचा गाभा । बुंथी सांडोनी उभा । कां अवयवचि नभा । उदयला तो ९५ तैसें होय शरीर । तैं तें ह्मणिजे खेचर । हें पद होतां चमत्कार । पिंडजनीं ९६ देखें साधकु निघोनि जाये । मागां पाउलांची वोळ राहे । तेथ ठायीं ठायीं होये । अणिमादिक ९७

नीच्या जवळ बुद्धि असल्यामुळें तिच्या कानावर किंचित् ॐकाराचा ध्वनि जातो. ७५ घोषाच्या कुंडींत ध्वनि व नादरूपी ॐकाराच्या आकाराचीं रेखलेलीं अशीं रूपें उमटतात. ७६ या गोष्टी कल्पनेनेंच जाणतां येतात, परंतु कल्पना करणारा कोठून आणावा? (कारण,त्याचें जीवात्म्याशीं ऐक्य झालें असतें.) म्हणून त्या हृदयाकाशांत कसली गर्जना होते ती कांहीं समजत नाहीं.७७अर्जुना, मी तुला एक गोष्ट सांगण्याची विसरलों. ती कोणती, तर जोंपर्यंत प्राण, अपान वगैरे वायूंचा नाश होत नाहीं, तोंपर्यंत हृदयाकाशाला वाचा असते, आणि म्हणूनच शब्द उत्पन्न होतो. ७८ त्या अखंड ॐकाराच्या मेघासारख्या ध्वनीनें हृदयाकाश दुमदुमूं लागतें, तेव्हां ब्रह्मरंध्राची खिडकी सहज उघडते. ७९ पहा कीं, कमळांतील पोकळीप्रमाणें हृदयाकाशांत जी पोकळ जागा असते, तेथें चैतन्य हें अधांतरीं वास करितें (पूर्ण असतें). २८० त्या आत्म्याच्या घरीं कुंडलिनी परमेश्वरी पाहुणी आल्यावर तेजरूपाची मेजवानी दिली. ८१ त्या वेळेस बुद्धिरूप भाजीसह ताट वाढून–कीं ज्यांत द्वैताचा भास देखील होऊं नये–अशी मेजवानी दिली. ८२ कुंडलिनी आपली तेजरूप कांति टाकून वायुरूप बनली, त्या वेळीं कशी दिसली म्हणाल तर,प्रत्यक्ष वाऱ्याची पुतळी जी सोनसळी होती, तें (वस्त्र) फेडून तिनें एका बाजूस ठेवल्याप्रमाणें दिसली. ८३ ८४ किंवा, दिव्याची ज्योति वारा लागल्यानें ज्याप्रमाणें मालवते, अथवा बीज चमकून गगनांत नाहींशी होते, ८५ त्याप्रमाणें हृदयकमळापर्यंत जाऊन ती सोन्याच्या जाड कांबीसारखी सतेज, किंवा तेजरूप पाण्याच्या झऱ्याप्रमाणें वहात आलेली दिसते. ८६ मग ती हृदयरूप भुसभुशीत भूमींत एकाएकीं जिरते,तेव्हां कुंडलिनीशक्तीचें रूप शक्तींतच लय पावतें. ८७ अशी स्थिति झाल्यावर हिला शक्तिच म्हणावयाचें; एऱ्हवीं ती खरोखर प्राणच होय परंतु त्या वेळेस ध्वनि, कळा, ज्योति हीं नाहींतशीं होतात. ८८ नंतर मन जिंकणें,वायूचें अधर राहणें,किंवा ध्यान करणें, हींही नाहींतशीं होतात. ८९ आणि कल्पना घेणें व सोडणें ही खटपट नाहींशी होते. असे व्यापार बंद होतात, म्हणून कुंडलिनी ही केवळ पंचमहाभूतें आटण्याची सूस होय. २९० शरिरानें शरीर नाहींसें करणें हा, योगशास्त्राचे नाथ जे शंकर, त्यांनीं केलेल्या सिद्धांताचा अभिप्राय होय: त्याचा श्रीमहाविष्णूंनीं हेतु दर्शित केला.९१[ज्ञानेश्वरमहाराज म्हणतातः–] त्या महाविष्णूंच्या संकेताचें गाठोडें सोडून व यथार्थरूप वस्त्राची घडी झाडून श्रोते हेच या मालाचे गिऱ्हाईक आहेत असें जाणून मी ती त्यांच्यापुढें मांडून ठेविली. ९२

अन्वय–एवं सदा आत्मानं युंजन् नियतमानसः योगी निर्वाणपरमां मत्संस्थां शांतिं अधिगच्छति, ॥१५॥

अर्थ–अशा प्रकारें सर्वकाल आपलें अंतःकरण समाधीचे ठिकाणीं लावून मनाचा निग्रह करणाऱ्या योग्याला, मोक्ष हेंच जिचें परम फळ आहे अशी माझ्या स्वरूपीं असणारी शांति प्राप्त होते. ॥ १५ ॥

पहा कीं, ज्या वेळेस शक्तीचें तेज नाहींसें होतें, त्यावेळेस देहाचें रूप नाहींसें होतें, आणि तो योगी इतकें सूक्ष्म रूप धारण करितो कीं, तो लोकांस दिसेनासा होतो. ९३ एऱ्हवीं तें शरीर पूर्वीप्रमाणेंच सावयव असतें, परंतु तें केवळ वायूचेंच असतें. ९४ किंवा केळीचीं सोपटें काढून त्याचा गाभा उभा केला ह्मणजे जसें कांहींच उरत नाहीं, किंवा आकाशालाच जसे अवयव फुटावे, तसे त्याचे अवयव असून नसल्याप्रमाणें असतात, ९५ त्याचप्रमाणें शरीर बनल्यावर त्यालाच आकाशांत संचार करणारा असें म्हणतात; आणि याप्रमाणें स्वरूप बनल्यावर त्याचा देह लोकांत आश्चर्यकारक दिसतो. ९६ पहा, योग साध्य करणारा साधक चालून गेल्यावर पाठीमागें पावलें उमटतात, त्या प्रत्येक पावलाच्या ठिकाणीं अणिमादिक सिद्धि हात जोडून उभ्या असतात. ९७ परंतु, धनंजया, ऐक; त्या

परि तेणें काय काज आपणपयां । अवधारीं ऐसा धनंजया । लोप आथी भूतत्रया । देहींचा देहीं ९८ पृथ्वीतें आप विरवी । आपातें तेज जिरवी । तेजातें पवनु हरवी । हृदयामाजीं ९९ पाठीं आपण एकला उरे । परि शरीराचेनि अनुकारें । मग तोही निगे अंतरें । गगना मिळे ३०० ते वेळीं कुंडलिनी हे भाष जासे । मग मारुती ऐसें नाम होये । परि शक्तिपण तें आहे । जंव न मिळे शिवीं १ मग जालंधर सांडी । ककारांत फोडी । गगनाचिये पाहाडीं । पैठी होय २ ते ॐकाराचिये पाठी । पाय देत उठाउठी । पश्यंतीचिये पाउठी । मागां घाली ३ पुढें तन्मात्रा अर्धवरी । आकाशाच्या अंतरीं । भरती गमे सागरीं । सरिता जेवीं ४ मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनी । सोहंभावाच्या बाह्या पसरुनी । परमात्मलिंगा धांवोनी । आंगा घडे ५ तंव महाभूतांची जवनिका फिटे । मग दोहींसि होय झटें । तेथ गगनासकट आटे । समरसीं तिये ६ पैं मेघाचेनि मुखीं निवडला । समुद्रु कां वोघीं पडिला । तो मागुता जैसा आला । आपण पयां ७ तेवीं पिंडाचेनि मिषें । पदीं पद प्रवेशें । तें एकत्व होय तैसें । पंडुकुमरा ८ आतां दुजें हन होतें । कीं एकचि हें आइतें । ऐशिये विवंचनेपुरतें । उरेचिना ९ गगनीं गगन लया जाये । ऐसें जें कांहीं आहे । तें अनुभवें जो होये । तो होऊनि ठाके ३१० म्हणोनि तेथींची मातु । न चढेचि बोलाचा हातु । जेणें संवादाचिया गांवाआंतु । पैठी कीजे ११ अर्जुना एन्हवीं तरी । इया अभिप्रायाचा जे गर्व धरी । ते पाहें पां वैखरी । दुरी ठेली १२ भ्रूलता मागलीकडे । तेथ मकराचेंचि आंग न मांडे । सडेया प्राणा सांकडें । गगना येतां १३ पाठीं तेथेंचि तो भेसळला । तैं शब्दाचा दिवो मावळला । मग तयाहि वरी आटु भविन्नला । आकाशाचा १४ आतां महाशून्याचिया डोहीं । जेथ गगनासीचि थावो नाहीं । तेथ तागा लागेल काई । बोलाचा इया १५ म्हणूनि आखरामाजि सांपडे । कीं कानावरी जोडे । हें तैसें नव्हे फुडें । त्रिशुद्धी गा १६ जैं कहीं दैवें । अनुभविलें फावे । तैं आपणाचि हें ठाकावें । होऊनियां १७ पुढती जाणणें तें नाहींचि । म्हणोनि असो किती हेंचि । बोलावें आतां वायांचि । धनुर्धरा १८ ऐसें शब्दजात माघौतें सरे । तेथ संकल्पाचें आयुष्य पुरे । वाराही जेथ न शिरे । विचाराचा १९ जें उन्मनियेचें लावण्य । जें तुर्येचें तारुण्य । अनादि जें अगण्य । परमतत्त्व ३२० जें विश्वाचें मूळ । जें योगद्रुमाचें फळ ।

अणिमादिक सिद्धींशीं आपल्याला काय करावयाचें आहे ? पृथ्वी, आप, व तेज या तीन भूतांचा देहांतल्या देहांतच लोप होतो. ९८ पृथ्वीला उदक विरवतें, उदकाला अग्नि जिरवितो, आणि हृदयांत अग्नीचा नाश वायु करितो. ९९ पाठीमागें एकटा वायु आपण उरतो, तो शरीराचे आकृतीनें असतो; पण तोही कांहीं वेळानें निघून ब्रह्मरंध्र आकाशांत जाऊन मिळतो. ३०० त्या वेळीं कुंडलिनी हें नांव जाऊन मग फक्त मारुत् (वायुमय) हें नांव प्राप्त होतें. परंतु ती ब्रह्मांत मिळेपर्यंत तिची शक्ति कायम असतेच. १ मग जालंधरबंध सोडून काकीमुख (कंठस्थान) फोडून ब्रह्मरंध्र आकाशाचे पहाडावर प्रवेश करते. २ ती ॐकाराचे पाठीवर पाय देऊन पश्यंति वाचेची पायरी मागें टाकिते. ३ पुढें ॐकारांतील अर्धवर्तुलाकार मात्रा मागें टाकून ज्याप्रमाणें नदी सागराला मिळते, त्याप्रमाणें ती ब्रह्माकाशांत जाऊन मिळते. ४ नंतर मस्तकाच्या पोकळींत (ब्रह्मरंध्रांत) स्थिर होऊन, मी ब्रह्म आहें ह्या भावनेनें वाहु पसरून परब्रह्माला मिठी मारून एकवटते. ५ त्या वेळेस पंचमहाभूतांचा पडदा नाहींसा होऊन मग शिवशक्तींचें ऐक्य होतें, त्या ठिकाणीं ती आकाशासह ब्रह्मानंदांत मिळून जाते. ६ ज्याप्रमाणें समुद्राचें पाणी मेघांच्या द्वारें जाऊन नंतर जमिनीवर वर्षाव होऊन तें नदीमार्गानें पुनः समुद्रासच येऊन मिळतें, ७ त्याप्रमाणें, अर्जुना, देहाच्या निमित्तानें ब्रह्मपदीं जीवात्मा प्रवेश करितो तें एकत्वही समुद्राच्या पाण्याप्रमाणें होय. ८ नंतर, मी वेगळा व आत्मा वेगळा किंवा दोन्ही एक ही वाटाघाट उरतच नाहीं. ९ आकाश आकाशांत मिळतें असें जें कांहीं एक तत्व आहे, त्याचा जो कोणी अनुभव घेईल त्यालाच सिद्धि प्राप्त होईल. ३१० म्हणून, ज्या शब्दांनीं कोणतीही गोष्ट स्पष्ट करून सांगतां येते, त्या शब्दांनीं तेथली गोष्ट व्यक्त करतां येत नाहीं. ११ अर्जुना, खरोखर पाहिलें तर अभिप्राय सांगण्याचा गर्व वाहणारी जी वाणी, तिला देखील याचा पत्ता लागत नाहीं. १२ भिंवयांच्या आंतल्या बाजूस मकाराचा देखील प्रवेश होत नाहीं; त्याचप्रमाणें एकट्या प्राणवायूला देखील ब्रह्माकाशांत जाण्याला संकट पडतें. १३ पुढें तो वायु तेथें गेल्यावर तदाकार होतो, त्या वेळेस शब्दाचें बोलणें खुंटते. मग आकाशतत्वाचीही आटणी होते. १४ जेथें अव्यक्त स्थितीच्या डोहांत महदाकाशाचाही पत्ता लागत नाहीं, तेथें या शब्दाची दाद लागेल काय ? १५ म्हणून हें ब्रह्म अक्षरांत सांपडण्याजोगें (वर्णन करतां येण्याजोगें) किंवा ऐकूं येण्याजोगें नाहीं, हें त्रिवार सत्य जाण. १६ ज्या वेळेस कांहीं दैवगतीनें याचा अनुभव घेतो, त्या वेळेस तो अनुभव घेणारा तद्रूप होऊन जातो. १७ नंतर तेथील स्थिति जाणण्याचें आपोआप राहतें; म्हणून, धनुर्धरा, याच्याबद्दल कितीही बोललें तरी तें व्यर्थ होय. १८ याप्रमाणें सर्व बोलणें आपोआप राहतें; त्या ठिकाणीं संकल्पही मावळतो; आणि म्हणूनच विचाराची तेथें दादही लागत नाहीं. १९ तें ब्रह्मस्वरूप कसें आहे, तर सहज स्थितीचें सौंदर्य, आणि समाधि अवस्थेचें तारुण्य होय; आणि ज्याला आदि नाहीं व जें मापतां येत नाहीं, ३२० तें विश्वाचा आधार व योगरूप वृक्षाचें फळ आणि

जें आनंदाचें केवळ। चैतन्य गा २१ जें आकाराचा प्रांतु। जें मोक्षाचा एकांतु। जेथ आदि आणि अंतु। विरोनि गेले २२ जें महाभूतांचें बीज। जें महातेजाचें तेज। एवं पार्था जें निज। स्वरूप माझें २३ ते हे चतुर्भुज कोंभेली। जयाचि शोभा रूपासि आली। देखोनि नास्तिकीं नोकिलीं। भक्तवृंदें २४ तें अनिर्वाच्य महासुख। पैं आपणचि जाहले ते पुरुष। जयांचे कां निष्कर्ष। प्राप्तिवेरीं २५ आम्हीं साधन हें जें सांगितलें। तेंचि शरीरीं जिहीं केलें। ते आमुचेनि पाडें आले। निर्वाळलेया २६ परब्रह्माचेनि रसें। देहाकृतीचियेनि मुसें। वोतींव जाहले तैसे। दिसती आंगें २७ जरि हे प्रतीति हन अंतरीं फांके। तरी विश्वचि हें अवघें झांके। तव अर्जुन म्हणे निकें। साचचि जी हें २८ कां जे आपण आतां देवो। हा बोलिले जो उपावो। तो प्राप्तीचा ठावो। म्हणोनि घडे २९ इये अभ्यासीं जे दृढ होती। ते भरवसेंनि ब्रह्मत्वा येती। हें सांगतियाची रीती। कळलें मज ३३० देवा गोठीचि हे ऐकतां। बोधु उपजतसे चित्ता। मा अनुभवें तल्लीनता। नोहेल केवीं ३१ म्हणऊनि एथ कांहीं। अनारिसें नाहीं। परी नावभरी चित्त देईं। बोला एका ३२ आतां कृष्णा तुवां सांगितला योगु। तो मना तरी आला चांगु। परि न शके करूं पांगु। योग्यतेचा ३३ सहजें आंगिक जेतुलें आहे। तेतुलियाचि जरी सिद्धि जाये। तरी हाचि मार्गु सुखोपायें। अभ्यासीन ३४ नातरी देव जैसें सांगतील। तैसें आपणपें जरी न ठकेल। तरी योग्यतेवीण होईल। तेंचि पुसों ३५ जीवींचिये ऐसी धारण। म्हणोनि पुसावया जाहलें कारण। मग म्हणे तरी आपण। चित्त देइजो ३६ हांहो जी अवधारिलें। जें हें साधन तुम्हीं निरूपिलें। तें आवडतयाहि अभ्यासिलें। फावों शके ३७ कीं योग्यतेवीण नाहीं। ऐसें हन आहे कांहीं। तेथ श्रीकृष्ण म्हणती काई। धनुर्धरा ३८ हें काज कीर निर्वाण। परि आणिकही जें कांहीं साधारण। तेंही अधिकाराचे वोडवेविण। काय सिद्धी जाय ३९ पैं योग्यता जे म्हणिजे। ते प्राप्तीची अधीन जाणिजे। कां जे योग्य होऊनि कीजे। तें आरंभिलें फळे ३४० तरी तैसी एथ कांहीं। साविधाचि केणी नाहीं। आणि योग्यतेची काई। खाणी असे ४१ नावेक विरक्तु। जाहला देहधर्मीं नियतु। तरि तोंचि नव्हे व्यवस्थितु। अधिकारिया ४२ येतुलालिये आयणीमाजि येवडें। योग्यपण तूतेंही जोडे। ऐसें प्रसंगें सांकडें। फेडिलें तयाचें ४३

आनंदाचें केवळ जीवन होय. २१ तेथें आकाशाचा शेवट होतो; तें म्हणजे मोक्षाची केवळ स्थिति असून त्या ठिकाणीं आदि आणि अंत यांचा लय झाला आहे. २२ तें ब्रह्म पंचमहाभूतांचें मूळकारण व महातेजाचें तेज होय. सारांश, पार्था, तें ब्रह्म माझें मूळस्वरूप होय. २३ साधुवृंदांचा नास्तिकांनीं जेव्हां छल केला, तेव्हां हीच चतुर्भुज मूर्ति या स्वरूपापासून आकाराला आली. २४(अर्जुना,) असें हें महासुख अवर्णनीयच; परंतु याची प्राप्ति होईपर्यंत ज्या पुरुषांचे प्रयत्न अव्याहत चालले, ते पुरुष स्वयमेव सुखरूप झाले. २५ आम्हीं हें जें अष्टांगयोगाचें साधन सांगितलें, तें स्वतः शरीरानें जे करितात, ते योगानें तयार झाल्यामुळें माझ्याच योग्यतेस येतात. २६ त्या योग्यांचीं शरिरें परब्रह्माच्या रसानें देहाकृतीच्या मुशींत ओतल्यासारखीं सतेज दिसतात. २७ जर हा अनुभव अंतर्यामीं प्राप्त झाला; तर हें सर्व विश्व त्याला मावळतें; तेव्हां अर्जुन म्हणाला, "देवा, आपण बोललां तें सत्य आहे. २८ देवा, आपण आतां जो हा उपाय सांगितला तो ब्रह्मप्राप्तीचें ठिकाण आहे, म्हणूनच त्या ठिकाणीं ब्रह्मसाक्षात्कार होतो. २९ आपण जो हा मार्ग सांगितला, त्याचा दृढ अभ्यास करणारे खरोखर ब्रह्मपदाला पावतात, हें आपल्या सांगण्यावरून मला समजलें. ३३० देवा, आपण सांगितलेली गोष्ट ऐकतांनाच चित्तांत ज्ञान उत्पन्न होतें, तर मग तिचा अनुभव घेणाराला तद्रूपता कशी बरें प्राप्त होणार नाहीं? ३१ म्हणून, हें जें आपण सांगितलें, यांत कांहीं संशय नाहीं. परंतु क्षणभर मी जी विनंती करतों, तिकडे लक्ष द्यावें. ३२ कृष्णा, आतां तुम्ही जो मला योग सांगितला, तो माझ्या मनाला फार आवडला; परंतु माझी योग्यता कमी असल्याकारणानें माझ्या हातून कांहीं तो होणार नाहीं. ३३ माझ्या अंगांत जेवढी शक्ति आहे, तेवढी खर्च करूनही जरी हा शेवटाला जाईल, तरी देखील मी मोठ्या समाधानानें याचा अभ्यास करीन. ३४ किंवा, देवा, तुम्ही जसें सांगतां तसें माझ्यानें जर न करवेल, तर आपल्या योग्यतेच्या मानानें आपल्या हातून जें होईल तेंच आपण विचारावें, ३५ अशी माझ्या मनांत इच्छा उत्पन्न झाल्यामुळें आपल्याला विचारण्याचें कारण पडलें," अर्जुन म्हणतो, "तर मग देवा, आपण इकडे लक्ष द्यावें. ३६ महाराज, आपण हें जें योगसाधन सांगितलें, तें ऐकलें; परंतु वाटेल त्यानें याचा अभ्यास केला तर या योगाची प्राप्ति होईल काय? ३७ किंवा हें योग्यतेशिवाय होणारच नाहीं असें आहे कीं काय?" तेव्हां श्रीकृष्ण म्हणाले, "अर्जुना, हें तूं काय विचारतोस? ३८ हा योभाभ्यास जर म्हणशील तर खरोखर मोक्ष देणारा आहे; पण याशिवाय दुसरी साधारण जरी गोष्ट असली, तरी ती सुद्धां अधिकाराच्या योग्यतेशिवाय सिद्धीस जाईल काय? ३९ परंतु योग्यता म्हणून जिला म्हणतात, ती प्राप्तीचे पूर्वी समजत नाहीं. कारण, अधिकारी होऊन आरंभिलेलें काम तत्काल फलद्रूप होतें. ३४० तरी या ठिकाणीं खरोखर तशी कांहीं अडचण नाहीं, आणि दुसरें असें पहा कीं, योग्यतेची एकादी खाण आहे कीं काय? ४१ जो थोडासा विरक्त होऊन देहाच्या धर्मांचें व्यवस्थित नियमन करणारा असेल तो सुद्धां अधिकारी होणार नाहीं काय? ४२ अशा युक्तीनें इतकी योग्यता तुझे ठिकाणींही आहे." याप्रमाणें अर्जुनाचें त्या समयाला संकट फेडलें. ४३ मग श्रीकृष्ण म्हणाले:—

मग म्हणे पार्था । ते हे ऐसी व्यवस्था । अनियतासि सर्वथा । योग्यता नाहीं४४

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकांतमनश्नतः । न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥१६॥

जो रसनेंद्रियाचा अंकिला । कां निद्रेसी जीवें विकला । तो नाहीं एथ ह्मणितला । अधिकारिया ४५ अथवा आग्रहाचिये बांदोडी । क्षुधा तृषा कोंडी । आहारातें तोडी । मारूनियां ४६ निद्रेचिया वाटा नवचे । ऐसा दृढिवेचेनि अवतरणें नाचे । तें शरीरचि नव्हे तयाचें । मा योगु कवणाचा ४७ ह्मणोनि अतिशयें विषयो सेवावा । तैसा विरोधु नोहावा । कां सर्वथा निरोधावा । हेंही नको

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु । युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥१७॥

आहार तरी सेविजे । परी युक्तीचेनि मापें मविजे । क्रियाजात आचरिजे । तयाचि स्थिती ४९ मितला बोली बोलिजे । मितलिया पाउलीं चालिजे । निद्रेही मानु दीजे । अवसरें एकें ३५० जागणें जरी जाहलें । तरी व्हावें तें मितलें । येतुलेनि धातुसाम्य संचलें । असेल सहजें ५१ ऐसें युक्तीचेनि हातें । जैं इंद्रियां वोपिजे भातें । तैं संतोषासी वाढतें । मनचि करी ५२

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते । निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥१८॥

बाहेर युक्तीची मुद्रा पडे । तंव आंत आंत सुख वाढे । तेथें सहजेंचि योगु घडे । नाभ्यासितां ५३ जैसें भाग्याचिये भडसें । उद्यमाचेनि मिसें । मग समृद्धिजात आपैसें । घर रिघे ५४ तैसा युक्तिमंतु कौतुकें । अभ्यासाचिया मोहरा ठाके । आणि आत्मसिद्धीचि पिके । अनुभवु तयाचा ५५ ह्मणोनि युक्ति हे पांडवा । घडे जया सदैवा । तो अपवर्गांचिये राणिवा । अळंकरिजे ५६

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता । योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः ॥१९॥

युक्ति योगाचें आंग पावे । ऐसें प्रयाग जेथ होय बरवें । तेथ क्षेत्रसंन्यासें स्थिरावे । मानस जयाचें ५७ तयातें योगयुक्त तूं ह्मण । हेंही प्रसंगें जाण । तें दीपाचें उपलक्षण । निर्वातींचिया ५८ आतां तुझें मनोगत जाणोनी । कांहीं एक आह्मी ह्मणोनि । तें निकें चित्त देउनी । परिसावें गा ५९ तूं प्राप्तीची चाड बाहसी । परि अभ्यासीं दक्षु न होसी । तें सांग पां काय बिहसी । दुवाडपणा ३६० तरी पार्था हें ह्मणें । सायास घेशी हो मनें । वायां बागूल इये

पार्था, या योगप्राप्तीची अशी व्यवस्था आहे; परंतु अव्यवस्थित मनुष्याला त्याची प्राप्ति होण्याचा कधींही संभव नाहीं. ४४

अन्वय–अर्जुन, अत्यश्नतः तु योगः न अस्ति, एकांतं अनश्नतः च योगः) न (अस्ति), अतिस्वप्नशीलस्य च (योगः) न (अस्ति); जाग्रतः एव च (योगः) न (अस्ति). ॥१६॥

अर्थ—अर्जुना, अतिशय खाणाराच्यानें योग होणार नाहीं, आणि अगदीं न खाणाऱ्याच्यानेंही [योग] होणार नाहीं; त्याचप्रमाणें अत्यंत झोंप घणाराच्यानेंही योगसाधन होणार नाहीं, व सदैव जागणाराच्यानेंही योगसाधन होणार नाहीं. ॥ १६ ॥

जो जिव्हेच्या अंकित झाला, किंवा सर्वथैव झोंपेच्या अधीन झाला, तो या योगाचा अधिकारी म्हटला जात नाहीं. ४५ अथवा, दुराग्रहाच्या आवेशांत जो भूक आणि तहान मारतो, आणि जेवण कमी करतो, ४६ आणि झोंपेचें नांव देखील न घेतां बळकट अभिमान धरतो, त्याचें शरीर सुद्धां त्याच्या अधीन रहात नाहीं, मग त्याला योग कोठून साध्य होणार? ४७ म्हणून विषयांचें अति सेवन करण्याची, किंवा त्यांचा अगदींच त्याग करण्याची इच्छा करूं नये; अर्थात् सर्व गोष्टी नियमित असाव्या. ४८

अन्वय–युक्ताहारविहारस्य, कर्मसु युक्तचेष्टस्य, युक्तस्वप्नावबोधस्य (योगिनः) योगः दुःखहा भवति. ॥१७॥

अर्थ–ज्याचे आहारविहार युक्त असतात, कर्मांचरणांतील व्यापार योग्य तऱ्हेनें चाललेले असतात, आणि ज्याची निद्रा व जागृति प्रमाणशील असते, त्या पुरुषाचा योग त्याच्या दुःखाचा नाश करितो. ॥ १७ ॥

अन्न ग्रहण तर करावें, पण तें युक्तियुक्तीनें परिमित करावें; त्याचप्रमाणें, जीं जीं कामें करावयाचीं तींही सर्व युक्तीनेंच प्रमाणांत आणावीं. ४९ भाषण परिमित असावें; त्याचप्रमाणें व्यायामही माफक करावा; व झोंपही नेमलेल्या वेळींच घ्यावी. ३५० जाग्रण जरी करावयाचें झालें तरी तें नियमित वेळेपर्यंत करावें. अशा नियमित रीतीनें आचरण केल्यावर शरिरांतील रक्तादिक सप्तधातु समतोल आपोआप राहतील. ५१ अशा प्रकारें बेताबातानें इंद्रियांची तृप्ति केली, म्हणजे आपलें मनच संतोषाची वृद्धि करितें. ५२

अन्वय–यदा (योगिनां) विनियतं चित्तं आत्मनि एव अवतिष्ठते, सर्वकामेभ्यः (च सः) निस्पृहः (भवति, तदा सः) युक्तः इति उच्यते. ॥१८॥

अर्थ–जेव्हां योग्याचें नियत–एकाग्र झालेलें चित्त आत्म्याच्याच ठिकाणीं स्थिर राहतें, आणि म्हणून तो सर्व वासनांविषयी निःस्पृह–निरिच्छ बनतो, तेव्हां त्याला ' युक्त ' असें म्हणतात. ॥ १८ ॥

याप्रमाणें बाहेरील इंद्रियांची स्थिति नियमित ठेविली, तर अंतर्यामीं सुख उत्पन्न होऊन, त्या मनुष्याला अभ्यास न करितां योग सहज घडतो. ५३ ज्याप्रमाणें भाग्योदय झाला असतां उद्योगाचे निमित्तानें सर्व संपत्ति आपोआप घरीं चालून येते, ५४ त्याप्रमाणें, जो नियमशील आहे, तो कौतुकानें जरी योगाभ्यासाकडे वळला, तरी त्याला आत्मस्थितीचा अनुभव येतोच. ५५ म्हणून, अर्जुना, ज्या दैववान् पुरुषाला युक्तीचें साह्य असतें, तो मोक्षाच्या राज्यावर शोभिवंत होतो. ५६

अन्वय–यथा निवातस्थः दीपः न इङ्गते, सा उपमा आत्मनः योगं युंजतः यतचित्तस्य योगिनः स्मृता. ॥१९॥

अर्थ–निवाऱ्यांत ठेविलेला दिवा हालत नाहीं; ही उपमा आत्मविषयक योग करणाऱ्या स्थिरचित्त झालेल्या योग्याला लागू पडते. ॥१९॥

नियमित वागणाराला जर योगाभ्यास करण्याची इच्छा झाली, तर तो योग गंगा आणि यमुना यांचा संगम झालेल्या प्रयागतीर्थाप्रमाणें होय. त्या आत्मस्वरूपी प्रयागाचे ठिकाणीं ज्या मनुष्याचें मन क्षेत्रसंन्याशाप्रमाणें कायम राहतें, ५७ त्याच मनुष्याला तूं योगी म्हण; आणि प्रसंगानुरोधानें हेंही पण लक्षांत ठेव कीं, त्याच्या चित्ताला निवाऱ्यांतील दिव्याची उपमा लागू पडते. ५८ आतां तुझ्या मनांतील भाव जाणून आम्ही तुला कांहीं गोष्ट सांगतों, ती चित्त देऊन ऐक. ५९ तूं योगप्राप्तीची इच्छा मनांत बाळगतोस, परंतु अभ्यासाकडे तुझें लक्ष नाहीं; तर तो अभ्यास कठीण आहे अशी तुझ्या मनांत भीती वाटते कीं काय, तें सांग. ३६० पार्था, कदाचित् तूं ही भीति मनांत बाळगशील; पण तसें करूं नको हो! कारण हीं दुर्जन इंद्रियें ह्या अभ्यासाचा उगीच बागुलबोवा करून भीति

दुर्जनें । इंद्रियें करिती ६१ पाहें पां आयुष्यातें अढळ करी । जें सरतें जीवित वारी । तया औषधातें वैरी । काय जिव्हा न म्हणे ६२ ऐसे हितासि जें जें निकें । तें सदाचि या इंद्रियां दुखे । एऱ्हवीं सोपें योगासारिखें । कांहीं आहे ६३

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया । यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥२०॥
सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् । वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥२१॥

ह्मणोनि आसनाचिया गाढिका । जो आह्मीं अभ्यासु सांगितला निका । तेणें होईल तरी हो कां । निरोध ययां ६४ एऱ्हवीं तरी येणें योगें । जैं इंद्रियां विंदाण लागे । तैं चित्त भेटों रिगे । आपणपेयां ६५ परतोनि पाठिमोरें ठाके । आणि आपणियांतें आपण देखे । देखतखेंवो वोळखे । म्हणे तत्त्व हें मीचि ६६ तिये वोळखीचिसरिसें । सुखाचिया साम्राज्यीं बैसे । मग आपणपां समरसें । विरोनि जाय ६७ जयापरतें आणिक नाहीं । जयातें इंद्रियें नेणती कहीं । तें आपणचि आपुलया ठायीं । होऊनि ठाके ६८

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः । यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते२२

मग मेरूपासूनि थोरें । देह दुःखाचेनि डोंगरें । दाटिजो पां पडिभरें । चित्त न दटे ६९ कां शस्त्रें वरी तोडिलिया । देह अग्नीमाजि पडलिया । चित्त महासुखीं पहुडलिया । चेवोचि नये ३७० ऐसें आपणपां रिगोनि ठाये । मग देहाची वासु न पाहे । आणिकचि सुख होऊनि जाये । ह्मणूनि विसरे ७१

तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् । स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा २३

जया सुखाचिया गोडी । मन आर्तींची सेचि सोडी । संसाराचिया तोंडीं । गुंतलें जें ७२ जें योगाची बरव । संतोषाची राणिव । ज्ञानाची जाणिव । जयालागीं ७३ तें अभ्यासिलेनि योगें । सावयव देखावें लागे । देखिलें तरी आंगें । होइजेल गा ७४

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः । मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥२४॥

तरि तोचि योगु बापा । एके परी आहे सोपा । जरी पुत्रशोकु संकल्पा । दाखवीजे ७५ हा विषयातें निमालिया आइके । इंद्रियें नेमाचिया धारणीं देखे । तरी हियें घालूनि मुके । जीवित्वासी ७६ ऐसें वैराग्य हें करी । तरी संकल्पाची सरे वारी । सुखें धृतीचिया धवळारी । बुद्धि नांदे ७७

शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया । आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् २५
यतो यतो निश्चलति मनश्चंचलमस्थिरम् । ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥२६॥

दाखवितात ! ६१ पहा–जें आयुष्य स्थिर करतें (वाढवितें), आणि संपणाऱ्या जीविताला मागें आणतें (मृत्यु टाळतें), त्या औषधाला देखील जिव्हा शत्रु समजत नाहीं का ? ६२ त्याचप्रमाणें, पारलौकिक हितास जें चांगलें, तें नेहमीं या इंद्रियांना दुःखदायक वाटतें; एव्हवीं या योगसाधनाइतकें दुसरें कांहीं सोपें साधन आहे का ? ६३

अन्वय–योगसेवया निरुद्धं चित्तं यत्र उपरमते, यत्र च आत्मना आत्मानं पश्यन् एव आत्मनि तुष्यति; ॥२०॥ यत्र यत् आत्यंतिकं, बुद्धिग्राह्यं अतींद्रियं सुखं तत् वेत्ति, (तत्र) च अयं स्थितः (योगी) तत्त्वतः न एव चलति. ॥२१॥

अर्थ–योगाभ्यासानें संयमित झालेलें चित्त जेव्हां कर्मांपासून उपरम पावतें, निवृत्त होतें, व जेव्हां तो आपण आपल्या ठिकाणीं आपल्या स्वरूपाला पाहूनच संतुष्ट होतो; ॥२०॥ आणि जेव्हां तो अनंत, बुद्धीला ग्रहण होण्यासारखें, व इंद्रियांना घेतां न येणारें जें सुख तें अनुभवितो, तेव्हां तो स्थिर झालेला योगी ब्रह्मस्वरूपापासून ढळतच नाहीं. ॥२१॥

म्हणून आसनाच्या बळानें जो आम्हीं खरा अभ्यास सांगितला,त्या योगानेंच या इंद्रियांचा झाला तर निग्रह होईल. ६४ एव्हवीं या योगसाधनानें जेव्हां इंद्रियांनाच वेध लागतो; तेव्हां आपल्या आपणच चित्त हें आत्म्याची भेट घेण्याकरितां जातें. ६५ चित्ताची धांव नेहमीं पुढें असते; ती मागें फिरून ज्या वेळेस चित्ताला आत्मदर्शन होतें, त्या वेळेस त्याला आत्मतत्त्वच मी आहें अशी ओळख पटते. ६६ ती ओळख झाल्यावरोबर तें सुखाच्या राज्यावर बसतें, आणि मग आत्मानंदांतच लय पावतें;६७आणि ज्यापेक्षां दुसरें अधिक कांहीं नाहीं,व ज्याला इंद्रियें कधीं जाणत नाहींत असें जें आत्मस्वरूप म्हणजे ब्रह्मरूप तें स्वतांच होऊन राहतें.६८

अन्वय–यं च लब्ध्वा अपरं ततः अधिकं लाभं न मन्यते; यस्मिन् स्थितः (योगी) गुरुणा अपि दुःखेन न विचाल्यते. ॥२२॥

अर्थ–आणखी, जो प्राप्त झाला असतांना योगी त्याहून दुसरा अधिक कोणताही लाभ मानीत नाहीं आणि कसलेंही महद्दुःख प्राप्त झालें तरी त्याचें चित्त स्वरूपानंदापासून ढळत नाहीं ॥ २२ ॥

मग अशी स्थिति झाल्यावर, मेरुपर्वतापेक्षांही मोठ्या दुःखाच्या भारानें देह दडपला असतां त्याच्या चित्ताला दुःख होत नाहीं; ६९ किंवा शस्त्रानें जरी देह तोडला, अथवा अग्नींत जरी पडला,तरी महासुखांत निमग्न झालेलें त्याचें चित्त जागृत होत नाहीं. ३७० याप्रमाणें आत्मसुखांत निमग्न झाल्यावर तो देहाची आठवण विसरतो; आणि असें अनिर्वाच्य ब्रह्मसुख प्राप्त झाल्यामुळें इतर गोष्टींचा त्याला विसर पडतो. ७१

अन्वय–तं दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितं विद्यात्; सः योगः अनिर्विण्णचेतसा निश्चयेन योक्तव्यः ॥२३॥

अर्थ–त्याला दुःखसंबंधाची ताडातोड करणारा योग असें जाणावें. तो योग प्रसन्न चित्तानें साधकानें निश्चयानें करावा ॥ २३ ॥

ज्या ब्रह्मसुखाच्या गोडीनें संसारांत गुंतलेलें मन इच्छेची आठवणच सोडतें,७२ जे योगाची शोभा, संतोषाचें केवळ राज्य, आणि ज्याच्याकरितां ज्ञानाची आवश्यकता, ७३ तें ब्रह्मसुख अभ्यासाचे योगानें मूर्तिमंत दिसूं लागतें; आणि दिसूं लागल्यावर तें पाहणारा तद्रूपच बनतो. ७४

अन्वय–सर्वान् संकल्पप्रभवान् कामान् अशेषतः त्यक्त्वा, मनसा एव इंद्रियग्रामं समन्ततः विनियम्य. ॥२४॥

अर्थ–संकल्पापासून उत्पन्न होणाऱ्या सर्व वासनांचा निखालस त्याग करून मनानेंच सर्व इंद्रियें सर्व बाजूंनीं जिंकून, ॥ २४ ॥

तथापि, अर्जुना, एकापरी हा योग सोपा आहे: संकल्पाचे पुत्र जे कामक्रोधादिक, त्यांचा नाश केल्यामुळें त्या संकल्पाला जेव्हां पुत्रशोक होईल, तेव्हांच तो साध्य होतो ! ७५ विषय लय पावले असें या संकल्पानें ऐकलें, व इंद्रियें नियमितपणानें वागतात असें पाहिलें, ह्मणजे याची छाती फुटून जाऊन हा जिवाला मुकतो, ७६ अशा रीतीनें वैराग्य प्राप्त झाल्यावर संकल्पाच्या यात्रा संपतात, आणि धैर्याच्या मंदिरांत बुद्धि ही सुखानें वास करते. ७७

अन्वय–धृतिगृहीतया बुद्ध्या शनैः शनैः उपरमेत्; मनः आत्मसंस्थं कृत्वा किंचित अपि न चिंतयेत् ॥२५॥ चंचलं अस्थिरं मनः यतः यतः निश्चलति, ततः ततः एतत् नियम्य आत्मनि एव वशं नयेत्. ॥२६॥

अर्थ–धैर्ययुक्तबुद्धीनें हळू हळू आत्मस्वरूपीं स्थिर व्हावें. याप्रमाणें मन स्थिर करून मग कशाचेंही चिंतन करूं नये. ॥ २५ ॥ [हें] अस्थिर व चंचल मन ज्या ज्या ठिकाणीं जाईल, तेथून तेथून त्याला निग्रहानें ओढून आणून आत्मस्वरूपींच लावावें. ॥ २६ ॥

बुद्धी धैर्या होय वसौटा । तरी मनातें अनुभवाचिया वाटा । हळु हळु करी प्रतिष्ठा । आत्मभुवनीं७८याही एके परी । प्राप्ति आहे विचारीं । हें न ठके तरी सोपारी आणिक ऐकें७९आतां नियमुचि हा एकला । जीवें करावा आपुला । जैसा कृतनिश्चयाचिया बोला । बाहेरा नोहे३८०जरी येतुलेनि चित्त स्थिरावे । तरी काजा आलें स्वभावें । नाहीं तरी घालावें । मोकलुनी ८१ मग मोकलिलें जेथ जाईल । तेथूनि नियमूचि घेऊनि येईल । ऐसेनि स्थैर्याचि होईल । साावियाचि कीं ८२

प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् । उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥२७॥

पाठीं केतुलेनि एके वेळे । तया स्थैर्याचेनि मेळें । आत्मस्वरूपाजवळें । येईल सहजें ८३ तयातें देखोनि आंगा घडेल । तेथ अद्वैतीं द्वैत बुडेल । आणि ऐक्यतेजें उघडेल । त्रैलोक्य हें ८४ आकाशीं दिसे दुसरें । तें अभ्र जैं विरे । तैं गगनचि कां भरे । विश्व जैसें ८५ तैसें चित्त लया जाये । आणि चैतन्याचि आघवें होये । ऐसी प्राप्ति सुखोपायें । आहे येणें ८६

युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः । सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥२८॥

या सोपिया योगस्थिती । उकलु देखिला गा बहुतीं । संकल्पाचिया संपत्ती । रुसोनियां ८७ तें सुखाचेनि सांगातें । आलें परब्रह्मा आंतौतें । तेथ लवण जैसें जळातें । सांडूं नेणे ८८ तैसें होय तिये मेळीं । मग सामरस्याचिया राउळीं । महासुखाची दिवाळी । जगेंसि दिसे ८९ ऐसें आपले पायवरी । चालिजे आपुले पाठीवरी । हें पार्था नागवे तरी । आन ऐकें ३९०

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि । ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥२९॥

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति । तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति३०

तरि मी तंव सकळ देहीं । असें एथ विचारु नाहीं । आणि तैसेंचि माझ्या ठायीं । सकळ असे ९१ हें ऐसेंचि संचलें । परस्परें मिसळलें । बुद्धी घेपे एतुलें । होआवें गा ९२ एऱ्हवीं तरी अर्जुना । जो एकवटलिया भावना । सर्वभूतीं अभिन्ना । मातें भजे ९३ भूतांचेनि अनेकपणें । अनेक नोहे अंतःकरणें । केवळ एकत्वाचि माझें जाणें । सर्वत्र जो ९४ मग तो एक हा मियां । बोलतां दिसतसे वायां । एऱ्हवीं न बोलिजे तरि धनंजया । तो मीचि आहें९५ दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडु जैसा । तो माझ्या ठायीं तैसा । मी तयामाजीं ९६ जैसा उदकाचेनि आयुष्यें रसु । कां गगनाचेनि मानें अवकाशु । तैसा माझेनि रूपें रूपसु । पुरुषु तो गा ९७

बुद्धीला धैर्याचा आश्रय मिळाला, म्हणजे मग ती मनाला हळू हळू ब्रह्मानुभवाच्या वाटेला लावून त्याची ब्रह्मस्वरूपीं स्थापना करते. ७८ या एका मार्गानें ब्रह्मप्राप्ति होते, आणि हेंही घडत नसल्यास याहीपेक्षां सुलभ असा दुसरा एक मार्ग सांगतों तो ऐक. ७९ साधकानें आपला एक नियम करावा कीं, एकदा केलेला निश्चय कधींही टाळावयाचा नाहीं. ३८० अशा निश्चयानें जर चित्त स्थिर झालें, तर आनायासेंच काम झालें; पण असें जर न होईल, तर त्या चित्ताला खुशाल स्वैर वर्तूं द्यावें. ८१ मग तें मोकळें सुटल्यावर जेथें जाईल तेथून निश्चय त्याला परत घेऊन येईल; आणि अशा रीतीनें तें तत्काल स्थिर होऊन राहील. ८२

अन्वय–प्रशांतमनसं शांतरजसं ब्रह्मभूतं अकल्मशं एनं योगिनं उत्तमं सुखं उपैति हि. ॥२७॥

अर्थ–ज्या योग्याचें चित्त समाधान पावलें आहे, ज्याचा रजोगुण नाहींसा झाला आहे, व जो ब्रह्मस्वरूप व निष्पाप झाला आहे, अशा ह्या योग्याला ब्रह्मसुख प्राप्त होतें. ॥ २७ ॥

नंतर अशा प्रकारें अनेक वेळां स्थिर राहण्यानें तें सहज आत्मस्वरूपाजवळ येईल; ८३ आणि त्या आत्मस्वरूपाला पाहून स्वतः तद्रूप होईल. मग अद्वैतामध्यें द्वैत हें बुडून जाईल, आणि ऐक्याच्या ते जानें हें त्रैलोक्य प्रकाशित होईल. (त्रैलोक्यभर ब्रह्मपद दिसूं लागेल.) ८४ आकाशांत उत्पन्न झालेलीं अभ्रें ज्या वेळेस नाहींतशीं होतात, त्यावेळेस जिकडे तिकडे शुद्ध आकाशच दिसतें; ८५ त्याचप्रमाणें, चित्त ब्रह्मांत लयाला जाऊन त्रैलोक्य ब्रह्मस्वरूप होणें ही प्राप्ति या उपायापासून सहज होते. ८६

अन्वय–एवं सदा आत्मानं युंजन् विगतकल्मषः योगी ब्रह्मसंस्पर्शं अत्यंतं सुखं सुखेन अश्नुते. ॥२८॥

अर्थ–याप्रमाणें निरंतर आत्मविषयक योग करणारा व पापरहित योगी ब्रह्माचा अनुभव ज्यांत आहे असें अत्यंत सुख अनायासानें मिळवितो. ॥ २८ ॥

मनांतील संकल्पविकल्प सोडून जे या सोप्या योगस्थितीचा पुष्कळ अनुभव घेऊन सुखी झाले, ८७ ते त्या सुखाच्या संगतीनें परब्रह्मपदास येऊन पोहोंचले. मीठ पाण्यांत मिळाल्यावर ज्याप्रमाणें पाण्याला सोडूं शकत नाहीं, ८८ त्याप्रमाणें, जीव आणि ब्रह्म यांचें ऐक्य झाल्यावर त्यांची स्थिति होते; आणि नंतर ब्रह्मानंदाच्या मंदिरांत महासुखाची दिवाळी तो सर्व जगास झाली आहे असें पाहतो. ८९ याप्रमाणें आपलेच पाय घेऊन आपले पाठीवर योगी चालतो. असा अवघड जो योग तो तुला घडत नसेल, तर तुला आणखी दुसरा उपाय सांगतों. ३९०

अन्वय–योगयुक्तात्मा सर्वत्रसमदर्शनः (पुरुषः) आत्मानं सर्वभूतस्थं आत्मनि च सर्वभूतानि ईक्षते. ॥२९॥ यः मां सर्वत्र पश्यति सर्वं च मयि पश्यति, तस्य अहं न प्रणश्यामि सः च मे न प्रणश्यति ॥३०॥

अर्थ–सर्वत्र समदृष्टि आहे असा योगयुक्त पुरुष सर्व भूतांमध्यें आपणच आहों व सर्व भतें आपल्यामध्यें आहेत असें पाहतो. ॥२९॥ सर्व भूतांमध्यें मला पाहतो, व माझ्या ठिकाणीं सर्व भूतें पाहतो, त्याच्या दृष्टीआड मी होत नाहीं व माझ्या दृष्टीआड तो होत नाहीं. [कारण दोघे एकरूप असतों.] ॥ ३० ॥

मी सर्वांच्या देहांत आहें आणि माझ्या ठिकाणीं सर्व आहे याविषयीं तर वाद नाहींच. ९१ अशा रीतीनें जग व ईश्वर हीं एकमेकांत मिसळलीं आहेत. परंतु त्याप्रमाणें साधकाच्या बुद्धीनें तसें पक्करलें पाहिजे एवढेंच. ९२ अर्जुना, एव्हवीं तरी, जो एकत्वभावनेनें सर्व भूतांचे ठिकाणीं मी व्यापक आहें असें मानून मला भजतो, ९३ व्यक्तिमात्राच्या अनेकत्वानें ज्याचे अंतःकरणांत अनेकत्व उत्पन्न होत नाहीं, आणि जो केवळ सर्व ठिकाणीं मीच व्यापक आहें असें जाणतो, ९४ तो आणि मी एक असें बोलणेंच व्यर्थ होय; एव्हवीं धनंजया, बोलून दाखविलें नाहीं, तरी त्याचें व माझें रूप एकच आहे. ९५ ज्याप्रमाणें दिवा आणि प्रकाश यांच्या एकत्वाची योग्यता असते, त्याप्रमाणें तो माझ्या ठिकाणीं व मी त्याचे ठिकाणीं आहें. ९६ जसें पाण्याचे योगानें गोडी किंवा गगनाच्या योगानें पोकळी यांचें अस्तित्व असतें, तसा माझ्याच रूपानें तो योगी रूपवान दिसतो. ९७

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः । सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ३१

जेणें ऐक्याचिये दिठी । सर्वत्र मातेंचि किरिटी । देखिला जैसा पटीं । तंतु एकु ९८ कां स्वरूपें तरी बहुतें आहाती । परी तैसीं सोनीं बहुवें न होती । ऐसी ऐक्याचळाची स्थिती । केली जेणें ९९ नातरी वृक्षांचीं पानें जेतुलीं । तेतुलीं रोपें नाहीं लाविलीं । ऐसी अद्वैतदिवसें पाहली । रात्री जया ४०० तो पंचात्मकीं सांपडे । तरी मग सांगं पां कैसेनि अडे । जो प्रतीतीचेनि पाडें । मजसीं तुके १ माझें व्यापकपण आघवें । गवसलें तयाचेनि अनुभवें । तरी न म्हणतां स्वभावें । व्यापकु जाहला २ आतां शरीरीं तरी आहे । परी शरीराचा तो नोहे । ऐसें बोलवरी होये । तें करूं काई ३

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन । सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ३२

म्हणोनि असो तें विशेषें । आपणपेंयासारिखें । तो चराचर देखे । अखंडित ४ सुखदुःखादि वर्में । कां शुभाशुभें कर्में । दोनी ऐसीं मनोधर्में । नेणेचि जो ५ हें समविषम भाव । आणिकही विचित्र जें सर्व । तें मानी जैसे अवयव । आपुले होती ६ हें एकैक काय सांगावें । जया त्रैलोक्यचि आघवें । मी ऐसें स्वभावें । बोधा आलें ७ तयाही देह एकु कीर आथी । लौकिकीं सुखदुःखी तयातें म्हणती । परी आम्हांतें ऐसी प्रतीती । परब्रह्माचि हा ८ म्हणोनि आपणपां विश्व देखिजे । आणि आपण विश्व होइजे । ऐसें साम्यचि एक उपासिजे । पांडवा गा ९ हें तूतें बहुतीं प्रसंगीं । आम्ही म्हणों याचिलागीं । जे साम्यापरौती जगीं । प्राप्ति नाहीं ४१०

अर्जुन उवाचः—

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन । एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिराम् ३३
चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् । तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ३४ ॥

तंव अर्जुन म्हणे देवा । तुम्ही सांगा कीर आमुचा कणवा । परि न पुरों जी स्वभावा । मनाचिया ११ हें मन कैसें केवढें । ऐसें पाहों म्हणों तरी न सांपडे । एऱ्हवीं राहटावया थोडें । त्रैलोक्य यया १२ म्हणोनि ऐसें कैसें घडेल । जें मर्कट समाधी येईल । कां राहा म्हणतलिया राहेल । महावातु १३ जें बुद्धीतें सळी । निश्चयातें टाळी । धैर्येसीं हातफळी । मिळऊनि जाय १४ जें विवेकातें भुलवी । संतोषासी चाड लावी । बैसिजे तरी हिंडवी । दाही दिशा १५ जें निरोधलें घे उवावो । जया संयमुचि होय सावावो । तें मन आपुला स्वभावो । सांडील काई १६ म्हणोनि मन एक निश्चळ राहेल । मग आम्हांसि साम्य होईल । हें विशेषेंही न घडेल । याचिलागीं १७

अन्वय–यः एकत्वं आस्थितः (सन्) सर्वभूतस्थितं मां भजति, सः योगी सर्वथा वर्तमानः अपि मयि वर्तते. ॥३१॥

अर्थ–जो योगी एकनिष्ठेनें सर्व भूतांत असलेल्या मला भजतो, तो कोणत्याही प्रकारें वागत असला तरी माझ्या स्वरूपाचे ठिकाणींच असतो. ॥ ३१ ॥

अर्जुना, ज्याप्रमाणें वस्त्रांत तंतु एक असतात, त्याप्रमाणें ज्यानें ऐक्याचे दृष्टीनें सर्व ठिकाणीं माझी व्याप्ति आहे असें जाणलें, ९८ किंवा पुष्कळ जरी अलंकार घातले तरी अनेकत्व नसणाऱ्या सोन्याप्रमाणें ज्यानें ऐक्यरूप पर्वताची स्थिति बनविली आहे, ९९ अथवा, जितकीं झाडाचीं पानें तितकीं रोपें लाविलेलीं नसतात, अशा अद्वैतप्रकाशानें ज्याची अज्ञानरात्र उजाडली आहे, ४०० तो पंचमहाभूतात्मक शरिरांत जरी सांपडला, तरी मग तो स्वस्वरूपास येण्याला कसा बरें प्रतिबंध पावेल ? कारण, अनुभवाच्या योगानें जो माझी एकता पावतो, १ त्याच्या अनुभवानें माझें सर्व ठिकाणीं व्यापकत्व आहे असें जाणलें आहे; मग 'तो सर्व व्यापक झाला' असें म्हटलेंच पाहिजे असें नाहीं, २ हें पहा–त्यानें जरी शरीर धारण केलें आहे तरी तो शरिराचा नाहीं. ही गोष्ट बोलून दाखवितां येण्यासारखी नव्हे; तेव्हां तिचें वर्णन करितां येईल काय? ३

अन्वय–अर्जुन, यः आत्मौपम्येन सर्वत्र सुखं वा दुःखं यदि वा समं पश्यति, सः योगी परमः मतः ॥३२॥

अर्थ–हे अर्जुना, जो योगी आपलेप्रमाणें सर्वत्र सुख आणि दुःख सारखें पाहतो, तो योगी परममान्य होय.३२

अर्थात् या विषयाबद्दल जास्त सांगणें नको. जो सदोदीत आपल्यासारखेंच सर्व जग मानतो; ४ जो सुख आणि दुःख यांचे विकार अथवा शुभ व अशुभ कर्में हीं दोन आहेत असें आपल्या मनांत समजत नाहीं, ५ हें सम आणि हें विषम असा भाव मनांत न धरतां, याशिवाय इतर सर्व विचित्र गोष्टी जो आपल्या शरिराच्या अवयवांप्रमाणें एकच आहेत, असें समजतो; ६ यापेक्षां आणखी काय काय गोष्टी सांगाव्या ? ज्याला सर्व त्रैलोक्य मीच आहे असें अनुभवानें समजलें आहे, ७ त्याला शरीर आहे ही गोष्ट खरी, आणि तो सुखःदुख भोगतो असें लोक देखील म्हणतात; तथापि आमच्या अनुभवानें तो परब्रह्मच आहे. ८ म्हणून, अर्जुना, ज्याच्या योगानें आपल्याच ठिकाणीं सर्व विश्व पाहतां येईल, आणि आपणा स्वतांःसच विश्वरूप होतां येईल, त्या समदृष्टीची तूं उपासना कर. ९ आम्ही तुला पुष्कळ प्रसंगीं याच कारणाकरितां असें सांगितलें आहे कीं, समदृष्टीपेक्षां या जगतांत दुसरी अधिक प्राप्ति कसली नाहीं. ४१०

अन्वय–मधुसूदन, त्वया अयं योगः साम्येन प्रोक्तः; अहं (मनसः) चंचलत्वात् एतस्य स्थिरां स्थितिं न पश्यामि. ३३ कृष्ण, मनः चंचलं प्रमाथि बलवत् दृढं (अस्ति), अहं हि तस्य निग्रहं वायोः इव सुदुष्करं मन्ये. ॥३४॥

अर्थ–अर्जुन म्हणाला, " हे मधुसूदना, तुम्हीं जो हा समत्वयोग सांगितला, तो, मनाच्या चंचलपणामुळें, माझ्यानें सतत घडेल, असें मला वाटत नाहीं. ॥ ३३ ॥ हे कृष्णा–मन हें अति चंचल–कोणताही बेत तडीस जाऊं न देणारें–बलवान व अभेद्य आहे,—त्याचा निग्रह करणें वायूप्रमाणें दुःसाध्य आहे असें मी मानतों. " ३४

मग अर्जुन श्रीकृष्णास म्हणतो, " देवा, तुम्हीं आमची दया मनांत आणून हा समतेचा मार्ग सांगितला, परंतु मनाच्या चंचल स्वभावापुढें आमचा टिकाव लागत नाहीं. ११ हें मन कसें आणि केवढें आहे असें पाहूं म्हटलें तर तें सांपडत नाहीं. एव्हढीं त्याला फिरण्याला त्रैलोक्यही पुरें होत नाहीं. १२ म्हणून, माकडाला समाधि लागणें किंवा मोठ्या वाऱ्याला स्थिर हो म्हणतांच तो थांबणें ह्या गोष्टी कशा घडतील ? १३ जें मन बुद्धीला छळतें, निश्चय मोडतें, आणि धैर्याचे हातावर हां हां म्हणतां तुरी देऊन निघून जातें, १४ जें विचाराला चकवितें, संतोषाला नादीं लावतें. आणि मनुष्य एके ठिकाणीं बसला तरी त्याला दशदिशा हिंडवितें, १५ ज्याला कोंडलें असतां तें उसळून बाहेर येतें, आणि निग्रह केला तर तो उलटा त्याला साध्य करतो, असें हें मन आपला स्वभाव सोडील का ? १६ म्हणून, एक मन जर स्थिर राहील, तर मग आम्हांला समदृष्टि प्राप्त होईल, परंतु मनाची अशीच चंचल वृत्ति असल्यामुळें ती प्राप्त होणें दुर्घट आहे. १७ "

श्रीभगवानुवाचः—

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् । अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥३५॥

तंव कृष्ण म्हणती साचचि । बोलत आहासि तें तैसेंचि । यया मनाचा कीर चपळचि । स्वभावो गा१८परि वैराग्याचेनि आधारें । जरि लाविलें अभ्यासाचिये मोहरें । तरि केतुलेनि एके अवसरें । स्थिरावेल१९कां जें यया मनाचें एक निकें । जें देखिले गोडीचिया ठाया सोके । म्हणोनि अनुभवसुखाचि कवातिकें । दावीत जाइजे

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः । वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥३६

एऱ्हवीं विरक्ति जयांसि नाहीं । जे अभ्यासीं न रिघती कहीं । तयां नाकळे हें आम्हीही । न मनूं कायी २१ परि यमनियमांचिया वाटा न वचिजे । कहीं वैराग्याची से न करिजे । केवळ विषयजळीं ठाकिजे । बुडी देउनी २२ यया जालिया मानसा कहीं । युक्तीची कांबी लागली नाहीं । तरी निश्चळ होईल काई । कैसेनि सांगें २३ ह्मणोनि मनाचा निग्रहो होये । ऐसा उपाय जो आहे । तो आरंभीं मग नोहे । कैसा पाहों २४ तरी योगसाधन जितुकें । तें अवघेंचि काय लटिकें । परि आपणपयां अभ्यासूं न ठाके । हेंचि ह्मण २५ आंगीं योगाचें होय बळ । तरि मन केतुलें चपळ । काय महदादि हे सकळ । आपु नोहे २६ तेथ अर्जुन ह्मणे निकें । देवो बोलती तें न चुके । साचचि योगबळेंसीं न तुके । मनोबळ २७ तरि तोचि योगु कैसा केविं जाणों । आह्मी येतुले दिवस याची मातुही नेणों । ह्मणोनि मनातें जी ह्मणों । अनावर २८ हा आतां आघवेया जन्मा । तुझेनि प्रसादें पुरुषोत्तमा । योगपरिचय आह्मां । जाहला आजी २९

अर्जुन उवाचः—

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः । अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ३७
कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति । अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥३८॥
एतन्मे संशयं कृष्ण च्छेत्तुमर्हस्यशेषतः । त्वदन्यः संशयस्यास्य च्छेत्ता न ह्युपपद्यते ॥३९॥

परि आणिक एक गोसांविया । मज संशयो असे साविया । तो तूंवांचूनि फेडावया । समर्थु नाहीं ४३० ह्मणोनि सांगें श्रीगोविंदा । कवण एकु मोक्षपदा । झोंबत होता श्रद्धा । उपायेंविण ३१ इंद्रियग्रामोनि निगाला । आस्थेचिया वाटा लागला । आत्मसिद्धीचिया पुढिला । नगरा यावया । ३२ तंव आत्मसिद्धि न ठकेचि । आणि मागुतें न येववेचि । ऐसा अस्तु गेला माझारींचि । आयुष्यभानु ३३ जैसें अकाळीं आभाळ । अळुमाळु सपातळ । विपायें आलें केवळ । वसे ना वर्षे ३४ तैसीं दोन्ही दुरावलीं । जे प्राप्ती तंव अलग

अन्वय–महाबाहो, असंशयं मनः चलं दुर्निग्रहं (अस्ति) कौंतेय, (तत्) तु अभ्यासेन वैराग्येण च गृह्यते. ॥३५॥

अर्थ–श्रीभगवान् म्हणालेः—हे महाबाहो, मन हें चंचल असून त्याचा निग्रह करणें खरोखर फार कठीण आहे, हें मी निःसंशय मानतों; पण, अर्जुना, वैराग्य व अभ्यास या दोहोंच्या योगानें तें स्वाधीन करून घेतां येतें.

तेव्हां श्रीकृष्ण म्हणतातः–तूं जें बोललास, तें खरोखर तसेंच आहे. या मनाचा स्वभाव खरोखरी चंचल आहे. १८ परंतु याला वैराग्याच्या आधारानें अभ्यासाच्या रस्त्याला लावलें, तर कांहीं अवकाशानें हें स्थिर होईल. १९ कारण, या मनाच्या ठिकाणीं एक,चांगला गुण आहेः ज्याची याला चटक लागेल, त्याच ठिकाणीं रहावयास हें सोकावतें! म्हणून कौतुकानें आत्मसुखाकडेसच याला वळवावें. ४२०

अन्वय–असंयतात्मना योगः दुष्प्रापः, वश्यात्मना तु यतता उपायतः अवाप्तुं शक्यः; इति मे मतिः ॥३६॥

अर्थ–जे मनाचा निग्रह करण्याचा अभ्यास करीत नाहींत, त्यांना योग प्राप्त होत नाहीं, परंतु जे अंतःकरण वश करून मनाचा निग्रह करण्याचा यत्न करतात, त्यांना उपायानें योग प्राप्त होतो, असें माझें मत आहे ॥३६॥

एन्हवीं ज्याला वैराग्य नाहीं, व जो कधीं अभ्यासही करीत नाहीं, त्याला हें मन आंवणार नाहीं असें आम्ही देखील कोठें मानीत नाहीं! २१ परंतु जो यम, नियम, प्राणायाम वगैरेंचा अभ्यास करीत नाहीं, ज्याला वैराग्याची कधीं आठवण होत नाहीं, आणि जो केवळ विषयरूप जलांत माशासारखी बुडी देऊन राहिला आहे, २२ आणि अशा प्रकारें विषयलंपट झालेल्या त्याच्या मनाला युक्तीची चिमट कधीं लागली नाहीं, त्याचें मन निश्चल कसें होईल सांग बरें? २३ म्हणून, मनाचा निग्रह करणें हा जो उपाय आहे, त्याला तूं आरंभ कर. मग तें कसें निश्चल होत नाहीं तें पाहूं! २४ तर योगसाधनें म्हणून जेवढीं आहेत, तेवढीं सर्व काय खोटीं आहेत? परंतु आपल्याला अभ्यास होत नाहीं असें म्हण. २५ जर योगसाधनांचें बळ अंगांत असलें तर मनाच्या चंचलतेची कथा काय? योगबलानें महत्तत्त्वादिक स्वाधीन होत नाहींत का? २६ तेव्हां अर्जुन म्हणतो, "देवा, आपण जें म्हणतां तें खरें आहे; खरोखर योगबलापुढें मनाचें बल टिकणार नाहीं; २७ तरी तो योग कसा आहे व कशा रीतीनें जाणावा त्याची गोष्ट इतके दिवस आम्हांस माहीत नव्हती, म्हणून मन हें अनावर आहे असें आम्ही म्हणत होतों. २८ हे पुरुषोत्तमा, तुमच्या प्रसादानें आमच्या सगळ्या जन्मांत आज योगाचा परिचय आम्हास झाला! २९

अन्वय–कृष्ण, श्रद्धया उपेतः अयतिः योगात् चलितमानसः योगसंसिद्धिं अप्राप्य कां गतिं गच्छति ? ॥३७॥ महाबाहो, ब्रह्मणः पथि अप्रतिष्ठः विमूढः सः उभयविभ्रष्टः (सन्) छिन्नाभ्रम् इव न नश्यति कच्चित्! ॥३८॥ कृष्ण, एतत् मे संशयं अशेषतः छेत्तुं अर्हसि; त्वदन्यः अस्य संशयस्य छेत्ता न हि उपपद्यते. ॥३९॥

अर्थ–अर्जुन म्हणालाः—हे कृष्णा, जो साधक श्रद्धेनें युक्त आहे, परंतु विशेष यत्न करीत नाहीं, ज्याचें मन योगापासून भ्रष्ट झालें असतां तो योगसिद्धीला न पावतां कोणत्या गतीला जातो? ॥ ३७ ॥ कृष्णा, ब्रह्ममार्गाचे ठिकाणीं स्थिर न होतां, मोहाला पावलेला योगी कर्ममार्ग व योगमार्ग या दोहोंपासून भ्रष्ट होऊन, तुटलेल्या ढगाप्रमाणें नाशाला पावत नाहीं काय? ॥ ३८ ॥ हे कृष्णा, या माझ्या संशयाचा निःशेष छेद करण्यास तुम्हीच योग्य आहां, तुमच्यावाचून या संशयाचा छेद करण्यास दुसरा कोणीही समर्थ नाहीं. ॥ ३९ ॥

" परंतु, हे प्रभो, आणखी एक संशय सहज उत्पन्न झाला आहे, तो फेडण्यास आपल्याशिवाय दुसरा कोणीही समर्थ नाहीं. ४३० म्हणून, गोविंदा मला सांगा कीं, कोणीएक मनुष्य मोक्षप्राप्तीकरतां भक्तियुक्त अंतःकरणानें उपायाशिवाय इच्छा करीत होता; ३१ इंद्रियरूपी गांवाहून निवून मोक्षरूपी गांवास जाण्याकरितां तो भक्तिरूप मार्गाला लागला ३२ तों, मोक्ष प्राप्त होत नाहीं, आणि परतही येववत नाहीं, अशा स्थितींत त्याचा आयुष्यरूपी सूर्य मध्येंच मावळला; ३३ सहज अकालीं आलेला लहान पातळ ढग ज्याप्रमाणें टिकत नाहीं व वृष्टिही करीत नाहीं, ३४ त्याप्रमाणें, ज्याला दोन्ही अंतरलीं, म्हणजे मोक्षप्राप्ति तर दूरच राहिली, आणि श्रद्धे-

ठेली । आणि अप्राप्तिही सांडवली । श्रद्धा तया ३५ ऐसा दोंला अंतरला कां जी । जो श्रद्धेच्या समाजीं । बुडला तया होजी । कवण गति ३६

श्रीभगवानुवाचः—

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते । न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥४०॥

तंव कृष्ण म्हणती पार्था । जया मोक्षसुखीं आस्था । तया मोक्षावांचूनि अन्यथा । गती आहे गा३७परि एतुलें हेंचि एक घडे । जें माझारीं विसावावें पडे । तेंही परि ऐसेनि सुरवाडें । जो देवां नाहीं३८एऱ्हवीं अभ्यासाचा उचलता ।पाउलीं जरी चालता । तरि दिवसाआधीं ठाकिता । सोहंसिद्धीतें ३९ परि तेतुला वेग नव्हेचि । म्हणऊनि विसावा तरी निकाचि । पाठीं मोक्षु तंव तैसाचि । ठेविला असे ४४०

प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः । शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ४१

ऐकें कवतिक हें कैसें ।जे शतमखा लोक सायासें । ते तो पावे अनायासें । कैवल्यकामु४१मग तेथिंचे जे अमोघ । अलौकिक भोग ।भोगितांही सांग ।कांटाळे मन ४२ हा अंतरायो अवचितां । कां वोढवला श्रीभगवंता । ऐसा दिविभोग भोगितां । अनुतापी नित्य४३पाठीं जन्मे संसारीं । परी सकळ धर्माचिया माहेरीं । लांबा उगवे आगरीं । विभवश्रियेचा४४जयातें नीतिपंथें चालिजे । सत्यधूत बोलिजे । देखावें तें देखिजे । शास्त्रदृष्टी ४५ वेद तो जागेश्वरु । जया व्यवसाय निजाचारु । सारासार विचारु । मंत्री जया ४६ जयाच्या कुळीं चिंता । जाली ईश्वराची पतिव्रता । जयातें गृहदेवता । आदि ऋद्धि ४७ ऐसी निजपुण्याची जोडी । वाढिन्नली सर्वसुखाची कुळवाडी । तिये जन्मे तो सुरवाडी । योगच्युतु ४८

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् । एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ४२ ॥
तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् । यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥

अथवा ज्ञानाग्निहोत्री । जे परब्रह्मश्रोत्री । महासुखक्षेत्रीं । आदिवंत ४९ जे सिद्धांताचिया सिंहासनीं । राज्य करिती त्रिभुवनीं । जे कूजती कोकिल वनीं । संतोषाच्या ४५० जे विवेकद्रुमाचे मुळीं । बैसले आहाति नित्य फळीं । तया योगियाचिया कुळीं । जन्म पावे५१मोटकी देहाकृती उमटे। आणि निजज्ञानाची पाहांट फुटे । सूर्यापुढें प्रगटे । प्रकाशु जैसा ५२ तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयातें ५३ तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे । मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ५४ ऐसें जें जन्म । जंबालागीं देव सकाम । स्वर्गीं ठेले जप होम । करिती सदा ५५ अमरीं भाट हो-

मुळें सोडलेल्या संसारासही तो मुकला, ३५ असा दोन्ही गोष्टींना जो मुकला, परंतु भक्तींत निमग्न झाला त्याला कोणती गति प्राप्त होते हें सांगा." ३६

अन्वय–पार्थ, इह अमुत्र (च) तस्य विनाशः न एव विद्यते; तात, कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं हि न गच्छति. ४०

अर्थ–श्रीभगवान् म्हणालेः—हे पार्था, असा योगभ्रष्ट पुरुष इहलोकाला व परलोकाला अंतरत नाहीं. बाबा, चांगलीं कृत्यें करणारा पुरुष दुर्गतीप्रत कधींही जात नाहीं.

तेव्हां श्रीकृष्ण म्हणालेः–पार्था, ज्याला मोक्षप्राप्तीची इच्छा आहे, त्याला मोक्षावांचून दुसरी गति आहे काय? ३७ परंतु त्याला मध्यंतरीं विश्रांति घ्यावी लागते एवढेंच काय तें! पण त्या विश्रांतींत त्याला जें सुख होतें तें देवांना सुद्धा मिळत नाहीं! ३८ एरव्हीं, जर ह्यानें अभ्यासाचीं पावलें जोरानें टाकिलीं असतीं म्हणजे झपाट्यानें अभ्यास केला असता तर दिवस (आयुष्य) मावळण्याच्या पूर्वीच हा मोक्षप्राप्तीच्या गावाला पोहोंचला असता! ३९ परंतु तितका त्याचा वेग नसल्यामुळें विसावा घेणें भाग पडलें, तथापि मागाहून तरी मोक्षप्राप्ति ही ठेविलीच आहे. ४४०

अन्वय–योगभ्रष्ट (पुरुषः) पुण्यकृतां लोकान् प्राप्य (तत्र) शाश्वतीः समाः उषित्वा शुचीनां श्रीमतां गेहे अभिजायते. ॥४१॥

अर्थ–योगभ्रष्टः पुरुष, महत्पुण्यानें प्राप्त व्हावयाचे जे इंद्रादिक लोक तेथे जाऊन व तेथें पुष्कळ वर्षें राहून नंतर [मृत्युलोकामध्यें] पवित्र व श्रीमत पुरुषाच्या कुलांत जन्मास येतो. ॥ ४१ ॥

अरे, हें कौतुक पहा—ज्या लोकांची प्राप्ति व्हावयास शंभर यज्ञ करणाऱ्या इंद्रालाही सायास पडतात, ते या मोक्षेच्छु पुरुषाला अनायासें प्राप्त होतात. ४१ मग तेथील निष्फळ न होणारे व अप्रतिम असे भोग भोगता भोगतां त्याच्या मनाला कंटाळा येतो! ४२ ते दिव्य भोग भोगीत असतां तेथें त्यास सुख होत नाहीं; व 'हें भगवंता, हें भोगाचें विघ्न माझ्यामागें कां लागलें?' असा तो निरंतर पश्चात्ताप करीत असतो. ४३ नंतर तो फिरून मृत्युलोकीं जन्म पावतो, पण सर्व धर्माचें माहेरघर अशा कुलांत जन्म पावतो; आणि शेत कापल्यावर पडलेल्या भातगोट्यांचें शेत जसें जोरानें फोंफावतें, तशी त्याच्या ऐश्वर्याची वृद्धि होते. ४४ जें कुल नीतिमार्गानें चालणारें, सत्य आणि पवित्र भाषण करणारें, आणि शास्त्ररीतीनें वागणारें, ४५ ज्या कुलांत वेद नित्य जागृत असतो, व स्वधर्माचें आचरण हा ज्याच्या कुलाचा व्यवसाय आणि सारासार विचार हाच मंत्री ४६ ज्या कुलांत चिंतेनें ईश्वरास वरिलें, (ज्या कुलाला चिंता ही ठाऊक नाहीं आणि वडील माणसें (पूज्य दैवत) हींच ज्याची संपत्ति, ४७ असें ज्या कुलानें पुण्य जोडलें आहे, व जेथें सर्व सुखाची समृद्धि आहे, अशा कुलांत तो योगभ्रष्ट पुरुष सुखानें जन्म घेतो ४८

अन्वय–अथवा धीमतां योगिनां एव कुले (जन्म) भवति; यत् ईदृशं एतत् जन्म तत् लोके दुर्लभतरं हि ॥४२॥ कुरुनंदन, तत्र (सः) तं पौर्वदेहिकं बुद्धिसंयोगं लभते; ततः (च) संसिद्धौ भूयः यतते. ॥४३॥

अर्थ–अथवा बुद्धिमान् योग्यांच्याच कुलामध्यें हा योगभ्रष्ट जन्माला येतो. कां कीं, अशा प्रकारचा जन्म ह्या लोकीं फार दुर्लभ आहे ॥ ४२ ॥ अशा योग्यांच्या कुलांत जन्म झाला म्हणजे त्याला पूर्वजन्मींची योगबुद्धि ह्या जन्मीं प्राप्त होते, आणि मग तो योगाच्या सिद्धीकरितां पुनः यत्न करतो ॥ ४३ ॥

अथवा ज्ञानरूप अग्नीमध्यें हवन करणारे, व अध्यात्म सिद्धांतांत निष्णात, आणि परब्रह्मरूप गांवचे वतनदार; ४९ जे एकमेवाद्वितीय या सिद्धांतांत नेहमीं निमग्न राहून त्रिभुवनाचें राज्य करतात, आणि संतोषरूप वनांत कोकिळासारखा मधुर ध्वनि करतात, ४५० आणि जे विचारवृक्षाच्या मुळापाशीं बसून ब्रह्मरूप नित्य फळाचें सेवन करतात, अशा योग्यांच्या कुलांत तो योगभ्रष्ट पुरुष जन्म घेतो. ५१ जन्म घेतल्यावर लहान वयांतच त्याच्या ठिकाणीं आत्मज्ञानाचा उजेड पडतो; व ज्याप्रमाणें सूर्य उगवण्याच्या अगोदर चहूंकडे प्रभा फांकते, ५२ त्याप्रमाणें, प्रौढ वयाची वाट न पाहतां ज्ञान हें त्याला बालपणींच वरतें. ५३ पूर्वजन्मीं सिद्ध झालेल्या बुद्धीच्या योगानें सर्व विद्या त्याला प्राप्त होतात व त्याच्या मुखांतून सर्व शास्त्रें स्वयमेव निघूं लागतात. ५४ असें जें उत्तम कुलीं जन्म, तें प्राप्त होण्याकरितां स्वर्गवासी देव देखील मनांत हेतु धरून नेहमीं जप, होम करीत असतात. ५५ पार्था, देवांनी स्तुति-

इजे । मग मृत्युलोकातें वानिजे । ऐसें जन्म पार्था गा जें । तें तो पावे ५६

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः । जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥

आणि मागील जे सद्बुद्धि । जेथ जीवित्वा जाहाली होती अवधि । मग तेचि पुढती निरवधि । नवी लाहे ५७ तेथ सदैवा आणि पायाळा । वरि दिव्यांजन होय डोळा । मग देखे जैसी अवलीळा । पाताळधनें ५८ तैसे दुर्भेद जे अभिप्राय । कां गुरुगम्य हन ठाय । तेथ सौरसेवीण जाय । बुद्धि तयाची ५९ बळियें इंद्रियें येती मना । मन एकवटे पवना । पवन सहजें गगना । मिळोंचि लागे ४६० ऐसें नेणों काय अपैसें । तयातेंचि कीजे अभ्यासें । समाधि घर पुसे । मानसाचें ६१ जाणिजे योगपींठीचा भैरवु । काय हा आरंभरंभेचा गौरवु । कीं वैराग्यसिद्धीचा अनुभवु । रूपा आला ६२ हा संसार उमाणितें माप । कां अष्टांगसामग्रीचें द्वीप । जैसे परिमळोंचि धरिजे रूप । चंदनाचें ६३ तैसा संतोषाचा काय घडिला । कीं सिद्धिभांडारींहूनि काढिला । दिसे तेणें मानें रूढला । साधकदशे ६४

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः । अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥

जे वर्षशतांचिया कोडी । जन्मसहस्रांचिया आडी । लंघितां पातला थडी । आत्मसिद्धीची ६५ म्हणोनि साधनजात आघवें । अनुसरे तया स्वभावें । मग आयतिये बैसे राणिवे । विवेकाचिये ६६ पाठीं विचारितया वेगां । तो विवेकुही ठाके मागां । मग अविचारणीय तें आंगा । घडोनि जाय ६७ तेथ मनाचें मेहुडें विरे । पवनाचें पवनपण सरे । आपणपां आपण मुरे । आकाशही ६८ प्रणवाचा माथा बुडे । येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे । म्हणोनि आधींचि बोल बहुडे । तयालागीं ६९ ऐसी ब्रह्मींची स्थिती । जे सकळा गतींसी गती । तया अमूर्ताची मूर्ति । होऊनि ठाके ४७० तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं । विक्षेपांचीं पाणिवळें झाडिलीं । म्हणोनि उपजतखेंवो बुडाली । लग्नघटिका ७१ आणि तद्रूपतेसीं लग्न । लागोनि ठेलें अभिन्न । जैसें लोपलें अभ्रें गगन । होऊनि ठाके ७२ तैसें विश्व जेथ होये । मागौतें जेथ लया जाये । तें विद्यमानेंचि देहें । जाहला तो गा ७३

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः । कर्मिभ्यश्चाऽधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन

जया लाभाचिया आशा । करूनि धैर्यबाहूंचा भरंवसा । घालीत षट्कर्मांचा धारसा । कर्मनिष्ठ ७४ कां जिये एक वस्तूलागीं । बाणोनि ज्ञानाची वज्रांगी । जुंझत प्रपंचेंशीं समरंगीं । ज्ञानिये गा ७५ अथवा निलागें निसरडा ।

पाठक होऊन मृत्यु लोकाचें वर्णन करावें असें जें उत्तम कुलीं जन्म, तें तो योगभ्रष्ट पुरुष पावतो; ५६

अन्वय–सः अवशः अपि तेन एव पूर्वाभ्यासेन ह्रियते; योगस्य जिज्ञासुः अपि शब्दब्रह्म अतिवर्तते. ॥४४॥

अर्थ–तेथें जन्म झाल्यावर, तो परतंत्र असला तरी पूर्वाभ्यासाचे बलानें [योगाकडे] ओढला जातो; आणि तो योगाविषयीं [नुस्ता] जिज्ञासु असला तरी देखील त्याला वेदाचरणाच्या फलापेक्षां विशेष फल मिळतें ४४

आणि ज्या पूर्वजन्मांत आयुष्याचा शेवट झाला होता, त्या वेळची सद्बुद्धि त्याला पुनः प्राप्त होते. ५७ त्यासमयीं आधींच दैववान्, पायाळू आणखी वर डोळ्यांत दिव्यांजन घातलेल्या पुरुषास जसें भूमींतील धन सहज दृष्टीस पडतें, ५८ त्याप्रमाणें, गुरुमुखाशिवाय न कळणाऱ्या कठीण अशा अभिप्रायाच्या ठिकाणीं त्याची बुद्धि अनायासें जाऊन पोहोंचते. ५९ इंदियें हीं आपण होऊन मनाच्या अधीन होतात, मन प्राणवायूंत ऐक्य पावतें, व तो प्राणवायु चिदाकाशांत मिळतो. ४६० आणखी काय गोष्टी असतील त्या असोत, परंतु योगाभ्यासही त्याला आपोआप प्राप्त होतो, आणि समाधिही त्याच्या मनाचें घर विचारीत येतो. ६१ जगाला आरंभ करणारी जी रंभा ह्मणजे पार्वती तिचा गौरव करणारा योगपीठीचा शंकरच कीं काय किंवा वैराग्यरूप सिद्धीचा मूर्तिमंत अनुभवच प्रकट झाला आहे कीं काय ! ६२ किंवा हें संसार मोजण्याचें मापच, अथवा अष्टांगयोगसाहित्याचें बेटच होय. सुगंधानेंच ज्याप्रमाणें चंदनाचे रूप धारण करावें, ६३ त्याचप्रमाणें, साधकदशेच्या योगानें हा इतका योग धैर्ययुक्त झालेला असतो कीं, संतोषाचा पुतळा बनविल्यासारखा किंवा सिद्धीच्या भांडारांतून काढल्यासारखा दिसतो. ६४

अन्वय–प्रयत्नात् यतमानः. संशुद्धकिल्बिषः योगी तु अनेकजन्मसंसिद्धः ततः परां गतिं याति. ॥४५॥

अर्थ–पण; नियमानें प्रयत्न करणारा, सर्व पातकांपासून मुक्त झालेला, व अनेक जन्म हाच प्रयत्न करीत आलेला योगी तर परमगतीप्रत प्राप्त होतो. ॥ ४५ ॥

कारण, कोट्यवधि वर्षांनीं हजारों जन्मांचा प्रतिबंध दूर करून तो आत्मसिद्धीच्या किनाऱ्यावर येऊन पोहोंचलेला असतो. ६५ ह्मणून सर्व साधनें त्याला स्वभावतःच प्राप्त होतात; आणि मग सहजच तो विचाराच्या गादीवर बसतो. ६६ नंतर, विचार करण्यामध्यें प्रबल असा विवेकही मागें राहतो; आणि अविचारणीय असें जें ब्रह्म, तें तो स्वतांच होतो. ६७ त्या ठिकाणीं मनाचे ढग नाहींतसे होतात; प्राणवायूचें हालणें बंद होतें; व आकाशही आपल्या ठिकाणीं लीन होतें. ६८ ॐकाराच्या अर्ध बिंदूंत प्रणव नाहींसा होतो. अशा रीतीचें त्याला अवर्णनीय सुख प्राप्त होतें, ह्मणून त्या ठिकाणीं बोलणेंच बंद होतें. ६९ मग सगळ्या गतींना गति देणारी जी ब्रह्मस्थिति, त्या निराकार स्थितीचें स्वरूपच तो बनून राहतो. ४७० त्यानें मागल्या अनेक जन्मांत, प्रतिबंध हाच कोणी पाण्यावरील मळ झाडून टाकलेला असतो, ह्मणून त्याची लग्नघटका त्याचा जन्म होतांच बुडते, ७१ आणि तद्रूपतेशीं शुभलग्न होऊन तो अभिन्नत्व पावतो. अभ्रें नाहींतशीं झालीं ह्मणजे ज्याप्रमाणें आकाशरूपच होऊन राहतात. ७२ त्याप्रमाणें, (विक्षेपादि विघ्नें नाहींतशीं झालीं ह्मणजे,) ज्यापासून विश्वाची उत्पत्ति होते व ज्या ठिकाणीं तें पुनः लय पावते, तें ब्रह्म तो या विद्यमान देहांत असतांनाच बनतो. ७३

अन्वय–योगी तपस्विभ्यः अधिकः (अस्ति); ज्ञानिभ्यः अपि अधिकः मतः; कर्मिभ्यः च अधिकः (अस्ति); तस्मात्, अर्जुन, त्वं योगी भव. ॥४६॥

अर्थ–तप करणाऱ्यांहून ज्ञान्यांहून व कर्म करणाऱ्यांहून योगी अधिक श्रेष्ठ आहे; ह्मणून, अर्जुना, तूं योगी हो. ॥ ४६ ॥

ज्या लाभाच्या आशेनें कर्मनिष्ठ पुरुष आपल्या बाहुबलाच्या भरंवशावर कर्ममार्गाच्या प्रवाहांत उडी घालतात, ७४ किंवा ज्या एका वस्तूसाठीं ज्ञानी पुरुष हे ज्ञानरूप कवच धारण करून समरांगणांत प्रपंचशत्रूंशीं झगडतात, ७५ अथवा ज्याच्या प्राप्ती-

तपोदुर्गाचा आडकडा । झोंबती तपिये चाडा । जयाचिया ७६ जें भजतियां भज्य । याज्ञिकांचें याज्य । एवं जें पूज्य । सकळां सदा ७७ तेंचि तो आपण । स्वयें जाहला निर्वाण । जें साधकांचें कारण । सिद्ध तत्त्व ७८ म्हणोनि कर्मनिष्ठां वंद्यु । तो ज्ञानियांसि वेद्यु । तापसांचा आद्यु । तपोनाथु ७९ पैं जीवपरमात्मसंगमा । जयाचें येणें जाहलें मनोधर्मा । तो शरीरीचि परी महिमा । ऐशी पावे ४८०म्हणोनि याकारणें । तूतें मी सदा म्हणे ।योगी होईं अंतःकरणें । पंडुकुमरा ८१

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना । श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे आत्मसंयमयोगोनाम षष्ठोऽध्यायः

अगा योगी जो म्हणिजे । तो देवाचा देव जाणिजे । आणि सुख सर्वस्व माझें । चैतन्य तो ८२ तेथ भजता भजन भजावें । हें भक्तिसाधन जें आघवें । तो मीचि जाहलों अनुभवें । अखंडित ८३ मग तया आम्हा प्रीतीचें । स्वस्वरूप बोलीं निर्वाचे । ऐसें नव्हे गा तो साचें । सुभद्रापती ८४ तया एकवटलिया प्रेमा । जरी पाडें पाहिजे उपमा । तरी मी देह तो आत्मा । हेचि होय ८५ ऐसें भक्तचकोरचंद्रें । त्रिभुवनैकनरेंद्रें । बोलिलें गुणसमुद्रें । संजयो म्हणे ८६ तेथ आदिलापासूनि पार्था । ऐकिजे ऐसीचि आस्था । दुणावली हें यदुनाथा । भावों सरलें ८७ कीं सावियाचि मनीं संतोषला । जे बोला आरिसा जोडला । तेणें हरिखें आतां उपलवला । निरूपील ८८ तो प्रसंगु आहे फुडा । जेथ शांत दिसेल उघडा । तो पालविजेल मुडा । प्रमेयबीजाचा ८९ जे सात्त्विकाचेनि वडपें । गेलें आध्यात्मिक खरपें । सहजें निडारले वाफे । चतुरचित्ताचे ४९० वरी अवधानाचा वाफसा । लाधला सोनयाऐसा । म्हणोनि पेरावया धिंवसा । श्रीनिवृत्तीसी ९१ ज्ञानदेव म्हणे मी चाडें । सद्गुरूनीं केलें कोडें । माथां हात ठेविला तें फुडें । बीजाचि वाइलें ९२ म्हणऊनि येणें मुखें जें जें निगे । तें संतांच्या हृदयीं साचचि लागे । हें असो सांगों श्रीरंगें । बोलिलें जें ९३ परि तें मनाच्या कानीं ऐकावें । बोल बुद्धीच्या डोळां देखावे । हे सांटोवाटीं घ्यावे चित्ताचिया ९४ अवधानाचेनि हातें । नेयावे हृदयाआंतौते । हे रिझवितील आयणीतें । सज्जनाचिये ९५ हे स्वहितातें निववितीं । परिणामातें जीववितीं । सुखाची वाहती । लाखोली जीवां ९६ आतां अर्जुनेंसीं श्रीमुकुंदें । नागर बोलिजेल विनोदें । तें वोंवियेचेनि प्रबंधें । सांगेन मी ४९७

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षष्ठमोऽध्यायः ॥ ६ ॥ श्लोक ४७, ओंव्या ४९७.

साठीं तपस्वी लोक हे निराधार व निसरडें झालेल्या अशा तपोरूप पर्वताच्या कड्यावरून प्रवास करितात, ७६ जें भजन करणारांच्या भजनाचें अधिष्ठान, अशा प्रकारें सर्वांस पूज्य, ७७ आणि जें साधकांचें सिद्धतत्त्व, तें निर्वाण परब्रह्म तो स्वतांच बनतो. ७८ म्हणून, तो कर्मनिष्ठांना वंद्य व ज्ञान्यांना विचारणीय आणि तपस्व्यांचा मूळ तपोनाथ होय. ७९ हें पहा—जीव व परमात्मा यांच्या संगमाच्या ठिकाणीं त्याच्या मनाचें ऐक्य झाल्याकारणानें, तो देही असूनही अशा योग्यतेस पावतो. ४८० म्हणून, अर्जुना, याच कारणास्तव, 'तूं योगी हो' असें मनापासून तुला मी नेहमीं सांगत असतों. ८१

अन्वय—सर्वेषामपि योगिनां (मध्ये) यः श्रद्धावान् मद्गतेन अंतरात्मना मां भजते, सः मे युक्ततमः मतः (अस्ति).

अर्थ—सर्व योग्यांमध्येंही, जो श्रद्धेनें माझ्याशीं ऐक्य पावून मला भजतो, तो मला परममान्य आहे. ॥ ४७ ॥

अरे, योगी म्हणजे देवांचा देव, माझें सर्व सुखाचें आगर, आणि केवळ माझा प्राण असें समज. ८२ त्याच्या ठिकाणीं भजन करणारा, भजनक्रिया व भज्यवस्तु ही भक्तीची त्रिपुटी त्याच्या अनुभवानें मीच झालों आहें. ८३ हे सुभद्रापते, मग त्याच्या आणि माझ्या प्रीतीचें स्वरूप वर्णन करितां येत नाहीं. तर असें समज कीं, तो म्हणजे प्रत्यक्ष मीच. ८४ अशा रीतीनें जें प्रेमाचें ऐक्य झालेलें असतें, त्याच्या तुलनेला उपमा पाहिजे असली तर मी देह व तो आत्मा याशिवाय दुसरी उपमा नाहीं! ८५ संजय म्हणतोः—राजा, भक्तरूप चकोराचा चंद्र किंवा सर्व त्रिभुवनाचा राजा व गुणाचा समुद्र जो श्रीकृष्ण परमात्मा, असें बोलला असतां ८६ तेथें पार्थाला पूर्वीपासून योगाचें ऐश्वर्य ऐकण्याची आस्था होतीच, ती पुनः दुप्पट झाली असें यदुनाथानें मनांत जाणलें;८७ आणि तें पाहून श्रीकृष्णाच्या मनांत सहज आनंद झाला कीं, मी जें सांगतों,तें प्रत्यक्ष पाहण्याचा अर्जुन हा आरसाच होय. तेव्हां आतां या आनंदाचे भरांत ते पुढील कथा सांगतील. ८८ तो प्रसंग पुढें असून त्यांत शांतिरस स्पष्ट दिसेल, व ज्ञानरूप बीजाचा मुढा उघडा होईल. ८९ जें ज्ञानबीज पेरण्याकरितां सत्त्वगुणाची वृष्टि होऊन, व आध्यात्मिक तापांचे गुंतडे वाहून जाऊन, चतुर श्रोत्यांच्या चित्ताचे वाफे सहज तयार झाले, ४९० त्यावर सोन्यासारखी अवधानाची घात साधल्यामुळें श्रीनिवृत्तिनाथांना तें ज्ञानरूप बीज पेरण्याची उत्कंठा उत्पन्न झाली. ९१ महाराज म्हणतातः—तें बीज पेरण्याकरितां सद्गुरूंनीं माझी मोठ्या कौतुकानें चाड्याच्या ठिकाणीं योजना केली, व माझ्या मस्तकावर हात ठेवला, तो हात ठेवला असें नव्हे, तर चाड्यांत बीजच घातलें. ९२ म्हणून, माझ्या मुखांतून जें जें कांहीं निघेल, तें संतांच्या मनाला रुचतें. हें असो; आतां श्रीरंग जें कांहीं बोलले, तें मी पुढें सांगतों. ९३ परंतु ते बोल मनाच्या कानानें ऐका, बुद्धीच्या डोळ्यानें बघा, आणि त्याचा ऊहापोह चित्तानें करा.९४ श्रवणाच्या हातानें हृदयांत सांठवा, म्हणजे ते सज्जनांच्या मनाला समविणारे होतील. ९५ ह्या बोलापासून नित्य आत्मप्राप्ति होईल, संकटांतून मुक्तता होईल, व जीवाला सुखप्राप्ति होईल. ९६ आतां, श्रीमुकुंद अर्जुनाला विनोदानें जें कांहीं सर्वोत्कृष्ट ज्ञान सांगतील, तें मी ओंवीरूपानें तुम्हांला सांगेन. ४९७